लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील
आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

अकरावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक एप्रिल, २०१३ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१३

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील
आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

अकरावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(८) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(९) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

(१०) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

* (१०अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(११) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१२) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१३) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१४) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१७) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१८) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(१९) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२०) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२१) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(२३) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२४) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

** (२५) रिक्त

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

*** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दि. ७ जानेवारी, २०१३ रोजी निमनियुक्ती केली.**

**** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने सन २००७-२००८ या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलेला अतिरिक्त खर्च व बचतीच्या रक्कमांचा तसेच इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानुसार समितीचा हा अकरावा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीने दिनांक २२ ऑगस्ट, २०१२, दिनांक २३ ऑगस्ट, २०१२, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२, दिनांक १२ सप्टेंबर, २०१२, दिनांक १३ सप्टेंबर, २०१२, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२, दिनांक २ जानेवारी, २०१३, दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी अपर मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य आणि कृषी विभाग व प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, वित्त, नियोजन, गृहनिर्माण, उद्योग, ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता, नियोजन (रो.ह.यो.), महिला व बालविकास व सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास), सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली. तसेच दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे प्रत्यक्ष भेट देऊन गृह, महिला व बालविकास, नगरविकास, सांर्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे. तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ४ एप्रिल, २०१३

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

( )

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	**अतिरिक्त खर्च नियमाकूल करणे -**	
	अतिरिक्त खर्च सन २००७-२००८	
	सन २००७-२००८	
(२)	**कृषी विभाग**	
	नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य.	
(३)	**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय (दुग्धव्यवसाय) विभाग**	
	शासकीय दुधशाळांमध्ये दुधसंकलन वाढविणे.	
(४)	**वित्त विभाग**	
	मुळ तरतूद शिल्लक असताना पूरक मागणी करणे.	
(५)	**उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग**	
	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उद्योग वसाहतीमध्ये स्थानिकांना प्राथम्यक्रमाने रोजगार उपलब्ध करणे.	
(६)	**उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग**	
	राज्यातील वीज निर्मितीसाठी इतर प्रकल्प राबविणे	
(७)	**नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग**	
	रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर विहिरी योजनांना निधी वाढविणे.	
(८)	**नियोजन विभाग**	
	आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करणे.	
(९)	**गृहनिर्माण विभाग**	
	शहरी गरीबांकरीता मुलभूत सोई उपलब्ध करणे.	
(१०)	**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**	
	विद्यापीठातील रिक्त पदांसंदर्भात	
(११)	**महिला व बालविकास विभाग**	
	चेंबूर येथिल बी.ओ.टी. तत्वावर बांधकाम करण्यास दिलेल्या भिक्षेकरी गृहासंदर्भात.	
(१२)	**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**	
	राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी विविध योजना राबवूनही गावांना/वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याबाबत.	
(१३)	**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**	
	गुणात्मक व दर्जेदार मराठी चित्रपटांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्याबाबत.	

अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे
सन २००७-२००८

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली /भांडवली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००७-२००८ च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

अ.क्र.	अनुदान/विनियोजनाचे नांव	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (दत्तमत)	एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (भारित)
(१)	(२)	(३)	(४)
	ए-महसूल लेख्यांवरील खर्च	**(रुपये)**	**(रुपये)**
	महसूल व वन विभाग		
१.	सी-३ व्याज प्रधान		१,२६,५३५
२.	सी-५ इतर सामाजिक सेवा	६,२०,७९,२९७	४,९१,०७८
३.	सी-६ नैसर्गिक आपत्ती	४४,५६,११,१६०	
४.	सी-७ वन		८०,३८६
	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स व्यवसाय विभाग		
५.	डी-२ सामाजिक सुरक्षा व कल्याण	६,७३,४०१	
६.	डी-४ कृषीविषयक सेवा		८६,६५९
	नगरविकास विभाग		
७.	एफ-२ नगरविकास व इतर प्रगत सेवा	२,१०,४५,९४,१३२	
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
८.	एच-३ गृहनिर्माण	४५,८४,४०,५४७	
९.	एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती		३,९१,५३,८२१
	ग्रामविकास व जलसंधारण विभाग		
१०.	एल-१ व्याजप्रदान		४४,३७,५०,९२२
११.	एल-५ नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे		३,७८,१५८

	गृहनिर्माण विभाग		
१२.	क्यू-१ व्याज प्रदान		८,०७,५२,१९४
१३.	क्यू-४ सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा	१,३६,१९५	
	आदिवासी विकास विभाग		
१४.	टी-२ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण	२,०७,७४,३५६	
	पर्यावरण विभाग		
१५.	यू-१ व्याज प्रदान		५८,५०,८३६
१६.	यू-३ सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा	३७,५०७	
	पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग		
१७.	वाय-४ लहान पाटबंधारे	४४,०६,२५३	
	एकूण ए महसूल लेख्यावरील खर्च	३,०९,६७,५२,८४८	५७,०६,७०,५७९
	बी- भांडवली लेख्यावरील खर्च		
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
१.	एच-११ शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे	७,६८६	
	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग		
२.	के-क्रमांक राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण विरहित		१,०१,८५,९४.०००
	अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग		
	एकूण बी महसूल लेख्यांवरील खर्च	**७,६८६**	**१,०१,८५,९४.०००**
	एकूण (ए) + (बी)	**३,०९,६७,६०,५३४**	**१,५८,९२,६४,५८९**

तळटीप : -- समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

कृषी विभाग

१ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य.

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क्र.डी-३ - "नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य" मधील प्रधान शीर्ष २२४५ - "नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य" व अनुदान क्र.डी-४ मधील कृषी विषयक सेवा या प्रधान शीर्ष, २४०१ - "पीक संवर्धन", २४०२ - "मृद जलसंधारण" २४१५ - "कृषि विषयक संशोधने व शिक्षण"** या शिर्षा अंतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र.डी-३ "नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य" (सर्व दत्तमत)

(रुपये हजारांत)

१.२	**प्रधान शिर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
			(२)	**(३)**	**(४)**
२२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य					
मूळ तरतूद	४,५०,००,०० १,९२,७०,००	}	६,४२,७०,००	५,१५,८६,४६	(-) १,२६,८३,५४
वर्षभरात परत केलेली रक्कम			...	....	....

१.३ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(रुपये लाखांत)

१.४	प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
			(२)	(३)	(४)
२२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य ०२ - पूर, चक्रीवादळे इत्यादी १०१ - अनुग्रह सहाय्य १०१ (००) (०२) इतर बाबी					
मूळ तरतूद पूरक	४,५०,००.०० १,९२,७०.०० }		६,४२,७०.००	५,१५,८६.४६	(-) १,२६,८३.५४

रुपये १२,६८३.५४ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

१.५ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००६-२००७ या वित्तीय वर्षामध्ये मार्च २००७ अखेर मंजूर करण्यात आलेल्या रु.५० कोटी आकस्मिकता निधीचे समायोजन सन २००७-०८ या अर्थसंकल्पित वर्षामध्ये करण्यात आल्यामुळे चालू वित्तीय वर्षात रु.५० कोटी बचत दिसून येते. त्या शिवाय रु. ७६.७१ कोटी निधी कापूस व धान पिकासाठी लाभार्थीच्या नावाने अचूक ७/१२ नसणे लाभार्थी परगावी असणे, वारस निश्चित नसणे, इतर हिस्सेदारांची संमती नसणे व मूळ अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त निधी उपलब्ध असणे. या कारणांमुळे अखर्चित राहिलेली आहे.

अनुदान क्र.डी-४ "कृषी विषयक सेवा"

(रुपये लाखांत)

१.६ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+) बचत (-)
		(२)	(३)	(४)
२४०१ - पीक संवर्धन ००१ - संचालन व प्रशासन ००१(००)(०७) - जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने				
मूळ तरतूद	३०,५३.१५	३०,५३.१५	२८,७८.६७	(-) १,७४.४८
पुनर्विनियोजन	.....			

१.७ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरीता अंतिम सुधारित तरतूद रुपये ३०५३.१५ लाख मंजूर करण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये २६७६.८३ लाख झाला. म्हणजेच अंतिम अनुदानापेक्षा रु.३७६.३२ लाखाने कमी झाला.

महालेखाकार कार्यालयाने योजनेवर रु.२८७८.६७ लाखांचा खर्च नोंदविला. याबाबत विभागाचे पत्र क्र.विनीले १००८/प्र.क्र.१००/लोलेस कक्ष दिनांक ३० मार्च २००९ अन्वये रु. २०१.८४ लाख वजा खर्चाचा चुकीच्या नोंदीचा दुरुस्ती प्रस्ताव महालेखाकार मुंबई कार्यालयास सादर करणेत आला असून तो महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. DC-2/MH-2401, 4402/NOE/2006-07 & 2007-08/100A, Dt. 20.12.2010 नुसार मंजूर करण्यात आला आहे.

अंतिमत: योजनेवर प्रत्यक्ष खर्च होऊनही अंतिम अनुदानापेक्षा रु.३७६.३२ लाखाने खर्च कमी दिसून येतो. चालू वित्तीय वर्षामध्ये काही जिल्हा परिषदांकडून समायोजन प्रस्ताव विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यामुळे योजनेवर बचत दिसून येते.

(रुपये लाखांत)

१.८ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
		(२)	(३)	(४)
२४०१ - पीक संवर्धन १०५ - खते व रासायनिक खते १०५(००)(२८) - विदर्भातील सहा जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेती तंत्रज्ञान अभियान (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)				
मूळ तरतूद पुनर्विनियोजन	७,९५.०० ३,०४.००	१०,९९.००	७,९९.३५	(-) २,९९.६५

१.९ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिता अंतिम सुधारित तरतूद र. १०९९.०० लाख मंजूर करण्यात आले. त्यापैकी योजनेवर विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.७९९.३५ लाख झाला म्हणजेच अंतिम अनुदानापेक्षा रु.२९९.६५ लाखाने कमी झाला.

महालेखाकार कार्यालयाने योजनेवर रु.७९९.३५ लाखांचा खर्च नोंदविला. शेतकरी वैयक्तिक विमा योजनेसाठी नव्याने विमा कंपनीची नियुक्ती करणेत आली. सदरहू रु.२९९.६५ लाखाची रक्कम त्यामुळे बचतीची रक्कम विमा योजनेकडे हस्तांतरित करणेत आली.

(रुपये लाखांत)

१.१०	प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
			(२)	(३)	(४)
२४०१ - पीक संवर्धन १०९ - विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण १०९(०१)(३०) कृषि विस्तारासाठी माहितीचे सहाय्य राज्य योजनांतर्गत योजना					
मूळ तरतूद	१,५०.००		१,५०.००	३२.०६	(-) १,१७.९४
पुनर्विनियोजन	....				

१.११ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिता अंतिम सुधारित तरतूद रु.१५०.०० लाख मंजूर करण्यात आली. तथापि सदरची योजना ही ७५:२५ पैकी राज्य हिश्याची असून त्याअंतर्गत राज्य हिश्यासाठी रु.३२.९९ लाख इतकेच उपलब्ध करुन देणेत आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३२.०६ लाख झाला. म्हणजेच राज्य हिश्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अंतिम अनुदानापेक्षा रु.०.९३ लाखाने कमी झाला.

महालेखाकार कार्यालयाने योजनेवर रु.३२.०६ लाखांचा खर्च नोंदविला. उर्वरित बचत ही प्रामुख्याने विहीत कालावधीत बीडीएस प्रणालीद्वारे तरतूद उपलब्ध होऊ न शकल्यामुळे झाली असून ती अंतिम अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प असल्याने कृपया ती क्षमापीत करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

१.१२	प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
			(२)	(३)	(४)
२४०१-पीक संवर्धन ११९ -फलोत्पादन व भाजीपाला पीके ११९(०३)(२३) कीडनाशक अंशतपासणी प्रयोगशाळेची स्थापना व बळकटीकरण (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)					
मूळ तरतूद		३,२५.००	३,२५.००	५०.००	(-) २,७५.००

१.१३ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिता अंतिम सुधारित तरतूद रू.३२५.०० लाख मंजूर करण्यात आले त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रू. ५०.०० लाख झाला. म्हणजेच अंतिम अनुदानापेक्षा रू.२७५.०० लाखाने कमी झाला. महालेखाकार कार्यालयाने योजनेवर रू.५०.०० लाखांचा खर्च नोंदविला.

अंतिमत: योजनेवर अंतिम अनुदानापेक्षा रू.२७५.०० लाखाने खर्च कमी झाला असून तो योजनेवर केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या प्रशासकीय मंजूरीनुसार प्रत्यक्ष खर्च करणेत आलेमुळे बचत दिसून येते. कृपया बचत क्षमापीत करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

१.१४ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
		(२)	(३)	(४)
२४०१ -पीक संवर्धन ११४ - तेलबियांचा विकास ११४(००)(०५) एकात्मिकृत तेलबियया आणि वनस्पती तेल विकास मंडळ पुरस्कृत कार्यक्रम (१०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम)				
मूळ तरतूद	१०.००	१०.००	---	(-) १०.००

१.१५ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिंता अंतिम सुधारित तरतूद रू.१०.०० लाख मंजूर करण्यात आले. तथापि केंद्र शासनाकडून वित्तीय वर्ष संपुष्टात येईपर्यंत प्रशासकीय मंजूरी प्राप्त होऊ न शकल्यामुळे योजनेवर बचत दिसून येते.

(रुपये लाखांत)

१.१६ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
		(२)	(३)	(४)
२४०१ पीक संवर्धन १०२ अन्नधान्य पीके १०२(००)(०९) तृणधान्य विकास				
मूळ तरतूद पुनर्विनियोजन	३,६०.९१ (-) १,५१.८९	२,०९.०२	१,९७.०६	(-) ११.९६

केद्र सरकारकडून कमी रकमेला मान्यता मिळाल्यामुळे पुनर्विनीयोजन/ प्रत्यार्पण याद्वारे रुपये १५१.८९ लाख इतका निधी काढणेत आला. रुपये ११.९६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००८)

१.१७ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिता केंद्र शासनाकडून प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे मूळ अनूदान विहित कालावधीत कमी करण्यात आले त्यामुळे योजनेवर अंतिम सुधारित अनुदान रु.२०९.०२ लाख ठेवण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२०४.७० लाख झाला व रु.४.३२ लाखाची बचत झाली.त्याबाबत चुकीच्या नोंदीच्या दुरूस्तीचा प्रस्ताव सादर करण्याचे अनावधानाने राहून गेले.

हीरवळीच्या खताचे बियाणे उत्पादन ही योजना सन २००७-०८ मध्ये नव्यानेच व अल्प प्रमाणात राबविण्यात आली. त्यामुळे रु.४.३२ लाखाची बचत झाली आहे. ही योजना प्रामुख्याने ठाणे, नासिक, पुणे, कोल्हापूर व नागपूर विभागात अल्प प्रमाणात राबविण्यात आली आहे. यामुळे बचत झालेली आहे. बचत मंजूर अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प असल्यामुळे कृपया क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

१.१८ **प्रधान शिर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
		(२)	**(३)**	**(४)**
२४०१ पीक संवर्धन ००१ संचालन व प्रशासन ००१(००)(१६) कृषि प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषि विस्तार-१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना				
मूळ तरतूद पुनर्विनियोजन	१,००.०० (-) ८४.००	१६.००	०.१२	(-) १५.८८

१.१९ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिंता केंद्र शासनाकडून वित्तीय वर्ष संपुष्टात येईपर्यत प्रशासकीय मंजुरी प्राप्त होऊ न शकल्यामुळे पुनर्विनियोजनाद्वारे रु.८४.०० लाख तरतूद कमी करण्यात आली व उर्वरित रक्कम ही सन ०६-०७ वर्षातील पुस्तकी समायोजन प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी ठेवण्यात आली.

सदरचा रु. ०.१२ लाख खर्च दर्शविण्यात आला आहे. याबाबत विभागाचे पत्र क्रमांक विनीले १००८/ प्र.क्र.१००/लोलेस कक्ष/दिनांक ३० मार्च, २००९ अन्वये वजा खर्चाचा चुकीच्या नोंदीचा दुरूस्ती प्रस्ताव महालेखाकार, मुंबई कार्यालयास सादर करणेत आला असून तो महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. DC-2/MH-2401, 4402/NOE/2006-07 & 2007-08/100A, Dt.20.12.2010 नुसार मंजूर करण्यात आला आहे.

(रुपये लाखांत)

१.२०	**प्रधान शिर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
			(२)	**(३)**	**(४)**
२४०१ - पीक संवर्धन १०२ - अन्नधान्य पीके १०२(००)(११)- तृणधान्य विकास कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना)					
मूळ तरतूद पूनर्विनियोजन		१०,८२.८३ (-) ४,५५.७३	६,२७.००	५,६२.८४	(-) ६४.१६

१.२१ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिंता अंतिम सुधारित तरतूद रुपये ६२७.०० लाख मंजूर करण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ६२७.०० लाख झाला. म्हणजेच अंतिम अनुदान इतकाच झाला. महालेखाकार कार्यालयाने योजनेवर र. ५३२.८४ लाखांचा खर्च नोंदविला. याबाबत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीचे चौथ्या तिमाहीकरितां अर्थोपाय आगाऊ रकमांशी करावयाचे समायोजन हे चालू वित्तीय वर्षात होऊ न शकल्यामुळे योजनेवर बचत दिसून येते.

(रुपये लाखांत)

१.२२	प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
			(२)	(३)	(४)
२४०१ - पीक संवर्धन ८०० इतर खर्च ८००(००)(०३) दारिद्र रेषेच्या वर आणण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य					
मूळ तरतूद पूनर्विनियोजन	८७,०१.३८ (-) ३,७६.३४	}	८३,२५.०४	२५,७२.१७	(-) ५७,५२.८७

१.२३ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिंता अंतिम सुधारित तरतूद रुपये ८३२५.०४ लाख मंजूर करण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ८३२५.०४ लाख झाला. म्हणजेच अंतिम अनुदान इतकाच झाला.

महालेखाकार कार्यालयाने योजनेवर र. २५७२.१७ लाखांचा खर्च नोंदविला. सन २००७-०८ या वित्तीय वर्षामंध्ये जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाचे चौथ्या तमाहीचे समायोजना माहे सप्टेंबर २००८ मध्ये झाल्यामुळे चालू वित्तीय वर्षात बचत दिसून येते.

(रुपये लाखांत)

१.२४ **प्रधान शिर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
		(२)	**(३)**	**(४)**
२४०१-पीक संवर्धन १०३ बी बियाणे १०३(००)(२३) निवडक गावात बियाणे उत्पादन कार्यक्रम - केंद्र पुरस्कृत योजना				
मूळ तरतूद पुनर्विनियोजन	३,००.०० (-) ६,७५.००	९,७५.८४	(-) २,७५.८४	(-) ६,१९.१६

कोणतेही विर्निदिष्ट कारण नमुद न करतां मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रुपये ६.७५ लाख एवढ्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली. रुपये ६१९.१६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

१.२५ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेकरिंता अंतिम सुधारित तरतूद रुपये ९७५.०० लाख मंजुर करण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये २७५.८४ लाख झाला. म्हणजेच अंतिम अनुदानापेक्षा रु.६१९.१६ लाखाने कमी झाला.महालेखाकार कार्यालयाने योजनेवर रु.२७५.८४ लाखांचा खर्च नोंदविला. अंतिमत: योजनेवर केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या प्रशासकीय व वित्तीय मंजुरीनुसार दिलेल्या बहुतेक लक्ष्याप्रमाणे खर्च करण्यात आल्या मुळे चालू वित्तीय वर्षात खर्च कमी दिसतो. तथापि, सदरची बचतीची रक्कम पुढील वर्षी खर्च करणेस केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त करुन घेण्यात आली आहे.

(रुपये लाखांत)

१.२६ **प्रधान शिर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
		(२)	**(३)**	**(४)**
२४१५ -कृषि विषयक संशोधन व शिक्षण ०१ पीक संवर्धन १२०(००)(०२) आणि (०७) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यपीठाला सहाय्यक अनुदान				
मुळ तरतूद पुनर्विनियोजन	३०,१६.९५ १,५०.००	३१,६६.९५	३०,१६.९५	(-) १,५०.००

रु. १५० लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता कोणतीही विनिर्दिष्ट कारण नमूद न करता मार्च, २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे करण्यात आलेली र. १५० लाख इतकी अतिरिक्त तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

१.२७ **ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात कृषी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या लेखाशिर्षाअंतर्गत योजनेअंतर्गत व योजनेतर कर्मचारी वृदांसाठी मिळून अंतिम अनुदान रु. ३१६६.९५ लाख मंजुर करण्यात आले त्यानुसार विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ३०१६.९५ लाख झाला आहे म्हणजेच रु. १५० लाखाची बचत झाली आहे.

सदर बचत रु. १५० लाखाचे देयक कोषागारात पारीत न झाल्यामुळे बचत दिसून येते. कृपया बचत क्षमापीत करण्यात यावी.

साक्ष :-

१.२८ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील कृषि व पदुम (कृषि) विभागाच्या मागणी क्रमांक डी-३ संदर्भात समितीने दि.२९ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रधान सचिव, कृषि विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी मागणी क्रमांक डी-३ अंतर्गत ४५० कोटी रुपयांची मुळ तरतूद होती. त्यातून १२६ कोटी रुपयांची जी बचत झाली आहे त्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विवरण पत्रात १२६ कोटी रुपयांची बचत दाखविण्यात आलेली आहे. ५० कोटी रुपये आकस्मिकता निधीचे समायोजन सन सन २००७-२००८ या अर्थसंकल्पित वर्षामध्ये करण्यात आल्यामुळे चालू वित्तीय वर्षात रुपये ५० कोटी रुपयांची बचत दिसून येते. सन २००६-२००७ मध्ये कापसावरील लाल्या रोगांसाठी १५०० रुपये प्रति हेक्टर्सप्रमाणे शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आली होती. सन २००७-२००८ मध्ये कापसासाठी ही रक्कम देण्यात आली. मार्च २००७ मध्ये विदर्भातील भातशेती करिता प्रती हेक्टरी रु.१०००/- मदत जाहीर करण्यात आली होती. मार्च महिन्यात ५० कोटी रुपये आकस्मिकता निधीतून काढण्यात आले होते. या रक्कमेची तरतूद पुढील अधिवेशनात करावी लागते म्हणून पावसाळी अधिवेशनात यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम ही नैसर्गिक आपत्तीशी निगडित असते. कापसावरील लाल्या रोगामुळे नुकसानभरपाई देण्यासाठी मागणी केली जाते. पिकाखाली असलेल्या क्षेत्रास हेक्टरी मदत द्यावयाची असते. यामध्ये बाधित कापसाचे क्षेत्र १५०० रुपये पर हेक्टर तसेच भाताचे क्षेत्र ९ हजार प्रमाणे मदत दिली जाते. यामध्ये काही वेळेस पूर्ण रक्कम मिळते तर काही वेळेस ती मिळत नाही. यामध्ये कृषी विभागातील कृषी अधिकाऱ्याकडून अंदाज वर्तवितला जातो. प्रत्यक्षात ७/१२ नुसार शेतकऱ्यांना मदतीचे वाटप केले जाते.

१.२९ हा विषय नैसर्गिक आपत्तीचा आहे. कारण लाल्या रोग, धान उत्पादक शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा ७/१२ मध्ये उल्लेख केलेला असतो. यामध्ये महसूल विभाग आणि कृषी विभाग हे एकत्रितपणे वारस निश्चित नसणे, अचूक ७/१२ नसणे, किती शेतकरी बाधित झालेले आहेत हे एका ठिकाणी बसून निश्चित करीत असतात, असे असेल तर मग ७/१२ च्या विषयाची काहीच आवश्यकता नसून यामध्ये ७/१२ वर ५ नावे असतील तर जो मूळ

मालक आहे, त्याला मदत दिली पाहिजे. यामध्ये रु.१००० हेक्टरी ही मदत दिली जात असून ती काही फार नसल्याचे सांगत समितीने नाराजी व्यक्त केली असता त्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पंचनाम्यावर आधारित रक्कमेचे वाटप केले जात नाही. नैसर्गिक आपत्तीमध्ये जेव्हा अतिवृष्टी होते तेव्हा प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे केले जातात, ७/१२ वरील यादी निश्चित केल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना रकमेचे वाटप केले जाते. या दोन्ही योजना पंचनाम्यावर आधारित नव्हत्या. ही योजना सरसकट जाहीर करण्यात आली. ७/१२ वर अंदाज निश्चित केले जातात. समितीने यासंदर्भात ७/१२ मध्ये लाभार्थ्यांचा वारसदार निश्चित नसणे, हिस्सेदार नसणे त्यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत असतात. ७/१२ असल्याशिवाय त्याचे नाव यादीत टाकले जात नाही. ज्यावेळी पेरणी केली जाते, त्यावेळी त्याची ७/१२ वर नोंद केली जाते. कापसावरील लाल्या रोगाचा विषय आहे. यामध्ये १२६ कोटी रुपये परत गेले आहेत. संबंधित शेतकऱ्यांना लाल्या रोगाचे पैसे मिळाले नाहीत. या गोष्टीला कोणते अधिकारी जबाबदार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी यादी अगोदर तयार होत नाही. मागणी केल्यानंतर आपल्या हातात यादी नसते. ढोबळमानाने क्षेत्र निश्चित केले जाते. १४ लाख हेक्टर भाताचे क्षेत्र आहे. त्याला १ हजार प्रमाणे रक्कम निश्चित केली जाते. हे झाल्यानंतर १४ लाख हेक्टरची यादी विभागाकडे येण्याची गरज असून शेतकऱ्यांचे स्वत:चे अकाऊंट असेल तर त्याच्या खात्यावर रक्कम जमा होणार आहे. यामध्ये जॉईंट अकाऊंट असेल तर अमुक एकाच्या खात्यावर रक्कम जमा करावी, अशा प्रकारची संबंधितांनी संमती देण्याची गरज आहे. दुर्देवाने अनेक ७/१२ हे जॉईंटली आहेत. अशा प्रकारची परिस्थिती कोकणामध्ये जास्त असल्याची माहिती दिली.

१.३० समितीने बुलढाणा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे कापसावरील लाल्या रोगामुळे झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानाची भरपाई मिळाली नसल्याबाबत विचारणा केली असता. विभागाने यामध्ये महसूल आणि कृषी विभागाचा संबंध येत असतो. योजना महसूल विभागाकडून निश्चित केली जाते आणि कृषी विभागाकडून मदत दिली जाते. महसूल विभागाकडे ७/१२ चा रेकॉर्ड आहे. त्यामुळे या ठिकाणी गोंधळ निर्माण होतो. यादी आल्याशिवाय मदत देता येत नाही. काही वेळेला यादी अपूर्ण असते. माझ्या भावाला संपूर्ण रक्कम मिळाली, मला मिळाली नाही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी असतात. त्यामुळे शासनाने

लाभार्थ्यांना नियमानुसार वाटप करण्याबाबतचे आदेश दिले होते. निम्मे क्षेत्र असेल तर निम्मी मदत दिली पाहिजे असे सांगितले.

१.३१ ज्ञापनामध्ये एका ठिकाणी परगांवी असे उल्लेख केला आहे त्याबाबत समितीने परगावीचा अर्थ काय आहे ? अशी विचारणा विभागीय सचिवांना केली असता त्यांनी डीसीसी बँकेच्या कार्यक्षेत्रात जेवढे भाताचे क्षेत्र आहे, तेवढी रक्कम डीसीसी बँकेत जमा होते. यामध्ये एखाद्या गावातील शेतकरी दुसऱ्या गावात गेल्यास ती रक्कम बँकेत तशीच पडून राहते असे स्पष्टीकरण केले. प्रत्यक्ष शेतकरी गावात हजर आहेत. त्यांचे नुकसान झालेले आहे. त्यांची ७/१२ वर नोंद आहे. शेतकरी हजर आहेत पण अशा त्यांना मदत मिळालेली नाही, असे असताना देखील विभागाने १२६ कोटी रुपये परत केले असल्याबाबत समितीने विभागाकडे विचारणा केली असता विभागाने १२६ कोटी रुपयांपैकी ५० कोटी रुपये आकस्मिकता निधीतून अग्रिमाद्वारे घेतले गेले आहेत. यामध्ये भातावरील आणि कापसावरील नुकसानभरपाईचा समावेश आहे. त्या वेगवेगळ्या रक्कमा आहेत. यामध्ये दोन हेक्टरीपेक्षा जास्त मदत द्यायची नाही, अशी अट त्यामध्ये आहे. यामध्ये ३ हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना २ हेक्टरचीच मदत मिळालेली असल्याची माहिती दिली.

१.३२ जिल्हावाईज किती निधी परत गेला तसेच ७/१२ मध्ये ५ नावे असतील तर समान मदत देण्याची गरज असल्याचे मत समितीने मांडले. यावर विभागाने कृषि विभाग प्राथमिक अंदाजावरून मदत देत असून अशा वेळी जॉईंटली मदत दिली पाहिजे. ५ हेक्टरमधील शेतकऱ्यांनी अमुक अमुक क्षेत्र असून त्यानुसार आम्हाला मदत दिली पाहिजे, अशी त्यांनी मागणी करण्याची गरज असल्याचे सांगितले.

१.३३ समितीने अतिवृष्टी झाल्यानंतर कृषी विभागाकडून नजरअंदाज वर्तविले जातात. अंदाजाप्रमाणे अभिप्राय पाठविण्याचे काम तहसीलदाराचे आहे. त्यानंतर प्रांत आणि जिल्हाधिकारी यांचे काम असते. १५ तारखेच्या आत यादी द्यायला सांगितले जाते. १० ते १२ गावे एका तालुक्यात असतात. कृषि खात्याकडून अंदाज द्यायला सांगितले जाते.

१.३४ शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची मदत मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. शासनाची मदत मिळविण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांना अनेक किचकट कार्यपद्धती पार पाडाव्या लागतात. यामध्ये कृषी आणि महसूल विभागाचा ताळमेळ बसत नाही. प्रत्येक वेळी दुष्काळामुळे कोणत्या

ना कोणत्या पिकाचे नुकसान होत असते याची सर्वांनाच कल्पना आहे. यामध्ये सरकारकडून जाहीर केली जाणारी मदत खालच्या शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही.

१.३५ अनेक वेळा तलाठी, सर्कल, प्रांत, तहसीलदार हे अधिकारी कार्यालयात बसूनच आणेवारी जाहीर करीत असतात आणेवारीची पध्दत ही ब्रिटीश काळापासून चालत आलेली आहे. यामध्ये आवश्यक तो बदल घडवून आणण्याची गरज आहे. सॅटेलाईटद्वारा नैसर्गिक आपत्तीचा अंदाज वर्तविला जाऊ शकतो. परंतु, प्रत्यक्षात लाभार्थ्याला लाभ मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये महसूल आणि कृषी विभागांचा आपापसात ताळमेळ नसल्यामुळे लाभार्थ्यांवर अन्याय होतो. आता दुष्काळी परिस्थितीमुळे राज्य शासनाने १२२ तालुके दुष्काळग्रस्त असल्याचे घोषित केले आहे. यामध्ये कृषी विभागाला देखील अचूक आकडेवारी देता आली नव्हती. याकरिता कृषी आणि महसूल विभागाने एक धोरण निश्चित करण्याची गरज असून अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नुकसानग्रस्त भागाचा सर्व्हे करुन संबंधित लाभार्थ्यांना मदत देण्याची गरज आहे. ५ - ६ भावांमध्ये एकच जण शेती करीत असतो. मालकी हक्क ज्याचा आहे, त्याला मदत दिली पाहिजे असा आपला कायदा आहे. पेरणी जो करीत आहे त्याला एकदाच मदत दिली पाहिजे. बटाई शेतीवाले सुध्दा असून एक नंबरला ज्याचे नाव असेल त्याला शासनाने मदत दिली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता. विभागाने यावर यामध्ये कायदेशीर अडचणी असल्याचे सांगितले. समितीने यावर सरकारची मदत शेतकऱ्यांना मिळत नाही, यामध्ये कायदेशीर अडचणी खूप आहेत. वारसा हक्काचे प्रश्न उपस्थित होतात. मालकी हक्काचे प्रश्न उपस्थित होतात. यामध्ये जाहीर केली जाणारी मदत ही कसणाऱ्या शेतकऱ्याला मिळतच नसल्याचे सांगितले. तसेच सदर परिच्छेदाच्या संदर्भात महालेखापाल यांना विभागाने माहिती दिली नसल्याची विचारणा केली असता विभागीय सचिवांनी यामध्ये ५० कोटी रुपयांच्या ॲडजस्टमेंटचा प्रश्न होता. तसेच महाराष्ट्रात केलेल्या सर्व्हेनुसार असे निदर्शनास आले आहे की, ३५५ तालुके आहेत. २१०६ रेव्हेन्यू सर्कलपैकी १२०० ठिकाणी रेनगेज स्टेशन्स बसविण्यात आली आहेत. भारतीय हवामान खाते पूर्ण देशाचा विचार करुन तालुकास्तरावरील आकडेवारी ग्राह्य धरते, अशी वस्तुस्थिती असल्याचे सांगितले. समितीने बऱ्याच ठिकाणी पर्जन्यमापन स्टेशन्स तालुका तहसीलाच्या बाहेर असतात. ही पर्जन्यमापन स्टेशन्स तालुक्याच्या गावातील पावसाची मोजणी करतात. त्यामुळे बाकीच्या

गावांतील पावसाच्या मोजणीचा समावेश त्यामध्ये होत नसल्याबाबत विचारणा केली असता यावेळी विभागाने या संदर्भात आता ५० कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर केलेला आहे. त्यानुसार येत्या ३ वर्षांत २१०६ महसूली क्षेत्राच्या ठिकाणी ऑटोमेटिक हवामान ठाणी उभारण्यात येणार आहेत. यासाठीची निविदा ११ जुलै रोजी काढलेली असून, ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये ही प्रक्रिया पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. शासन सार्वजनिक खाजगी भागीदारीमध्ये हा कार्यक्रम राबविण्यास तयार आहे. यामध्ये त्यांना जी माहिती उपलब्ध होणार आहे तो, त्यांना इतरत्र वापरता येतो. जसे की, पीक विमा कंपन्या ही माहिती त्यांच्याकडून विकत घेतात. राजस्थानमध्ये एका कंपनीने ११०० हवामान ठाणी उभारली आहेत. महाराष्ट्रात देखील अशी स्वत:च्या खर्चाने उभारलेली ३५० हवामान ठाणी असून, त्यांच्या कडील माहिती पिक विमा कंपन्या घेतात, अशी समितीला दिली माहिती दिली.

१.३६ यावर समितीने महसूली क्षेत्रनिहाय निविदा काढली आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागाने भारतीय हवामान खात्याची ४९ वेदर स्टेशन्स आहेत. त्यांची माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे. हायड्रॉलॉजी प्रोजेक्टचे, जलसंपदा विभागाची ८०० हवामान ठाणी आहेत. त्यांची माहिती संगणकावर उपलब्ध असल्याचे सांगितले. ती माहिती ग्राह्य धरता येते का ? तसेच आपल्या येथे किती क्षेत्रामध्ये पाऊस पडला याचा सर्व्हे कोण करते ? हे काम कृषी खात्याचे आहे का ? अशी विचारणा समितीने विभागाकडे केली असता विभागाने भारतीय हवामान खाते केवळ महाराष्ट्राचा नाही तर पूर्ण देशाचा विचार करुन माहिती प्रसिध्द करीत असते. काही राज्यांमध्ये तालुका स्तरावर पर्जन्यमापन स्टेशन्स आहेत. महाराष्ट्रात महसूली क्षेत्र स्तरावर पर्जन्यमापन स्टेशन्स उभारणार आहोत. तामिळनाडू राज्याची ग्रामपंचायत स्तरावर पर्जन्यमापन स्टेशन्स उभारण्याची तयारी आहे. कोईम्बतूर युनिर्व्हसिटीने या बाबतचा प्रोजेक्ट हाती घेतला असून त्या करिता राष्ट्रीय कृषी योजनेतून तरतूद उपलब्ध करुन दिली असल्याची माहिती समितीस दिली. तसेच स्वयंचालित हवामान ठाण्यांमध्ये सेन्सर असतो त्या द्वारे आर्द्रता सूर्यप्रकाश, वाऱ्याची दिशा याची नोंद केली जाते. केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे पर्जन्याबाबतची विश्वसनीय माहिती देण्याचे अधिकार भारतीय हवामान खात्याला असल्याचे सांगितले. यावर समितीने सध्या ती यंत्रणा नसल्याचे सांगितले यावर विभागाने आपल्याकडे सध्या १२०० स्टेशन्स आहेत. जलसंपदा विभाग आणि महसूल विभाग काही ठिकाणची

आकडेवारी गोळा करते तर काही ठिकाणची करत नाही. त्यांचा डेटा भारतीय हवामान खात्याला उपयोगी पडत नव्हता, कारण भारतीय हवामान खाते फक्त तालुका स्तरावरील माहिती घेत होते. ही गोष्ट माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी आदेश दिले की, आपल्या येथील माहिती वेळोवेळी गोळा केली पाहिजे. या करिता आता या वर्षीच्या जुलै महिन्यात कृषी सल्लागार नेमला असल्याचे सांगितले.

१.३७ समितीने काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. दुष्काळ जाहीर करण्याबाबतचे विभागाचे निकष काय आहेत ? दुष्काळ जाहीर झाल्यानंतर विभाग नुकसानभरपाई देते. त्यावेळेस आपल्याकडून शेतकरी बाहेरगावी गेले, सातबाऱ्याचा प्रश्न आहे अशा अनेक अडचणी सांगितल्या जातात. याबाबत विभागाकडे विचारणा केली असता विभागाने केंद्र शासनाच्या स्तरावर १३ व्या वित्त विभागाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय आपत्ती सहाय्य निधी निर्माण करण्यात आला. त्याच धर्तीवर राज्यामध्ये राज्य आपत्ती सहाय्य निधी निर्माण करण्यात आला. हे दोन्ही निधी सन २००६ च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्याप्रमाणे १३ व्या वित्त विभागाच्या शिफारशीनुसार निर्माण करण्यात आले. १३ व्या वित्त आयोगाने सन २००९ ते सन २०१४ या ५ वर्षांच्या कालावधीत कोणत्या राज्याला किती निधी मिळणार आहे, याची माहिती अहवालामध्ये दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याला या वर्षी ४८८ कोटी रुपये मिळणार आहेत. देशाच्या पातळीवर विचार केला तर साधारणपणे साडेचार हजार कोटी रुपयांचा निधी असेल तर त्यातील ७५ टक्के हिस्सा हा केंद्र शासनाचा असतो, तर २५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा असतो. राष्ट्रीय आपत्ती सहाय्य निधीमध्ये जमा असलेला निधी १०० टक्के खर्च केला जातो. परंतु, त्या अंतर्गत निधी हवा असेल तर अगोदर कोणता भाग दुष्काळग्रस्त आहे ते जाहीर करावे लागते. दुष्काळ आहे हे ठरविण्याबाबत दुष्काळ व्यवस्थापन मॅन्युअल तयार केले आहे. त्यामध्ये काही निकष नमूद केले आहेत. जसे की, एखाद्या गावातील पहिल्या दोन म्हणजे जून, जुलै महिन्यातील पावसाची आकडेवारी व पेरणीची आकडेवारी ५० टक्क्यांच्या आत असेल तर दुष्काळ जाहीर करता येतो. तसेच, सॅटेलाईट चित्राद्वारे हिरवळीचा राष्ट्रीय निर्देशांक तयार होतो. ती जर पॉईंट ४ ने कमी असेल तर त्याचा विचार केला जातो. पर्जन्यवृष्टिची आकडेवारी पाहिली जाते, पेरणीची आकडेवारी पाहिली जाते. या निकषाचा विचार करता ६९ तालुके दुष्काळग्रस्त ठरले. या व्यतिरिक्त १४९

तालुके असे होते की, जे अवर्षणग्रस्त होते. त्यांचा वेगळा विचार करावा लागेल या हेतुने ५० टक्क्यांपेक्षा कमी पेरणीची व पावसाची जी अट होती ती आता ७५ टक्क्यांपेक्षा कमी अशी करण्यात आली.

१.३८ सदर ५० किंवा ७५ टक्क्यांपेक्षा कमी आकडेवारी कशा प्रकारे काढली जाते ? अशी समितीने विचारणा केली. विभागाने फक्त खरीप पिकांच्या बाबतीत असेल तर, ५ वर्षांच्या सरासरीवरुन ही टक्केवारी काढली जाते. महाराष्ट्रामध्ये जवळपास ५००० गावे रब्बी पिकांची आहेत. एखादा भागातील २/३ एरिआ रब्बी पिकाचा असेल तर तो भाग रब्बी पिकाचा समजला जातो. एखाद्या भागातील २/३ एरिआ खरीप पिकाचा असेल तर तो भाग खरीप पिकाचा समजला जातो. सोलापूर जिल्हा रब्बी पिकाचा आहे तर पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयामध्ये काही गावांत रब्बी पीक घेतले जाते, अशी सविस्तर माहिती दिली. यावर समितीने एकूण क्षेत्राच्या २५ टक्के क्षेत्रावर खरीप पिकाची लागवड होत असेल तर, मग विभाग त्याची गणना कशी करते ? अशी विचारणा विभागाकडे केली असता विभागीय सचिवांनी त्या २५ टक्के क्षेत्राच्या ५० टक्के अशा प्रकारे गणना केली जाते. या बाबतचे अंतिम अंदाज काढल्यानंतर पैसेवारी जाहीर होते. पुणे, नाशिक, कोकणासाठीची पैसेवारी जाहीर करण्याची तारीख १५ सप्टेंबर आहे तर, विदर्भ आणि मराठवाड्यासाठीची तारीख ३० सप्टेंबर आहे. खात्यातर्फे हाच मुद्दा मांडला जातो की, आपण प्रथम प्राथमिक अंदाज काढतो. परंतु, केंद्र सरकारकडे प्रस्ताव घेऊन जायचे असेल तर, अगोदर दुष्काळ आहे की, नाही ते सांगावे लागते. केंद्र शासनाची टीम जेव्हा राज्यामध्ये पाहणीसाठी येते त्यावेळी आपल्या खात्याकडून पैसेवारी जाहीर झालेल्या गावांची यादी दिली जाते. परंतु, या यादीतील नावे कमी जास्त होऊ शकतात, अशी माहिती समितीला दिली.

१.३९ समितीने दुष्काळ व्यवस्थापन मॅन्युअलमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस व पेरणी ऐवजी ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस व पेरणीची अट नमूद नसल्याचे विभागास सांगितले असता पावसाची आकडेवारी पाहून सप्टेंबर अखेरीस अंतिम पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची यादी जाहीर होते. परंतु, त्यामध्ये देखील बदल होऊ शकतो. जसे की, मागच्या वेळेस या यादीमध्ये ७२०० गावे होती. तर या वर्षी ही संख्या १५००० गावांवर जाण्याची शक्यता आहे. दुष्काळाच्या बाबतीतील उपाययोजनांबाबत बोलावयाचे झाले तर, चाऱ्याचा प्रश्न सोडला तर

सर्व उपाययोजना सर्व गावांना लागू आहेत. दुष्काळ जाहीर करण्यात आला त्या बाबतची कारणे सांगावयाची झाली तर, चारा डेपो बंद करुन जनावरे छावण्या सुरु करावयाचे होते. ते कोठे सुरु करावेत, कोठे सुरु करु नयेत या बाबत विचार करावयाचा होता. केंद्र शासनाची टीम सप्टेंबरच्या अखेरीस किंवा ऑक्टोबर महिन्यामध्ये येते तोपर्यंत येथील पावसाचा हंगाम संपत आलेला असतो, असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

१.४० केंद्र सरकारचे दुष्काळ ठरविण्याबाबतचे प्रमाण ठरलेले आहेत, त्या बाबतचा निकष ठरलेला आहे. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. या दुष्काळाच्या निवारणासाठी केंद्र शासनाकडे ५ हजार कोटी रुपये इतकी मदत मागण्याचा निर्णय कॅबिनेट बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळाने या बाबतचा धोरणात्मक निर्णय घेताना, त्यांना हे माहीत नव्हते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी राष्ट्रीय आपत्ती सहाय्य निधीचे दुष्काळ ठरविण्यासाठीचे जे निकष आहेत ते संपूर्ण देशाचा विचार करता लागू केलेले असल्याने ते राज्याला पुरेसे नसल्याचे सांगत पूर, त्सुनामी, भूकंप अशा गोष्टींचा त्यामध्ये समावेश असून त्यातील काही बाबी लागूच होत नसल्याचे सांगितले. जसे की, १५ दिवसांसाठी पाणी आले तर लोकांना राहण्यासाठी छावणी उभारणे, बुडणाऱ्या लोकांना वाचविणे वगैरे याचा दुष्काळाशी संबंध नाही परंतु, अशा गोष्टी त्यामध्ये असल्याची माहिती समितीस दिली.

१.४१ Drought is also a kind of disaster but it is not added by the 13th Finance Commission. अशी विचारणा केली असता विभागाने, it is added असे उत्तर दिले.

१.४२ कृषी विभागाचा विनियोजन लेखा अहवाल सन २००७-२००८ चे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन पाहता विभागाने १०७६ कोटी रुपये मागितले, त्यापैकी ९९८ रुपये खर्च केले आणि बचत केली ७७ कोटी रुपयांची. त्यानंतर सन २००८-२००९ मध्ये २८४ कोटी रुपयांची व सन २००९-२०१० मध्ये २०९ कोटी रुपयांची बचत केली. सन २०१०-२०११ मध्ये परत ३८८ कोटी म्हणजे जवळपास ४०० कोटी रुपयांची बचत केलेली आहे. एकाच शीर्षाखाली ही सर्व बचत झाली असून ही माहिती उपलब्ध आहे. याचा अर्थ कृषी खात्याचे अंदाजपत्रक पाहिले तर सन २००७ चा अपवाद वगळता लागोपाठ ३ वर्षे पुरवणी मागणी मागून देखील २०० ते ३०० कोटी रुपयांची बचत केलेली दिसून येत असल्याचे नमुद करत राज्याच्या कृषी विभागामध्ये पीक विमा, खते व बि-बियाणे अनुदान, चारा डेपो, पाणीपुरवठा या सर्व समस्या असतांनाही कृषी

खाते व इतर खाते ठराविक रकमा प्रतीवर्षी शासनाला समर्पित करतात. खात्याच्या या रक्कम समर्पित करण्याच्या कृतीमुळे राज्याबाबतचे चित्र अतिशय आलबेल असल्याचे जाणवते. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती अतिशय वेगळी असून खात्यामध्ये विभागीय पातळीवर व जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर अनेक समस्या आहेत, तरीही खाते मात्र शासनाला अखर्चित रक्कम समर्पित करते. कृषी खात्यामध्ये जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर जो समन्वय साधला जाणे आवश्यक आहे, तो साधला जात नाही. कृषी खात्याच्या निरनिराळया योजनांच्या अंमलबजावणीबाबते तांत्रिक सर्वेक्षण केले असता, बऱ्याच योजना यशस्वीपणे राबविल्या जात नसल्याचे मत समितीने नोंदविले.

१.४३ विभागाने कृषी विषयक ९० टक्के योजना या केंद्र शासन पुरस्कृत आहेत. या योजनांकरिता केंद्र शासनाकडून जी अनुरूप अनुदान येणार असते, त्याबाबत राज्याच्या बजेटच्या दिवसापर्यंत खात्याला कोणतीही माहिती कळत नाही. अनेक वेळा अचानकपणे एखादी योजना परस्पर बंदही केली जाते. पुढील अर्थसंकल्पिय वर्षामध्ये कोणत्या योजना येणार आहेत, याचीही माहिती खात्याला कळत नाही. केंद्र शासनाच्या सहाय्य अनुदानाची रक्कम राज्य शासनाला बजेटच्या दिवसापर्यंत न कळल्यामुळे राज्य शासनाचा हिस्सा वित्त व नियोजन विभागाला ठरविता येत नाही. काही वेळा त्या त्या वर्षापुरती राज्य शासनाचा सहाय्य अनुदानामधील हिस्सा अतिरिक्त होतो. तो अतिरिक्त हिस्सा खाते शासनाकडे अर्थसंकल्पिय वर्षाअखेर समर्पित करते. काही वेळा योजनेच्या अंमलबजावणीच्या स्थितीबाबत विचारणा करण्याकरिता केंद्र शासनाची एक टीम येते. काही केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये तर राज्य शासनाचा हिस्सा केवळ २० टक्केच आहे. **स्कीम व नॉन स्कीम, प्लान व नॉन प्लान** अशा दोन्ही प्रकारच्या कामांमध्ये राज्य शासनाच्या एकूण बजेटच्या दीड ते दोन टक्के रक्कम फक्त कृषी विभागाला मिळते. कृषी विभागाकरिता ठोक रक्कम एकाच शीर्षा अंतर्गत अनुरुप अनुदान व योजनेतर खर्चाकरिता शासनाने ठरवून द्यावी असा प्रस्ताव विभागातर्फे तयार करण्यात येणार असल्याचे नमूद करत राज्य शासनाकडे या संदर्भातील केंद्र शासनाच्या सहाय्य अनुदानाबाबतचा अहवाल आहे. या अहवालामध्ये जीएन१ ते जीएन ४ पर्यंत हेड आहेत. या शीर्षांतर्गत राज्य शासनाच्या योजनांकरिता व कृषी विभागाच्या योजनांतर्गत खर्चांकरिता अर्थसहाय्य केले जात असल्याची माहिती विभागाने समितीस दिली. तथापि, कृषि विभागांर्तगत

कार्यान्वित असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत योजनांसाठी देण्यात येणाऱ्या राज्य हिस्स्यासाठी एकच योजना (Head) करण्याबाबतचा कृषि विभागाने तयार केलेला प्रस्ताव नियोजन विभागाने अमान्य केलेला असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.४४ समितीने राज्याच्या कृषी खात्याची परिस्थिती अतिशय आलबेल व आबाद आहे, असे चित्र निर्माण केले जाते व विभागाने आता जी माहिती दिलेली आहे, ती भयावह व गंभीर असून राज्य शासनाच्या एकूण बजेटच्या दीड ते दोन टक्के एवढीच रक्कम शेतीकरिता खर्च केली जात असल्याचे नमुद करत या संदर्भात इतर राज्याच्या कृषी विभागाचा अभ्यास केलेला आहे. जर राज्य शासनाचे बजेट १०० रुपयांचे आहे, तर कृषी विभागावर फक्त दीड ते दोन रुपये एवढाच खर्च केला जातो. ही परिस्थिती अतिशय गंभीर असल्याचे नमूद करत तीव्र खेद व्यक्त केला. तसेच केंद्र पुरस्कृत योजनांकरिता राज्य शासनाच्या वतीने अनुरुप अनुदान म्हणून एकत्रित निधीची तरतूद करण्यात यावी. इतर खात्यांमध्ये ज्याप्रमाणे एकत्रित व आकस्मिक निधीची तरतूद केली जाते त्याप्रमाणे तरतूद पाहिजे असे मत नोंदविले व नियोजन व वित्त खात्याला गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये कृषी खात्याने एकूण १५०० कोटी रुपये समर्पित केलेले आहेत यामुळे इतर राज्यांमध्ये व केंद्र शासनाच्या दृष्टीने असे चित्र निर्माण झाले की, राज्याचे कृषी खाते एकदम उत्तम आहे. प्रतीवर्षी सर्व योजनांची अंमलबजावणी करुन तसेच, सर्व समस्यांचे समाधान करुन काही कोटी रुपये शिल्लकही राहतात. पंरतु प्रत्यक्ष एकूण बजेटच्या दीड ते दोन टक्के एवढीच रक्कम कृषी खात्याकरिता राखून ठेवली जाते, अशी खंत व्यक्त केली.

१.४५ विभागाने चुकीच्या नोंदिचा प्रस्ताव व खर्चमेळ्याच्या माध्यमातून कृषी विषयक खर्च समितीच्या दृष्टीने अतिशय कमी आहे, असे निदर्शनास येत असल्याचे सांगितले. समितीने चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव आल्यानंतर त्याचा खर्चमेळा झाल्यानंतर मूळ खर्च लेख्यांमध्ये दिसून येतो. परंतु चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव लेखे बंद केल्यानंतर व छपाई झाल्यावर त्याचा काहीही उपयोग होत नाही. आक्षेप परिच्छेदांवरील पूर्तता विभागाने नियोजित वेळेमध्ये केले नाही तर छापील लेख्यांमध्ये चुकीचे हिशेब छापले जाऊ शकतात. वेळोवेळी पूर्तता करण्याची जबाबदारी विभागीय अधिका-यांची आहे. यावर महालेखाकार यांनी एकाउंट क्लोजिंग एवं प्रिंटिंग के बाद

के ये नोट ऑफ एरर हैं. अगर रिकन्सिलिएशन ठीक से होगा तो नोट ऑफ एरर की जरुरत ही नहीं पड़ेगी, असे मत नोंदविले.

१.४६ कृषी विभागाचे स्वतंत्र बजेट मांडले जाणार आहे, असे सभागृहामध्ये सांगण्यात आले होते. राज्य शासनाने शेतीकरिता एकूण बजेटच्या फक्त दीड ते दोन टक्के एवढीच रक्कम कृषी विभागाकरिता राखून ठेवलेली होती, असे असतांना एकूण बजेटच्या दीड ते दोन टक्के रकमेच्या आधारावर राज्य शासन कृषी विभागाचे वेगळे बजेट सादर करणार आहे का, तसेच तीन ते चार वर्षांपासून कृषि खात्याने एकूण १५०० कोटी रुपये शासनाला समर्पित केलेले आहेत, या रकमा शासनाने अन्य कोणत्या खात्याकडे वर्ग केलेल्या आहेत व एखाद्या खात्याने शासनाकडे समर्पित केलेली रक्कम ही केवळ पुस्तकी समायोजन असते का ? शासन किंवा नियोजन व वित्त खाते समर्पित रकमा कोणत्या विभागाकडे वर्ग करते, या संदर्भातील माहिती समितीसमोर विषद करण्यासंदर्भात सांगितले. कृषि विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात कृषि आयुक्तालयाकडून आवश्यक प्रस्ताव मागविण्यात आलेला असल्याचे विभागाने कळविले आहे. या संदर्भात अधिक माहिती देताना वित्त विभागाच्या सचिवांनी नमूद केले की, राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये योजना व योजनेतर खर्च समाविष्ट असतात. उदाहरणार्थ एखाद्या खात्याच्या विशिष्ट योजना व प्रकल्पाकरिता अर्थसंकल्पामध्ये १,८०,००,००० कोटी रुपये विर्निदिष्ट केलेले असतात. त्यावेळी राज्याच्या तिजोरीमध्ये प्रत्यक्ष तेवढा निधी अस्तित्वात असतो. संबंधित प्रकल्पाच्या टप्प्यानुसार त्यातील पैसे टप्प्याटप्प्याने दिले जातात, त्यानुसार तिजोरीमधील उपलब्ध निधीचा पुरवठा संबंधित खात्याच्या योजनांना पुरविला जातो. ज्या खात्यांनी त्यांची बचत समर्पित केलेली असेल तर तो पैसा त्या त्या वेळी आवश्यकतेप्रमाणे इतर खात्यांच्या योजनांकरिता वर्ग केला जातो.

१.४७ यावर बजेट जर २,४७,००,००० कोटी रुपयांचा असेल तर त्यावेळी शासनाच्या तिजोरीमध्ये तेवढे पैसे उपलब्ध असतीलच असे नाही. ते सर्व पैसे सर्व प्रकारच्या स्त्रोतांकडून उपलब्ध होणे बाकी असतात, असा याचा अर्थ होतो. अर्थसंकल्पामध्ये जेवढया रकमांची घोषणा होते, तेवढे पैसे तिजोरीमध्ये जमा नसतात. याचाच अर्थ असा होतो की, केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे बजेट हे फुगीर बजेट असते. महानगरपालिकेचे बजेट जर

योजना योजनेतर खर्चांकरिता कमी पडत असेल तर ते चटकन जकात कर वाढविण्याचा निर्णय घेऊन रक्कम समायोजित करतात. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये अचानक करवाढीचा निर्णय घेणे शक्य नसतो. विनियोजन लेख्यांद्वारे योजनांना व पुरवणी मागण्यांकरिता मंजूरी घेतली जाते. अर्थसंकल्पीय वर्षांच्या शेवटी महालेखापालांकडून लेखे बंद होतात. विनियोजन लेख्यांच्या माध्यमातून विभागीय महत्वाचे खर्च आपल्या नजरेसमोर येतात, असे समितीने अभिप्राय व्यक्त केले.

१.४८ परिच्छेद क्रमांक डी-४ "कृषी विषयक सेवा"संदर्भात विभागीय सचिवांनी, राज्य शासन व केंद्र शासन एकत्रितपणे ज्या योजना राबवित असते. त्या योजनांचा निधी जर केंद्र शासनाकडून आला नाही तर राज्य शासनाने दिलेली अनुरूप अनुदाने व केंद्रशासनाकडून अभिप्रेत असलेला पंरतु न प्राप्त झालेला निधी बचत म्हणून या लेखापरीक्षणामध्ये दिसून येतो. प्रत्यक्षात तो राज्य शासनाला केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला नसतो. राज्य शासनाची अनुरूप अनुदान व केंद्र शासनाकडून अपेक्षित असलेला निधी हा लेखापरीक्षणामध्ये अखर्चित दिसून येतो. पूर्वी जिल्हापरिषद स्तरावर अर्थोपाय या शीर्षाखाली शासन जिल्हा परिषदांना निधी देत असे. या निधीमधून जिल्हापरिषदेची सर्व खाती आपापली कामे करुन घेत होती. जिल्हापरिषदेला उपरोक्त मथळयाखाली दिलेल्या निधीचे विनियोजन कशा प्रकारे करण्यात आलेले आहे, जिल्हापरिषदेला देण्यात येणा-या या सर्व खर्चाचे महालेखाकार यांच्याकडे विभागामार्फत खर्चमेळा करण्यात येत नाही. दिनांक ३० जूनपर्यंत जिल्हापरिषदेच्या अर्थसंकल्पीय खर्चाचे खर्चमेळ्याचे काम जिल्हापरिषदेच्या विविध खात्यांमार्फत व शासनाच्या खात्यामार्फत विहित वेळमर्यादेमध्ये करण्यात येत नाही. लेखापरीक्षणामध्ये हा सर्व खर्च अखर्चित दिसत असल्यामुळे विभागीय खर्चामध्ये अनियमितता असल्याचे असे चित्र निर्माण होते. असे समितीस सांगितले.

१.४९ मात्र ग्रामविकास विभाग जिल्हापरिषदेला वर्ग केलेल्या निधीचे खर्चमेळ्याचे काम ठराविक वेळेमध्ये करणार आहे. याबाबतच्या आक्षेप परिच्छेदांचे उत्तरही महालेखाकार यांच्या कार्यालयाला देण्यात येणार आहे. सदर निर्णय सन २००८ मध्ये घेण्यात आला होता. परंतु सदर आक्षेप परिच्छेद हा सन २००६-२००७, सन २००७-२००८ मधील आहे. यामुळे या परीक्षण अहवालामध्ये विभागीय खर्चामध्ये अनियमितता दिसून येत नाही. विभागाने जिल्हापरिषदेकडे

वर्ग केलेल्या पैशांचे खर्चमेळ्याचे काम करण्यात आलेले नाही. या लेखा परीक्षणामध्ये ६०,९६,००,००० रुपये अखर्चित दाखविण्यात आलेले आहेत. विभागीय बचत म्हणून उपरोक्त रक्कम गणली जात आहे. परंतु प्रत्यक्षात ही केंद्र शासनाच्या अनुरूप अनुदानाच्या अनुषंगाने राज्य शासनाने केलेली तरतूद होय. केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये राज्य शासन अनुरूप अनुदानाकरिता तरतूद करीत असते. राज्य शासनाची तरतूद खर्च झालेली असते. परंतु केंद्र शासनाचे अनुरूप अनुदान प्राप्त झालेल नसल्याने राज्य शासनाने केलेली तरतूदही अखर्चित दाखविण्यात आलेली असते, परंतु ती प्रत्यक्षात ती खर्च झालेली असते. जिल्हापरिषदेच्या विविध खात्यांनी शासनाच्या संबंधित विभागांशी त्या त्या कामासंदर्भात वेळोवेळी समन्वय साधून कामे केली तर महालेखाकारांच्या आक्षेप परिच्छेदासंदर्भात व चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावा संदर्भात विभागाला खर्चमेळा करणे सुकर होते असा विभागाने खुलासा केला यावर समितीने समाधान व्यक्त केले. विभागाने काही ठिकाणी चुकीच्या रकमांची नोंद चुकीच्या शीर्षकाखाली झालेली आहे. चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावानुसार उपरोक्त परिच्छेदांमध्ये एकूण ८६ बाबी आहेत. परंतु प्रत्यक्षात एवढया बाबींवरील खर्च प्रलंबित नाही. प्रत्यक्ष खर्च व लेखी पुस्तकांमधील नोंदी यामध्ये वेळेप्रमाणे ब-याच तफावती आहेत. सुधारित खर्चानुसार लेखी अभिलेख्यांमध्ये वस्तुस्थिती दर्शक नोंदी करणे आवश्यक आहे. जिल्हापातळीवर व तालुका पातळीवर डी.डी.ओ. व ए.डी.ओ. पातळीवरील लेखा अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी शासकीय निधी व अनुदानाच्या खर्चाचे व बचतीचे विवरण संबंधित शासकीय विभागांना सादर करणे क्रमप्राप्त आहे, अशी माहिती समितीला दिली.

१.५० विभागाच्या चुकांचे समर्थन पूर्णपणे जिल्हापातळीवरील यंत्रणेवर करणे योग्य नाही. विभागीय अधिका-यांनीही त्यांनी वेळेवर न केलेल्या कामाची जबाबदारी घेणे अधिक संयुक्तिक ठरेल. केंद्र पुरस्कृत योजनांमधील केंद्राकडून अभिप्रेत असलेल्या निधीचे पुनर्मुल्यांकन होणे अधिक आवश्यक आहे, असे मत समितीने मांडले. यावर केंद्राकडून अपेक्षित असलेल्या निधीचे पुनर्मुल्यांकन विहित कालावधीमध्ये झाल्यानंतरच तो निधी ग्रामीण पातळीवर खर्च करता येतो. त्यामुळे केंद्राकडून येणा-या निधीचे पुनर्मुल्यांकन विहित वेळेमध्ये होत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.५१ चुकीच्या शीर्षाखाली चुकीच्या नोंदीबाबत विभागीय पातळीवरील व जिल्हा पातळीवरील सर्व अधिका-यांना आपण नोटीसा देऊन त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्याची नोंद घ्यावी. अन्यथा त्यांच्याकडून या चुकांबाबत स्पष्टीकरणाकरिता कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात यावी असे आदेश समितीने दिले. तसेच दीर्घकाळ चालणा-या व्यवहारांव्यतिरिक्त इतर साध्या व्यवहारांची नोंद विभागीय व जिल्हा पातळीवरील लेखा अधिका-यांनी योग्य हेडअंतर्गत अचूकपणे करु शकले पाहिजे. अधिका-यांनी केलेल्या चुकांची जबाबदारी निश्चित करुन नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई वेळेवर केली तर जिल्हा व तालुका पातळीवर हा कारवाईचा शिस्तीचा संदेश पोहोचेल. तसेच, यामुळे सर्व पातळीवरची यंत्रणा अधिक सक्षमपणे व अचूक काम करण्याचा प्रयत्न करेल. तरी संबंधित अधिका-यांनी केलेल्या चुका संदर्भात योग्य ती कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत देखील समितीने मांडले. समितीने सुचविल्याप्रमाणे संबंधित अधिका-यांना विभागातर्फे ज्ञापन पाठविण्यात आले असल्याचे तसेच चौकशीनंतर नियमाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगत जिल्हा पातळीवरील खर्चाबाबतच्या खर्चमेळा करण्याची पध्दत बदलण्यात आली असून आता यापुढे हा चुकीच्या नोंदीच्या प्रस्ताव, खर्चमेळा,छापील लेखे व त्यामधील त्रूटींचा प्रश्न उद्‌भवणार नाही, असे विभागाने समितीला आश्वासन दिले.

१.५२ विदर्भातील सहा जिल्हयांमधील शेतक-यांसाठी सेंद्रिय शेती तंत्रज्ञान अभियान योजना राबविण्यात येत आहे. त्याची थोडक्यात माहिती द्यावी व शेतकरी वैयक्तिक विमा योजनेसाठी नव्याने कोणत्या विमा कंपनीची नियुक्ती करणेत आली आहे व केव्हा तसेच विदर्भातील सहा जिल्हयातील शेतक-यांच्या विमा योजनेची सद्य:स्थिती काय आहे? सेंद्रीय खते वापरल्यामुळे ज्या भागामध्ये शेती व्यवसायामध्ये फायदा झालेला आहे, संबंधित भागातील शेतक-यांच्या आत्महत्या थांबलेल्या आहेत का ? समितीच्या या प्रश्नावर अमरावती विभागातील पाच जिल्हयांमध्ये सेंद्रीय खतांचा वापर प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आला होता. आता त्या भागामधील शेती व्यवसायामध्ये सेंद्रीय खताचा वापर वाढलेला असून शेतक-यांचा खतावरील खर्च अतिशय कमी झालेला आहे. खतांवरील खर्चाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतक-यांवरील कर्जाचा बोजा कमी झालेला आहे. सेंद्रीय खतांमुळे शेती उत्पादनामध्ये वाढ झाल्यामुळे शेतक-याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झालेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

रासायनिक व सेंद्रीय खतांमधील फरक स्पष्ट करताना विभागाने असे सांगितले कि, रासायनिक खते म्हणजे ज्या खतांमध्ये रासायनिक मुलद्रव्ये व इतर घटकद्रव्यांचा वापर करुन बनविलेली खते होय. सेंद्रीय खते म्हणजे बायोलॉजिकल वेस्टेज कुजवून त्यातून निर्माण झालेले खत होय. सेंद्रीय खताचा वापर शेतक-याच्या खिशाला शेत जमिनीला परवडणारा असतो. सेंद्रीय शेतीला नॉन केमिकल फार्मिंग असेही संबोधतात. सेंद्रीय शेती म्हणजे नैसर्गिक शेती होय. जैविक घटकांवर प्रक्रिया करुन व त्यांना कुजवून जे खत तयार केले जाते, त्याला सेंद्रीय खत असे म्हणतात. जनावरांचे मलमुत्र शेतीमधील वाया गेलेला भाजीपाला यांना जमिनीतील खड्डयामध्ये टाकून काही दिवस कुजविले जाते. त्यानंतर त्याचा खत म्हणून शेतजमिनीवर वापर केला जातो. सेंद्रीय खतामध्ये गांडुळ खताचाही समावेश होतो. जमिनीमध्ये ठराविक खोलीचा खड्डा खणून तेथे टाकाऊ जैविक घटक कुजवून त्यामधील जीवाणूंची संख्या वाढविली जाते. या वाढीव जीवाणूंचा उपयोग शेतजमिनीला प्रभावीपणे होतो. या खतामध्ये आता मानवी मलमुत्राचाही समावेश करण्याची संकल्पना विचाराधीन आहे. यावरही उच्च पातळीवरील संशोधन चालू आहे. या कुजविलेल्या खतातून जे पाणी निघते, ते टँकमध्ये भरुन शेतामध्ये टाकले जाते. तसेच, जे घन पदार्थ असते ते नंतर वाळवून किंवा तसेच्या तसे शेतजमिनीवर पसरविण्याची प्रक्रिया असते. केमिकल फर्टिलायजर, अन्य खते वापरल्यामुळे जमिनीचा पोत खराब होऊन जमिनीचा कस दिवसेंदिवस कमी होतो.

१.५३ पंजाब व गुजरातहून बोगस खते शेतक-यांना विकली जात आहेत. त्या संदर्भातही विभागाने योग्य ती कारवाई केली पाहिजे. बोगस खतांमुळे शेतक-यांची फसवणूक होते. सेंद्रिय खताचा वापर केल्यानंतर आत्महत्याग्रस्त जिल्हयामधील आत्महत्यांचा प्रमाणामध्ये फरक पडलेला आहे, या संदर्भात विभागाने कोणते निरीक्षण केलेले आहे का ? अशी विचारणा समितीने केली त्यावर सेंद्रिय शेतीमध्ये कमी पाण्यामध्ये व खताच्या नगण्य खर्चामध्ये केवळ संकरित बी-बियाण्याच्या आधारावर मुबलक खात्रीदायक शेतीमुळे ब-याच शेतक-यांच्या परिस्थितीमध्ये फरक पडलेला आहे. आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये ज्या ठिकाणी सेंद्रिय शेतीचा वापर केला गेलेला आहे, तेथील शेतक-यांचा अनुभव चांगला आहे.

१.५४ महाराष्ट्रातील बऱ्याच भागांमधील शेतकरी भांडवलावर आधारीत शेती करण्याकरिता उत्सुक आहेत. वास्तविकतः मजूर आधारीत शेती करीत असतांना सेंद्रिय खत

निर्मिती करुन त्याप्रमाणे पिकाची मशागत केल्यास उत्पादनात भरघोस वाढ होते. मात्र सेंद्रिय शेती करण्यास सध्या शेतकरी फारसे उत्सुक नाहीत, असे आढळून येते. रासायनिक खतांचा वारंवार वापर करुन त्यांची जमीन दिवसेंदिवस नापिक होत चालली आहे. सेंद्रिय शेती करण्याकरिता जास्त मेहनत लागते. ग्रामीण पातळीवर शेतक-यांना काही कामांकरिता मजूरांची आवश्यकता असते. काही ठिकाणी कामे करण्याकरिता मजूरही मिळत नाहीत. अनेक शेतकरी सेंद्रिय शेती करीत आहेत आणि त्यामध्ये अत्यंत उत्कृष्ट परिणाम मिळत आहेत.

१.५५ बीडीएस प्रणालीद्वारे तरतूद उपलब्ध होऊ न शकण्याची कारणे काय आहेत या प्रश्नाच्या संदर्भात विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सदरहू योजनेकरिता अंतिम सुधारित तरतूद म्हणून १.५० लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. ही रक्कम बीडीएस प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिनांक ३१ मार्च रोजी रात्री ९.३० वाजता उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतु, तेथील कोषागार कार्यालय त्यावेळेस बंद झालेले होते. त्यामुळे ती रक्कम काढता आली नाही. ती रक्कम पुढील वर्षाच्या अनुदानात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१.५६ कीडनाशक अंशतपासणी प्रयोगशाळेची स्थापना व बळकटीकरण योजना ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची योजना असून यामध्ये एकूण रु. ३२५ लाख मूळ तरतुदीतून केवळ रु. ५० लाख खर्च होऊन रु. २७५ लाख बचत झाली आहे. ही बचत एकूण अनुदानाच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे ही योजना कृषी अधिकाऱ्यांनी जबाबदारीने राबविलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच, केंद्र शासनाकडून वित्तीय वर्ष संपुष्टात येईपर्यंत प्रशासकीय मंजुरी प्राप्त होऊ न शकणाऱ्या अनेक योजना असून त्या योजनांची समितीला माहिती देण्यात येईल व प्रशासकीय मंजुरीस विलंब होण्याची कारणे काय आहेत या प्रश्नांच्या संदर्भात केंद्र शासनाकडून ३२५ लाख रुपये मिळतील अशी विभागाची अपेक्षा होती. परंतु, केंद्र शासनाकडून अपेक्षेपेक्षा कमी म्हणजे ५० लाख इतकीच रक्कम मिळाली त्यामुळे रक्कम अखर्चित असल्याचे दिसत आहे. प्रत्यक्षात केंद्र शासनाकडून अनुरूप अनुदान न मिळाल्याने तसे झाले आहे, अशी माहिती देखील विभागीय सचिवांनी दिली. हिरवळीच्या खताबाबत दोन प्रकारच्या बियांणावर बायॉलॉजिकल प्रक्रिया करुन हिरवळीचे खत तयार करण्याबाबत संशोधन समोर आल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.५७ राज्यात दुष्काळाची परिस्थिती आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात जनावरांना चारा उपलब्ध नाही. अमरावती जिल्ह्यामध्ये तसेच विदर्भामध्ये काही ठिकाणी चाऱ्याची केंद्रे आहेत. चारा निर्मिती करिता कृषी विभागामार्फत कोणते कार्यक्रम राबविले जातात ? आज राज्यात मोठ्या संख्येने जनावरे आहेत. शेतकऱ्यांना जनावरांना सकस पेंड देणे आर्थिकदृष्टया परवडत नाही. काही वेळेस शेतामध्ये ज्वारी, तूर डाळीचे पीक घेतल्यानंतर त्याचाच कुटार, कडबा जनावरांना खायला घातला जातो. राज्यभरातील चारा निर्मितीसाठी केलेल्या विशेष प्रयत्नाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यापूर्वी जेव्हा राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी ५० लाख टन इतक्या चाऱ्याची निर्मिती करण्यात आली होती. त्या करिता ५० कोटी रुपये इतकी मदत करण्यात आली. चारा निर्मितीकरिता प्रति हेक्टर २०० रुपये इतकी मदत बियाणे व खताकरिता केली जाते. या व्यतिरिक्त ५०० हेक्टर क्षेत्राकरिता ०४ लाख रुपये कडबाकुट्टी मशिन करिता दिले जात होते. राज्यात एकूण १ लाख ७५ हजार हेक्टर क्षेत्रावर चारा निर्मितीची योजना हाती घेतली आहे. विभागनिहाय सांगावयाचे झाले तर, पुणे विभागात ८० हजार हेक्टर क्षेत्रावर, नाशिक विभागात ३० हजार हेक्टर क्षेत्रावर, मराठवाडा विभागात १ लाख हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. १० कोटी ५० लाख रुपयांची तरतूद पशु संवर्धन विभागासाठी देखील करण्यात आलेली आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना १५०० रुपयांचे "अफ्रिकन टॉल" जातीचे बियाणे दिले जाणार आहे.

१.५८ वैरण विकास कार्यक्रमांतर्गत चारा निर्मितीचा कार्यक्रम विभागाने राबविला. त्याकरिता मोठ्या प्रमाणावर निधीही खर्च केला. महाराष्ट्रातील १२२ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केलेले आहेत. या चारा निर्मिती कार्यक्रमांतर्गत किती चारा उपलब्ध झाला व हा उपलब्ध झालेला चारा शेतकऱ्यांच्या जनावरांना देण्यासाठी उपयोगी पडला का ? समितीच्या या प्रश्नावर मागच्या वर्षी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जेथे पाणी उपलब्ध असेल तेथे चारा निर्माण करण्यात आला. राज्य शासनाची जी चारा डेपोची योजना आहे, त्या बाबत प्रथम २ ते ३ हजार रुपये प्रती टन दराने शासनातर्फे चारा खरेदी करण्यात यावा असा विचार होता. परंतु तसे प्रत्यक्षात होऊ शकले नाही. या चारा खरेदीकरिता कंत्राटदार नेमण्यात आले. उसाचे

वाडे खरेदी करुन चारा उपलब्ध करण्यासाठी २२५ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले अशी माहिती विभागाने दिली.

१.५९ या पूर्वी सुबाभळीच्या बाबतीत असाच कार्यक्रम राबविण्यात आला होता, त्याचे काय झाले ? तसेच मक्याच्या बाबतीत देखील माहिती द्यावी असे समितीने सांगितले त्यावर मक्याचे पिक घेतल्यानंतर कणीस तसेच चारा देखील उपलब्ध होत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.६० जळालेला ऊस चाऱ्यासाठी अधिग्रहित करण्याबाबत विचार सुरु असून त्याच प्रमाणे ज्वारी व बाजरीच्या पिकाचाही विचार केला जाणार आहे काय ? तसेच, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नाशिक, मराठवाडा विभागात चारा निर्मितीचे कार्यक्रम राबविले जाणार असून तेथील नेमक्या कोणत्या भागात हे कार्यक्रम राबविले जाणार आहेत ? तसेच चाऱ्याचे दर ठरविण्याचा विषय आपल्या विभागाशी संबंधित आहे का ? अशी विचारणा समितीने केली त्यावर चाऱ्याचे दर ठरविण्याचा विषय कृषी विभागाशी संबंधित नसल्याचे सांगून चारा निर्मितीचे कार्यक्रम जेथे पाण्याची सोय आहे तेथे हा कार्यक्रम घेता येतो. या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या अंतर्गत ४० हजार हेक्टर क्षेत्रामध्ये चारा निर्मिती करिता १३ हजार क्विंटल बियाणे उपलब्ध करुन दिले जाते. या शिवाय विभागाकडे जवळपास ३४ हजार क्विंटल बियाणे उपलब्ध असल्याची माहिती देखील विभागाने दिली. चारा डेपोंना साखर कारखान्यांनी उस दिला. हे साखर कारखानदार शेतकऱ्यांकडून कमी भावाने ऊस घेतात आणि सरकारला चारा डेपोकरिता जास्त भावाने उस देतात. सरकारने या संदर्भात काढलेल्या निविदा टेंडर साखर कारखान्यांनी भरल्या. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ऊसाचे गाळप झाले नाही तरी चालेल परंतु, जनावरांना चारा मिळाला पाहिजे म्हणून शेतकऱ्यांनी चारा डेपोकरिता उस दिला. त्यामुळे साखर कारखान्यांनी ज्या भावाने शेतकऱ्यांकडून उस घेतला त्याच भावाने तो चारा डेपोंना दिला पाहिजे. तसेच, या कामाकरिता निविदा काढण्याची शक्कल कोणी काढली ? या कार्यक्रमाकरिता प्रती तालुक्याकरिता येणारा खर्च १६ ते १७ कोटी रुपये इतका असताना एका तालुक्यामध्ये ३७ कोटी रुपयांची उचल झाल्याचेही समितीला आढळून आले.

१.६१ बीड जिल्ह्यातील आष्टी येथील जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने आलेले विजेचे देयक त्यांना जास्त वाटले. त्याबाबत त्यांनी लक्ष देऊन तपासणी केल्यानंतर त्या बिलाची रक्कम बरीचशी कमी झाली. बऱ्याच ठिकाणी अशाच प्रकारे बिलाची थकबाकी आहे तेथे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घातल्यास यामध्ये होणाऱ्या अनुचित प्रकारांना आळा घालण्यास मदत होईल असे मत समितीने व्यक्त केले. चाऱ्याच्या दराबाबत सांगावयाचे झाले तर बीड जिल्हयापासून नगर जिल्हा काही अधिक अंतरावर नाही. परंतु, बीड जिल्हयामध्ये प्रति क्विंटल २९०० रुपये इतके तर, नगर येथे प्रति क्विंटल २७५० रुपये इतके चाऱ्याचे दर आहेत. मराठवाड्यामध्ये प्रति क्विंटल १८५० रुपये, तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रति क्विंटल १८०० रुपये इतके चाऱ्याचे दर आहेत. चाऱ्याच्या दरामध्ये इतकी तफावत असण्याची कारणे काय आहेत ? यावर हा विषय विभागाच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे विभागाने सांगितले. विभागामार्फत १ लाख ७५ हजार हेक्टर क्षेत्रावर चारा निर्मितीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. शेतकरी ते काम करण्यास तयार आहेत. हे काम जेथे चारा उपलब्ध नाही तेथे केले जाणार असून दर ठरविताना वाहतूक, लोडिंग, अनलोडिंगसाठी येणाऱ्या खर्चाचा देखील वेगळा विचार करावा लागेल. पुणे विभागामध्ये हा दर २९०० रुपये प्रती टन इतका आहे, तर मराठवाडा मध्ये तो २८०० रुपये प्रति टन इतका आहे. यापैकी वाहतुकीचा खर्च ७०० रुपये प्रती टन इतका आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. तालुक्यातील तालुक्यामध्ये चारा नेण्यासाठी प्रती टन वाहतुकीसाठी ७०० रुपये इतका खर्च येतो का ? तसेच कर्नाटक राज्यात भरपूर प्रमाणात चारा उपलब्ध आहे. शासनाचा कर्नाटक राज्यामधून चारा आणण्याबाबत विचार आहे का ? त्यावर चारा नसलेल्या काही ठिकाणी १०० कि.मी. अंतरावरुन चारा न्यावा लागतो. जत, आटपाटी, माण, खटाव सारख्या भागामध्ये तर चारा अजिबात उपलब्ध होत नाही अशी माहिती विभागाने दिली.

१.६२ आदिवासी विकास महामंडळाच्या एकाधिकार गवत खरेदी योजनेबाबतची माहिती समितीने विचारली असता हा विषय कृषी विभागाच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे विभागाने सांगितले तसेच कृषी फार्म ३.५० हजार हेक्टर क्षेत्रावर सिड्स प्रॉडक्शनचे काम करीत आहेत. जे शेतकरी चारा निर्मितीचे काम करण्यास स्वेच्छेने तयार आहेत त्यांना मदत करुन चारा निर्मिती करता येईल, अशीही माहिती विभागाने दिली. कृषी फार्मनी सिड्स प्रॉडक्शनच्या

कामा बरोबरच चारा निर्मितीचेही काम करावे. तसेच, कृषी विषयातील तज्ज्ञ म्हणून जे सरकारी नोकरी करीत आहेत त्यांनाही हे काम करण्यास सांगावे असे समितीने सुचविले.

१.६३ कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषी विस्तार या योजनेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग किती टक्के आहे, सदर प्रदर्शनाचा लाभ किती शेतकऱ्यांनी घेतला, त्यानुसार कोणत्या जिल्ह्यातील शेतकरी आधुनिक पध्दतीने शेती करत आहेत याबाबत तालुकानिहाय अशी माहिती दिली की, केंद्र शासनाच्या ॲग्रीकल्चरल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट एजन्सीतर्फे प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरावरील कृषी प्रदर्शनाकरिता २५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जातो. या अंतर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये एक कृषी प्रदर्शन होते. परंतु, खाजगी क्षेत्रामध्ये कमर्शिअल तत्त्वावर मोठया प्रमाणावर कृषी प्रदर्शन भरविण्याकडे लोकांचा कल दिसून येतो.

१.६४ नागपूरमध्येच संत्र्याचे पीक मोठया प्रमाणात येत असल्यामुळे तेथे संत्र्याला फारशी मागणी नसल्याने विदर्भातील संत्री पुण्या-मुंबई मध्ये विकण्यासाठी पणन मंडळाने पुढाकार घेतलेला आहे. पणन व कृषी विभागा मार्फत प्रत्येक जिल्ह्यात धान्य महोत्सव, फळ महोत्सव आयोजित करण्यात येतात. या अंतर्गत कोल्हापूरमध्ये तांदूळ महोत्सव आयोजित करण्यात आला होता. तेथील चंदगड व आजरा तालुक्यामध्ये होणाऱ्या घणसाळ या तांदळाच्या जातीला खूप मागणी होती. सदरहू महोत्सवामध्ये एकाच दिवशी तेथील शेतकऱ्यांचा संपूर्ण तांदूळ विकला गेला. या व्यतिरिक्त पणन मंडळातर्फे पुण्यामध्ये सिझनप्रमाणे कधी काजू महोत्सव तर कधी आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. विधिमंडळाच्या नागपूर येथील अधिवेशन कालावधीत संत्रा महोत्सव आयोजित केला जातो. अशा प्रकारे प्रोत्साहनपर प्रदर्शनांचे आयोजन केले जाते व त्याचा अतिशय चांगला परिणाम झालेला दिसून येतो, अशी अधिक माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.६५ शेतक-यांना प्रोत्साहित करणे हा महोत्सवाचा उद्देश आहे. हिंगोलीमध्ये हळदीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते आणि हळद प्रोसेसिंग कारखाने सांगलीमध्ये आहेत. विदर्भामध्ये काटोल येथे फळप्रक्रिया कारखाना सुरु करण्यात आला होता. तो कारखाना बंद आहे. तो कारखाना चालू राहावा यासाठी काही प्रोत्साहन दिले गेले नाही. आंब्याच्या बाबतीत सांगायचे तर सर्वात जास्त आंबा मराठवाड्यात पिकतो. नागपूरमध्ये संत्री जास्त होतात आणि प्रोसेसिंग कारखाना नांदेडला काढण्यात आला, त्यावर विभागीय सचिवांनी असे स्पष्टीकरण

दिले कि, राज्याच्या विविध भागामध्ये हे महोत्सव आयोजित केले जातात. पुण्यामध्ये देखील संत्रा-महोत्सव आयोजित केला जातो. नागपूरमध्ये जेव्हा विधिमंडळाचे अधिवेशन भरते त्यावेळी संत्रा-महोत्सव आयोजित केला जातो. अधिवेशनाच्या वेळी राज्याच्या विविध भागातून लोक येत असतात. त्यांना संत्र्याबाबत माहिती व्हावी हा त्याचा उद्देश असतो.

१.६६ कृषी विद्यापीठामध्ये वैरण विकास अधिकारी असतात. त्यांना चांगल्या प्रकारचा चारा तयार करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले जाते काय ? समितीच्या या प्रश्नावर वैरण विकास कार्यक्रम घेतला जातो. त्यामध्ये कृषी विद्यापीठातील संशोधक तसेच कृषी विस्तारमधील अधिकारी यांचा वापर करुन घेतला जातो. Accelerated Fodder Development Programme केन्द्र शासनाने जाहीर केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत चांगल्या दर्जाचा चारा तयार करण्यासाठी प्रशिक्षिण दिले जाते. त्यासाठी विद्यापीठाला ५० लाखाचा निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्याची माहिती विभागाने दिली.

१.६७ ज्यांनी प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांनी गावागावामध्ये जाऊन शेतक-यांना माहिती दिली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले, त्यावर चांगले पीक कसे घ्यावे याचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अवगत केलेले आहे. चाऱ्याची नवीन आफ्रिकन जात विकसित झालेली आहे. खाजगी क्षेत्रात देखील चारा उत्पादनाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला जात आहे. डेअरी इंडस्ट्रीमध्ये चाऱ्याला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे, असा खुलासा विभागाने केला.

१.६८ प्रदर्शनावर फक्त १२ हजार रु. खर्च करण्यात आलेला आहे. त्यावर केन्द्र शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम ही केन्द्र शासनाच्या योजनेनुसार खर्च होते. ही रक्कम व्यपगत होत नाही. दरवर्षी प्रत्येक जिल्ह्याला अडीच लाख रुपये प्राप्त होतात. एक्स्टेन्शनच्या कामासाठी मागील वर्षी ६० कोटीची तरतूद होती. या वर्षी देखील ६० कोटीची तरतूद आहे. साधारणपणे एका जिल्ह्याला एक ते दीड कोटी रुपये मिळतात. खाजगी क्षेत्रातील कंपन्या ज्याप्रमाणे मोठ्या जागेत प्रदर्शन भरवितात त्याप्रमाणे आपण दोन-अडीच लाख रुपये खर्च करुन प्रदर्शन भरवू शकत नाही. त्या प्रदर्शनामध्ये विविध कंपन्याचे स्टॉल्स असतात आणि शेतकरी देखील मनापासून अशा प्रदर्शनामध्ये सहभागी होतात. अशा प्रदर्शनातून शेतक-यांना अत्यंत चांगली माहिती मिळते. जे काम खाजगी क्षेत्राकडून केले जात नाही असे काम

शासनाच्या माध्यमातून केले गेले तर त्याचा शेतक-यांना चांगला उपयोग होऊ शकेल अशी माहिती विभागाने दिली.

१.६९ कृषी खात्याच्या अनेक चांगल्या योजना आहेत. योजना शेतक-यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विभागाकडून देखील प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात येत असल्याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. तसेच जेव्हा कृषी विषयक प्रदर्शन भरविण्यात येते त्यावेळी स्थानिक आमदारांना देखील प्रदर्शनाची आणि योजनांची माहिती देण्यास कृषी अधिका-यांना सांगावे, असे सुचविले.

१.७० जळगाव जिल्ह्यामध्ये केळीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. जळगावची केळी जगप्रसिद्ध आहेत. परंतु केळीवर पडणा-या करपा रोगामुळे केळी पिकविणा-या शेतक-यांचे फार नुकसान होते. जळगाव जिल्ह्यात केळी प्रोसेसिंग युनिट नाही. केळीपासून केळी-वेफर, कागद, कपडा, सिल्क इत्यादी गोष्टी तयार होतात. परंतु त्याबाबत शेतक-यांना माहिती दिली जात नाही. जळगाव जिल्ह्यातील केळीच्या पिकाखालील क्षेत्र कमी कमी होत असून गुजरात राज्यामध्ये केळीच्या पिकाखालील क्षेत्र वाढत आहे, अशी समितीने माहिती दिली असता या वर्षी करपा रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी केन्द्र आणि राज्य शासनाच्या सहभागातून कार्यक्रम घेण्यात आलेला असून ४० कोटी रु. खर्च अपेक्षित आहे. हेक्टरी २५ हजार रु. खर्च अपेक्षित आहे. १२ महिन्यामध्ये तीन ते चार फवारण्या केल्या जातील. मार्केटिंगसाठी पणन मंडळातर्फे रावेर येथे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच खाजगी निर्यात कंपन्या देखील त्या भागामध्ये पुढे आलेल्या आहेत. तेथील एक निर्यात कंपनी दीपक फर्टीलायझर कंपनीने टेकओव्हर केलेली आहे. या वर्षी त्या कंपनी तर्फे चांगल्या दर्जाची केळी निर्यात केली जाणार आहेत. त्या भागामध्ये जैन इरिगेशन कंपनीच्या माध्यमातून टिश्यूकल्चरचे चांगले काम होत आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.७१ जळगाव भागातील केळी १०-१५ वर्षापासून निर्यात होत आहेत. त्या भागामध्ये दोन-चार व्यापारी संघटनांनी सोसायट्या तयार केलेल्या आहेत. परिणामी शेतक-यांना त्यांचा माल विकता येत नाही. राज्याच्या विविध भागामध्ये वेगवेळया फळांचे प्रदर्शन भरविण्यात येते. मग केळीचे प्रदर्शन का भरविण्यात येत नाही ? त्यावर दर वर्षी केळी पिकाखालील क्षेत्र

वाढण्यासाठी मदत केली जाते तसेच रायपनिंग चेंबरसाठी ४० टक्के सबसिडीची योजना असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.७२ राज्यामध्ये ठिकठिकाणी संशोधन केन्द्रे आहेत. परंतु या केन्द्रातून संशोधनाचे अपेक्षित काम होत नाही असे दिसते. केळी,संत्रा, धान इत्यादी बाबत अपेक्षित संशोधन झालेले नाही. पिकावर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर औषधाच्या फवारण्या केल्या जातात. परंतु कीड नष्ट होत नाही. औषधांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ती घेणे शेतक-यांना परवडत नाही. परिणामी शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, दर्जेदार बि-बियाणे तयार करण्यासाठी करावयाचे संशोधन याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर कीडनाशक अंशतपासणी प्रयोगशाळेची स्थापना व बळकटीकरण यासाठी केन्द्र शासनाकडून फक्त ५० लाख रु. आले होते. ही संपूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. पुणे येथे प्रयोगशाळा स्थापन केलेली आहे. १९९७ पासून त्या प्रयोगशाळेत २० कोटी रुपयाची यंत्रसामग्री खरेदी करण्यात आलेली आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत अत्यंत प्रगत अशी यंत्रसामग्री तेथे बसविलेली आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणावर करावा लागत आहे. कीटकनाशकांचा कमीत कमी वापर कसा होईल यासाठी काय करता येईल ? समितीच्या या प्रश्नावर पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प सन २००९-१० पासून राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत दरवर्षी १०० लाख हेक्टरची तपासणी करण्यात येते. त्यासाठी ८०० स्काऊटस् आहेत. प्रत्येक स्काऊट १०-१२ हेक्टर क्षेत्राची पाहणी करतो आणि पाहणीमध्ये जे काही आढळून येते ते वरिष्ठांना कळवितो. जेव्हा सोयाबीन पिकावर लष्कर अळीचा प्रादुर्भाव झाला होता तेव्हा पासून ही योजना केन्द्र शासनाने सुरु केलेली आहे. मागील ४-५ वर्षापासून भात, सोयाबीन, कापूस या पिकावर पडणा-या रोगांचे प्रमाण कमी कमी होत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.७३ पिकावर पडणा-या रोगाचे प्रमाण कागदोपत्री कमी कमी दिसत असले तरी प्रत्यक्षात मात्र हे प्रमाण वाढलेले आहे. या वर्षी लष्कर अळीने सोयाबीनच्या संपूर्ण पिकाचा नाश केलेला आहे. पेरणी पासून ते कापणी पर्यंत शेतक-याला शेतात सारखी किटकनाशकांची फवारणी करावी लागत आहे. अशा परिस्थितीत केवळ केन्द्र सरकारच्या योजनांवरच अवलंबून

न राहाता राज्य शासनाने देखील शेतक-यांच्या गरजा लक्षात घेऊन पावले उचलण्याची गरज असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

१.७४ शेतात भरघोस पीक यावे, औषधांचा कमीत कमी वापर व्हावा यादृष्टीने शेतक-यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. याबाबतीत क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून अपेक्षित काम केले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. क्षेत्रीय अधिकारी हे कधीच शेतावर जात नाहीत. त्यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली पाहिजे. या क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून चांगले काम होण्याच्या दृष्टीने काही विशेष मॉनिटरिंग करण्याबाबत देखील विभागाने प्रयत्न केले पाहिजेत असे समितीने सांगितले.

१.७५ शासनाने अनेक शेती उत्पादनाच्या आधारावर शेती उद्योगाची स्थापना केलेली आहे. अनेक खाजगी शेती उद्योगांना प्रोत्साहन दिलेले आहे. या पार्श्वभूमीवर शेतक-यांच्या शेतीमालाला भाव मिळावा तसेच, शेतक-यांनी जास्तीत जास्त उत्पादन काढावे, याकरिता शासन कोणत्या प्रकारचे प्रोत्साहन व मदत शेतक-यांना करीत आहे ? दरवर्षी वर्तमानपत्रामध्ये निरनिराळया खते, फवारणीची औषणे याविषयी तसेच नवनवीन पिकांवरील रोगांविषयी तसेच, त्या रोगांमुळे झालेल्या नुकसानीबाबतही माहिती येते परंतु आधुनिक कीटकनाशके व नवनवीन रोगांचा सातत्याने होणारा प्रादुर्भाव यांचे समीकरण जुळत नाही. राज्य शासन कृषी संशोधन केंद्रे, तसेच कृषी संशोधन अभ्यासक्रम या सर्वांना मोठया प्रमाणात प्रोत्साहन देत आहे. या संदर्भात समितीला विभागाने सविस्तर माहिती द्यावी असे सांगितले तसेच शेतक-यांच्या पाठीवरील फवारणीचा पंप शेतक-याची पिके कापणीला आली तरीही उतरत नाही. मराठवाडयामध्ये १२० कोटी रुपयांची फवारणीची औषधे विकली गेलेली असतांना प्रत्यक्षात तेथे फक्त १०० कोटी रुपयांची फवारणीची औषधे विकली गेलेली असतात. पंजाबहून फवारणीच्या औषधांची आयात मराठवाडयात व महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये होते. पंरतु यातील ८० टक्के फवारणीची औषधे बोगस असतात. बोगस फवारणीच्या औषधांमुळे पिकांवरील कीड तात्पुरती मरते. पिके मोठी होईपर्यंत त्यांना किडीपासून वाचविण्याकरिता शेतकरी सातत्याने फवारणी करीत असतो. याचे कारण असे आहे की, शेतक-याने विकत घेतलेली फवारणीची औषधे बोगस असतात. या बोगस फवारणीच्या औषधांमुळे पिकांवरील किडीचा प्रादुर्भाव नष्ट होतच नाही. पिके वाया जातातच. परंतु जास्त फवारणी मारलेली पिके मनुष्याच्या पोटात गेल्यानंतर

त्यालाही निरनिराळया भीषण रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. फवारणीच्या औषधांमध्ये शेतकरी फसविला जातो, हे उघड सत्य आहे.

१.७६ इतर राज्यातून जी फवारणीची औषधे महाराष्ट्र राज्यामध्ये आणण्यात येतात, त्या औषधांना राज्यामध्ये वापरण्याकरिता परवानगी देण्याअगोदर या औषधांची नमुना चाचणी होत नाही का ? अशी ही विचारणा समितीने केली. त्यावर इतर राज्यांमधून आलेली फवारणीची औषधे व इतर उत्पादने राज्यामध्ये वापरण्याअगोदर राज्यातील केंद्र शासनाच्या कृषी संशोधन केंद्रामध्ये व राज्याच्या कृषी संशोधनामध्ये नमुना परिक्षा होते. परंतु नमुन्याकरिता दिलेली औषधे वेगळी असतात. तसेच, प्रत्यक्ष विकण्याकरिता जो माल असतो, तो ओरिजनल लेबलींग करुन विकला जातो. अशा प्रकारच्या घटनाही काही ठिकाणी घडत असतात, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.७७ संबंधित बोगस औषधांच्या कंपनीविरुध्द शासन कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही का ? इतर राज्यांमधून आलेल्या बोगस औषधे व खते यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आर्थिक दृष्टया नुकसान होऊन तसेच, शेतीचे नुकसान होऊन देशोधडीला लागला तरीही शासनाचे या संदर्भात कोणतेही नियंत्रण नाही का ? शेतकरी कीटकनाशके व खते घेण्याकरिता सावकाराकडून कर्ज घेत असतो. या कर्जातून घेतलेल्या औषधांचा व कीटकनाशकांचा काहीही उपयोग झाला नाही तर त्याचे कर्ज फेडण्याकरिता त्याचा काहीही उपयोग होत नाही. सावकाराचे कर्ज व चक्रवाढ व्याज एका बाजूला वाढतच असते. अशा प्रकारे शेतकरी कर्जाच्या गर्तेत फसण्याकरिता बोगस कीटकनाशकांमुळे मदत होते, असे समितीने सांगितले असता त्यावर विभागाने महाराष्ट्रामध्ये बोगस खते व औषधे विकणा-या कंपन्यांवर शासनाने नियमाप्रमाणे कारवाई केलेली आहे. काही कंपन्यांवर कारवाई प्रस्तावित आहे. तसेच, शेतक-यांच्या पिकांच्या संरक्षणाकरिता "क्रॉपसॅप "हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रायोगिक तत्वावर हा प्रकल्प महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्येच राबविला जात आहे. याच्या यशस्वितेनंतर हा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

१.७८ शासनाची कृषी संशोधन केंद्रे प्रायोगिक तत्वावर काही शेतक-यांच्या शेतीच्या लहान लहान तुकडयांवर प्रयोग करीत असतात. मागील दोन वर्षांमध्ये साधारणत: २० लाख हेक्टर शेतजमिनीवर ६००-७०० कोटी रुपये खर्च करुन उत्तम खते व बि- बियाणांचा वापर २०

लाख शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. हे सर्व प्रयत्न शासन उत्पादनवाढीकरिता व शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी, याकरिता करीत आहे. कृषी संशोधन केंद्रांच्या या प्रयोगामुळे शेतक-यांच्या ज्वारी व बाजरीच्या उत्पादनामध्ये भरघोस वाढ झालेली आहे. ग्रामीण भागामध्ये शेतक-यांचे मेळावे आयोजित करुन शेतक-यांना पीक पध्दती, खतांचा वापर करावयाची पध्दत, शत्रू कीड व मित्र कीड या संदर्भात शास्त्रशुध्द माहिती देऊन त्यांना संकरित व सेंद्रीय शेती करण्याविषयी उद्युक्त करण्याचे काम शेती संशोधन केंद्रे व एनजीओ करीत आहेत. ग्रामीण भागामध्ये एनजीओ तसेच, शासनाच्या विभागाचे भरारी पथके काम करीत आहेत. ही भरारी पथके संकटात सापडलेल्या शेतक-यांना प्रत्येक प्रकारची मदत व मार्गदर्शन करतात. तसेच, शेतकरी हेल्पलाईनवरुन त्यांना मदत करण्याचे कामही विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे. शेतक-याला त्याच्या शेतजमिनीच्या पोतावरुन कोणते पीक कोणत्या ऋतुमध्ये घ्यावे, यासंबंधी मार्गदर्शन केले जाते, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.७९ बनावट औषधे, खते व बी - बियाणे वितरित करणा-या कंपन्यांवर कोणत्या प्रकारची कारवाई विभागाने केलेली आहे? समितीने अशी विचारणा केली असता बोगस खते, बी-बियाणे, औषधे वितरित करणा-या कंपन्यांचे परवाना रद्द करण्यात येते. भेसळयुक्त बियाणे वितरित करणा-या कंपन्यांविरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करुन प्रत्येक उत्पादन नमुना चाचणी करुनच प्रमाणित केले जाते. कृषी संशोधन केंद्रांमध्ये एकूण १३०० अधिकारी व कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.८० राज्यामध्ये बी-बियाणे, खते, फवारणीची औषधे, कीटकनाशके यांच्या वितरणाचा व वाढीव किंमतींचा प्रश्न बोकाळलेला दिसून येत नाही. राज्यातील शेतीसंदर्भातील उपरोक्त ज्वलंत प्रश्नांचा शासनाने वेगळया दृष्टीकोनातून विचार करुन त्याला प्रतिबंध घालण्याकरिता प्रभावी उपाययोजना केली पाहिजे. अन्यथा राज्यातील शेतीउत्पादनामध्ये कमालीची घट होऊन आयातीचे प्रमाण वाढेल. तसेच, राज्यातील शेतकरी देशोधडीला लागतील. राज्याचा अन्नदाता जर सरकारवर रुसला तर आपले शेतकी अर्थव्यवस्था कोलमडून जाईल. तसेच बोगस बी-बियाणे, खते, फवारणीची औषधे व कीटकनाशके यांच्यामुळे पिकांवर तर भीषण परिणाम होतोच. परंतु प्रादुर्भावित पिके अथवा अन्नधान्ये सेवन केल्यानंतर मानवी

जीवनावरही विपरित परिणाम होतो. शासनाने आखलेल्या धोरणांवर अंमलबजावणी करीत असतांना विभागाने जेवढे काटेकोर व कठोर व्हावयास पाहिजे, तेवढा काटेकोरपणा त्यांच्या कृतीमध्ये आढळून येत नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामीण भागांमध्ये खेडया-खेडयांमध्ये खते, बि-बियाणे व औषधे यांच्या उपयोगाचे व वापराचे मार्गदर्शन, प्रदर्शन व मेळावे भरविले जातात. संबंधित कंपन्या शेतक-यांच्या हिताकरिता हे मेळावे भरवित नसून स्वत:च्या उत्पादनाच्या प्रमोशनकरिता मेळावे भरवित असतात. या मेळाव्याच्या माध्यमातून त्यांना एक प्रकारची बाजारपेठ मिळत असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

१.८१ त्यावर कोणतेही उत्पादन निर्मिती करणा-या कंपनीला त्यांच्या उत्पादनाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा हक्क असल्याने या संदर्भात विभाग वैध कारवाई करु शकत नाही. संबंधित कंपनी ज्या उत्पादनांचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत, ती उत्पादने शेतक-यांच्या हिताचीच आहेत की नाही, याकरिता त्यांच्या उत्पादनाची नमुना चाचणी करु शकते. नमुन्यामध्ये दिलेले उत्पादन दर्जेदार असेल आणि प्रत्यक्ष विक्री करीत असतांना जर उत्पादनाचा दर्जा घसरलेला असेल तर कृषी संशोधन केंद्राच्या गुण नियंत्रण विभागामध्ये नमुना चाचणी करण्यात येते. त्यानुसार कंपनीच्या उत्पादन विक्रीला परवानगी देण्यात येते. तसेच, राज्याच्या कीटकनाशके कायद्याच्या कलमानुसार कीटक नाशकांच्या दर्जामध्ये अनियमितता आढळली तर त्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येते, अशा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.८२ जिल्हापरिषदांकडून समायोजन प्रस्ताव विहित कालावधीत न पाठविण्याची कार्यवाही नियमित होत असल्याचा उल्लेख स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामधून दिसून येत आहे ? तेव्हा या संदर्भात कोणत्या जिल्हा परिषदांकडून समायोजन प्रस्ताव विहित कालावधीत प्राप्त झालेला नाही व या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर जिल्हापरिषदांच्या विविध खात्यांमार्फत विविध बाबींवरील खर्चाचा तपशील तसेच समायोजन प्रस्ताव विहित मुदतीत पाठविलेले नाहीत, ही बाब खरी आहे. कारण केंद्र शासनाकडून केंद्र पुरस्कृत योजनांकरिता किंवा अनुरूप अनुदान असणा-या योजनांकरिता अभिप्रेत निधी आर्थिक वर्ष संपण्याच्या थोडेच दिवस आधी येतो. तसेच, केंद्र शासनाची अनुरूप अनुदान न आल्यामुळे राज्य शासनाची अनुरूप अनुदान खर्च होऊनही

अखर्चितच दाखविली जाते. यामुळे महालेखाकार यांच्याकडील ताळेबंदांमध्ये बचत जास्त दिसून येते. जिल्हा परिषदांच्या विविध खात्यांवर काम करणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई प्रस्तावित आहे.

१.८३ छत्तीसगढ़, कर्नाटक, बिहार या राज्यांमध्ये कृषी व कृषी संलग्न विभागांचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयोग यशस्वी ठरलेला असून या राज्यांमध्ये विभाग अभ्यास दौरा करण्याकरिता जाणार आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. या दौऱ्याकरिता कृषी संशोधन केंद्रामधील मोठमोठे संशोधक, वित्त विभागाचे सचिव, ऊर्जा विभागाचे सचिव, पाटबंधारे विभाग, जलसंपदा विभाग, हॉर्टिकल्चर क्षेत्रातील प्रमुख तसेच, कृषी संलग्निक विभागाच्या सचिवांना व इतर क्षेत्रातील महनीय व्यक्तिंबरोबर लोकलेखा समितीच्या सन्माननीय सदस्यांनाही निमंत्रण देण्यात येईल, असे आश्वासन समितीस दिले.

१.८४ लोकलेखा समितीच्या यापूर्वीच्या कृषी विभागाच्या साक्षीच्या बैठकीमध्ये समितीला एक अशी माहिती मिळाली होती की, राज्य शासन कृषी विभागावर प्रत्यक्ष एकूण बजेटच्या केवळ दीड ते दोन टक्के निधी देते. उर्वरित कृषी विभागाच्या योजनांचा सर्व खर्च केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून व अनुरूप अनुदानाच्या माध्यमातून केंद्र सरकार उचलत आहे. राज्य शासन कृषी विभागाच्या विविध खर्चांकरिता केवळ दीड ते दोन टक्के आर्थिक तरतूद करीत आहे. त्यावर घटनेप्रमाणे विभागाला स्वतंत्र अर्थसंकल्प करणे शक्य नाही. परंतु अर्थसंकल्पात भाग-१, भाग-२, असे वर्गीकरण करणे शक्य आहे. कर्नाटक या राज्याने कृषी व सर्वसाधारण अर्थसंकल्प हे भाग-२ असे वर्गीकरण केलेले आहे. कृषी संदर्भातील अर्थसंकल्पात कर्नाटक या राज्याने कृषी, पशुसंवर्धन, डेअरी डेव्हलपमेंट, सेरीकल्चर, हॉर्टिकल्चर, सहकार, पणन, पाटबंधारे, उर्जा या विभागांचा समावेश केला आहे. हा अर्थसंकल्प जवळपास १७००० कोटी रुपयांचा होता. स्वतंत्र अर्थसंकल्पाबाबत कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल एका महिन्यात अपेक्षित आहे.

१.८५ जलसंधारण, जलसंपदा विभागाच्या संदर्भात विंधण विहीर, के.टी.बंधारे व सिंचित क्षेत्रामध्ये वाढ करण्यात यावी. भविष्य काळामध्ये कृषी विभागाचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्यासारखा महत्वाचा निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. शेतीच्या विकासाकरिता राज्याच्या एकूण अर्थसंकल्पातील जास्तीत जास्त निधी प्रभावीपणे विविध योजनांच्या माध्यमातून

वापरता येईल, अशा प्रकारे दिला पाहिजे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची सन्माननीय सदस्यांसमवेत एक वेगळी बैठक घेऊन त्या बैठकीस सिंचन विभागासह या विषयांशी संलग्न असलेल्या सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनाही बोलावता येईल. या सर्व प्रक्रियेतून जी काही माहिती मिळेल त्यातून या राज्याच्या भविष्याच्या दृष्टीने दिशादर्शक असे खूप काही चांगले करता येईल असे मत समितीने मांडले. ज्या राज्यांनी स्वतंत्र कृषी बजेट बाबत पावले उचललेली आहेत त्यांचा अनुभव काय आहे व ज्या राज्यांनी स्वतंत्र कृषी बजेटबाबत जे धोरण आखले आहे तेथे, त्याची खरोखरच अंमलबजावणी होते की नाही याची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु अद्यापपर्यंत विभागाकडून माहिती प्राप्त झालेली नाही.

१.८६ कृषि विभाग के कुल १८३२.६८ करोड़ रुपये के ११२५१ उपयोगिता प्रमाणपत्र पेंडिंग हैं. संबंधित विभाग को इस पेंडेंसी को शीघ्र क्लियर करने की आवश्यकता है, एसी डीसी बिल के कुल ४० मामले पेंडिंग हैं. जिसकी राशि करीब २५.४५ करोड़ रुपये है. इसमें से वर्ष २००६-०७ तक के १६ मामले पेंडिंग हैं. इस विभाग के कुल १० यू.आर. पेंडिंग हैं. विभाग को इस पेंडेंसी को शीघ्र क्लियर करना चाहिए, असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले असता समितीने सन २००८-२००९, सन २००९-२०१०, सन २०१०-२०११ या वर्षांच्या लेख्यांवरील महालेखाकारांच्या आक्षेपांचे निरसन लवकरात लवकर झाले पाहिजे. ज्या परिच्छेदांबाबत आक्षेप आहेत त्या संदर्भातील माहिती तसेच लोकलेखा समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची माहिती संदर्भात महालेखाकारांसमवेत बैठक घेऊन वेटिंग करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी, असे निदेश समितीने विभागास दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

१.८७ नैसर्गिक आपत्तीमुळे उदा.अतिवृष्टी, दुष्काळ यामुळे शेतक-यांचे नुकसान होत असते. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अंदाज वर्तविले जातात. अंदाजाप्रमाणे शासनास अभिप्राय सादर करण्याचे काम हे तहसीलदाराचे असते. त्यानंतर प्रांत व जिल्हाधिकारी त्याची छाननी करतात. अनेक तलाठी, प्रांत, तहसिलदार हे कार्यालयात बसूनच आणेवारी जाहिर करीत असतात. आणेवारीची पद्धत ही ब्रिटीश काळापासून चालू आहे.

शासनाची मदत मिळविण्यासाठी लाभार्थ्यांला अनेक किचकट कार्यपद्धती पार पाडाव्या लागतात. यामध्ये महसूल व कृषी विभागांचा आपआपसात ताळमेळ नसल्यामुळे लाभार्थ्यांवर अन्याय होतो. नुकसानाची अचूक आकडेवारी येण्यासाठी सॅटलाईटद्वारा माहिती गोळा करुन अचूक अंदाज वर्तविले येऊ शकतात. नैसर्गिक आपत्तीमुळे होणा-या नुकसानीचा शेतक-यांपर्यंत लाभ मिळावा व अचूक आकडेवारीद्वारे तो निश्चित करण्यासाठी कृषी व महसूल विभागाने एक धोरण निश्चित करावे व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन नुकसानग्रस्त भागाचा सर्वे करुन लाभार्थ्यांना मदत कशी पोचू शकेल यादृष्टीने उपाययोजना कराव्यात अशी समिती शिफारस करीत आहे.

१.८८ विनियोजन लेख्याच्या सन २००७-२००८ या अहवालामध्ये विभागाने ७७ कोटींची बचत केली आहे. सन २००८-२००९ मध्ये २८४ कोटी, सन २००९-२०१० मध्ये २०९ कोटी व सन २०१०-२०११ मध्ये ३८८ कोटी अशी बचत केलेली आहे. पीक विमा, खते व बि-बियाणे अनुदान, चारा डेपो, पाणीपुरवठा या सर्व समस्या असतानाही कृषी खाते ठराविक रक्कमा प्रतिवर्षी शासनास समर्पित करीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. परंतु, **कृषीविषयक ९०% योजना या केंद्र शासित पुरस्कृत असल्यामुळे या योजनांकरिता केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते. ब-याच वेळा अर्थसंकल्प होईपर्यंत केंद्र शासनाकडून कोणत्या योजनेकरिता निधी प्राप्त होणार आहे याची माहिती प्राप्त होत नसल्याने मागील काही वर्षांच्या योजना राज्याच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन त्याकरिता राज्याच्या वाट्याचा हिस्सा म्हणून या योजनांखाली तरतूद करण्यात येत असते. परंतु, केंद्र शासनाकडून अचानकपणे काही योजना बंदही केल्या जातात वा त्यांच्या योजनांकरिता अनुदान वितरित केले जात नाही. त्यामुळे वेगवेगळ्या योजनांखाली केलेल्या तरतूदी या वर्षअखेरीस अखर्चित राहतात. हे टाळण्यासाठी कृषी विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत योजनेसाठी प्राप्त होणारा निधी अखर्चित न रहाता तो योग्यरित्या वापरला जाईल यादृष्टीने विभागाने कार्यवाही करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

१.८९ विदर्भातील अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये सेंद्रीय खतांचा वापर प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आला होता. या भागातील शेती व्यवसायामध्ये सेंद्रीय खताचा वापर वाढल्यामुळे शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून आले आहे व त्यामुळे रासायनिक खतांवरील खर्चाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतक-यांवरील कर्जांचा बोजा

कमी झालेला आहे. **सेंद्रीय शेती ही नैसर्गिक शेती असल्यामुळे जमिनीचा कस वाढण्यात मदत होत आहे. पारंपारिक स्वरुपाची ही शेती असल्यामुळे कमी पाण्यामध्ये व खताच्या नगण्या खर्चामध्ये मुबलक व खात्रीदायक शेती होत असल्यामुळे सेंद्रिय शेती हाच खरा व शाश्वत उपाय असल्याचे निष्पन्नात दिसून आले आहे. सेंद्रीय शेतीस प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने शेती करणा-या शेतक-यांच्या अनुदानात वाढ करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

१.९० राज्यामध्ये विविध ठिकाणी कृषी संशोधन केंद्रे आहेत. परंतु, या केंद्रामधून संशोधनाचे अपेक्षित काम होत नाही. केळी, संत्रा, धान इत्यादीबाबत अद्याप म्हणावे तसे संशोधन झालेले नाही. पिकांवर देखील वेगवेगळ्या प्रकारचे रोग त्यांचे प्रार्दुभाव होत असून ते नष्ट करणे किंवा प्रतिबंधीत करण्याकरिता ठोस असा कोणत्याही प्रकारचे संशोधन झालेले दिसत नाही. रोगांवर नियंत्रण ठेवण्याकरिता दर्जेदार बियाणे तयार करण्यासाठी कृषी संशोधन केंद्रानी किंवा विद्यापीठांनी संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. **याकरिता शासनाने देखील या कृषी विद्यापीठांना संशोधनास सहाय्य होण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे कृषी संशोधनावर जास्तीत जास्त भर देऊन शेतक-यांना पीक पद्धती, सेंद्रीय खतांचा वापर, शत्रू कीड व मित्र कीड यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती मिळण्यासाठी कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्र यांना प्रोत्साहित करावे अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

दुग्धव्यवसाय विकास

२ शासकीय दुधशाळांमध्ये दुधसंकलन वाढविणे.

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क्रमांक डी-६ "दुग्धव्यवसाय विकास" मधील प्रधान शीर्ष २४०४ - दुग्ध व्यवसाय विकास व ३६०६ साह्यकारी साहित्य व साधनसामुग्री** या शिर्षा अंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चा संबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र. डी-६ - "दुग्धव्यवसाय विकास"

(रुपये लाखांत)

२.२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२०१ बृहन्मुंबई दुध योजना, २०१(०२) बृहन्मुंबई दुध योजना, प्रापण मूळ १,९२,२८.६५ पुनर्विनियोजन (-) ५५,७८.९७	१,३६,४९.६८	१,३६,५५.१७	(+) ५.४९

(एक) दुधाचे कमी प्रापण होणे (३३४२.८० लाख) (दोन) सुधारीत अंदाजाच्या आधारे (रु.१५८७.५० लाख) आणि (तीन) दुध खरेदीवरील कमी खर्चामळे इतर शीर्षाकडे निधी वळविण्यात आला (रु.६४८ लाख) या कारणामुळे मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पण याद्वारे रु.५५७८.९७ लाख इतका निधी काढण्यात आला.

रु.५.४९ लाख इतक्या अंतिम, अधिक खर्चाची करणे कळविण्यात आलेली नाहीत.

(मार्च २००८)

२.३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१३६५५१६७६६/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१३६५५१६७६६/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

<u>अधिक खर्चाची कारणे :-</u>

महागाई भत्त्याच्या दरात वाढ झाल्यामुळे वेतन खर्चात वाढ झाली आहे.

(रुपये लाखांत)

२.४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
२२१, शासकीय दुध योजना, बीड २१९ (०३) शासकीय दुध योजना, बीड **संस्करण** मूळ १८४.८६ पुनर्विनियोजन (-) २५.०८	१५९.७८	१६०.६४	(+) ०.८६

२.५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१६०६३७९७/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१६०३७९७/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक.

अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.६ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
२२१, शासकीय दुध योजना, बीड २२०(०४) शासकीय दुध योजना, बीड **वितरण** मूळ २६६.७९ पुनर्विनियोजन (-) ८६.०२	१८०.७७	१८१.०६	(+) ०.२९

२.७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१८१०५६५४/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१८१०५६५४/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक.

अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.८ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२२, शासकीय दुध योजना, नांदेड २२२(०२) शासकीय दुध योजना, नांदेड- **प्रापण** मूळ १०२१.२८ पुनर्विनियोजन (-) ३८८.५७	६३२.७१	६२३.७२	(-) ८.९९

२.९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.६२३७१६६३/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.६२३७१६६३/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक.

<u>बचतीची कारणे :-</u>

अंदाजापेक्षा दुध संकलन कमी झाल्यामुळे खर्चात बचत.

(रुपये लाखांत)

२.१० प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२२, शासकीय दुध योजना, नांदेड २२२(०४) शासकीय दुध योजना, नांदेड- **वितरण** मूळ ७२.७९ पुनविनियोजन (-) १०.७१	६२.०८	५७.८४	(-)४.२४

२.११ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.५७८३९६२/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.५७८३९६२/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

<u>बचतीची कारणे :-</u>

१. दुध संकलन कमी झाल्याने वितरीत दुधाच्या परिमाणानुसार कमी खर्च झाला.

२. स्थानिक दुध वितरण बंद असल्याने अनुषंगीक खर्चात बचत.

३. कारखाना नुतनीकरणाची देयके वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे खर्चात बचत.

(रुपये लाखांत)

२.१२ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२३, शासकीय दुध योजना, भूम (उस्मानाबाद) २२३(०२) शासकीय दुध योजना, भूम (उस्मानाबाद) **प्रापण** मूळ १९२७.३० पुनर्विनियोजन (-) ४६४.१५	१४६३.१५	१४२६.०२	(-) ३७.१३

२.१३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१४२६०२१७९/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१४२६२१७९/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

<u>बचतीची कारणे :-</u>

अंदाजापेक्षा दुध संकलन कमी झाल्यामुळे खर्चात बचत

(रुपये लाखांत)

२.१४ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२४, शासकीय दुध योजना, परभणी २२४ (०२) शासकीय दुध योजना, परभणी **प्रापण** मूळ ९४९.७१ पुनर्विनियोजन (-) ३४१.६४	६०८.०७	६०६.३०	(-)१.७७

२.१५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.६०६२९५३८/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.६०६२९५३८/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत बचत अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

२.१६ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२५, शासकीय दुध योजना, अमरावती २२५ (०२) शासकीय दुध योजना, अमरावती **प्रापण** मूळ ६८०.२२ पुनर्विनियोजन (-) २४१.५१	४३८.७१	४३८.७६	(+)०.०५

२.१७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.४३८७५८०९/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.४३८७५८०९/-
महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक
अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

२.१८ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२६, शासकीय दुध योजना, यवतमाळ २२६ (०२) शासकीय दुध योजना, यवतमाळ **प्रापण** मूळ ५२२.७२ पुनर्विनियोजन (-) १४३.४५	३७९.२७	३७९.४७	(+)०.२०

२.१९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.३७९४७२४९/-
विभागाने नोदंविलेला खर्च रु.३७९४७२४९/-
महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.२० प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२७, शासकीय दुध योजना, अकोला २२७(०२) शासकीय दुध योजना, अकोला **प्रापण** मूळ २३६६.१० पुनविनियोजन (-) ९११.५५	१४५४.५५	१४६१.५७	(+) ७.०२

२.२१ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१४६१५७४१८/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१४६१५७४१८/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

<u>अधिक खर्चाची कारणे :-</u>

मुळ मंजूर अनूदानाप्रमाणे खर्च करण्यात आला होता परंतु सुधारीत अनुदान कमी प्राप्त झाल्यामुळे जादा खर्च झाला.

(रुपये लाखांत)

२.२२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२७, शासकीय दुध योजना, अकोला २२७ (०३) शासकीय दुध योजना, अकोला **संस्करण** मूळ ३८४.४८ पुनर्विनियोजन (-) ८.६१	३७५.८७	३६९.१२	(-) ६.७५

२.२३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.३६९११६७१/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.३६९११६८१/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

बचतीची कारणे :-

१. विद्युत देयके व संभव्य देयके कमी रकमेची प्राप्त झाल्यामुळे खर्चात बचत.

२. कोषागारातून देयके परत आल्यामुळे खर्चात बचत.

(रुपये लाखांत)

२.२४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२७, शासकीय दुध योजना, अकोला २२७(०५) शासकीय दुध योजना,अकोला- **जमीन व इमारत** मूळ २८.४० पुनर्विनियोजन (-) १६.०६	१२.३४	५.४६	(-) ६.८८

२.२५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.५४५९८९/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.५४५९८९/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

बचतीची कारणे :-

अंतिम सुधारीत अनुदान विलंबाने प्राप्त झाल्यामुळे दि.३१ मार्च २००८ पुर्वी खर्च होऊ शकला नाही.

रुपये लाखांत)

२.२६ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२८, शासकीय दुध योजना, नांदूरा (जि.बुलढाणा) २२८(०३) शासकीय दुध योजना, नांदूरा (जि.बुलढाणा) **संस्करण** मूळ ४३.७४ पुनविनियोजन (-) ११.८०	३१.९४	३२.२४	(+) ०.३४

२.२७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.३२२३७८९/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.३२२३७८९/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक.

(रुपये लाखांत)

२.२८ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२९ शासकीय दुध योजना, नागपूर २२९(०२) शासकीय दुध योजना, नागपूर **प्रापण** मूळ २७५०.८३ पुनर्विनियोजन (-) ९८७.२०	१७६३.६३	१७६३.६३	--

२.२९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१७६३६३०५०/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१७६३६३०५०/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारीत अनुदानाएवढा खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.३० प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२९ शासकीय दुध योजना, नागपूर २२९(०३) शासकीय दुध योजना, नागपूर **संस्करण** मूळ ५२०.३७ पुनर्विनियोजन (-) ३१.२१	४८९.१६	४८८.६१	(-)०.५५

२.३१ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.४८८६११३२/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.४८८६११३२/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

बचत अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.३२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२९, शासकीय दुध योजना, नागपूर २२९ (०४) शासकीय दुध योजना, नागपूर **वितरण** मूळ २५८.३९ पुनविनियोजन (-) ९४.७४	१६३.६५	१६३.८८	(+) ०.२३

२.३३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१६३८७६९२/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१६३८७६९२/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.३४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२३१, शासकीय दुध योजना, गोंदिया २३१(०२) शासकीय दुध योजना, गोंदिया (जि. भडारा) **प्रापण** मूळ २८०६.०६ पुनर्विनियोजन (-) १५६७.९६	१२३८.१०	१२४०.०३	(+) १.९३

२.३५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१२४००३३२६/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१२४००३३२६/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत अधिक खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.३६ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२३१ शासकीय दुध योजना, गोंदिया २३१(०४) शासकीय दुध योजना, गोंदिया (जि. भडारा) **वितरण** मूळ ७१.९६ पुनर्विनियोजन (-)२१.६८	५०.२८	५०.२०	(-) ०.०८

२.३७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.५०२०४१९/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.५०२०४१९/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

बचत अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.३८ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२३२, शासकीय दुध योजना, चंद्रपूर २३२(०२) शासकीय दुध योजना, चंद्रपूर **प्रापण** मूळ १३०२.७१ पुनर्विनियोजन (-) ९९.३८	१२०३.३३	१२०३.२०	(-) ०.१३

२.३९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.१२०३२००५३/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.१२०३२००५३/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

बचत अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.४० प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२३४, शासकीय दुध योजना, जालना २३४(०२) शासकीय दुध योजना, जालना **प्रापण** मूळ ५०५.२८ पुनर्विनियोजन (-) २०१.००	३,०४.२८	३,०४.२८	--

सुधारीत अंदाजाच्या आधारे आणि दुधाचे कमी प्रापण झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २००८ मध्ये रु.२१९८८.७४ लाख इतका निधी काढण्यात आला. वर नमूद केलेल्या शिर्षाखालील कमी अधिक खर्चाची/बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

२.४१ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.३०४२७९९४/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.३०४२७९९४/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारीत अनुदानाएवढा खर्च अत्यल्प असल्याने अभिप्राय निरंक

(रुपये लाखांत)

२.४२ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२०१, बृहन्मुबई दुध योजना, २०१(०१) बृहन्मुबई दुध योजना, **प्रशासन** मूळ ६३९.३० पुनविनियोजन (-) १४.८७	६५४.१७	६२८.४०	(-) २५.७७

रु.२५.७७ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता, सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे तरतूद केलेला रु. १४.८७ लाखाचा अतिरिक्त निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले असून त्याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००८

२.४३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोदंविलेला खर्च रु.६२८३९९३५/-

विभागाने नोदंविलेला खर्च रु.६२८३९९३५/-

महालेखापाल व विभागाने नोदंविलेल्या खर्चातील फरक निरंक

<u>बचतीची कारणे :-</u>

१) सरकारी वकीलांची प्रलंबित सेवा प्रदानासाठी तरतूद करण्यात आली होती परंतु त्याबाबत प्रशासकीय मंजूरी व अन्वेषण प्रमाणपत्र यास मंजुर प्राप्त न झाल्यामुळे खर्चात बचत.

(रुपये लाखांत)

२.४४ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२१७, शासकीय दुध योजना, खोपोली (रायगड) २१७ (०४) शासकीय दुध योजना, खोपोली (रायगड) **वितरण** मूळ ४५.११ पुनविनियोजन (-) ११.३७	३३.७४	३३.७४	--

मुख्यत्वेकरून (एक) वेतन, पेट्रोल, तेल वंगण, वीज, पाणी, साहित्य व पुरवठा, मोटारवाहने, साहित्य व साधनसामग्री यावर कमी खर्च झाल्यामुळे आणि (२) सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २००८ मध्ये रु.३३४.१४ लाखांचा निधी परत करण्यात आला.

२.४५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात दुग्ध विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी नोंदविलेला खर्च रु.३३७३६९८/-

विभागाने नोंदविलेला खर्च रु.३३७३६९८/-

महालेखापाल व विभागाने नोंदविलेल्या खर्चातील फरक निरंक

अंतिम सुधारित अनुदानाप्रमाणे खर्च झाला असल्याने अभिप्राय निरंक

साक्ष :-

२.४६ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक २९ ऑगस्ट २०१२ रोजी परिच्छेद डी-६ संदर्भात दुग्धविकास विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अनुदान क्रमांक डी-६ दुग्धव्यवसाय विकास अंतर्गत समितीने अर्थसंकल्पीय तरतूद, मूळ तरतूद, पुरवणी मागण्या आणि पुरक खर्च कमी झाल्यामुळे २०० ते २५० कोटी रुपयांच्या झालेल्या बचतीची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

२.४७ विभागाने खुलासा करताना प्रत्यक्षात स्थापित क्षमता ३६ लक्ष लिटर दुध संकलनाची होती. त्यासाठी ८८७ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात ३६ लक्ष लिटरऐवजी ४.३१ लक्ष लिटर दुध संकलनाची हाताळणी करण्यात आली. या संदर्भात प्रत्यक्षात ३७५ कोटी रुपये खर्च झाले व २७६ कोटी रुपयांची बचत झाल्याचे समितीस सांगितले. यावर समितीने सन २००६-०७ ते २०१०-११ पर्यंत वर्षनिहाय दूध हाताळणीच्या संदर्भात स्थापित क्षमतेपेक्षा प्रत्यक्षात किती क्षमतेने दुधाची हाताळणी करण्यात आली असे विचारले असता विभागाने सन २००६-०७ मध्ये दूध संकलनाच्या एकूण स्थापित क्षमतेच्या १७ टक्के म्हणजे ६.२३ लक्ष लिटर, सन २००७-०८ मध्ये ४.३१ लक्ष लिटर, सन २००८-०९ मध्ये ५.१२ लक्ष लिटर, सन २००९-१० मध्ये ३ लक्ष लिटर, सन २०१०-११ मध्ये २.२३ लक्ष लिटर्सची हाताळणी झाल्याचे समितीस सांगितले.

२.४८ विभागाने समितीस दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सन २००६-०७ ते २०१०-११ या ५ वर्षांच्या कालावधीत स्थापित क्षमतेच्या कमी प्रमाणात दुधाचे संकलन हाताळणी झाली. स्थापित क्षमतेचा विचार करुन मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी केली परंतु प्रत्यक्षात स्थापित क्षमतेच्या अतिशय कमी प्रमाणात हाताळणी करण्यात आली. अशा प्रकारे अयोग्य पध्दतीने निधीची मागणी केली असल्याचे मत व्यक्त केले तसेच दूध संकलनाच्या स्थापित क्षमतेत दरवर्षी वाढ होणे अत्यावश्यक आहे. स्थापित क्षमतेनुसार पैसे मिळाले पाहिजे. परंतु स्थापित क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात दूध संकलन होण्याची कारणे काय आहेत ? या सर्व बाबींचा विचार केल्यास अर्थसंकल्पातून कमी निधीची मागणी करावी. त्यानंतर निधी कमी पडल्यास, आपल्याला आकस्मिकता निधीतून निधी मिळू शकतो. परंतु या संदर्भात २०० ते ३०० कोटी

रुपयांच्या जास्त निधीची मागणी केल्यानंतर तो निधी वर्षभर आपल्याकडे ठेवून घ्यावयाचा व वर्षाच्या शेवटी तो पुन्हा शासनाकडे परत करावयाचा. अशा प्रकारची पध्दत सुरु आहे. ही बाब योग्य नाही. खाजगी किंवा सहकारी दूध उत्पादक संघाकडून दुधाला चांगला भाव दिला जात असल्यामुळे शेतकरी शासकीय डेअरीमध्ये दूध देत नाही. त्यामुळे या संदर्भात आपण सरासरीनिहाय अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. ८०० कोटी रुपयांची मागणी करावयाची व ३०० कोटी रुपये परत करावयाचे, याचा अर्थ २५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम शासनाकडे परत पाठविणे, ही बाब संयुक्तिक वाटत नसल्याचे नमुद करत नाराजी व्यक्त केली. स्थापित क्षमता ३६ लक्ष लिटरची असतानाही प्रत्यक्षात ६-७ लक्ष लिटरपेक्षा जास्त दूध हाताळणी होत नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर त्यानुसार निधीची मागणी करणे क्रमप्राप्त होते. अशा परिस्थितीत विनाकारण वाढीव निधीची मागणी का करण्यात आली ? तसेच दूध संकलनाच्या स्थापित क्षमतेनुसार मागणी करुन त्यानुसार दूध संकलनाची हाताळणी करणे आवश्यक होते. परंतु स्थापित क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात दूध संकलन झाले व उर्वरित बचत झालेला निधी शासनाला परत करावा लागला याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. समितीने दुध संकलनाच्या स्थापित क्षमतेनुसार मागणी करून त्यानुसार दुध संकलनाची हाताळणी करण्याची केलेली सुचना विभागाने मान्य केली तसेच पुढील काळात याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आश्वासन समितीस दिले. तसेच मार्केटमधील दूधाच्या संदर्भात डेअरी डेव्हलपमेंट कमिशनरमार्फत कार्यवाही करण्यात येते, यामध्ये दोन पध्दती आहेत. दुग्ध विकास विभाग स्थापित क्षमता पूर्ण करीत असो किंवा नसो परंतु हा विभाग मार्केटमध्ये असणे आवश्यक आहे. त्याचे कारण असे आहे की, दुग्ध विकास विभागामार्फत दूधाची किंमत ठरविण्यात येते. त्यामुळे ओपन मार्केटमध्ये खाजगी व सहकारी दूध संस्था विभागाने ठरविलेल्या दूधाच्या किंमतीपेक्षा दूध उत्पादक शेतकऱ्यांना किमान दोन रुपये तरी जास्त देतात. त्यामुळे दुग्धविकास विभाग मार्केटमध्ये कार्यरत असणे आवश्यक असल्याचे समितीस सांगितले.

२.४९ यावर समितीने विभागास अशी विचारणा केली की, विभागाने १७ रुपये लिटर दुधाचे भाव जाहीर केले तर खाजगी व सहकारी दूध संस्था १९ रुपये लिटर भाव देतात. त्यामुळे दूध उत्पादकांना दोन रुपयांचा फायदा होतो. हा विषय धोरणात्मक आहे. शासनाची धोरणात्मक भूमिका चांगली आहे. त्यामुळे विभागाचे अस्तित्व मार्केटमध्ये असणे अत्यंत

आवश्यक आहे. अहवालात नमूद केल्याप्रमाणे विभागाने अहवाल वर्षात ८८९ कोटी रुपयांची मागणी केली होती. विभागाची स्थापित क्षमता ३६ लाख लिटर्स आहे, त्यापैकी फक्त १२ टक्के दूधाचे संकलन देखील शासनाकडून होत नाही. ३६ लाख लिटर्स स्थापित क्षमतेनुसार विभागाने आस्थापना निर्माण केली आहे. त्यामुळे आस्थापनेवर होणारा खर्च वाया जात आहे. दूध संकलनाची स्थापित क्षमता ३६ लाख लिटर्स असताना फक्त ४ लाख लिटर्स दूध संकलित होत आहे. असे असताना विभागात बेकायदेशीररीत्या भरती करण्यात येत आहे. या विषयावर सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. विदर्भातील नागपूर व मराठवाड्यात बेकायदेशीर भरती करण्यात आली आहे. दूध संकलनाची स्थापित क्षमता निर्माण करण्यासाठी विभागाच्या माध्यमातून गाई व म्हशींचे वाटप शेतकऱ्यांना करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान देण्यात आले आहे. दूध संकलनाचे आठ प्रकल्प मराठवाड्यात असून त्यापैकी फक्त एक प्रकल्प अस्तित्वात आहे. शासनाकडून मिळालेल्या अनुदानात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आले आहेत. त्यामुळे खाजगी व सहकारी दूध संघातून काही प्रमाणात दूध शासनाकडे जमा केले पाहिजे असे बंधन त्यांच्यावर आणले पाहिजे. कायद्यानुसार असे बंधन आणता येणार आहे काय ? अशा प्रकारची कार्यवाही शासनाकडून करण्यात येणार आहे काय ? यावर विभागाने शासनाची दूध संकलन स्थापित क्षमता ३६ लाख लिटर्स असून त्यावेळी आस्थापनेवर १३ हजार कर्मचारी होते. सन २००७-२००८ मध्ये कर्मचारी संख्या ९ हजारावर आलेली आहे. आताच्या परिस्थितीत कर्मचाऱ्यांची संख्या ५०५० इतकीच आहे, त्यामुळे टप्प्या टप्प्याने कर्मचारी कमी करण्यात येत असल्याची माहिती समितीस दिली.

२.५० यावर समितीने नागपूर येथे जी भरती करण्यात आली ती योग्य होती काय ? तसेच स्थापित क्षमतेच्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची संख्या आहे. आता फक्त ४.५ लाख लिटर्स इतक्याच दुधाचे संकलन होते, त्यानुसार कर्मचाऱ्यांची संख्या कमी करावयास पाहिजे होती. विभागामार्फत एकूण दूध संकलन किती होते. जेवढे दूध विभागाकडे संकलित व्हावयास पाहिजे तितके दूध संकलित होते काय ? अशी विचारणा केली असता विभागाने मे महिन्यात प्रतिदिन ११३ लाख लिटर्स दूधाचे संकलन होते. जुलै महिन्यात प्रतिदिन ९६ लाख लिटर्स दूध संकलन होते. गेल्या वर्षी जुलै महिन्यात ९४ लाख लिटर्स दूधाचे संकलन झाले होते. यापैकी फक्त २ ते ३ टक्के दूधाचे संकलन विभागाकडे होते. एकूण दुधाच्या काही टक्के दूध

शासनाकडे जमा केले पाहिजे असे बंधन खाजगी व सहकारी दूध संघावर कायद्यानुसार टाकण्यात आले नसल्याचे समितीस सांगितले.

२.५१ समितीने यावर शासनाचे दूधाचे दर व खाजगी दूध संघाच्या दुधाच्या दरामध्ये मोठी तफावत आहे. सामान्य माणसाला योग्य भावात दूध मिळाले पाहिजे. यासाठी धोरणात्मक निर्णय शासनाला घ्यावा लागणार आहे. एकूण दूध संकलनातील दोन ते पाच टक्के दूध शासकीय दूध योजनेकडे आले पाहिजे. या संदर्भातील धोरणात्मक निर्णय विभाग घेणार आहे काय ? एकूण दुधाच्या संकलनातील काही टक्के दूध शासकीय डेअरीकडे जमा केले पाहिजे. अशा प्रकारे बंधन खाजगी व सहकारी दूध संघावर टाकता येईल का याबाबत विभागाने विचार करावा व यासंदर्भात कोणते धोरण शासन आखणार आहे याचाही खुलासा करण्याबाबत विभागाला आदेशित केले असता यावर विभागाने खाजगी व सहकारी दूध संघावर आज कोणतेही बंधन घालण्यात आले नसून दुग्धविकास विभागामार्फत दूधाची किंमत ठरविण्यात येते. त्यातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होतो. एकूण दूधाच्या दोन टक्के दूध शासनाकडे जमा केले पाहिजे याबाबत कोणताही नियम करण्यात आला नाही. दुसरे असे की, सहकारीकरण झाले पाहिजे, याची अंमलबजावणी करीत असताना ३३ जिल्ह्यापैकी १३ जिल्ह्यात सहकारीकरण झाले आहे. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या काही भागात सहकारीकरण झाले नाही. महानंदने हे काम सुरु केले आहे. अमरावती, नागपूर व औरंगाबाद या विभागात शासनाला हे काम करावे लागणार आहे. संपूर्ण २० जिल्ह्यात शासन काम करु शकणार नसल्याचे विभागाने समितीस सांगितले.

२.५२ मराठवाड्यातील परभणी येथे फक्त शासकीय दूध संकलित होते. ते दूध लातूर येथे पाठविण्यात येते. त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढतो. याबाबत मागील काळात आंदोलने झाली. मोर्चा काढण्यात आला होता. भविष्यकाळात तेथे ५० लिटर्स दूध देखील संकलित होऊ शकणार नाही. अशा गोष्टींवर विभागाने नियंत्रण आणले पाहिजे. मागील काळात दुग्ध विकास विभागाने अनुदान देऊन ज्या गाई व म्हशी दिल्या, त्या भाकड होत्या त्यातून दूध वाढले नाही. शासनाकडून देण्यात आलेल्या अनुदानात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण दूधाचे संकलन कसे काय वाढेल. दुधाचं संकलन वाढविण्यासाठी विभाग काय प्रयत्न करीत आहे ? अशी विचारणा समितीने विभागाकडे केली असता विभागाने दुग्ध विकास

विभागाकडे एकूण १३ हजार कर्मचारी होते त्यांची संख्या कमी करुन ९ हजार करण्यात आली आहे. तसेच गेल्या दोन-तीन-चार वर्षात टप्प्या टप्प्याने कर्मचाऱ्यांची संख्या कमी करुन ५ हजारापर्यंत आणली असल्याची माहिती समितीस दिली.

२.५३ समितीने दूध संकलन करीत असताना प्रति लिटर्स व्यवस्थापन खर्च किती करण्यात येतो याबाबत विचारणा केली असता प्रति लिटर्स २.९० पैसे खर्च करण्यात येता असे विभागाने सांगितले. समितीने यावर ३६ लाख लिटर्स दूध संकलनाची स्थापित क्षमता असताना फक्त सरासरी ५ लाख लिटर्स दूध संकलित करण्यात येते. यासाठी सन २००५ पसूनची आकडेवारी उपलब्ध करून देण्याबाबत विभागास सांगितले यावर विभागाने सन २००५-०६ मध्ये ८.६ लाख लिटर्स दूध संकलित करण्यात आले. त्यानंतर २००६-०७ मध्ये ६.२३ लाख लिटर्स दूध संकलित करण्यात आले होते. सन २००८-२००९ मध्ये विभागाने १०३ कोटी रुपये परत केले आहेत. त्यानंतर सन २००९-२०१० मध्ये २२३ कोटी रुपये परत केले आहेत. सन २०१०-२०११ मध्ये २०६ कोटी रुपये परत करण्यात आले आहेत अशी माहिती समितीला दिली. समितीने मागील वर्षात किती दूध संकलित करण्यात आले, त्याचा आधार घेऊन पुढील वर्षाच्या बजेटची मागणी करावयास पाहिजे. मागील वर्षात किती दूध संकलित झाले याचा विचार न करता पुढील बजेटची मागणी करण्यात आलेली आहे, ही बाब योग्य नसल्याचे नमूद करत, दरवर्षी जवळपास बजेटमध्ये जास्त रकमेची मागणी करुन २०० कोटी रुपयांची रक्कम परत करण्यात येते. त्यामुळे हा निधी अकारण पडून राहतो. आवश्यक तेवढ्याच निधीची मागणी केली असती तर अशा प्रकारे ५०० कोटी रुपये दुसऱ्या सामाजिक कार्यासाठी शासनाला वापरता आले असते. विभागाचा खर्च कमी होत असून दरवर्षी जास्तीचा निधी मागविण्यात येतो. एकंदरीत कामकाजाच्या दृष्टीने ही बाब योग्य नसल्याचे सांगत तीव्र नापसंती व्यक्त केली. समितीने याबाबत वित्त विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा केली असता वित्त विभागाने दरवर्षी मूळ रकमेपैकी किती रक्कम खर्च होते, याचा विचार करुन बजेटची मागणी करणे आवश्यक आहे. या बाबीकडे नियोजन व वित्त विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. बजेटमध्ये रक्कम नमूद करतांना मागील वर्षात किती रक्कम खर्च करण्यात आली याचा विचार करुन वित्त व नियोजन विभागाने पुढील वर्षाचे बजेट मंजूर करावयास

पाहिजे. नॉन प्लॅनसाठी जास्तीची रक्कम शासनाकडून दिली गेली असेल तर ती वित्त विभागाची जबाबदारी असल्याची माहिती वित्त विभागाने समितीस दिली.

२.५४ समितीने यावर सन २००९-२०१० मध्ये शासनाकडे प्रत्यक्षात ५.१२ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. सन २००६-२००७ मध्ये ५.९८ कोटी रुपये खर्च झाला आणि ७.२१ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. परिगणना केली तर मागणी आणि मिळालेली रक्कम यात फार मोठा फरक नाही. प्रत्यक्षात जी जास्त रक्कम देण्यात आली त्यासंदर्भात संबंधित विभागाचे सचिव या बाबींकडे बघत नव्हते काय? तसेच जबाबदारी ही वित्त विभागाची असल्याचे सांगत गेल्या दोन चार दिवसात मोठया प्रमाणात पैशांचे वाटप करण्यात आले. हे पैसे नेमके कोठे गेले. जास्तीची मागितलेली रक्कम नेमकी कोठे हस्तांतरीत होते, की कोणत्या बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येते? ही रक्कम शासनाकडे परत केली किंवा अन्य कोठे प्रत्यर्पित केली आहे, याबाबतची माहिती समितीस देण्याबाबत आदेश दिले असता त्याबाबत असा खुलासा करण्यात आला की, ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात किती रक्कम लागेल, याबाबत आढावा घ्यावयाचा असतो. सन २००८-२००९ करिता किती रक्कम खर्च झाली आणि राहिलेल्या तीन महिन्यात किती खर्च अपेक्षित आहे, बजेट कमी होते किंवा जास्त होते? बजेट जास्तीचे होत असेल तर ती रक्कम प्रत्यर्पित करावयाची आणि सुधारीत मागणीचा प्रस्ताव तयार करावयाचा असतो. प्रत्यक्षात जास्त तरतूद झालेली असून खर्च कमी केलेला आहे. तेवढा खर्च शासनाकडे प्रत्यर्पित होतो की, अन्य विभागाकडे वळता केला जातो, याबाबतची तपासणी होणे देखील गरजेचे असल्याचे मत समितीसमोर व्यक्त केले.

२.५५ समितीने गेल्या तीन चार वर्षीच्या साक्षीमध्ये जे पैसे अखर्चिक राहिले आहेत त्यासंबंधीचा मुद्दा चर्चेला घेऊन पैसे नेमके मार्च महिन्याच्या शेवटी मिळतात, परंतु विशिष्ट ठिकाणी ते पैसे खर्च केले जातात. हे पैसे नेमके कोठे वळविले जातात ? ९१ कोटी रुपयांचा शासनाचा अपव्यय झालेला आहे, ही बाब वित्तीय नियमात बसत नाही, ही अतिशय गंभीर बाब असून मागचा अनुभव लक्षात घेऊनही विभागाने जास्तीची रक्कम मागितली आहे. १०९ कोटी रुपये, २१० कोटी रुपये जास्तीचे मागितले आहेत. अशाप्रकारे जास्तीचे पैसे वाढवून अंदाजपत्रक फुगविले जाते अशी विचारणा केली असताही रक्कम खर्च होईल असे अपेक्षित होते, पण तसा खर्च झालेला दिसत नसल्याचा खुलासा विभागाने समिती समोर केला.

समितीने यावर शासनाकडे मागणी केलेली रक्कम प्रत्येक वर्षी खर्च होत नसल्याचे नमूद करत वकिलांची नेमणूक केली जाते परंतु प्रत्यक्षात शासनाकडून त्या प्रकरणांचे निकाल लागतात काय? तसेच वकिल प्रकरणे बरोबर हाताळतात काय, ज्या प्रकरणाकरिता वकिलाची नियुक्ती केली आहे ते निर्णय सरकारकडून लागतात की फिर्यादीकडून लागतात? अशी विचारणा केली असता विभागाने श्री.जाधव या सरकारी वकीलांना नेमले होते. विभागाकडे कर्मचा-यांची संख्या खूप मोठी आहे. त्यातही प्रामुख्याने कामगार बाब असल्यामुळे त्यासाठी वकिलाची गरज भासते. या वकिलांसाठी १० लाख २२ हजार ७०० रुपयांचे बिल अदा केले असून या वकीलांनी आतापर्यंत ४४ प्रकरणे हाताळली असल्याचे सांगितले. सन २००७-२००८ या कालावधीतील देयकाला शासन स्तरावर दिनांक १६ मार्च, २००९ रोजी मंजुरी मिळालेली असून देयक विधी व न्याय विभागाकडे पाठवून त्यांच्याकडून तपासून घेण्यात येते. वकिलांनी केलेले कामकाज हे बरोबर होते किंवा नाही त्याची देखील तपासणी करुन देयक मंजूर केले जात असल्याची माहिती समितीस दिली.

२.५६ यावर समितीने मुंबईत दूध योजनेसाठी १८०० स्टॉल दिलेले असून ते जीर्ण झालेले आहेत. ते स्टॉल प्रायोजकाला चालवायला देत नसल्याबाबत तसेच प्रायोजक नेमून त्या स्टॉलना चांगले अधुनिक बनविण्याबाबत सुचना केली असता समितीने केलेली सुचना अंमलात आणण्यात येईल असे विभागाने आश्वासन दिले.

२.५७ विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीबाबत समितीचे समाधान न झाल्याने सदर परिच्छेदासंदर्भात दि. १३ सप्टेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिव यांची पुन्हा साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्या वेळी समितीला शासनाच्या दुग्धविकास योजनांबाबत विभागाने पुढील माहिती दिली.

२.५८ दुग्ध व्यवसाय विकास विभागाची स्थापना सन १९५८ मध्ये झाली. विभागाच्या ३३ दुग्धशाळा व ६७ शितकरण केंद्रे आहेत. विभागाची प्रतिदिन स्थापित क्षमता ३६ लाख लिटर्स इतकी आहे.

२.५९ सन २००७-२००८ या वर्षात प्रत्यक्षात ४ लाख ३१ लिटर्स एवढी हाताळणी झाली असता त्या वर्षी २,९१,४५,४८/- हजार रुपयांची बचत झाली. त्यापैकी २,८७,९२,३८/- हजार रुपये वर्षाभरात परत केले होते त्यानंतर उर्वरित रक्कमही परत करण्यात आली.

२.६० संपूर्ण महाराष्ट्रातून वेगवेगळया माध्यमातून प्रती दिवशी असणारी दुधाची एकूण गरज किती आहे ? असे समितीने विचारले असता विभागाने ८१ लाख लिटर्स दुधाची गरज असल्याचे सांगितले. यावर समितीने ही बाब अतिशय गंभीर आहे. या विभागाला स्वतंत्र मंत्री आहेत, बजेट आहे तरीही प्रती दिवशी ८१ लाख लिटर्स इतकी दुधाची गरज असताना आपली स्थापित क्षमता केवळ ३६ लाख लिटर्स एवढीच आहे. त्यासाठी येणारा खर्च मात्र वाढलेला आहे. या वाढलेल्या खर्चाच्या तुलनेत जर दुधाचे उत्पादन वाढत नसेल तर हे पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे. अनुदान घेऊनही ज्या योजना केवळ कागदावरच राहिलेल्या आहेत, त्याबाबतची माहिती न देता इतर माहिती दिली जात असल्याचे नमूद करत मुंबई सारख्या ठिकाणी वरळी तसेच गोरेगाव येथे जागा असून व एवढया सगळया सोयी असतानाही विभागाने जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, दूध संकलनामध्ये शासनाचा वाटा २ टक्के, सहकारी क्षेत्राचा वाटा ३७ टक्के व खाजगी क्षेत्राचा वाटा ६१ टक्के आहे. शासनाचा वाटा इतका कमी असण्याची कारणे काय आहेत ? तसेच, विभागातील एकूण कर्मचारी १३५०१ इतके असून सध्या कार्यरत पदे ५०५० असल्याचेही नमूद केले आहे. विभागातील ८००० रिक्त पदे असल्याची कारणे काय? तसेच इण्टिग्रेटेड प्रकल्प उभे आहेत काय ? अकोला येथील मशिनरी का विकली इंटिग्रेटेड प्रकल्पांना किती निधी दिला आहे व मराठवाड्याची जबाबदारी कोणाची आहे? केन्द्र सरकार पुरस्कृत योजना किती जिल्ह्यात सुरु आहेत ? केन्द्राचे अनुदान घेऊन या योजना बंद झालेल्या आहेत काय ? अशी विचारणा केली.

२.६१ यावर विभागाने समितीने मागील बैठकीमध्ये काही सूचना केल्या त्या अनुषंगाने सर्व प्रादेशिक दुग्ध विकास अधिका-यांची बैठक घेऊन. शासनाच्या योजनेअंतर्गत ज्यांना आर्थिक मदत दिलेली आहे अशा सर्व तालुका संघांच्या आणि जिल्हा संघांच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असून मराठवाडा विभागाची जबाबदारी श्री.वाघमारे नावाच्या अधिकाऱ्यांकडे असल्याचे सांगितले. तसेच स्वच्छ दूध उत्पादन योजनेअंतर्गत १८ दूध संघाना २१ कोटी रुपयाचे वाटप केलेले असून यामध्ये केन्द्र आणि राज्य शासनाचा हिस्सा आहे. संगमनेर संघाला ४ कोटी ३५ लाख रु., नेवासा संघाला १.२२ कोटी रु., हुतात्मा संघाला ६६ लाख रु., शीवस्मृती संघाला ३.५८ कोटी रु., बीड संघाला १.६१ कोटी रु., फलटण संघाला १.३७ कोटी रु., आष्टी संघाला १.७१ कोटी रु., पुणे जिल्हा संघाला १.६० कोटी रु.,

तुळजाभवानी संघाला १.५९ कोटी रु., दूधगंगा संघाला ३.२७ कोटी रु., राजारामबापू पाटील संघाला ३.४९ कोटी रु., बारामती संघाला ३.७१रु., याप्रमाणे निधी दिलेला असल्याचे समितीस सांगितले.

२.६२ समितीने बीडमधील २ आणि औरंगाबादमधील १ या संघाव्यतिरिक्त बाकीचे सर्व संघ पश्चिम महाराष्ट्रातील असल्याचे नमूद केले. केन्द्र सरकारकडून आलेला निधी दूध संघांना वितरित करण्यात आला. हे वितरण केन्द्राकडून होते असे विभागाने समितीस सांगितले. शेतकरी आत्महत्या करण्यापासून वाचावा यासाठी मराठवाड्यातील ६ जिल्ह्यामध्ये केन्द्राच्या पॅकेज मधून शेतक-यांना गायी वाटप करुन दुग्ध विकास करण्याचे धोरण ठरविण्यात आले होते. असे असताना जास्तीत जास्त प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात दिले गेले. अकोला येथील मशिनरी भंगारात निघाली. ज्या भागात शेतक-यांच्या आत्महत्या होतात त्या भागात प्रकल्प न देण्याचे कारण काय ? अशी समितीने विभागाकडे विचारणा विभागाकडे केली असता विभागाने ज्या संघाकडे दुधाच्या साठवणुकीची सोय नाही अशा दूध संघांना कोल्डस्टोरेजचा पर्याय दिला होता. विदर्भामध्ये फक्त भंडारा संघ नॉर्म्समध्ये बसला. इण्टिग्रेटेड डेअरी फार्म प्रोजेक्टसाठी मराठवाडा आणि विदर्भातील संघांकडे एस्टॅब्लिशमेण्ट आणि एकूणच कॉन्सण्ट्रेटेड व्यवस्था नव्हती, अशी माहिती समितीला दिली.

२.६३ समितीने यावर मराठवाड्याला या प्रकल्पापासून वंचित ठेवलेले आहे. परभणीमध्ये दूध संकलन केन्द्र असताना देखील तेथील दूध नांदेडला पाठविण्यात येते. दूध संकलनाची पध्दत चुकीची आहे. विभागाचे नियोजन चुकीचे आहे. फक्त पश्चिम महाराष्ट्रातील दूध प्रकल्प फायद्याचे कसे होतात ? तसेच विदर्भातील दूध संकलन केन्द्रे आणि इण्टिग्रेटेड प्रकल्प बंद असल्याबाबत तसेच बीडची स्थिती काय आहे याची विभागाकडे विचारणा केली असता विभागाने सद्य:स्थितीत ४६ पैकी ५ प्रकल्प चालू आहेत. मराठवाड्यात ७ पैकी ४ चालू आहेत. ४ कार्यान्वित करण्याच्या स्थितीत आहेत तसेच बीडमध्ये साखरेबोरगाव येथे गोमाता नावाची संस्था असल्याचे सांगितले

२.६४ समितीने यावर राज्यातील एकूण दुग्ध व्यवसायामध्ये राज्याचा वाटा फक्त २ टक्के आहे. हा वाटा वाढत नाही. त्यामुळे केवळ २ टक्क्यासाठी शासनाने दुग्ध व्यवसाय करायचा की या व्यवसायातून बाजूला होऊन फक्त धोरण ठरवायचे, असा प्रश्न निर्माण झ

ालेला असून शासनाच्या दुग्ध व्यवसायामध्ये हजारो कर्मचारी असून करोडो रुपये खर्च होत आहेत या बाबत शासनास शिफारस करण्याचे मत समितीने यावेळी मांडले. राज्यातील जिल्हा दूध संघांना केन्द्र शासनाच्या योजनेतून कोटयवधी रुपये मिळालेले आहेत. पूर्व विदर्भातील दोन जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. गोंदिया जिल्ह्यातील दूध संघाचे बळकटीकरण करण्यासाठी निधी दिलेला नसल्याबाबत तीव्र खेद व्यक्त केला. शासनाच्या दूध संकलन केन्द्रामध्ये संकलित केलेले दूध त्याच ठिकाणच्या खाजगी संस्थेला तोटा सहन करुन विकले जाते काय ? अशी विचारणा केली असता विभागाने असा प्रकार कुठे घडलेला नाही. राज्यात ऑर्गनाईज्ड सेक्टरमध्ये १ कोटी १३ लाख लिटर दूध संकलन होते. त्यामध्ये राज्य शासनाचा फक्त २ टक्के वाटा आहे. विभागाची भूमिका पंच म्हणून असली पाहिजे. ही भूमिका अधिक सक्षम करण्याचे विभागाचे प्रयत्न आहेत.

२.६५ समितीने गोंदिया येथील दुग्धसंकलन केंद्र व शीतकरण केंद्राकरिता गेल्या तीस वर्षांपासून निधी मिळालेला नसून खाजगी संस्था व जिल्हा परिषदेच्या सहकार विभागाने या दुग्ध संकलन केंद्राने सहाय्य केलेले आहे. सोयी सुविधांच्या अभावामुळे गोंदिया येथील दुग्ध संकलन केंद्रामध्ये दुधाचे नुकसान होत असल्याचे सांगितले असता. विभागाने दुग्ध संकलन केंद्रांना सोयी सुविधा व प्रोत्साहन देण्याच्या कार्यक्रमाकरिता तसेच, दुग्धव्यवसायाला चालना मिळण्याकरिता निरनिराळया योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता २४२ कोटी रुपये मागितले होते. दुग्धव्यवसायाकरिता राज्यभरामध्ये विविध जिल्हयांमध्ये तेथील दुग्धउत्पादनाप्रमाणे आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. वित्त विभागाच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार सन २००१-२०११ पर्यंत दुग्धव्यवसाय विभागाची संचित तूट ४,१२७ कोटी रुपयांची आहे. शासनाचा विभाग दुग्ध संकलन तसेच, त्याची वाहतूक, दुधापासून निरनिराळे दुग्धजन्य पदार्थ निर्माण करण्याचे प्रोसेसिंग युनिटसना प्रोत्साहन देण्याकरिता दुग्ध विकास विभागाने शासनाच्या वित्त विभागाकडे विशेष निधीची मागणी केलेली आहे. दुग्धव्यवसायामध्ये शासनाचा विभाग पंच म्हणून असतो. राज्यातील ३५ जिल्हयांपैकी १३ जिल्हयांमधील दुग्ध संकलनाचे काम दुग्ध संकलन महासंघाकडे सोपविलेले आहे. उर्वरित २२ जिल्हयांपैकी औरंगाबाद व नागपूर विभागातील पाच जिल्हे, नाशिक विभागातील ४

जिल्हयांमध्ये मेरिटवर तपासणी करुन तेथील दुग्धसंकलनाचे काम एनडीडीबीकडे कामकाज सुपूर्द केलेले आहे.

२.६६ शासकीय दुग्धशाळा व शितकरण केंद्र टप्प्याटप्प्याने सहकारी संघाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय दि.११ नोव्हेंबर, २००१ रोजी शासनाने घेतला आहे. त्यानुसार आतापर्यंत ४ दुग्धशाळा व ८ शितकरण केंद्रे सहकारी संघांना हस्तांतरित करण्यात आले असल्याचे सांगितले. तसेच दुग्ध संकलनामध्ये शासनाचा वाटा २ टक्के, सहकारी क्षेत्राचा ३७ टक्के आहे. खाजगी क्षेत्राचा वाटा ६१ टक्के इतका आहे. शासनामार्फत दूध प्रक्रिया व वितरण करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याची माहिती समितीस दिली.

२.६७ समितीने दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या दुग्ध संकलन केंद्रांची दुग्ध संकलनाची व संवर्धनाची क्षमता आता जेवढी आहे, त्यापेक्षा ती वाढविण्याची भविष्यामध्ये आवश्यकता भासणार असल्याचे मत मांडले. दुग्धव्यवसाय विकास विभाग व दुध सहकारी महासंघामध्ये अतिरिक्त कर्मचारी काम करीत असून दुग्धव्यवसाय विकास विभागाचा व महामंडळाचा आस्थापना खर्च प्रचंड आहे, असे दिसून येत असल्याचे नमूद करत दुधामध्ये होणारी भेसळ थांबविण्याकरिता कोणत्या प्रकारची यंत्रणा कार्यरत आहे अशी विचारणा केली. यावर विभागाने एकूण १३,००० कर्मचा-यांपैकी ८,००० कर्मचारी कमी केले आहे. ही शासकीय भरती इतर विभागांमध्ये इतर पदांवर समायोजित करण्यात येणार असल्याचे समितीस सांगितले.

२.६८ समितीने नागपूर येथील दुध संकलन सहकारी महासंघामध्ये अतिरिक्त भरती कोणत्या माध्यमातून करण्यात आली होती, असा प्रश्न विभागाला विचारला असता विभागाने दिनांक २३ एप्रिल,२००८ रोजीचा शासन निर्णय, दिनांक २२ ऑगस्ट,२००५ च्या जी.आर.नुसार रोजी प्रतिक्षा यादीतील ५० टक्के उमेदवार पहिल्या वर्षी तसेच, उर्वरित ५० टक्के २५ टक्के प्रतिवर्षी याप्रमाणे येत्या दोन वर्षांमध्ये भरती करण्यात येतील. उपरोल्लेखित जी.आर.नुसार ही पदे भरण्यात आलेली आहेत. दिनांक १२ जून,२००४ च्या शासन निर्णयानुसार उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ दिनांक २१ मार्च,२००८ रोजी त्याची अंमलबजावणी दिनांक ३१ ऑगस्ट, २००८ रोजी पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत असे समितीस सांगितले. दुग्ध विकास खात्यामध्ये एवढी अतिरिक्त पदे असतांनाही जिल्हा पातळीवरील पदे भरण्याकरिता

जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिली होती का ? आकृती बंधानुसार किंवा बिंदु नामावलीनुसार अतिरिक्त पदे होत होती तरीही नवीन पदांची भरती कोणत्या आधारावर केली ? दुग्धव्यवसाय विकास विभागाने जिल्हा पातळीवरील पदे अगोदरच कर्मचा-यांचे सरप्लस असतांना कसे भरले? नागपूर येथील अनैतिक भरती प्रकरणात श्री.आडे,दुग्धविकास अधिकारी यांचाही या समावेश होता. नागपूर येथे प्रतिक्षा यादीतील पदे भरण्यात आली होती त्यांच्या वर्गीकरणाबाबत समितीने विभागास विचारणा केली असता विभागाने नागपूर येथील विसंगत भरतीचे प्रकरण तपासून घेण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले. मराठवाडा आणि नागपूर विभागामध्ये प्रतिक्षा यादीतील एकूण १०० पदे भरण्यात आली होती. वर्ग-३ -२०, वर्ग-४ -१९, वर्ग:-३ २८, वर्ग-४ - २५, तिसरे वर्ष वर्ग-३- २१, वर्ग-४ -११ पदे भरण्यात आली होती. या प्रतिक्षा यादीमध्ये काही पदे अनुकंपा तत्व, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त अशा प्रकारची असल्याची माहिती समितीस दिली. यावर समितीने नागपूर विभागामध्ये भुकंपग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त पदे दुग्धविकास विभागामध्ये भरण्याचे कारण काय आहे ? सर्वसाधारणपणे भुकंपग्रस्तांना जवळपास व प्रकल्पग्रस्तांना संबंधित प्रकल्पामध्ये किंवा जवळपासच्या सरकारी व निमसरकारी महामंडळामध्ये नोकरी देण्यात येते. अगोदरच या विभागामध्ये जास्त कर्मचारी कार्यरत असतांनाही नागपूर विभागामध्ये विविध पदांची भरती करण्यात आलेली आहे. शासन निर्णयांचा आधार घेऊन आयुक्त व जिल्हाधिकारी पातळीवर आततायीपणाचा निर्णय घेण्यात आलेला असल्याचे नमूद करत या संदर्भात संबंधित अधिका-यांवर जबाबदारी फिक्स करुन नियमाप्रमाणे कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत समितीने नोंदविले.

२.६९ यावर विभागाने नागपूर विभागातील भरती प्रकरणामध्ये विसंगती आहे. कर्मचारी अतिरिक्त असतांना नव्याने भरती करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. हे मान्य आहे. तसेच, हे अतिरिक्त कर्मचारी इतरत्र पाठविले जात आहे, हेही चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

२.७० दुग्धविकास खात्याने एकूण किती रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित केली होती तसेच किती रुपयांचा निधी या खात्याला मिळाला होता खात्याला मिळालेल्या निधीपैकी किती रुपये कर्मचा-यांच्या पगारावर खर्च करण्यात आला अशी विचारणा समितीने केली असता विभागाने सन २०१२-२०१३ खात्याला ५५४.८७ लाख रुपये कर्मचा-यांच्या पगारावर खर्च केला जातो. दुग्धविकास खात्यातील तत्कालीन अधिकारी माननीय मंत्री महोदयांनी कॅबिनेट

बैठकीमध्ये हे निर्णय घेतलेले असल्याचे सांगितले. परंतु आता कर्मचा-यांची संख्या मर्यादित करुन आस्थापना खर्च कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती समितीस दिली.

२.७१ समितीने दुग्धजन्य पदार्थांवर म्हणजे तूप, ताक, आईस्क्रीम स्टॅण्डर्ड क्वालिटी मार्क ॲगमार्क वगैरे क्वालिटी मार्क आहेत. परंतु दुधाच्या पॅकेटवर कोणताही क्वालिटी स्टॅण्डर्ड मार्क नसल्याचे नमूद केले असता विभागाने यांसंदर्भात विचार केला जाईल असे समितीस आश्वासित केले

२.७२ खाजगी दुग्धजन्य पदार्थांवर आयएसआय,बीएसआय, कॅलरीवाईज, फॅटवाईज स्टॅण्डर्ड मार्किंक केलेल असते. दुधामध्ये फक्त फुल क्रीम मिल्क आणि टोण्ड दुध, डबल टोण्ड मिल्क असे प्रकार बाजारामध्ये उपलब्ध होतात. खाजगी व सहकारी दुग्ध विक्री क्षेत्रामध्ये दुध विकतांना भेसळही केली जाते. केंद्र शासनाचा ट्रेडमार्किंग स्टॅण्डर्ड ट्रेड मार्किंक रेट हे केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. तरीही राज्य शासनाच्या दुग्धविकास विभागाने या संदर्भात गांभीर्याने विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मत समितीने नोंदविले. यावर विभागाने राज्य शासन बहुतांशी सहकार व खाजगी क्षेत्रातील दुधाचे स्टॅण्डर्ड तपासत असल्याचे सांगितले. सहकारी व खाजगी क्षेत्रातील दुधाचे नमुने तपासले जातात, असे जर शासनाचे म्हणणे असेल तर आतापर्यंत सब स्टॅण्डर्ड क्वालिटी, भेसळयुक्त दुधाचे किती नमुने किंवा केसेस पकडल्या गेलेल्या आहेत, व त्यांच्यावर कारवाई झालेली आहे ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर आतापर्यंत भेसळयुक्त दुधाच्या नमुन्याच्या केसेस पकडलेल्या आहेत. तसेच, संबंधितांवर त्यावेळी नियमाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात आली होती. परंतु आकडेवारी विषयी सविस्तर माहिती संकलित करुन समितीला सादर करण्यात येईल, असे आश्वासन विभागाने समितीला दिले.

२.७३ समितीने विद्यमान अर्थसंकल्पिय वर्षाकरिता दुग्धविकास खात्याने किती रुपयांच्या निधीची मागणी केली होती ? किती रुपये प्रत्यक्षात प्राप्त झाले होते ? तसेच मुंबईमध्ये दुध तपासणी व मोजणी केंद्र कोठे स्थित आहेत ? यावर विभागाने दुग्धविकास खात्याने चालू आर्थिक वर्षाकरिता ८६७ कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु प्रत्यक्षात दुग्धविकास खात्याला ५५४ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत व मुंबईमध्ये दुध तपासणी व मोजणी केंद्र वरळी येथे स्थित असल्याचे समितीस सांगितले. समितीने दुग्ध विकास विभागाने दुध संकलन

व क्वालिटी स्टॅण्डर्ड मार्किंग संदर्भात धोरणात्मक विचार करणे आवश्यक आहे. तसेच, दारिद्रयरेषेखालील लोकांना टोण्ड दुधाचा पुरवठा केला जातो. श्रीमंत लोकांना फुल क्रीम दुधाचा पुरवठा केला जात असल्याचे सांगितले असता विभागाने टोण्ड दुध हे दुधामधून क्रीम काढून बनविले जाते. या क्रीमचा वापर इतरत्र उत्पादनाकरिता केला जातो. तसेच, हे क्रीम काढलेले दुध गरिबांना कमी किमतीमध्ये उपलब्ध करुन दिले जाते. तसेच, हे टोण्ड दुध आर्मी फोर्समध्येही पुरविले जाते. ज्या प्रमाणे गरिबांना लेव्हीची साखर दिली जाते त्याप्रमाणे महानंदासारख्या टोण्ड व सेमी क्रीम दुधामार्फत गरिबांना कमी किंमतीमध्ये दुध पुरवठा केला जातो, असे स्पष्टीकरण विभागाने केले. विभागाने दुधामध्ये लेव्ही हा प्रकार नसल्याचे सांगत. जी सूचना समितीने केलेली आहे त्याचा स्वीकार करु, असे आश्वासन समितीस दिले.

२.७४ मुंबईत पूर्वी किती गोठे होते आणि आता किती गोठे आहेत ? याबाबत विभागाकडे विचारणा केली असता विभागाने सुप्रीम कोर्टात केस दाखल झालेली आहे. दापचरी येथे ६ हजार एकर जमीन संपादित करण्यात आलेली असून ही जमीन डेअरी डिपार्टमेंटच्या ताब्यात आहे. ही जमीन महाराष्ट्र आणि गुजरात राज्याच्या बॉर्डर जवळ असून तेथे धरण बांधण्यात आलेले आहे. धरणामध्ये ५२० हेक्टर जमीन गेल्याचे तसेच पाटाच्या चाऱ्यांमध्ये ४३ हेक्टर जमीन गेलेली असल्याचे सांगितले. रस्ते आणि इमारत यामध्ये २३० हेक्टर जमीन गेलेली आहे. तेथे डेअरी होती ती जमीन २७० हेक्टर इतकी आहे. २६३ हेक्टर जमीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी असल्याचे समितीस सांगितले. समितीने प्रकल्पग्रस्त लोक आहेत काय ? अशी विचारणा केली असता विभागाने प्रकल्पग्रस्त लोक असल्याचे नमूद करत तेथे आरटीओचा चेक नाका असल्याची माहिती समितीस दिली. ही जमीन मुंबईतील गोठ्यांना देण्यासाठी संपादित करण्यात आली होती. आता ही जमीन दुसऱ्याच लोकांना देत आहात असे विभागास विचारले असता तेथे आरटीओचा चेक नाका असला पाहिजे, असा शासनाने निर्णय घेतला होता. तेथे आरटीओचा चेक नाका आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुंबईतील गोठे तेथे शिफ्ट करावयाचे आहेत. ही केस सुप्रीम कोर्टात प्रलंबित असून मुंबईतील गोठे तेथे शिफ्ट करणार असल्याची माहिती विभागाने दिली. तसेच, वन क्षेत्रात आंबा, काजू इत्यादींची लागवड करण्यात आली असल्याचे सांगितले. समितीने ही जमीन केव्हा संपादित करण्यात आलेली आहे ? जमीन संपादित करुन आता ५० वर्षे झालेली

आहेत. तेथे आंबा बागायतदार कसे काय आहेत ? अशी विचारणा विभागाकडे केली असता विभागाने ही जमीन सन १९६६ साली संपादित करण्यात आलेली आहे. दुग्धविकास विभाग त्या जमिनीची राखण करतो. त्या जमिनीवर जो चारा निघतो त्यातून विभागाला उत्पन्न मिळते, अशी माहिती दिली. २,६०० हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. मूळ प्रकल्पासाठी २०० हेक्टर जमीन आहे आणि इतर जमीन वेगवेगळ्या कारणासाठी दिल्याचे दिसून येत असल्याचे नमूद करत या प्रकल्पाची संपूर्ण माहिती समितीला देण्याबाबत विभागाला आदेश दिले.

२.७५ मुंबईतील गोठयांसंदर्भात सुप्रीम कोर्टात केस दाखल करण्यात आलेली आहे. त्या केसच्या सद्य:स्थिती बाबत समितीने विचारले असता विभागाने हायकोर्टामध्ये आपल्या बाजूने निकाल लागलेला आहे. आता मुंबई प्रोडयुसर असोसिएशनने सुप्रीम कोर्टात अपील दाखल केलेले आहे. त्या केसची २९ तारखेला अंतिम सुनावणी होणार असल्याचे सांगितले. समितीने यावर कोर्ट केसेसचे काम कोण बघते ? तसेच ही जागा मुंबईतील गोठ्यांसाठी देणार आहात. मुंबईतील गोठे तेथे शिफ्ट झाल्यानंतर मुंबईतील जागा कोणाच्या ताब्यात मिळणार आहे ? अशी विचारणा केली असता कोर्टकेसेसच्या कामासाठी स्वतंत्र ब्रँच आहे तसेच मुंबईतील गोठ्यांची जागा शासन घेईल असे समितीस सांगितले. मुंबई शहरातील जागेला मोठ्या प्रमाणावर भाव आहे. त्या लोकांना जमीन संपादित करुन जी जागा दिली जाणार आहे त्या जागेचा भाव मुंबईतील जागेपेक्षा कमी आहे. मुंबईतील गोठे तेथे शिफ्ट केले जाणार आहेत. मुंबईतील मोकळी झालेली जमीन शासनास घेता येणार नाही. पुणे येथील गोठे शिफ्ट करण्यात आले होते त्यावेळी अशाच प्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता असे समितीने विभागास सांगितले असता विभागाने मूळ शासन निर्णयाची प्रत समितीला उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. समितीने दापचारी येथे ६ हजार एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. ही जमीन कोणत्या दराने संपादित करण्यात आली याबाबत विचारणा केली असता. विभागाने सन १९६६ मध्ये ही जमीन संपादित केलेली असल्याचे व याबाबतची माहिती समितीला देण्यात येईल असे आश्वासन दिले.

२.७६ समितीने यामध्ये आदिवासी पट्टयातील जमिनी आहेत. कायद्यानुसार त्या जमिनी घेता येत नाहीत. ठाकूर बिल्डरने जमीन घेऊन ठाकूर कॉम्प्लेक्स बांधलेला आहे. हिरानंदानी

बिल्डरने वर्सोवा येथे कॉप्लेक्स बांधून त्या कॉम्प्लॅक्सला हिरानंदानी कॉम्प्लेक्स असे नाव दिलेले आहे. दापचरी येथे तर शासनाने जमीन संपादित केलेली आहे. यामध्ये आदिवासींच्या जमिनी होत्या काय ? अशी विचारणा केली. विभागाने सन १९६६ मध्ये जमीन संपादित केलेली आहे. ज्या भागामध्ये जमीन संपादित करण्यात आलेली आहे तो प्रामुख्याने आदिवासी भाग आहे. तलासरी तालुका हा आदिवासी तालुका आहे. तलासरी तालुक्याला लागून डहाणू तालुका आहे. त्यामुळे आदिवासींच्या जमिनी असण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

२.७७ मुंबईत दूध योजनेसाठी १८०० स्टॉल दिलेले आहेत, यासंदर्भात समितीला माहिती देण्याबाबत तसेच स्टॉल सुशोभिकरण करण्याची आवश्यकता असल्याचे मत नोंदविले असता विभागाने मुंबईत एकूण १८११ स्टॉल आहेत. त्या स्टॉलमधून दुधाच्या पदार्थांची विक्री केली जाते. स्टॉल सुशोभित करण्याचा मुद्दा मान्य करून ओनरशिपच्या मुद्याच्या संदर्भात शासन स्तरावर निर्णय घ्यावा लागेल, असे मत व्यक्त केले.

२.७८ अंधेरी येथील क्लब समोरील फुटपाथवर दूध केंद्र होते. त्या दूध केंद्राचे हॉटेलमध्ये रुपांतर करण्यात आलेले असून तेथील फुटपाथवर आलिशान हॉटेल बांधण्यात आलेले आहे. त्या स्टॉलचे हॉटेलमध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे. आता त्यांनी कोर्टाकडून स्थगिती मिळविलेली आहे. त्या हॉटेल मालकाकडे ५० मुले काम करतात आणि ते घरपोहोच डिलेव्हरी देतात, असे विभागास सांगितले असता विभागाने सदरहू प्रकरणाची माहिती देण्याचे आश्वासन समितीस दिले. समितीने दूध योजनेसाठी देण्यात आलेल्या १८०० स्टॉल पैकी १२०० स्टॉल सुरु आहेत. मग उर्वरित ६०० स्टॉल काढण्यात आलेले आहेत काय? हे १२०० स्टॉल ज्या कारणासाठी देण्यात आले होते त्या व्यतिरिक्त या स्टॉलमधून इतर वस्तुंची विक्री करण्यास परवानगी आहे काय ? तसेच या स्टॉलमधून दुधाची किती विक्री होते? अशी विचारणा केली असता विभागाने शासन मान्यतेनुसार शितल एजन्सीची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांच्या मार्फत ब्रेड, बिस्कीट, लेज इत्यादी पदार्थांची विक्री केली जाते व त्यापोटी शासनास रॉयल्टी मिळते तसेच या स्टॉलच्या माध्यमातून ९० हजार लिटर दुधाची विक्री होत असल्याचे समितीस सांगितले.

२.७९ दुधामध्ये भेसळ करण्यासंदर्भातील विषय आहे त्यासंदर्भात समितीला माहिती देण्याबाबत विभागास आदेश दिले असता विभागाने मागील ४ वर्षात ५ हजार पेक्षा जास्त

दुधाचे सॅम्पल घेऊन ६०० प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई केलेली आहे. अन्न भेसळ प्रतिबंध कायदा, १९५४ चा जुना कायदा होता. त्या कायद्यानुसार धाडी टाकल्या जात होत्या. वर्षानुवर्षे दुधाचे सॅम्पल घेऊन फॅट कन्टेन्ट तपासले जात होते. पूर्वी देशात ८ प्रकारचे कायदे होते. मिल्क, व्हेजिटेबल, एडिबल ऑईल, अन्न भेसळ याबाबतचे हे ८ कायदे होते. केंद्र शासनाने हे सर्व कायदे रिपील केलेले ओहत. केंद्र शासनाने सन २००६ मध्ये अन्न सुरक्षा कायदा केलेला आहे. दिनांक ५ ऑगस्ट, २०११ पासून हा कायदा संपूर्ण देशात लागू करण्यात आलेला आहे. या कायद्यामध्ये कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. या कायद्यानुसार दुधातील फॅट कन्टेन्ट बाबतच्या तपासणीबरोबरच दुधातील सिन्थेटीक केमिकलची देखील तपासणी केली जाते. दुधामध्ये भेसळ करुन टाकण्यात आलेले केमिकल, सिन्थेटीक केमिकल, हेवी मेटल, आर्सेनिक इत्यादींची देखील तपासणी केली जाते. दुधामध्ये सिन्थेटीक केमिकल, युरीया इत्यादी आढळून आले तर १० लाख रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. त्याच प्रमाणे शरीराला हानीकारक असलेले केमिकल पदार्थ भेसळ करुन टाकण्यात आलेले असतील तर ६ महिने ते जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे. केंद्र शासनाच्या आदेशानुसार सर्व राज्यांनी फुड सेफ्टी ट्रॅब्युनल स्थापन केलेले आहे. जे फुड इन्स्पेक्टर होते ते आता फुड सेफ्टी अधिकारी म्हणून काम बघत असल्याचे समितीस सांगितले.

२.८० समितीने अशी विचारणा केली की, भेसळ प्रतिबंध कायद्यानुसार आता पर्यंत किती प्रकरणे दाखल करण्यात आली आणि किती लोकांना शिक्षा झालेली आहे. यावर विभागाने सांगितले की, दुधात भेसळ करणाऱ्यांविरुद्ध प्रकरणे दाखल केलेली आहेत. परंतु शिक्षा कोणालाही झालेली नाही. दुधाचे सॅम्पल घेऊन त्याची तपासणी केली जाते. डेअरीतील दुधामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर भेसळ केली जाते. केमिकल टाकून दूध तयार केले जाते. तुम्ही काही डेअरींवर धाडी टाकलेल्या आहेत काय ? दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी गोंदिया येथील डेअरीवर धाड टाकण्यात आली होती. श्री.ढोले नावाचे सुपरवायझर होते, त्यांनी दुधामध्ये मायक्रो टॉक्सीन केमिकल मिक्स केले होते. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केले असून दिनांक १ जून ते ३० जून, २०१२ या कालावधीत विशेष मोहीम राबविली आहे. या कालावधीमध्ये मुंबईच्या ४ झोपडपट्टयांमध्ये धाडी टाकून जवळजवळ १ हजार लिटर भेसळयुक्त दूध पकडण्यात आले होते. त्याशिवाय १५० ठिकाणी धाडी टाकून कारवाई

करण्यात आलेली असल्याचे समितीस सांगितले. हा अतिशय गंभीर विषय आहे. नागपूर येथे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी केमिकल पासून दूध कसे बनवितात ते दाखवले. आता काही दिवसानंतर गणपती उत्सव आहे. त्यामुळे भेसळयुक्त माव्याचा वापर केला जाण्याची शक्यता आहे. साताऱ्याला देखील शुध्द माव्याचे कंदी पेढे मिळत नाहीत अशी स्थिती आहे. याबाबतीत विभागाने कारवाई करण्याबाबत कोणते नियोजन केलेले आहे याबाबत विचारणा केली असता विभागाने या अनुषंगाने निश्चित कारवाई करण्याचे समितीला आश्वासन दिले.

२.८१ समितीने यापूर्वी मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त खवा पकडण्यात आला होता आणि औरंगाबाद, नगर,पुणे इ.भागांमध्ये टी.व्ही.वर देखील ही बाब दाखविण्यात आली होती.आपण जे कायदे करतो ते कडक असतात आणि त्याची लोकांना भीती वाटली पाहिजे.पण प्रत्यक्षात या कारणामुळे एकही माणूस तुरुंगामध्ये गेलेला नसल्याची खंत व्यक्त केली. यावर विभागाने एकंदर १२ प्रॉसीक्युशन्स् लॉज केलेली असून १२ जणांना शिक्षा झालेली आहे. जो कायदा केलेला आहे त्यानुसार एखाद्याने भेसळ केली तर त्यास दंड व शिक्षा देण्याची तरतूद आहे. एखाद्याने सब स्टॅण्डर्ड व हानिकारक प्रकारची भेसळ केली तर त्याला शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, सणाच्या दिवशी माव्याला मोठ्या प्रमाणात मागणी असते. अशा वेळी बाहेरच्या राज्यातून जो मावा येतो त्याबाबतीत लक्ष ठेवण्यासाठी काही लोकांची नेमणूक करण्यात येते आणि असे प्रकार करणाऱ्यांवर कारवाई देखील करण्यात आल्याची माहिती समितीस दिली.

२.८२ सन २०११ मध्ये जो कायदा झाला त्याचा ठराव केला आहे काय? राज्यात याबाबत अनेक ठिकाणी अडचणी येतात. कारण केंद्र शासनाचे सर्व कायदे महाराष्ट्रातील लोक प्रतिनिधींना फारसे माहिती असतीलच असे नाही. जर एखादी बाब समवर्ती सूची असेल तर संबंधितांविरुध्द कारवाई करता येते तसेच २०११ मधील कायद्याचे दुधाच्या संदर्भात ज्या तरतूदी आहेत त्यांचे मराठी भाषांतर करुन ती समितीला सादर करण्यात यावी, असे आदेश विभागास दिले. विभागाने याबाबत सदरहू कायद्याची संक्षिप्त टिप्पणी सादर करु असे आश्वासन समितीस दिले. आतापर्यंत भेसळ करणाऱ्या किती लोकांना शिक्षा झाली आहे ? समितीने अशी विचारणा केली असता नवीन कायदा आल्यानंतर ३ डेअरीनां ७० हजार

रुपयांचा दंड करण्यात आला असल्याचे तसेच पूर्वी पी.एफ.ए.कायदा होता. त्यामुळे १२ ठिकाणी लोकांना शिक्षा झाली असल्याची माहिती विभागाने दिली.

२.८३ परंतु यामुळे संबंधितांना जरब बसल्याचे दिसत नाही तसेच मागील १० वर्षाच्या काळामध्ये भेसळीच्या बाबतीत अनेक प्रकरणे समोर आली आहेत. परंतु त्याबाबत कोणी काहीही करु शकले नाही. यावर विभागाने आता नवीन कायद्यानुसार याबाबतीत काय करावयाचे ते कोर्टामध्ये ठरणार आहे. त्या नंतर ही बाब सह आयुक्तांकडे जाईल, मग ती ट्रॅब्युनलकडे जाईल. कारण याबाबतीत त्यांना अधिकार देण्यात आले आहेत. जेणेकरुन वर्षानुवर्षे कोर्टामध्ये केसेस पेडींग रहाणार नाहीत आणि ट्रॅब्युनलकडून शिक्षा जाहीर झाल्यावर लगेच त्याची अंमलबजावणी होईल असे सांगितले.

२.८४ राज्यातील एकूण दुधाचे उत्पादन पाहिले तर यामध्ये पुणे, सांगली, सातारा, नागपूर, नगर इ.जिल्हे मुख्य आहेत. या व्यतिरिक्त बीड, भंडारा, गोंदिया येथेही उत्पादन होत आहे आणि हे जिल्हे सोडले तर बाकी ठिकाणी १ हजार, २ हजार लि. दुधाचे उत्पादन होते. त्यामुळे या सहा-सात जिल्ह्यांमध्ये भेसळ होत आहे. अशा वेळी जर दुधामध्ये होणारी भेसळ रोखली तर पुढील पिढी विकलांग होण्यापासून वाचू शकते असे मत मांडले असता विभागाने याबाबतीत नोंद घेऊन कारवाई करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले. यावर महालेखाकार यांनी मिल्क स्कीम के परफॉरमन्स अकाऊंट आऊटस्टँडींग है. डेअरी डेवलपमेंट के अकाऊंट के बारे में २-५ युनिट्स का एरिअर्स रहता है. सभी युनिटस के अकाऊंट ए.जी. ऑफिस को मिलने चाहिए असे मत मांडले असता विभागाने जल्द से जल्द, एक महीने के अंदर अकाऊंट भेज देंगे, असे आश्वासन महालेखाकार यांना दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

२.८५ शासकीय दुग्धशाळांची स्थापित क्षमता ३६ लाख लीटर दुधसंकलनाची असून त्याकरिता ८८७ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात ३६ लाख लीटरऐवजी फक्त ४.३१ लक्ष दूधसंकलन करण्यात आले. याकरिता ३७५ कोटी रुपये खर्च झाले व २७६ कोटी रुपयांची बचत झाल्याची समितीस माहिती प्राप्त झाली. समितीस प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसर सन २००५-२००६ मध्ये ८.६ लक्ष लीटर, सन २००६-२००७ मध्ये ६.२३ लक्ष लीटर, सन २००७-२००८ मध्ये ४.३१ लक्ष लीटर, सन २००८-२००९ मध्ये ५.१२ लक्ष लीटर,

सन २००९-२०१० मध्ये ३ लक्ष लीटर व सन २०१०-२०११ मध्ये २.२३ लक्ष लीटरची हाताळणी झालेली आहे. त्यामुळे ३६ लाख लीटर दूधसंकलनाची क्षमता जरी असली तरी, सन २००६-२००७ ते २०१०-२०११ या कालावधीमध्ये शासकीय दुग्धशाळांच्या दूधसंकलनामध्ये लक्षणीय अशी घट दिसून येत आहे. सन २००८-२००९ मध्ये विभागाने रुपये १०३ कोटी, सन २००९-२०१० मध्ये २२३ कोटी व सन २०१०-२०११ मध्ये २०६ कोटी रुपये शासनास परत केले आहे.

२.८६ दूधसंकलनाच्या गत पाच-सहा वर्षांच्या आकडेवारीचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, दुग्धव्यवसाय विभागाने शासकीय दूधसंकलनाच्या स्थापित क्षमतेच्या आकडेवारीनुसार निधीची मागणी शासनाकडे केली असून या स्थापित क्षमतेच्या ब-याच कमी प्रमाणात दूधसंकलन केल्यामुळे दूधसंकलनापोटी शेतक-यांना द्यावयाच्या रकमेतील बरीच मोठी रक्कम शिल्लक राहिल्याने ती शासनास समर्पित केलेली आहे. **यावरुन असे स्पष्ट होते की, विभागाने दूधसंकलनाच्या खर्चाकरिता मागणी करताना गत पाच वर्षांमध्ये यावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचा विचार न करता केवळ ढोबळ अंदाजाने परंतु अवास्तव मागणी केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी २०० कोटी रुपयाचा निधी हा अकारण पडून राहून तो विकास कामाकरिता व एखादा योजनेकरिता / प्रकल्पांकरिता खर्च करता आला नाही ही निश्चितच खेदाची बाब आहे. विभागाने यापुढील काळात दूधसंकलनाच्या आकडेवारीचा गत पाच वर्षांमध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च विचारात घेऊन अंदाजपत्रकात मागणी करावी जेणेकरुन अवास्तव खर्चाची तरतूद होणार नाही व मोठ्या प्रमाणात निधी अखर्चीत न राहता तो राज्याचा इतर विकास कामांकरिता / योजनांकरिता उपलब्ध होऊ शकेल अशी समिती शिफारस करीत आहे.**

२.८७ समितीच्या असेही निदर्शनास आले की, गत काही वर्षांमध्ये दूधसंकलनाचे प्रमाण अतिशय कमी होत असले तरी, या विभागात असलेल्या कर्मचारी संख्या तेवढ्याच प्रमाणात राहिलेली आहे ती कमी झाल्याचे दिसून आलेले नाही. **स्थापित क्षमतेपेक्षा दूधसंकलन कमी होत असल्यास दूधसंकलनाकरिता आवश्यक आहे तेवढाच कर्मचारीवृंद विभागाने स्वत:कडे ठेवून घ्यावा व अतिरिक्त कर्मचारीवर्ग त्यांनी शासनाच्या इतर विभागांकडे वर्ग करण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाशी समन्वय साधवा अशी देखील समिती शिफारस करीत आहे.**

२.८८ लोकलेखा समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या नागरी वर्षांच्या अहवालातील परिच्छेद क्र.४.४.१ "कामाविना असलेला कर्मचारीवर्गास

वेतनाची अदायगी" यासंदर्भात आपला नववा अहवाल (सन २०१२-२०१३) माहे जुलै, २०१२ मध्ये विधानमंडळास सादर केला असून त्या अहवालात देखील शासकीय दुग्धशाळांची दूधसंकलनाची टक्केवारी वाढविण्यासाठी शासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात तसेच या दुग्धशाळांचे आधुनिकीकरण करावे अशा शिफारशी केलेल्या आहेत. **दूध व दुग्धजन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत असून दुग्धव्यवसाय हा कृषिपूरक व्यवसाय असल्याने त्यामुळे ग्रामीण रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. अशा प्रकराच्या रोजगार संधी या शासनाच्या उपक्रमांच्या माध्यमातून उपलब्ध होण्याच्या शक्यता जास्त असल्याने शासकीय दुग्धव्यवसायाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

२.८९ दुग्धजन्य पदार्थांवर उदा.तूप, लस्सी, दूधाची भूकटी, आईस्क्रीम यावर त्या पदार्थांच्या गुणवत्तेसंदर्भात ॲगमार्क, आयएसआय मार्क अशी चिन्हे त्यांच्या पँकींगवर असतात. परंतु, दूधाच्या पिशवीवर दूधाच्या गुणवत्तेबाबत कोणतेही चिन्ह दर्शविलेले नसते. खाजगी दुग्धजन्य पदार्थांवर आयएसआय, बीएसआय, कॅलरीनिहाय, फॅटनिहाय चिन्हांकित केलेले असते. दूधामध्ये फक्त फूल क्रिम मिल्क, टोण्ड दूध, डबल टोण्ड दूध असे प्रकार उपलब्ध असतात. त्यामुळे दूधांच्या पिशव्यांवर देखील त्याच्या गुणवतेचे चिन्ह उमटविलेले असावे जेणेकरुन ग्राहक ते दूध निर्धास्तपणे घेऊ शकेल. **ट्रेडमार्क स्टँडर्ड हा विषय केंद्र शासनाच्या अखात्यरित असल्यामुळे याप्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन दूधाच्या पिशव्यांवर देखील दूधाच्या गुणवत्तेबाबत ट्रेडमार्क करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

२.९० दूध, मावा या पदार्थांमध्ये भेसळ होण्याचे प्रमाणे वाढलेले आहे. विशेषत: सणासुदीच्या दिवसांमध्ये दूध भेसळ ही पाणी, बिल्चिंग पावडर, पीठाचे पाणी याद्वारे होत असते. सर्वसामान्य जनतेच्या पोषण आहाराशी दूध हा विषयक निगडीत असल्याने दूध भेसळीचे दुष्परिणाम देखील भयानक आहे. **विभागातर्फे दूध भेसळ करणा-यांवर कारवाई जरी करण्यात येत असली तरी, या प्रवृत्तीच्या लोकांवर जरब निर्माण व्हावी यादृष्टीने कायद्यामध्ये कडक शिक्षेची तरतूद करणे आवश्यक झाले आहे तसेच विभागाने देखील दूध भेसळीवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधक व्यवस्था निर्माण करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

वित्त विभाग

३ मुळ तरतूद शिल्लक असताना पूरक मागणी करणे.

३.१ भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात अनुदान क्र. **जी-१ "विक्रीकर प्रशासन" मधील प्रधान शीर्ष २०२०, उत्पन्न व खर्च यांवरील करांची वसुली, २०४०, विक्रीकर, ३४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा, जी-२ "इतर आर्थिक व संकीर्ण सेवा" मधील प्रधान शीर्ष २०४७ इतर आर्थिक सेवा, जी-४ "सेक्रेटरिएट - सर्वसाधारण सेवा" मधील प्रधान शीर्ष २०५२ सेक्रेटरीएट सर्वसाधारण सेवा आणि जी-५ "कोषागार व लेखा प्रशासन" मधील प्रधान शीर्ष २०५४ कोषागार व लेखा प्रशासन** या शिर्षाखाली बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपला अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

<u>अनुदान क्रमांक जी-१ विक्रीकर प्रशासन</u>

(रुपये हजारात)

३.२ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०२०, उत्पन्न व खर्च यांवरील करांची वसुली २०४०, विक्रीकर ३४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा दत्तमत मूळ	१,९३,२२,१४	२,२५,६२,१४	१,७०,७९,४१	- ५४,८२,७३
पूरक	३२,४०,००			
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २००८)				३३,४३,६६
मूळ	१२,८२,९५,३२	१२,९२,९५,३२	---	- १२,८२,९५,३२
पूरक	-----			
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २००८)				१२,८२,९५,३२

टिपा व भाष्ये : रु.५४८२.७३ लाखांची अंतिम बचत असताना, वर्षभरात केवळ रु.३३४३.६६ लाख इतकाच निधी परत करण्यात आला.

३.३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या मागणी क्रमांकाखाली झालेला अधिक खर्च/बचत याबाबतची सविस्तर कारणे खालील तक्त्यांमधे नमूद करण्यात आलेली आहेत.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखात)

३.४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०२०, उत्पन्न व खर्च यांवरील करांची वसुली ००१ संचालन व प्रशासन ००१(००)(०१) व्यवसाय, व्यापार, आजीविका, व नोकऱ्या यांवरील कर-विक्रीकर आयुक्त मूळ ... १४,४७.८१ पुनर्विनियोजन - ४,३५.३१	१०,१२.५०	१०,७०.४६	(+) ५७.९६

(एक) पदे रिक्त असल्यामुळे (दोन) काटकसरीच्या कारणास्तव कपात लादल्यामुळे, (तीन) अपेक्षेपेक्षा दौरे कमी झाल्यामुळे (चार) प्रत्यक्ष गरजांवर आधारित (पाच) संगणक लेखनसामग्री सतत खरेदी न केल्यामुळे (सहा) एजंटकडून कमी दावे प्राप्त झाल्यामुळे रु.४३५.३१ लाखांचा निधी परत करण्यात आला.

रु.५७.९६ लाखाच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट, २००८)

३.५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या लेखाशीर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.१४,४७,८१,०००/- इतके होते. त्यापैकी, मार्च, २००५ मध्ये खालील कारणांमुळे रु.४,३५,३१,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित करण्यात आले.

१. काही पदे रिक्त राहिल्यामुळे,

२. काटकसरीच्या धोरणामुळे,

३. अपेक्षित प्रवास दौरे न झाल्यामुळे, संगणक लेखनसामुग्री खरेदी न केल्यामुळे,

४. एजंटकडून कमी दावे प्राप्त झाल्यामुळे.

परिणामी, अंतिम सुधारित अनुदान रु.१०,१२,५०,०००/- इतके असताना, विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१०,७,४६,०००/- इतका झाल्यामुळे, रु.५७,९६,०००/- इतका अधिक खर्च नोंदला आहे.

अधिक खर्चाबाबतची कारणे खालीलप्रमाणे :

१. वेतन : रिक्त पदे पदोन्नतीने भरल्यामुळे

२. देशांतर्गत प्रवास खर्च : मूल्यवर्धित कर प्रणाली लागू केल्यामुळे थकित व्यवसाय कर वसूली करीता अधिकारी/कर्मचारी यांनी करदात्यांना अधिक भेटी दिल्यामुळे.

३. कार्यालयीन खर्च : नागपूर, औरंगाबाद व नाशिक या शहारातील एप्रिल ते जून मधील उष्ण तापमान लक्षज्ञत घेता एअर कुलर्स आणि वॉटर कुलर्स या संत्रसामुग्रीवर अधिक खर्च झाल्यमुळे.

४. भाडेपट्टी व कर : प्रलंबित भाडे मालकांना अदा करण्यात आल्यामुळे, या उद्दिष्टाखाली अधिक खर्च झालेला आहे.

५. संगणकावरील खर्च : संगणकप्रणाली अद्यावत ठेवण्यासाठी आवश्यक खर्च केल्यामुळे या उद्दिष्टाखाली अधिक खर्च झाला आहे.

६. व्यावसायिक सेवा : व्यवसायकर वसुलीकरिता नियुक्त केलेल्या खाजगी अभिकर्त्यांना वसुलीच्या रकमेच्या प्रमाणात मानधन प्रदान केल्यामुळे.

(रुपये लाखात)

३.६ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०४०, विक्रीकर				
००१ संचालन व प्रशासन				
००१ (००) (०१) विक्रीकर आयुक्त				
मूळ ...	७४,४२.४२			
पूरक ...	३२,००.००	६९,६२.४०	४५,३७.०७	- २४,२५.३३
पुनर्विनियोजन	- ३६,८०.०२			

मुख्यत्वेकरून (एक) विविध संवर्गाची पदे रिक्त राहिल्यामुळे (दोन) काटकसरीच्या कारणावरून यंत्रसामुग्री खरेदी न केल्यामुळे, (तीन) विक्रीकरावरील पुस्तके खरेदी न केल्यामुळे (चार) संगणकीकरणावरील कमी खर्च झाल्यामुळे आणि मुल्यवर्धित करासाठी अपेक्षेपेक्षा कमी जाहिराती मिळाल्यामुळे (पाच) काटकसरीच्या कारणास्तव कपात लादल्यामुळे आणि (सहा) प्रत्यक्ष खर्चावर आधारित प्रत्यर्पण पुनर्विनियोजन याद्वारे रु.३६८०.०२ लाखांच्या निधीची कपात करण्यात आली.

रु.२४२५.३३ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००८)

३.७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या गौणशिर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.७४,४२,४२,०००/- इतके होते. पूरक मागणी अन्वये रु.३२,००,००,०००/- इतके अतिरिक्त अनुदान मिळविण्यात आले. त्यामुळे या लेखाशिर्षाखाली एकूण अनुदान रु.१०६,४२,४२,०००/- इतके झाले. या अनुदानातून रु.२०,००,००,०००/- इतके अनुदान दुसऱ्या गौणशिर्षाखाली वेतनासाठी वळविण्यात आले आणि रु.१६,८०,०२,०००/- इतके अनुदान (एक) विविध संवर्गाची पदे रिक्त राहिल्यामुळै (दोन) काटकसरीच्या धोरणामुळे यंत्रसामुग्री खरेदी न

केल्यामुळे (तीन) विक्रीकरावरील पुस्तके खरेदी न केल्यामुळे (चपार) संगणकीकरणावर कमी खर्च झाल्यामुळे मार्च, २००८ मध्ये प्रत्यार्पित करण्यात आले.

परिणामी, अंतिम सुधारित अनुदान रु.६९,६२,४०,०००/- इतके झाले. यापोटी, विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४५,३७,०७,०००/- इतका झाला असून रु.२४,२५,३३,०००/- इतकी बचत झाली आहे.

बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. देशांतर्गत प्रवास खर्च : दौऱ्यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाला.

२. कार्यालयीन खर्च : काटकसरीच्या धोरणामुळे यंत्रसामुग्री खरेदी न केल्यामुळे बचत झाली.

३. संगणकावरील खर्च : इसीआयएल कंपनीकडून तांत्रिक अडचणीमुळे देयक वेळेत सादर न झाल्यामुळे बचत झाली आहे.

४. जाहिराती : मूल्यवर्धित करप्रणालीवर वेगवेगळया योजनांसाठी अपेक्षेपेक्षा कमी जाहिराती प्रसिद्ध केल्यामुळे बचत झाली आहे.

(रुपये लाखात)

३.८ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०१ वसूली खर्च				
००१ (०२) (०१) महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण				
मूळ ...	१,३२.४३			
पूरक ...	४०.००	१,५९.९८	१,५९.०५	(-) ०.९३
पुनर्विनियोजन ..	- १२.४५			

मुख्यत्वेकरून पदे रिक्त राहिल्यामुळे आणि तांत्रिक अडचणींमुळे पुस्तक प्रकाशनाचे काम पुढे ढकलल्यामुळे रुपये १२.४५ लाख इतका निधी काढण्यात आला.

३.९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या गौणशिर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.१,३२,४३,०००/- इतके होते. पूरक मागणी अन्वये रु.४०,००,०००/- इतके अतिरिक्त अनुदान मिळविण्यात आले. परिणामी एकूण मंजूर अनुदान रु.१,७२,४३,०००/- इतके झाले. या अनुदानातून खालील कारणामुळे मार्च, २००८ मध्ये रु.१२,४५,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित करण्यात आले.

१. विविध संवर्गातील रिक्त पदांमुळे,

२. तांत्रिक अडचणीमुळे पुस्तक प्रकाशनाचे काम पुढे ढकलल्यामुळे,

परिणामी, अंतिम सुधारित अनुदान रु.१,५९,९८,०००/- इतके झाले. यापोटी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१,५९,०५,०००/- इतका झाला असून रु.९३,०००/- एवढी बचत झाली आहे.

बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. वेतन : काही पदे रिक्त राहिल्यामुळे,

२. देशांतर्गत प्रवास खर्च : अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाल्यामुळे,

३. जाहिराती : जाहिरातीवर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे बचत झाली आहे.

३. <u>टीप २ मध्ये नमूद केलेली बचत पुढील शीर्षाखाली अंशतः प्रतिसंतुलित झाली :-</u>

(रुपये लाखात)

३.१० प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०४०, विक्रीकर				
१०१ वसुली खर्च				
००१ (००) (०१) विक्रीकर विभाग				
मूळ ...	१,००,७२.२०	१,०८,६५.२५	१,११,०१.०३	(+) २,३५.७८
पुनर्विनियोजन ...	७,९३.०५			

रुपये २३५.७८ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, (एक) पदे रिक्त राहिल्यामुळे (दोन) अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाल्यामुळे (तीन) काटकसरीच्या कारणास्तव कपात लादल्यामुळे यंत्रसामुग्री आणि विक्रीकरावरील पुस्तके खरेदी न केल्यामुळे (चार) संगणकीकरणाबाबत निर्णय न घेतल्यामुळे (पाच) अहवालात विसंगती असल्यामुळे मेसर्स प्राइस वॉटर कूपर्स लिमिटेड यांना रक्कम प्रदान न केल्यामुळे प्रत्यार्पण/पुनर्विनियोजन याद्वारे तरतूद केलेला रुपये ७९३.०५ लाखांचा अतिरिक्त निधी अपुरा असल्याचे सिद्ध झाले असून याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

३.११ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या गौणशिर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.१००,७२,२०,०००/- इतके होते. वेतनाकरीता, दुसऱ्या गौणशिर्षाकडून पुनर्विनियोजनाद्वारे रु.२०,००,००,०००/- इतके अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून घेण्यात आले. परिणामी, एकूण मंजूर अनुदान रु.१२०,७२,२०,०००/- इतके झाले. या अनुदानातून (एक) पदे रिक्त राहिल्यामुळे (दोन) अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाल्यामुळे (तीन) काटकसरीच्या धोरणामुळे यंत्रसामुग्री आणि विक्रीकरावरील पुस्तके खरेदी न केल्याने (चार) संगणकीकरणाबाबत निर्णय न झाल्यामुळे (पाच) अहवालात विसंगती असल्यामुळे मेसर्स प्राइस वॉटर कूपर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना रक्कम प्रदान न केल्यामुळे मार्च, २००८ मध्ये रु.१२,०६,९५,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित करण्यात आले.

परिणामी, अंतिम सुधारित अनुदान रु.१०८,६५,२५,०००/- इतके झाले. यापोटी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१११,०१,०३,०००/- इतका झाला असून, र१.२,३५,७८,०००/- इतका अधिक खर्च नोंदला गेला आहे.

अधिक खर्चाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

वेतन : मूल्यवर्धित कर प्रणालीच्या पार्श्वभूमीवर विविध संवर्गातील पदे भरल्यामुळे तसेच, कालबद्ध पदोन्नतीमुळे वेतनावर अधिक खर्च झाला आहे.

देशांतर्गत प्रवास खर्च : प्रलंबित प्रवास देयके पारित झाल्यामुळे.

कार्यालयीन खर्च : सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समितीमार्फत हाती घेतलेल्या पायलट प्रोजेक्टकरीता महाराष्ट्र राज्याच्या हिश्श्याचे अनुदान प्रदान केल्यामुळे अधिक खर्च झाला आहे.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखात)

३.१२ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०२०, उत्पन्न व खर्च यांवरील करांची वसुली ७९७ राखीव निधी व ठेव लेखे यांच्याकडे/यांच्याकडून हस्तांतरण ७९७(००)(०१) राखीव निधी व ठेव लेखे याकडे/याकडून हस्तांतरण - रोजगार हमी निधीकडे हस्तांतरण			
मूळ १२,८२,९४.३२ पुनर्विनियोजन - १२,८२,९४.३२	---	---	---

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. बीयुडी १७०७/सीआर-७६/कर-३, दि. ३१ मार्च, २००८ अन्वये रुपये १२८२९४.३२ लाखांची संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करण्यात आली. त्यामुळे रोजगार हमी निधीकडे रक्कम हस्तांतरीत करण्यात आली नाही.

३.१३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. दिनांक २२ फेब्रुवारी, २००८ च्या अध्यादेशाद्वारे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरूवातीस निधीतील जमा रक्कम रुपये २००० कोटी रुपयांपेक्षा कमी असणार नाही, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी रोजगार हमी निधीमध्ये रुपये ११,५६९.१० कोटी एवढी रक्कम शिल्लक असल्यामुळे सन २००७-०८ या वित्तीय वर्षामध्ये व्यवसाय करातून जमा होणारी रक्कम रोजगार हमी निधीमध्ये हस्तांतरीत करण्याची गरज नव्हती. त्याचप्रमाणे सदर निधीमध्ये अनुशेष

शिल्लक नसल्याने सन २००७-०८ मध्ये निधीमध्ये हस्तांतरीत करावयाची रुपये १२८२.९४ कोटी एवढी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

अनुदान क्रमांक जी-२ इतर आर्थिक व संकीर्ण सेवा (सर्व दत्तमत)

(रुपये लाखात)

३.१४ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०४७, इतर आर्थिक सेवा				
१०३ अल्पबचत प्रचालन --				
१०३ (०१) (०२) अल्पबचत संचालनालय				
मूळ	७,३९.७१	६,१४.३०	६,०३.९८	-१०.३२
पुनर्विनियोजन	- १,२५.४१			

मुख्यत्त्वेकरून (एक) राज्य शासनाने आर्थिक कारणावरुन कपात लादल्याने (दोन) रिक्त पदे (तीन) दौऱ्यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे आणि (चार) प्रत्यक्ष गरजेवर आधारित असल्यामुळे रुपये १२५.४१ लाखांचा निधी परत करण्यात आला.

रुपये १०.३२ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट, २००८).

३.१५ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या लेखाशीर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रुपये ७,३९,७१,०००/- एवढे होते. विभागीय उपसंचालक, अल्पबचत यांची ६ कार्यालये बंद झाली. त्यामुळे ३६ पदे रद्द झाल्यामुळे आणि दौऱ्यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे तसेच, आठमाही खर्चाच्या आधारे मार्च, २००८ मध्ये रुपये १,२५,४१,०००/- इतके अनुदान मंजूर अनंदानातून प्रत्यार्पित करण्यात आले.

परिणामी, अंतिम सुधारित अनुदान रुपये ६,१४,३०,०००/- एवढे झाले.

या अंतिम सुधारित अनुदानापोटी विभागाचा रुपये ६,०३,९८,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. त्यामुळे या शीर्षाखाली रुपये १०,३२,०००/- इतकी बचत झाली.

बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

वेतन :- काही पदे रिक्त असल्यामुळे,

देशांतर्गत प्रवासखर्च :- अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाल्यामुळे,

जाहिरात, प्रसिद्धी आणि विक्री खर्च :- अल्पबचतीचे उद्दीष्ट ठरविण्यात आलेले नसल्यामुळे प्रसिद्धी व जाहिरात यावर अपेक्षित खर्च झाला नाही.

मोटार वाहन :- वाहन दुरूस्तीवर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाला.

(रुपये लाखात)

३.१६ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा				
१०३ राज्य लॉटरी --				
१०३ (००) (०१) लॉटरी संचालनालय - प्रमुख				
लॉटरी				
मूळ	६,९०,४९.१४	१७,०३.९८	१६,८९.८१	-१४.१७
पुनर्विनियोजन	- ६,७३,४६.१६			

(एक) तिकीटांच्या छपाईवर कमी खर्च झाल्यामुळे आणि दोन अंकी लॉटरी बंद केल्याने विक्रीकर न मिळाल्यामुळे (दोन) बक्षिसांच्या मागण्या कमी झाल्यामुळे (तीन) लॉटरी संचालनालय - प्रमुख लॉटरी यांच्याकडून जाहिरातीवर कमी खर्च झाल्यामुळे रुपये ६७,३४५.१६ लाखांची अपेक्षित बचत परत करण्यात आली.

३.१७ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या उपशीर्षाखाली २००७-०८ या वर्षाकरिता मूळ मंजूर अनुदान रु.६,९०,४९,१४,०००/- एवढे होते. दोन अंकी लॉटऱ्या बंद असल्यामुळे १) लॉटरी तिकिटाच्या छपाईवरील खर्च अपेक्षेपेक्षा कमी झाला २) लॉटरी टॅक्सवर

अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाला ३) बक्षिसांचे दावे कमी प्राप्त झाले. ४) लॉटरी संचालनालयाकडून जाहिरातीवरील खर्च अपेक्षेपेक्षा कमी झाला. त्यामुळे, मार्च, २००८ मध्ये रु.६,७३,४५,१६०००/- एवढे अनुदान प्रत्यार्पित केले. परिणामी सुधारित अनुदानापोटी लॉटरी कार्यालयाने रु.१६,८९,८१,०००/- एवढा खर्च केला. परिणामी, रु.१४,१७,०००/- एवढी बचत झाली.

बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

०५ बक्षिसे :- लॉटरी वरील टॅक्सबाबत न्यायालयाचा अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे दोन अंकी लॉटऱ्या अजून सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे बक्षिसे या उद्दिष्टाखाली खर्च झाला नाही.

१३ कार्यालयीन खर्च :- दोन अंकी लॉटऱ्या अद्यापही चालू झालेल्या नाहीत. त्यामुळे कार्यालयीन खर्च या बाबीखाली अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाला.

५० इतर खर्च :- भव्यतम व पारंपारिक लॉटऱ्यांची तिकिट विक्री अपेक्षेपेक्षा कमी झाली. त्यामुळे, अभिकर्त्यांकडून सेवा आकार व बोनसचे दावे अपेक्षेपेक्षा कमी प्राप्त झाले. त्यामुळे इतर खर्च या बाबीखाली बचत झाली.

अनुदान क्रमांक जी-४ सेक्रेटरीएट-सर्वसाधारण सेवा (सर्व दत्तमत)

(रुपये हजारात)

३.१८ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०५२, सेक्रेटरीएट - सर्वसाधारण सेवा - दत्तमत				
मूळ ..	१०,६२,५३	१०,६२,५३	८,९१,५०	-१,७१,०३
पूरक ..	--			
वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २००८)				१,७१,४४

३.१९ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या प्रधानशीर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.१०,६२,५३,०००/- इतके होते.

विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.८,९१,५०,०००/- इतका झाला असून एकूण बचत रु.१,७१,०३,०००/- इतकी झाली आहे. तथापि, रु.१,७१,४४,०००/- इतके अनुदान खालील कारणांमुळे प्रत्यार्पित करण्यात आले.

१. काही पदे रिक्त असल्यामुळे,
२. रजा प्रवास सवलत व वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्चाच्या मागण्या अपेक्षेपेक्षा कमी प्राप्त झाल्या
३. टाटा इस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेसोबत केलेल्या करारानुसार संस्थेने कामाची पूर्तता न केल्याने त्यांना सेवाशुल्काचे प्रदान होऊ शकले नाही.
४. विभागासाठी संगणक खरेदी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान २००२-२००३ या स्पर्धेअंतर्गत मिळालेल्या रु.५ लाख इतक्या बक्षिसाच्या रकमेतून प्रस्तावित असल्यामूळे
५. विभागाचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव प्रलंबित राहिल्यामुळे. तथापि प्रत्यार्पित रक्कम अत्याधिक झाल्याचे सिद्ध झाले.

अनुदान क्रमांक जी-५ कोषागार व लेखा प्रशासन

(रुपये हजारात)

३.२०		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष				
२०५४, कोषागार व लेखा प्रशासन				
दत्तमत				
मूळ	८५,३९,०१	८७,१५,९३	८२,३२,८४	-४,८३,०९
पूरक..	१,७६,९२			
वर्षभरात परत केलेली रक्कम	(मार्च २००८)			४,७३,०८

३.२१ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. सन २००७-०८ या वर्षामध्ये या प्रधानशीर्षाखाली मूळ मंजूरी अनुदान रु.८५,३९,०१,०००/- (दत्तमत) इतके होते.

रु.१,७६,९२,०००/- इतके अतिरिक्त अनुदान पूरक मागणी अन्वये मंजूर करण्यात आले. पूरक मागणीअन्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्ती वेतन योजना यंत्रणा, ही नवीन सेवा असल्यामुळे विधान मंडळाच्या निदर्शनास आणण्याकरिता रु.३५,४२,०००/- इतके अनुदान, पूरक मागणीअन्वये मंजूर करण्यात आले. नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्ती वेतन योजना यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता २० पदे मंजूर करण्यात आली होती. तथापि, फक्त १० पदे भरण्यात आल्यामुळे रु.२०,१८,०००/- ची बचत झाली. सदर बचत मार्च, २००८ मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

२. अर्थसंकल्प वितरण प्रणाली सुरू करण्यासाठी हार्डवेअरसहीत कोषागार नेट व्हर्जन २ करीता यू.पी.एस. थिन क्लाएंटस व प्रिंटर्स या संबंधातील खर्च भागविण्याकरीता पूरक मागणी अन्वये रु.१,४१,५०,०००/- इतके अतिरिक्त अनुदान मिळविण्यात आले.

या गौणशीर्षाखाली विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१,३५,३०,०००/- इतका झालेला आहे. याखाली झालेली बचत रु.६,२०,०००/- इतकी असून, ही बचत मुख्यत: संगणकाचे दर कमी झाल्यामुळे झाली आहे.

परिणामी या प्रधानशीर्षाखाली एकूण मंजूर अनुदान रु.८७,१५,९३,०००/- इतके झाले. प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे मार्च, २००८ मध्ये रु.४,७३,०८,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित करण्यात आल्यामुळे अंतिम सुधारीत अनुदान रु.८२,४२,८५,०००/- इतके झाले. यापोटी विभागाने रु.८२,३२,८४,०००/- इतका खर्च केला असून रु.१०,०१,०००/- एवढी बचत झाली आहे. ही बचत काही पदे रिक्त असल्यामुळे **"वेतन"** या उद्दिष्टाखाली झाली आहे.

(रुपये हजारात)

३.२२ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
भारित -				
मूळ ..	२,००	५,५२	२५	-५,२७
पूरक ..	३,५२			
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८)				५,२७

टिपा व भाष्ये :-

मूळ अर्थसंकल्पीय तरतूदी इतकाही खर्च झाला नाही आणि रुपये १,७६,९२ लाखांइतक्या रकमेची पूरक मागणी अनावश्यक असल्याचे सिद्ध होते.

३.२३ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे. या गौणशीर्षाखाली मूळ मंजूर अनुदान रु.२,००,०००/- इतके होते. पूरक मागणीन्वये रु.३,५२,०००/- इतके अतिरिक्त अनुदान मंजूर करण्यात आले. जिल्हा सत्र न्यायालय, अमरावती यांच्या निकालानुसार श्रीमती पुष्पा बाखडे यांना रु.५,५१,६०७/- इतकी रक्कम प्रदान करावयाची होती. त्यामुळे वरीलप्रमाणे पूरक मागणी मंजूर करण्यात आली. तथापि, ही रक्कम मार्च, २००८ अखेर पर्यंत प्रदान करण्यात आली नसल्यामुळे मार्च, २००८ मध्ये रु.५,२७,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित करण्यात आले. या गौणशीर्षाखालील तरतूद न्यायनिवाडयाचा अनपेक्षित खर्च भागविण्यासाठी करण्यात येते.

साक्ष :

३.२४ दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या विभागीय प्रतिनिधींच्या साक्षीच्यावेळी सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या लेखापरिक्षण परिच्छेदासंदभार्त समितीने रु. ३२.४० कोटी एवढ्या रकमेची पूरक मागणी कोणत्या कारणासाठी करण्यात आली होती अशी विचारणा केली. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २०२०, उत्पन्न व खर्च यावरील करांची वसुली या लेखाशीर्षाखाली सन २००७-२००८ मध्ये रु. १४,४७,८१,०००/- इतकी मूळ तरतूद होती. त्यापैकी ३१ मार्च २००८ पर्यंत अंतिम सुधारित अनुदान रु. १०,१२,५०,०००/- इतके होते. त्यापैकी रु. १०,७०,४६,०००/- खर्च झाला. रु. ५७,९६,०००/- इतका अधिकचा खर्च झाला. हे प्रधान शीर्ष आहे. यामध्ये ५ टक्के खर्च कमी-अधिक होऊ शकतो. सर्व उपशीर्षमधील रकमा एकत्रित केल्यामुळे पुनर्विनियोजनामध्ये ही बाब आलेली आहे.

३.२५ अशी समितीने विचारणा केली असता पदे रिक्त राहिल्यामुळे, अपेक्षित प्रवास-दौरे न झाल्यामुळे, संगणक लेखनसामग्री खरेदी न केल्यामुळे विक्रीकर उत्पन्नावर परिणाम झालेला आहे काय ? तसेच कर वसुलीची उद्दिष्ट किती होते आणि किती कर वसूल झालेला आहे ? यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, उपशीर्षावर ५७.९६ लाख रु. अधिक खर्च झालेला आहे व त्याची कारणे स्पष्टिकरणात्मक ज्ञापनात दिलेली आहेत.

३.२६ समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००७-२००८मध्ये विक्रीकर वसुलीचे उद्दिष्ट किती होते आणि किती साध्य झाले ? विक्रीकर विभागाकडून जेवढा महसूल प्राप्त होतो त्याच्या ३ ते ४ टक्के आस्थापनेवर खर्च होतो. तसेच सन २००६-२००७ मध्ये ५४.८२ कोटी रु.ची बचत झालेली असताना ३२.४० कोटी रु.ची पूरक मागणी का करण्यात आली ? यासंदभार्त विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सन २००६-२००७ मध्ये व्यवसाय कर वसुलीमध्ये १९.४० टक्के वाढ झालेली आहे. यामध्ये ४ वेगवेगळे उपशीर्ष आहेत. प्रत्येक उपशीर्षाची माहिती दिलेली आहे. सन २००६-२००७ मध्ये व्यवसाय कर वुसलीमध्ये १९.४० टक्के इतकी वाढ झाली. त्या वर्षात आर्थिक वाढ फक्त १० टक्के होती. त्या तुलनेत जवळ जवळ दुपटीने टॅक्स वसुली झालेली आहे.

३.२७ तसेच रु.३२.४० कोटी एवढया रकमेची पूरक मागणी कोणत्या कारणासाठी घेण्यात आली, रू.५४.८२ कोटी बचतीचे कारण काय व रु.३२.४० कोटी पूरक मागणी घेऊनही रु.५४.८२ कोटी रकम अखर्चित कशी राहिली. याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे. विक्रीकर विभागाच्या पुनर्रचने नंतर वाढीव पदावरील वेतनावरील खर्च भागवण्याकरीत रुपये २० कोटी विक्रीकर विभागाच्यासंपूर्ण संगणकिकरणाच्या कामाकरीता वाढीव निधी रु.१० कोटी व मूल्य वर्धीत करप्रणाली यशस्वी पणे राबविण्यासाठी प्रसिद्धी देणे, त्याची माहिती व्यापाऱ्यांना देण्याकरीत जाहिराती करीता रु.२ कोटी. याकरीता पूरक मागणी घेण्यात आली होती.

३.२८ रु.५४.८२ कोटी मधील रु.३३.४४ कोटी वर्षभरात परत केले. उर्वरित रु.२१.३८ कोटी बचत प्रामुख्याने विक्रीकर विभागाचे संगणकीकरणाचे काम मे.ईसीआयएल कंपनी कडून केले जाते. मे.ईसीआयएल कं.कडून तांत्रिक अडचणी मुळे देयके विहीत वेळेत सादर न झाल्यामुळे सदर बचत झाली आहे.

३.२९ रु.५४.८२ कोटी मधील रु.३३.४४ कोटी वर्षभरात परत केले. उर्वरित रु.२१.३८ कोटी रक्कम वर्ष अखेर खर्च होणे अपेक्षित होते, परंतु प्रामुख्याने विक्रीकर विभागाचे संगणकीकरणाचे काम मे.ईसीआयएल कंपनी कडून केले जाते. मे.ईसीआयएल कं.कडून तांत्रीक अडचणी मुळे देयके विहीत वेळेत सादर न झाल्यामुळे सदर निधी अखर्चीत राहिला आहे.

३.३० रिक्त पदे पदोन्नतीने भरल्यामुळे, देशांतर्गत प्रवास खर्च, मूल्यवर्धित कर प्रणाली लागू केल्यामुळे, थकीत व्यवसाय कर वसुली करिता अधिकारी/कर्मचारी यांनी करदारत्यांना अधिक भेटी दिल्यामुळे, कार्यालयीन खर्च : नागपूर, औरंगाबाद व नाशिक या शहरातील एप्रिल ते जून मधील उष्ण तापमान लक्षात घेता एअर कुलर्स आणि वॉटर कुलर्स या यंत्रसामग्रीवर अधिक खर्च झाल्यामुळे, भाडेपट्टी व कर : प्रलंबित भाडे मालकांना अदा करण्यात आल्यामुळे, संगणकावरील खर्च : संगणकप्रणाली अद्यावत ठेवण्यासाठी आवश्यक खर्च केल्यामुळे अशी अधिक खर्चाची कारणे व दौऱ्यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाला, काटकसरीच्या धोरणामुळे यंत्रसामुग्री खरेदी न केल्यामुळे बचत झाली असे विभागाने स्पष्टिकरणात नमूद केले आहे.

कमी संगणकांची खरेदी केल्यामुळे बचत झाली. म्हणजेच विभागाने दोन ठिकाणी वेगवेगळे अभिप्राय सादर केलेले आहेत असे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ज्या कामासाठी अंदाजपत्रक केले जाते त्या कामावरच तो निधी खर्च केला जातो. ५७.९६ लाख रुपयांचा निधी पूर्वीच्या प्रलंबित देयकांचे पेमेंट करण्यासाठी खर्च झालेला आहे.

३.३१ गत वर्षातील भाडे अदा करण्याचे राहिले असेल तर तो खर्च पुढे करता येतो का ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, प्रलंबित खर्च पुढील वर्षी करावा लागतो. या संदर्भात उदाहरण देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, परभणी जिल्ह्याचे ३ लाख रुपयांचे देयक विलंबाने प्राप्त झाल्यामुळे तेवढी रक्कम पुढील वर्षी खर्च करण्यात आली. अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाल्यामुळे बचत झाली आहे. एकीकडे अधिकाऱ्यांनी करदात्यांना अधिक भेटी दिल्याचे नमूद केले आहे आणि दुसरीकडे अपेक्षेपेक्षा कमी दौरे झाले आहेत असे नमूद केलेले आहे. ही बाब समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली असता ट्रॅब्यूनलवरील खर्च वेगळ्या कामावर फिरवू करु शकत नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

३.३२ शासनाकडून विक्रीकर विभागाला काटकसर करण्याचे आदेश आले असतील. विक्रीकर विभागाने अधिक वसुली केलेली आहे. मग कारण नसताना विभागाकडून खरेदी केली जात होती ही बाब विभागाने मान्य केली. काटकसरीतून उत्पन्न वाढत असेल तर तो विभागाच्या कार्यक्षमतेचा भाग आहे. असे अभिप्राय समितीने व्यक्त केले. शासनाने काटकसरीचे आदेश निर्गमित केल्यानंतरही विभागाचे उत्पन्न वाढलेले आहे. निरर्थक पुरवणी मागणीमुळे बचत झालेली आहे. सुरुवातीला फक्त अधिक खर्च झालेला आहे. विक्रीकर विभागाचे उत्पन्न १३ टक्क्यांवरुन १९ टक्क्यापर्यंत उत्पन्न वाढलेले आहे. काटकसर केल्यामुळे बचत झाली आहे. काही गोष्टी उपलब्ध नसताना महसूल वाढू शकतो असा त्याचा अर्थ होतो. वसुलीच्या संदर्भात वित्त विभागाने किती लक्ष घातले होते ?

३.३३ यासंदर्भात माहिती देताना सचिव, वित्त (ले व को) विभाग यांनी असे सांगितले की, त्यावेळी शासनाने काटकसरीचे धोरण स्वीकारले होते आणि अजूनही तेच धोरण आहे. कार्यक्षमता वाढविणे हा एक मार्ग आहे. महसूल विभागाकडे मशिनरी कमी असली तरी आहे

ती यंत्रणा रात्रंदिवस काम करीत असते. त्यावेळी शासनाचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या मशिनरीने चांगले काम केलेले आहे. तसेच त्यावेळची आर्थिक परिस्थिती कशी होते त्यावरही ते अवलंबून आहे.

३.३४ संगणकांच्या खरेदीमुळे समितीचे समाधान झाले परंतु ऑन लाईनद्वारे माहिती उपलब्ध होत असताना पुस्तकांची खरेदी का करण्यात आली ? यासंदर्भात विभागीय सचिवांना विचारले असता यावर विभागीय सचिवांनी आपले अभिप्राय समितीसमोर नोंदविता आले नाहीत.

३.३५ समिती व्यावसायिक दृष्टीकोनातून विचार करीत आहे. शासनाने आदेश दिल्यानंतर अधिकारी कार्यक्षम होतात. त्यांच्या कार्यक्षमतेचे ऑडीट झाली पाहिजे. कारण आदेश दिले नाही तर कार्यक्षमता वापरली जात नाही, असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

३.३६ विक्रीकर भागाचे काही प्रमाणात उत्पन्न वाढले असेल, परंतु पैसे मागण्याची खात्यांना सवय लागलेली आहे. ज्या ज्या खात्यांमध्ये बचत झालेली आहे त्यांची मूळ अर्थसंकल्पामध्ये किती मागणी होती, प्राप्त रकमेतून बचत किती झाली किंवा अधिक खर्च किती झाला आणि पुरवणी मागण्यांचे प्रमाण किती आहे यावर दोन्ही सभागृहात सविस्तरपणे चर्चा होत नसल्यामुळे समितीमध्ये काम करीत असताना हा विषय समोर आलेला आहे. त्यामुळे वित्त विभागाकडून मागील २ वर्षात ज्या विभागांनी पुरवणी मागण्या केलेल्या आहेत त्या खात्यात मूळ अर्थसंकल्पामधील किती रक्कम शिल्लक राहिली होती याची माहिती समितीसमोर सादर करावी परंतु अद्याप सदर माहिती समितीला आप्राप्त आहे. तसेच मूळ तरतुदीपैकी रक्कम शिल्लक असताना पैसा मागितला जात असेल तर त्यासंबंधी समितीच्या माध्यमातून शासनाला शिफारस करेल.

३.३७ विक्रीकर विभागाने अधिक वसुली केल्यावर वित्त विभागाचे समाधान होत असेल परंतु त्याच विभागाला निधी देताना मात्र अनेक कारणे सांगितली जातात. अनेक विभागांकडून निरर्थक पुरवणी मागण्या केल्या जातात. गेल्या ५ वर्षात एखाद्या खात्याने निरर्थक पुरवणी मागणी केल्याचे सिध्द झाले असेल तर त्या खात्याची पुरवणी मागणी रोखण्याचा प्रयत्न केला आहे काय ? यावर वित्त सचिवांचे अभिप्राय प्राप्त झाले नाहीत.

३.३८ मूळ तरतूद खर्च झालेली नसताना पुरवणी मागणी करणे. मूळ मागणी, शिल्लक राहिलेली रक्कम, बचतची वा अधिक खर्चाची रक्कम अशा प्रकारे मागील ३ वर्षाची माहिती सविस्तर तक्त्यामध्ये समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले. परंतु सदर माहिती समितीला अद्याप अप्राप्त आहे.

३.३९ पूरक मागण्यांना मर्यादित आऊट-ले असतो. मूळ तरतूद खर्च झाली नाही तर त्यासाठी संबंधितांना जबाबदार धरले पाहिजे. जुलै व डिसेंबर महिन्यात पूरक मागण्या सादर केल्या जातात. पूरक मागणीतील तरतूद शिल्लक असताना पुढील अधिवेशनात पुन्हा पूरक मागणी सादर केली जाते. त्यामुळे विकासाच्या कामांसाठी पुरेसा निधी मिळत नाही, आवश्यक असलेल्या कामांना कट लावला जातो. म्हणून संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे, असे निदेश समितीने विभागास दिले.

३.४० व्यवसाय कर वसुलीकरिता नियुक्त केलेल्या खाजगी अभिकर्त्यांना वसुलीच्या रकमेच्या प्रमाणात मानधन प्रदान केल्यामुळे अधिक खर्च झाला. असे विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केलेले आहे त्याअनुषंगाने खाजगी अभिकर्त्यांची संख्या किती आहे, त्यांची निवड कशा प्रकारे करण्यात येते, त्यासाठी शैक्षणिक पात्रता किती आहे आणि त्यांना किती मानधन दिले जाते आणि त्यांनी व्यवसाय कराची किती वसुली केली ? अशी समितीने विचारणा केली असता यावर अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, संपूर्ण राज्यात केवळ ४७ अभिकर्त्यांची नियुक्ती केली होती. त्यांना वसुलीच्या ७ टक्के मानधन प्रदान केले जाते. ज्यांनी व्यवसाय कर भरलेला नाही अशा नवीन करदात्यांकडून त्यांनी वसुली केलेली आहे. १२ वी उत्तीर्ण झालेल्या महिला व अल्प बचतीचे एजन्ट असलेल्यांना हे काम दिले जाते. अल्पबचत महिला गट सक्षमीकरणाचे शासनाचे धोरण असल्यामुळे त्यांची नियुक्ती केली जाते ही नियुक्ती हंगामी कालावधी करीता होते. व्यवसायकर वसूल रकमेच्या ७% व १०% या दराने प्रोत्साहन पर रक्कम त्यांना अदा करण्यात येते.

३.४१ अनेक खाते प्रमुखानींच एजन्टला या कामासाठी नेमलेले आहे. तसेच हे अधिकारी ७ टक्क्यांमधील एजन्टला २ टक्के देत देऊन स्वत:जवळ ५ टक्के रक्कम ठेवत असतील. या एजन्टनी किती रकमेची वसुली केली आहे ? याबाबत खूलासा कराताना

विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, एका वर्षात २० लाख रुपयांची वसुली केली आहे. या रकमेच्या ७ टक्के इतके त्यांना मानधन प्रदान करण्यात आले. मानधनाचा दर वाढवून मिळावा अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

३.४२ सन २००७-०८ मध्ये रोजगार हमी निधीमध्ये अनुशेष शिल्लक नसल्यामुळे रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली असे विभागाने सादर केलेल्या स्पष्टीकरणात्मक अभिप्रायमध्ये नमूद केलेले आहे. याचे कारण काय आहे असे समितीने विचरणा केली असता हा भारीत शीर्ष आहे. यावर मतदान होत नाही. दिनांक २२.२.२००८ रोजी शासनाने एक अध्यादेश काढला होता. त्या अध्यादेशाद्वारे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरुवातीस निधीतील जमा रक्कम रुपये २ हजार कोटी रुपयांपेक्षा कमी असणार नाही असा निर्णय घेतला होता. त्यानुसार २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम रोजगार हमी योजनेमध्ये शिल्लक असेल तर भारीत शीर्षामधून खर्च करता येतो. बहुतेक ठिकाणी हा निधी राखीव निधीमध्ये ठेवला होता. एकत्रित निधीत हा फंड ठेवावयाचा होता. त्यावेळी ११,५६९.१० कोटी रुपये शिल्लक होते. त्यामुळे ती रक्कम हस्तांतर करण्याची गरज भासली नाही. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.४३ रोजगार हमी योजनेसाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून व्यवसाय कराची कपात केली जाते. आता राज्याची रोजगार हमी योजना रद्द झाली असून केंद्र सरकारची रोजगार हमी योजना सुरु आहे. सन २००७-०८ मध्ये या योजनेसाठी जमा झालेली १२८२.९४ कोटी रुपये इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. राज्याची रोजगार हमी योजना बंद झालेली असतानाही राज्यातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून व्यवसाय कर वसूल केला जातो. एस.टी.च्या व बेस्टच्या तिकिटातून बांगलादेशातील नागरिकांच्या संदर्भात अतिरिक्त अधिभार आजही वसूल केला जातो. लोकांकडून वसूल केलेला पैसा प्रत्यार्पित केला जातो. हा पैसा दुसऱ्या कारणासाठी वापरला येतो काय? मग ही बाब या शीर्षामध्ये कशी आली ? ज्या वर्षी रोजगार हमी योजनेकरिता ही रक्कम जमविली होती तो विषय संपलेला आहे त्यामुळे या शीर्षाला तो येता कामा नये. असे विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिल्यावर सचिव, वित्त (ले.व को.) यांनी असे समितीला असे सांगितले की, सन २००७-२००८ पर्यंत ती परिस्थिती होती. त्याच्या पुढे असे येणार नाही. रोजगार हमी योजनेसाठी ज्या पैशांची गरज आहे त्यासाठी किमान २ हजार कोटी रुपयांची तरतूद असली पाहिजे असे केलेले आहे.

३.४४ महाराष्ट्रामध्ये हवालाव्दारे जे व्यवहार होतात त्या बाबतीत विक्री कर आकारणीबाबत वित्त विभागामार्फत काय कारवाई केली जाते ? याबाबत समितीने माहिती देण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, विभागामध्ये संगणकीकरण झाल्यानंतर क्रॉस चेकींग करण्याची व्यवस्था झालेली आहे. इतर राज्यांमध्ये अशी व्यवस्था नाही. देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की ज्या राज्याने केंद्र शासनाबरोबर एक करार करुन एक पायलट प्रोजेक्ट तयार केलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये मूल्यवर्धित कर, विक्रीकर, राज्य उत्पादन शुल्क आणि सेवा कर यांची माहिती एकाच ठिकाणी गोळा केली जाते. यासाठी जे इकॉनॉमिक एव्हिडंस युनिट आहे त्या ठिकाणी एकत्रित माहिती गोळा केली जाते. आतापर्यंत हवालाच्या १२७० केसेस पकडल्या. त्यामध्ये ३२ हजार लाभार्थी होते. १ हजार कोटी रुपयांपैकी ५०० कोटी रुपये कर वसूली केलेली आहे. उर्वरित कर येत्या पाच सहा महिन्यांमध्ये वसूल करणार आहोत.

३.४५ पुढे समितीने अशी विचारणा केली की, तालुका पातळीवर जी गावे असतात त्या ठिकाणी किराणा दुकान, सोनाराचे दुकान किंवा इतर जे व्यापार चालतात त्या ठिकाणी खरेदी-विक्री होते पण अधिकृत पावती दिली जात नाही. त्या ठिकाणी कोणत्या आधारावर विक्रीकर वसूल केला जातो ? गावांमध्ये अशा पध्दतीचे सगळे व्यवहार चालत असतात. तालुका पातळीवर गावांमध्ये पावत्या न देता जी खरेदी-विक्री होते त्या बाबतीत आपल्या विभागाकडून कशा पध्दतीने विक्रीकराची वसुली केली जाते ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, शासनाने मुंबईमध्ये विक्रीकरा ऐवजी मूल्यवर्धित कर आकारत आहे. त्यामध्ये सेल्फ कम्प्लायन्सवर भर दिलेला आहे. वर्षाची उलाढाल ५ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल तर अशा व्यापाऱ्यांनी सेल्स टॅक्स भरला पाहिजे. ज्यांचा उलाढाल ५ लाखापेक्षा कमी आहे असे व्यापारी सुध्दा आता नोंदणी घेण्यासाठी येतात. परचेस टॅक्सच्या दृष्टीने ते आवश्यक आहे. आमच्याकडे एका वर्षात ३० ते ४० हजार व्यापारी ज्यांचा उलाढाल ५ लाखापेक्षा कमी आहे ते नोंदणी घेण्यासाठी येतात. विभागमध्ये सर्वेक्षण शाखा निर्माण करण्यात आलेली आहे. त्या माध्यमातून मुंबई आणि पूर्ण राज्याचे सर्वेक्षण करतो. ज्यांच्याकडे नोंदणी नसेल त्यांना दंड लावतो. विभागाने नवीन पध्दती सुरु केल्यानंतर दोन-चार वर्षात विक्रीकराची वसुली दुप्पट झालेली आहे. या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशामध्ये पहिल्या

क्रमांकावर आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या पध्दतीचा वापर करतो ती अतिशय उत्कृष्ट असून त्याचा अभ्यास करण्यासाठी दुसऱ्या राज्यातील लोक येत असतात. महाराष्ट्र राज्याची विक्रीकराची वसुली ५६ हजार कोटी रुपये आहे अशीही सचिवांनी समितीला माहिती दिली. यावर समितीने अशी विचारणा केली की, एखादी व्यक्ती दुकानात गेल्यानंतर एका वस्तूची किंमत ५० रुपये असेल तर दुकानदार सांगतो की, तुम्ही पावती घेतली नाही तर ती वस्तू ४५ रुपयांना देऊ. आपले ५ रुपये वाचतात म्हणून साधारणत: लोक पावती घेत नाहीत. अजूनही शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर असे प्रकार चालतात. त्यामुळे विक्रीकराच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. शहर पातळीवर, राज्य उत्पादन शुल्क विभागीची धाड पडली, विक्रीकर विभागाची धाड पडली असे कधी वाचावयास मिळत नाही. व्यापारी पावती न देता माल विकत असतील तर विक्रीकर अधिकाऱ्यांनी देयके न देता विक्रीकरणाऱ्या व्यापाऱ्यांकडे प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचेवर वसूलीची कारवाई करावी. पावत्या न दिल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा कर बुडतो. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली गाव-तालुका-जिल्हा पातळीवर या संदर्भात शासनाकडे काय यंत्रणा आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी गाव-तालुका-जिल्हा पातळीवर अशा प्रकारची यंत्रणा नसल्याबाबत समितीला सांगितले.

३.४६ राज्यामध्ये देयका विना विक्री करून कर चुकवणाऱ्या अशा किती व्यापाऱ्यांवर काय कारवाई केली याची माहिती समितीला सविस्तर द्यावी. असे निदेश समितीने सचिवांना दिले होते. तथापि, समितीला सदर माहिती अद्याप प्राप्त झाली नाही. त्यामुळे समितीला यासंदर्भात आपले अभिप्राय देता आले नाहीत.

३.४७ विभागाकडून जे कर जमा होते ते २० टक्के लोकांकडूनच होते. जर कार्यक्षमता दुप्पट केली तर विभागाचे उत्पन्न खूप वाढेल. या संदर्भात विभागाकडे काय यंत्रणा आहे ? किती धाडी घातल्या, किती दंड वसूल केला ? पण याकडे खात्याचे पाहिजे तेवढे लक्ष नाही असे समितीचे मत आहे.

३.४८ यासंदर्भात समितीने सचिवांना असे सुचित केले की, विभागाकडे मनुष्यबळ कमी असेल तर त्यांना खाजगीकरणातून उत्पन्न वाढवता येऊ शकते. तसेच व्यापाऱ्यावर कारवाई केली तर नकली मालाच्या विक्रीला सुध्दा आळा बसू शकेल.

३.४९ किती रुपयांपर्यंत खरेदी केली तर विक्रेत्याने देयके देणे जरूरीचे आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, ५० रुपयाच्या वर खरेदीविक्रीचा व्यवहार झाला तर पावती दिली पाहिजे.

३.५० जर ५० रुपयाच्या वर खरेदी विक्रीच्या व्यवहार झाला तर पावती दिली पाहिजे असा नियम आहे, मग महाराष्ट्रातील काही शहरामध्ये विक्रीकर विभागाने पुढाकार घेवून वस्तूंची खरेदी केल्यावर देयके न देणाऱ्या विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई केली तर त्या-त्या शहरांचे उत्पन्न निश्चितपणे वाढेल असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधीनीं समितीला सांगितले की, मोठ्या शहरांमध्ये विक्रीकर विभागाने अश्या प्रकारे कारवाई केलेली आहे. परंतु विभागाने दिलेली माहिती समितीने मान्य केली नाही कारण पावत्याशिवाय जी खरेदी विक्री होते त्यासंदर्भात तपासणी करण्यासाठी सध्या विभागाकडे कोणतीही पध्दती नाही. राज्यातील पावत्या न घेता माल विकणाऱ्या व्यापाऱ्यांकडून दंड वसुली केली अशी हजारामध्ये एक सुध्दा केस होत नाही. समितीची अशी सूचना आहे की, एकदा याची सुरुवात करावी. अशा प्रकारची पध्दती सुरु झाल्यानंतर जर असे वाटले की, यामध्ये काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक लागणार आहेत तर नंतर निविदा वगैरे काढावयाचे की काय या दृष्टीने विचार करता येईल. पण मी जो मूळ विषय उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात टिप्पणी तयार करुन समितीला सादर कराव्यात. **(परिशिष्ट .....)**

३.५१ विक्रीकर विभागाने फ्लाईन्ग स्कॉड बाबत सांगितले. नाशिकमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी या संदर्भात लिलाव केला तर १० हजार कोटी रुपये, ५ हजार कोटी रुपयांमध्ये खाजगी लोक हे काम घेतील. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

३.५२ विक्री कराचे उत्पन्न ५६ हजार कोटी रुपये असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले त्याअनुषंगाने वसूली वाढविली आहे. शासनाने सोयाबीनच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतला. पण जे धान उत्पादक शेतकरी आहेत त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. ज्या राईस मिल्स आहेत किंवा साल्वंट प्लांट आहेत त्यांच्याकडून विक्रीकर विभाग १० ते १५ कोटी रुपये टॅक्स वसूल करणार पण शेवटी त्याचा भार शेतकऱ्यांवरच

पडणार आहे. विक्रीकर विभागाने सोयाबीनच्या बाबतीत जसा निर्णय घेतला त्याप्रमाणे धानाच्या बाबतीत सुध्दा सहानुभूतिपूर्वक निर्णय घ्यावा अशी सूचना समितीने विभागाला केली.

३.५३ मेसर्स प्राईस वॉटर कूपर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना किती रकमेचे प्रदान करावयाचे होते ? तसेच मे.प्राईस वॉटर कूपर्स प्रा.लि. यांची नियुक्ती कोणत्या कारणासाठी करण्यात आली होती ? त्यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये कोणती विसंगती दिसून आली तसेच सदर कंपनीवर कोणती व कशा प्रकारची कारवाई करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली. यावर विभागीय सचिवांनी समितीला अधिक माहिती देताना असे सांगितले की, यामध्ये मूळ तरतूद १०० कोटी ७२ लाख रुपये होती. पुनर्विनियोजनाव्दारे ७ कोटी ९३ लाख रुपये प्राप्त झाले. अंतिम सुधारित अनुदान १०८ कोटी ६५ लाख रुपये होते आणि प्रत्यक्ष खर्च १११ कोटी रुपये झालेला आहे व यासंदर्भात विभागाने दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, अंदाचे रुपये एक कोटी इतक्या रकमेचे प्रदान करावयाचे होते. मुल्यवर्धीत करप्रणाली व संगणकीकरणाच्या अंमलबजावणीसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. मे.प्राईस वॉटर कूपर्स प्रा.ली.याची मुल्यवर्धीत करप्रणालीच्या अंमलबजावणीसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. विक्रीकर विभागाच्या संगणकीकरणाचे काम मे.ईसीआयएल कं.कडून केले जाते. त्यांनी केलेल्या कामाकरीता सल्लागार म्हणून मे.प्राईस वॉटर कूपर्स प्रा.लि. याची नियुक्ती केली. त्याबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालात परीपुर्तता नसल्याने त्यांची देयके पारीत केली नाहीत.

३.५४ पुढे समितीने अधिक माहिती जाणून घेताना असे विचारले की, मेसर्स प्राइस वॉटर कूपर्स लिमिटेड ही कंपनी काय काम करते ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, इसीआर आणि मॅस्टेक या दोन कंपन्याकडून संगणक आणि सॉफ्टवेअर घेण्यात आले. संगणक प्रणालीच्या कामाचे वेटिंग करण्यासाठी मेसर्स प्राइस वॉटर कूपर्स लि. या कंपनीला नेमण्यात आले. २००७-०८मध्ये या कंपनीने वेटिंग करण्यामध्ये विलंब केला होता आणि त्यामुळे त्यांचे पेमेंट थांबविण्यात आले होते. हे तांत्रिक काम आहे. संगणकावर सर्व सुविधा व्यवस्थित मिळतात की नाहीत,काम समाधानकारक आहे की नाही याची त्या कंपनीकडून सातत्याने पाहणी केली जाते. या कंपनी बरोबर ५ वर्षाचा करार केलेला आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.५५ जकात कराऐवजी मुल्यवर्धित कर लागू झालेला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी एकूण किती माल विकत घेतला आणि किती विकला याची नोंद विक्रीकर विभागाकडे असावयास पाहिजे. एखाद्या गावामध्ये ज्या प्रमाणात माल आला असेल त्या प्रमाणात विक्रीकर जमा झाला पाहिजे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता संगणकावर विक्रीकर विभागाला ज्या सुविधा तत्काळ मिळावयास पाहिजेत त्या सुविधा मिळण्यासाठी विलंब झाला तर विक्रीकर विभाग संबंधीत कंपनीवर दंड आकारतो. असे विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना समितीला सांगितले.

३.५६ संगणकाचे आज्ञावली योग्य प्रकारे वापरले जाते की नाही हे पहाण्यासाठी त्या कंपनीची नेमणूक केलेली आहे काय ? त्यावर उत्तर देताना विभागीय सचिवांनी होय म्हणून समितीला सांगितले.

३.५७ विक्रीकर भरण्याची ऑनलाईन प्रणाली बंद असल्यामुळे अनेक व्यापा-यांना विक्रीकर भरता आलेला नाही. त्यामुळे विक्रीकर भरण्याची मुदत वाढविण्यात यावी अशी मागणी अनेक व्यापा-यांनी लोकप्रतिनिधींकडे केलेली आहे. तसेच सन २००६ ते २०१० या कालावधीत फ्लॅटविकत घेतलेल्या लोकांकडून पूर्वलक्षीप्रभावाने मुल्यवर्धित कर वसूल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासंबंधी समितीला माहिती द्यावी. असे सांगितले असता विभागीय सचिवांनी अधिक माहिती देताना असे सांगितले की, विक्रीकर व्यवसायाची आमच्याकडे येऊन विवरण भरण्यासाठी वेळ वाढवून द्यावी असे सांगत असतात. तीन-चार वर्षापूर्वी वेळ वाढवून घेण्याची त्यांना खूप सवय लागली होती. आता विभागाने कामात शिस्त आणलेली आहे. पूर्वी केवळ ३० ते ३५ टक्के विवरण वेळेवर भरले जात होते. आता ९० टक्के विवरण वेळेवर भरले जातात. आता व्यापा-यांना विवरण भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही हे माहीत झालेले आहे. त्यामुळे व्यापारी वेळेवर विवरण भरतात. एखाद्या वेळी सर्व्हरमध्ये काही बिघाड झाला असेल तर एक-दोन दिवस मुदत वाढवून दिली जाते. यावेळी दोन दिवस सर्व्हर बंद पडल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे १५ दिवसांची मुदत वाढ दिली होती. शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर विवरणची भरणा होतो.

३.५८ पुढे समितीने विभागीय प्रतिनिधींना असे विचारले की, व्यापा-यांनी चुकीचे विवरण भरले तर काय केले जाते ? यावर चुकीचे विवरण भरले गेले तर सुधारित विवरण

भरता येते. पूर्वी सुधारित विवरण भरण्यासाठी १० महिन्यांची मुदत होती आणि कितीही सुधारित विवरण भरता येत होते. आता एकच सुधारित विवरण भरता येते. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

३.५९ ऑडिट करुन निर्णय देणारे अधिकारी विक्रीकर विभागाचे असतात काय ? याची विचारणा केली असता जो अधिकारी ऑडिट करतो त्याच्या वरिष्ठ पदावरचे अधिकारी देखील ऑडिट करतात. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

३.६० समितीने सदनिकावरील मूल्यवर्धित करा संबंधी विचारणा केली होती त्यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सन २००६ पासून ज्या सदनिका पूर्ण झालेल्या नाहीत ते पूर्ण करण्यासाठी वाळू, सिमेंट, स्टील इत्यादी जी काही सामग्री वापरण्यात आलेली असेल त्यावर मुल्यवर्धित कर लावलेला आहे. यासंदर्भात विकासक उच्च न्यायालयात गेले होते. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. त्यानंतर कराराच्या एकूण मूल्याच्या (टोटल ॲग्रीमेण्ट व्हॅल्यूच्या) एक टक्का मूल्यवर्धित कर घ्यावा अशी बिल्डर्सनी स्वत:हून विनंती केली. मूल्यवर्धित कर वस्तूंवर घेतला जातो. काही वस्तूंवर १२.५ टक्के तर काही वस्तूंवर ५ टक्के मूल्यवर्धित कर आकारला जातो. सर्व वजावट करुन सरासरी २ ते ३ टक्के एवढा मूल्यवर्धित कर लागतो. विभागाने विकासकांना दोन विकल्प दिलेले आहेत. एकतर त्यांनी वस्तूनिहाय मुल्यवर्धित कर भरावा किंवा कराराच्या एकूण मूल्याच्या (टोटल ॲग्रीमेण्ट व्हॅल्यूच्या) १ टक्का मुल्यवर्धित कर भरावा. वस्तूनिहाय मुल्यवर्धित कराची परिगणना केलेली रक्कम ही कराराच्या एकूण मूल्याच्या (टोटल ॲग्रीमेण्ट व्हॅल्यूच्या) १ टक्का मुल्यवर्धित कर रकमेपेक्षा अधिक होते. २०१० पासून ही योजना सुरु केल्यानंतर काही विकासक उच्च न्यायालयात गेले. कर २००६ पासून लागू झालेला आहे. उच्च न्यायालयाने विकासकांना परिगणना करुन कर भरण्यास सांगितले.

३.६१ समितीने विभागीय प्रतिनिधींना अशी विचारणा केली की, मुद्यासंदर्भात सन २००६ मध्ये मुल्यवर्धित कराच्या संदर्भात जी परिस्थिती निर्माण झाली आणि प्रत्यक्षात १२.५ टक्के व ५ टक्के मुल्यवर्धित कर कशा प्रकारे वसूल केला जात होता त्याची माहिती सादर करावी. एखाद्या विकासकाने १० सदनिकेची इमारत बांधली असेल आणि एका सदनिकेची किंमत १० लाख असेल तर १ कोटी रुपये या सदनिकांची एकूण किंमत होईल. त्याशिवाय ५० लाख

रुपये जमिनीची किंमत असेल तर त्या विकासकाला १.५० कोटी या रकमेवर १ टक्क्याप्रमाणे मूल्यवर्धित द्यावा लागेल का ? हा कर विकासक सदनिका धारकाकडून वसूल करणार आहे काय ? यासंदर्भात अधिक खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीला असे सांगितले की, कायद्यानुसार १ टक्का मुल्यवर्धित कराच्या प्रदानाची जबाबदारी विकासकांची आहे. या संदर्भात न्यायालयात दावा दाखल झाल्यानंतर कोर्टाने स्थगिती उठविलेली आहे. त्यामुळे बिल्डरकडून ही रक्कम वसूल केली जाणार आहे. परंतु अनेक विकासकांनी ग्राहकांकडून वसुली करुन ठेवली होती. त्यामुळे ते सुप्रीम कोर्टात जाणार आहेत. बिल्डर्सकडे जमीन सोडून इतर ऑप्शन्स आहेत. परंतु त्यांना सदनिका व वस्तू एकत्रित करता येत नाही.

३.६२ सदनिकांची किंमत जमिनीच्या किंमतीसह आकारली जाते. सरकार जमिनीवर मूल्यवर्धित कर घेऊ शकत नाही. त्यामुळे सदनिकेच्या किंमतीमधून जमिनीची किंमत वजा केली पाहिजे. जमिनीवर विक्रीकर वसूल करता येत नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विकासकांना ३ विकल्प दिलेले होते. विकासकांकडून एकूण करार रकमेच्या १ टक्का किंमत वसूल करता येते. तसेच त्यांना बाकीचे विकल्प खुले आहेत.

३.६३ पंरतु यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगने परचेज्ड गुड्स पर १२.५ प्रतिशत तथा ५ प्रतिशत या फ्लैट की कुल एग्रीमेंट कीमत पर एक प्रतिशत व्हॅट लिया जाएगा. मेरा प्रश्न यह है कि ग्राहकों की दृष्टि से कौन से विकल्प में उनको कम रकम भरनी पड़ेगी ? तसेच सामग्रीनिहाय व्हॅटची रक्कम करार रकमेच्या १ टक्क्यापेक्षा जास्त असते काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, प्रत्येक सामग्रीच्या किंमतीमध्ये फरक असल्यामुळे व्हॅटमध्येही फरक असतो. साधारणत: असे लक्षात आले आहे की, करार रकमेच्या १ टक्क्यानुसार काढलेली व्हॅटची रक्कम सामग्रीनिहाय काढलेल्या व्हॅटच्या एकूण रकमेपेक्षा कमी असते.

३.६४समितीने पुढे विभागीय प्रतिनिधींना असे विचारले की, यासंदर्भात एखादी याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे का ? या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सदर प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती, परंतु सद्य:स्थितीत स्थगिती मागे घेण्यात आलेली आहे.

३.६५ बांधकाम व्यावसायिकांकरीता शासन एखादी अभय योजना राबविणार आहे का ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, अशा प्रकारची कोणतीही योजना राबविण्याबाबत शासनाच्या विचारधीन नाही.

३.६६ पुढे समितीने अधिक माहिती जाणून घेताना विभागीय सचिवांना असे विचारले की, थकीत व्हॅट वरील व्याजाची रक्कम व त्यावरील दंड माफ करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नसल्याचे समितीला सांगितले.

३.६७ अनेक बिल्डर्सनी फ्लॅटधारकांकडून हा कर वसूल करुन ठेवलेला आहे. ते अधिकाऱ्यांबरोबर हात मिळवणी करण्याची शक्यता आहे. सन २००६ ते २०१० पर्यंत स्थगिती होता, ही स्थगिती २०१० साली उठलेली आहे. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिला असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, स्थगिती सन २०१२ पर्यंत होती. परंतु त्यांनी स्वत:हून २०१० पासून हा कर भरण्यास सुरुवात केली आहे.

३.६८ सन २००६ सालापासून मूल्यवर्धित कर लागू करण्यात आला होता. परंतु २०१२ पर्यंत त्याला स्थगिती असताना विकासकांकडून २०१० पासून हा कर वसूल करण्याचे प्रयोजन काय आहे ? प्रत्येक विकासकांबरोबर ग्राहकाने करारनामा केलेला असतो. त्या करारनाम्यामध्ये कलम अंतर्भूत असते. हा सर्वसामान्य सदनिका मालकांना मोठ्या प्रमाणात भुर्दंड पडणार आहे. विकासकांकडून हा कर वसूल कशा प्रकारे केला जाणार आहे आणि किती विकासकांनी नोंदणी केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विक्रीकर विभागाच्या नोंदणी कार्यालयाकडून बरीच माहिती गोळा केलेली आहे व आगामी एक माहिन्यामध्ये प्रत्यक्ष वसूलीला सूरुवात होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

३.६९ ग्राहकांकडून हा कर वसूल करता कामा नये. अशी सूचना समितीने विभागास दिली परंतु जर मधल्या काळात विकासकांनी ग्राहकांकडून कराची वसुली केली असेल तर त्यासाठी शासन कायदा आणणार आहे काय व सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्रात किती विकासकांनी केलेले आहे ? यावर सदनिका विकणाऱ्यांनी मूल्यवर्धित कराचा भरणा केला पाहिजे असे विभागीय प्रतिनिधींकडून समितीला सांगण्यात आले.

३.७० सन २००६ साली राज्यात मूल्यवर्धित कर प्रणाली लागू केली आहे. विकासकांनी सदनिका विकताना कर लावला पाहिजे. परंतु विकासकांनी सन २०१२ पर्यंत ग्राहकांकडून कर वसूल केलेला आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागाने १३ विकासकांची तपासणी केली होती. त्यांनी ग्राहकांकडून ५० कोटी रुपये वसूल केले होते. त्यात काही ग्राहकांचा विकासकांसमवेत करारनामा झालेला होता, काही विकासकांनी गरज पडली तर वसुली केली जाईल असे सांगितलेले होते. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

३.७१ जो व्यवसाय करतो त्यांनी कर दिला पाहिजे. त्यानुसार विक्रेत्याने आपल्या नफ्यातून शासनाला मूल्यवर्धित कराची रक्कम भरली पाहिजे. The statement 'Seller has to pay the Tax' has to be categorically made clear. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

३.७२ सन २००६ ते २०१२ पर्यंत स्थगिती होती मग १ टक्क्याचा निर्णय केव्हा घेण्यात आला ? तसेच या विषयाला कोर्टात स्थगिती असताना शासनाने निर्णय कसा घेतला ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, विधीमंडळाने विधेयक मंजूर करून सन २०१० मध्ये शासनाने निर्णय घेतला. परंतु यासंदर्भात समितीने असा आक्षेप घेतला की, सदर प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना त्यासंदर्भात शासनाने कायदा तयार करून यासंदर्भात निर्णय घेतला.

३.७३ विक्रीकर विभागाच्या बाबतीत एकूण किती खर्चाचे ताळमेळ घालण्याचे किती प्रकरणे प्रलंबित आहे ? अशी विचारणा केली असता महालेखाकारांनी सन २०११-२०१२ चे साधारणतः २३ टक्के प्रलंबित आहे असे समितीला सांगितले. यावर समितीने विभागीय सचिवांना प्रंलबित परिच्छेदांचा तात्काळ निपटारा करण्याबाबत सूचना दिल्या.

३.७४ लॉटरीच्या संदर्भात सद्यःस्थितीची माहिती द्यावी ? लॉटरीमुळे मटक्यापेक्षाही भयानक परिस्थिती झालेली आहे. लोकांची घरे-दारे उद्ध्वस्त झालेली आहेत. १५-१५ मिनिटांमध्ये लॉटऱ्या काढल्या जातात. या संदर्भात कोणामार्फत कारवाई केली जाते ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, लॉटरीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या बरोबर चर्चा झाली. त्यावेळी

त्यांनी या संदर्भात कडक कारवाई करण्यास सांगितले आहे. कायद्याच्या विरुध्द जे लॉटरी चालवित असतील या संदर्भातील कारवाईची बाब गृह विभागाच्या अंतर्गत येते. पोलीस या संदर्भात कारवाई करतात. परंतु यावर समितीने आपला आक्षेप नोंदविताना असे सांगितले की, पोलीसामार्फत यासंदर्भात कोणतीही कारवाई केली जात नाही. बेकायदेशीर लॉटरी चालविणाऱ्यांवर अजामिनमात्र गुन्हा नोंदविला पाहिजे. अशीही सूचना समितीने विभागाला केली.

३.७५ अर्ध्या-अर्ध्या तासाला ज्या लॉटरीच्या सोडती काढल्या जातात त्यावर विभागाचे कशा प्रकारे नियंत्रण आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यासंदर्भात पोलिसांनी कारवाई करावयास पाहिजे. त्यामध्ये कोणताही गैरव्यवहार होत असेल, बेकायदेशीर काम होत असेल तर गृह विभागाने कारवाई केली पाहिजे.

३.७६ परंतु लॉटरीच्या माध्यमातून गोळा होणाऱ्या उत्पन्नावर वित्त विभागाचा अधिकार आहे. लॉटरी कशा पदतीने चालवावी याची सिस्टिम ठरविण्याचा अधिकार वित्त विभागाचा आहे. पण या राज्यामध्ये बेकायदेशीर लॉटरी चालत असेल तर ती बंद करण्याचा अधिकार पोलिसांकडे आहे. लॉटरीमुळे मटक्यापेक्षा वाईट परिस्थिती झालेली आहे. कारवाईचे अधिकार पोलिसांना दिले अशी विसंगती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच बेकायदेशीर लॉटरी चालू असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित पोलीस स्टेशनचे प्रमुख अधिकारी निलंबित झाले पाहिजेत असा कायदा केला तरच यावर नियंत्रण येईल. अशी समितीने विभागाला सूचना केली.

३.७७ वित्त विभागाच्या सूचना दिल्यानंतर पोलिसांनी धाडी घातल्या तरी प्रत्यक्षात किती वसुली होते ? अवैध वाहतुकीच्या बाबतीत एस.टी. महामंडळ आणि पोलीस कारवाई करतात तशा पध्दतीची कारवाई वित्त विभाग करु शकते काय असे समितीने विचारले असता लॉटरी संदर्भातील कायद्यामध्ये पोलिसांना कारवाईचे अधिकार आहेत.

३.७८ लॉटरीच्या माध्यमातून राज्याला मिळणारे उत्पन्न किती आहे ? जर लॉटरीमुळे मिळणारे उत्पन्न जास्त नसेल आणि त्यामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत असतील तर लॉटरी

पूर्णपणे बंद करा. शासनाने ज्याप्रकारे गुटखा बंदी केलेली आहे त्याचप्रकारे लॉटरी बंद करता येईल.

३.७९ सद्यःस्थितीला लॉटरीपासून ७८ कोटी रुपये उत्पन्न मिळते. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली. यासंदर्भात वित्त विभागाची सुध्दा जबाबदारी असून लॉटरी सेंटरवर एकाच वेळी ५०-६० लॉटऱ्या चालवित असतील तर विभागाने कारवाई करणे अपेक्षित आहे. तसेच केवळ पोलिसांकडे न सोपविता जशी सेल्स टॅक्सच्या बाबतीत शासनाने ॲडिशनल यंत्रणा तयार केली तशा पध्दतीची यंत्रणा लॉटरीच्या बाबतीत तयार केली तर राज्याचे लॉटरीचे उत्पन्न ४००-५०० कोटी रुपयांपर्यंत वाढू शकते असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

३.८० वित्त विभागाच्या मागणी क्रमांक जी-१, जी-२, जी-४ व जी-५ या मागण्यांसंदर्भात महालेखापाल कार्यालयाने घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने समितीमध्ये चर्चा केली असताना काही विभाग अनाठाई पुरवणी मागण्या मागतात. काही विभाग त्यांच्या मूळ अंदाजपत्रकातील तरतूदी एवढी रक्कमही खर्च होत नसताना पुरवणी मागणीद्वारे निधीची मागणी करतात. परंतु, मूळ तरतूदी एवढा खर्चही होत नसल्याने संबंधीत विभागांनी केलेल्या पूरक खर्चाची मागणी वर्षअखेरनंतर निरर्थक असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे बराचसा निधी अखर्चीत राहत असल्याने त्याचा योग्य कार्यासाठी वापर होत नाही. प्रकल्पांसाठी, विकासाच्या कामांसाठी निधी आवश्यक असताना सदरहू कामे निधीअभावी होत नाही व वित्त विभाग या कामांच्या मागण्यांकरिता निधीमध्ये कपात करतो. वास्तविक, अशाप्रकरणी राज्याच्या वित्तीय साधनसामुग्रीचे नियंत्रक म्हणून वित्त विभागावर फार मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे ज्यावेळेस एखाद्या विभागाकडून पूरक खर्चाच्या मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास सदरहू विभागाने केलेल्या मागणीप्रमाणे खरोखरच नियोजन केले आहे काय व तो खर्च कशाप्रकारे व कोणत्या बाबींवर करणार आहे याची पूर्णपणे शहानिशा करुनच आवश्यक असल्यास पूरक मागण्यांच्या निधीचे प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करते की, वित्त विभागाने इतर विभागाकडून प्राप्त होणा-या पूरक मागणींच्या प्रस्तावाची अत्यंत तपशीलाने छाननी करुनच सदरहू मागण्यांचे प्रस्ताव मान्य करण्याची कार्यवाही करावी जेणेकरुन पुरवणी**

मागणीन्वये उपलब्ध झालेला निधी अखर्चीत न राहता तो उचित प्रयोजनासाठी विहित वेळेत खर्च होईल.

३.८१ राज्याला विक्री कराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल जमा होतो. राज्याची विक्रीकराची वसूली प्रतिवर्षी ५६ हजार कोटी एवढी आहे. विक्रीकर कार्यालयांचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे गत काही वर्षांमध्ये विक्रीकराच्या वसूलीत भरघोस वाढ झालेली आहे. असे असले तरी, हा विक्रीकराचा महसूल शासनास मोठे व्यापारी, कंपन्या यांचेकडून प्राप्त होत असतो. परंतु, राज्यामध्ये लाखो किरकोळ आस्थापना आहेत ज्यांच्या माध्यमातून लोकांच्या नित्यनियमातील वस्तुंच्या खरेदीचे व्यवहार होत असतात. शासन नियमाप्रमाणे रुपये ५० एवढ्या किंमतीची वस्तू खरेदी केल्यावर त्याची पावती देणे बंधनकारक असते. परंतु, ग्राहकांकडून किरकोळ वस्तूकरिता पावतीची मागणी होत नसल्यामुळे या खरेदी विक्री मध्ये शासनास जो विक्रीकर येणे अपेक्षित असते तो मिळत नाही. महाराष्ट्रात सन २०११-२०१२ मध्ये वस्ती असलेली ४३,६६३ गावे असून शहरे ५३५ आहेत. याचा विचार करता या गावांमध्ये/शहरांमध्ये असणा-या छोट्या आस्थापनेमधून किरकोळ स्वरुपात होणारी हजारो कोटींची उलाढाल यावर विक्रीकर लावलाच जात नाही व त्याचा महसूलही शासनास प्राप्त होत नाही. सदरहू होणारी उलाढाल लक्षात घेता, विक्रीकराअभावी शासनास किती महसूल मिळत नाही याचा विचारही करता येत नाही. यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे विक्रीकर अधिका-यांनी वेळोवेळी या आस्थापनांना अचानक भेटी देऊन त्यांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदवह्यांची तपासणी केल्यास या व्यापाऱ्यांवर दबाव निर्माण होवून शासनाचे उत्पन्न भरघोस प्रमाणात वाढू शकते. सध्या याप्रकारची पद्धती अवलंबविण्यात येत नसल्याने व्यापारी वर्ग, ५० रुपयांवरील खरेदीवर पावतीही देत नाहीत तसेच ग्राहकाकडून देखील त्याची मागणी होत नाही. याकरिता ग्राहकांमध्ये देखील जनजागृती निर्माण होणे आवश्यक आहे तसेच **विक्रीकर अधिका-यांनी अचानक भेटी देऊन या पद्धतीचे अवलंबन न करणा-या व्यापारांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची सुरुवात केल्यास ही पद्धत सुरळीतपणे चालू होणे शक्य आहे. यादृष्टीने वित्त सचिवांनी विक्रीकर आयुक्तांसमवेत बैठक बोलवून ही कार्यपद्धती राबविण्याबाबत कोणती कार्यवाही करणे शक्य आहे याबाबत सांगोपांग विचार**

करावा व कोणती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे याची माहिती तीन महिन्यात द्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

३.८२ शासनातर्फे महाराष्ट्र राज्य लॉटरी चालविली जाते. परंतु, इतर राज्यांच्या लॉट-या, अनधिकृत लॉट-या तसेच पंधरा-पंधरा मिनिटांनी सोडतीच्या लॉट-या यांचे पेव ब-याच ठिकाणी फुटले आहेत. या अनधिकृत लॉट-यांवर पोलीसांमार्फत कार्यवाही करण्यात येते. परंतु, ही कार्यवाही तात्कालिक स्वरुपाची असल्याने अनधिकृत लॉट-या चालविणा-या व्यावसायिकांवर याचा तीळमात्रही परिणाम होत नाही. कार्यवाही झाल्यावर थोड्या कालावधीकरिता ती बंद राहून पुन्हा काही कालांतराने ती चालू होते. या बेकायदेशीर लॉट-यांमुळे अनेक कुटुंबच्या कुटुंब उद्धवस्त झालेले आहे. **त्यामुळे बेकायदेशीर लॉट-यांवर कायमची बंदी आणण्यासाठी लॉटरी सेंटर चालविणाऱ्या पोलीस स्थानकांच्या हद्दीतील प्रमुख पोलीस अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यामध्ये काही अनियमितता आढळल्यास त्यांना जबाबदार धरण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

उद्योग विभाग

४ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उद्योग वसाहतीमध्ये स्थानिकांना प्राथम्यक्रमाने रोजगार उपलब्ध करणे.

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना **अनुदान क्र. के-७ "उद्योग" मधील प्रधान शीर्ष २८५१ -"ग्रामोद्योग व लघुउद्योग", प्रधान लेखा शिर्ष २८५२ - "उद्योग" व प्रधान शिर्ष २५८३ - "अलोह व खनिकर्म व धातुविषयक उद्योग"** या शिर्षांतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आह. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याने समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र. के-७ "उद्योग"

(रुपये हजारात)

४.२ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
२८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग २८५२- उद्योग २८५३- अलोह व खनिजकर्म व धातुविषयक उद्योग				
दत्तमत मुळ पुरक	 ५,८०,५६,३९ ४,४८,४८,८५	१०,२९,०५,२४	१०,२४,७१,८९	-४,३३,३५
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८)				३,५६,४४
भारित मुळ पुरक	 ९५,२६,५० ३,८६,६९	९९,१३,१९	८२,६९,०२	- १६,४४,१७
वर्षभरात परत करण्यात आलेली (रक्कम मार्च २००८)				१६,४४,१७

४.३ **ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदभार्त उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहे.

सदर तीनही लेखाशीर्षकाखाली अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २००७-२००८ या वर्षासाठी खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आली होती

लेखाशीर्ष	दत्तमत /भारित	योजनेतर	योजनाअंतर्गत	एकूण
२८५१	दत्तमत	२३६,६७२	१४०,८७१	३७७,५४३
	भारित	--	--	--
२८५२	दत्तमत	४,४७०,६६१	१,१००	४,४७१,७६१
	भारित	--	९८,३००	९८,३००
२८५३	दत्तमत	९५६,३३५	--	९५६,३३५
	भारित	८५४,३५०	--	८५४,३५०
	दत्तमत	५,६६३,६६८	१४१,९७१	५,८०५,६३९

अशाप्रकारे या तीनही लेखाशीर्षकाखाली रूपये ५,८०,५६,३९,०००/-(दत्तमत) व रू.९५,२६,५०,०००/-(भारित) एवढे मूळ अनुदान मंजूर करण्यात आले. तदनंतर या तीनही लेखाशीर्षकाखाली शासन परिपत्रक क्र. पुरक-२००७-२००७-२००८/(९३४३)/प्रशासन-१ दि.२८.३.२००७, क्र.पुरक-२००७-२००७-२००८/(९३४३)/प्रशासन-१ दि.२८.३.२००७, क्र.पुरक-२००७/२००७-२००८/(९१७४)/प्रशासन-१,दि.२७.९.२००७ व पुरक-२००७/२००७-२००८/(९२१६)/ प्रशासन-,दि.२७.९.२००७ व पुरक-२००७/२००७-२००८/(९२१६)/प्रशासन-१, दि.२०.१२.२००७ अन्वये रु.४,४८,४८,८५,०००/-(दत्तमत) व रूपये ३,८६,६९,०००/-(भारित) (एकूण रूपये ४,५२,३५,५४,०००/-) एवढी रक्कम व पुरवणी अनुदानाद्वारे उपलब्ध करून देण्यात आली. सदर अनुदानातून वर्षाखेरीस रू.३,५६,४४,०००/-(दत्तमत) व रूपये १६,४४,१७,०००/-(भारीत) एकूण रूपये २०,००,६१,०००/-) एवढी रक्कम शासन निर्णय क्र.आरईई २८५१/२००७-२००८/(९३१०)/ प्रशासन-१ दिनांक २८.३.२००८,क्र.आरईई२८५३/२००७-२००८/(९३४७) प्रशा-१,दि.२८.३.२००८, क्र.आरईई २८५३/२००७-२००८/ (९३४७)/ प्रशासन-१ दि.३१.३.२००८ क्र.आरईई २८५१/२००७-

२००८/ (९१७७)/ प्रशासन-१ दि.२८.३.२००८ वक्र.आरईई २८५१/२००७-२००८/(९१७७) प्रशासन-१ दि.३१.३.२००८ अन्वये परत करण्यात आली. या तीनही लेखाशीर्षकाखाली महालेखापालांनी नोंदविल्याप्रमाणे रूपये २०,२४,७१,८९,०००/- (दत्तमत) रूपये ८२,६९,०२,०००/- (भारीत) एवढा प्रत्यक्ष खर्च झाली असून रू.४,३३,३५,०००/- (दत्तमत) व १६,४४,१७,००/- (भारीत) एवढी बचत झाली आहे. या तीनही लेखाशीर्षाखाली झालेल्या उपशीर्षनिहाय बचतीची कारणे खाली दिली आहेत. विनियोजनातील बचत पुढील शीर्षकाखाली झाली:-

(रूपये लाखात)

४.४ प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
२८५२, उद्योग				
८०, सर्वसाधारण				
७९७ राखीव निधी व ठेव खात्याकडे/कडून हस्तांतरण				
७९७ (००)(०१) विशेष जैव-तंत्रज्ञान विकास निधीस हस्तातंरण				
मुळ	९८३.००	----	---	---
पुनर्विनियोजन	(-) ९८३.००			

राज्य शासनाने निधी लेखा बंद करण्याचा निणर्य घेतल्यामुळे मार्च,२००८ मध्ये रूपये ९८३ लाखांचा निधी परत केला.

४.५ ज्ञापन

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहे.

मागणी क्र.के-७,

मुख्य लेखाशिर्ष २८५२ उद्योग, ८० सर्वसाधारण, ७९७ राखीव विधी व ठेव खात्याकडे हस्तांतर ७९७ (००)(०१) विशेष जैव तंत्रज्ञान विकास निधीकडे हस्तांतर. या लेखाशिर्षाखाली रूपये ९८३.०० लक्ष इतकी अंतिम तरतूद केली होती. वित्त विभागाने राज्य राखीव विधी रद्द केल्यामुळे मार्च,२००८ मध्ये रु.९८३.०० लक्ष इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

(रूपये लाखात)

४.६ प्रधान शिर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
२५८३, अलोह खनिकर्म व धातुविषयक उद्योग				
०२, खाणीचे विनियमन व विकास				
७९७, राखीव निधी व ठेव खात्याकडे/कडून हस्तांतरण				
७९७ (०१) (०१) खनिकर्म विकास निधीस हस्तांतरण				
मुळ	८५,४३.००	७८,८२.३३	७८,८२.३३	---
पुनर्विनियोजन	(-) ६,६१.१७			

वित्त विभागाच्या सुधारित अंदाजानुसार मान्य केलेल्या निधीपैकी मार्च २००८ मध्ये रू.६६१.१७ लाख रूपये प्रत्यार्पित करण्यात आले.

२) महाराष्ट्र खनिज विकास निधी- महाराष्ट्र राज्यातील खाणकामांचे समन्वेषण व खनिकर्म विकासासाठी महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व वापर) अधिनियम, २००१ अंतर्गत महाराष्ट्र खनिज विकास निधी स्थापन करण्यात आला.

एकूण खनिज महसूलाच्या दहा टक्के रक्कम (प्रधान शिर्ष ०८५३ अलोह खनिकर्म व धातुविषयक उद्योग) चालू वित्तीय वर्षाची वसुली अंशदान म्हणून निधीकडे हस्तांतरित करण्यात येईल. या अनुदानाच्या नावे निधीचे अंशदान देण्यात येईल.

२००७-२००८ या वर्षामध्ये रुपये ७८,८२.३३ लाख इतकी रककम निधीमध्ये जमा केली होती. या वर्षाचे लेखे समाप्त करण्यापूर्वी झालेला खर्च सुरुवातीला या अनुदानाच्या नावे जमा केला होता आणि नंतर निधीमध्ये हस्तांतरित करण्यात आला होता.

लेख्यांच्या वर्षाच्या अखेरीस निधीकडे रुपये ७८,८२.३३ लाख एवढी रक्कम हस्तांतरित करण्यात आली, मार्च, २००८ च्या अखेरीस निधीतील शिल्लक रक्कम रुपये २,८८,९६.०५ लाख इतकी होती.

४.७ ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहे.

महाराष्ट्र खनिज विकास निधीची निर्मिती महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ अन्वये करण्यात आलेली आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार मागील आर्थिक प्राप्त होणाऱ्या एकूण खनिज महसूलाच्या १०% रक्कम राज्याच्या एकत्रित निधी मधून खनिज विकास निधीकडे हस्तांतरित करण्यात येते. त्यासाठी तेवढ्याच रकमेची तरतूद सदर हस्तांतरणाचा खर्च समायोजित करण्यासाठी या उपशीर्षाखाली करण्यात येते.सदर रकमेचे हस्तांतरण पुस्तकी समायोजनाने करण्यात येते. त्यामुळे या उपशीर्षाखाली प्रत्यक्ष खर्च केला जात नाही. सदर हस्तांतरित केलेली रक्कम खर्च म्हणून दर्शविली जाते.

खनिज विकास निधी मध्ये मार्च २००८ अखेरीस हस्तांतरित केलेले रू. ७८८२.३३ लक्ष मिळून एकूण रू.३६७७८.३८ लक्ष एवढा निधी शिल्लक होता. त्यापैकी ३१.०३.२००८ पर्यंत विकास कामांसाठी रू. २१३७८.७० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला होता.

साक्ष :

४.८ समितीने दिनांक ३० ऑगस्ट, २०१२ रोजी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालामधील परिच्छेद क्र. के-७ "उद्योग" संदर्भात उद्योग विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सचिवांना अशी माहिती विचारली की, मूळ तरतूद ५८०.५६ लक्ष असताना रु.४४८.४९ एवढ्या रकमेची पूरक मागणी घेण्याची गरज का भासली व सदर पूरक मागणी कोणत्या अधिवेशनात घेण्यात आली ? या संदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अनुदान क्रमांक के-७ अंतर्गत २८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग, २८५२-उद्योग व २८५३-अलोह व खनिकर्म व धातुविषयक उद्योग, असे ३ प्रधान लेखाशीर्ष आहेत. या तिन्ही प्रधान लेखाशीर्षाअंतर्गत ५८०.५६ लक्ष रुपयांची तरतूद होती. त्या व्यतिरिक्त ४,४८,४८,८५,००० रूपयांची अतिरिक्त पुरवणी मागणी जुलै, २००७ मध्ये झालेल्या अधिवेशनात सादर करण्यात आली होती. लेखाशीर्ष २८५१ यासाठी ४३ लक्ष ६३ हजार रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. त्यानंतर १ कोटी ९४

लाख ५ हजार रुपयांची महागाई भत्ता व अन्य थकबाकीसाठी पुरवणी मागणी जुलै, २००७ च्या अधिवेशनात सादर करण्यात आली होती. २८५२-उद्योग या प्रधान लेखाशीर्षाअंतर्गत भारीत २७ लाख ६४ हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली होती. त्याशिवाय या शीर्षाखाली दत्तमत अंतर्गत ९ कोटी ६३ लाख रुपयांची पुरवणी मागणी जुलै महिन्यातील अधिवेशनात मांडली होती. त्यानंतर डिसेंबर, २००७ च्या अधिवेशनात २८५१ या शीर्षाखाली १ कोटी ५० लाख रुपयांची आणि १० लाख ३० हजार रुपयांची तसेच २८५२ साठी २०० कोटी ६२ लाख रुपयांची आणि मार्च, २००८ मध्ये २३४ कोटी ०५ लाखांची अशी एकूण ४,४८,४८,८५,०००/- रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती.

४.९ पुढे समितीने अशी विचारणा केली की, विभागाच्या ५,८०,५६,३९,०००/- या मूळ तरतुदीमध्ये ४,४८,४८,८५,०००/- ची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती व त्यामधील मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च झाली आहे व रक्कमेची बचतही झालेली आहे. त्यामुळे समितीला हे जाणून घ्यावयाचे आहे की, या सर्व निधीतून कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला आहे ? याबाबत समितीने विभागीय सचिवांना खुलासा करावयास सांगितला असता विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांचा जेवढी थकबाकी होती ती अदा करण्यासाठी हा निधी खर्च करण्यात आला आहे.

४.१० पुरवणी मागणीव्दारे मंजूर झालेल्या रकमेतून देखील काही रकमेची बचत झाली आहे, सदर बचतीची कारणे समितीने विभागीय सचिवांना विचारली असता विभागीय सचिवांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, पुरवणी मागणीव्दारे मंजूर झालेल्या रकमेसह १०,२९,०५,२४,००० रुपयांची तरतूद विभागाला मिळाली होती. त्यापैकी ४ कोटी रुपयांची बचत झाली आहे. याचाच अर्थ, एकूण उपलब्ध निधीपैकी केवळ ४ टक्के रकमेची बचत झाली आहे. विभागाचा मोठा व्याप बघता व एकूण २० ते २५ विविध योजना बघता केवळ ४ टक्के रकमेची बचत तशी जास्त म्हणता येणार नाही. असाही सचिवांनी समितीसमोर युक्तीवाद केला.

४.११ परंतु समितीने याबाबत आक्षेप नोंदवित खर्च केल्यानंतर राहिलेल्या बचतीची टक्केवारी जास्त नसली तरी ही रक्कम कशासाठी वापरण्यात आली, त्या कामांची प्रगती काय आहे, याबाबतचा विभागाने खुलासा करावा. असे सांगितले असता यावर राज्य शासन प्रत्येक ५ वर्षानंतर उद्योग धोरण जाहीर करीत असते. त्याप्रमाणे सन २००६-२००७ मध्ये नवीन उद्योग

धोरण जाहीर केले होते. त्याव्दारे जवळपास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष २२ लाख एवढी रोजगार निर्मिती झाली आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक विकासाचा दर ११.०८ टक्के गाठला आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.१२ समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्यत: कोणत्या उद्योगांमुळे रोजगार निर्मिती झाली व ती कोणत्या भागात झाली ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खूलासा करताना असे सांगितले की, साधारणपणे राज्य सरकारने एकूण ३२४ विशाल प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे. एकूण लोकसंख्येंच्या प्रमाणात राज्याची लोकसंख्या ९.४ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात विदेशी गुंतवणूक जवळपास ३२ ते ३४ टक्के झाली आहे. एकूण देशाच्या लोकसंख्येशी तुलना करता राज्याची लोकसंख्या १/१० गृहित धरली तर १/३ विदेशी कंपन्यांनी आपल्या राज्यात गुंतवणूक केली आहे.

४.१३ विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने नजीकच्या काळात महाराष्ट्रात झालेली विदेशी गुंतवणूक कोणत्या भागात झाली, कोणते विशाल प्रकल्प राज्यात पूर्ण झाले आहेत ? याची अधिक माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, साधारणपणे ३२ ते ३४ टक्के विदेशी गुंतवणूक राज्यात झाली आहे. या टक्केवारीमध्ये दिव-दमण येथे झालेल्या गुंतवणुकीचाही समावेश केलेला आहे. तथापि, तेथील गुंतवणूक १ ते २ टक्के असल्यामुळे टक्केवारीत मोठा फरक पडत नाही.

४.१४ विभागीय सचिवांनी प्रोत्साहनाचा उल्लेख विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये केला आहे. हे लक्षात घेता एकूण इन्सेंटिव्ह किती देण्यात आला आहे ? अशी समितीने विचारणा केली असता मागील शिल्लक राहिलेली रक्कम धरुन साधारणपणे ८०० कोटी रुपयांची प्रोत्सहनात्मक रक्कम देण्यात आला आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.१५ महाराष्ट्राची औद्योगिक क्षेत्रातील स्थिती बघितली तर अनेक जिल्ह्यांमध्ये छोटे छोटे उद्योग बंद पडले आहेत. त्यामुळे जिल्हानिहाय माहिती समितीला देण्यात यावी अशी सूचना समितीने विभागीय सचिवांना केली असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र राज्याचे ६ विभाग करण्यात आले आहेत. विशाल प्रकल्पांची स्थिती बघितली तर कोकण विभागात ४४ टक्के, पुणे विभागात २४ टक्के, नागपूर

विभागात २१ टक्के, नाशिक विभागात ४ टक्के, औरंगाबाद विभागात ३ टक्के व अमरावती विभागात ५ टक्के विशाल प्रकल्प आहेत.

४.१६ मध्यम, सुक्ष्म व लघु उद्योगांचा विचार केला तर कोकण विभागात ८ टक्के, पुणे विभागात १९ टक्के, नाशिक विभागात ४४ टक्के, औरंगाबाद विभागात २३ टक्के, अमरावती विभागात २ टक्के आणि नागपूर विभागात ४ टक्के, अशी उद्योगांची टक्केवारी विभागीय सचिवांनी समितीसमोर सादर केली.

४.१७ मराठवाडा आणि विदर्भातील विशाल प्रकल्पांची टक्केवारी ३ आणि ५ टक्के आहे. तर मध्यम, सुक्ष्म आणि लघु उद्योगांची टक्केवारी २३ व ५ टक्के आहे. त्याअनुषंगाने मराठवाडा व विदर्भात उद्योग उभारण्याबाबत उद्योजकांकडूनच कमी प्रस्ताव प्राप्त झाले काय ? याबाबत सविस्तर खुलासा समितीसमोर करावा असे समितीने सांगितले असता यावर विदर्भ आणि मराठवाड्याची टक्केवारी कमी आहे, विभागीय सचिवांनी मान्य केले परंतु, आज औद्योगिक क्षेत्रातील स्पर्धा लक्षात घेतली तर उद्योजकांकडून अतिशय बारकाईने सर्व गोष्टींचे विश्लेषण करण्यात येत असते आणि ज्या ठिकाणी सर्वाधिक सुविधा, प्रोत्साहन दिले जाते, त्या ठिकाणी उद्योग उभारण्याकडे त्यांचा कल असतो. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.१८ विभागाने सांगितलेला उद्योजकांचा कल विशाल प्रकल्पासाठी लागू पडतो. परंतु, त्या त्या भागातील छोटे छोटे उद्योजक राज्यात उद्योग उभारतात. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाकडून अन्य सुविधा दिल्या जातात. त्याअनुषंगाने समितीने असे विचारले की, उद्योजकांकडूनच प्रस्ताव सादर झाले नाहीत की, विभाग त्यांना सुविधा देण्यामध्ये कमी पडले आहे ? विभागाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे का ? तसेच राज्य सरकारने एसईझेडसाठी राज्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. अशा किती जमिनींवर उद्योग उभारले गेले आहेत ? याबाबत मात्र विभागीय सचिवांना माहिती समितीला देता आली नाही.

४.१९ प्रत्येक जिल्ह्यांमध्ये एमआयडीसी स्थापन करण्यात आली आहे. त्यामागे शासनाची अशी भूमिका आहे की, स्थानिक उद्योजक पुढे आले पाहिजेत, त्यांनी उद्योग उभारले पाहिजेत व स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. परंतु, आज अशी स्थिती आहे की, अनेक जिल्ह्यातील एमआयडीसी ओस पडल्या आहेत. उद्योग येण्याची शक्यता नाही,

अशा ठिकाणी लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव एमआयडीसी उभारल्या गेल्या असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणवर पायाभूत सुविधांसाठी खर्च करण्यात आला आहे. परंतु, एवढा खर्च केल्यानंतर उद्योग उभे राहू शकले नाहीत. एवढेच नाही तर ओस पडलेल्या एमआयडीसींचे प्रमाण जास्त आहे. पायाभूत सुविधांवर केलेला खर्च शेवटी शासनाकडून करण्यात आला आहे. असे असताना जर उद्योग आले नसतील तर त्याची जबाबदारी कोणाची आहे ? त्यामुळे या संदर्भातील उद्योग विभागाची भूमिका समितीला स्पष्ट करावी.

४.२० तसेच समितीने सचिवांच्या असे सांगितले की, निदर्शनास आणून दिले व्यवसाय आल्यानंतर तो लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणारा असला पाहिजे. त्याठिकाणी हाय प्रोफाईल टेक्नॉलॉजी असता कामा नये. औरंगाबादमध्ये स्कोडा कंपनीचा उद्योग आणण्यासाठी सर्व पक्षांनी आग्रही मागणी केली परंतु प्रत्यक्षात मात्र त्या ठिकाणी स्कोडा कंपनीने केवळ ३०० लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला. त्यामध्ये स्थानिक कामगार केवळ ८० इतकेच होते व उर्वरित लोक बाहेरुन आणले. त्यामुळे मराठवाड्याला रोजगार निर्मितीच्या दृष्टीने काही फायदा झाला नाही. त्यावेळी स्कोडा उद्योग आल्यामुळे मराठवाड्यामध्ये क्रांती घडून येईल असा प्रचार करण्यात आला होता. परंतु आज तेथे जी एम.आय.डी.सी. निर्माण केली आहे ती रिकामी आहे. परभणी येथील एम.आय.डी.सी.मध्ये बंगले बांधले ही परिस्थिती आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये एवढी गुंतवणूक आली असे सांगण्यात आले. कलकत्ता, मद्रास, तामिळनाडू, मुंबई आणि ओखा येथे गुंतवणूक होते कारण तेथे बंदर जवळ आहे. दिल्ली-मुंबई इंडस्ट्री कॅरिडोर प्रकल्प उभारला जात आहे त्या ठिकाणी कामगारांची टक्केवारी अतिशय कमी असणार आहे. येथील स्थानिक लोकांना रोजगार मिळणार नाही अशी स्थिती असेल तर मग येथे उद्योग कशासाठी आणावयाचे अशी पृच्छा समितीने एम.आय.डी.सी.स्थापन करण्यासाठी कोणते निकष आहेत? अशी समितीने विचारणा केली असता याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कोणत्याही ठिकाणी एम.आय.डी.सी. किंवा औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची गरज भासली तर शासन प्रामुख्याने ३-४ गोष्टींचा अभ्यास करते. हा अभ्यास करण्यासाठी एक समिती आहे. त्यामध्ये नियोजन विभागाचे अधिकारी आणि इतर अधिकारी असून ते वेगवेगळया ठिकाणी जाऊन जागेच्या बाबतीत तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करतात.अशा वेळी मुख्यतः तेथे पाणी उपलब्ध असले पाहिजे. तसेच इंजिनिअरींग सेक्टर,

केमिकल सेक्टर, बायो टेक्नोलॉजी सेक्टर इ.पैकी कोणत्या सेक्टरसाठी तो भाग उपयुक्त ठरेल याचा अभ्यास केला जातो. त्याठिकाणी पाणी, वीज उपलब्ध होऊ शकेल की नाही हे पाहिले जाते. तसेच एम.एस.ई.बी. बरोबर संपर्क साधून येथे वीज पुरवठा करण्यासाठी अडचण येईल काय याबाबत अभ्यास केला जातो. समितीने सांगितले त्या प्रमाणे जर तेथे जवळपास बंदर नसेल तर विदर्भ आणि मराठवाड्यात कोणत्या प्रकारच्या उ्द्योगांना पोटेन्शिअल उपलब्ध होईल याचा अभ्यास केल्यानंतर निवड समिती याबाबत अहवाल देते. त्यावर एम.आय.डी.सी.च्या मुख्य कार्यालयामध्ये विस्तृत चर्चा केल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जातो. काही एमआयडीसी भागामध्ये वापरात नसलेले भूखंड आहेत.

४.२१ पैठणची एम.आय.डी.सी.ची जागा शेतकऱ्यांना परत द्यावी असे सांगण्यात आले आहे. जिंतूर येथे एकही उद्योग सुरु झालेला नाही. आता तेथे ढाबे सुरु केले आहेत. लातूरला १५ दिवसातून एकदा पाणी येते. तेथे १ लाख, २ लाख, ३ लाख रुपये खर्च करुन एम.आय.डी.सी.तयार केली आहे पण तेथे पाणी नाही, विजेचा प्रश्न आहे. ही ठिकाणे कोणत्याही निकषामध्ये बसत नसली तरी देखील तेथे एम.आय.डी.सी. झाली आहे. जिंतूर येथे बाहेरुन मुलांना बोलवावे लागत आहे. आता तेथील लोकांनी शेती व्यवसाय सुरु केला आहे. याठिकाणी एम.आय.डी.सी. निर्माण करुन जनतेच्या पैशाचा अपव्यय केलेला असून याची जबाबदारी कोण घेणार आहे ? औरंगाबाद, वाळूंज येथे असेच झालेले आहे तसेच शेंद्रा येथे देखील तसेच झालेले आहे. जर तेथे कोणी नवीन उद्योग सुरु करावयाचे ठरविले तर जमीन मिळत नाही. एम.आय.डी.सी.च्या प्लॉट वाटपामध्ये देखील दलाल आहेत. त्यांच्या मार्फत प्रयत्न केला तर प्लॉट मिळतो. वैधरित्या प्रयत्न केले तर काही मिळत नाही. आता ऑन लाईन सिस्टीम आहे. परंतु बऱ्याच वेळा ती साईट बंद असते, पण दलालांना जेव्हा पाहिजे तेव्हा साईट ओपन असते आणि इतर वेळी ती बंद असते. दलालांनी सांगितले तरच प्रस्ताव मान्य होतो, नाहीतर होत नाही आणि याबाबत उघडपणे सांगितले जाते. यासंदर्भात समितीने विभागाला गांभिर्याने उपाययोजना करावयाच्या सूचना दिल्या. याबाबतीत विभागीय सचिवांनी अधिक खूलासा करताना असे सांगितले की, शेंद्रा, वाळूंज येथे एकही जागा शिल्लक नाही. काही ठिकाणी जागा उपलब्ध आहेत पण काही ठिकाणी नाहीत.

४.२२ शासनाने धोरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल केला आहे. सुरुवातीला विभाग जागा देत होते. त्यानुार एक एकर जागेमध्ये जेवढा एफ.एस.आय.येतो त्याच्या १० टक्के एफ.एस.आय.चा वापर करुन इमारतीचे बांधकाम केले तर तो प्लॉट व्यापारी तत्वावर दिला असे गृहीत धरले जात होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता समितीने त्याठिकाणी काम पूर्ण न करता ते झाले आहे असे गृहीत धरले जात होते असे सांगितले असता यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, त्यावेळी तसे धोरण होते. मोठ्या जागा घेतल्यानंतर त्यातील १० टक्के जागेचा वापर केल्यानंतरही जागा रिकामी आहे असे दिसत असले तरी तेथे बांधकाम करण्यासारखी स्थिती नव्हती. त्यामुळे १० टक्क्यावरुन २० टक्क्यापर्यंत सदरहू धोरणामध्ये बदल करण्यात आला. जोपर्यंत २० टक्के जागेवर बांधकाम करुन बी.सी.सी.घेऊन सदरहू युनिट प्रॉडक्शन सुरु करीत नाही तोपर्यंत त्यांना मान्यता दिली जात नाही. पूर्वी उद्योजक ९० टक्के बांधकाम करुन मोकळे होत असत. पण आता तसे होत नाही. त्याठिकाणी जागेचा वापर करण्यासाठी मुदत देण्यात येते. जर त्या कालावधीमध्ये वापर केला नाही तर संबंधितांना नोटीस देऊन एक-दोन वेळा संधी दिली जाते. परंतु त्यानंतरही जागेचा वापर केला नाही तर ती जागा परत घेण्यात येते. याबाबतीत मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी समितीला माहिती देताना सांगितले.

४.३२ पुढे समितीने काही ठिकाणी एम.आय.डी.सी.जाहीर करण्यात आल्या. पण तेथे पाच वर्षामध्ये पायाभुत सुविधा निर्माण करण्यात आल्या नाहीत त्यामुळे जमिनीचे संपादन कसे होणार अशी विचारणा केल असता सचिवांनी समितीला सांगितले ? राज्यात २३३ एम.आय.डी.सी.आहेत. त्यापैकी एक-दोन ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यामध्ये कमतरता असू शकेल. परंतु संपूर्ण देशात महाराष्ट्रामध्ये एमआयडीसीचे चांगले काम झालेले आहे. केंद्र शासनाने देखील औद्योगिकीकरणामध्ये अतिशय चांगले काम केले आहे. असे विभागीय सचिवांनी माहिती दिली.

४.२४ **"You are known as kaleidoscope of industries"** समितीने असा विचारला प्रश्न की, याठिकाणी जर धोरण चुकीचे झाले असेल तर पैठण येथे गेली २५ वर्षे एम.आय.डी.सी.ची जागा रिक्त आहे.नांदेड येथे देखील एम.आय.डी.सी.ची जागा रिक्त आहे. कै.विलासराव देशमुख होते तोपर्यंत लातूर येथील एम.आय.डी.सी.ला उद्योजकांकडून मागणी

होती. विभाग पायाभुत सूविधांकरिता करोडो रुपये खर्च करते मग एम.आय.डी.सी.मध्ये उद्योग येवोत की न येवोत याचा विचार करीत नाही. पैठण येथील एम.आय.डी.सी.मध्ये एकही उद्योग आले नाहीत. एका कंपनीच्या व्यवस्थापकाचा मृत्यू झाला. त्यामुळे तेथे कोणतीही इंडस्ट्री येत नाही. अशा वेळी विभाग काय करणार आहे? काही ठिकाणी बेकायदेशीर इंडस्ट्री निर्माण झाल्या असून त्यांची वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनीवर एम.आय.डी.सी. सुरु करण्यात आली नसेल तर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत द्यावयास पाहिजेत. त्याच प्रमाणे एखाद्या उद्योजकांनी त्याला मिळालेल्या एम.आय.डी.सी.तील प्लॉटचा एफ.एस.आय. वापरला नसेल तर त्याला नोटीस देऊन तो प्लॉट परत घेतला पाहिजे. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

४.२५ नाशिक येथे इंडस्ट्री सुरु झाली पण ती नंतर बंद पडली. सदरहू जमीन खाजगी मालकाने विकत घेऊन आता तेथे तो हॉटेल विकसित करीत आहे. ज्यावेळी एखादा उद्योग बंद पडतो तेव्हा सदरहू जमीन कायदेशीररित्या परत घेऊ शकतो. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. मग खाजगी विकासक चढ्या किंमतीने संबंधितांना धमकावून जमीन विकतात. त्यामुळे तेथे गुंडांच्या टोळ्या निर्माण होतात. याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य करून पुढे अशी माहिती दिली की, एम.आय.डी.सी.च्या जागेचा वापर करण्याच्या बाबतीत जे धोरण आहे त्यामध्ये विकास नियंत्रण नियमावली नुसार तेथे १० टक्के मोकळी जागा ठेवावयास पाहिजे. याशिवाय काही टक्के जागा निवासासाठी देखील राखून ठेवावयास पाहिजे.

४.२६ समितीने अंबड येथील एम.आय.डी.सी. संदर्भात माहिती विचारली असता, विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, त्याठिकाणी दोन एम.आय.डी.सी. असून त्या संपूर्णपणे ऑक्युपाईड झालेल्या आहेत. त्याठिकाणी एवढा जास्त विकास झालेला आहे की, ती एम.आय.डी.सी.आता शहरामध्येच आलेली आहे. तसेच जळगाव, पिंपरी-चिंचवड आणि चिखलदरामध्येही झाले आहे.

४.२७ दिल्ली-मुंबई कॉरिडॉर संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांया कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली होती. १९ लाख ९५ हजार प्रति एकर बिल्डरला देणार आहोत. याबाबत काय प्रगती

झालेली आहे ? अशी विचारणा समितीने विभागीय सचिवांना केली असता विभागीय सचिवांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, दिल्ली, मुंबई कॅरिडॉर हा राज्यासाठी आणि देशासाठी एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. राज्य आणि देशाकरता जपानबरोबर सामंजस्य करार करुन सहा राज्यात एम.आय.डी.सी. प्रकल्प आणला जात आहे. तसेच इतर राज्यांमध्ये मेगा सिटी स्थापन होत आहे. परंतु या प्रकल्पासंदर्भात काही ठिकाणी विरोध होत आहे. परंतु एक गोष्ट चांगली आहे की, राज्या साठी दोन मेगासिटी मान्य करण्यात आल्या आहेत आणि त्या औरंगाबाद आणि रायगड जिल्ह्यामध्ये स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासाठी अंमलबजावणीचा पहिला टप्पा म्हणजे जागा संपादन करुन ती अधिसूचित करणे. तसेच जागा घेतल्यानंतर त्याबाबत बृहत योजना (मास्टर प्लान) तयार करावा लागणार आहे.

४.२८ दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर धुळे, गुजरात की औरंगाबाद या विभागातून जाणार आहे का? तसेच सेन्द्रे मध्ये प्लॉट निकामी दिसतात, परंतु प्रत्यक्षात मागितले तर ते मिळत नाहीत, हे खरे आहे का? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, यामध्ये दोन प्रकल्प आहेत. पहिला प्रकल्प डिडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा माल वाहतुकीसाठी मुंबई ते दिल्ली तयार करण्यात येत आहे. या फ्रेट कॉरिडॉरच्या बाजूस दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर तयार केला जाणार आहे. जळगाव, धुळे आणि नाशिक येथे डीएमआयसी चे प्रकल्प सुरु करणार आहोत. मालाची वाहतूक करण्यासाठी फ्रेट कॉरिडॉर रेल्वे मंत्रालय तयार करीत आहोत. या वर्षात दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पामध्ये नवीन औद्योगिक वसाहत, स्मार्ट सिटी आणि पॉवर प्लॉन्ट असे प्रकल्प हाती घेतले आहेत. डीएमआयसी च्या प्रकल्पातंर्गत मेगा सिटी प्रकल्प करण्याचे प्रस्तावित आहे. सेन्द्रा, नाशिक मालेगाव आणि धुळे येथे अंमलबजावणीचे काम सुरु आहे. धुळे जिल्ह्यात जागेची निवड झाली असून मास्टर प्लॉन तयार झाला आहे. सेन्द्राच्या जवळपास पहिल्या टप्प्यात एक तृत्यांश वीज प्रकल्पांसाठी जमिनीचे भूसंपादन झाले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार जमीन खरेदी करता येते. रायगड तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील धारवाड येथे मास्टर प्लॉन पूर्ण करुन त्याची अंमलबजावणी करणे, तेथे पाणी तसेच इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

४.२९ औरंगाबाद येथील एम.आय.डी.सी. मध्ये पाणी पुरवठा संदर्भात विचारले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, त्याठिकाणी जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

४.३० मराठवाडा विभागासाठी हजीरा गॅस पाईप लाईन मंजूर झालेली आहे. सदर गॅस पाईप लाईन आता बदलली असून बुलढाण्याला येत आहे. या संदर्भात समितीची अशी सूचना आहे की, ती पाईपलाईन बुलढाण्याहून मराठवाड्याला आणली तर बरे होईल. ती लाईन आता बुलढाण्याहून पुढे चाललेली आहे. याबाबत नव्याने औद्योगिक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल कारण हे रोजगार निर्मितीचे उद्योग आहेत.

४.३१ महाराष्ट्र खनिज विकास निधीतून २१३ कोटी रुपये कोणत्या विकास कामांसाठी खर्च करण्यात येतील यासंदर्भात विभागाने तपशीलवार माहिती समितीला सादर करावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, खनिज विकास निधीसंदर्भात महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ संमत करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील तरतूदीनुसार माननीय मुख्यमंत्री महोदय हे सल्लागार समितीचे अध्यक्ष आहेत. दिनांक ३१ मार्च २००८ पर्यंत २१४. .३३ कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली आहे. यातून ८० टक्के रक्कम रस्तेविकास कामासाठी, १२ टक्के रक्कम पाणी पुरवठ्यासाठी आणि ५ टक्के रक्क्म आरोग्य संदर्भात उपायोजना करण्यासाठी तसेच पायाभूत सुविधांसाठी आणि एक कोटी रुपये पर्यावरणासाठी दिले आहेत. आता नुकतीच यामध्ये सुधारणा करुन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नवीन धोरण तयार केले आहे.

४.३२ महाराष्ट्र राज्याने इतर राज्याप्रमाणे गुंतवणुकीसंदर्भात वृत्तपत्रामधून जाहिरात प्रसिध्द का करत नाही असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात अधिक माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये अधिक प्रमाणामध्ये गुंतवणूक होत असते. विभागाकडून जाहिरात केली जात नाही परंतु Action speaks more than words. जवळपास ३० टक्केपेक्षा जास्त विदेशी गुंतवणुक आपल्या महाराष्ट्रात होत असते त्याचप्रमाणे २६ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असते. महाराष्ट्र सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक पाया अतिशय मोठा आहे. एमआयडीसी मधील गुंतवणुकीच्या आकडेवारीनुसार जवळपास सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र राज्य फार पुढे आहे. ब-याचवेळा असे सांगितले जाते की,

इतर राज्यांचा उदा. छत्तीसगड, बिहार या राज्यांचा वाढीचा दर महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्या राज्याचा औद्योगिक पाया मोठा असल्यामुळे वाढीचा दर आकडेवारीनुसार कमी दिसत असला तरी देखील आपला व्हॅल्यूम जास्त आहे. In terms of absolute investment, Maharashtra is one of the best destination for industries. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.३३ पुढे समितीने अधिक माहिती जाणून घेताना विभागीय सचिवांना असे विचारले की, खनिकर्म उपक्रमातून किती स्वामित्वधन महाराष्ट्र राज्यातून मिळते. या निधीचा विनियोग कसा कशा प्रकारे केला जाणार ? असे विचारले असता महाराष्ट्र राज्याला जवळपास १८०० कोटी रुपये स्वामित्वधनाच्या माध्यमातून प्राप्त होतात. स्वामित्वधनासाठी खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम अन्वये रॉयल्टीचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केला जातो.असे विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.३४ ज्या विभागातून स्वामित्वधन मिळते, त्या विभागाच्या विकासाकरीता हा निधी उपयोगात आणला जातो काय ? अशी विचारणा केली असता दहा टक्के निधीतील एक तृतीयांश रक्कम ही एमआयडीसी विभागात पायाभूत सुविधांसाठी वापरली जाते. यातील ५० टक्के निधी ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिली जाते आणि उर्वरित ५० टक्केच्या ६.७ टक्के रक्कम रस्ते विकास, पर्यावरण, पाणी पुरवठा इत्यादी कामांसाठी खर्च केला जातो. तसेच खनिज विकास निधीची एक सल्लागार समिती असून त्याचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आणि खनिकर्म विभागाचे राज्य आणि कॅबिनेट मंत्री यांचा समावेश आहे. नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ आणि भंडारा या चार जिल्ह्यात संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री महोदयांचा समितीमध्ये समावेश आहे. २५ किलोमीटर्सच्या बाहेर स्वामित्वधनाचा निधी वापरता येत नाही. अशी माहिती समितीला विभागीय सचिवांनी सादर केली.

अभिप्राय व शिफारशी :-

४.३५ महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रस्ते, पाणी, वीजपुरवठा व उद्योजकांसाठी इतर अंतर्गत सेवा यासारख्या अत्यावश्यक पायाभूत सोई युक्त अशा औद्योगिक वसाहती प्रत्येक जिल्ह्यात विकसित केल्या आहेत. परंतु, एखाद्या

ठिकाणी औद्योगिक वसाहत विकसित केल्यावर त्या वसाहतीस आवश्यक असणारा वीजपुरवठा, पाणीपुरवठा, दळणवळण व्यवस्था इत्यादी सोईसुविधा व्यवस्थितपणे पुरविण्यात येण्याबाबत काही वर्षांनी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे या सुविधांच्या अभावी ब-याच ठिकाणी उद्योगधंदे बंद पडले असून त्या वसाहती ओस पडत चालल्या आहे. **त्यामुळे औरंगाबाद, नागपूर, अमरावती या विभागातील औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेल्या वसाहतींना वीज व पाणी पुरवठा तसेच दळणवळणाची सोय भविष्यकाळात योग्यरित्या देण्यात येईल, यादृष्टीने शासनाने विशेष लक्ष दर्शविले व याकरिता शासनाने महाराष्ट्र औद्योगिक महामंडळास सर्वोतोपरी सहाय्य करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

४.३६ एखाद्या विभागात औद्योगिक वसाहतीचा विकास करताना स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यांचा विकास करण्यात येतो. त्यामुळे शेतकरी प्रकल्पबाधीत होऊन त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो. या औद्योगिक वसाहतींमध्ये येणारे उद्योग हे रोजगार निर्मिती करणारे असावे तसेच यामध्ये या उद्योगांमध्ये स्थानिक व विशेषत: प्रकल्पबाधीत लोकांना रोजगार उपलब्ध होईल, यादृष्टीने सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे. **त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतींमध्ये उद्योग स्थापित करणा-या कंपन्या या रोजगार निर्मितीक्षम असतील व त्यात स्थानिकांना प्राथम्यक्रमाने रोजगार उपलब्ध होईल यादृष्टीने धोरणात सुधारणा कराव्या व त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी होईल याकरिता शासनाने दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

४.३७ पैठण, नांदेड, लातूर, नाशिक इत्यादी ठिकाणी औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती आहेत. परंतु, त्यातील ब-याचश्या ठिकाणचे भूखंड हे विकासीत करून विनावापरामुळे पडून असून त्यांचा कोणताही वापर होत नाही. या औद्योगिक वसाहती सुरु करताना शेतक-यांच्या जमिनीचे संपादन केले असल्यामुळे ज्या प्रयोजनाकरिता त्या जमिनीचे संपादन केले आहे ते उद्दिष्ट सफल होत नसल्यास ज्या शेतक-यांकडून जमिनी संपादित केलेल्या आहेत त्या शेतक-यांना या जमिनी परत केल्या पाहिजे असे समितीचे मत आहे. **त्यानुषंगाने ज्या औद्योगिक वसाहतींमधील भूखंड विनावापर पडून आहेत ते भूखंड संबंधित शेतक-यांना परत करण्याबाबत शासनाने साकल्याने विचार करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

४.३८ केंद्र शासनाकडून मुंबई ते दिल्ली असा डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा मालवाहतुकीसाठी प्रकल्प राबविण्यात येत आहे तसेच याच प्रकल्पाच्या अनुषंगाने दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर तयार करण्यात येत आहे. मालाची वाहतुक करण्यासाठी फ्रेट कॉरिडॉर रेल्वे मंत्रालयातर्फे तयार करण्यात येत आहे. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरमध्ये नवीन औद्योगिक वसाहती, स्मार्ट सिटी, पॉवर प्लँट असे प्रकल्प हाती घेतले आहेत तसेच डिएमआयसीच्या प्रकल्पांतर्गत मेगा सिटी प्रकल्प उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. **सेंद्रा, नाशिक, मालेगाव आणि धुळे येथे अंमलबजावणीचे काम सुरु आहे अशी माहिती समितीस प्राप्त झाली. फ्रेट कॉरिडॉर व इंडस्ट्रियल कॉरिडॉर या प्रकल्पांमुळे सेंद्रा, नाशिक, मालेगाव आणि धुळे या भागांचा औद्योगिकदृष्ट्या विकास होणार असल्यामुळे केंद्र शासनाकडे या योजनासंदर्भात पाठपुरावा करावा अशी समितीची शिफारस आहे.**

४.३९ राज्यात उत्पादनक्षम खनिज असणारे क्षेत्र सुमारे ५८ हजार चौरस कि.मी. इतके आहे. सदरहू क्षेत्र हे भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ, कोल्हापूर, सातारा, रायगड, सिधुदूर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहे. **खनीकर्म या उपक्रमातून राज्याला वर्षाला जवळपास १८ कोटी इतकी रक्कम स्वामीत्व धनाच्या रुपात प्राप्त होत असते. सदरहू रक्कम ज्या विभागांतून खनीकर्म उत्पादन केले जाते त्या विभागांच्या विकासाकरिताच वापरण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

४.४० शासनाने एमआयडीसीच्या उभारणीसाठी गुंतविलेली रक्कम व त्याठिकाणी यानिमित्ताने शासनाने राज्यात जिल्हानिहाय उपलब्ध करून दिलेल्या पायाभूत सुविधा व त्यासाठी झालेला खर्च विचारात घेता निर्माण केलेल्या एमआयडीसीच्या संदर्भात राज्यस्तरावर एक समिती नेमून राज्यातील एमआयडीसीच्या कामकाजाची व त्याठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिलेल्या असतानाही त्या ठिकाणी उद्योग धंद्याची वाढ न होण्याची कारणे, बंद पडलेल्या एमआयडीसी, प्लॉटचे हस्तातंरणातात झालेल्या गैरव्यवहार दलालामार्फत बेकायदेशीररित्या प्लॉटची होणारी विक्री बंद पडलेल्या अथवा उद्योग व्यवसाय सुरुच न झालेल्या एमआयडीसीच्या जागा इत्यादी बाबतची माहिती घ्यावी व या संदर्भात शासन स्तरावर ठोस निर्णय घेण्याचे दृष्टीने विनाविलंब कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. नवीन उद्योग उभारणीसाठी ज्यांनी प्लॉट मिळण्यासाठी अर्ज केला आहे अशा अर्जदारांना

शासनाकडून कोणतेही उत्तर वर्षानुवर्षे मिळत नाही त्यामुळे नवीन उद्योग सुरु करण्याच्या अगोदर उद्योजक नाउमेद होतात. अशा प्रकरणाचा तातडीने निपटारा करण्यासाठी यावर मुदत मर्यादा घालणे आवश्यक आहे अशी समितीची शिफारस आहे.

ऊर्जा विभाग

५ राज्यातील वीज निर्मितीसाठी इतर प्रकल्प राबविणे

५.१ भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात **अनुदान क्र. के-११ "ऊर्जेवरील भांडवली खर्च (दत्तमत)" मधील प्रधान लेखाशीर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च व ६८०१ वीज प्रकल्पांना कर्जे** या शिर्षाखाली बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपला अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र. के - ११ ऊर्जेवरील भांडवली खर्च (दत्तमत)

(रुपये हजारात)

५.२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
४८०१, वीज प्रकल्पांवरील भांडवली खर्च ६८०१, वीज प्रकल्पांना कर्जे मूळ ९,०३,८५,२६ पूरक २५,०२	९,०४,१०,२८	२,५९,७०,५८	(-) ६,४४,३९,७०
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८)			५,४२,७८,७२

टिपा व भाष्ये :

मूळ तरतूदी इतका देखील खर्च झाला नाही. त्यामुळे माच, २००७ मध्ये प्राप्त झालेले रुपये २५.०२ लाखाची पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले असून, लाक्षणिक मागणी म्हणून निर्बंधित करता आली असती.

५.३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात उपशिर्ष निहाय माहिती सोबत जोडण्यात येत आहे असे कळविले आहे.

अनुदानाअंतर्गत बचत पूढील शिर्षाअंतर्गत झाली.

(रुपये लाखांत)

५.४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च, ०२ औष्णिक वीज निर्मिती ८०० इतर खर्च, ८००(०१)(०२) खापरखेडा विस्तार युनिट मध्ये भांडवली गुंतवणूक मूळ २,१३,०२.०० पुनर्विनियोजन (-) १,८३,०२.००	३०,००.००	३०,००.००	----

५.५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई यांनी वित्तीय वर्ष सन २००७-२००८ साठी मागणी के-११, मुख्य लेखाशिर्ष ४८०१ खाली एकूण ५४,२००.०० लाखांचा निधी वीज निर्मिती कंपनीकडून भाग भांडवलासाठी कमी मागणी आल्यामुळे परत करण्यात आली असा आक्षेप नोंदविलेला आहे. वित्तीय वर्ष सन २००७-२००८ साठी मुख्य लेखाशिर्ष ४८०१ मध्ये एकूण ४ उपशिर्षांखाली सदर रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली होती. त्याचा अनुक्रमे तपशिल खालील प्रमाणे आहे.

महानिर्मिती कंपनीने असे कळविलेले आहे की, खापरखेडा संच क्र.५ च्या प्रकल्पांच्या कामाचे आदेश जाने-२००७ मध्ये देण्यात आले व नंतर प्रकल्पांचे अंदाजित अर्थसंकल्प बनविण्यात आले. तसेच प्रकल्पाच्या बाष्पक उभारणीसाठी मे. भेलकडून होणारा पुरवठा वर्ष २००७-०८ मध्ये अंदाजे २५ टक्के इतका होता, तथापि प्रकल्पातील महत्वाच्या टप्प्यास ४ महिन्यांचा विलंब झाला. उर्वरित संयंत्राचे आदेश माहे जुलै-२००७ मध्ये देण्यात आले व उपकंत्राटदाराच्या नियुक्तीस विलंब झाल्यामुळे यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्यामध्ये विलंब झाल्याने मागणी कमी करण्यात आली.

(रुपये लाखांत)

५.६ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
०२ औष्णिक वीज निर्मिती ८०० इतर खर्च, ८००(०१)(०४) पारस औष्णिक निर्मिती केंद्राच्या विस्तार योजनेमध्ये भांडवली गुंतवणूक मूळ ७९,७३.०० पुनर्विनियोजन (-) ५९,७३.०० 	२०,००.००	२०,००.००	---

५.७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, याबाबत महानिर्मिती कंपनीने असे कळविलेले आहे की, पारस संच क्रमांक ४ च्या प्रकल्पांच्या कामाचे आदेश माहे ऑगस्ट-२००६ मध्ये देण्यात आले व प्रकल्प ३४ महिन्यात म्हणजेच २००७-०८ मध्ये पुर्ण् होणे अपेक्षित होते. परंतु उर्वरित संयंत्राच्या ३५ कामांचे आदेश देण्यास विलंब झाल्यामुळे संयंत्राच्या यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्यामध्ये विलंब झाला. त्यामुळे मागणी कमी करण्यात आली.

(रुपये लाखांत)

५.८ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
०२ औष्णिक वीज निर्मिती ८०० इतर खर्च, ८००(०१)(०५) भुसावळ औष्णिक निर्मिती केंद्राच्या विस्तार योजनेमध्ये भांडवली गुंतवणूक मूळ ३,१९,५२.०० पुनर्विनियोजन (-) २,३९,५२.०० }	८०,००.००	८०,००.००	----

५.९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, याबाबत महानिर्मिती कंपनीने असे कळविलेले आहे की, भुसावळ संच क्र.४ च्या बाष्पक उभारणीसाठी मे.भेलकडून होणारा पुरवठा वर्ष २००७-०८ मध्ये अंदाजे २५ टक्के इतका होता. तथापी प्रकल्पातील महत्वाचे टप्प्यांस ४ महिन्यांचा विलंब झाला. उर्वरित संयंत्राचे आदेश माहे नोव्हेंबर २००७ मध्ये देण्यात आले व उपकंत्राटदाराच्या नियुक्तीस विलंब झाल्यामुळे यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्यामध्ये विलंब झाल्याने मागणी कमी करण्यात आली.

(रुपये लाखांत)

५.१० प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
०२ औष्णिक वीज निर्मिती ८०० इतर खर्च, (८००)(०१)(०६) परळी विस्तार योजनेमध्ये भांडवली गुंतवणूक मूळ ७९,७३.०० पुनर्विनियोजन (-) ५९,७३.०० }	२०,००.००	२०,००.००	----

वीज निर्मिती कंपनीकडून भाग भांडवलासाठी कमी मागणी आल्यामुळे मार्च २००८ मध्ये वर नमूद केलेल्या शिर्षाखाली रू.५४,२०० लाखांचा निधी परत करण्यात आला.

५.११ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, याबाबत महानिर्मिती कंपनीने असे कळविलेले आहे की, परळी संच क्र.७ च्या प्रकल्पांच्या कामाचे आदेश माहे ऑगस्ट-२००६ मध्ये देण्यात आले व प्रकल्प ३२ महिन्यात म्हणजेच २००७-०८ मध्ये पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु उर्वरित संयंत्राच्या ३५ कामांचे आदेश देण्यास विलंब झाल्यामुळे संयंत्राच्या यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्यामध्ये विलंब झाला. त्यामुळे मागणी कमी करण्यात आली.

(रुपये लाखांत)

५.१२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्ज इतर उपक्रमांना कर्ज (१९०)(०१),(०२) केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमांद्वारे निर्गमित केलेल्या रोख्यांच्या हप्त्याचे एकरकमी प्रदान मूळ १,०१,८६.००	१,०१,८६.००	----	(-) १,०१,८६.००

केंद्र सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांद्वारे निर्गमित केलेल्या वीज रोख्यांची परतफेड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "६००३ राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण" या प्रधान शीर्षाऐवजी वरील शीर्षाखाली अनावधानाने तरतूद केली.

५.१३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, वित्तीय वर्ष सन २००७-२००८ मधील विनियोजन लेखे मागणी के-११, मुख्य लेखाशिर्ष "६८०१" वीज प्रकल्पासाठी कर्ज, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे, (१९०)(०१)(०२) केंद्रिय सार्वजनिक उपक्रमांची देणी एकाचवळी चुकती करण्यासंदर्भात उभारलेल्या रोख्यावरील मुद्दलाचा हप्ता देणे (६८०१०२७१) या लेखाशिर्षाखाली

रू.१०१,८६,००,०००/- तरतूद करण्यात आली. सदर संपूर्ण रक्कम बचत झाली आहे. महाराष्ट्र शासनाने "६००३" राज्य शासनाचे देशांतर्गतऋण या प्रधान शिर्षा ऐवजी "६८०१" या लेखाशिर्षाखाली अनवधानाने तरतूद केली असल्याचे महालेखापाल कार्यालयाने नमूद केले आहे.

२. वित्तीय वर्ष सन २००७-२००८ पासून केंद्रिय सार्वजनिक उपक्रमांची देणी एकाचवेळी चुकती करण्यासंदर्भात उभारलेल्या रोख्यावरील मुद्दलाचा हप्ता देण्यासाठी विभागाने लेखाशिर्ष "६८०१०२७१" खाली तरतूद केली होती. वित्तीय वर्ष सन २००७-२००८ साठी उपरोक्त बाबीसाठी रू.१,०१,८६,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूद "६००३" खाली करणे आवश्यक होते, मात्र विभागाने अनवधानाने लेखाशिर्ष "६८०१०२७१" खाली तरतूद केली होती.

३. लेखाशिर्ष "६००३" हे सन २००६-२००७ पर्यंत सामान्यपणे वित्त विभागामार्फत पाहिले जात असल्याने महालेखापाल कार्यालयाने वित्त विभागास पत्र क्रं.VLC/Appn.A/cs२००६-२००७/३८ दि.२/४/२००८ द्वारे सदर बाबत लोकलेखा समितीपूढे स्पष्टीकरण देण्याबाबत कळविले होते. मात्र वित्त विभागाने सदर खर्च हा पॉवर बॉन्ड संदर्भात असल्याने ऊर्जा विभागास नविन लेखाशिर्ष उघडण्याबाबत सन २००८-२००९ मध्ये आदेशीत केले आहे.

४. केंद्रिय सार्वजनिक उपक्रमांची देणी एकाचवेळी चुकती करण्यासंदर्भात उभारलेल्या रोख्यावरील मुद्दलाचा हप्ता देण्यासाठी करण्यात येणारी तरतूद लेखाशिर्ष "६८०१" खाली न करता "६००३" खाली करणे आवश्यक असल्याबाबत महालेखापाल कार्यालयाने विभागास कळविले होते. महालेखापाल कार्यालयाच्या सुचनेनुसार "६००३०४०२" हे नविन लेखाशिर्ष उघडले असून त्याखाली तरतूद करण्यात येत आहे. तरी वित्तिय वर्ष सन २००७-२००८ मध्ये लेखाशिर्ष "६८०१०२७१" खाली दाखविण्यात आलेली बचतीची रक्कम क्षमापित करण्यात यावी व सन २००७-२००८ च्या विनियोजन लेखे पुस्तकातून आक्षेप कृपया काढून टाकण्यात यावा असेही नमूद केले आहे.

अनुदानाअंतर्गत केलेली बचत पुढील उपशीर्षाखाली अधिक खर्चाद्वारे अंशत: प्रतितोलित झाली.

(रुपये लाखांत)

५.१४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे २०५ परिषण व वितरण, २०५ (००)(०१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांस कर्जे मूळ ४७,४५.७२ पुनर्विनियोजन (-) ७८.७२	४६,६७.००	४६,६७.००	----

वीज वितरण कंपनीकडून कमी मागणी झाल्यामुळे मार्च-२००८ मध्ये ७८.७२ लाखाचा निधी परत करण्यात आला.

५.१५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई यांनी वित्तीय वर्ष सन २००७-२००८ साठी मागणी के-११ मुख्य लेखाशिर्ष ६८०१, २०५ पारेषण व वितरण, २०५ (००)(०१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांस कर्जे (६८०१०२१७) मध्ये मुळ तरतूद रू.४७,४५.७२ लाख इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रू.४६,६७.०० लाख इतकी रक्कम खर्ची पडली असून रू.७८.७२ लाख इतका निधी परत करण्यात आला असा आक्षेप घेण्यात आला आहे.

२. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, वित्त विभागाने वर्ष २००७-०८ च्या सुधारित अंदाजामध्ये रू.७८.७२ लाख एवढी कपात केल्याने तेवढी रक्कम समर्पित करावी लागली.

३. तरी महालेखापाल, मुंबई यांना विनंती करण्यात येते कि सदरहू आक्षेप सन २००७-२००८ च्या विनियोजन लेखे अहवालातून काढून टाकण्यात यावा असे नमूद केले आहे.

(रुपये लाखांत)

५.१६ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
२०२ औष्णिक वीज निर्मिती, २०२ (००)(०९) मदतसाहित्य व साधान सामग्रीच्या स्वरुपात केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या सहाय्याची परतफेड करण्याकरिता महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यास कर्जे पूरक २५.०२	२५.०२	५०.०४	(+) २५.०२

वर नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली रू.२५.०२ लाख इतक्या अंतिम खर्चाची कारणे कळविण्यात आलेले नाही. (ऑगस्ट-२००८)

५.१७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, वित्तीय वर्ष सन २००७-२००८ साठी मागणी के-११, मुख्य लेखाशिर्ष ६८०१-वीज प्रकल्पांना कर्जे, २०२ औष्णिक वीज निर्मिती, २०२ (००)(०९) मदत साहित्य व साधन सामुग्रीच्या स्वरूपात केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या सहाय्याची परतफेड करण्याकरीता महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यास कर्जे खाली रू.२५.०२ लाख इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यात रू.५०.०४ लाख इतकी रक्कम खर्ची पडली आहे. त्यामुळे २५.०२ लाख इतका अतिरिक्त खर्च झाला असून अंतिम खर्चाची कारणे कळविण्यात आली नाही असा आक्षेप घेण्यात आला आहे.

२. उपरोक्त बाबत असे नमूद करण्यात येते की, उरण गॅस प्रकल्पाच्या पुर्नवसनासाठी केंद्र शासनाकडून सन २००३-०४ मध्ये वस्तु स्वरूपात प्राप्त झालेल्या रू.२५.०२ लाख इतक्या खर्चासाठी लेखाशिर्ष उपलब्ध नसल्याने महालेखापालांनी सदर खर्च निलंबन लेख्यात दर्शविला होता. निलंबन लेखा समाप्त करण्यासाठी २००७ च्या पावसाळी अधिवेशनात रू.२५.०२ लाखाची पुरवणी मागणी मंजुर करून घेतली. वास्तवित महानिर्मिती कंपनीस सन २००३-०४ या वित्तीय वर्षात रू.२५.०२ लाख इतकी रक्कम केंद्र शासनाकडून प्राप्त झाली होती. त्यामुळे त्या रकमेचे

पुस्तकी समायोजन करणे आवश्यक होते. परंतु तसे न होता अनवधानाने दि.२६ ऑक्टोबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये महानिर्मिती कंपनीस रू.२५.०२ लाख इतकी रक्कम रोखीने वितरीत करण्यात आली. त्यामुळे रू.२५.०२ लाख इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे.

३. महानिर्मिती कंपनीस अतिरिक्त दिलेली रक्कम रू.२५.०२ लाख कंपनीने चलनाद्वारे आर.बी.आय. मध्ये जमा केलेली आहे. चलन सोबत जोडण्यात येत आहे.

४. मराठी व इंग्रजीचा मसुदा मान्यतेसाठी सादर केला आहे. तरी महालेखापाल, मुंबई यांना विनंती करण्यात येते कि सदरहू आक्षेप सन २००७-२००८ च्या विनियोजन लेखे अहवालातून काढून टाकण्यात यावा असे नमूद केले आहे.

साक्ष :-

५.१८ दि. ३० ऑगस्ट, २०१२ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अनुदान क्र. के-११ "ऊर्जेवरील भांडवली खर्च" या अंतर्गत रुपये ६४४.३९ कोटी एवढी बचत होण्याची कारणे काय आहेत ? याचा खुलासा करण्याकरिता सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, महानिर्मिती कंपनीमार्फत ४ प्रकल्प राबविले जाणार आहेत. याकरिता सन २००६-२००७ मध्ये आवश्यक ती मान्यता घेण्यात आलेली आहे. परळीचे युनिट क्रमांक ७ आणि पारसचे युनिट क्रमांक ४ आहे. सन २००६-२००७ मध्ये खापरखेडा आणि भुसावळ येथील प्रकल्पांना मंजूरी मिळालेली आहे. त्यानंतर कामाचे कार्यादेश मिळाले होते. प्रकल्प सादर केल्यानंतर २० टक्के हिस्सा हा शासनाकडून घेतला जातो व ८० टक्के कर्जाच्या माध्यमातून उभे करावे लागते. यावर्षी ४ प्रकल्पासाठी अंदाजपत्रकामध्ये ७९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने पहिल्या तिमाहीत दिलेला सर्व निधी ऊर्जा विभागाने खर्च केलेला आहे. त्यानंतर शासनाने ऊर्जा विभागास असे सांगितले होते की, जो पर्यंत ऊर्जा विभाग कर्जाच्या माध्यमातून निधी उभा करीत नाही, तो पर्यंत शासनाकडून त्यांना निधी वितरित केला जाणार नाही. त्यानंतर ऑक्टोबर, २००८ मध्ये शासनाला पत्राद्वारे असे कळविण्यात आले होते की, पूर्वी अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली होती. परंतु, शासनाच्या धोरणामध्ये बदल झाल्यामुळे त्यावर्षातील निधी खर्च झालेला नव्हता. सदरचा निधी हा पुढील वर्षात खर्च करण्यात आला आहे.

५.१९ विभागाने दिलेल्या उपरोक्त खुलाशा संदर्भात महालेखाकारांनी विभागाला विचारले कि, आप इस बारे में समिति को एक्च्युअल पोजीशन बता दीजिए कि ऑरिजलनल ग्रांट कितनी थी, उसके बाद सप्लीमेंट्री डिमांड कितनी ली गयी तथा फिर यह डिमांड वापस क्यों की गयी, ग्रांट वापस करने के कारण क्या हैं ? यावर विभागाने असा खुलासा केला की, ग्रांट सरेंडर करने का कारण. इस काम के लिए ७९२ करोड़ रुपए की बजट प्रोवीजन की गयी थी. त्यापैकी १५० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. उर्वरित पैसे सरेंडर केले आहेत. यासंदर्भात ऊर्जा विभागाने स्पष्टीकरण दिलेले आहे. शासनाने ऊर्जा विभागाला असे कळविले होते की, जो पर्यंत ऊर्जा विभाग कर्ज घेत नाहीत, तो पर्यंत शासन कोणत्याही परिस्थितीत निधी वितरित करणार नाही. त्यानंतर ऊर्जा विभागाने शासनाला विनंती केली होती की, या चार प्रकल्पानंतर पुढील जे प्रकल्प येणार आहेत, त्यासाठी तरी निधी देण्यात यावा. असे शक्य नसेल तर निधी समर्पित करावा लागणार आहे. पुढील वर्षात इक्वीटी रक्कम खर्च करण्यात आली आहे. शासनाच्या धोरणात बदल झाल्यामुळे सदरचा निधी हा अखर्चित राहिला होता.

५.२० समितीने खापरखेडा संच क्रमांक ५ च्या प्रकल्पाची ऊर्जा निर्मितीची क्षमता किती आहे? तसेच खापरखेड्यात किती युनिट आहेत. याबाबत विचारणा केली असता विभागाने खापरखेड्यातील युनिट क्रमांक ५ ची ऊर्जा निर्मिती क्षमता ५०० MW असून, संच कार्यान्वित झालेला आहे. सद्य:स्थितीमध्ये प्रोडक्शन सुरू झालेले आहे व खापरखेड्यात एकूण ५ युनिट असल्याचे सांगितले. (याबाबतची माहिती परिशिष्ट १ मध्ये उपलब्ध) यावेळी समितीने अशी विचारणा केली कि, भुसावळ येथील पॉवर स्टेशनच्या बाबतीत विलंब कशामुळे झालेला आहे? Since from last one year approval is given by the government, expenditure are incurred, but still the power station is not working. What is the problem of the department? यावर विभागाने ४ प्रकल्पांसाठी कार्यादेश देण्यात आले होते. सन २००६-२००७, सन २००७-२००८ मध्ये भारतात खूप प्रोडक्शन झाले होते. परंतु बीएचईएल कंपनीकडून सप्लाय करण्यासाठी विलंब झालेला होता असे सांगितले.

५.२१ विभागाने केलेल्या स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने समितीने पुढे विचारणा केली कि, एखाद्या कंपनीकडून यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी करार केला जातो. जर त्यामध्ये

पुरवठा करायला विलंब लागल्यास काही दंडाची तरतूद केलेली असते. तसे तुम्ही केले होते काय ? यावर बीएचईएल कंपनीकडून पुरवठा करण्यासाठी विलंब झालेला आहे व सप्टेंबर महिन्याचा अखेरीत २ युनिट कार्यान्वित होणार असल्याचे आश्वासन समितीला दिले.

५.२२ यावेळी समितीने बीएचईएल कंपनीकडून पुरवठा करण्यासाठी विलंब झाल्यामुळे शासनाला किती नुकसान झालेले आहे? अशी विचारणा केली परंतु विभागाने याचे स्पष्टीकरण न करता परळीला ९ महिन्यांचा, पारसला ७ महिन्यांचा व भुसावळला १८ महिन्यांचा विलंब झाल्याचे सांगितले. यावर समितीने भुसावळचा प्रकल्प वेळेवर पुर्ण झाला असता तर मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती झाली असती असे निदर्शनास आणले असता विभागाने त्या ठिकाणचे युनिट हे सप्टेंबर अखेरपर्यंत कार्यान्वित होईल असे सांगितले.

५.२३ राज्यात विजेचे उत्पादन अतिशय कमी होत आहे. वीजनिर्मितीसाठी वेगवेगळ्या यंत्रसामग्री आणि तांत्रिक अधिकाऱ्यांची गरज लागते. यामध्ये १८ महिन्यांचा विलंब झालेला असल्यामुळे संबंधितांवर दंड ठोठावलेला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने बीएचईएलकडून वसूली करण्यात आली आहे व १० टक्के प्रमाणे वसूली केलेली आहे असे सांगितले.

५.२४ यावर समितीने सन २००७-२००८ मध्ये सदरहू घटना घडलेली आहे. यावर समितीने चर्चाही केलेली नाही. यासंदर्भात कमीत कमी माहिती तरी घेण्याची गरज आहे व सप्टेंबर, २०१२ मध्ये सदर युनिट कार्यान्वित होणार आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागाने सदर युनिट सप्टेंबर २०१२ मध्ये कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले.

५.२५ समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास असे आणून दिले की, सदस्यांकडून सभागृहात वारंवार मागणी केली जाते की, ज्या भागात वीजनिर्मिती केली जाते, त्याच्या ५ कि.मी. परिसरातील सर्व क्षेत्र लोडशेडींग मुक्त झाले पाहिजे. यासंदर्भात शासनाने धोरण निश्चित केलेली आहे. सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भातील शासनाचे धोरण स्पष्ट करताना असे सांगितले होते की, ज्या भागात वीजनिर्मिती केली जाते, त्या परिसरातील ५ कि.मी. इतके अंतर लोडशेडींग मुक्त केले जाईल अशा प्रकारचा प्रस्ताव एमईआरसीकडे पाठविला होता. जसे पुणे शहर लोडशेडींग मुक्त आहे व त्यामध्ये आपण तेथे रिलायबिलीटी चार्जेस लावले आहेत. यासंदर्भात एमईआरसीने सदर परिसर लोडशेडींग मुक्त करण्यासाठी

जादा खर्च येईल असे म्हटले होते आणि तो खर्च कोण करणार असाही प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावर आम्ही या क्षेत्रासाठीचे रिलायबिलीटी चार्जेस फक्त त्या क्षेत्रावर न लावता संपूर्ण महाराष्ट्रात लावावे असा प्रस्ताव दिला होता. परंतू, तो प्रस्ताव एमईआरसीने अमान्य केला. आता पारस आणि चंद्रपूर येथील परिसर लोडशेडींग मुक्त झालेला आहे. आज विजेची परिस्थिती चांगली सुधारलेली आहे.

५.२६ ज्या ठिकाणी ३५ टक्यांपेक्षा जास्त तोटा आहे, असा परिसर लोडशेडींग मुक्त होणार नाही. मुंब्रा परिसरातील नागरिकांनी या संदर्भात हायकोर्टात धाव घेतली होती. लोडशेडींग संदर्भात तेथील लोकांचे असे म्हणणे होते की, ५०% लोक पैसे भरतात तर ५०% लोक पैसे भरीत नाहीत. तर या बिल न भरणाऱ्या ग्राहकांमुळे बाकी वेळेवर बिल भरणाऱ्या ग्राहकांना त्रास सहन करावा लागतो. याबाबतीत फिडरवाईज लोडशेडींग हाच एक मार्ग आहे. यामध्ये ज्या ठिकाणी ३४ टक्क्यांपेक्षा लॉसेस कमी असेल, अशा ठिकाणी कोणत्याही प्रकारे लोडशेडींग केली जाणार नाही. तसेच ज्या ठिकाणी ७० टक्क्यांपेक्षा जास्त लॉसेस आहेत, त्या ठिकाणी संध्याकाळी ७ ते १० या वेळेत लोडशेडीग केले जाते. विजेचे दर १५-१५ दिवसांनी बदलत असतात. शासनाच्या धोरणाप्रमाणे ३४ टक्क्यांपेक्षा कमी लॉसेस असेल, अशा ठिकाणी लोडशेडींग होणार नाही असा खुलासा केला.

५.२७ विभागाने केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने समितीने सचिवांच्या असे निदर्शनास आणून दिले की, यासंदर्भात सभागृहात धोरण घोषित केले होते. ज्या ठिकाणी वीजनिर्मिती केली जाते, त्या ठिकाणच्या लोकांना प्राधान्याने वीज दिली पाहिजे. ज्या भागात वीजनिर्मिती केली जाते, त्या भागातील लोकांना रस्ते, प्रदूषण वगैरे अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा ठिकाणी तरी किमान प्राधान्याने सर्व सोयी-सुविधा आणि वीज देण्याची गरज आहे. एमईआरसीला जेव्हा दर वाढवून पाहिजे असतो, तेव्हा त्यांना दर वाढवून दिला जातो. पण नागरिकांना फायदा देण्याबाबत जेव्हा वेळ येते तेव्हा मात्र त्यांची नकारात्मक भूमिका असते. यासंदर्भात शासनाने ५ टक्याची घोषणा केली होती. भविष्यात ३४ टक्यांच्या नॉर्म्समध्ये ५ टक्के बसेल किंवा बसणारही नाही. यावर विभागाने अनेक भागात विजेची कमतरता राहिलेली नाही. विजेचे दर बदलत असतात. ज्या ठिकाणी वीजनिर्मिती केली जाते, त्याच्या ५ कि.मी.च्या परिसरात लोकांना वीज द्यावी लागणार आहे. वीज बिल न भरणाऱ्या

लोकांना देखील वीज द्यावयाची काय, असा प्रश्न देखील काही वेळा आमच्या समोर निर्माण होतो. तसेच मुंब्रा परिसराप्रमाणे काही ठिकाणी १०० पैकी ९६ लोक वीज बिल भरत नाहीत. साधारणपणे ६० ते ७० टक्के विजेचे नुकसान होते. यावर समितीने वीज बिल न भरणाऱ्या लोकांना वीज देऊ नये. मात्र जे ग्राहक प्रामाणिकपणे वीज बिल भरत आहेत, त्यांना तरी वीज मिळाली पाहिजे असे सांगितले. तसेच समितीने या नुकसानीमध्ये नैसर्गिक तोटा (नॅचरल लॉस) व वीज चोरी या दोहोंचा समावेश आहे. या दोन्ही वेगवेगळया गोष्टी आहेत. त्यामुळे त्या गोष्टी आपण एकत्र करु नयेत. ३४ टक्क्यांपेक्षा अधिक वीज गळती असणाऱ्या भागामध्ये लोड शेडींग केले जाते. मात्र मागील ३० वर्षात काही भागामध्ये एकही नवीन सबस्टेशन तयार करण्यात आले नाही. सबस्टेशन नसल्यामुळे तेथे वीज गळतीचे प्रमाण अधिक आहे. हा तोटा नंतर ग्राहकांवरच लादला जात असल्याचे नमूद करत. ही जबाबदारी कोणाची आहे? तसेच हायटेन्शन वायरचे आयुष्यमान किती असते? अशी विचारणा केली असता यावर सचिवांनी असे सांगितले की, काहीही केले तरे टेक्निकल लॉसेस किमान ५ टक्के होतातच. आज ५० वर्षे जुन्या हायटेन्शन वायर देखील अद्याप कार्यरत असल्याचे सांगितले.

५.२८ समितीने जळगाव जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी विद्युत देयकाच्या कलेक्शनचे काम खाजगी कंपन्यांना दिलेले आहे. त्यांना ते काम करु द्यावे. तेथे एमएसईबी किंवा महावितरण कशाकरिता अतिरिक्त लक्ष देते ? हे ठेकेदार लोकांकडून पैसे गोळा करतील. या भागामध्ये संध्याकाळी ६ ते रात्री १० या कालावधीमध्ये बरेचदा वीज नसते. अशा वेळी शाळेत जाणाऱ्या मुलांनी कसा काय अभ्यास करावा? ही मुले शिकली नाहीत तर आपल्या राज्याचे भवितव्य काय राहणार आहे, याचा आपण विचार केला आहे काय? ग्रामीण भागामध्ये आजही १० तासांचे लोड शेडींग सुरु आहे. मात्र त्याबाबत शासनाकडे कोणतेही निश्चित धोरण नाही. असे सचिवांच्या निदर्शनास आणून दिले व त्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

५.२९ यावर विभागाने संध्याकाळी ७ ते रात्री १० या कालावधीमध्ये सर्वात अधिक म्हणजे जवळजवळ ७० ते ८० टक्के लॉसेस होतात. या संदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. जे ग्राहक वीज बिल नियमितपणे भरतात त्यांना वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे. वीज गळतीच्या नुकसानीची जबाबदारी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आहे. मात्र काही वेळा असे देखील होते की, वीज चोरी करणाऱ्यांची लाईन कापण्यासाठी

कर्मचारी जातात, त्यावेळी त्यांना तेथील स्थानिक लोकांकडून मारहाण केली जाते. अशा वेळी तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. काही भाग पूर्वी डी, ई,एफ, जी १, जी २ या कॅटेगरीमध्ये होता. जेथे वीज गळती जास्त आहे, तेथे लोड शेडींग केले गेले. यामुळे रस्त्याच्या एका बाजूला वीज आहे व दुसऱ्या बाजूला वीज नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. यामुळे तेथील लोकांनी नियमितपणे वीज बिल भरण्याची भूमिका स्वीकारली व नंतर आता तो भाग लोड शेडींगमुक्त झालेला आहे असा खुलासा केला.

५.३० सचिवांनी समितीला असेही सांगितले की, गावठाण फीडर सेपरेशन योजना ग्रामीण भागामध्ये राबविण्यात आली होती. मात्र या योजनेचा काहीही फायदा झाला नाही. या फीडरमुळे लोकांना बराच त्रास होतो असे समितीने सांगितले असता विभागाने या गोष्टी तपासण्यासाठी टेक्निकल सिस्टीम तयार केलेली आहे.

५.३१ एखाद्या ठिकाणी ३४ टक्क्यांपेक्षा कमी वीज गळती असेल तर तेथे लोड शेडींग कमी करण्याचे प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर का पाठवले जातात ? आपल्या अधिकाऱ्यांवर आपला विश्वास नाही काय? या समितीने विचारलेल्या सुचक प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, या ठिकाणी विश्वासाचा प्रश्न नाही. मात्र कोणत्याही प्रकारचे आरोप होऊ नये, याकरिता साधारणपणे अशा प्रकारच्या प्रस्तावांवर त्याच दिवशी विचार केला जातो. त्यासाठी प्रकाशगड येथे सेंट्रल कॉम्प्युटर सिस्टीम तयार केलेली आहे. तेथे सर्व संगणक लिंक अप केलेले आहेत. यामुळे स्थानिक पातळीवरुन आलेली माहिती योग्य आहे की नाही हे तपासून घेतल्यानंतर त्या प्रस्तावांवर ताबडतोब विचार केला जातो असे सांगितले.

५.३२ समितीने पारस प्रकल्प नियोजित वेळेत का पूर्ण करण्यात आला नाही, विलंबाची कारणे काय आहेत ? याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? उप कंत्राटदाराने विलंब केल्यामुळे प्रोजेक्टला उशीर झालेला आहे काय ? अशी विचारणा केली. असता विभागाने पारस येथील संच पूर्ण होण्यास विलंब झाल्याचे मान्य करुन पुढे असे सांगितले की, त्यावेळी एकाच वेळी ४ प्रकल्प सुरु झाले होते. त्या प्रकल्पाचे पुरवठादार भेल कंपनी होती. कोराडीचा प्रकल्प १९८० मे.वॅ. उर्जा क्षमतेचा आहे तसेच भेलने सबकॉंट्रॅक्ट केले होते. याबाबत एक बैठक घेणार असल्याचे सांगितले.

५.३३ समितीने परळी येथील प्रकल्पाच्या कामास उशीर होण्याची कारणे काय आहेत. प्रकल्पाचे काम उशिरा सुरु होण्यामध्ये अधिकारी दोषी आहेत काय ? भुसावळ येथील प्रकल्पाच्या कामाला तेथील स्थानिक लोकांकडून बराच विरोध केला गेला. त्यावेळी तेथील गावकऱ्यांसह काही महिला व मुलींना देखील जेलमध्ये टाकण्यात आले होते हे खरे आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागाने या प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास ९ महिन्यांचा उशीर झालेला आहे. भुसावळ व परळी येथील प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास उशीर झालेला आहे. भुसावळ येथे रेल्वे ट्रॅक तयार करण्याबाबत काही प्रश्न निर्माण झाले होते. खापरखेडा प्रकल्प कार्यान्वित झालेला आहे. तेथे एक नवीन रस्ता बांधायचा होता, तेथील पाणी पुरवठा योजनेला मान्यता दिलेली आहे. प्रकल्पालगतच्या भागामध्ये राहणाऱ्या लोकांना सुविधा उपलब्ध करुन आवश्यक आहे असे सांगितले.

५.३४ त्यावर समितीने राज्यात गत १५ वर्षात किती मेगावॅट क्षमतेचे ऊर्जा पकल्प कार्यान्वित झालेले आहेत याची माहिती द्यावी तसेच चुकीच्या लेखाशिर्षाखाली नोंद करण्याची कारणे काय आहेत ? याबाबत महालेखापालांना विहित मुदतीत का कळविण्यात आले नाही. या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? याबाबत विभागाने राज्यात गत १५ वर्षात महानिर्मितीचे एकूण २४२० मे.वॅ. क्षमतेचे खालील औष्णिक प्रकल्प कार्यान्वित झाले असल्याचे सांगितले.

प्रकल्प	क्षमता	कार्यान्वयनाचा दिनांक
चंद्रपूर संच क्र.७	५००	०१.०३.१९९८
खापरखेडा संच क्र.३	२१०	०१.०१.२००१
खापरखेडा संच क्र.४	२१०	०१.०९.२००१
परळी संच क्र.६	२५०	०१.११.२००७
पारस संच क्र.३	२५०	३१.०३.२००८
परळी संच क्र.७	२५०	३१.०७.२०१०
पारस संच क्र.४	२५०	३१.०८.२०१०
खापरखेडा संच क्र.५	५००	१६.०४.२०१२

५.३५ तसेच चुकीच्या लेखाशिर्षाखाली नोंद करण्याची कारणे विषद करताना असे सांगितले कि, वित्तीय वर्ष सन २००७-२००८ पासून केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांची देणी एकाचवेळी चुकती करण्यासंदर्भात उभारलेल्या रोख्यांवरील मुद्दलाचा हप्ता देण्यासाठी विभागाने लेखाशीर्ष "६८०१०२७१" खाली तरतूद केली होती. वित्तीय वर्ष सन २००७-०८ मध्ये सदर बाबीसाठी रु.१०१,८६,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूद "६००३" खाली करणे बाबत व याबाबत लोकलेखा समितीपुढे स्पष्टीकरण देण्याबाबत महालेखापाल कार्यालयाने पत्र VLC/Appn.A/cs २००६-२००७/३८,दि.२.४.२००८ द्वारे वित्त विभागास कळविले होते. मात्र वित्त विभागाने वित्तीय वर्ष २००७-२००८ संपल्यानंतर ऊर्जा विभागास नविन लेखाशिर्ष उघडण्याबाबत व तरतूद करण्याबाबत कळविले. वित्तीय वर्ष संपले असल्यामुळे विभागाला २००७-०८ साठी तरतूद करणे शक्य झाले नाही. तथापि सन २००८-०९ मध्ये महालेखापाल कार्यालयाच्या सूचनेनुसार "६००३०४०२" हे नवीन लेखाशिर्ष उघडले असून त्याखाली तरतूद करण्यात येत आहे. तसेच भुसावळ रेल्वे लाइनचे काम अद्याप पूर्ण झाले नाही तर तेथून कोळशाची वाहतूक करता येणार नाही असे सांगितले. यावर विभागाने शासनाच्या धोरणाप्रमाणे योग्य तो निर्णय घेतला जाईल असे नमूद करत. नवीन लेखाशीर्ष क्र. घेण्यामध्ये चूक झालेली आहे. ती काही बदल झाल्यामुळे शीर्षामध्ये बदल करावा लागला असे सांगितले.

५.३६ समितीने उरण गॅस (माहिती परिशिष्ट २ मध्ये) प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाची सद्य:स्थिती बाबत विचारणा केली असता विभागाने एकूण २११ प्रकल्पग्रस्त असून महानिर्मितीने नोकरीवर सामावून घेतलेले १९८ प्रकल्पग्रस्त असून उर्वरित १३ प्रकल्पग्रस्त असल्याचे तसेच प्रगत कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ०३ प्रशिक्षणार्थी असून उर्वरित प्रकल्पग्रस्तांमध्ये आय टी आय पास प्रकल्पग्रस्त १ असल्याचे व आय टी आय प्रशिक्षणासाठी पाठविलेले प्रकल्पग्रस्त ४ असल्याचे समितीला सांगितले.

वायु विद्युत क्रेंद्र उरण, जि.रायगड

वीज केंद्राचे नाव	एकूण प्रकल्प -ग्रस्त	महा - निर्मितीने नोव्हेंबर-२०११ पर्यंत नोकरीवर समावून घेतलेले प्रकल्प - ग्रस्त	उर्वरीत प्रकल्प - ग्रस्त	उर्वरित प्रकल्प - ग्रस्तांमध्ये आय.टी.आय. पास प्रकल्प - ग्रस्त	महानिर्मितीचे तर्फे आय.टी.आय. करीत असणारे प्रकल्प - ग्रस्त	२०११-१२ मध्ये किती प्रकल्प - ग्रस्तांना आय.टी.आय करीता पाठविण्यात आले.	प्रगत कौशल्य प्रशिक्षण योजने अंतर्गत कार्यरत प्रकल्प -ग्रस्त	बी टी आय आय अंतर्गत किती प्रकल्प - ग्रस्त प्रशिक्षण घेत आहेत	बीए, बी.एस.सी उत्तीर्ण प्रकल्प -ग्रस्त	१२वी उत्तीर्ण प्रकल्प -ग्रस्त	४वी उत्तीर्ण प्रकल्प -ग्रस्त
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
वायु विद्युत केंद्र उरण	२११ प्रकल्प - ग्रस्त	१९८ प्रकल्प-ग्रस्त	उर्वरीत ३८ प्रकल्प - ग्रस्तांपैकी १२ अर्ज प्राप्त	१	५	५	३	कोणीही नाही	२	१	१

५.३७ सचिवांनी पुढे असेही सांगितले की, उरण गॅस प्रकल्पाची क्षमता ६७२ मे.वॅट आहे. परंतु सद्या गॅस टंचाईमुळे ४५० मे.वॅट इतकी वीजेची निर्मिती होते. गॅसची टंचाई असल्यामुळे त्याचा फटका दुसऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांना बसतो असे सांगितले. यावर समितीने आपल्याकडे गॅसचा साठा भरपूर असून तो कमी पडणार नाही असे नेहमी सांगितले जाते आणि संसदेमध्ये देखील आपल्याकडे गॅस अतिरिक्त आहे असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. या बाबतीत वस्तुस्थिती सांगावी. यावर विभागाने दाभोळचा प्रकल्प हा २ हजार मे.वॅटचा आहे. त्या ठिकाणी ७०० ते ८०० मे.वॅट वीजेची निर्मिती होते. त्या ठिकाणी गॅसचा तुटवडा जास्त प्रमाणात असल्याचे समितीस सांगितले. गॅसचा तुटवडा आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. केंद्र सरकारने मागील महिन्यात एक पत्र दिले आहे. या देशामध्ये गॅसवर आधारित वीज निर्मितीचे प्लँट उभारले गेले पाहिजेत. आंध्र प्रदेशामध्ये ८० एमएसएसपी गॅस मिळतो. त्याठिकाणी रिलायन्स कंपनीचे ४० गॅसचे एमएसएसपी प्रॉडक्शन आहे. त्यांचे म्हणणे असे की, एक वर्षात ८० एमएसएसपीपर्यन्त गॅसचे उत्पादन करु शकतो.

त्यांच्या गॅसच्या विहिरीमधून गॅस काढीत असतांना आतमध्ये पाणी आणि रेती जाते असे त्यांचे म्हणणे आहे. बाहेरच्या देशामधून गॅस मागविला तर त्याचा दर १५ डॉलर असून तो आपल्याला परवडणारा नाही. देशातील गॅसचा दर ४ ते ५ डॉलर आहे. जर बाहेरच्या देशामधून महागडा गॅस घेतला तर उत्पादन खर्च ७ ते ८ डॉलरने अधिक वाढेल. त्यामुळे गॅस प्लँट कमी क्षमतेने चालवावे लागतात असे समितीसमोर विषद केले.

५.३८ समितीने जीओथर्मल पॉवर प्रोजेक्टमध्ये आपले पोटेंशिअल जास्त आहे काय? अशी विचारणा केली असता विभागाने असे सांगितले की, देशामध्ये एसजीआर आणि जीआयएस या जीओथर्मल एनर्जीबाबत सर्व्हे करणाऱ्या संस्था आहेत त्यांनी काही पॉकेट आयडेंटिफाय केले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राच्या कोकणातील राजापूरचा काही भाग आहे. अमरावती आणि यवतमाळमध्ये काही भाग आहेत त्याठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत. तेथील पोटेंशिअल आपण आयडेंटिफाय केले पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये आयडेंटिफाय केलेल्या भागामध्ये लो टेंपरेचर आहे असा जीआयएसने आपला अहवाल दिला आहे. सर्व्हे करण्याबाबत एक धोरणाचा भाग म्हणून "एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट" मागविले आहेत. काही ठिकाणी कमी पोटेंशिअल निघाले, काही ठिक्राणी लो टेंपरेचर निघाले, काही ठिकाण्ी हाय टेंपरेचर निघाले, काही ठिकाणी मिनिमम टेंपरेचर निघाले तर त्या अनुषंगाने त्या ठिकाणी चार ते पाच प्रकल्प विकासाचे कामकाज करावे लागते. काही वर्षापूर्वी शासनाच्या परवानगीने कोकणपट्टीमध्ये तेथील भागाचा अभ्यास करण्यात आला. त्यादृष्टीने आपण त्यांच्याकडे कोकणपट्टीतील त्या भागाचा सर्व्हे, असेसमेंट आणि डेव्हलपमेंट ऑफ एक्झिस्टिंग पोटेंशिअल अशाप्रकारचा एक कार्यक्रम नुकताच सोपविला आहे. त्याचप्रमाणे कोकणपट्टीमध्ये वज्रेश्वरीपासून राजापूरपर्यंत हा एक भाग आहे. तसेच, जळगाव, अमरावतीमध्ये असलेल्या पट्टयात टाटा पॉवर इंडस्ट्रीने सर्व्हे करण्याचे काम दिले असून त्यांच्याबरोबर एक करार करण्याच्या तयारीत आम्ही आहोत. व्हायाबिलिटीच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे जीएसआय आणि एनजीआरआयच्या रिपोर्टप्रमाणे ज्या ज्याठिकाणी पॉकेट आहेत त्याठिकाणी लो टेंपरेचर आहे. तसेच, ज्याठिकाणी ८० ते ९० डिग्रीपर्यन्त हाय टेंपरेचर आहे त्याठिकाणी सर्व्हे आणि असेसमेंटला फारसा वेळ लागणार नाही. असलेल्या पोटेंशिअलप्रमाणे जीओथर्मल पॉवर जनरेशनची क्षमता किती निर्माण झाली आहे तेवढे पॉवर स्टेशन्स स्थापण्याचा विचार केला आहे.

५.३९ यावर समितीने अशी विचारणा केली की, शासनाने डिसेंबर २०१२ पर्यन्त हे राज्य भारनियमन मुक्त करण्याची घोषणा केली आहे. वीज निर्मितीच्या बाबतीत पवन ऊर्जा आणि अणु ऊर्जा ही दोन साधने आपण गृहीत धरली आहेत. अशाप्रकारे गॅसवर आधारित होणारे वीजेचे उत्पादन थांबणार असेल तर वीजेच्या बाबतीत ठरविलेले उद्दिष्ट साध्य होणार आहे काय? गॅसच्या माध्यमातून राज्याच्या भागात किती मे.वॅट वीजेची निर्मिती होते, गॅसचा तुटवडा असल्यामुळे किती मे.वॅट कमी वीजेचे उत्पादन होणार आहे?

५.४० यावर खुलासा करताना सचिवांनी असे सांगितले की, गॅसच्या टंचाईमुळे दाभोळ प्रकल्पाला १ हजार मे.वॅट इतका वीजेचा फटका बसणार आहे. ऊरण गॅस प्रकल्पामध्ये २०० ते २५० मे.वॅट इतका फटका बसणार आहे. यामध्ये अे, बी, सी विभाग लोडशेडींगमुक्त करण्यासाठी व तो तूट भरुन करण्यासाठी केंद्र सरकारकडे आपण अतिरिक्त वीजेची मागणी करीत आहोत. तसेच, खाजगी क्षेत्रामध्ये मौदा, मुंब्रा तसेच अडाणीच्या तिरोडी येथील प्रकल्पातून वीज निर्मिती करण्यात येत आहे. गॅसचा पुरवठा होत नसल्यामुळे जी तूट निर्माण होणार आहे ती भरुन काढण्यासाठी चंद्रपूर आणि भुसावळ येथे वीज निर्मितीचे नियोजन केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२ पर्यत अणु ऊर्जा निर्मितीच्या दृष्टीने काही नियोजन केले आहे काय, त्यासाठी शासनाच्या पातळीवर कोणते प्रयत्न केले यावर विभागाने असा खुलासा केला की, जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पासाठी जमीन संपादनाचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

५.४१ महाराष्ट्रामध्ये जेवढी वीज निर्मिती होते तिचे वाटप कशाप्रकारे होते व पवन ऊर्जा आणि सौर ऊर्जेच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे. तसेच आपल्या राज्यामध्ये पवन ऊर्जा निर्मिती जवळ जवळ ३ हजार मे.वॅट इतकी होते. एमईआरसीने पवन ऊर्जेच्या बाबतीत आपल्याला डायरेक्शन्स दिल्या. पवन ऊर्जा सयंत्रामध्ये वाढ करण्यात आली आहे. ज्याठिकाणी वाऱ्याचा वेग जास्त असेल त्याठिकाणी वीजेचे दर कमी असतील आणि वाऱ्याचा वेग कमी असेल तर त्याठिकाणी वीजेचे दर जास्त असतील अशी समितीस माहिती मिळाली. समितीने पवन ऊर्जेच्या बाबतीत गुजरात राज्य आघाडीवर आहे हे खरे आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागाने पवन ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत महाराष्ट्र गुजरात राज्याच्या पुढे आहे असे सांगितले.

५.४२ समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की पवन ऊर्जा निर्मिती संदर्भात गुजरातच्या माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. तसेच, सुजलॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांबरोबर सुध्दा चर्चा केली आहे. तेथील कंपनीची संपूर्ण यंत्रणा अप टु डेट आहे. तेथील सर्व कामकाज हे कॉप्युटराईज करण्यात आले आहे. त्यामुळे रेकॉर्डवर गुजरात राज्य महाराष्ट्राच्या पुढे असल्याचे दिसते. तसेच वीज निर्मितीच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र गुजरातच्या पुढे गेले पाहिजे असे समितीचे मत असल्याचे स्पष्ट केले. यावर विभागाने गुजरात किंवा महाराष्ट्र राज्यामध्ये ग्रीडच्या स्वरुपात वीज न देता ओपनॲक्टमध्ये देतो. पवन ऊर्जेमध्ये डायरेक्टली वीजेचे उत्पादन होते त्याप्रमाणे तिचे वितरण होते. तसेच, काही मॉलच्या मालकांचे पवन ऊर्जेच्या बाबतीत असे म्हणणे होते की, वारा सुरु झाला तर त्यामूधन मिळणारी वीज आम्ही वापरु आणि वारा बंद झाल्यानंतर तुमच्याकडून मिळणारी वीज वापरु, त्यांची ही तांत्रिक बाब शासनाला मान्य नाही. काही राज्यांनी खाजगी कंपन्यांना परवाने दिल्यामुळे त्यांना जास्त पैसे मिळाले, आमच्याकडे परवाने नाही म्हणून आम्हाला जास्त पैसे मिळत नाहीत असे सांगितले.

५.४३ सौर ऊर्जेच्या बाबतीत आपली काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता केंद्र सरकारने असा नियम केला आहे की, आपण एकूण जी वीज खरेदी करतो त्यापैकी ६ टक्के वीज ही अपारंपारिक स्त्रोतामधून निर्माण होते. त्यामध्ये सौर ऊर्जेचे प्रमाण ०.२५ टक्के इतके आहे असा खुलासा केला. यावर समितीने महाराष्ट्रामध्ये वीजेच्या उत्पादनावर करोडो रुपये खर्च करीत आहोत. परंतु विकास संशोधन हा एक महत्वाचा भाग आहे. बजाज, टाटासारख्या मोठमोठया कंपन्या संशोधनावर करोडो रुपये खर्च करीत आहेत. त्यांना आज आऊटपुट मिळाले नाहीतरी उद्या मिळते. महाराष्ट्रामध्ये वीजेची मागणी खूप असल्यामुळे आपण वीज निर्मितीमध्ये वाढ केली पाहिजे. त्यासाठी वेगवेगळे प्रोजेक्ट डेव्हलप झाले पाहिजेत. स्थानिक पातळीवर किंवा ग्रामीण पातळीवर वीजेची निर्मिती झाली पाहिजे. राज्यात बायो गॅसमधून सुध्दा वीजेची निर्मिती होते. त्यासाठी संशोधन केलेले नाही. शहरी भागामध्ये हजारो टन बायो गॅस निर्माण करणारी क्षमता आहे, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची क्षमता निर्माण झाली आहे. उदा. पुण्यामध्ये ५ टनाचा बायो गॅस वीज प्रकल्प सुरु करुन त्यामधून टिळक रोडवर दिवे लावण्यात आले. अशापरिस्थितीत राज्याची भविष्यकालीन वीजेची वाढती मागणी लक्षात घेता आपण ही अडचण कशी सोडविणार आहात? वीज ही सुध्दा एक

जीवनावश्यक बाब झाली आहे. ग्रामीण भागामध्ये शेती पंपासाठी आणि शहरी भागामध्ये उद्योग, कारखाने आणि घरगुती वापरासाठी वीज आवश्यक झाली आहे. यादृष्टीने स्थानिक पातळीवर सुध्दा या क्षेत्रामध्ये अधिक संशोधन करण्याची आवश्यकता आहे. आज पवन ऊर्जा निर्मिती महाग पडते. पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी सातारा जिल्ह्यामध्ये २०० एकर जमीन घेतली आहे. त्याचप्रमाणे् मुळशी तालुक्यामध्ये सुध्दा त्यांनी जमीन घेतली आहे. राज्याची वीजेची वाढती गरज लक्षात घेता आणि वीज निर्मितीकरिता आवश्यक असलेल्या स्त्रोताची टंचाई लक्षात घेता यामध्ये अधिक संशोधन केले पाहिजे याकरिता लोकप्रतिनिधी म्हणून आपण काही करु शकतो काय असा समितीपुढे प्रश्न आहे? त्याकरिता आमदार निधीमधून निधी उपलब्ध करुन देऊ शकतो काय? या संदर्भात जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांबरोबर चर्चा झाली पाहिजे. समितीने आपल्यापुढे हा विषय मांडला असून त्याबाबत आपण विचार करावा. लहान लहान देशामध्ये वीज निर्मितीसाठी अधिक प्रयत्न होतात, स्थानिक पातळीवर सुध्दा ते प्रयत्न यशस्वी होतात, वीज निर्मिती क्षेत्रामध्ये गावेच्या गावे स्वयंपूर्ण झाली आहेत. गोबर गॅसपासून, कचऱ्यापासून, वाऱ्यापासून वीजेची निर्मिती होत असतांना आपणाकडून सुध्दा या बाबतीत अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. शहरी भागामध्ये मोठया प्रमाणात घरबांधणी सुरु आहे, अशावेळी वीजेची वाढती गरज लक्षात घेऊन आपण अधिक वीज निर्मिती करु शकलो नाही तर भविष्यकाळात हे राज्य पुढे जाणे शक्य नाही. याकरिता आपण संशोधनाच्या बाबीवर अधिक भर दिला पाहिजे असे समितीचे मत आहे. काही खाजगी कंपन्या आपल्या उत्पन्नामधून संशोधनावर करोडो रुपये खर्च करीत असतात. आज आपल्याला करोडो रुपयांचे उत्पन्न मिळत असतांना वीजेचे उत्पादन वाढविण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करीत आहात ही बाब देखील विचारात घेतली पाहिजे असे मत स्पष्ट कले.

५.४४ परमनंट सी.एस.आर. (Corporate Social Responsibility) करतो. त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना आय.टी.आय. मध्ये प्रशिक्षण दिले जाते त्यानंतर त्यांना कॉंट्रॅक्टरव्दारे सेवेत दाखल करुन घेतो. दुसरी गोष्ट अशी की, यामध्ये आपली ठोस रक्कम नाही, आपला खापरखेडाचा प्लॅंट १८ ते २० कोटींचा होता. काही गावांमध्ये बाधीत लोकांची पाणीपुरवठा, रस्ते इ. कामाची मागणी असते त्याप्रमाणे त्यांना काम करुन देतो असे सांगितले.

५.४५ समितीने यावर असे विचारले की, This amount must be reflected in your balance sheet or yearly Report of the Company. If you do not reflect it in your Balance Sheet or yearly Report, you may be reflecting it somewhere. यावेळी विभागाने It is a project base fund, I do not have the figures with me. I will submit it later before the Committee असे सांगितले. यावर समितीने यासंदर्भातील माहिती नंतर पाठवून द्यावी असे सांगितले तसेच आपण आय.टी.आय. च्या विद्यार्थ्यांना, नवीन प्रकल्पग्रस्त असलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देता काय, त्यांना सी.एस.आर. मध्ये घेता काय ? अशी विचारणा केली असता विभागाने असा खुलासा केला की, सी.एस.आर. म्हणजे नक्की कोणत्या प्रकारचे काम द्यावयाचे आहे? पूर्वी महाजनकोमध्ये सुरुवातीला कंत्राटी पद्धतीवर काम देत असतांना त्यांना प्रशिक्षण देऊन त्यानंतर त्यांना काम देत होतो. समितीने प्रकल्पग्रस्तांसंदर्भात अधिक माहिती विचारली. याबाबतची प्राप्त माहिती परिशिष्ट ४ वर उपलब्ध आहे.

५.४६ सन २००७-०८ या वर्षाचे लेखे विचारात घेण्यात आले आहेत. २००८-०९, २००९-१०, २०१०-११ या वर्षाच्या लेख्यांची काय स्थिती आहे? उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे लेखा परिच्छेद एकत्रितपणे आहेत. काही परिच्छेद प्रलंबित असल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने समन्वय साधून वेळेत आक्षेपांची पूर्तता करावी व महालेखापाल कार्यालयाशी संपर्क साधून परिच्छेद निकाली काढावेत अशी समितीने सूचना केली आणि अहमदनगर जिल्हयातील कर्जत-जामखेड तालुक्यामध्ये सौर ऊर्जेचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या प्रकल्पाशी संबंधित एजन्सी आणि कंपन्यांची नावे या संदर्भातील माहिती आपण समितीला सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले असता विभागाकडून सदर विषयाची माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. परंतु अपांरपारिक उर्जा स्त्रोत बाबत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती आहे. **(विवरण क्र.)**

अभिप्राय व शिफारशी :-

५.४७ मागणी क्रमांक पी-११ या २० प्रकल्पांवरील भांडवली खर्च याखाली याअंतर्गत रु.६४४.३९ कोटी एवढी बचत दर्शविण्यात आली होती. यासंदर्भात विभागाने केलेल्या खुलाशामध्ये महानिर्मिती कंपनीमार्फत राज्यांमध्ये खापरखेडा, पारस, भुसावळ व परळी असे चार प्रकल्प राबविले जाणार होते. त्याकरिता सन २००६-२००७ मध्ये आवश्यक त्या मान्यता

घेण्यात आल्या होत्या. या कामांकरिता शासनाचा हिस्सा २०% व ८०% हे कर्जाच्या माध्यमातून उभे करण्यात येणार होते. निधी उभा करताना कर्जाच्या माध्यमातून निधी उभा करीत नाही तोपर्यंत शासनाकडून त्यांच्या हिश्याचा निधी वितरित करण्यात येणार नाही असे सांगण्यात आले होते. परंतु, कर्जांची रक्कम वेळेत उभी न राहिल्यामुळे त्या वर्षांतील शासनाचा निधी हा अखर्चीत राहिला.

५.४८ महाराष्ट्र राज्यामध्ये विजेच्या मागण्यांपेक्षा विजेचा पुरवठा कमी होत असल्याने कमाल मागणीच्यावेळी विजेमध्ये तूट असते. राज्यातील विजेची मागणी व होणारा पुरवठा यांचा विचार करता राज्याला विजेमध्ये भविष्यकाळात स्वावलंबी व्हावयाचे असल्यास सध्याच्या विजनिर्मिती क्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे आवश्यक असतांना एखाद्या प्रकल्पाकरिता राज्याच्या अंदाजपत्रकात तरतूद करुनही निधी अखर्चीत राहणे ही बाब योग्य नाही. **त्यामुळे खापरखेडा, पारस, भुसावळ व परळी या चार प्रकल्पांवर तरतूद करण्यापूर्वी त्याचे योग्यप्रकारे नियोजन केले असते तर हा निधी अखर्चीत राहून पुन्हा शासनास समर्पित करण्याची वेळ आली नसती. भविष्यकाळात राज्याच्यादृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या अशा मोठ्या भांडवली प्रकल्पांवर तरतूद करण्यापूर्वी त्यांचे योग्यप्रकारे नियोजन करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

५.४९ राज्यामधील ज्या ज्या भागांमध्ये विजनिर्मिती केली जाते त्या भागातील पाच किलोमीटर परिसरातील सर्व क्षेत्र भारनियमन मुक्त असले पाहिजे. परंतु, राज्यात विजनिर्मिती करण्या-या कपंनाच्या पाच किलोमीटर परिसरातील अद्याप काही भागात भारनियमन झालेले नाही. हा त्या परिसरातील नागरिकांवर एक प्रकारचा अन्यायच असून त्यादृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत अशी समिती शासनास शिफारस करीत आहे. **राज्यातील काही भागांमध्ये विज चोरी होणे व ५०% विज ग्राहक बिलाचे पैसे भरत नसल्यामुळे या भागांमध्ये भारनियमन केले जाते. या भागांमध्ये पाच-पाच सहा-सहा तास भारनियमन केले जाते. विज चोरी व विजेची बील न भरणा-या ग्राहकांमुळे नियमित विजेच्या देयकाचा भरणा करणा-या ग्राहकांना भारनियमनाचा नाहक त्रास सोसावा लागतो. वास्तविक पाहता, विज चोरी रोखणे व विजेच्या देयकांची वसूली करणे याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित कंपनीची असल्यामुळे त्यांच्या नाकर्तेपणामुळे नियमांचे पालन करणा-या ग्राहकांवर अन्याय होतो तसेच अखंडित विज**

आवश्यक असल्यास ग्राहकांना अतिरिक्त शुल्क भरुन विज घ्यावी लागते. अशाप्रकारे नियमांचे पालन करणा-या ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असल्याने विजेची चोरी करणारे ग्राहक व देयके न भरणा-या ग्राहकांवर कठोर अशी कारवाई करण्यासाठी विज अधिनियमात कडक सुधारणा करण्यात याव्यात तसेच विज चोरी करणारे व विजेच्या देयके न भरणा-या ग्राहकांवर कारवाई करण्यासाठी महावितरणाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

५.५० राज्यातील महत्वाच्या विजनिर्मिती प्रकल्पांची उभारणी होऊन बराच काळ लोटलेला आहे. यात वापरण्यात आलेली यंत्रसामुग्रीही अतिशय जुनी झाली असून त्यांची देखभाल-दुरुस्ती वेळेत होणे आवश्यक झाली आहे तसेच कालानुरुप बदलामुळे यंत्रसामुग्रीमध्ये अनुषंगिक सुधारणा देखील होणे आवश्यक झाली आहे. **जुन्या यंत्रसामुग्रीमुळे वहनातील विजेची हानी होत असल्यामुळे सदोष मापके बदलणे, उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त टॉन्सफॉर्मर्स पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे आणि तारा टाकणे ही कामे तातडीने करणे आवश्यक आहे. याकरिता निधीची आवश्यकता लागणार आहे. यादृष्टीने महावितरण कंपनी, महापारेषण कंपनी यांना शासनाने निधी द्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

५.५१ विजनिर्मिती प्रकल्प उभारताना शेकडो एकर जमिन शासन संपादित करते. त्यावेळेला या प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या पुनर्वसनाची जबाबदारी देखील शासनावर असते. **या प्रकल्पबाधीतांना महानिर्मिती कंपनीमध्येच नोकरीत सामावून घेणे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणे तसेच त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला त्यांना देणे याबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

५.५२ दाभोळ येथील विज प्रकल्प हा २००० मेगावॅट क्षमतेचा विज प्रकल्प आहे. या ठिकाणी सातशे ते आठशे मेगावॅट विजेची निर्मिती होते. परंतु, गॅसचा तुटवडा असल्याने पूर्ण क्षमतेवर दाभोळ येथील प्रकल्प चालू नाही ही वस्तुस्थिती आहे. दिवसेंदिवस पारंपारिक ऊर्जा स्त्रोतात घट होत असल्याने, नवीन व अक्षय स्त्रोत जे भविष्यातील ऊर्जा स्त्रोत आहेत त्यांचा शोध घेणे ही काळाची गरज झालेली आहे. **त्यामुळे ऊर्जा निर्मितीकरिता इतर स्त्रोतही बघणे गरजेचे झाले आहे. यामध्ये अक्षय ऊर्जा येत असून त्यामध्ये पवन, सौर, जैविक, बायोगॅस,**

सागरी लाटा, भूऔष्णिक इत्यादींचा समावेश होतो. राज्यातील स्थापित क्षमतेपैकी १७.८ एवढी स्थापित क्षमता अक्षय ऊर्जेची असून राज्यातील एकूण विद्युत निर्मितीपैकी फक्त ६.५% एवढी विद्युत निर्मिती अक्षय ऊर्जेमार्फत होत आहे. अक्षय ऊर्जा स्त्रोतामार्फत ऊर्जा निर्मिती करण्यास भरपूर वाव असून शासनाने त्यादृष्टीने पावले उचलावीत तसेच या क्षेत्रामध्ये संशोधन व विकास करणाऱ्या कंपन्यांना प्रोत्साहन दिल्यास विजनिर्मितीमध्ये वाढ होण्यास मदतच होईल. शहरी घन कचरा, औद्योगिक कचरा यामार्फत देखील विज निर्मिती करता येत असल्याने व सध्या राज्यामध्ये काही ठिकाणी असे प्रकल्प उभे राहत असल्यामुळे या प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने विचार करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

५.५३ साक्षीच्यावेळी सचिवांनी समितीला माहिती देताना असे सांगितले होते की, जीओथर्मल पॉवर प्रोजेक्ट उभारण्याच्या दृष्टीने चांगली स्थिती असून राज्यात कोकणातील राजापूरचा काही भाग अमरावती आणि यवतमाळ या ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत. जळगाव, वज्रेश्वरी पासून राजापूर पर्यंत जीओथर्मल पॉवर प्रोजेक्ट कार्यान्वित करण्यसारखी परिस्थिती असून याठिकाणी असे प्रोजेक्ट उभारण्यासाठी इच्छुक संस्थाकडून संमत्ती पत्रे मागविली आहेत. देशामध्ये एसजीआर आणि जीआयएस या जीओथर्मल एनर्जीबाबत सर्व्हे करणाऱ्या संस्था आहेत. त्यांनी वरील पॉकेट निश्चित केले असून या संस्थांना कोकणपट्टीतील भागाचा सर्व्हे करण्यास सांगितले आहे. तर जळगांव जिल्ह्यातील भुसावळ व अमरावतीमध्ये असलेल्या पट्ट्यातील टाटा पॉवर इंडस्ट्रिने सर्व्हे करण्याचे काम दिले असून त्यांच्य सोबत लवकरच करार करण्यात येईल अशाप्रकारे ४ ते ५ प्रोजेक्ट कार्यान्वित होणार आहेत ही बाब विचारात घेता शासनाने गॅसचा तुटवडा कमी करण्यासाठी व वीजेची निर्मिती करुन भारनियमन मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी जीओथर्मल पॉवर प्रोजेक्ट राज्यात विशेषत: जेथे औष्णिक विद्युत केंद्र आहेत व त्याठिकाणी भुगर्भाची स्थिती जिओ-थर्मल पॉवर प्रोजेक्ट उभारणी करण्यायोग्य असेल अशा ठिकाणी सदर प्रोजेक्ट प्राधान्याने राबविण्याच्या दृष्टीने एक धोरणात्मक निर्णय म्हणून यासंदर्भातील सर्व बाबींची पूर्तता करुन सदर प्रोजेक्ट लवकरात लवकर कसे पूर्ण होतील यादृष्टीने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत व त्याबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नियोजन (रोहयो) विभाग

६ रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर विहिरी योजनांना निधी वाढविणे.

६.१ भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्याची छाननी करण्याचे **अनुदान क्र. ओ-३ "ग्रामीण रोजगार" मधील प्रधान लेखाशीर्ष २५०५ "ग्रामीण रोजगार"** या शिर्षाखाली बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपला अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्रमांक ओ-३ ग्रामीण रोजगार

(रुपये हजारात)

६.२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
प्रधान शीर्ष - **२५०५, ग्रामीण रोजगार** **दत्तमत** मुळ ..... ९,९७,५५,१५ पूरक ..... ५,०० वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २००८)	९,९७,६०,१५	८,९७,९३,३१	-९९,६६,८४ ६५,४९,४०

(१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
भारित मुळ ..... १६,४२,४४,३२ पूरक .... वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २००८)	१६,४२,४४,३२	८,०१,३५	-१६,३४,४२,९७ १२,८४,६७,८५

टिपा व भाष्ये :-

अनुदान खर्च हा मूळ तरतूदीइतका देखील झाला नव्हता. रू.५ लाखांची पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिद्ध झाले व ही तरतूद लाक्षणिक मागणी म्हणून निर्बंधित करता येऊ

शकली असती. रू.९९६६.८४ लाखांची अंतिम बचत असतांना, वर्षभरात रू.६५४९.४० लाखांचा निधी परत करणे अपेक्षित होते.

६.३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, मुख्य लेखाशिर्ष २५०५ ग्रामीण रोजगार या मुख्य लेखाशीर्षांतर्गत दर्शविण्यात आलेला अधिक खर्च/बचत ही विविध उपशीर्षांतर्गत अधिक खर्च/बचतीचा बाबतची स्पष्टीकरणे पुढे नमूद केलेली आहेत.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखात)

६.४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
२५०५ ग्रामीण रोजगार ६०, इतर कार्यक्रम ००१, रोजगार हमी योजना ००१(०१)(०२) जवाहर विहिर कार्यक्रम- मुळ ..... १,५०,००.०० पुनर्विनियोजन ..... -१,१९,२९.४५	३०,७०,५५	२४,२१.९६	-६,४८.५९

कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च २००८ मध्ये प्रर्त्यपण/पुनर्विनियोजन यांद्वारे रू.१,१९,२९.४५ लाखांचा निधी काढण्यात आला. रू.६,४८.५९ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००८)

६.५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ००१(०१)(०२) जवाहीर विहीरी कार्यक्रम (२५०५ ७६४) दत्तमत

खालील कारणांसाठी रू.१,१९,२९.४५ लाख इतका निधी काढण्यात आला.

राज्यात सन २००६-०७ पासून केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. सदर योजना ही मागणी प्रवण योजना असून सदर

योजने अंतर्गत रोजगाराची मागणी वाढत असल्याने योजनेसाठी द्यावयाच्या राज्य हिस्सा व इतर बाबींवरील तातडीचा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पित तरतूद अपुरी पडत होती. त्यामुळे सदर तातडीचा खर्च भागविण्यासाठी या उपशीर्षाखालील रू.९६,३०.०० लाख इतकी निधी पुनर्विनियोजनाद्वारे वळविण्यात आला. तसेच, जवाहर विहीरी कार्यक्रम ही वैयक्तिक लाभाची प्रतिपूर्ती योजना आहे. या योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकडून निधीची मागणी कमी प्राप्त झाल्यामुळे निधी अखर्चित रहाण्याची शक्यता असल्याने वरीलप्रमाणे निधी पुनर्विनियोजीत करण्यात आला. तथापि, तरीदेखील निधी अखर्चित रहाणार असल्याने रू.२२,९९.४५ लाख इतकी तरतूद समर्पित करण्यात आली.

त्यामुळे उक्त पुनर्विनियोजीत रू.९६,३०.०० लाख अधिक समर्पित रू.२२,९९.४५ लाख मिळून एकूण रू.१,१९,२९.४५ लाख इतका निधी काढण्यात आला.

खालील कारणांसाठी रू.६,४८.५९ लाख इतकी बचत झाली.

जवाहर विहीरी कार्यक्रम योजने अंतर्गत विहिरींची कामे पूर्ण न झाल्यामुळे लाभार्थ्यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती अदा करता आली नाही. त्यामुळे सदर बचत झाली आहे. सदरची बचत एकूण अनुदानाच्या २१.१२% इतकी आहे.

(रुपये लाखात)

६.६ प्रधान शिर्ष			**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)			**(२)**	**(३)**	**(४)**
६०, इतर कार्यक्रम					
००१, रोजगार हमी योजना					
००१(०१)(०३) उद्यानविद्या -					
मुळ	.....	१,२५,००.००	१,०३,८०.१९	९४,६६.१४	-९,१४.०५
पुनर्विनियोजन	.....	-२१,१९.८१			

कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च-२००८ मध्ये रू.२१,१९.८१ लाखांचा परत केलेला निधी हा, रू.९,१४.०५ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता अपुरा असल्याचे सिद्ध झाले, त्याची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट-२००८)

६.७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ००१ (०१) (०३) फलोत्पादन कार्यक्रम (२५०५ ७७३) दत्तमत

खालील कारणांसाठी रू.२१,१९.८१ लाख इतका निधी समर्पित करण्यात आला.

फलोत्पादन कार्यक्रम ही वैयक्तिक लाभाची प्रतिपूर्ती योजना आहे. या योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकडून निधीची मागणी कमी प्राप्त झाल्यामुळे निधी अखर्चित रहाण्याची शक्यता असल्याने रू.२१,१९.८१ लाख इतकी तरतूद समर्पित करण्यात आली.

तसेच, खालील कारणांसाठी रू.९,१४.०५ लाख इतकी बचत झाली.

फलोत्पादन कार्यक्रम योजने अंतर्गत फळबागांची लागवड केलेल्या लाभार्थ्यांनी केलेल्या प्रतिपूर्ती मागण्यांचे प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने प्रतिपूर्ती अदा करता आली नाही. त्यामुळे सदर बचत झाली आहे. सदरची बचत एकूण अनुदानाच्या ८.८०% इतकी आहे.

(रुपये लाखात)

६.८ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
६०, इतर कार्यक्रम ००१, रोजगार हमी योजना ००१(०१)(०१) रोजगार हमी योजना - मुळ ..... ७,२१,४८.१० पूरक ..... ५.०० पुनर्विनियोजन ..... - ७४,९९.८६	७,९६,५२.९६	७,७८,०४.१५	- १८,४८.८१

कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च-२००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे तरतूद केलेला रुपये ७४,९९.८६ लाखांचा अतिरिक्त निधी हा, रू.१८,४८.८१ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता अत्याधिक असल्याचे सिद्ध झाले, त्याची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट-२००८)

६.९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ००१ (०१) (०१) रोजगार हमी (२५०५ २२००) दत्तमत

खालील कारणांसाठी रू. ७४,९९.८६ लाख इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करावा लागला.

राज्यात सन २००६-०७ पासून केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. सदर योजना ही मागणी प्रवण योजना असून सदर योजने अंतर्गत रोजगाराची मागणी वाढत असल्याने योजनेसाठी द्यावयाच्या राज्य हिस्सा व इतर बाबींवरील तातडीचा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पित तरतूद अपुरी पडत होती. त्यामुळे सदर तातडीचा खर्च भागविण्यासाठी रू.५.०० लाख इतका निधी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करण्यात आला. तसेच, ००१(०१)(०३) जवाहर विहीरी कार्यक्रम या उपशीर्षाखालील रू.९६,३०.०० लाख इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे वळवून उपलब्ध करण्यात आला.

तथापि, नंतर सदर मागणी प्रवण योजने अंतर्गत रोजगाराची मागणी कमी झाल्यामुळे योजनेसाठी द्यावयाच्या राज्य हिस्सा व इतर बाबींवरील खर्चासाठी क्षेत्रीय स्तरावरुन निधीची मागणी देखील कमी प्राप्त झाली. त्यामुळे निधी अखर्चित रहाणार असल्याने रू.२१,३०.१४ लाख इतकी तरतूद समर्पित करण्यात आली.

तसेच, खालील कारणांसाठी रू.१८,४८.८१ लाख इतकी बचत झाली.

केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाल्यामुळे जुनी राज्य रोजगार हमी योजना बंद झाली व ती मधील कांही अपूर्ण कामे नव्या केंद्र पुरस्कृत योजनेत वर्ग करण्यात आली. तसेच केंद्र पुरस्कृत योजना नवीन असल्याने क्षेत्रीय स्तरावर निधी पूर्ण खर्च झाला नाही. त्यामुळे सदर बचत झाली आहे. सदरची बचत एकूण अनुदानाच्या २.३२% इतकी आहे.

(रुपये लाखात)

६.१० प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
६०, इतर कार्यक्रम ००१, रोजगार हमी योजना ००१(०१)(०१) रोजगार हमी योजना (२५०५ ०३८१) भारित - मुळ ..... २,५०.०० पुनर्विनियोजन ..... -१,७३.५३	७६.४७	५८.१०	-१८.३७
६०, इतर कार्यक्रम ७९७, राखीव निधीकडे हस्तांतरण शासकीय अंशदान मुळ ..... १६,३९,९४.३२ पुनर्विनियोजन १२,८२,९४.३२	३,५७,००.००	७,४३.२६	-३,४९,५६.७४

कोणतेही विशिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २००८ मध्ये रू.१२,८४,६७.८५ लाखांचा निधी परत करण्यात आला. वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रूपये ३४,९७५.११ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट-२००८)

६.११ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ००१ (०१) (०१) रोजगार हमी योजना (२५०५ ०३८१) भारित

या उपशीर्षाखाली झालेल्या रू.१८.३७ लाख इतक्या बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

रोजगार हमी योजने अंतर्गत कामांसाठी संपादित केलेल्या जमिनींच्या भूसंपादन मोबदल्यांचे प्रकरणी मा.न्यायालयांचे निर्णय झालेले होते. त्यानुसार निधी मागणीची प्रकरणे त्रुटी पूर्ततेस्तव परत करण्यात आली होती. ती पूर्ततेसह प्राप्त न झाल्याने/विलंबाने प्राप्त झाल्याने निधी वितरीत करता आला नाही व त्यामुळे सदर बचत झाली आहे.

७९७, राखीव निधीकडे हस्तांतरण

शासकीय अंशदान (२५०५ ०३५२) भारित

या उपशीर्षाखाली झालेल्या रू.३४९,५६.७४ लाख इतक्या बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

सन २००७-२००८ या वित्तीय वर्षाकरिता राखीव निधीकडे हस्तांतरणाचे शासकीय अंशदान (भारित) यासाठी वित्त विभागाकडून अंतिम अंदाज निश्चित करण्यात येतो. त्यानुसार वित्त विभागाने एकूण रू.१६,३९,९४,३२ हजार इतकी रक्कम अर्थसंकल्पित केलेली होती.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, यांच्या दिनांक १५/९/२००३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार शासनाने रू.३५७००० लाख इतकी रक्कम, प्रत्येकी रू.३५७०० लाख रकमेच्या १० समान वार्षिक हप्त्यांत राखीव निधीकडे हस्तांतरीत करावयाची होती. त्यास्तव, सदर १० पैकी ५ वा हप्ता भरण्याकरिता आवश्यक असणारी रू.३५७००.०० लाख इतकी रक्कम वगळून, उर्वरीत रू.१२८२९४.३२ लाख इतकी रक्कम शासन ज्ञापन दि.३१-०३-२००८ (प्रत संलग्न) **विवरण पत्र क्र.१** अन्वये समर्पित करण्यात आली.

सदर ५ व्या हप्त्याची रू.३५७०० लाख इतकी रक्कम मार्च-२००८ मध्ये महालेखापाल कार्यालयाकडून पुस्तकी समायोजनाने राखीव निधीकडे जमा केली जाणार होती. तथापि, तसे पुस्तकी समायोजन करण्यासाठीचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास वेळेत सादर केला गेला नाही. त्यामुळे सदर बचत झाली.

तथापि, सन २००८-२००९ या वित्तिय वर्षामध्ये सन २००७-२००८ मधील रू.३५७०० लाख व सन २००८-२००९ चे रू.३५७०० लाख असे एकूण रू.७१४०० लाख इतक्या रकमेचे समायोजन करण्यात आले आहे.

साक्ष :-

६.१२ विभागाने पूरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दि.२३ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रधान सचिव, नियोजन (रोजगार हमी योजना) ची साक्ष घेतली. परंतु साक्षीच्या बैठकीत विभागाकडून सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेला अनूदान क्र. ओ-३ "ग्रामीण रोजगार" परिच्छेदासंदर्भात स्पष्टीकरण ज्ञापने विधानमंडळ सचिवालयास स्मरणपत्रे पाठवून सुद्धा प्राप्त झाली नसल्याने सदर परिच्छेदासंदर्भात साक्ष होउ शकली नाही. मंत्रालयीन विभाग लोकलेखा समितीचे कामकाज गंभीरपणे दखल घेतली जात नाही अशी तीव्र नाराजी व्यक्त

करून समितीने विभागीय कामकाजाबाबत असमाधान व्यक्त केले व स्पष्टीकरण ज्ञापने यापूढे वेळेवर पाठविण्याची विभागाकडून दक्षता घेण्यात यावी असे निदेश दिले व सदर परिच्छेदासंदर्भाततील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्राप्त झाल्यानंतर समितीने दि.१२ सप्टेंबर, २०१२ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची पुन्हा साक्ष घेतली.

६.१३ सदर साक्षीच्या वेळी जवाहर विहीर कार्यक्रमाच्या संदर्भात समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीला सांगितीले कि, सन १९९१-९२ पासून जवाहर विहीर कार्यक्रम राज्यात सुरु करण्यात आलेला आहे. जवाहर विहिरीसाठी १ लाख रुपये दिले जातात. ही प्रतिपूर्तीची योजना आहे. शेतकऱ्यांना जवाहर विहिरीच्या कामासाठी ५०, ३० आणि २० टक्के अशा तीन टप्प्यात निधी दिला जातो. शासनामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाला निधी वितरित केला जातो. जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे निधी वितरीत करतात. त्यानंतर कार्यकारी अभियंता पंचायत समितीला निधी वितरित करतात. पंतप्रधान पॅकेजमध्ये विदर्भातील ६ जिल्ह्यात धडक सिंचन कार्यक्रम घेऊन या योजनेचे लक्ष्य वाढवून देण्यात आले होते. यामध्ये इतर एजन्सी सुध्दा काम करीत आहेत. लाभार्थी शेतकऱ्याने विहिरीचे काम पूर्ण केल्यानंतर संबंधित अभियंते मोजमाप घेतात. जिल्ह्याकडून निधीची मागणी आल्यानंतर निधी वितरित केला जातो. त्यामुळे एका वर्षासाठी किती निधी लागेल हे निचितपणे सांगता येत नाही. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या विहिरींची मागणी जास्त आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी या योजनेच्या विहिरीसाठी २ लाख रुपये मदत दिली जाते. जवाहर विहीर सिंचन संबधात सविस्तर टिपणी अहवालाच्या शेवटी जोडली आहे. **(विवरण क्र.)**

६.१४ समितीने सन २००७-२००८ मध्ये अपेक्षित असलेल्या विहीरींची कामे न होण्याची कारणे काय आहेत तसेच जवाहर विहिरींची मागणी मोठ्या प्रमाणावर असताना सुध्दा जवाहर विहिरी मंजूर केल्या जात नाहीत अशी विचारणा केली याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, जवाहर विहीर लाभार्थ्यांना त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात अनुदान वाटप केले जाते त्यामुळे केलेल्या कामाचे परिमाण अपेक्षित परिमाणापेक्षा कमी झाले. काही लाभार्थ्यांनी आर्थिक वर्षात कामे पुर्ण न केल्याचे तसेच मंजूरी आदेश देऊनही कामे सुरु न केल्यामुळे

लाभार्थ्यांच्या दिरंगाईमुळे, विहीरींची कामे विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने व लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने विहिरींची कामे कमी प्रमाणात झाली आहेत.

६.१५ पंचायत समिती मार्फत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविली जात असल्यामुळे विभागाने या योजनेचा अभ्यास केला पाहिजे. पंचायत समिती तालुक्याच्या ठिकाणी असते. एका तालुक्यात अनेक गावे असतात काही गावांमध्ये एकही जवाहर विहीर मंजूर करण्यात आलेली नाही आणि काही गावांमध्ये अनेक जवाहर विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. म्हणून विभागाने याबाबत नियोजन करावयास पाहिजे. राजकीय दबाव आल्यानंतर जवाहर विहिरी मंजूर केल्या जातात काय ? जवाहर विहिरींचे सम प्रमाणात वाटप करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात विभागाने काही विचार केलेला आहे काय तसेच जवाहर विहीर मंजूर करण्याचे निकष काय आहेत याबाबत विभागीय सचिवांकडून उत्तर प्राप्त झाले नाही परंतु त्यांनी समितीस सांगितले की, मजुरी, जवाहर विहीर आणि फलोत्पादन अशा तीन शीर्षाखाली निधी मिळतो. आता राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांची मजुरी वाढविण्यात आलेली आहे.

६.१६ लोकप्रतिनिधी ग्रामीण भागात काम करतात. जवाहर विहीर कार्यक्रमासाठी तीन-चार वर्षे निधी मिळत नाही. मोजमापीच्या नावाखाली भ्रष्टाचार केला जातो. शेतकरी कर्ज काढून विहिरीचे काम पूर्ण करतात. एका जवाहर विहिरीचे काम पूर्ण करण्यासाठी तीन-चार वर्षे का लागतात ? ठराविक कालावधीत विहिरीचे काम पूर्ण झाले पाहिजे, विहिरीसाठी अमूक इतका निधी दिला पाहिजे, विहीर मंजूर झाल्यानंतर विहिरीचे काम पूर्ण करुन घेतले पाहिजे याबाबत विभागाचे नियोजन काय आहे ? याबाबतची माहिती समितीला बैठकीच्या वेळी मिळू शकली नाही.

६.१७ जवाहर विहीर कार्यक्रम ही वैयक्तिक लाभाची योजना आहे. व्यवसायी कराच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेसाठी निधी जमा केला जातो. या माध्यमातून शासकीय तिजोरीत जेवढा निधी जमा होईल तेवढा निधी राज्य शासनाने जमा करुन तो निधी रोजगार हमी योजनेच्या कामांवर खर्च करावयाचा आहे. परंतु मागील ५ वर्षापासून रोजगार हमी योजनेच्या कामासाठी निधी दिला जात नाही. रोजगार हमी योजनेची इतर कामे सुध्दा बंद आहेत. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेच्या मजुरांना कार्ड देण्यात आलेले आहे. या योजनेचे

ठराविक मजूर आहेत. त्या मजुरांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे करावयाची आहेत. मजुरांना दोन-चार महिने वेतन मिळत नाही. वैजापूर तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी २ विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या विहिरींच्या कामासाठी निधी मिळत नाही. रोजगार हमी योजनेचा कायदा तयार करण्यात आलेला आहे. जे मॅन्युअल तयार करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे कामे झाली पाहिजेत. व्यावसायीक कराच्या माध्यमातून जमा होणारा निधी रोजगार हमी योजनेच्या कामांवर खर्च का केला जात नाही ? समितीने उपस्थित केलेल्या या मुद्यासंदर्भात विभागीय सचिवांकडून उत्तर प्राप्त झाले नाही आणि या संदर्भातील लेखी माहिती सुद्धा विभागाकडून प्राप्त झाली नाही.

६.१८ विदर्भातील ६ जिल्ह्ये वगळले तर संपूर्ण राज्यात मागील ५ वर्षात जवाहर रोजगार योजने अंतर्गत एकही विहरी मंजूर करण्यात आलेली नाही. पंतप्रधान पॅकेज मिळाल्यानंतर विदर्भातील ६ जिल्ह्यांसाठी निधी दिला गेला. त्यावेळी विदर्भातील ६ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक हजार विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यावेळी एका विहिरीसाठी ६५ हजार रुपये देण्यात आले होते. विहिरीच्या कामासाठी जवढे पैसे द्यावयास पाहिजे होते तेवढे पैसे दिले गेले नाहीत. त्यामुळे विहिरींचे काम पूर्ण झालेले नाही. शेतकऱ्यांच्या शेतात फक्त खड्डे खोदण्यात आलेले आहेत. त्या विहिरींना पाणी लागलेले नाही. शेतकऱ्यांना विहिरीचा दुसरा हप्ता देण्यात आलेला नाही. यासंदर्भात सन २००८ पासून समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता याबाबत विभागीय सचिवांनी खूलासा केली की, सन २००८ पासून ज्या जिल्ह्यातून कामाची मागणी येते, त्या ठिकाणी निधीचे वितरण करण्यात येते. १-२ जिल्हे वगळता सर्व जिल्ह्यांमधून कामाची मागणी येते. त्याप्रमाणे निधी देण्यात येतो. सध्या त्रैमासिक मागणी विचारात घेतली जाते. ६ जिल्ह्यांमध्ये मोठया प्रमाणात निधीचे वितरण झालेले आहे. एकूण किती निधीचे वितरण झाले आहे, तसेच याबाबतची आकडेवारी नंतर उपलब्ध करून दिली जाईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिली परंतु अद्यापपर्यंत विभागाकडून माहिती प्राप्त झाली नाही.

६.१९ विदर्भातील सहा जिल्ह्यातील रोहयो खाली सिंचन विहीरीचा धडक कार्यक्रम संदर्भातील शासन निर्णय अहवालाच्या शेवटी **विवरण क्र ३** जोडले आहे.

६.२० सन २००८ नंतर ६ जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांना निधी मंजूर झालेला नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले व सन २००८ नंतर कोणत्या जिल्ह्याला किती निधी वितरित केला गेला, याची माहिता सादर करण्याचे निदेश विभागास दिले असता विभागीय सचिवांननी सन २०११-१२ मध्ये ६ जिल्हे वगळून जवाहर विहीर कार्यक्रमाकरिता वितरित केलेल्या निधीची आकडेवारी खालील प्रमाणे सांगितली

जिल्हा	**वितरित केलेला निधी (रुपये लाखात)**
रत्नागिरी	५.६७
सिंधुदुर्ग	८.४८
पुणे	३५.२३
सातारा	१८.५३
कोल्हापूर	२६४.२८
जालना	३८८.१२
परभणी	१०
बीड	३५२
लातूर	८.०९
नागपूर	११२४
भंडारा	८०२
गोंदिया	६२४.२७
चंद्रपूर	१५००
गडचिरोली	१०००
वाशिम	५०
यवतमाळ	६७.३४

६.२१ विभागाने वितरीत केलेली उपरोक्त निधीची आकडेवारी पाहता काही जिल्हयांना ११२४ कोटी रुपये तर काही जिल्ह्यांना ८ कोटी रुपये वितरित केले गेले आहेत. त्यामुळे या

संदर्भात विभागाने अधिक सविस्तर माहिती सादर करावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.परंतू विभागाकडून माहिती अप्राप्त आहे.

६.२२ सन २००७-०८ ते २०११-१२ या वर्षामधील रोजगार हमी योजनेंतर्गत जवाहर कामाची सद्य:स्थितीबाबतची माहिती अहवालाच्या शेवटी वर जोडली आहे. **(विवरण क्र. ----)**

६.२३ राज्यात पहिल्या टप्प्यात कोणत्या १२ जिल्ह्यांमध्ये व दुसऱ्या टप्प्यात कोणत्या ६ जिल्ह्यांमध्ये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना सुरु झाली होती. सदर योजनेचे निकष काय होते ? या संदर्भातील लेखी माहिती विभागाकडून पुढील प्रमाणे प्राप्त झाली आहे.

"राज्यात पहिल्या टप्प्यात खालील १२ जिल्ह्यांमध्ये दि.२.२.२००६ पासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली होती.

१) अहमदनगर २) अमरावती ३) औरंगाबाद ४) भंडारा ५) चंद्रपूर ६) धुळे ७) गडचिरोली ८) गोंदिया ९) नांदेड १०) नंदुरबार ११) यवतमाळ १२) हिंगोली

दुसऱ्या टप्प्यात खालील ६ जिल्ह्यांमध्ये दि.०१.०४.२००७ पासून योजना सुरु झाली.

१) अकोला २) बुलढाणा ३) उस्मानाबाद ४) ठाणे ५) वर्धा ६) वाशिम

तिसऱ्या व शेवटचा टप्पा उर्वरित १५ जिल्ह्यांमध्ये दि.०१.०४.२००८ पासून योजना सुरु झाली.

१) बीड २) जळगाव ३) जालना ४) कोल्हापूर ५) लातूर ६) नागपूर ७) नाशिक ८) परभणी ९) पुणे १०) रायगड ११) रत्नागिरी १२) सांगली १३) सातारा १४) सिंधुदुर्ग १५) सोलापूर

सदर योजनेचे निकष राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ नुसार निश्चित करण्यात आले आहेत."

६.२४ मागील ५ वर्षापासून रोजगार हमी योजनेच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. या योजनेच्या विहिरीसाठी २ लाख रुपये मदत दिली जाते. २ लाख रुपयांची विहीर मंजूर होत असताना एक लाख रुपयांची जवाहर विहीर कोण घेणार आहे? म्हणून जवाहर विहिरीसाठी निधी वाढवून देण्याची आवश्यकता आहे.

६.२५ राज्य शासनाने आता जवाहर विहिरी मंजूर करणे जवळपास बंदच केलेले आहे. आता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (एमआरईजीएस) सुरु करण्यात

आलेली आहे. मागील ५-६ वर्षापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जवाहर विहिरींचे पैसे लाभार्थी शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाहीत, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आहेत. असे असताना ९६.३० कोटी रुपये पुनर्विनियोजित करण्याची कारणे काय आहेत? व सदर निधी कोणत्या शिर्षाखाली वळविण्यात आला. याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरत पूढील प्रमाणे नमूद केले आहे.

६.२६ "राज्यात सन २००६-०७ पासून केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. सदर योजना ही मागणी प्रवण योजना असल्याने आणि या योजनेखाली रोजगाराची मागणी वाढत असल्याने योजनेसाठी द्यावयाचा राज्य हिस्सा व इतर बाबींवरील तातडीचा खर्च मागविण्यासाठी अर्थसंकल्पित तरतूद अपुरी पडत होती त्यामुळे सदर तातडीचा खर्च भागविण्यासाठी ९६.३० कोटी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेकडे वाळविण्यात आली."

६.२७ "जवाहर विहिरी कार्यक्रम योजने अंतर्गत क्षेत्रिय कार्यालय यंत्रणेकडून निधी मागणीचे प्रमाण कमी आहे व विहिरींची कामे पूर्ण न झाल्यामुळे लाभार्थ्यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती अदा करता आली नाही. त्यामुळे बचत झाली व सदरची बचत एकूण अनुदानाच्या २१.१२ टक्के इतकी आहे असे विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे असे असताना संबंधित अधिकाऱ्यांवर जवाहर विहिरीची कामे पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

६.२८ परंतु क्षेत्रिय कार्यालयाकडून निधी मागणीचे प्रमाण कमी येण्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जवाहर विहिरी कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्याकडून निधीची मागणी करण्यात येते. परंतु सदर योजना नवीन असल्यामुळे मजुरांची कामाची मागणी कमी होती. त्यामुळे निधी मागणीचे प्रमाण कमी होते. जिल्हानिहाय कामाची माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे.

६.२९ सन १९९१-९२ पासून शासनाने संपूर्ण राज्यात जवाहर विहीर कार्यक्रम सुरु केलेला आहे. तेव्हापासून राज्यामध्ये किती जवाहर विहीरींची कामे हाती घेण्यात आली, त्यापैकी किती विहीरींची कामे पूर्ण झाली व किती विहीरींना पाणी लागले ? विहीरीची कामे हाती घेताना कोणते निकष निश्चित करण्यात आले होते. तसेच काही जिल्ह्यांमध्ये विहीरीची

कामे मंजूर करण्यासाठी १० टक्के रकमेची मागणी केली जाते. अशी रक्कम घेण्याबाबत अधिकृतपणे वा अनधिकृतपणे काही नियम ठरवण्यात आलेला आहे काय ? काही टक्के रक्कम स्वीकारून विहीरींच्या कामाला मंजुरी देण्याचे धोरण ठरवले आहे काय ? जवाहर विहीरींचा कामाचा दर्जा हा निकृष्ट असतो. जवाहर विहीरींची योजना कोणत्या यंत्रणेमार्फत राबवली जाते ? पंचायत समितीकडे सदर योजनेचे नियंत्रणाचे काम सोपवले आहे. मात्र त्यांच्याकडून योग्य प्रकारे काम केले जात नाही. यामुळे कामाचे बिल वेळेवर निघत नाहीत. अनेकदा बिल मंजूर करण्यासाठी पैसे मागितले जातात. यामुळे कामे पूर्ण होऊन देखील शेतकऱ्यांना पैसे मिळण्यास बराच विलंब होतो.या संदर्भात शासनाची काही व्यवस्था आहे काय तसेच या बाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे काय ?या समितीने उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

६.३० अनेक ठिकाणी जवाहर विहिरींची कामे होतात मात्र निधी दिला जात नाही.याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जवाहर विहीर योजना ही प्रतिपूर्ती योजना आहे. या योजनेंतर्गत कामे हाती घेण्यासाठी शेतकऱ्यांनी देखील आपला हिस्सा दिला पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर समिती मार्फत कामाचे मोजमाप करून शेतकऱ्यांना अदायगी केली जाते. त्रैमासिक मागणी लक्षात घेऊन किती निधी द्यावयाचा हे ठरवले जाते. यंदा विभागाने २०० कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये केलेली आहे. मागील वर्षी देखील निधीची तरतूद करण्यात आली होती. साधारणपणे जून महिन्यामध्ये कामाची मागणी अधिक असते. या गोष्टींचा विचार करून महिना निहाय तक्ता तयार करून निधी उपलब्ध करून देण्याचा विभागामार्फत प्रयत्न केला जातो. मात्र सर्वच मागण्या मान्य केल्या जात नाहीत, हे देखील खरे आहे.

६.३१ कामे किंवा मागण्या मान्य करण्याचे निकष काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागासवर्गीय अल्प भूधारक शेतकऱ्यांना २० टक्के, अमागासवर्गीय व ५ एकर पर्यंत जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना ४० टक्के तसेच नाबार्ड अंतर्गत ५ एकर पर्यंत जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना ४० टक्के निधी दिला जातो.

६.३२ मागील वर्षी शासनाने अर्थसंकल्पामध्ये १०० कोटी रुपयांची तरतूद केली होती व यंदा २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र त्या प्रमाणात खर्च झालेला

नाही. या संदर्भात लोकप्रतिनिधींनी उच्च न्यायालयामध्ये दाद मागितली होती. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने असा निर्णय दिला की, १५ दिवसाच्या कालावधीमध्ये कामांची मागणी करण्याकरिता अर्ज मागवावेत, त्या करिता गावामध्ये दवंडी द्यावी.पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत यांनी अर्ज द्यावेत. या नंतर प्राप्त अर्जांची छाननी झाल्यानंतर ते अर्ज आमदारांच्या समिती समोर ठेवावे. या समितीमध्ये पंचायत समितीचे सभापती, उपसभापती,बीडीओ, तहसीलदार, आमदार यांनी अर्जांची निवड करायची. या समितीमध्ये एका जागेसाठी २ अर्जांची निवड करावी. या नंतर हे अर्ज पालक मंत्री महोदयांकडे पाठवावे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर ४ उमेदवार या समितीचे सदस्य असतात. या समितीमध्ये अर्जांची अंतिम निवड करून मान्यता द्यावी. अशी योजना तत्कालीन मंत्री महोदय यांनी सन २००८ मध्ये तयार केली होती. हे अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूर करावेत अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती. त्याकरिता कोर्टाचे अंतरिम आदेश ही घेण्यात आले होते व सन २०१० मध्ये लोकप्रतिनिधींच्या बाजूने निकाल लागला. या नंतर उच्च न्यायालयाने नवीन समितीची स्थापना केली.

६.३३ रुपये २०० कोटी कोणत्या जिल्ह्यांना वितरित करावयाचा आहे, हे प्रशासनाने ठरवले पाहिजे. अन्यथा मंत्री महोदयांच्या किंवा इतर महत्वाच्या राजकीय व्यक्तींच्या जिल्ह्यांनाच निधी वितरित केला जातो. यामुळे उर्वरित जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही अशी खंत समितीने व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संपूर्ण राज्यामध्ये १ लाख ३५ हजार अर्ज आले असून त्यापैकी १ लाख ९ हजार लाभार्थ्यांची निवड झालेली आहे. पूर्ण विहीरी ५४ हजार असून प्रगत विहिरींची कामे ३० हजार आहेत. तसेच ३१२ विहीरींचे काम सुरू होऊन बंद पडले आहे. निष्फळ विहीरी १३८ असून १९ हजार विहीरींचे काम सुरू केलेले नाही व रद्द कामे ५४९४ आहे. केंद्र शासनाने जवाहर विहिरींचा कार्यक्रम सुरू केल्यानंतर सन २००९ मध्ये व्यक्तिगत लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाचा समावेश केला गेला. या करिता ग्रामपंचायतीच्या मंजुरीची आवश्यकता असते. यामुळे मागील वर्षी सदर योजनेंतर्गत मोठया प्रमाणात कामे हाती घेतली गेली नाहीत. मार्च २०११ मध्ये शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर विहिरींच्या कामाची मागणी वाढली. मागणी करण्यात आलेली कामे पूर्ण केली जाणार आहेत. एससी, एस.टी, बी.पी.एल, इंदिरा आवास योजनेमधील लाभार्थी, ५ एकरपर्यंत

जमीन असणारे शेतकरी, सर्वसाधारण वर्गातील शेतकरी यांना ही योजना अनुज्ञेय आहे. परंतु सदर योजना ही राज्यामध्ये अल्प भूधारक वर्ग २ व सर्वसाधारण वर्गातील शेतकऱ्यांना लागू नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

६.३४ समितीने पुढे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधील कामाच्या वाटपाच्या संदर्भात व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरी मंजूर करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे याबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण ६ प्रकारचे प्रवर्ग आहेत. एस.सी., यासाठी आर्थिक मर्यादा नाही. एस.टी., इंदिरा आवास योजनेचा लाभार्थी, बीपीएल लाभार्थी, लहान व सिमांत शेतकरी म्हणजे ज्यांच्याकडे ५ एकरपर्यंत जमीन आहे आणि वर्ग २ जमीनधारक असे ६ प्रकार निश्चित केले आहेत. हे निकष केंद्र शासनाने ठरवून दिलेले आहेत.

६.३५ राज्य शासन रोजगार हमी योजनेसाठी निधी गोळा करते. असे असताना या राज्यातील काही शेतकरी फायद्यापासून वंचित राहणार असतील तर त्यांना राज्याच्या रोजगार हमी योजनेतून लाभ का दिला जात नाही? याबाबत खुलासा करताना असे सांगण्यात आले की, राज्य शासनाची जवाहर विहीर योजना ५ एकरपर्यंत मर्यादित होती. जवाहर विहीर योजना ही प्रतिपूर्ती योजना आहे. राज्य रोजगार हमी योजनेमध्ये दोन प्रकारचे काम आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्यानुसार दोन प्रकारचे काम अनुज्ञेय आहे. एक सार्वजनिक स्वरुपाचे काम आणि दुसरे वैयक्तिक लाभार्थी योजना. वैयक्तिक लाभार्थी योजनेंतर्गत फलोद्यान आणि जवाहर विहीर कार्यक्रम मागील २० वर्षापासून राबविला जात आहे. जवाहर विहीर मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्याला १ लाख रुपये इतके मर्यादित अर्थसहाय्य दिले जाते आणि त्याची प्रतिपूर्ती कायद्यानुसार आम्ही करतो. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये प्रतिपूर्ती केली जात नाही. १५ दिवसात कामाचे मस्टर भरावे लागते. वेळेवर मजुरांना वेतन द्यावे लागते. एजन्सी म्हणून आम्ही निधी खर्च करतो. जवाहर विहिरीसाठी जॉब कार्ड किंवा मस्टरची प्रक्रिया केली जात नाही. ज्युनिअर इंजिनिअर कामाला मान्यता देतात आणि काम पूर्ण होईल त्याप्रमाणे प्रतिपूर्ती केली जाते. आजच्या काळात एका विहिरीचा खर्च २.५ ते ३ लाख रुपये होऊ शकतो. परंतु शासन १ लाख रुपयांपर्यंत मर्यादित अर्थसहाय्य देते.

६.३६ घर आणि जमीन ज्याच्याकडे नाही त्याचा बीपीएलच्या यादीत समावेश होतो. असा लाभार्थी विहीर कुठे घेणार असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता लाभार्थ्याकडे जमीन असलीच पाहिजे. सहा प्रकारचे लाभार्थी आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.३७ सहा प्रकारच्या लाभार्थ्यापैकी इंदिरा आवास योजनेचा लाभार्थी हा एक प्रकार आहे. इंदिरा आवास योजना सुरु झाली त्यामध्ये एक अट अशी घालण्यात आली होती की, जो भूमिहिन आहे, ज्याचे स्वत:चे घर नाही तोच इंदिरा आवास योजनेसाठी पात्र लाभार्थी ठरु शकतो. अशा लाभार्थ्याकडे जमीन कुठून येणार? मग हा प्रवर्ग करुन अंतर्भूत केला? कारण शेती आहे, परंतु जो दारिद्र्य रेषेमध्ये आहे, त्याला इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळतो. इंदिरा आवास योजनेचा लाभ घेतला म्हणजे तो भूमिहिन आहे असे नाही तसेच बीपीएलधारक आणि इंदिरा आवास योजनेचा लाभार्थी हे वेगवेगळे आहेत याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सहा निकष राज्य शासनाने ठरविलेले नसून केंद्र शासनाने शेड्युल्ड-१ मध्ये हे निकष ठरवून दिलेले आहेत. या सहा कॅटेगरीमध्ये जे समाविष्ट होतील त्यांनाच लाभ द्यावा अशा सूचना विभागाने दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या निकषांचे विभागाकडून पालन करण्यात येत आहे. कारण पूर्ण निधी केंद्र शासनाचा आहे.

६.३८ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमआरईजीएस) मधून किती लाभार्थ्यांना विहीर मंजूर केली गेली? याबाबतची आकडेवारी, विभागीय सचिवांकडे बैठकीच्या वेळी उपलब्ध नसल्यामुळे सदर आकडेवारी समितीस सादर केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले परंतु अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही.

६.३९ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु होण्यापूर्वी राज्याची रोजगार हमी योजना सुरु होती. त्यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र निधी उभा केला जात होता. केंद्र शासनाची योजना आल्यानंतर दरवर्षी २००० कोटी रुपये राखीव निधीची तरतूद केली गेली. आतापर्यंत प्रतिवर्षी त्यातील किती रक्कम खर्च करण्यात आली? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षी जवळपास ८५० कोटी रुपये खर्च करण्यात आले. स्टेट बजेटची रोजगार हमी योजना आहे. कोणत्या शीर्षाखाली किती खर्च झाला याची माहिती देता येईल. दोन प्रकारचा खर्च होतो. पहिल्याप्रथम केंद्रीय निधीचा राज्य हिस्सा द्यावा लागतो. केंद्र शासन १०० टक्के निधी देत नाही. कुशल भागाच्या २५ टक्के निधी दिला जातो.

वर्षाला १०० दिवस मजुरी द्यायची आहे. महाराष्ट्रात १५ टक्के मजुरांना १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस रोजगार दिला जातो. उर्वरित निधी राज्य शासनाकडून खर्च होतो.

६.४० वर्षाला १०० दिवसांपेक्षा जास्त काम केले अशा कुटुंबांची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, १.५ लाख इतके मनुष्य दिवस आहेत. केंद्र शासनाने मागील वर्षी १२७ रुपये मजुरीचा दर ठरवून दिला आहे. विभागाकडून महाराष्ट्रात त्यापेक्षा अधिक खर्च करण्यात येतो. राज्य शासनाचा मजुरीचा सरासरी दर १२७ पेक्षा अधिक आहे. या व्यतिरिक्त राज्य बजेटमधून राज्याचा हिस्सा दिला जातो. इतर राज्यात कायद्याप्रमाणे फक्त कुशल कामाच्या २५ टक्के निधी दिला जातो. इतर राज्ये वर्षाला १०० दिवसांपेक्षा जास्त रोजगार देत नाहीत. आंध्रप्रदेश १२० दिवस रोजगार देत असले तरी मजूर सकाळपासून काम करतात. ठराविक मर्यादेपर्यंत काम करा आणि नंतर घरी जा, असा प्रकार असतो. राजस्थान राज्यात सकाळी ७.०० ते १०.०० किंवा ११.०० वाजेपर्यंत मजूर काम करतात आणि घरी जातात. महाराष्ट्रात मात्र जूनी पध्दत अवलंबीत आहोत.

६.४१ गेल्या वर्षी औरंगाबाद जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात जूनी अपूर्ण रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली त्याची आम्ही अदायगी करीत आहोत. भूसंपादनाच्या प्रकरणांमध्येही अदायगी करावे लागते. योजनेतर पगार देता येत नाही म्हणून योजनांमधील निधीतून कर्मचाऱ्यांना पगार दिला जातो. नेहमी एक प्रश्न विचारला जातो की, निधी खर्च का होत नाही? राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम हे मागणीप्रमाणे आहे. मार्च महिन्यापर्यंत अमुक इतके काम होईल असे आज सांगता येत नाही. म्हणून क्रेडिट मर्यादा दिली जाते. इतर विभागांना यावर्षी इतका निधी पाहिजे असे ठामपणे सांगता येते. रोजगार हमी योजनेचे काम हे बदलत्या स्वरुपाचे आहे. सध्या महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयात ४७ हजार इतके सगळ्यात जास्त मजूर उपलब्ध आहेत. मागील महिन्यात उस्मानाबाद जिल्हयात सर्वाधिक मजूर उपलब्ध होते. ही स्थिती सदैव बदलत असते.

६.४२ समितीने पुढे अशी विचारणा केली की, अहमदनगर जिल्हयात कोणत्या स्वरुपाची कामे सुरु आहेत? याबाबत विहिरी, रोपवाटिका, बांधबंधिस्तीची कामे सुरु आहेत. कामांचा तपशील देता येतील. ज्या भागात पाऊस कमी झाला तेथे अधिक कामे होतात. उन्हाळ्यामध्ये नांदेड जिल्हयात जास्त कामे सुरु होती असे विभागाकडून सांगण्यात आले.

पाऊस कमी झाला म्हणून कामे हाती घेतली का? असा मुद्दा उपस्थित केला असता जर पाऊस वाढला तर मजूर शेताकडे वळतील. एकूण मनुष्यदिवसांपैकी २५ टक्के मनुष्यदिवस १८ ब्लॉकमध्ये निर्माण होतात. यापैकी सर्वात जास्त मनुष्यदिवस अक्कलकुवा, अक्राणी, भंडारा, गोंदिया, ब्रम्हपुरी, नांदेड येथे आणि ५० टक्के मनुष्यदिवस ५४ ब्लॉकमध्ये निर्माण होतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.४३ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून शेतकऱ्यांच्या शेतामध्ये लावणी ते कापणीपर्यंत प्रयोग केला जाणार होता त्याचे काय झाले? तसेच पायलट प्रोजेक्ट म्हणून शेतकऱ्यांच्या फळबागापासून जलसंधारणाची कामे, मातीचे बंधारे, नाला सरळीकरण, रोपवाटिका ही कामे, शेतातील पांदण रस्ते यांचा समावेश योजनेमध्ये केला होता. याबाबत माहिती देताना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम विभागाकडून करण्यात येते. खरे म्हणजे याची सर्व व्यवस्था आणि अधिकार ग्रामपंचायतीकडे आहेत. ज्यांनी २-२ कोटी रुपये खर्च केले अशा ग्रामपंचायतींना पारितोषिक मिळाले आहे. भंडारा आणि नांदेड जिल्हयातील सरपंचांना पारितोषिक मिळाले. लावणीपासून कापणीपर्यंतच्या पुन्हा-पुन्हा उद्‌भवणाऱ्या बाबींना केंद्र शासन परवानगी देत नाही.

६.४४ फलोत्पादन योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी स्थानिक पातळीपर्यंत राष्ट्रीय यंत्रणा काम करित नाही तसेच शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अपेक्षीत केलेल्या लागवडीपेक्षा कमी लागवड झालेली आहे याबाबत उपाययोजनेसंदर्भात विभागाकडून सविस्तर टिप्पणी **विवरण क्रमांक ---** वर जोडली आहे.

६.४५ शिरपूर पॅटर्नचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनामध्ये होऊ शकतो का? कारण अमरावती जिल्हयात डॉ.बोंडे यांनी प्रयोग केला, त्यांना ९० लाख रुपये दिले गेले. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर पैसे रोजगार हमी योजनेतून दिलेले नाहीत. रोजगार हमी योजनेमध्ये ६०:४० ची टक्केवारी पाळावा लागते. ते मशिन इन्टेसिव्ह वर्क आहे.

६.४६ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आल्यापासून राज्याच्या रोजगार हमी योजनेतून प्रतिवर्षी किती निधी खर्च केला गेला याची माहिती समितीला सादर करण्याबाबत तसेच कुटुंबातील एका व्यक्तीला वर्षाला १०० दिवस रोजगार देण्याची केंद्र सरकारने हमी

दिली आहे. राज्य शासनाने कुटुंबातील एका व्यक्तीला वर्षाला १०० ऐवजी १५० ते १७५ दिवस रोजगार देऊन राज्याच्या निधीतून काही खर्च केला असल्यास त्याची माहिती समितीला सादर करण्याचे निदेश समितीने विभागास दिले.

६.४७ लावणीपासून कापणीपर्यंत पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्या बाबींकरीता केंद्र शासन मान्यता देत नसेल, परंतु राज्याच्या रोजगार हमी योजनेत तरतूद करण्याकरिता शासनाने प्रस्ताव तयार केला आहे का? यासाठी केंद्र शासनाकडे जायची गरज नाही. ही मागणी पूर्वीपासून होत आहे. विशेषत: ज्या भागात कुपोषण आहे, आदिवासी शेतकरी कर्जबाजारी होत आहेत त्या ठिकाणी या योजनेचा फायदा देणे आवश्यक आहे.

६.४८ विशेषत: विहिरींची योजना ही भांडवली गुंतवणूक आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, राज्याची रोजगार हमी योजना किंवा अनेक योजनांच्या माध्यमातून याची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी व्हावी. राज्याकडून निधी मिळतो, केंद्राकडून काही निधी मिळतो, लाभार्थ्यांचा काही प्रमाणात हिस्सा असतो, त्यामुळे ही योजना अधिक परिणामकारक होण्याकरिता तांत्रिक अडचणी दूर केल्या पाहिजेत. २९ हजार विहिरी प्रलंबित आहेत. सरकारचा टप्प्याटप्प्याने मिळणारा निधी, लाभार्थ्यांचा हिस्सा याचा समन्वय साधून निधी १-२ वर्षात खर्च झाला पाहिजे. याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर काय अडचणी येतात या संदर्भात आपण समितीला एक टिप्पणी सादर करावी. जेणेकरुन समिती शासनाला शिफारस करु शकेल. हा विषय ग्रामीण भागाशी, विशेषत: शेतीशी निगडित आहे. दिवसेंदिवस या विषयाला प्राधान्य मिळणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

६.४९ केंद्र शासनाची योजना आणि राज्य शासनाची योजना या संदर्भात अद्ययावत माहिती पुस्तिका व काही शासन निर्णय असल्यास त्यांच्या प्रती समितीस सादर कराव्यात असे निदेश समितीने विभागास दिले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, केंद्र शासनाच्या योजनेची सर्व माहिती राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना एनआयसी.इन या संकेतस्थळावर इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये उपलब्ध आहे. एम.आय.एस.वर माहिती उपलब्ध करुन देणे विभागास बंधनकारक आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात किती कामे सुरु आहेत हे कोणीही एम.आय.एस.वर पाहू शकतो तसेच ग्रामपरिवर्तनाचे नवे पाऊल (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण

हमी योजना, महाराष्ट्र, परिचय, वैशिष्टे व शासन निर्णय) व ही विभागाकडून प्राप्त झालेली पुस्तिका लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

अभिप्राय व शिफाशी :-

६.५० राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतक-यांच्या जमिनीवर जवाहर विहिरी कार्यक्रम शासनाने सन १९९१-९२ पासून सुरु केला. ही योजना वैयक्तिक लाभाची प्रतिपूर्ती योजना असून या योजनेंतर्गत शेतक-यांनी प्रत्यक्षात केलेल्या विहिरीच्या कामानुसार त्यांना तीन टप्प्यात रुपये एक लाख एवढा निधी दिला जातो. सन २००७-२००८ मध्ये अपेक्षित असलेल्या विहिरींची कामे न झाल्याबाबतचा मुद्दा समितीपुढे चर्चेस होता. त्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, काही लाभार्थ्यांनी आर्थिक वर्षात कामे पूर्ण न केल्याने तसेच मंजूर आदेश दिल्यानंतरही कामे सुरु न केल्यामुळे विहिरींची कामे झालेली नाहीत. जवाहर विहिर योजना ही वैयक्तिक लाभाची प्रतिपूर्ती असल्याने लाभार्थ्यांना प्रथम काम पूर्ण करावे लागते व त्यानंतर जिल्हाधिकारी हे मागणी व उपलब्ध असलेल्या अनुदानातून निधी वितरित करीत असतात. परंतु, मुळातच योजना ही अल्पभूधारक शेतक-यांकरिता राबवली जात असल्याने हे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अतिशय कमकुवत व दुर्बल असतात. त्यामुळे त्यांच्याकडे विहिरीचे काम करण्यास भांडवलच उपलब्ध नसते. शासन टप्प्याटप्प्याने निधी देत असल्याने तसेच हा निधीही रुपये एक लाखापर्यंत मर्यादीत असल्याने आर्थिक दुर्बलतेमुळे शेतक-यांना जवाहर विहिरीचे काम विहित मुदतीत करुन घेणे शक्य होत नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत विहिरींच्या खर्चात दोन लाख रुपयांवरुन तीन लाख एवढी वाढ करण्यात आलेली आहे. **त्याचअनुषंगाने जवाहर विहिरी योजनेकरिता असलेली एक लाख रुपयाची मर्यादा वाढवून ती तीन लाख रुपये केल्यास जवाहर विहिर योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतक-यांना त्यांच्या जमिनींवर विहिर घेणे शक्य होईल. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत विहिरींच्या खर्चात करण्यात आलेल्या रुपये तीन लाखांच्या वाढी एवढीच वाढ म्हणजेच रुपये तीन लाख एवढ्या निधीची वाढ जवाहर विहिरी कार्यक्रमांतर्गत करण्यात यावी व याप्रकरणी विभागाने तातडीने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

६.५१ समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, काही तालुक्यांतील अनेक गावांत एकही जवाहर विहिर मंजूर करण्यात आलेली नाही तर काही गावांमध्ये अनेक जवाहर विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. ही विषमता दूर होणे आवश्यक असून यासंदर्भात विभागाने योग्य ते नियोजन करावे तसेच जवाहर विहिरी मंजूर करण्याच्या निकषांमध्ये राज्यस्तरीय आढावा घेऊन आवश्यक ती सुधारणा करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

६.५२ सन २००७-२००८ या वर्षांच्या विनियोजन लेख्यांची छाननी समितीने करावयाच्या प्रस्तावित दिनांकापर्यंत विभागाकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोकलेखा समिती कार्यालयास प्राप्त झाली नसल्यामुळे त्यासंदर्भातील विभागीय अधिका-यांची साक्ष पुढे ढकलण्यात आली होती. मंत्रालयीन विभाग हे महालेखापालांच्या अहवालातील प्रारुप परिच्छेदांना विहित मुदतीत उत्तरे पाठवित नाहीत तसेच महालेखापाल कार्यालयाकडून ती वेळेत संमत करुन घेण्याची देखील दक्षता घेत नाहीत. **समितीने यापूर्वीही अनेक प्रकरणी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देखील मंत्रालयीन विभागांकडून अशाप्रकारची कामातील कुचराई वारंवार होत असते यावर समितीने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करुन नियोजन विभाग तसेच इतर मंत्रालयीन विभागाच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त केले. यापुढील काळात मंत्रालयीन विभागांनी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने विहित मुदतीत महालेखापाल कार्यालयाकडून संमत करुन ती लोकलेखा समितीस पाठविण्याची दक्षता घ्यावी व याकरिता विभागामध्ये जबाबदार अधिका-यांची नियुक्ती करुन त्यांच्यावर यासंबंधीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

६.५३ समितीच्या साक्षीच्यावेळी परिपूर्ण माहितीसह प्रधान सचिव/सचिवांनी येणे अपेक्षित असतांना व त्यांनी बैठकीच्यावेळी माहिती न दिल्यास समितीस अपूर्ण माहिती प्राप्त होते. त्यावेळी काही मुद्यांबाबतची माहिती मागावून देण्यात येईल असे समितीस आश्वासन देण्यात येते. असे असतांनाही बऱ्याच वेळा सदर आश्वासित माहिती समिती आपला अहवाल तयार करीपर्यंत देखील समितीला प्राप्त होत नाही. **त्यामुळे समितीला काही बाबतीत आपले अभिप्राय देता येणे शक्य होत नाही. आश्वासित माहिती पाठविण्याची जबाबदारी विभागातील जबाबदार अधिका-यावर निश्चित करून माहिती न पाठविणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नियोजन विभाग

७ आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करणे.

७.१ भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क्र.ओ-४- प्रधान शीर्ष २५१५ "इतर ग्रामविकास कार्यक्रम" व अनुदान क्र.ओ-९ प्रधान शीर्ष ४५१५ "इतर ग्रामकविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च"** या शिर्षाअंतर्गत बचत झालेली आहे. बचती संबंधात महालेखापालांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

अनुदान क्रमांक ओ - ४ - इतर ग्रामविकास कार्यक्रम (सर्व दत्तमत)

(रूपये हजारात)

७.२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम दत्तमत मूळ ११,२७,४३,८९ पूरक ----- वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८).	११,२७,४३,८९	१०.३३	(-) ११,२७,३३,५६ - ४.३०

टिपा व भाष्ये :- रूपये ११,२७,३३.५६ लाखांची अंतिम बचत असताना मार्च, २००८ मध्ये रूपये ४.३० लाख एवढा निधी परत करणे अपेक्षित होते.

७.३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, अनुदान ओ-४ प्रधान शीर्ष-२५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम (सर्व दत्तमत) १०२, सामूहिक विकास १०२ (००) (०३) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत (लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम) आकस्मिक खर्च (२५१५ ०२४२) या खाली प्रत्यक्षात (रू.११,२७,४३.८९ मधून ८०० इतर खर्च या खालील तरतूद रू.११,२७,२८.८९

वजा जाता रू.१५.०० लक्ष कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त झाले त्यामधून रू.०९.७१ लक्ष खर्च झाला असून रू.०५.२९ लक्ष इतकी बचत झाली आहे.

(१) कार्यालयीन खर्चा करिता इतर लेखाशिर्षामधून पुरेसा निधी उपलब्ध झाल्याने उदा.३४५१ सदर लेखाशिर्षाखालील प्राप्त निधी पूर्ण खर्च होऊ शकला नाही.

(२) खर्चात झालेली बचत ही **अनुज्ञेय मर्यादेमध्ये** असल्यामुळे क्षमापित करण्यात यावी.

बचत पुढील प्रमाणे झाली.

(रुपये लाखात)

७.४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
८०० इतर खर्च ८००(०१)(०१) अर्थसंकल्पित न केलेल्या महसुली नियतव्ययाची ठोक तरतूद मूळ - -- - ---	११,२७,२८.८९	११,२७,२८.८९	-११,२७,२८.८९

रुपये ११,२७,२८.८९ लाख इतक्या संपूर्ण तरतूदींचा वापर केला नव्हता व ती परतही केली नव्हती. संपूर्ण तरतूदींचा वापर न केल्याची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

७.५ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मागणी क्र.ओ-४ मुख्य लेखाशिर्ष २५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च ८००(०१) (०१) हे लेखाशिर्ष शासनाच्या नियोजन विभागामार्फत हाताळण्यात येत नाही. वार्षिक योजना सन २००७-०८ अंतिम झाल्यानंतर अर्थसंकल्पिय अधिवेशनात इतर विभागांना ठरवून दिलेल्या नियतव्ययातील विना अर्थसंकल्पित उर्वरित नियतव्यय वित्त विभागाने मागणी क्र.ओ-४ २५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च ८०० (०१)(०१) अर्थसंकल्पित न केलेल्या महसूली नियतव्ययाची ठोक तरतूद या खालील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित केलेला आहे. तथापि सदर तरतूद या विभागाकडून कोणत्याही प्रयोजनास्तव वापरण्यात येत नाही. सबब या प्रधान लेखाशिर्षाखाली सन २००७-०८ मध्ये बचत झालेली नाही.

विनियोजन लेखे २००७-०८ या पुस्तकामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष खर्च दर्शविलेला आहे, तथापि प्रत्यक्ष खर्च "निरंक" असे दर्शविणे अपेक्षित आहे.

अनुदान क्रमांक ओ-९
"इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च"

(रू.हजारात)

७.६ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च दत्तमत मूळ ११,३०,२०,११ पूरक ८८,१३,३४	१२,१८,३३,४५	४,५७,४६,९३	-७,६०,८६,५२
वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २००८)			७,४३,७८,६४

टिपा व भाष्ये :- रुपये ७६,०८६,५२ लाख इतकी अंतिम बचत असताना मार्च, २००८ मध्ये केवळ रु.७४,३७८,६४ लाख इतका निधी परत करण्यात आला.

७.७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, याबाबतची सर्व कागदपत्रे दिनांक २१.६.२०१२ रोजी मंत्रालयात लागलेल्या आगीत नष्ट झाली असल्याने सदर माहिती पुनः संकलित करण्यात येत आहे. माहिती प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखात)

७.८ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
१०२ सामूहिक विकास १०२ (००) (०२) वैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रांतर्गत विकास कार्यक्रम मूळ १,००,००,०० पूरक ०.०१ पुनर्विनियोजन - ४०.८६	९९,५९.१५	८७,५४.४१	-१२,०४.७४

रुपये १२,०४.७४ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता कोणतेही कारण नमूद न करता मार्च २००८ मध्ये परत करण्यात आलेला रु.४०,८६ लाख इतका निधी अपुरा असल्याचे सिद्ध झाले याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

७.९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, याबाबतची सर्व कागदपत्रे दिनांक २१.६.२०१२ रोजी मंत्रालयात लागलेल्या आगीत नष्ट झाली असल्याने सदर माहिती पुनः संकलित करण्यात येत आहे. माहिती प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल.

(रुपये लाखात)

७.१० प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
८०० इतर खर्च ८०० (०१) (०१) अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या भांडवली खर्चासाठी ठोक तरतूद मूळ ७,३६,३५.११ पुनर्विनियोजन - ७,३५,१९.७४	१,१५.३७	--	- १,१५.३७

कोणतेही विनिर्दिष्ट कारण नमूद न करता मार्च, २००८ मध्ये रूपये ७३५१९.७४ लाख इतका निधी परत करण्यात आला. रूपये ११५.३७ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

७.११ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मागणी क्र.ओ-९ मुख्य लेखाशिर्ष ४५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८००(०१)(०१) हे लेखाशिर्ष शासनाच्या नियोजन विभागामार्फत हाताळण्यात येत नाही. वार्षिक योजना सन २००७-०८ अंतिम झाल्यानंतर अर्थसंकल्पिय अधिवेशनात इतर विभागांना ठरवून दिलेल्या नियतव्ययातील विना अर्थसंकल्पित उर्वरित नियतव्यय वित्त विभागाने मागणी क्र.ओ-९ मुख्य लेखाशिर्ष ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८००(०१)(०१) अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या भांडवली खर्चासाठी ठोक तरतूद या खालील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित केलेला आहे. तथापि सदर तरतूद या विभागाकडून कोणत्याही प्रयोजनास्तव वापरण्यात येत नाही.

(रूपये लाखात)

७.१२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
१०२ सामूहिक विकास १०२(००)(०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम मूळ २,९३,८५.०० पूरक ८८,१३.३३ पुनर्विनियोजन - ८,१८.०४	३,७३,८०.२९	३,६९,९२.५३	(-) ३,८७.७६

(एक) निधी व प्रस्ताव याबाबत काही सभासदांकडून अर्थसंकल्पीय अंदाज न मिळाल्यामुळे **(दोन)** निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने नवीन कामांसाठी निधी देता येऊ शकला नसल्यामुळे आणि **(तीन)** काही नव्याने निवडून आलेल्या आमदारांनी करारनिविष्ट वेळेमध्ये त्यांचा मध्यवर्ती जिल्हा घोषित न केल्यामुळे मार्च, २००८ मध्ये रूपये ८१८.०४ लाख इतका निधी परत करण्यात आला. रूपये ३८७.७६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००८)

७.१३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

१) वि.स.स./वि.प.स. यांच्याकडून कामांचे प्रस्ताव हे वेळेवर प्राप्त झाले नाहीत.

२) जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यास विलंब.

३) अंमलबजावणी यंत्रणांनी कामांचे अंदाजपत्रक विलंबाने सादर केले होते.

४) नवीन निवडून आलेल्या आमदारांनी आपला नोडल जिल्हा विहीत कालमर्यादेत जिल्हाधिकाऱ्यांना घोषित केला नाही.

५) खर्चात झालेली बचत ही **अनुज्ञेय मर्यादेमध्ये** असल्यामुळे क्षमापित करण्यात यावी.

साक्ष :-

७.१४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी अनुदान क्रमांक ओ-४ "इतर ग्रामविकास कार्यक्रम", अनुदान क्रमांक ओ-९ "इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च" या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितल कि, अनुदान क्रमांक ओ-४ "इतर ग्रामविकास कार्यक्रम" यामध्ये स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये कार्यालयीन खर्चासाठी १५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती व प्रत्यक्ष खर्च ९ लाख ७१ हजार रुपये झालेला आहे. ५ लाख २९ हजार रुपये शिल्लक राहिले होते ते समर्पित करण्यात आले होते. त्याबाबत खर्चमेळ करण्याचे राहून गेले होते.

७.१५ अनुदान क्रमांक ओ-९ "इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च" मध्ये महत्वाची बाब अशी आहे की, १०० कोटी रुपयांचा एक कार्यक्रम प्रत्येक वैधानिक विकास मंडळासाठी ठेवण्यात येतो. पण गेल्या वर्षीपासून ते बंद केले आहे. त्या ठिकाणी ती रक्कम वैधानिक विकास मंडळाकडून शिफारस करण्यात आलेल्या कामांवर खर्च करावयाची अशी तरतूद होती. पण त्यावेळी मार्च महिन्यामध्ये त्यांच्याकडून कामाची शिफारस करण्यात येत होती आणि त्यामुळे निधी मुक्त करणे आणि खर्च करणे शक्य झाले नाही. त्यामुळे १२ कोटी रुपये जे खर्च झालेले नाहीत ते समर्पित करु शकलो नाही. विभागाने कोषागरे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. २३ जिल्हाधिकाऱ्यांनी विभागाकडे

माहिती पाठविलेली आहे त्याप्रमाणे त्या २३ जिल्ह्यांच्या बाबतीत ५८ कोटी रुपयांपैकी ५७ कोटी रुपये एवढा निधी खर्च केलेला आहे. समर्पित केलेला निधी ५६ लाख रुपये होता. बाकीच्या जिल्ह्यांची माहिती येणे बाकी आहे. ही १२ कोटी रुपयांची रक्कम थोडी कमी होईल. विभागाने लेखा व कोषागरे महासंचालनालय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून रक्कम मुक्त केली होती काय याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्या संदर्भात अशी माहिती प्राप्त झाली कि, सन २००९ पासून बीडीएस सिस्टिम सुरु केलेली आहे त्यामुळे त्याच्या आधीची माहिती उपलब्ध नाही. मंत्रालयाला लागलेल्या आगीत कागदपत्रे नष्ट झालेली आहेत पण ही १२ कोटी रुपयांची रक्कम थोडी कमी होईल.

७.१६ जिल्हा नियोजनाच्या बाबतीत समितीने विचारणा केली कि, पूर्वी डीपीडीसी होती आता जिल्हा नियोजन समिती आहे. केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे त्यामध्ये जिल्हा परिषदेचे सदस्य व इतर काही महामंडळाचे सदस्य घेतले पाहिजे अशी तरतूद आहे. पुणे जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीत जुनेच लोक काम करीत आहेत. त्या ठिकाणी नवीन लोकांना घेतलेले नाही ही गोष्ट खरी आहे का ? केंद्र शासनाच्या कायद्याप्रमाणे नवीन लोकांना घेतले पाहिजे. त्यामुळे नवीन लोकांना काम करण्याची संधी मिळेल. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, जिल्हा नियोजन समिती बाबतीत सांगायचे तर २७ जिल्हयांमध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका झालेल्या आहेत.महानगरपालिकेच्या निवडणुकाही ब-याच ठिकाणी झालेल्या आहेत. नवीन तरतुदीप्रमाणे प्रत्येक ठिकाणी महिलांसाठी ५० टक्क्याप्रमाणे आरक्षण करण्यात आले होते. यापूर्वीच्या डीपीसीच्या नियमाप्रमाणे निवडून आलेल्या सदस्यांपैकी ३३ टक्के आरक्षण महिलांसाठी होते. आता ८० टक्के निवडून आलेल्या सदस्यांमधून ५०टक्के महिला सदस्य घ्याव्यात असा प्रस्ताव करणे आवश्यक आहे. प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या स्तरावर आहे. त्यांनी त्यास मान्यता दिल्यानंतर जिल्हा नियोजन समिती च्या निवडणुका होतील.

७.१७ जिल्हा नियोजन समितीच्या बैठका वर्षातून किती वेळा होतात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती असे नमूद केले आहे कि, महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (सभा घेणे), नियम-१९९९ मधील नियम क्र.४ (१) अनुसार जिल्हा नियोजन समितीच्या सर्व सभा जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्याबाबत तरतूद आहे. तसेच उक्त नियमांतील नियम

क्र.४ (२) अनुसार नव्याने गठीत झालेल्या समितीची पहिली सभा समिती गठीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत घेतली जाईल. परंतू समितीची मागील सभा व पुढील सभा यामधील कालावधी ९० दिवसांपेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीच्या बैठका घेण्यात येतात.

७.१८ अनेक वर्षापासून ग्रामीण भागामध्ये आमदार निधीमधून शौचालये बांधण्यात येतात. ज्या ठिकाणी बाराही महिने पाणी मिळते त्या ठिकाणी ५-५ लाख रुपये खर्च करुन महिलांसाठी आणि पुरुषांसाठी शौचालये बांधण्यात आली होती. पूर्वी ५ लाख रुपयांमध्ये शौचालये बांधता येत होती पण आता त्यासाठी १० लाख रुपये लागतात. परंतू आता आमदार निधीच्या बाबतीत सन २०११ नवीन शासन निर्णय काढलेला आहे त्यामध्ये शौचालयाचा भाग वगळलेला आहे.

७.१९ आमदार निधीतून स्वच्छतागृहे बांधता येतात काय ? संपूर्ण ग्रामीण भागामध्ये शौचालये बांधण्यात आल्यामुळे आणि शौचालयाच्या वापरासाठी पाण्याचा जास्त वापर होत असल्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. त्यामूळे ग्रामीण भागामध्ये अशी किती शौचालये बांधलेली आहेत ? याबाबतीत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, आमदार निधीतून सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करता येते. सदरहू शौचालय शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या जागेवर असले पाहिजे. तसेच ग्रामीण भागामध्ये असलेल्या शौचालयाबाबतची माहिती नियोजन विभागाकडे उपलब्ध नसते. कारण पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाकडून सार्वजनिक शौचालये बांधण्याचा कार्यक्रम राबविला जातो.

७.२० आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सुधारित सर्व समावेशक मार्गदर्शक सुचना संदर्भातला शासनाचा दि.१३/९/२०१२ रोजीचा शासन निर्णय **विवरण क्रमांक ---** जोडला आहे.

७.२१ आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत (लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम) याबाबतीतील निकष काय आहेत? या अंतर्गत कोण-कोणती कामे करण्यात येतात? याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.

"शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक १३/९/२०११ अन्वये, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

निकष :-

१) जिल्हा वार्षिक योजना राबवितांना निधीअभावी किंवा योजनेतील प्राथम्यक्रमा अभावी जी लहान लहान लोकोपयोगी कामे मागे राहतात, अशी कामे लोप्रतिनिधींनी सुचविणे.

२) शासनाची स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे.

अनुज्ञेय कामे :-

१) या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाची कामे शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागेवरच घेणे.

२) या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणारी मालमत्ता ही शासनाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची राहील. कामे मंजूर करण्यापूर्वी हया कामांच्या देखभाल दुरूस्तीची हमी स्थानिक स्वराज्य संस्थेने घेणे बंधनकारक आहे.

७.२२ या योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांची यादी परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ मध्ये दर्शविण्यात आली आहे. **(विवरण क्र २)**

७.२३ आमदार-खासदार निधीतून गौण खनिज अंतर्गत २० टक्के कपात केली जाते. समाज मंदिराचे ५ लाख रुपयाचे काम असेल तर प्रत्यक्षात ४ लाख रुपयापेक्षाही कमी खर्च येतो. आता खेड्यापाड्यातील मुले इंजिनिअर झालेली आहेत. ती कामाचे मोजमाप करतात. कामासाठी किती खर्च येतो हे त्यांना समजते. लोकांना कामावर आवश्यकते पेक्षा अधिक खर्च झाल्यासारखे वाटते. परिणामी लोक लोकप्रतिनिधीकडे संशयाने पाहतात. म्हणून ही रॉयल्टी काढून टाकावी अशी सूचना समितीने केली. सर्वात जास्त वसुली ही आमदार-खासदार फंडातून केली जाते. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले कि, आतापर्यन्त जिल्हा परिषद, म्हाडा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मार्फत सेंटेज चार्जेस घेतले जात होते. मागील वर्षी पावसाळी अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी या संदर्भात योग्य ती उपाययोजना करण्यात येईल असे तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, नागपूरमध्ये एनआयटी, मुंबईमध्ये म्हाडा अशा ६ एजन्सीकडून सेंटेज चार्जेस वसूल करण्याची पध्दत होती. आमदार आणि खासदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमासाठी सेंटेज चार्जेसची सूट द्यावी जेणेकरुन विकास कामासाठी ८ ते ९ लाख रुपये उपलब्ध होऊ शकतील,

असा प्रस्ताव विभागाने मंत्रीमंडळापुढे ठेवला. तसेच गौण खनिजाचा मुद्दा तपासून घेण्यात येईल असे विभागाने सांगितले. गौण खनिजावर सूट देण्याची तरतूद नसल्यामुळे तो प्रस्ताव मंत्रीमंडळामध्ये मान्य झाला नाही. उर्वरित प्रस्ताव मान्य करण्यात आले. त्यामुळे विकास कामासाठी उपलब्ध निधीमध्ये १० लाखापर्यंत वाढ होऊ शकेल.

७.२४ नद्यांतील वाळू काढण्यास परवानगी दिल्यानंतर ट्रकमधून २०-३० टन वाळूची वाहतूक होते. परिणामी गावातील रस्ते खराब होतात. अशा प्रकारे खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्यासाठी गौण खनिज या शीर्षाखाली जमा होणारा निधी खर्च करण्याचे धोरण शासनाने स्वीकारणे आवश्यक आहे, तसेच गौण खनिजाच्या बाबतीत सूट देता येईल का ते विभागाने पहावे अशी सुचना समितीने विभागास दिली.

७.२५ आमदार स्थानिक विकास निधीतून खास बाब म्हणून खाजगी ठिकाणी कामे केली जातात का हे पहाण्यासाठी यंत्रणा आहे काय ? तसेच आमदार-खासदार निधीतून नियमाप्रमाणे कामे होतात की नाहीत हे पाहिले जाते काय, झालेल्या कामांचे लेखा परिक्षण होते काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,खाजगी ठिकाणच्या कामांना मान्यता दिली जात नाही असे प्रस्ताव नियोजन विभागाकडे येत नाहीत व आमदार-खासदार निधीतून होणाऱ्या कामांचे लेखा परिक्षण केले जाते.

७.२६ आमदार निधीतून कामे मंजूर करुन घेण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकाऱ्याला (डीपीओला) सतत विनवणी करावी लागते. जिल्हा नियोजन अधिकाऱ्याच्या कामाच्या बाबतीत जिल्ह्यातील सर्व पक्षीय आमदारांच्या तक्रारी असतात, तसेच जिल्हा नियोजन अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर त्यांचे आदेश तात्काळ काढले पाहिजे परंतु ते काढले जात नाही. सहा वर्षानंतर त्यांची बदली झाली तरी ते बदलीच्या ठिकाणी रुजू होत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले.

७.२७ नगरपालिकांना शासनामार्फत दिला जाणारा निधी नगरपालिका नियमानुसार खर्च करतात की नाही हे पहाण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे एखाद्या कामासाठी दिलेला निधी नगरपालिका त्याच कामासाठी खर्च करीत नाहीत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता जेथे खर्च करण्यामध्ये अनियमितता झालेली आहे अशा नगरपालिकांची

नावे सांगितली तर त्याबाबतीत कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

७.२८ एखाद्या आमदाराने एखाद्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी काम करण्याचे निश्चित केले आणि ती ग्रामपंचायत दुसऱ्या पक्षाची असेल तर त्या कामाला ती ग्रामपंचायत ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या बाबतीत राजकारण करण्यात येते. काम ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये असेल तर ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. काम नगरपालिकेच्या हद्दीमध्ये असेल तर नगरपालिकेकडून घ्यावे लागते. बऱ्याच वेळा आमदारांनी सुचविलेल्या कामांना ग्रामपंचायती कडून किंवा नगरपालिकांकडून संबंधित संस्थांकडून ना हरकत प्रमाणपत्र दिली जात नाही. अश्या प्रकारामुळे आमदार फंडातील पैसे व्यपगत होतात. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, आमदार निधी लॅप्स होत नाही. दोन कोटी आमदार निधीतील १ कोटी ९० लाख रु. खर्च झाले असतील तर उर्वरित १० लाख रुपये पुढील वर्षीच्या आमदार निधीमध्ये जमा होतात. व डी.पी.सी. च्या बैठकीमध्ये जिल्ह्याच्या विकासासाठी निधी खर्च करण्यात आला पाहिजे, तो आपसात वाटून घेऊ नये अशी त्यामागची कल्पना आहे.

७.२९ आपण जिल्हा नियोजन समिती चे सभासद नाही, अशावेळी काय करणार? असे समितीने विचारले असता,आपण निमंत्रित म्हणून त्या बैठकीमधील चर्चेमध्ये भाग घेऊ शकता, परंतु आपल्याला मतदानाचा अधिकार नाही. आपल्याला लोकांच्या तक्रारी मांडता येतील, परंतु ठराव संमत करण्याचा आपल्याला अधिकार नाही.

७.३० ना हरकत प्रमाण पत्र देण्यास अशा प्रकारे अडवणूक होऊ नये म्हणून "जर संबंधित ग्रामपंचायतीने/नगरपालिकेने काम करण्यासाठी १५ दिवसात एनओसी दिली नाही तर ती एनओसी दिली गेल्याचे समजण्यात यावे" असा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अशी सूचना समितीने केली असता, या बाबतीत तरतूद करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

७.३१ काही जिल्ह्यांमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे सिंचनाची परिस्थिती बिकट झाली आहे. आमदार फंडामधून कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी परवानगी मिळते, परंतु शिरपूर पॅटर्न बंधारा बांधण्यासाठी, वॉटर स्टोअरेज बंधारा

बांधण्यासाठी शासनाची परवानगी मिळत नाही. कोल्हापूर पध्दतीचा बंधारा आणि शिरपूर पॅटर्न बंधारा यामधील फरक असा आहे की, कोल्हापूर पध्दतीचा बंधारा हा जमिनीच्या वर असतो आणि शिरपूर पॅटर्न बंधारा हा जमिनीच्या सम पातळीवर असतो. जमीन खोल खोदून त्यामध्ये पाणी साठविले जाते, त्या पाण्याचा जमिनीमध्ये पाझर होत असतो.असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नाल्यामध्ये खोदकाम करुन सुध्दा पाणी साठविले जाते व बंधारा बांधला जातो. हे काम आमदार फंडामधून घेता येते.

७.३२ परंतु नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधता येईल, शिरपूर पध्दतीचा साठवण बंधारा बांधता येणार नाही असे स्थानिक लोकप्रतिनिधींना सांगितलेअसे समितीने निदर्शनास आणून दिले असता, नाल्यामध्ये खोदकाम करीत असतांना ते ३ मीटरपेक्षा जास्त करण्यास जी.एस.डी.ए. परवानगी देत नाही. याचे कारण असे की, ३ मीटर पेक्षा जास्त खोदकाम केले तर वॉटर परक्युलेशनचे स्ट्रक्चर चोक अप होते. या कारणास्तव परवानगी दिली जात नाही. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

७.३३ विभागाने दिलेल्या खुलाश्या संदर्भात समितीने विभागास सुचना केली कि, शिरपूर पध्दतीच्या बंधाऱ्याची पाहणी विभागीय प्रतिनिधींनी करावी. प्रत्येक पक्षाचे आमदार तसेच मंत्रीमहोदयांनी शिरपूर बंधाऱ्याची पाहणी केली आहे. शिरपूर बंधाऱ्याचा पॅटर्न अतिशय यशस्वी झालेला आहे. १५ ते २० फूट नालीचे रुंदीकरण, व खोदकाम केले व जमिनीच्या सम पातळीवर बंधारा बांधून त्यामध्ये पाण्याची साठवण केली तर पाण्याचे परक्युलेशन जास्त होते. त्यामुळे त्या परिसरातील विहिरींना बारा महिने पाणी असते. त्यामुळे शासनाच्या योजनेमध्ये या कामाचा समावेश करावयाचा असेल तर त्याला मान्यता मिळाली पाहिजे. तसेच रोजगार हमी योजनेच्या नवीन धोरणामध्ये या कामाचा समावेश केला पाहिजे. त्याकरिता विभागीय आयुक्तांकडून माहिती प्राप्त करून घेण्यात यावी. आता आपल्याकडे अे.आय.बी.पी. चा नवीन कार्यक्रम आला आहे. यावर या तांत्रिक मुद्याला जी.एस.डी.ए. ची मान्यता मिळत नाही. अलिकडच्या काळात अशाप्रकारच्या कामांना जी.एस.डी.ए. परवानगी देत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले. कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, शिरपूर पध्दतीचा बंधारा व तलावातील गाळ काढणे ही तिन्ही प्रकारची कामे आमदार फंडामधून झाली पाहिजेत. शिरपूर पॅटर्न बंधाऱ्यामुळे

जळगाव जिल्ह्यातील ७० टक्के जमीन सिंचनाखाली आली आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

७.३४ गौण खनिज निधीमधून जिल्हा निहाय निधीचे वाटप केले जाते. परंतु मुख्यमंत्र्यांची सही न झाल्यामुळे जिल्हा पातळीवरुन खालच्या पातळीवर हा निधी पोहोचला नाही ही गोष्ट खरी आहे काय? गौण खनिज निधीमधून ९० टक्के निधी खर्च होत नाही तर मग हा निधी जातो कुठे ? प्रत्येक जिल्हानिहाय हा निधी किती प्रमाणात गोळा झाला, व त्यापैकी किती निधी खर्च झाला? याची माहिती समितीला देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी सदरहू माहिती महसूल विभागाकडून प्राप्त करून ती समितीस सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

७.३५ शासनाने निर्गमित केलेल्या नवीन शासन निर्णय नुसार गौण खनिज उत्पन्न प्राप्त होत असलेल्या २० कि.मी. च्या परिक्षेत्रामध्ये एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतीमार्फत खर्च करण्यास मंजुरी आहे त्या निधीमधून रस्त्याचे बांधकाम करावयाचे नाही तर पर्यावरण संतुलन राखण्याच्या दृष्टीने नियोजन करावयाचे आहे. अलिकडच्या काळात त्या निधीमधून १९ कोटींची कामे मंजूर करण्यात आली परंतु ती कामे नंतर रद्द करण्यात आली याचे कारण काय? याबाबत विभागीय सचिवांनकडून माहिती प्राप्त झाली नाही.

७.३६ नाविन्यपूर्ण योजनेमधून खर्च करावयाच्या निधीबाबत कोणते निकष आहेत? त्याबाबतची एखादी योजना जिल्हा निधीमधून पूर्ण होत नसेल व ती पूर्ण करणे आवश्यक असेल तर ती नाविन्यपूर्ण योजनेमध्ये समाविष्ट करावयाची अशाप्रकारचे निकष सरकारने ठरविले आहेत काय? व त्याचे ऑडीट होते काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

७.३७ "नियमित योजनांबरोबरच त्या-त्या जिल्ह्याच्या/विभागाच्या अडीअडचणी दूर करून स्थानिक गरजा पूर्ण करण्यास वाव रहावा या उद्देशाने शासनाने शासन निर्णय क्र. डिएपी-१०१०/प्र.क्र.२०३/का.१४८१ दि.०९ ऑगस्ट, २०१० अन्वये नाविन्यपूर्ण योजनांची संकल्पना सुरू केली आहे. त्यानुसार जिल्ह्याच्या एकूण नियतव्ययाच्या कमाल ४.५% नियतव्यय नाविन्यपूर्ण योजनांवर खर्च करता येऊ शकेल अशा सुचना आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ व क्र.८ नुसार नाविण्यापूर्ण योजनांचे निकष विहित केले

आहेत. सदर निकषांनुसार नाविन्यपूर्ण योजनांच्या प्रस्तावास जि.नि.स. ने मान्यता दिल्यावर त्यावर खर्च करण्यात येतो. नुकतेच शासनाने शासन परिपत्रक क्र. डिएपी-१०१२/प्र.क्र.२८०/का.१४८१, दि. १२.०९.१२ अन्वये नाविन्यपूर्ण योजनांबाबत काही मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून त्यानुसार यापुर्वी राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजनांच्या फलनिष्पतीचा अभ्यास करण्याबाबत तसेच राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्याच्या सुचना दिल्या आहेत. प्रसंगत: जिल्हा वार्षिक योजनेबाबत (नाविन्यपूर्ण योजनांसह सर्व योजना) महालेखापाल कार्यालयाद्वारे दरवर्षी लेखापरिक्षण करण्यात येते."

७.३८ संपूर्ण बजेटच्या रकमेपैकी ४.५ टक्के रक्कम म्हणजे २०० ते ३०० कोटी रुपयांपैकी १२ कोटी रुपये जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना त्या जिल्ह्यासाठी खर्च करावयास मिळतात. त्यामुळे याबाबत रुल्स अँड रेग्युलेशन्स काय आहेत? यापूर्वी अशाप्रकारची कामे जिल्हा नियोजन समिती (डी.पी.सी.) मधून मंजूर केली जात असल्यामुळे ती नोंदवावी लागत असे. त्याकरिता असलेल्या निकषांची समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले कि, नाविन्यपूर्ण योजनेमधून साडे चार टक्के निधी खर्च करता येतो म्हणून तो केला पाहिजे असे नाही. ज्यावेळी एखादे माननीय सदस्य डी.पी.सी. च्या बैठकीमध्ये काही कामे घेण्याबाबत आग्रह धरीत असतात अशावेळी सदरची कामे कोणत्याही योजनेमधून घेता येत नाहीत असे जिल्हाधिकाऱ्यांना वाटले तर ती कामे नाविन्यपूर्ण योजनेमधून घेता येतात. त्यावेळी त्या योजनेला मान्यता देऊन तो खर्च करता येतो. परंतु एखाद्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर संबंधित संलग्न विभागाला विचारुन हे काम खरोखरच नाविन्यपूर्ण आहे काय, यामध्ये दुबार काम होते काय, सदरचे काम केल्यानंतर लोकांवर त्याचा परिणाम होईल काय, केलेला खर्च वाया जाईल काय? त्या जिल्ह्यासाठी ती नाविन्यपूर्ण योजना असेल तरच खर्च करण्यास परवानगी देण्यात येते.

७.३९ नाविन्यपूर्ण योजनेची व्याख्या अशी आहे की, एखादे सार्वजनिक हिताचे काम करण्यासाठी नियमानुसार पैसे उपलब्ध होत नाही परंतु सामाजिकदृष्टया ते काम करणे आवश्यक आहे, ज्यावेळी द्रुतगती मार्गावर अपघात होतात त्यावेळी अल्कोहोल डिटेक्ट करण्यासाठी पोलिसांकडे अल्कोहोल डिटेक्टर नसते, नाविन्यपूर्ण योजनेमधून अल्कोहोल

डिटेक्टर घेता येत नाही त्यामुळे पोलिसांना योग्य ती कारवाई करता येत नाही. वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्याकरिता आपल्याला रोपवाटिका तयार करावयाची आहे. अशाप्रकारच्या सार्वजनिक हिताच्या योजना नाविन्यपूर्ण योजनेमध्ये समाविष्ट करण्यासंबंधी निकष आहेत. त्याकरिता राज्य शासनाकडे ५ टक्के निधी आहे, असे समितीने सांगितले.

७.४० काही लोकप्रतिनिधींनी पोलीस डिपार्टमेंटसाठी नाविन्यपूर्ण योजनेमधून गाडया घेतल्या परंतु त्यासाठी केलेला खर्च मान्य करण्यात आला नाही. यावर मागील वर्षी मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन या योजनेमधून दोन-दोन वाहने खरेदी करण्यास परवानगी दिली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

७.४१ एखाद्या गावामध्ये आमदारांनी रस्त्याचे काम करण्यास सुचविल्यानंतर त्या गावच्या सरपंचाची ना हरकत प्रमाणपत्रा ची गरज लागते परंतु जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्या ना हरकत प्रमाणपत्र ची गरज नसते, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची एन.ओ.सी. लागते. जर एखाद्या विधानपरिषद/विधानसभा सदस्यांनी महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये एखादे काम सुचविल्यानंतर विरोधी पक्षाच्या नगरसेवकांकडून तशाच स्वरुपाचे काम करण्याबाबत आयुक्तांना पत्र दिले जाते. म्हणजेच एका बाजूला माननीय सदस्य यांनी सुचविलेले काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचा प्रस्ताव तयार केला जातो आणि दुसऱ्या बाजूला तशाच स्वरुपाचे दुसरे काम सुचविले जाते जेणेकरुन माननीय सदस्यांनी सुचविलेले काम होता कामा नये असा त्यामागील उद्देश असतो. या करिता केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या निधीमधून रक्कम खर्च करीत असतांना त्यामध्ये आमदारांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विरोधी पक्षांच्या आमदारांची कामे होऊ द्यावयाची नसतील तर अशावेळी तेथील सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक तशाच स्वरुपाची दुसरी कामे सुचवितात. अशाप्रकारची कामे घेतल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी शिल्लक राहतो, ते काम सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला मान्यता मिळते, तसेच ही कामे कमी निविदे किंवा निविदेशिवाय हाती घेतली जातात. त्यामधून विरोधी पक्षाच्या आमदारांचे काम बाजूला पडते. अशाप्रकारचा अनुभव बऱ्याच विधानपरिषद/विधानसभा सदस्यांना आलेला आहे. या करिता शासनाने या संदर्भात एक परिपत्रक निर्गमित करण्याची आवश्यकता आहे अशी सुचना समितीने विभागास केली. म्हणून

हा निधी खर्च करण्याच्या बाबतीत प्राधान्यक्रम ठरवितांना प्रथम खासदार, त्यानंतर आमदार आणि त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी असा क्रम लावून त्याप्रमाणे नियम तयार केले पाहिजेत. कोणत्याही पक्षाच्या आमदारांकडून पहिले पत्र आले असेलतर त्यालाच प्राधान्य दिले पाहिजे. अनेक वेळा सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची कामे घेतली जातात व विरोधी पक्षांच्या नेत्यांची कामे बाजूला टाकली जातात. तसेच जर जिल्हा नियोजन अधिकारी वरिष्ठांच्या दबावाखाली एखाद्या सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी सुचविलेले काम अगोदर घेत असतील आणि विरोधी पक्षाच्या आमदारांचे काम बाजूला ठेवीत असतील तर ती बाब योग्य होणार नाही. तसेच जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना आमदार निधीतून पैसे खर्च करण्यासाठी जास्त निधी मंजूर होतो कारण मा. पालकमंत्री हे जिल्हा नियोजन मंडळाचे प्रमूख असतात. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले कि फक्त सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सुचविलेली कामे करा, इतर पक्षाच्या सदस्यांनी सुचविलेली कामे नंतर करा किंवा करू नका असे शासन कधीही सांगू शकत नाही. कारण कोणत्याही पक्षाच्या माननीय आमदारांनी पहिले पत्र देऊन काम सुचविले असेल तर त्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे हे समितीचे म्हणने बरोबर आहे, असे विभागीय सचिवांनी मान्य केले. परंतू, विरोधी पक्षाच्या आमदारांनी जर २ कि.मी. च्या रस्त्याचे काम सुचविले असेल तर दुसऱ्या पक्षाचे आमदार साडे ३ कि.मी. च्या रस्त्याचे काम सुचवितात. म्हणजेच दीड कि.मी. जास्त लांबीचा रस्ता दाखवितात व सुचविलेले काम वेगळे आहे असे सांगतात. अशावेळी त्यामधून विभाग काहीतरी मार्ग काढीत असतो.

७.४२ परंतु विभागाने केलेला उपरोक्त खुलासा समितीने मान्य केला नाही कारण एखाद्या आमदारांनी पहिले पत्र दिले असेल तर त्यांच्या कामाला प्राधान्य दिले गेले पाहिजे. कामांना प्राधान्य देण्याच्या बाबतीत प्रथम खासदार, त्यानंतर आमदार, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य व त्यानंतर नगरसेवक या क्रमवारीनुसार तो निधी वापरला गेला पाहिजे. शिष्टाचाराप्रमाणे जर त्यांनी कामाचा प्रस्ताव दिला असेल तर तो विभागाला नाकारता येणार नाही, ते काम प्राथम्याने हाती घेतले पाहिजे. यासंदर्भात नियोजन विभागाने असा निर्णय घेतला की, विधान परिषदेवर निवडून आलेले आमदार हे संपूर्ण महाराष्ट्रभर आपला निधी वापरु शकतात. याबाबतीत विभागीय सचिवांनी सांगितले कि, या संदर्भात प्राथम्यक्रम ठरवून देता येईल. ज्या लोकप्रतिनीधींचे प्रथम प्राप्त झाले त्यांन्याच प्राथम्य दिले पाहिजे या

संदर्भातला शासनाने शासन निर्णय निर्गमित केला पाहिजे, असे निदेश समितीने विभागास दिले.

७.४३ लोकप्रतिनिधींकडून कामाचे प्रस्ताव केव्हा प्राप्त होणे अपेक्षित असते? सन्माननीय सदस्यांकडून कामांचे प्रस्ताव प्राप्त होण्यासाठी विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येते? याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे कि, शासन निर्णय नियोजन विभाग दिनांक १३/९/२०११ अन्वये, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचनांतील परिच्छेद ५(३) नुसार विधीमंडळ सदस्यांनी कामांची शिफारसपत्रे त्यांच्या नाममुद्रीत पत्रावर स्वतःच्या सहीने, शक्यतो प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये त्या आर्थिक वर्षात अनुज्ञेय निधीच्या दिडपटीच्या मर्यादित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

७.४४ आमदार निधीच्या वाटपाबाबत जिल्हा नियोजन समितीमध्ये चर्चा करुन ठरवावयाचे असते व याचे अधिकार निवडून आलेल्या सर्व सदस्यांना अधिकार दिलेले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

७.४५ पुण्यात जलसिंचनाच्या कामासाठी लागणारे डंपर, जेसीबी जिल्हा नियोजन मंडळातून घेतलेले आहेत. बारामती येथे डीपीसीमधून जेसीबी, डंपर घेतलेले आहे. गाळ काढण्यासाठी तसेच सरकारी कामे करण्यासाठी ही मशिनरी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेली आहे पण बाकीच्या जिल्ह्यांमध्ये तशी परवानगी का दिली जात नाही ? याबाबत पुणे व नागपूर या दोन्ही जिल्ह्यात डीपीसीमधून जेसीबी, डंपर आणि इतर जी मशिनरी घेंतली त्याची माहिती देण्याचे निदेश समितीने विभागास दिले परंतु अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे.

७.४६ समितीने पुढे विभागास असे सुचित केले कि, आपल्याकडे भूमिगत बंधाऱ्यांची प्राचीन पध्दत आहे. ते बंधारे जास्त यशस्वी ठरतात. जसे साठवण बंधारे यशस्वी ठरलेले आहेत तसेच भूमिगत बंधारे यशस्वी ठरलेले आहेत. तसेच गाळ काढण्यासाठी परवानगी देण्यात येते. त्याप्रमाणे आमदार निधीतून गाळ फेकण्यासाठी सुध्दा परवानगी मिळाली पाहिजे.

७.४७ वित्त विभागाने मागणी क्रमांक ओ-४, २५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च ८००(०१)(०१) अर्थसंकल्पिता केलेल्या महसुली नियतव्ययाची ठोक तरतूद या खालील लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित केलेली आहे. तथापि, सदर तरतूद नियोजन

विभागाकडून कोणत्याही प्रयोजनास्तव वापरण्यात न येण्याची कारणे काय व अर्थसंकल्पित न केलेल्य नियतव्ययाची ठोक तरतूद प्रत्येक वर्षी करण्यात येते काय ? असल्यास गत ५ वर्षातील तरतूदीची माहिती देण्यात यावी. याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे कि, नियोजन विभागांकडून मंत्रालयीन विभागांना वाटप केलेला नियतव्यय विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या काही योजनांना लेखाशिर्ष उपलब्ध नसल्याने तसेच इतर काही तांत्रिक अडचणीमुळे पूर्ण अर्थसंकल्पित होऊ शकत नाही. असा अर्थसंकल्पित न झालेला एकत्रि नियतव्यय "ठोक तरतूद" म्हणून वित्त विभागाकडून नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पिय अंदाज पुस्तिकेत अर्थसंकल्पित करून दर्शविण्यात येतो. त्यामुळे सदर तरतूद नियोजन विभागाला खर्च करण्यासाठी उपलब्ध नसते. अर्थसंकल्पित न केलेल्या नियतव्ययाची ठोक तरतूद प्रत्येक वर्षी करण्यात येते. या संदर्भातील गत ५ वर्षातील तरतूदींची माहिती खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

वर्ष	लेखाशीर्ष	रक्कम
२००७-०८	२५१५	११२७२८.८९
	४५१५	७३६३५.११
	एकूण	१८६३६४.००
२००८-०९	२५१५	१३१७५६.२९
	४५१५	९५४०९.७३
	एकूण	२२७१६६.०२
२००९-१०	२५१५	१४८७४०२.१९
	४५१५	११५३४०३.७४
	एकूण	२६४०८०५.९३
२०१०-११	२५१५	१९३३१६.८७
	४५१५	१३९८०७.०५
	एकूण	३३३१२३.९२

२०११-१२	२५१५	---
	४५१५	२५४६९५.६६
	एकूण	२५४६९५.६६
२०१२-१३	२५१५	५५७९.८७
	४५१५	२०५७४१.३२
	एकूण	२११३२१.१९

७.४८ आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम या शीर्षा अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणानी कामांचे अंदाजपत्रक विलंबाने सादर केले होते असे विभागाने खुलाश्यात नमूद केले आहे. याबाबत समितीला जाणून घ्यायचे आहे कि, अंमलबजावणी यंत्रणा म्हणजे कोणत्या यंत्रणा? ज्यांची अंदाजपत्रक विलंबाने सादर केल्यामुळे त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती मध्ये असे नमूद केले आहे कि, अंमलबजावणी यंत्रणा म्हणजे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांशी संबंधित शासकीय यंत्रणा/स्थानिक स्वराज्य संस्था/अभिकरण यंत्रणा होय.

७.४९ मा. आमदार महोदयांनी कामांचे प्रस्ताव पहिल्या तीन महिन्यांत संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे दिल्यानंतर शक्यतो, तीन महिन्यांच्या कालावधीत कामांचे प्रस्ताव कामांशी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडून तपासून व त्यानुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करून, त्यास तांत्रिक मान्यता दिल्यानंतर, जिल्हाधिकारी यांचेकडून अनुज्ञेय असलेल्या कामास प्रशासकीय मंजूरी दिली जाते.

७.५० कामांची अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यतेसह क्षेत्रीय यंत्रणांनी वेळच्यावेळी विनाविलंब पाठविणेबाबत तसेच ज्या क्षेत्रीय यंत्रणांनी कामांची अंदाजपत्रके तयार करून, त्यास तांत्रिक मान्यता देऊन, असे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यात विलंब केला जाईल, अशा अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांविरूद्ध नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करणेच्या सूचना जिल्हाधिकारी यांना शासन परिपत्रक, नियोजन विभाग दिनांक १५/०९/२०१२ अन्वये देण्यात आल्या आहेत. सुलभ संदर्भासाठी शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. **(विवरण क्रमांक ३)**

७.५१ नवीन सदस्यांना त्यांचा मध्यवर्ती जिल्हा (Nodal District) विहित कालमर्यादा सादर करण्याची मुदत काय असेल? नवीन सदस्यांना यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले होते काय? याची कार्यपद्धती काय आहे? याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे कि, शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक १३/९/२०११ अन्वये, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

७.५२ ज्या मतदार संधातून विधान सभा सदस्य निवडून अलेले असतात, त्यांना त्यांचे मतदार संघातच निधी प्रस्तावित करता येतो. विधान सभा सदस्यांना नोडल जिल्हा घोषित करण्याची आवश्यकता नसते.

७.५३ विधान परिषद सदस्य तसेच विधान सभेवर मा. राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या सदस्यांनी "नोडल जिल्हा" घोषित करणे आवश्यक आहे. "नोडल जिल्हा" घोषित करण्यासाठी कालमर्यादा ठरवून देण्यात आली नाही. शक्यतो, निवड झाल्यानंतर लवकरात लवकर विधान परिषद सदस्य/मा.राज्यपाल नियुक्त विधान सभा सदस्य यांनी "नोडल जिल्हा" घोषित करणे अपेक्षित आहे. जेणेकरून, आमदार निधी हा संबंधित जिल्हयांकडे वर्ग करणे शासनास सुकर ठरेल.

७.५४ विधान परिषद सदस्य तसेच मा.राज्यपाल नियुक्त सदस्यांना शासनाच्या नियोजन विभागामार्फत आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वांच्या पुस्तिकेची प्रत मा.विधीमंडळ सदस्यांच्या माहितीस्तव शासनाच्या सह/उप सचिवांच्या पत्राद्वारे पाठविण्यात येऊन, त्यांना नोडल जिल्हा त्वरीत घोषित करून तसे शासनास कळविण्याबाबत विनंती करण्यात येते.

७.५५ परिशिष्ट ३ **(विवरण क्र. ४)** मध्ये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम- अनुज्ञेय निधीच्या ५ टक्के रकमेतून घ्यावयाच्या कामांची यादी दिलेली आहे त्यामध्ये शासकीय कार्यालयात सूचनाफलक बसविणे यासाठी ०.५० लाख रुपयांची आर्थिक मर्यादा दिलेली आहे. तहसीलदार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच बाकीची पर्यटन स्थळे असतील अशा ठिकाणी शासनाच्या श्रावणबाळ योजना किंवा इतर विविध योजनांच्या संदर्भात सूचना फलक लावता आले पाहिजेत. यासाठी त्याची आर्थिक मर्यादा सुध्दा वाढविली पाहिजे. आता ५० हजार

रुपयांमध्ये काहीच होत नाही. गोरगरीब लोकांसाठी ज्या योजना आहेत त्यांचे सूचना फलक लावण्यासाठी या निधीमध्ये वाढ करावी. ही आर्थिक मर्यादा ५० हजार रुपयांऐवजी २-३ लाख रुपये केली तर त्याचा उपयोग होईल. पाहिजे तर एका ठिकाणी फलक लावण्यासाठी १-२ लाख रुपयांचे सिलिंग ठेवावे. शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणारे पर्यटन / सांस्कृतिक महोत्सव यासाठी २ लाख रुपयांची आर्थिक मर्यादा दिलेली आहे. ही मर्यादा फारच कमी आहे. २ लाख रुपयांची मर्यादा ५ लाख रुपये करावी अशी जर यासाठी मंत्रीमंडळाची मान्यता लागत असेल तर ती घेण्यात यावी अशी सुचना समितीने विभागास दिली.

७.५६ पूर परिस्थितीच्या वेळी आवश्यक असणारी साधने जसे लाईफ सेव्हींग जॅकेट्स, होड्या, मोटार बोट व आपत्ती व्यवस्थापन साहित्य यासाठी ५ लाख रुपयांची आर्थिक मर्यादा ठेवलेली आहे याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

७.५७ आमदारांना ५ टक्के रक्कमेतून वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी खर्च करता येतो, त्याबाबतच्या गाईडलाईन्स काय आहेत याबाबतची माहिती सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले.

७.५८ आरसीसी बांधकाम ५० बाय ५० चे असलेले सभा मंडप बांधले तर त्याचे बजेट १० ते १५ लाख रुपये असते आणि त्या कामासाठी चार ते सहा महिने लागतात. पण जर स्टीलचे स्ट्रक्चर बांधले तर ते काम २ महिन्यामध्ये उभे राहते. ते काम मजबूत असते तसेच हवा सुध्दा खेळती राहते. पण जिल्हा नियोजन मंडळ अशा सभा मंडळाच्या कामाला मान्यता देत नाही. याबाबत सदर कामाचा समावेश आहे. फक्त काही स्पेसिफिकेशन असेल तर ते बघावे लागते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

७.५९ एखाद्या कामावर जास्तीत जास्त १५ लाख रुपये खर्च करता येतात. या मर्यादेमध्ये वाढ केली तर मोठी कामे करता येतील. १५ लाख रुपयांची मर्यादा वाढवून ३० लाख रुपये करावी. कारण आता महागाई सुध्दा वाढलेली आहे, असे निदेश समितीने विभागास दिले.

७.६० खासदारांना संपूर्ण रक्कम एखाद्या कामासाठी देता येते. खासदार निधीबाबत जसा खासदारांना अधिकार मिळाला तसा अधिकार आमदार निधीबाबत आमदारांनाही देण्यात

यावा व लघु पाटबंधाऱ्यांची कामांसाठी मिळणारा निधी वाढवावा अशी सुचना समितीने विभागास केली.

अभिप्राय व शिफारशी :-

७.६१ आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाचा उद्देश हा जिल्हा वार्षिक योजना लाभविताना निधी अभावी किंवा योजनेतील प्राथम्यक्रमाअभावी जी लहान लोकोपायोगी कामे मागे राहतात अशी कामे स्थानिक लोकप्रतिनिधींना सुचविता येणे तसेच या कार्यक्रमांतर्गत शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे असा आहे. आमदार महोदयांनी कामांचे प्रस्ताव दिल्यानंतर शक्यतो तीन महिन्यांच्या कालावधीत कामांचे प्रस्ताव तपासून संबंधित जिल्हाधिकारी यांनी अनुज्ञेय असलेल्या कामांना मंजूरी द्यावयाची असते. **या कामाची तपासणी देखील जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली होत असते. समितीच्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी आमदार निधीतून कामे मंजूर करुन घेण्यासाठी जिल्हा नियोजन अधिका-याला (DPO) सतत विनवणी करावी लागते. राज्यातील बहुतांश आमदारांच्या त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यातील जिल्हा नियोजन अधिका-यांच्या कामांच्याबाबतीत तक्रारी असतात. सदरहू अधिकारी हे एकाच ठिकाणी बरीच वर्षे असल्यामुळे त्यांची मनमानी चालते. त्यामुळे या जिल्हा नियोजन अधिका-यांच्या बदल्या शासकीय नियमानुसार दर तीन वर्षांनी करण्यात याव्यात व एकदा बदलीचे आदेश निर्गमित केल्यावर कोणत्याही कारणास्तव त्यांच्या बदलीचे आदेश रद्द करु नयेत अशी समिती शिफारस करीत आहेत तसेच बदलीच्या आदेशानंतरही जिल्हा नियोजन अधिकारी बदलीच्या ठिकाणी जाण्यास टाळाटाळ करीत असल्यास त्यांच्यावर नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करावी अशी समितीची शिफारस आहे.**

७.६२ सन्माननीय विधानमंडळ सदस्यांनी एखाद्या ग्रामपंचायतीच्या किंवा नगरपालिकेच्या ठिकाणी काम करण्याचे निश्चित केले असल्यास व सदरहू ग्रामपंचायत / नगरपालिका ही दुस-या पक्षाकडे असल्यास त्या कामास ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यात येत नाही याबाबतीत राजकारण करण्यात येते. **त्यामुळे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातील निधी व्यपगत होतो. त्यामुळे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास अडचण येऊ नये म्हणून संबंधित ग्रामपंचायतीने / नगरपालिकेने एखाद्या सदस्यांनी सुचविलेल्या कामास १५ दिवसात ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर सदरहू कामास ना-हरकत प्रमाणपत्र दिले गेले**

आहे असे समजण्यात यावे व त्यानुषंगाने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याची शासनाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

७.६३ महाराष्ट्रात सध्या अभूतपूर्व अशी दुष्काळ परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाण्याचा प्रश्न हा गंभीर स्वरुपाचा झाला असल्यामुळे सिंचनाची परिस्थिती देखील बिकट झाली आहे. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, लघुपाटबंधा-यांची कामे, वळण बंधारे, वनराई बंधारे अशी लघुपाटबंधारेची कामे करता येतात. परंतु, या निधीअंतर्गत शिरपूर पद्धतीचा बंधारा बांधण्यासाठी, वॉटर स्टोरेज बंधारा बांधण्यासाठी शासनाची परवानगी मिळत नाही. कोल्हापूर पद्धतीचा बंधारा हा जमिनीच्यावर असतो तर शिरपूर पद्धतीचे बंधारा हा जमिनीच्या समपातळीवर असतो. **यामध्ये जमिन खोल खोदून पाणी साठवत येत असल्यामुळे जमिनीत पाण्याचे पाझर होत असल्यामुळे त्या परिसरातील विहिंरीना बारामही पाणी असते. त्यामुळे शिरपूर पद्धतीचे बंधारे बांधण्यास व तलावातील गाळ काढण्यास देखील आमदार स्थानिक विकास निधीतून मंजूरी देण्यात यावी व त्यादृष्टीने देखील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे तसेच लघुपाटबंधा-यांची कामे करण्याकरिता आर्थिक मर्यादा रु.२० लाखापर्यंत आहे. परंतु, वाढलेली महागाई विचारात घेता, सदरहू मर्यादा कमी पडत असून ती रु.५० लाखापर्यंत वाढविण्यात यावी अशी देखील समिती शिफारस करीत आहे.**

७.६४ नियमित योजनांबरोबरच त्या त्या जिल्ह्याच्या / विभागाच्या अडीअडचणी दूर करुन स्थानिक गरजा पूर्ण करण्यास वाव रहावा या उद्देशाने नावीन्यपूर्ण योजनांची संकल्पना शासनाने सुरु केली आहे. त्यानुसार जिल्ह्याच्या एकूण नियतव्ययाच्या कमाल ४.५% नियतव्यय नावीन्यपूर्ण योजनेवर खर्च करता येऊ शकतो. **परंतु, या योजनेमध्ये निधी खर्च करण्याच्याबाबतीत प्राधान्यक्रम निश्चित केलेला नसल्यामुळे त्या त्या ग्रामपंचायती, नगरपालिका यामध्ये सत्तेवर नसलेल्या सदस्यांकडून कामाचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यास प्राथम्यक्रम न मिळता सत्तेवर असलेल्या नगरसेवकांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना खासदार वा विधानमंडळ सदस्य यांच्यापूर्वी प्राथम्य दिले जाते. त्यामुळे शिष्टाचार पाळला जात नाही. याकरिता नावीन्यपूर्ण योजनेतील निधी खर्च करण्यासंदर्भात प्राधान्यक्रम ठरविताना प्रथम संसद**

सदस्य, विधानमंडळ सदस्य व त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी असा क्रम लावण्यात यावा तसेच ज्या लोकप्रतिनिधींनी पहिले काम सुचविले असेल तर त्यांनी सुचविलेल्या कामास प्राधान्य देण्यात यावे अशी समिती शिफारस करीत असून त्यादृष्टीने या नावीन्यपूर्ण योजनेच्या निकषात बदल करावा अशी समितीची शिफारस आहे.

७.६५ मागणी क्रमांक ओ-४ इतर ग्रामविकास कार्यक्रम यामध्ये स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये कार्यालयीन खर्चासाठी रु.१५,००,०००/- तरतूद करण्यात आली होती. परंतु, प्रत्यक्ष खर्च रु.९,७१,०००/- होऊन रु.५,२९,०००/- एवढे शिल्लक राहिले होते. परंतु, या खर्चाचा ताळमेळ करण्याचे राहून गेले होते असे समितीस माहिती प्राप्त झाली. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेमध्ये शासकीय खर्चाचा ताळमेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी झाल्याबाबत सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. असे असले तरी, बरेच खाते प्रमुख व नियंत्रण अधिकारी आपल्या विभागातर्फे करण्यात आलेल्या खर्चाचा ताळमेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी योग्यरित्या घालत नाहीत. त्याचा परिणाम असा होतो की, खात्याच्या नोंदवहिप्रमाणे होणारा खर्च व महालेखापालांच्या पुस्तिकेप्रमाणे नोंदविलेल्या एकूण खर्च यामध्ये तफावत आढळते. त्यामुळे महालेखापालांकडून आक्षेप घेण्यात येऊन त्यांचा समावेश विनियोजन लेखांमध्ये होऊन ती लोकलेखा समितीसमोर चर्चेस येतात.

७.६६ खर्चमेळ करणे ही संपूर्णपणे संबंधित विभागाची जबाबदारी असल्यामुळे केवळ खर्चमेळ न झाल्यामुळे महालेखापालांनी आक्षेप घेतल्याची बरीच उदाहरणे समितीच्या निदर्शनास आलेली आहेत. समितीने आपल्या बैठकीमध्ये वेळोवेळी विभागांनी खर्चमेळाचे काम विहित मुदतीत करावे असे निदेशही दिले आहेत. तरीही बरेच विभाग, विभाग प्रमुख व नियंत्रण अधिकारी हे खर्चमेळाच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे समितीस जाणवू लागले आहे. केवळ खर्चमेळ न झाल्यामुळे समितीपुढे प्रकरण येत असल्याने साक्षीच्यावेळी समितीने याबाबींवर लक्ष दिल्यामुळे काहीवेळा इतर महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करता येत नाही. **सध्या महालेखापाल यांची मुंबई व नागपूर येथील कार्यालय तसेच राज्यातील सर्व कोषागार कार्यालये व अधिदान व लेखा कार्यालय यांचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे विभागांच्या खर्चाचा तपशील हा मंत्रालयीन विभागातच उपलब्ध होत आहे. त्यामुळे सर्व**

मंत्रालयीन विभागांनी खर्चमेळाचे काम करण्याकरिता स्वतंत्र पथक अथवा यंत्रणा निर्माण करावी तसेच त्याकरिता लागणारा कर्मचारी वर्ग प्रत्येक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या असलेल्या मंजूर आस्थापनेमधून वेगळा करुन घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. यापुढील काळात खर्चमेळाच्या कामात हलगर्जीपणा किंवा कुचराई केल्याचे आढळल्यास संबंधित अधिका-यांवर संबंधित विभागाने नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी शिफारस देखील समिती करीत आहे.

गृहनिर्माण विभाग

८ शहरी गरीबांकरीता मुलभूत सोई उपलब्ध करणे.

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क्र.क्यू-३ "गृहनिर्माण" (सर्व दत्तमत) मधील प्रधान शीर्ष २२१६ "गृहनिर्माण", २२१७ "नगरविकास" व २२३५ "सामाजिक सुरक्षा व कल्याण"** या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र. क्यू-३ "गृहनिर्माण"

(रुपये हजारात)

८.२ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२१६, गृहनिर्माण २२१७, नगर विकास २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण दत्तमत- मूळ ७,२१,५०,३४ पुरक २,९१,३४,६४	१०,१२,८४,९८	८,५०,१७,७३	(-)१,६२,६७,२५
वर्षभरता परत केलेली रक्कम (मार्च, २००८)			१,२६,८७,७४

८.३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मागणी क्र.क्यू-३ मधील प्रधान शिर्ष २२१६, २२१७, २२३५ खालील उपशिर्षनिहाय स्पष्टीकरणेसोबत जोडली आहेत.

(रुपये लाखांत)

८.४ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२१६, गृहनिर्माण ०२, नागरी गृहनिर्माण ८००, इतर खर्च ८०० (०१)(०१) लायसन्स फीचे हस्तांतरण झोपडपट्टीत राहणाऱ्यांना गलिच्छवस्ती सुधारणा निधीकडून भरपाईची रक्कम मुळ ४,००.०० पुनर्विनियोजन - ४,००.००	--	--	--

८.५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मा.महालेखापाल कार्यालयाकडून पुस्तकी समायोजन करण्यात येत असल्याने शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांक बचत-२००८/प्र.क्र.६६/अर्थसं-१, दिनांक ३१.३.२००८ अन्वये रु.४००.०० लक्ष रक्कम, पुस्तकी समायोजनाने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये लाखांत)

८.६ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२१६, गृहनिर्माण ०२, नागरी गृहनिर्माण ८००, इतर खर्च ८०० (०३) (०६) अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का.), पश्चिम उपनगरे मूळ अनुदान - ३,७६.९८ पुर्नविनियोजन - - ३०.४०	३,४६.५८	३,०७.०८	(-) ३९.५०

८.७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये या लेखाशिर्षाखाली बचत होण्याची कारणे खालीलप्रमाणे :

१) सन २००७-२००८ या वित्तीय वर्षात एकूण ५३ पदे रिक्त राहिल्यामुळे व रजा प्रवास सवलत व स्वग्राम सवलत व कालबद्ध पदोन्नतीचे प्रमाण अल्प झाल्यामुळे व वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयकांचे प्रमाण कमी असल्यामुळे उपरोक्त बाबी विचारात घेऊन रुपये २७.०० लाख परत करणेत आलेले आहेत.

२) प्रवासभत्ता सन २००७-०८ मध्ये बदल्यांचे प्रमाण अल्प असल्याने व बदलून आलेल्या कर्मचाऱ्यांने मूळ कार्यालयामधून प्रवासभत्ता अग्रिम घेतल्यामुळे खर्च कमी झालेला आहे. शासनाचे काटकसरीच्या धोरणांमुळे स्थानिक प्रवास कमी करण्यात आल्यामुळे व कर्मचाऱ्यांनी मागणी (Claim) सादर न केल्यामुळे अनुदानात बचत.

३) कार्यालयीन खर्च-पेट्रोल, तेल, वंगण या उद्दिष्टाखालील अनुदान वित्त विभागाने रद्द केल्यामुळे पेट्रोलचा खर्च कार्यालयीन खर्चामधून करण्यात आला. त्यामुळे खर्चात वाढ झालेली नाही.

४) पेट्रोल, तेल, वंगण-शासन निर्णय दिनांक ११/४/२००७ अन्वये पेट्रोल, तेल, वंगण उद्दिष्टाच्या खर्चाकरिता रुपये २६,००० अनुदान उपलब्ध करुन देणेत आलेले आहे. यापैकी मे-०७ मध्ये प्राप्त अनुदानानुसार खर्च करण्यात आला आहे. परंतु शासन निर्णय दिनांक ७/६/२००७ व दिनांक २६/३/२००८ नुसार सदर खर्चाचे अनुदान रद्द करण्यात आले. त्यामुळे सदर खर्चात वाढ झालेली आहे.

५) भाडेपट्टी व कर-उपजिल्हाधिकारी (अति/निष्का.) अंधेरी, बांद्रा यांचे भाडे प्रति महा ३०,०००/- आहे. त्याप्रमाणे तीन महिन्याचे भाडे रु.९०,०००/- अदा करुन उर्वरित रक्कम रु.१५,०००/- भाडे वळते होऊ शकले नसल्यामुळे खर्चात बचत झालेली आहे.

६) मोटार वाहने - वित्तीय वर्ष २००२-०३ मधील रु.२१,१६०/- प्रमाणे प्राप्त अनुदान रु.१७००/- मधून वळते होत नसल्याने चालू वित्तीय वर्षामधील मोटार वाहन दुरूस्तीचे खर्च अदा करुन उर्वरित अनुदान बचत झालेली आहे.

(रुपये लाखांत)

८.८ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२१६, गृहनिर्माण ०२, नागरी गृहनिर्माण ८००, इतर खर्च ८०० (०३) (०७) अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासन), पूर्व उपनगरे मूळ अनुदान - ३,६०.९६ पुर्नविनियोजन - - २७.३९	३,३३.५७	३,२७.८०	(-) ५.७७

८.९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००७-०९ या आर्थिक वर्षात मुख्य लेखाशिर्ष २२१६ ८०० (०३) (०७) अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.) पूर्व उपनगरे या कार्यालयास रु.३६०.९६ लक्ष इतके मुळ अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. तथापि, सदर तरतूद दिनांक ३१.०३.२००८ च्या शासन निर्णय क्रमांक-वाटप-२००८/प्र.क्र.६०/अर्थसं.१ अन्वये रु.३३३.५७ लाख इतकी सुधारित करण्यात आली होती. सदर आर्थिक वर्षात प्रत्यक्ष खर्च रु.३२२.८० लक्ष इतका झालेला असून बचत रुपये ४.७७ लक्ष इतकी झालेली आहे.

सदर बचत मुख्यत्वे करुन रिक्त असलेली पदे व अगोदरच रिक्त असलेली पदे भरली न गेल्यामुळे वेतनावरील खर्चात बचत झालेली दिसून येते. तसेच कर्मचारी व अधिकारी यांचे दौरे कमी झाल्याने तसेच प्रवास खर्चाचे देयके विहित मुदतीत पारित न झाल्यामुळे सदर उद्दिष्टांतर्गत रक्कम अखर्चित राहिल्याने सदर आर्थिक वर्षात बचत झालेली दिसून येते.

(रुपये लाखांत)

८.१० प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२१६, गृहनिर्माण ८०, सर्व साधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३(०३)(१०) विदर्भ प्रदेश विकास कार्यक्रमाअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकासाठी गृहनिर्माण योजना मूळ - २५.०० पुर्नविनियोजन - - २५.००	--	--	--

८.११ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, दिनांक ३१ मार्च, २००८ अखेरपर्यंत सदर निधी वितरणास वित्त विभागाने परवानगी नाकारल्याने बचत झाली आहे.

(रुपये लाखांत)

८.१२ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
८०, सर्व साधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३(०४) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्रचना अभियान मूळ ४,७२,००.०० पुर्नविनियोजन - १,५५,११.११	३,१६,८८.८९	२,८१,०३.००	(-)३५,८५.८९

८.१३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, १०३(०४) (०१) अंतर्गत रु.३५८५.८९ लक्ष इतकी बचत झाली, त्याची कारणे खालीलप्रमाणे :

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनंचा हिस्सा वितरित करणे अभिप्रेत आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्याने त्या प्रमाणात राज्य शासनाचा निधी कमी वितरीत झाला. त्यामुळे सदर लेखाशिर्षाखाली बचत (-) झाली आहे.

उपरोक्त स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे अशी विनंती आहे.

(रुपये लाखांत)

८.१४ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+)** **बचत (-)** **(४)**
८०, सर्व साधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३(०४) (०२) एकात्मिकृत गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम मूळ १,१४,१८.२९ पुर्नविनियोजन - ६४,१८.२९	५०,००.००	५०,००.००	---

८.१५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, १०३(०४) (०१) अंतर्गत रु.३५८५.८९ लक्ष इतकी बचत झाली, त्याची कारणे खालीलप्रमाणे :

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा वितरित करणे अभिप्रेत आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात केंद्र

शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्याने त्या प्रमाणात राज्य शासनाचा निधी कमी वितरीत झाला. त्यामुळे सदर लेखाशिर्षाखाली बचत (-) झाली आहे.

उपरोक्त स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे अशी विनंती आहे.

(रुपये लाखांत)

८.१६ प्रधान शिर्ष **(१)**	**एकूण अनुदान** **(२)**	**प्रत्यक्ष खर्च** **(३)**	**अधिक खर्च (+) बचत (-)** **(४)**
२२१६, गृहनिर्माण, दत्तमत ८०, सर्व साधारण ८००, इतर खर्च ८००(००)(०५) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला उपकराच्या वसुलीची रक्कम देणे मूळ - ४६,५५.०० पुर्नविनियोजन - - २,४७.००	४४,०८.००	४४,०८.००	---

वित्त विभागाने घालून दिलेल्या मर्यादेनुसार निधी दिल्यामुळे मार्च, २००८ मध्ये रुपये २४७ लाख इतका निधी परत करण्यात आला.

८.१७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, वित्त विभागाने, मुंबई महानगर पालिकेने सन २००६-०७ प्रत्यक्ष वसूल केलेल्या उपकराच्या रकमे इतकीच म्हणजे रु.४४.०४ कोटी इतकीच तरतूद वितरित करण्यास मंजूरी दिल्यामुळे रु.२.४७ कोटीची बचत झाली. बचत झालेली रक्कम रु.२.४७ कोटी शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.बचत-२००८/प्र.क्र.६६/अर्थसं-१, दिनांक ३१.०३.२००८ अन्वये प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये लाखांत)

८.१८ प्रधान शिर्ष (१)	एकूण अनुदान (२)	प्रत्यक्ष खर्च (३)	अधिक खर्च (+) बचत (-) (४)
२२१६, गृहनिर्माण ०३, ग्रामीण गृहनिर्माण ८००(०१)(०३) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.१ मूळ - २,०४.७१ पुर्नविनियोजन - ९९,७५.६४	१,०१,८०.३५	१,०१,८०.३५	--

शेरा :- योजनेअंतर्गत घराचे बांधकाम करण्यावरील अधिक खर्च भागविण्यासाठी मार्च, २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ९९,७५.६४ लाख इतका अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

८.१९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, या योजनेवरील सन २००७-०८ या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये १,०१,८०.५ इतका होता. परंतु त्या वर्षात रु.२,०४,७१ हजार इतकाच नियतव्यय मंजूर करण्यात आला होता. यास्तव रु.९९,७५,६४ हजार इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन द्यावा लागेल.

(रुपये लाखांत)

८.२० प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
२२१७, नगर विकास ८०, सर्व साधारण ८००, इतर खर्च ८००(०१)(०३) मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळीसाठी विशेष कार्यक्रम			
पुरक ०.०१	०.०१	५०.३७	+ ५०.३६

शेरा :- रुपये ५०.३६ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारण कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

८.२१ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, जांबोरी मैदान येथे जॉंगीग ट्रॅक बांधण्याबाबतच्या २ वर्षाच्या योजनेसाठी (सन २००७-०८ व २००८-०९) एकूण रु.१,०८,४४,४५९/- (रु.एक कोटी आठ लाख चव्वेचाळीस हजार चारशे एकोणसाठ फक्त) इतक्या खर्चास शासन मंजूरी देण्यात आली होती, त्यापैकी सन २००७-०८ या आर्थिक वर्षात रु.५०.३७ लक्ष इतका नियतव्यय जिल्हा योजनेमध्ये मुंबई शहर जिल्ह्यास उपलब्ध होता. सदर तरतूद पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करुन सन २००७-०८ साठी उपलब्ध करण्यात आली होती. त्यामुळे सदर प्रकरणी कोणताही अधिक खर्च झालेला नाही. तथापि या कालावधीत खर्चमेळ वेळेत झाला नाही म्हणून अधिक खर्च दिसत आहे. खर्चमेळ वेळचे वेळी करण्याबाबत खबरदारी घेण्यात येत आहे.

साक्ष :-

८.२२ दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, अनुदान क्र.क्यु-३ "गृहनिर्माण" या अंतर्गत २२१६ गृहनिर्माण, २२१७ नगर विकास, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण याकरिता

मूळ तरतूद ७,२१,५०,३४ हजार रुपये इतकी दर्शविली आहे. पूरक मागणी २,९१,३४,६४ हजार रुपये दर्शविली आहे. मूळ अनुदान १०,१२,८४,९८ हजार रुपये दर्शविले आहे, तर प्रत्यक्ष खर्च ८,५०,१७,७३ हजार रुपये इतका झालेला दर्शविला आहे. १,६२,६७,२५ हजार रुपये इतकी बचत झालेली आहे. वर्षभरात १,२६,८७,७४ हजार रुपये इतकी रक्कम परत केलेली दर्शविली आहे. त्याची वेगवेगळी कारणे दिलेली आहेत. ही कारणे लायसन्स फीचे हस्तांतरण झोपडपट्टीत राहणाऱ्यांना गलिच्छवस्ती सुधारणा निधीकडून भरपाईची रक्कम, विदर्भ प्रदेश विकास कार्यक्रमांतर्गत आर्थिक दुर्बल घटकासाठी गृहनिर्माण योजना, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्रचना अभियान, राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना, मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळीसाठी विशेष कार्यक्रम आदी संदर्भातील आहेत. प्रत्येक विभागाचे अंदाजपत्रक पाहिले तर मागणी केलेली रक्कम खर्च न केल्याचेच दिसून येते. अर्थसंकल्पामध्ये तरतूद असते, त्याप्रमाणे पुरवणी मागणी केली जाते. परंतु, त्या प्रमाणे खर्च केला जातो का ? जास्त पैशांची मागणी का करण्यात आली तसेच मागणी केल्यानंतर ते पैसे खर्च केले गेले नाहीत. ते परत केले गेले ही बाब बरोबर नाही. अशा प्रकारच्या जास्त निधीच्या मागणीमुळे अंदाजपत्रकातील आकडे फुगतात. शिवाय त्यामुळे विकास कामाकरिता निधी कमी पडतो. २-५ टक्क्यांचा फरक पडला तर समजून घेता येईल. परंतु, वर्षभरात १,२६,८७,७४ इतकी रक्कम परत केलेली आहे. याबाबत समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००७-२००८ या वर्षाच्या सुरुवातीला ७५१ कोटी रुपयांचे बजेट अंदाजपत्रक होते. त्यापैकी क्यु-३ या मागणी क्रमांकाखाली ७१९ कोटी रुपये इतक्या म्हणजे एकूण अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकाच्या ९५ टक्के रक्कमेची मागणी करण्यात आली. या ७१९ कोटी रुपयांपैकी ६२१ कोटी रुपयांची तरतूद योजनांतर्गत खर्चासाठी होती. ९८ कोटी रुपये इतकी तरतूद योजनेत्तर खर्चासाठी होती.

८.२३ या ६२१ कोटी रुपयांच्या विभाजनाबाबत सांगावयाचे झाले तर केंद्र सरकारने सन २००६-२००७ पासून मोठ्या शहरांसाठी जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नत्थान कार्यक्रम (बीएसयुपी) व छोटया शहरांसाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) अशा दोन महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतल्या होत्या. या ६२१ कोटी

रुपयांच्या योजनांतर्गत खर्चापैकी ५८६ कोटी रुपये म्हणजे जवळपास ९० टक्केपेक्षा जास्त रक्कम या दोन योजनांकरिता होती.

८.२४ जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नत्थान कार्यक्रम (बीएसयुपी) योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या एकूण प्रकल्पाच्या किंमतीपैकी ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारचा आहे. तर बाकीची रक्कम राज्य सरकार, लाभार्थी व नगरपालिकांनी द्यावयाची होती. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) योजनेमध्ये ८० टक्के रक्कम केंद्र सरकार देणार होते. ही योजना सुरु झाल्यानंतर या योजनेतील केंद्र सरकारच्या हिश्श्याच्या ८० टक्के रकमेच्या ५० टक्के इतकी रक्कम केंद्र सरकार देणार होते. तर जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नत्थान कार्यक्रम (बीएसयुपी) योजनेच्या बाबतीत २५ टक्क्यांच्या ४ टप्प्यांमध्ये निधी रिलीज होणार होता.

८.२५ सन २००७-२००८ मध्ये केंद्र सरकारने ही योजना मंजूर केली. त्यावेळेस आपल्या ज्या ३१ योजना होत्या त्यांची आकडेवारी काढली त्या अनुषंगाने केंद्र सरकारकडून १९०० कोटी रुपये येणे अपेक्षित होते. त्याचा २५ टक्क्यांचा ४७२ कोटी रुपयांचा पहिला हप्ता मिळेल या अपेक्षेने आपण त्यावेळी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली होती. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तरात नमूद केले आहे की, केंद्र शासनाकडून जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नत्थान कार्यक्रमाच्या (बीएसयुपी) केंद्र हिश्शापोटी रु.२८७.५८ कोटी व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाच्या (आयएचएसडीपी) केंद्र हिश्शापोटी रु.३,७६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाल्याने केंद्र हिश्शापोटी नवीन लेखाशिर्ष तयार करून त्यामध्ये पुरवणी मागणीद्वारे जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नत्थान कार्यक्रमाच्या (बीएसयुपी) केंद्र हिश्शापोटी रु.२८७.५८ कोटी व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाच्या (आयएचएसडीपी) केंद्र हिश्शापोटी रु.३.७६ कोटी अशी एकूण रु.२९१.३४ कोटींची तरतूद करण्यात आली.

८.२६ पूर्वी केंद्र व राज्य सरकारचा निधी एकाच शीर्षाखाली दर्शविण्यात येत होता. त्यावेळेस असा विचार करण्यात आला की, या बाबत स्वतंत्र शीर्ष निर्माण करावा. या मागे दोन हेतू होते त्यापैकी एक हेतू असा होता की, निधीच्या अभावी योजनेचे काम थांबू नये. दुसरा हेतू म्हणजे असे केल्यानंतर केंद्र सरकार या योजनेच्या पहिल्या हप्त्यापोटी २८७ कोटी रुपये

मुक्त करेल. त्यानंतर विभागाचे अंदाजपत्रक ९१४ कोटी रुपयांवर गेले. त्यावेळी अशी अपेक्षा होती की, केंद्र शासन जास्त निधी मुक्त करील. परंतु, केंद्र शासनाकडून जास्त निधी मिळाला नाही. त्यावेळेस ८५० कोटी रुपयांचे बजेट असताना, त्या वर्षीची अंतिम आकडेवारी पाहिली तर त्यामध्ये ८६९ कोटी रुपये दिसतात. त्यामध्ये १९ कोटी रुपये वाढले आहेत. विभागाने ३०० कोटी रुपयांची मागणी केली, त्यापैकी १५० कोटी रुपये खर्च करण्यात आला. संपूर्ण रक्कम विभागाकडून खर्च करण्यात आली नाही, कारण बीएसयुपी योजनेंतर्गत अपेक्षेप्रमाणे काम झाले नाही. ५ वर्षांमध्ये ही योजना पूर्ण होऊ शकली नाही.

८.२७ विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने असे मत व्यक्त केले की, केंद्र सरकारच्या तरतूदीच्या अनुषंगाने विभागाने जास्तीची तरतूद केली होती. सन २००६ साली सुरु झालेली योजना सन २०१२ पर्यंत पूर्ण होणार होती. या योजनेकरिता केंद्र शासनाकडून निधी मिळेल या अपेक्षेने अनुरुप अनुदान म्हणून विभाग अर्थसंकल्पात जादा निधिची तरतूद करण्यात आली. परंतु, केंद्र शासनाकडून कमी तरतूद प्राप्त झाली. त्यामुळे जादा केलेली तरतूद परत करण्यात आली.

८.२८ जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानासाठी व एकात्मिक गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमासंबंधी विभागाकडून प्राप्त झालेली माहिती लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.

"जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियांना अंतर्गत व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे या यांजनांकरीता २००७-०८ मध्ये अनुक्रमे रू.२०९.५५ कोटी (केंद्र हिस्सा ८० टक्के रू.१५३ कोटी) व रु.९४३.८२ कोटी (केंद्र हिस्सा ५० टक्के रु.४३२.१६ कोटी) चे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. आयएचएसडीपीच्या योजनेकरीता केंद्र हिश्शाच्या ५ टक्के म्हणजेच रू.७६.५० कोटी तर बीएसयुपीच्या योजनेकरीता केंद्र हिश्शाच्या ५० टक्के म्हणजेच रु.१०८.०४ कोटी इतका निधी अपेक्षित होता.

या योजनेला केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त होण्याची कारणांबाबत विभागाने असे सांगितले की, योजनेचा सुरूवातीचा कालावधी असल्याने मान्य प्रकल्पाकरीता जमिनीची अनुपलब्धता, योजनेप्रती लाभार्थ्यांची जागृती नसल्याने तसेच नागरी स्वराज्य संस्थांमध्ये

योजनांच्या अंमलबजावणी करीता यंत्रणा नसल्याने योजनांची प्रगती असमाधानकारक असल्याने केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त झाला.

आयएचएसडीपी व बीएसयुपी च्या विभागनिहाय व योजना निहाय प्रकल्पांचा सविस्तर तपशिल आणि जेएनएनयुआरएम योजनेचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

केंद्र शासनाने डिसेंबर ३, २००५ रोजी देशामध्ये बीएसयुपी / आयएचएसडीपी च्या योजना राबविण्याचे ठरविले. महाराष्ट्र राज्याकरिता रु.४.५०३ कोटींचा नियत व्यय मंजूर करण्यात आला. या योजनांची अंमलबजावणी महानगरपालिका आणि नगरपालिकांकडून करावयाची आहे. सदर बाबत केंद्र शासनाने सविस्तर मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. प्रकल्प मंजूरीसाठीचे प्रस्ताव महानगरपालिका/नगरपालिका यांच्याकडून तयार झाल्यानंतर ते राज्य शासनाने एसएलएनए म्हणून नेमलेल्या म्हाडाकडे सादर केले जातात. त्यांची तपासणी केल्यानंतर प्रकल्पांची छाननी बीएमटीपीसी किंवा हुडको यांच्याकडून झाल्यानंतर ते केंद्र शासनाकडे पाठविले जातात. केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यापूर्वी राज्य शासन स्तरावर गठीत केलेल्या एसएलसीसी (आयएचएसडीपी योजनांसाठी) आणि एसएलएससी (बीएसयुपी योजनांसाठी) गठीत केलेल्या समितीपुढे प्रकल्पाची मंजूरी तथा शिफारस करण्यात येते.

केंद्र शासनाने माहे मार्च २०१२ अखेर महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर केलेल्या योजनांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

(अ) बीएसयुपीच्या एकूण ६२ प्रकल्पा अन्वये १,४५,७०४ घरकुलांच्या योजना मंजूर केल्या आहेत. यासाठीच्या प्रकल्पाची किंमत रु.६,२४०.४० कोटी असून त्यामध्ये केंद्र शासनाचा अंदाजित निधी रु.३,०१९.९६ कोटी अंदाजित केला आहे. राज्य शासनाचा निधी रु.१,६३४.११ कोटी अपेक्षित केला आहे.

(ब) आयएचएसडीपी करिता एकूण १२८ इतके तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजूर केले असून त्यामध्ये ९६,८७६ घरकुले असून प्रकल्पाची किंमत रु.२,६७०.४८ कोटी इतकी आहे. केंद्र शासनाचा निधी रु.१,६८४.५७ कोटी व राज्य शासनाचा रु.३९०.१२ कोटी अंदाजित केला आहे **(विवरण क्र._____)."**

८.२९ सन २००७-२००८ मध्ये बीएसयुपी योजना मंजूर झाली, या योजनेंतर्गत गेल्या ५ वर्षांत किती घरे बांधावयाची होती, त्यापैकी किती बांधण्यात आली, किती घरांचे काम अपूर्ण

आहे आणि त्याकरिता किती देणी दिली गेली ? ते जर पूर्ण झाले नसेल तर त्याची कारणे काय आहेत ? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बीएसयुपी आणि आयएचएसडीपी अशा दोन योजनांकरिता केंद्र शासनाचे अनुदान मिळते. बीएसयुपी योजनेंतर्गत १ लाख ५२ हजार घरे बांधावयाची होती, त्यापैकी ५५३७९ हजार घरांचे काम पूर्ण झालेले आहे. तर २४ हजार घरांचे काम प्रगतीपथावर आहे. साधारणपणे ७० हजार घरांचे काम सध्या सुरु आहे. या करीता जी मुदतवाढ मिळालेली आहे. आयएचएसडीपी योजनेंतर्गत १ लाख १६ हजार घरे बांधावयाची आहेत. त्यापैकी १७३६५ घरे बांधून पूर्ण झाली आहेत. तर १६२९१ घरांचे काम प्रगतीपथावर आहे. या दोन्ही योजना मिळून एकूण २ लाख ६८ हजार घरे बांधावयाची आहेत. सन २००६ पासून या योजनेच्या कामाला सुरुवात झाली. मार्च, २०१२ पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे होते. परंतु, केंद्र सरकारच्या हे लक्षात आले की, या योजनेचे काम आवश्यक त्या गतीने होत नाही. त्यामुळे या योजनेला आणखी २ वर्षे मुदतवाढ देण्यात आली असून या दोन वर्षांत ही घरे बांधावयाची आहेत, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

८.३० या दोन्ही योजनेंतर्गत घरे बांधण्याकरिता निधीची उपलब्धता आहे. केंद्र सरकारच्या तरतुदीएवढे अनुदान राज्य सरकारने दिली पाहिजे असे बंधन आहे. ग्रामीण भागातील बेघरांसाठी ही घर निर्मिती केली जात आहे का ? यावर शहरी भागातील लोकांसाठी ही योजना असल्याचे विभागाने सांगितले.

८.३१ निधीची उपलब्धता असतानाही सात वर्षांमध्ये या योजनेच्या प्रगतीचे प्रमाण ३० ते ३५ टक्क्यांच्या पुढे गेलेले नाही याला कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने विभागाकडे केली असता विभागाने माहिती देताना सांगितले की, जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले नाही. झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांकरिता घरे बांधण्याची ही योजना असल्याने. ज्या जागेवर त्यांची झोपडी आहे त्याच जागेवर प्रामुख्याने ही योजना राबवावयाची आहे. ती जागा जर एखाद्या प्रकल्पासाठी उपयुक्त असेल तर, मग पर्यायी जागा देऊन ही योजना राबविली जाते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

८.३२ रस्त्याच्या प्रकल्पामुळे बाधित होणारे लोक, नदीच्या पात्रामुळे बाधीत होणारे लोक यांच्यासाठी देखील ही योजना आहे का ? याबाबत विचारणा केली असता विभागीय

सचिवांनी प्रामुख्याने ही योजना झोपडपट्टीधारकांसाठी आहे. झोपडपट्टीधारकांना जेथे झोपडी आहे तेथेच घर बांधून दिले जाईल, असे सांगितले.

८.३३ झोपडपट्टी पुनर्विकास योजना यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे-

- सदरहू योजना मुख्यत्वे करून झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी राबविण्यात येते.
- ज्या झोपडीधारकांकडे फोटोपास आहे किंवा त्यांचे नांव दिनांक ०१.०१.१९८५ च्या मतदार यादीत आहे असा झोपडीधारक योजनेसाठी पात्र होता व अशी झोपडी संरक्षित होती.
- सदरहू योजनेअंतर्गत कमाल २.५ इतके चटईक्षेत्र अनुज्ञेय होते. मात्र नफा २५ टक्के पेक्षा जास्त होता कामा नये.
- सदरहू योजनेमध्ये झोपडीधारकास रु.१५,०००/- इतक्या रकमेत मिळणाऱ्या पुनर्वसन सदनिकेचे चटईक्षेत्र १८० चौ.फुट ते २२५ चौ.फु. इतके अनुज्ञेय आहे.
- सदर योजना झज्ञेपडपट्टी पुनर्विकास समितीकडून मंजूर केली जात असे.

८.३४ सन २००७-२००८ साली ही योजना अंमलात आली. त्यासाठी तरतूद करण्यात आली. या पूर्वी जी वाल्मिकी आंबेडकर मलिन वस्ती आवास योजना (VAMBAY) योजना होती तिचे वेगळे निकष होते. आता मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळया नगरपालिकांसाठी ही योजना लागू करताना अ वर्गाची महानगरपालिका असेल तर तेथे ही योजना राबविताना काय निकष असतील, ब, क वर्गाची महानगरपालिका असेल तर तेथे काय निकष असतील ? याबाबत विभागाकडून समितीला मात्र उत्तर प्राप्त झाले नाही.

८.३५ वाल्मिकी आंबेडकर मलीन वस्ती आवास योजना (VAMBAY) योजना म्हाडा मार्फत राबविली जात होती. विभागीय मंडळामार्फत इचलकरंजी, सांगली, पुणे, लातूर, अमरावती येथे झोपडपट्टीची कामे चालू होती. आता शासनाला शिफारस करावी लागेल की, 'अ', 'ब' व 'क' महानगरपालिकेकडे कामे न सोपविता म्हाडाकडे सोपविण्यात यावीत असे झ ाले तरच ही कामे योग्य प्रकारे होतील, असे मत समितीने व्यक्त केले

८.३६ सन २००७-२००८ मध्ये बीएसयुपी या योजनेचे काम सुरु झाले ते सन २०१२ पर्यंत पूर्ण होऊ शकलेले नाही. हे काम करण्याकरिता ठेकेदाराने ज्या रकमेस सदर काम करण्याची निविदा भरली होती, त्या रकमेमध्ये ठेकेदार हे काम पूर्ण करु शकणार आहे की, हे काम करण्यासाठी त्याला वाढीव सुविधा देण्याबाबत निविदेमध्ये नमूद करण्यात आले आहे काय ? कारण पुढची दोन वर्षे ठेकेदार काम करणार आहे आणि जर त्याला त्याच किंमतीमध्ये हे काम करावे लागले तर काम निकृष्ट दर्जाचे होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले सन २००६-२००७ मध्ये काही घरांना मंजुरी मिळाली. घरांच्या मंजुरीची ही प्रक्रिया सन २०१२ पर्यंत सुरुच होती. गेल्या ६ फेब्रुवारी रोजी देखील काही घरांना मंजुरी देण्यात आलेली आहे. दोन वर्षांमध्ये हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. परंतु कामाच्या दर्जाबाबत माहिती समितीस मात्र उपलब्ध होऊ शकली नाही.

८.३७ पुणे, पिंपरी-चिंचवड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर या सारख्या नगरपालिकांमध्ये या योजनेंतर्गत काम सुरु आहे. परंतु, ही योजना किती कालावधी मध्ये पूर्ण केली पाहिजे या बाबतचा कालबध्द कार्यक्रम तयार केलेला नाही. त्यामुळे या योजनेकरिता टप्पानिहाय पैसे प्राप्त झाले तरी काम रखडत जाते. सहा वर्षांमध्ये पूर्ण होणारे हे काम पूर्ण होण्यास आता आठ वर्षे लागणार आहेत. झोपडपट्टीधारकांना देण्यात येणारी ही अतिशय साधी घरे आहेत. फार मोठे आरसीसी कन्स्ट्रक्शन, कलात्मक कलाकुसर असलेली अशी ही घरे नसूनही जेवढी घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते, त्या पेक्षा कमी घरे का बांधली ? हे काम गतीने होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय अशी समितीने विचारणा केली असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना अतिशय महत्वाकांक्षी आहे. परंतु ही योजना राबविण्यामध्ये विभागाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागलेले आहे. जागेची अडचण, आरक्षण बदलण्यासंबंधीची अडचण, लोक सहभागाची अडचण, मुंबई महानगरपालिकेच्या सर्व औपचारिकतेची अडचण वगैरे. तसेच, लाभार्थ्यांना त्यांचे पुनर्वसन नेमके कोणत्या ठिकाणी अपेक्षित आहे, त्याप्रमाणे जागेचे संपादन करणे आवश्यक होते. लाभार्थ्यांच्या अपेक्षेप्रमाणे व जागेच्या उपलब्धततेप्रमाणे जर पुनर्वसनाकरिता जागा निश्चित होऊ शकली नाही तर यामधून काही तरी मधला मार्ग काढणेही आवश्यक आहे.

८.३८ विभाग कोणताही प्रकल्प राबवित असतांना त्याचा तपशीलवार प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मागवित असते, अशा प्रकारचे डी.पी.आर. विभागाला वेळोवेळी प्राप्त झाले होते. या रिपोर्टमध्ये योजना राबवितांना येणा-या प्रत्यक्ष अडचणींचा उल्लेख केला जात होता. पुनर्वसन करावयाच्या जागेवर जर पूर्वी कोणाचे आरक्षण असेल तर त्याकरिता आवश्यक ती औपचारिकता लोक सहभागाने पूर्ण करण्यामध्ये विभागाला विलंब लागत होता. काही लाभार्थी असे म्हणत होते की, पुनर्वसित घराचे स्वरुप आम्हाला ग्राऊंड + थ्री असे नको. बैठया चाळीप्रमाणे आम्हाला घरे बांधून द्यावीत, अशी लाभार्थींची मागणी होती. नियम ३७(१) व (२) प्रमाणे आरक्षणाच्या वाटाघाटी करण्यामध्ये विलंब लागत होता. सन २००६-२००७ मध्ये केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या एकत्रित सहकार्याने बनलेली आय.एच.एस.डी.पी.ही योजना राबविण्यात येत होती. सन २००६-२००७ मध्ये लाभार्थ्याला ८०,००० रुपयांमध्ये घरे बांधून मिळत होती. परंतु आता महागाई वाढल्यामुळे व डी.एस.आर. वाढल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याकरिता एका घराकरिता किमान १,८०,००० रुपये मिळाले पाहिजेत, अशी लोकप्रतिनिधींकडून मागणी आली होती. केंद्र शासनाने या योजनेच्या माध्यमातून एका घराकरिता ८०,००० रुपयांचे अनुदान १,००,००० रुपये करण्यापूर्वी राज्य शासनाने या योजनेच्या माध्यमातून अनुरुप अनुदान १,२५,००० रुपये केलेली होती. परंतु निविदा प्रक्रियेमध्ये १,७०,००० व १,८०,००० रुपये एवढी एका घराची किंमत येत होती. या संदर्भात गृहनिर्माण विभागातर्फे वित्त व नियोजन विभागाकडे एक समर्पक अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. या संदर्भात अंतिम निर्णय झाल्यानंतर कामांची गती झपाटयाने वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

८.३९ समितीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बांधून मिळणा-या घरांचा डी.एस.आर. वाढविणे हे चुकीचे आहे. जी घरे बांधून तयार आहेत, तरीही त्यांचे वितरण झालेले नाही, अशी अनेक घरे आहेत. तसेच, ज्या घरांचे बांधकाम प्रगती पथावर असून ती घरे पूर्ण झालेली नाहीत अशी ही घरे अनेक आहेत. या योजनेच्या माध्यमातून ज्या ठेकेदारांना घर बांधण्याचा ठेका दिलेला आहे. ते ठेकेदार डी.एस.आर वाढण्याची वाट बघत राहतात. डी.एस.आर वाढल्यामुळे ठेकेदार त्यांच्या कामामध्ये विनाकारण विलंब लावतात. काही घरे तयार झालेली असून त्यांचे वितरण ही झाले नाही. या योजनेअंतर्गत ५०,००० रुपयांमध्ये

बांधली जाणारी घरे विहित वेळेमध्ये पूर्ण बांधून न झाल्यामुळे त्याकरिता पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येकी घरामागे ८०,००० ते १,२५,००० रुपये निधी वाढवून घ्यावा लागला. विहित वेळेनुसार एखाद्या भागातील घरे बांधण्याकरिता उशिर का लागतो ? याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे. एखाद्या भागातील बांधकामाच्या कामामध्ये विलंब झाल्यामुळे डीएसआर वाढतो. त्यामुळे ठेकेदारांचा फायदा होतो, असे मत समितीने व्यक्त केले व मूळ कामाची किंमत, उद्दिष्टपुर्तीचा कालावधी, प्रत्यक्ष काम पूर्ण होण्याचा कालावधी ठेकेदारनिहाय असा तक्ता विभागाने समितीला सादर करण्याबाबत आदेश दिले. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता विभागाने यासंदर्भात माहिती देताना असे सांगितले कि, घरे बांधण्याचे काम चालू आहे. काही ठिकाणी घरे बांधण्याचे काम पुर्णत्वास आलेले आहे. राज्यातील काही भागामध्ये घरे बांधण्याच्या निविदा काढल्या असता निविदा जास्त येत होती. निविदा किंमतीच्या बरोबरीने अनुदान देण्याकरिता संबंधित महानगरपालिका व नगरपालिका यांच्याकडे जास्त निधीची उपलब्धतता नाही.

८.४० बीएसयूपी या योजनअंतर्गत होणाऱ्या घराच्या बांधकामाच्या दर्जासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, खामगाव नगर परिषद भागामध्ये या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांच्या बांधकामांचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे. या निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे लाभार्थी तेथे राहावयास जात नाहीत. या योजनेच्या माध्यमातून काही आरक्षित प्लॉटवर देखील घरे बांधली गेलेली आहेत. काही घरांचे बांधकाम तर इतके निकृष्ट दर्जाचे आहे की, पावसाळयामध्ये ती घरे गळावयासही लागली आहेत. या योजनेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाचा निधी खर्च होतो. परंतु निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे लाभार्थी राहावयास जात नाहीत. या संदर्भात विभागाचा व शासनाचा यावर काहीही नियंत्रण नाही का ? अशी विचारणा विभागाकडे केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नरखेड येथे चुकीच्या ठिकाणी म्हणजे नदीच्या पात्रात बांधकाम केले आहे. याबाबत जे कंत्राटदार होते त्यांच्यावर कारवाईची प्रक्रिया सुरू केलेली आहे. मात्र त्याचा आढावा म्हाडामार्फत घेण्यात आला असून याची दखल शासन पातळीवर घेतलेली आहे. विभागाने या योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांच्या बांधकामाचा दर्जाचे लेखापरीक्षण त्रयस्त संस्थेमार्फत तपासले जाते. उक्त यंत्रणेमार्फत खामगाव नगर परिषदेसंदर्भात नगर परिषद भागामध्ये जर संबंधित

ठिकाणी निकृष्ट दर्जाचे बांधकाम आढळून आले तर त्या संदर्भात योग्य ती कारवाई निश्चितपणे ताबडतोब करण्यात येईल, असे आश्वासन समितीला दिले. परंतु समितीने त्याठिकाणी नदी पात्रामध्ये जे बांधकाम करण्यात आले आहे. असे असताना तेथील संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित का करण्यात आले नाही ? नदी पात्रामध्ये बांधकाम केल्याच्या संबंधातील अहवाला संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून दहा दिवसांच्या आत समितीकडे सादर करावा असे आदेश दिले असता विभागाने याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार नगरविकास विभागाची असल्याचे समितीस सांगितले.

८.४१ लोकलेखा समिती ही विधानमंडळाची एक महत्तवाची वित्तीय समिती असून या समितीकडे शासनाने तरतूदी पेक्षा कमी किंवा जास्त खर्च केला आहे किंवा काय तसेच झालेला खर्च हा ज्या बाबीसाठी तरतूद केली होती त्याच योजनेसाठी ती खर्च झाली आहे किंवा काय व झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत हे पहाण्याची जबाबदारी प्रामुख्याने सोपविली आहे. अर्थसंकल्पिय खर्चाच्या अव्यवस्थेवर अंकुश ठेवण्याकरिता गठित केलेली असते. या समितीचा प्रमुख हा विरोधी पक्षाचा असतो. जेणेकरुन अर्थसंकल्पिय खर्चातील अनियमिततेची जाणिव शासनास अचूकरित्या करून देता येईल. शासनाचे धोरण प्रशासनाकडून योग्यरित्या राबविले जात नाही. शासनाचे एखादे धोरण राबविण्यामध्ये प्रशासन अपयशी ठरत असेल, तर त्याची माहिती घेऊन लोकलेखा समितीने आपल्या अहवालाच्या माध्यमातून शासनास अवगत करते. केंद्र व राज्य शासनाचा अनुरुप अनुदानाचा मुद्दा अचूक आहे. एखाद्या वर्षी राज्य शासनाने केंद्र शासनाची अनुरुप अनुदान गृहित धरुन अनुदान दिले असेल तर त्याचे काय झाले, हे जाणण्याचा हक्क लोकलेखा समितीला व शासनाला आहे. केंद्र शासनाकडून आलेली अनुरुप अनुदान व राज्य शासनाने दिलेले अनुदान विहित वेळेमध्ये खर्च का करण्यात आले नाही ? तसेच, विहित वेळेमध्ये अपेक्षित खर्च न झाल्यामुळे रकमा समर्पित केल्या जातात. या संदर्भातही महालेखाकार कार्यालयाप्रमाणे समितीलाही वेळोवेळी माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे महालेखाकारांकडून आलेल्या आक्षेपाच्या परिच्छेदाबाबत समितीमध्ये जे प्रश्न विचारले जातात त्याची प्रशासनाने त्याचे व्यवस्थित उत्तर देणे अपेक्षित आहे. प्रशासनाने समितीला कोणत्याही बाबीसंदर्भातील माहिती विहित वेळेमध्ये व अचूक देणे अपेक्षित आहे. विभाग अर्थसंकल्पिय खर्चाबाबत ज्याप्रमाणे महालेखाकार यांच्याकडे पुर्तता

करते, त्याचप्रमाणे लोकलेखा समितीकडे देखील प्रत्येक खर्च व त्यातील अनियमिततेविषयी पुर्तता करणे आवश्यक आहे. The Public Accounts Committee not only examines Accounts but also checks the wisdom of expenditure. However, upto certain extent we have limitations on discussion, बीएसयुपी आणि आयएचडीएसपी या योजनांची केवळ ३० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. केंद्र शासनाच्या उपरोलोखित योजनाचा मुळ उद्देश गलिच्छ वस्ती सुधार आहे. शासनाने अतिशय उद्दात हेतूने ही योजना आणली होती. परंतु योजनेच्या कामामध्ये दप्तर दिरंगाई होत असल्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन कमी पडले आहे. अशा तीव्र भावना समितीने व्यक्त करून प्रशासनाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच ही योजना राबविण्यामागे दिरंगाई व विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करणे आवश्यक असल्याने या योजनेच्या अंमलबजावणी करीता दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे निदेश समितीने विभागाला दिले व विभागाला या योजनेचा क्षेत्रनिहाय उद्दीत्य व पूर्तता या दोहोचा तक्ता बनवून समितीस सादर करण्यास सांगितले.

८.४२ एखाद्या जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजनेअंतर्गत घरकुलांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव संमत झाला असेल, तर संबंधित महानगरपालिकेला किंवा नगरपालिकेला शासनाकडून विशिष्ट निधी दिला जातो. या संदर्भात सनियंत्रण एजन्सी म्हणून केंद्र शासनाने कोणाची नेमणूक केलेली आहे ? अशी विचारणा विभागाकडे केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात केंद्र शासनाने म्हाडाला राज्य पातळीवर नोडल एजन्सी म्हणून नेमलेले आहे. या नोडल एजन्सीच्या मार्फत त्रयस्थ संस्थेमार्फत परिक्षण होऊन त्याचा अहवाल स्वतंत्र पणे केंद्र शासनाला सादर केला जातो.

८.४३ एखाद्या जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजनेअंतर्गत घरकुलांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव संमत झाला असेल, तर संबंधित महानगरपालिकेला किंवा नगरपालिकेला शासनाकडून विशिष्ट निधी दिला जातो. या संदर्भात सनियंत्रण एजन्सी म्हणून केंद्र शसनाने कोणाची नेमणू केलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, नगरपालिका किंवा महानगरपालिका आहेत त्याबाबत दर महिन्याला आढावा घेतला आहे. तसेच मुख्य सचिवांच्या पातळीवर व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे आढावा

देखील घेतलेला आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे आणि संपूर्ण देशामध्ये प्रथम आपल्या महाराष्ट्र राज्यात ही महत्वाकांक्षी योजना राबविली जात आहे.महाराष्ट्र राज्यामध्ये योजना राबवित असताना येथील परिस्थिती समाधानकारक नाही अशी याबाबतीत भीती व्यक्त करण्यात आली होती. म्हणून मुख्य सचिवांनी दोन वेळा व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली आणि सचिवांनी त्या-त्या विभागीय मुख्यालयात जाऊन आढावा घेतला होता. त्यावेळी सर्व महानगरपालिकेचे आयुक्त आणि अधिकाऱ्यांनाही बोलविण्यात आले होते.

८.४४ जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (जे.एन.एन.यु.आर.एम.) साठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होतो. त्याचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे काय ? योजना मंजूर होऊन निधी प्राप्त झाल्या नंतर खर्च होण्यास वेळ लागतो. अगोदर शहरी विभागाला निधी मिळत नव्हता. आता केंद्र शासनाकडून निधी मिळतो. जेव्हा निधीची मागणी केली जाते तेव्हा तेथे काम करण्याची सुविधा आहे की नाही हे पाहिले जात नाही. असे झ ाल्यानंतर दुसऱ्या कामासाठी निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे योजना तयार करताना तेथील फिजिबिलिटी तेथील परिस्थिती न पाहता जर निधीची मागणी केली तर त्यातून प्रश्न निर्माण होतात. सोलापूर, अमरावती, पुणे, ठाणे इ.ठिकाणी जवळजवळ १५-२० लाख लोकसंख्या आहे.त्याठिकाणी जे.एन.एन.यु.आर.एम. बाबत काय स्थिती आहे याची समितीला माहिती ? तसेच नागपूर,अमरावती, औरंगाबाद, पुणे, सोलापूर,ठाणे इ. नगरपालिकांचे लेखापरीक्षण अहवाल समितीला सादर करण्याबाबत समितीने विभागास सांगितले देण्याबाबत आदेश दिले.

८.४५ समितीने एकात्मिक गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमांतर्गत पूनर्विनियोजन ६४ कोटी रुपयांचे आहे असे नमूद केले आहे. विभागाने ही योजना १ लाख १६ हजार घरांची असून त्यापैकी १७ हजारांची कामे पूर्ण झालेली आहेत. याबाबतीत शहरनिहाय संपूर्ण माहिती समितीस देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले.

८.४६ केंद्र शासनाकडून जे.एन.एन.यु.आर.एम. बाबत निधी प्राप्त करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? त्याप्रमाणे संबंधित विभागाने प्रयत्न केले आहेत काय ? राज्य शासनाने उपभोक्ता प्रमाणपत्र वेळेवर पाठविले नाही म्हणून या योजनेच्या बाबतीत शासन मागे पडत आहे. सदरहू योजनेची अंमलबजावणी राज्य शासनाने वेळेवर केली नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य शासन अंमलबजावणी करीत नाही

तर नगरपालिका आणि महानगरपालिका अंमलबजावणी करते याबाबतीत नियंत्रण कोण करते ? याबाबतीत आढावा घेऊन जर याची अंमलबजावणी होत नसेल तर त्याबाबत कारवाई का करीत नाही काय? नगरपरिषद आणि महानगरपालिका त्यांच्यावर कारवाई करीत नाही काय ? अशी विचारणा समितीने विभागाकडे केली असता विभागाने याबाबत कारवाई करण्याची जबाबदारी नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगर पालिका यांची आहे. कारवाई करण्याची जबाबदारी ज्या संस्थेने कामे दिले आहेत त्यांची असल्याचे सांगितले.

८.४७ ज्या नगरपालिका किंवा महानगरपालिका यांनी वेळेवर कामे केली नाहीतर त्यांच्यावर कारवाई का करीत नाही ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने यासंबंधातील अहवाल मागितलेला आहे. तो प्राप्त झाल्यानंतर लक्षात येईल की, कोणत्या नगरपालिका किंवा महानगरपालिका यांनी कोणी किती कामे केलेली आहेत? केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. त्यामधून म्हाडा, नगरविकास विभाग, नगरपालिका, महानगरपालिका यांना निधी दिला जातो. जास्त निधी मिळण्यासाठी वित्त विभाग प्रयत्न करीत आहे. यावर वित्त विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, वित्त विभागाने निधी दिलेला आहे आणि त्याच्या उपभोक्ता प्रमाणपत्र मार्कींग करण्याची जबाबदारी त्या-त्या विभागाची आहे.यामध्ये वित्त विभाग केवळ समन्वय करण्याचे काम करतो. महालेखाकार यांच्याकडून विचारणा करण्यात आली होती की, उपभोक्ता प्रमाणपत्र किती प्रमाणात प्रलंबित आहेत याची माहिती घेण्यासाठी उप सचिवांची बैठक घेण्यात आली होती आणि त्यांना असे सांगण्यात आले होते की, जो निधी देण्यात आला आहे त्याबाबत त्यांनी पाठपुरावा करावा. पण याबाबत हमी देऊ शकणार नाही.

८.४८ उपभोक्ता प्रमाणपत्राबाबत प्रधान महालेखाकार यांनी समितीस असे सांगितले की, हाऊसिंग डिपार्टमेंट से संबंधित वर्ष २००९-१० का एक युटिलाईजेशन सर्टिफिकेट पेंडिंग है जिसकी राशि करीब १.५ करोड़ रुपये है. वर्ष २०११-१२ के २२ युटिलाईजेशन सर्टिफिकेट पेंडिंग हैं जिनकी राशि करीब ८५३.०८ करोड़ रुपये है. इस तरह से कुल २३ युटिलाईजेशन सर्टिफिकेट पेंडिंग हैं जिनकी कुल राशि ८५४.५८ करोड़ रुपये है, अशी माहिती समिती समोर दिली असता समितीने ही गंभीर बाब असल्याचे सांगून नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करताना सांगितले की, केंद्र शासनाच्या जवळजवळ २५ टक्के

योजना महाराष्ट्राला मिळाल्या. पण महाराष्ट्रात जी प्रगती होत आहे ती सरासरीइतपतच झाल्याचे दिसते. ज्या योजना ५ वर्षामध्ये पूर्ण होतील अशी अपेक्षा होती पण तसे झाले नाही. त्यामुळे केंद्र शासनाने यासाठी दोन वर्षाची मुदतवाढ दिली आणि त्यामुळे केंद्र शासनाच्या योजना मंजूर झाल्या. याबाबतीत जाणुनबुजून दिरंगाई केली असेल तर संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे.पण योजना करीत असताना अनेक अडचणी समोर आल्या. याबाबतीत आढावा घेतल्यानंतर लोकांना सांगितले की, अमुक-अमुक अडचणीमुळे कामे करु शकत नाही. पण याचा अर्थ असा नाही की, अडचणी सांगितल्यानंतर कामे सोडून दिली. जर तेथील झोपडपट्टी हटत नसेल तर त्यांना जबरदस्तीने तेथून काढले पाहिजे. तोपर्यंत काम होऊ शकत नाही. आतापर्यंत ८०० घरांचे काम पूर्ण झाली आहेत. २ लाख ६८ हजार घरांच्या कामाच्या संबंधातील प्रगती कमी दिसते आणि त्यामुळे याबाबतीत विभागाला सुद्धा समाधान वाटत नाही. परंतु However, our progress is good in comparison to rest of India, असेही त्यांनी समितीस सांगितले.

८.४९ प्रधान शीर्ष २२१६, गृहनिर्माण या अंतर्गत अप्पर जिल्हा अधिकारी (अति/निष्क) पश्चिम उपनगरे या उपशिर्षा अंतर्गत रु.३९.५० लाखाच्या बचतीची कारणे सांगताना सन २००७-२००८ या वित्तीय वर्षात एकूण ५३ पदे रिक्त राहिली, असे स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद केले आहे. सदर ५३ पदे कोणत्या संवर्गातील व त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.

संवर्ग	**पदे**	**रिक्त**	**भरलेली**
वर्ग-२ राजपत्रित (नायब तहसिलदार)	०६	०१	०५
वर्ग-३ ची पदे (अराजपत्रित)	३७	३७	--
अव्वल कारकून - ५			
लिपिक टंकलेखक - ४			
लिपिक - ३			
वसूली (बिल) लिपिक - २४			

गोडाऊन किपर - १			
वर्ग ४ ची पदे (हमाल)			
एकूण पदे	**५३**	**४३**	**१०**

८.५० विदर्भ प्रदेश विकास कार्यक्रमा अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेंच्या निधी वितरणास वित्त विभागाने परवानगी नाकारल्याची कारणे संदर्भातील विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.

"(१) विदर्भ प्रदेश विकास कार्यक्रमाची थोडक्यात पार्श्वभूमी-विदर्भ विकास कार्यक्रमाची आढावा घेण्यासाठी दिनांक ३१.१२.१९९९ रोजी नागपूर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निश्चित करण्यात आलेल्या सुधारित आराखडयाच्या अनुषंगाने नियोजन विभागाने शासन निर्णय दि.२५.०२.२००० निर्गमित केला होता. त्यामध्ये म्हाडाच्या माध्यमातून नागपूर विभागात ४९४१ सदनिका व अमरावती विभागात ६४० सदनिका (प्रत्येकी रु.५०,०००/- इतक्या मर्यादित) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी नागपूर मंडळामार्फत मार्च २००७ अखेर २८१९ गाळे बांधण्यात आल्याचे दिसून येते. अमरावती मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या गाळयांची माहिती उपलब्ध नाही.

या कार्यक्रमाकरीता शासनाने सन २००२-०३, २००३-०४ व २००४-०५ या कालावधीत एकूण रू.२६७.५० लक्ष इतका निधी नागपूर मंडळास वितरीत केला होता. सदर निधीचा विनियोग कशाप्रकारे केला, त्याबाबत समाधानकारक खुलासा म्हाडाकडून प्राप्त न झाल्याने सन २००५-०६ व २००६-०७ या वर्षाकरीता म्हाडाला करण्यात आलेल्या प्रत्येकी रु.२६.०० लक्षची तरतूद वितरीत करण्यात आली नव्हती.

(२) सन २००७-०८ च्या तरतूदीबाबत खुलासा सन २००७-०८ मध्ये या योजनेकरीता रु.२५.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. परंतु सदर निधी त्याच प्रयोजनासाठी वापरण्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र म्हाडा सादर करू शकले नाही. तसेच सदर निधी दुसऱ्या प्रयोजनासाठी खर्च केल्याचे आढळून आल्याने वित्त विभागाने सदर निधी वितरीत करण्यास मान्यता दिली नाही. परिणामी ही निधी प्रत्यार्पित करण्यात आला. "

८.५१ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेची माहिती खालील प्रमाणे आहे.

"राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१- राज्याच्या ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना एकूण ५०,००० घरकुले बांधून देण्यासाठी राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ राबविण्याबाबतचा निर्णय शासनाच्या दि.१ नोव्हेंबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या योजनेतून लाभार्थींना घरकुल बांधण्यासाठी प्रत्येकी रु.२८,५००/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. या योजनेचा कालावधी १ जानेवरी, २००७ ते ३१ डिसेंबर, २००८ असा होता. तथापि, सदर कालावधीत योजना पूर्ण करणे शक्य नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर योजनेस दिनांक ३१.१२.२००९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या योजनेस लागणारा संपूर्ण निधी म्हाडा प्राधिकरणास शासनाकडून वितरीत करण्यात आला असून ही योजना पूर्ण झाली आहे."

८.५२ जांबोरी मैदान येथे जॉगिंग ट्रॅक बांधण्यासाठी १ कोटी ८ लाख ४४ हजार इतका निधी देताना असे नमूद केले आहे की, जिल्हा योजनेमध्ये ५०.३७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे काम जवळपास १ कोटी रूपयांचे होते. सन २००७-२००८ यावर्षासाठी अधिकची रक्कम खर्च झालेली आहे. परंतु या कालावधीमध्ये निधी वेळेत खर्च झाला नाही म्हणून अधिक खर्च झाल्याचे दिसत याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जांबोरी मैदानामध्ये जॉगिंग ट्रॅक बांधण्यासाठी लाक्षणिक तरतूद १ हजार रुपयांची होती. मग पुनर्विनियोजन करुन ५०.३७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती, ती खर्च करण्यात आली असून सद्यस्थितीत सदरहू काम पूर्ण झाले आहे.

८.५३ संक्रमण शिबीराबाबत समितीने अशी विचारणा केली की, २२ हजार संक्रमण शिबीर असून त्यापैकी जवळपास ५० टक्के संक्रमण शिबीरामध्ये घुसखोरी झाली आहे. याबाबत माहिती देताना उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी समितीस सांगितले की, चाळींचे पुनर्विकास करीत असताना तेथील रहिवाशांसाठी संक्रमण शिबीरामध्ये राहण्याची व्यवस्था केली जाते. सकृतादर्शनी २२ हजार पैकी ८ हजार शिबीरामधील घुसखोर अधिकृत आहेत व ११,५०० घुसखोर अनधिकृतपणे राहत आहेत. या संदर्भात म्हाडाने कार्यवाही सुरु केली आहे व संगणकीय डाटा तयार केलेला आहे. संक्रमण शिबीरामध्ये घुसखोरी केलेल्या लोकांनी त्यांना तेथून कोणी काढू नये, यासाठी कोर्टात धाव घेतली होती. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा निर्णय दिला आहे की, संक्रमण शिबीरामध्ये पात्र असलेल्या लोकांनाच

ठेवावे. त्या अनुषंगाने संक्रमण शिबीरामधून घुसखोरी केलेल्या अपात्र लोकांना काढण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. परंतु तेथे अशा प्रकारची कारवाई करण्यासाठी संबंधित यंत्रणा गेल्यानंतर, लोकांचा मोठा जमाव तयार होतो. परिणामी पुढील कारवाई करण्यास अडचणी येतात. परंतु, विभागाकडून पोलिस आयुक्त यांना पोलिस संरक्षण देण्याची विनंती केली असता पोलिस आयुक्तांनी घुसखोरांना संक्रमण शिबीरातून बाहेर काढण्याच्या कार्यवाही करते वेळी पोलिस संरक्षण देण्याचे मान्य केले.

८.५४ अनधिकृत लोकांना संक्रमण शिबीरातून बाहेर काढण्यासाठी कोणती कारवाई करणार आहात ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू लोकांनी ज्या पध्दतीने तेथे घुसखोरी केली आहे, त्याचा विचार केल्यास ते सहज पध्दतीने बाहेर निघणार नाहीत. त्यांच्याविरुध्द कडक स्वरुपाची कारवाई करावी लागणार आहे.

८.५५ म्हाडातील व्यवहारात दलालांचा वावर वाढला आहे, याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, गेल्या वर्षी म्हाडामार्फत लॉटरी प्रक्रिया झाली होती, त्यावेळी दलालांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट असल्यासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या प्रकरणी चौकशी केल्यानंतर १७ जणांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्या होत्या. त्यानुसार त्यांच्याविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल केलेला आहे. यावर्षी म्हाडाची लॉटरी प्रक्रिया पूर्ण झाली, त्यात एकाही दलालाच्या संदर्भात म्हाडाकडे तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे समितीला सांगितले.

८.५६ संक्रमण शिबीरातील ८ हजार घुसखोर आहेत. त्या घरांचा लिलाव का केला जात नाही ? या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ही संक्रमण शिबीर असल्यामुळे त्या घरांचा लिलाव करता येत नाही. म्हाडाच्या जागेत मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अतिक्रमणाची माहिती समितीस सादर करण्यास सांगितले असता सदरहू माहिती (**विवरण क्रमांक _____)** आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

८.५७ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरएम) हा शहर आधुनिकीकरणाचा मोठा कार्यक्रम आहे. या अभियानांतर्गत शहरी गरीबांकरिता मुलभूत

सुविधा (बीएसयुपी) व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) या दोन महत्त्वाकांक्षी योजना राज्यात म्हाडामार्फत राबविण्यात येतात. बीएसयुपी योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या एकूण प्रकल्पाच्या किंमतीपैकी ५०% हिस्सा केंद्र सरकारचा आहे तर उर्वरित रक्कम राज्य सरकार लाभार्थी व नगरपालिकेने द्यावयाची आहे. आयएचएसडीपी योजनेंमध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ८०% आहे.

८.५८ केंद्र शासनाने माहे मार्च, २०१२ अखेर महाराष्ट्र राज्यासाठी बीएसयुपी योजनेंतर्गत एकूण ६२ प्रकल्पांन्वये रु.१,४५,७०४/- घरकुलांच्या योजना मंजूर केल्या आहेत. यासाठी प्रकल्पाची किंमत ६२४०.४० कोटी असून त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ३०१९.९६ कोटी अंदाजित असून राज्य शासनाचा हिस्सा १६३४.११ कोटी इतका अपेक्षित आहे. आयएचएसडीपी योजनेकरिता १२८ प्रकल्प वगळून केले असून त्यामध्ये घरांचे लक्ष रु.९६,८७६/- असून प्रकल्पाची किंमत २६७०.४८ कोटी इतकी आहे. केंद्र शासनाचा निधी १६८४.५७ कोटी एवढा अंदाजित असून राज्य शासनाचा निधी ३९०.१२ कोटी इतका अपेक्षित आहे.

८.५९ सन २००७-२००८ मध्ये या योजनांकरिता केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्यामुळे राज्य शासनाच्या हिस्साच्या अनुरुप अनुदान परत करण्यात आल्याचे समितीच्या साक्षीमध्ये निदर्शनास आले. यासंदर्भात कार्यालयीन मिमांसा करताना विभागाने योजनेच्या सुरवातीच्या कालावधीमध्ये मान्य प्रकल्पांकरिता जमिनीची अनुपलब्धता, योजने प्रती लाभार्थ्यांची जागृती नसणे तसेच नागरी स्वराज्य संस्थामध्ये योजनांच्या अंमलबजावणीकरिता यंत्रणा नसल्याने योजनांची प्रगती असमाधानकारक झाल्याचे निदर्शनास आले. या योजनांकरिता केंद्र शासनांकडून भरगोस अनुदान मिळत असल्याने केंद्र शासनाने मंजूर केलेले किमान प्रकल्प विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. केवळ प्रकल्प पूर्ण होत नसल्याने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नाही ही अतिशय खेदाची बाब आहे. **केंद्र शासनाने या योजनेंचा कार्यकाळ माहे मार्च, २०१२ पासून माहे मार्च, २०१४ असा दोन वर्षांकरिता वाढविला असल्यामुळे या प्रकल्पांतर्गत लवकरात लवकर सदनिका बांधून पूर्ण होण्यासाठी शासनाने जमिन उपलब्ध करुन देणे नागरी स्वराज्य संस्थाद्वारे याची अंमलबजावणी यशस्वीरित्या राबविणे तसेच लाभार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे यादृष्टीने ठोस उपाययोजना कराव्यात**

ज्यायोगे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात यशस्वीपणे राबविला जाईल व शहरी गरीबांकरिता मुलभूत सोई उपलब्ध होतील अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

८.६० एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास आयएचएसडीपी कार्यक्रम मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेड या शहरांव्यतिरिक्त इतर ठिकाणी राबविण्यात येत आहे. झोपडपट्टी धारकांना बांधून देण्यात येणारी घरे ही अतिशय साधी व कमी आरसीसी कन्ट्रक्शन असलेली आहे. असे असताना ही ज्या ठेकेदारांना ही घरे बांधण्याचा ठेका देण्यात आलेला आहे ते ठेकेदार कामामध्ये विनाकारण विलंब लावत असल्यामुळे विहित कालावधीमध्ये घरे बांधून पूर्ण न झाल्यामुळे घरबांधणीचा खर्च देखील वाढत आहे. **बांधकामामध्ये होत असलेल्या विलंबामुळे ठेकेदारांचा फायदा होत असल्याने ठेकेदार विहित मुदतीत घरे बांधण्यास टाळाटाळ करीत आहे तसेच समितीच्या निदर्शनास आले की, खामगांव नगरपरिषद भागामध्ये या योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या बांधकामाचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे. तर नरखेडे येथे नदीच्या पात्रामध्ये बांधकाम केल्याचे समितीस आढळून आले आहे. अशाप्रकारे घरांच्या बांधकाम करणाऱ्या, विलंब लावणाऱ्या व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांना शासनाच्या काळ्या यादीमध्ये टाकावे तसेच त्यांनी आतापर्यंत केलेल्या निकृष्ट कामाबद्दल त्यांना दंड ठोठावून त्याबाबतची वसूली त्यांच्याकडून करुन घ्यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

८.६१ बीएसयुपी व आयएचएसडीपी या योजनांची कामे पूर्ण होण्याची टक्केवारी अतिशय कमी आहे तसेच त्याबाबतचे काम देखील अतिशय संथगतीने चालू आहे. केंद्र शासनाने ज्या उद्दात्त हेतूने ही योजना आणलेली आहे तो हेतू कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे संपूर्णतः सफल होत नसल्याने या योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासन कमी पडत आहे त्याबाबत समितीने प्रशासनाच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. **या योजनांचा शासनाने संपूर्णतः आढावा घ्यावा व त्या राबविण्यामध्ये दिरंगाई करणाऱ्या व विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर आवश्यक ती कारवाई करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

८.६२ चाळींचा किंवा मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करतांना तेथील रहिवाशांसाठी संक्रमण शिबिरांमध्ये राहण्याची व्यवस्था केली जाते. सध्या २२००० सदनिका

शिबिरात असून जवळपास ५०% संक्रमण शिबिरांमध्ये घुसखोरी झालेली आहे. यामध्ये जवळजवळ ११५०० घुसखोर अनधिकृतपणे राहात आहे. **म्हाडातर्फे संक्रमण शिबिरांमधून घुसखोरी केलेल्या अपात्र लोकांना काढण्याची कारवाई जरी करण्यात येत असली तरी ही कारवाई अपुरी पडत आहे. या घुसखोरांवर कडक कारवाई करण्याअगोदर म्हाडाने कागदपत्रे तपासुन पहावीत व नंतरच त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच याकरिता आवश्यक तेथे पोलीस संरक्षण घेऊन त्यांना त्वरित बाहेर काढण्याबाबत उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची समितीस तीन महिन्यात माहिती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

उच्च व तंत्र शिक्षण

९ विद्यापीठातील रिक्त पदांसंदर्भात

९.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क्र.डब्लू-२ "सर्वसाधारण शिक्षण" अंतर्गत प्रधान शीर्ष २२०२ सर्वसाधारण शिक्षण व अनुदान क्र.डब्लू-४ "कला व संस्कृती" अंतर्गत प्रधानशीर्ष २२०५ कला व संस्कृती, २२३० "कामगार व सेवायोजन"** या शीर्षा अंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चा संबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

विनियोजन क्रमांक डब्ल्यु - २ "सर्वसाधारण शिक्षण"

(रुपये हजारात)

९.२		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
प्रधान शीर्ष - २२०२, सर्वसाधारण शिक्षण दत्तमत - मूळ पूरक	}	१४,१८,४६,०४	१३,४६,६१,९५	(-) ७१,८४,०९
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८)				
भारित मूळ पूरक	} १,१	१,१२,०९	१,१०,९६	७१,२८,१६
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च,२००८)				(-) १,१३
				२,००

टिपा व भाष्ये :- अनुदानातील रुपये ७१८४.०९ लाख इतकी अंतिम बचम असताना वर्षभरात रुपये ७१२८.१६ लाख इतका निधी प्रत्यार्पित होणे अपेक्षित होते.

९.३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, रु.१४,१८,४६,०४ मंजूर अनुदानापैकी रु.१३,४६,६१,९५ एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. त्यामुळे रु.७१,८४,०९ एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. वास्तविक तेवढाच निधी प्रत्यार्पित करणे आवश्यक असताना रु.५५९३,००० एवढा निधी कमी प्रत्यार्पित करण्यात आला. एकूण तरतूदीशी तुलना करता ही रक्कम अल्प आहे. तेव्हा ती क्षमापित करण्यासाठी मा.महालेखापाल यांना विनंती करण्यात यावी.

भारित :- महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.४		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०२, माध्यमिक शिक्षण १०५, शिक्षकांचे प्रशिक्षण १०५ (०२)(०१), सर्वसाधारण परिरक्षण अनुदाने				
मूळ पुनर्विनियोजन	१७,६३.०५ ४,०१.०१	१३,६२.०४	१३,६२.०४	.....

अनुदानीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ झाल्याने तसेच शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त राहिल्याने मार्च, २००८ मध्ये रुपये ४०१.० लाख इतका अपेक्षित निधी प्रत्यार्पित करण्यात आला

९.५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मंजूर तरतूदीएवढाच खर्च झालेला आहे.

(रुपये लाखांत)

९.६		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०२, विद्यापीठांना सहाय्य १०२ (००)(०१), सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने				
मूळ पूरक पुनर्विनियोजन	१,२०,४१.५५ २,०८.२० - ६,४९.७५	१,१६,००.००	१,१५,९९.६७	(-) ०.३३

अनुदानीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ झाल्याने तसेच शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त राहिल्याने मार्च, २००८ मध्ये रुपये ४०१.० लाख इतका अपेक्षित निधी प्रत्यार्पित करण्यात आला

९.७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.८		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०४, अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य १०४(०१)(०१), अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य, अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधि महाविद्यालयांना अनुदाने				
मूळ पूरक पुनर्विनियोजन	१०,६२,७३.६५ १,१५,०२.०० - ४८,१७.६६	११,२९,५७.९९	११,२९,०१.२३	(-) ५६.७६

शिक्षण आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त राहिल्याने आणि तसेच अनुदानांच्या संगणेनुसार काही महाविद्यालयांकडून वसुली करण्यात आल्यामुळे, मार्च, २००८ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजना-द्वारे रु.४८,१७.६६ लाख इतका निधी काढण्यात आला.

रुपये ५६.७६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट, २००८)

९.९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, या उपलेखाशिर्षांखाली अंतिम तरतूद रु.११,२९,५७.९९ एवढी मंजूर होती. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च रु.११,२९,०१.२३ एवढा झालेला आहे. रु.५६,७६ एवढी बचत दर्शविली आहे. तो खर्च एकूण तरतूदीच्या अनुषंगाने नगण्या आहे. तो क्षमापित करण्यात यावा.

(रुपये लाखांत)

९.१०		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०३, शासकीय महाविद्यालये व संस्था १०३ (०१)(०२), शासकीय कला महाविद्यालयांचा विकास				
मूळ पुनर्विनियोजन	२,१४.४२ - १३.५७	२,००.८५	१,९८.७४	- २.११

९.११ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.१२		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०३, शासकीय महाविद्यालये व संस्था १०३ (०५)(०१), विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचे परिरक्षण				
मूळ		२,'		
पूरक	६.१६	१,८४.१८	१,८२.२५	(-) १.९३
पुनर्विनियोजन	- ३३.६७			

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे व रिक्त राहिल्याने आणि तसेच, कोषागार कार्यालयांद्वारे अर्थसंकल्पीय वितरण पद्धतीनुसार देयकांना मंजूरी न मिळाल्याने, मार्च, २००८ मध्ये उपरोक्त उपशीर्षाखाली प्रत्यर्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रुपये १६१.२३ लाख इतका निधी काढण्यात आला.

रुपये २०.२२ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत.

९.१३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, या उपलेखाशिर्षाखाली अंतिम तरतूद रु.१,८४,१८ एवढी मंजूर होती. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च रु.१,८२.२५ एवढा झालेला आहे. या उपलेखाशिर्षाखाली रु.१.९३ एवढी बचत दर्शविलेली आहे. ही तरतूदीच्या तुलनेने नाममात्र आहे. ती क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

९.१४		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०७, शिष्यवृत्त्या १०७ (०१)(०१), महाविद्यालयांतील सर्वसाधारण शिष्यवृत्या				
मूळ पुनर्विनियोजन	-३६.७५	१३.२५	१६.८०	(+) ३.५५

९.१५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.१६		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
८० - सर्वसाधारण १०७, शिष्यवृत्तया १०७ (०१)(०५), राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना				
मूळ पुनर्विनियोजन	१,००.०० - ६७.५१	३२.४९	३३.५१	(+) १.०२

९.१७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.१८		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
८० - सर्वसाधारण ८००, इतर खर्च ८०० (०२)(०९), ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,००० पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी				
मूळ पुनर्विनियोजन	१०,००.०० - ७,४६.६२	२,५३.३८	२,५३.५२	(+) ०.१४

विद्यार्थ्यांकडून कमी प्रमाणात अर्ज आल्यामुळे मार्च, २००८ मध्ये उपरोक्त उपशीर्षाखाली रूपये ८५०.८८ लाख इतका निधी प्रत्यर्पित करण्यात आला.

९.१९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.२०		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
८० - सर्वसाधारण ८००, इतर खर्च ८०० (०४)(०१), अवर्षणग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करणे				
मूळ पुनर्विनियोजन	३३.६० - २९.९४	३.६६	३.६६	.....

विद्यार्थ्यांकडून कमी प्रमाणात अर्ज आल्यामुळे त्याचप्रमाणे विभागीय उप संचालकांच्या कार्यालयाकडून कमी मागणी आल्यामुळे, मार्च, २००८ मध्ये प्रत्यर्पणाद्वारे रुपये २९.९४ लाखांची अपेक्षित बचत झाली

९.२१ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, मंजूर तरतूदी एवढाच खर्च झालेला आहे.

(रुपये लाखांत)

९.२२		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०२, माध्यमिक शिक्षण १०५, शिक्षकांचे प्रशिक्षण १०५ (०१) (०१), शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये				
मूळ	४,९१.३६	५,८८.८६	६,०७.७७	+ १८.९१
पूरक	८६.३८			
पुनर्विनियोजन	११.१२			

९.२३ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, या उपलेखाशिर्षाखाली रु.१८.९१ एवढा अधिक खर्च झालेला आहे. मूळ तरतूद व पूरक तरतूदीच्या तुलनेने नाममात्र आहे. ती क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

९.२४		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०३, शासकीय महाविद्यालये व संस्था १०३ (०५)(०३), तालुक्यांस्या ठिकाणी मूलींची वसतिगृहे उघडणे				
मूळ पुनर्विनियोजन	१ १	२७.७५	२७.७४	- ०.०१

प्रियदर्शनी वसतिगृहांसाठीच्या सहाय्यक अनुदानात वाढ केल्यामुळे मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये १२.७५ लाख इतक्या निधींची तरतूद करण्यात आली.

९.२५ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये लाखांत)

९.२६		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
८०, सर्वसाधारण १०७, शिष्यवृत्त्या १०७ (०१)(०७), एकलव्य शिष्यवृत्ती योजना (राज्यस्तरीय योजना)				
मूळ पुनर्विनियोजन	६०.०० २१.०५	८१.०५	८०.९५	- ०.१०

नवीन शिष्यवृत्तीसाठी तसेच शिष्यवृत्तीचे नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांकडून जास्त अर्ज प्राप्त झाल्यामुळे, मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये २१.०५ लाख इतक्या निधीची तरतूद करण्यात आली.

९.२७ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

अनुदान क्र.डब्लू-४ "कला व संस्कृती" अंतर्गत
प्रधानशीर्ष २२०५ कला व संस्कृती, २२३० "कामगार व सेवायोजन"

(रुपये हजारात)

९.२८		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
प्रधान शीर्ष --- २२०५, कला व संस्कृति २२३०, कामगार व सेवायोजन				
दत्तमत --				
मूळ	२,९५,५०,२७	४,०४,८९,९४	३,८५,१५,९१	- १९,७४,०३
पूरक	१,०९,३९.६७			
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च ०८)				२४,७१,८६

९.२९ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

(रुपये हजारांत)

९.३०	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
भारित --			
मूळ पूरक	४१,५२	३९,५७	- १,९५
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च ०८)			८५

टिप :-

ग्रंथालय निधी - राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, रचना व विकास याकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अन्वये ग्रंथालय निधी स्थापन करण्यात आला आहे. वार्षिक अभिहस्तांकनाद्वारे महसुलामधुन रुपये २५ लाखांपेक्षा कमी नाही इतकी रक्कम खर्च खाती घालून या निधीत अंशदान करण्यात येते. २००७-२००८ या वर्षात रुपये ४५५८.२१ लाखांइतकी रक्कम निधीत जमा करण्यात आली.

राज्यात ग्रंथालयाची स्थापना, देखभाल, रचना व विकास यांवर झालेला खर्च सुरूवातीस या अनुदानात खर्ची घालण्यात आला आणि वर्षाचे लेखे बंद करण्यापूर्वी निधीत हस्तांतरीत करण्यात आला. यावर्षामध्ये, रु.३७,३८.८३ लाख एवढा खर्च निधीत हस्तांतरीत करण्यात आला होता. ३१ मार्च २००८ रोजी निधीत शिल्लक जमा रक्कम रुपये १६,४४२.१५ लाख एवढी होती.

९.३१ ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, महालेखापालांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

साक्ष :-

९.३२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दि. २२ ऑगस्ट, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी सन २००८-०९ या वर्षाच्या विनियोजन अहवालातील बरेच परिच्छेद प्रलंबित असल्याचे सांगितले व फक्त २५ % रिकन्सिलेशन विभागाने पूर्ण केले आहे. प्रलंबित परिच्छेदासंदभारत समितीने विभागाच्या कामकाजावर असमाधान व्यक्त केले असता सदर प्रलंबित परिच्छेद लवकरात लवकर पुर्ण करण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

९.३३ सन २००७-०८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्रमांक डब्ल्यू-२ "सर्वसाधारण शिक्षण" या लेखाशीर्षांतर्गत रुपये १३४६.६१ कोटी एवढ्या निधीचे कोणत्या बाबींवर खर्च करण्यात आला त्याचा तपशील देण्याबाबत विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वसाधारण शिक्षणासाठी १४१८.६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात खर्च १३४६.६१ कोटी रुपये खर्च झालेला आहे. सन २००७-०८ या वर्षी माध्यमिक शिक्षण या लेखाशीर्षाखाली शिक्षकांचे प्रशिक्षण, सर्वसाधारण परिरक्षण अनुदाने यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली होती. त्याचप्रमाणे विद्यापीठ व उच्च शिक्षण या लेखाशीर्षाखाली विद्यापीठांना सहाय्य, सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली होती. याच लेखाशीर्षाखाली अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य, अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती. माध्यमिक शिक्षण या लेखाशीर्षाखाली शिक्षकांचे प्रशिक्षण, शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये यासाठी ५ कोटी ८८ लाख रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली होती. प्रत्यक्ष खर्च ६ कोटी ०७ लाख एवढा झालेला आहे.

९.३४ राज्यात खाजगी विना अनुदानित महाविद्यालये, उच्च महाविद्यालये सुरु झाली आहेत, अनेक अभिमत विद्यापीठे सुरु झाली आहेत. विना अनुदानित उच्च महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे यांनी वेगवेगळे पाठ्यक्रम सुरु केलेले आहेत. राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळया पाठ्यक्रमाचे शिक्षण तेथे घेतलेले आहे. विद्यार्थ्यांनी देणगी देवून पाठ्यक्रम पूर्ण केलेले आहेत. परंतु विद्यार्थी सदर पाठ्यक्रमाचे प्रमाणपत्र घेऊन बाहेर नोकरी मागावयास गेले तर सदरहू प्रमाणपत्र ग्राह्य मानले जात नसल्याचे कळते. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना नोकरी

मिळत नाही. या बाबतीत विभागाने लक्ष घालणे आवश्यक आहे, अशी सुचना समितीने विभागास केली तसेच अशासकीय महाविद्यालये, उच्च महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे यांनी वेगवेगळे पाठ्यक्रम सुरु केलेले आहेत, त्यांची यादी समितीला सादर करण्यात यावी, असे निदेश दिले परंतु विभागाकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे.

९.३५ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, इतर मागासवर्गीय आणि मागासर्गीय (बी.सी) विद्यार्थ्यांची जवळजवळ १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थकीत आहे, केंद्र शासनाचे असे म्हणणे आहे की, याबाबतीत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आलेली नाही. केंद्र शासनाची शिष्यवृत्ती १०० टक्के अनुदानाची आहे. त्यासाठी राज्य शासनाचे पैसे लागत नाहीत. मध्यंतरी असे सांगण्यात आले होते कि, यामध्ये राज्य शासनाची १० टक्के रक्कम आणि केंद्र शासनाची ९० टक्के रक्कम असेल. परंतु संबंधित विभागाकडून एकंदर किती विद्यार्थी आहेत याची माहिती आली नाही त्यामुळे जवळजवळ १४०० कोटी रुपये शिल्लक आहेत. रक्कम शिल्लक असताना सुध्दा राज्यातील इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देता येत नाही असे तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी सदनामध्ये सांगितले होते. त्यामुळे ही मुले शिक्षणापासून वंचित राहतात. तसेच विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयामधून काढून टाकण्यात येते. याही बाबतीत तत्कालीन मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल. पण त्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई आजपर्यंत झालेली नाही. यावर सदरहू बाब सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. परंतु यासंबंधातील मंत्रीमंडळाची टिप्पणी आणि धोरण ही उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे आहे, पण उच्च व तंत्र शिक्षण व सामाजिक न्याय या दोन्ही विभागाची संयुक्त जबाबदारी असू शकते,असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी ते मान्य केले.

९.३६ समितीने सचिवांना अशीही विचारणा केली की, आज मितीस राज्यामध्ये एकंदर अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालये किती आहेत? तसेच जी विनाअनुदानित महाविद्यालये आहेत त्यामध्ये जे विद्यार्थी आहेत त्यांना आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांची आर्थिक सवलत देत नाहीत. मात्र त्या महाविद्यालयांमधील भटक्या जमाती (एन.टी.) किंवा मागासवर्गीय

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. ग्रामीण भागामध्ये विना अनुदानित महाविद्यालये आहेत. त्याठिकाणी इतर मागासवर्गीय., भटक्या जमाती (एन.टी.)च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पण ज्यांची आर्थिक कुवत नसेल पण त्यांना उच्च शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्या विद्यार्थ्यांना अर्थिक सवलत मिळत नाही. यामध्ये या मुलांचा काय दोष आहे? या विद्यार्थ्यांनी काय करावयाचे? ई.बी.सी.चा नियम विना अनुदानित महाविद्यालयांना लागू आहे काय ? याबाबतीत, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ई.बी.सी.ची सवलत विना अनुदानीत महाविद्यालयांना लागू होत नाही. शासनाच्या या धोरणामुळे आज आपल्या राज्याची अशी अवस्था आहे की, आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुलांना शिक्षणाची ईच्छा असूनही शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागते अशी खंत समितीने व्यक्त केली व जर एखाद्या विद्यार्थ्याला सरकारी महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला नाही तर तो खाजगी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतो. अशा वेळ राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत सवलत मिळाली पाहिजे. शासकीय महाविद्यालयांमध्ये सर्वांना प्रवेश मिळू शकत नाही म्हणून शासन विना अनुदानित महाविद्यालयांना मान्यता देते. शासनाकडून अनुदानित विद्यालयांना मान्यता दिली जाते. त्याचप्रमाणे विना अनुदानित विद्यालये देखील मान्यताप्राप्त असतात. त्याठिकाणी शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रमच शिकवावयाचा असतो. त्यामुळे शिक्षणाच्या संबंधातील शासनाचे सर्व नियम त्यांना देखील लागू असले पाहिजेत. अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना ज्या सवलती मिळतात त्या सवलती विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. यासाठी शासनावर आर्थिक बोजा पडणार आहे हे जरी खरे असले तरी याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे, अशी सुचना समितीने विभागास केली.

९.३७ आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या बाबतीत केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे जे नियम आहेत. ते नियम ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये अंमलात आणत नसल्याने अकरावी व बारावीचे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. उच्च शिक्षण हा घटनात्मक मुलभूत अधिकार नाही. सर्वांना शिक्षण द्यावयाचे असेल तर तेवढी व्यवस्था नाही. विना अनुदानित बऱ्याच खाजगी संस्था आहेत. त्याचा सुध्दा वापर कराण्यात यावा. आणि मग २५ टक्क्याची प्रतिपूर्ती योजना पुढे आली आणि त्या योजनेला आव्हान देण्यात आले आणि त्याबाबत सुप्रीम

कोर्टानेही शिक्कामोर्तब केले असून केवळ अल्पसंख्यांक लागू केलेले नाही. तसेच २५ टक्क्याच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय ही झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९.३८ 'शिक्षणाचा अधिकार' हा कायदा केंद्र सरकारने आणला आहे. केंद्र सरकारकडून यासाठी १०० टक्के अनुदान मिळते. यासाठी राज्य शासन पैसा खर्च करीत नाही. मध्यान्होत्तर भोजन योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळतो. केंद्र सरकारच्या धोरणाची अंमलबजावणी राज्य सरकार करीत नाही असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला कि, राज्य शासनाचा या योजनेमध्ये हिस्सा आहे. ५५ टक्के केंद्र सरकारचा व ४५ टक्के राज्य सरकारचा हिस्सा आहे. मध्यान्होत्तर भोजन योजना ही खाजगी विना अनुदानित विद्यालयांमध्ये दिली जात नाही. यातील काही विद्यालये अनुदानित आहेत तर काही विना अनुदानित आहेत. खाजगी विना अनुदानित विद्यालयांमध्ये दुपारचे भोजन दिले जात नाही. विना अनुदानित विद्यालय असल्याने तेथील फी जास्त आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. तसेच त्यांना देण्यात येणाऱ्या दुपारच्या जेवणाबाबत शासनाने चांगले धोरण आखणे आवश्यक आहे असे समितीने प्रतिपादन केले. रुपये १३४६.६१ कोटी एवढ्या निधीचे कोणत्या बाबींवर खर्च करण्यात आला याबाबतची यादी समितीस सादर करण्यास सांगितली.परंतू समितीचा अहवाल तयार होईपर्यंत ही सदर माहिती विभागाकडून अप्राप्त आहे. त्यामूळे याबाबतचे आपले अभिप्राय समितीला स्पष्टपणे देता येत नाहीत.

९.३९ समितीने पुढे अशी विचारणा केली की, अर्थसंकल्पामधील रक्कम कमी पडली तर पुढील अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी सादर केली जाते. बजेटमध्ये मंजूर झालेल्या रकमेपैकी ७१.८४ कोटी रुपये शिल्लक राहिलेले असताना रुपये ११९.७२ कोटी एवढ्या रकमेची पूरक मागणी करण्याचे प्रयोजन काय, विभागाने मुळ मागणी किती रुपयाची केली हाती ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला कि, सन २००७-२००८ एकूण १० पूरक मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये एकूण ३ विषय अंतर्भूत होते. पूरक मागण्यांपैकी ६ मागण्या अतिरिक्त महागाई भत्त्याच्या होत्या. महागाई भत्त्यात कधी ४ टक्के वाढ होत असते तर कधी ६ टक्के वाढ होत असते. त्या संदर्भातील त्या मागण्या होत्या.

वेतन व वेतनेतर अनुदानासाठी १२.९८ कोटी रुपयांची मूळ मागणी केली होती व पुरवणी मागणी वाढीव महागाई भत्त्यासाठी करण्यात आली होती, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

९.४० रुपये ११९.७२ कोटी हा सर्व निधी वाढीव महागाई भत्त्यावर खर्च झाला आहे काय ? असे समितीने विचारले असता सन २००७-२००८ या वर्षा मध्ये शासकीय महाविद्यालयांसाठी, अनुदानित महाविद्यालयांसाठी, विना अनुदानित महाविद्यालयांसाठी, वसतिगृहांसाठी अशा वेगवेगळ्या मागण्या करण्यात आल्या होत्या. अनेक महाविद्यालये ३ वर्षानंतर १०० टक्के अनुदानावर येतात. पहिल्या तीन वर्षांसाठी या महाविद्यालयांना विना अनुदान तत्वावर मंजुरी दिलेली असते. ज्या महाविद्यालयांनी अनुदान प्राप्त होण्यासाठी निकष पूर्ण केलेले आहेत त्यांना चौथ्या वर्षापासून अनुदान मंजूर केले जाते. १०० टक्के अनुदान मिळण्यापूर्वी ७५ टक्के अनुदान जिल्हा नियोजन विकास समितीकडून मंजूर केले जाते. आता १०० टक्के अनुदान शासनाकडून दिले जाते. एखादी बाब योजना खर्चामधून, योजनेत्तर खर्चामधून मध्ये समाविष्ट केली जाते त्यावेळी ती बाब विधिमंडळाच्या निदर्शनास आणली जाते. अशा दोन बाबींच्या दोन पुरवणी मागण्या त्यावेळी करण्यात आल्या होत्या, असे विभागीय प्रतिनिधीनी समितीला सांगितले.

९.४१ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, अर्थसंकल्पामध्ये मूळ मागणी करीत असताना एकूण किती कर्मचारी आहेत हे गृहित धरण्यात आले होते. का पूरक मागणीतील संपूर्ण रक्कम वाढीव महागाई भत्त्याची आहे काय, मूळ मागणीमध्ये वेतनावरील खर्च गृहित धरला होता काय ? यावर अंदाजपत्रक तयार करीत असताना भरलेल्या पदांचे वेतन गृहित धरले जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

९.४२ विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांमध्ये "कर्मचाऱ्यांची काही पदे, विद्यापीठात काही पदे रिक्त राहिल्याने, काही विद्यापीठांकडून वसुली करण्यात आल्यामुळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे" अशा प्रकारचा शब्दप्रयोग केलेला आहे. जर उत्तरामध्ये स्पष्टता येत नसेल तर हे बरोबर नाही. विभागाने विनिर्दिष्ट उत्तर दिले पाहिजे, ढोबळ उत्तर देऊ नये, अशी सुचना समितीने विभागास केली असता या पुढील काळामध्ये विभागाकडून याबाबत काळजी घेण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

९.४३ सभागृहात अर्थसंकल्पा मधील मूळ मागणी, पुरवणी मागणी याबाबत अनेकदा चर्चा केली जाते. पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी मूळ मागणी किती होती हे मंत्री महोदयांकडून सांगितले जात नाही,सभागृहाच्या मान्यतेशिवाय शासनाला एक रुपयाही खर्च करता येत नाही अर्थसंकल्पामधील तरतुदीपैकी ७१.८४ कोटी रुपयांची बचत झाली हे सिध्द होते.

९.४४ वास्तविक पहाता अर्थसंकल्पाची प्रक्रीया ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यापासून सुरू होते. दरम्यानच्या काळात महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण झाल्यानंतर त्यावरील खर्च पूरवणी मागणीद्वारे भागविला जातो. रु. ११९.७२ कोटी पूरवणी मागणी उच्च तंत्रशिक्षण विभागाने ही महागाई भत्यासाठी केली होती. परंतू हि मागणी ठराविक कर्मचाऱ्यासाठी महागाई भत्याची केली होती का कारण राज्यात महिन्याला २ ते ४ हजार कर्मचारी निवृत होत असतात. विभागाकडे योजना व योजनेतर पैसा असतो. त्यातून हा खर्च करता येतो. मूळ अर्थसंकल्पामध्ये ७१.८१ कोटी रुपयाची बचत झालेली असताना ११९.७२ कोटी रुपयाची पूरवणी मागणी केली जात असेल तर हि बाब गंभीर आहे.

९.४५ मूळ अर्थसंकल्पा मधील रक्कम शिल्लक असताना पूरवणी मागणी केली गेल्याने लोकलेखा समितीत चर्चा होते. परंतु विभागाचे हिशोब तपासण्याचे काम लोकलेखा समितीचे नसून विभागाने केलेला खर्च व झालेली बचत योग्य कारण्यामुळे झाली आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी लोकलेखा समिती आहे.हा विषय आर्थिक शिस्त पाळण्याचा आहे. अर्थसंकल्पातील मंजूर रकमेपैकी काही रक्कम शिल्लक असताना पुढच्या सत्रामध्ये शिल्लक रकमेपेक्षा अधिक रकमेची पुरवणी मागणी सादर करणे या संदर्भात. अश्या प्रकारची अनेक उदाहरणे सापडतील. एकीकडे मूळ तरतूद केली जाते त्याची रक्कम वेगळी असते, सुधारित तरतूद वेगळी असते आणि पुरवणी मागणी वेगळ्याच रकमेची असते. हे बॅड बजेटिंग आहे, असे मत समितीने व्यक्त केले व विभागाच्या कामकाजाबाबत समितीने नाराजी व्यक्त केले.

९.४६ समितीने व्यक्त केलेल्या उपरोक्त मताशी सचिव, वित्त यांनी यासंदर्भात आपले अभिप्राय देताना असे नमूद केले की, समितीने हा महत्वाचा व गंभीर विषय उपस्थित केलेला आहे. ही चर्चा सन २००७-०८ या वर्षासंबंधी असली तरी सध्या देखील कमी जास्त प्रमाणात तशी परिस्थिती आहे. पुरवणी मागण्या कमी प्रमाणात केल्या पाहिजेत. अकल्पित परिस्थितीमध्ये

निधीची आवश्यकता निर्माण झाली तर पुरवणी मागणी केली पाहिजे. अन्यथा कोणत्याही खात्याला अर्थसंकल्पीय शिस्त राहणार नाही. मूळ अर्थसंकल्प व्यवस्थित झाले नसेल, पूरक मागणी मान्य आहे, अत्यावश्यक आहे असे गृहित धरल्यानंतर त्या रकमेतून बचत होणे ही गोष्ट बरोबर नाही. याचा अर्थ अर्थसंकल्पीय अंदाज बरोबर केलेले नाही. त्यामुळे मूळ अर्थसंकल्पाचे बरोबर केलेले नाही हे विभागाने मान्य करणे आवश्यक आहे. ७१.८४ कोटी रुपयांची बचत झाल्यानंतर तेवढी रक्कम प्रत्यार्पित करणे आवश्यक असताना केवळ ५५ लाख रुपये एवढी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली हे देखील गंभीर असून हे बॅड बजेटींग आहे व अशा प्रकारे अंदाज पद्धत तयार करण्याची ही पध्दत अयोग्य आहे, असे ही वित्त विभागाच्या सचिवांनी समिती समोर मान्य केले.

९.४७ पुरवणी मागण्या अकल्पित आहेत, हे जरी खरे असले तरी अत्यंत निकडीची गरज असेल तर पुरवणी मागणीमध्ये तो विषय आला पाहिजे. या ठिकाणी वित्त विभागाचे सचिवांनी धोरणात्मक विषय मांडला आहे त्यामुळे मूळ तरतूद शिल्लक असताना पूरवणी मागणी करतात अशा अधिकाऱ्याना कारणे दाखवा नोटिस देण्यात यावी व पूरक अनुदान वाढवून मागीतले यासंदर्भात सविस्तर टिपणी समितीस देण्यात यावी, असे निदेश समितीने विभागास दिले.

९.४८ राज्यामध्ये अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांची संख्या किती आहे? याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, राज्यामध्ये अनुदानित महाविद्यालये ११४१ आहेत, विना अनुदानित महाविद्यालये ३ आहेत, कायम विना अनुदानित महाविद्यालये २ हजार ३२ आहेत अशी एकूण ३ हजार १७६ महाविद्यालये आहेत.

९.४९ विना अनुदानित म्हणून एकदा मान्यता दिल्यानंतर कालांतराने ती महाविद्यालये अनुदानित होतात. कायम विना अनुदानित महा विद्यालये २ हजार ३२ आहेत ही नंतर अनुदानावर येणार आहेत काय? यावर खुलासा करताना सचिवांनी समितीला सांगितले की, महाविद्यालये अनुदानित करावयाची नाहीत असे पूर्वी उच्च शिक्षण खात्याचे धोरण होते. परंतु आता मोठया प्रमाणावर मागणी झाल्यामुळे "कायम" हा शब्द काढून टाकण्यात आला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९.५० शासनाकडून महाविद्यालयांना कोणत्या अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदान दिले जाते, त्या संदर्भात नियमावली तयार केली आहे काय? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, सन १९९१ च्या शासन निर्णयानुसार दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थी संख्येनुसार पहिल्या तीन वर्षापर्यन्त कोणतेही अनुदान दिले जात नाही. चौथ्या वर्षी अल्प प्रमाणात अनुदान दिले जाते. पाचव्या वर्षी ५० टक्के अनुदान दिले जाते, सहाव्या वर्षी ७५ टक्के अनुदान दिले जाते आणि त्यानंतर १०० टक्के अनुदान दिले जाते. यामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण ६० टक्के आहे आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण ४० टक्के आहे.

९.५१ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, काही महाविद्यालयामध्ये मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण नसते. अशाप्रकारे महाविद्यालयांना क्रीडांगण असणे आवश्यक आहे या संदर्भात शासनाने काही निकष ठरविले आहेत काय? यावर विभागिय सचिवानी सांगितले की महाविद्यालयांना शासनाची मंजुरी देण्याची पध्दत वेगळी आहे. मंजुरी मिळाल्यानंतर त्या महाविद्यालयाला विद्यापीठाशी संलग्न म्हणून मान्यता मिळते. त्यावेळी सर्व निकषांची पूर्तता केली आहे काय याची पाहणी केली जाते. त्यामध्ये महाविद्यालयाकडे स्वत:ची जमीन आहे काय, त्या ठिकाणी लेक्चर रुम आहे काय, सेमिनार हॉल आहे काय, डीनसाठी कार्यालय आहे काय, स्टाफ रुम आहे काय, सॅनिटरी-टॉयलेट आहे काय? इत्यादी गोष्टींची उपलब्धता आहे की नाही हे पाहिले जाते,

९.५२ एखादे महाविद्यालय सुरु केले जाते त्यावेळी त्याची गुणवत्ता राखली जात नाही. तसेच महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत असावी लागते.परंतु बहुतांश ठिकाणी चौथ्या व पाचव्या मजल्याच्या टेरेसवर पत्रे चढवून महाविद्यालयाचा फलक लावला जातो. अशा महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयाची व्यवस्था नसते, सेमिनार हॉलची व्यवस्था नसते, मुलांसाठी स्वतंत्र बाथरुमची व्यवस्था नसते, त्यांना खेळण्यासाठी क्रीडांगण उपलब्ध नसते. या सर्व गोष्टी नसतांनाही त्यांना मान्यता मिळते. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, जी महाविद्यालये निकषामध्ये बसत नाहीत त्यांना शासन अनुदान देत नाही.

९.५३ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार समाजातील गरीब मागासवर्गीय २५ टक्के विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये मोफत शिक्षण दिले पाहिजे. त्या निर्णयाची अंमलबजावणी या

वर्षीपासून म्हणजेच सन २०१२ पासून झाली. महाराष्ट्रामध्ये काही सेवाभावी संस्थामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ५ ते १० लाख रुपये इतकी फी वसूल केली जाते. त्यामधून २५ टक्के गरीब विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च भागविला जातो. ही बाब समितीने विभागाच्या निर्दशनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले कि, महाविद्यालयांना मान्यता देण्यापूर्वी त्यांची पूर्णपणे तपासणी केली पाहिजे अशी पध्दत शासनाने अवलंबिली आहे. अशाप्रकारची पध्दत यापूर्वी नव्हती. शासनाने सन २०१० मध्ये एक धोरणात्मक निर्णय घेतला व यासाठी २६ निकष ठरविण्यात आले. त्या निकषाप्रमाणे तपासणी केल्यानंतर शासनाची मान्यता देण्याचे ठरविण्यात आले आहेत. विद्यापीठाने त्या महाविद्यालयाची शिफारस केली तरीसुध्दा त्यांनी २६ निकषांची पूर्तता केली पाहिजे. त्याप्रमाणे आपण सन २०१०-११ मध्ये महाविद्यालयांना परवानगी दिली. परंतु सन २०११-१२ मध्ये २६ निकष शिथील करुन सक्तीचे २० निकष ठरविण्यात येते. या निकषांची जे पूर्तता करतील त्यांनाच मान्यता देण्याचे आता शासनाने ठरविण्यात आले.

९.५४ महाविद्यालयांना शासनाची मान्यता मिळण्यासाठी सर्व निकषांची पूर्तता केली जाते. परंतु एकदा मान्यता मिळाल्यानंतर "जैसे थे" परिस्थिती असते. आणि जर विभागाची टीम अशा महाविद्यालयांची तपासणी करावयास गेली तर त्या ठिकाणी त्यांच्या हाताला काहीही लागत नाही. कारण विभागाची पथक तपासणी करण्यासाठी जाते त्यावेळी सर्व ठीकठाक केलेले असते, त्याबाबत शासन काय करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली.

९.५५ महाविद्यालयांना कोणत्याही परिस्थितीत सक्तीने देणगी घेता येणार नाही म्हणून शासनाने देणगीच्या विरोधात कायदा संमत केला आहे. परंतु पुणे-मुंबईतील अनेक महाविद्यालयांचे जमा-खर्चाचे हिशेब तपासल्यास त्यांच्या लेख्यामध्ये करोडो रुपये जमा असल्याचे दिसून येतात. काही संस्था तर देणगी घेण्यासाठी पालकांना मेटाकुटीला आणतात काही ठिकाणी "इमारत निधीच्या" नावाने सक्तीने देणगी घेतली जाते. अशाप्रकारे अप्रत्यक्षरित्या देणगी घेण्याच्या प्रकारांना पायबंद घालण्याबाबत विभागाने काही उपाययोजना केल्या आहेत का याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, महाराष्ट्र राज्यामध्ये कॅपिटेशन फी बाबत कायदा करण्यात आला आहे. त्यामध्ये इमारत निधीचा समावेश केला आहे.

९.५६ पुनर्नियोजन या लेखाशीर्षाखाली "अनुदानित महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ झाल्याने तसेच शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त राहिल्याने मार्च २००८ मध्ये रुपये ४०१.० लाख इतका अपेक्षित निधी प्रत्यार्पित करण्यात आला" असे विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये म्हटले आहे. अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची किती पदे रिक्त आहेत, ती रिक्त राहण्याची कारणे काय आहेत? या ठिकाणी पदे रिक्त राहिल्यामुळे ४०१.० लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला.ही बाब योग्य नाही.

९.५७ ग्रामीण भागामध्ये मुलांना शिकविण्यासाठी जर शिक्षक उपलब्ध होत असतील तर ती पदे कां भरली गेली नाहीत? विभागाकडे निधीची उपलब्धता आहे, अर्थ खात्याने त्याला विशेष मंजुरी दिली आहे. असे असतांना शालेय शिक्षण विभागाने अधिकार न वापऱ्याचे कारण काय, त्या संदर्भात विभागाची नेमकी भूमिका काय आहे, शिक्षकांची पदे न भरण्याची कारणे काय, त्या संदर्भात विभागाकडून कोणती कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भातील सद्यःस्थिती बाबत माहिती विभागाकडे आता उपलब्ध नाही परंतु सदर माहिती समितीला मागाहून सादर करण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

९.५८ याच संदर्भात रिक्त पदे भरतीमध्ये येणाऱ्या अडचणी बाबत सांगताना विभागीय सचिवांनी असे सांगितले कि, यामध्ये मुख्य अडचण ही आहे की, बरेचसे शिक्षक निवृत्त होतात तर काही शिक्षक स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतात. परंतु, त्या प्रवर्गाचे भरतीचे नियम अद्याप अंतिम झालेले नाहीत., सहाव्या वेतन आयोगानंतर पद भरतीचे निकष बदलले. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाची मंजूरी घेऊन त्या बाबतचा प्रस्ताव राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. त्या बाबतच्या प्रक्रियेस सुरुवात झाली असून, बऱ्याचशा गोष्टींना मंजुरी मिळालेली आहे. या संदर्भात सद्यःस्थिती अशी आहे की, दिनांक ३१-३-२०१२ रोजी अ, ब, क व ड या वर्गातील ६१३९५ मंजूर पदांपैकी १०९६८ म्हणजे जवळपास १८ टक्के पदे रिक्त आहेत. सर्वसाधारणपणे १० टक्क्यांपर्यंतची पदे रिक्त असतात. हे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये.

९.५९ जागा असतानाही १८ टक्के पदे रिक्त राहिलेली आहेत. रिक्त पदामुळे निधी विभागाला प्रत्यार्पित करावा लागला अशा प्रकारे निधी अडवून ठेवल्याने इतर विभागाला

विकासाच्या कामासाठी पैसा उपलब्ध होत नाही. मुळात पैसे खर्च करण्यासाठी दिले असताना ते खर्च का केले जात नाहीत ? अशा प्रकारे निधी जर वापरला जात नसेल तर त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करावयाची याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, ही विभागाची जबाबदारी आहे. संबंधीत विभागाचे सचिव म्हणून त्या जबाबदारी पासून दूर जाऊ शकत नाही. परंतु, रिक्त पद भरती बाबत विभाग कडून पुनर्विलोकन करण्यात येते ती भरण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. तरी देखील वर्षाच्या शेवटी हा प्रश्न पूर्णपणे सुटला आहे असे म्हणावे अशी परिस्थिती नसते, असेही सचिवांनी समितीस सांगितले.

९.६० रिक्त पदे भरण्यासंदर्भात समितीने विभागाला सूचना केली की, ज्या महाविद्यालयामध्ये पदे मंजूर असतात, त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद असते तरीही तेथील पदे भरली जात नाहीत. अशावेळी अनुदानीत महाविद्यालयांनी अमूक इतक्या दिवसात पदे भरली पाहिजेत व त्यांनी तसे न केल्यास त्यांची मान्यता रद्द केली जाईल असे धोरण ठरविणे गरजेचे आहे. कारण धोरणात्मक चर्चा करणे हा लोकलेखा समितीचा गाभा आहे. जर पद भरतीमध्ये अडचणी येत असतील व त्याची जबाबदारी जर विभागाने स्विकारली तर यावर काय उपाययोजना करता येईल.अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले आहे कि, पद भरतीच्या प्रक्रियाचे केंद्रीकरण झाले पाहिजे. त्या योगे प्रतिक्षा यादी तयार करुन पद भरती करता येईल, अशी सुचना समितीने केली.

९.६१ राज्याच्या अर्थसंकल्पात वेगवेगळया शिर्षांखाली हजारो रुपयांचा निधी दर्शविलेला असतो. परंतु, तो निधी अखर्चित राहतो. सध्या असे दिसून येते की, करोडो रुपयांचे अर्थसंकल्प तयार केलेले असतानाही निधी खर्च न करणाऱ्या अधिकाऱ्यांना या प्रकरणी जबाबदार धरून त्यांच्या विरूद्ध कडक कारवाई करण्याची कार्यपद्धती सुरू करणे नितांत गरजेचे झाले आहे. काळ्या यादीत टाकले पाहिजे. अर्थसंकल्प तयार करताना हजारो कोटी रुपये मागून घेतले जातात मग ते खर्च का केले जात नाहीत ? शिक्षकांची पदे भरावयाची आहेत असे सांगून अर्थसंकल्प तयार करताना पैसे घ्यायचे पण ते खर्च करावयाचे नाहीत याची काय कारणे आहेत ? हजारो कोटी रुपयांच्या राज्याच्या बजेटमधील १०-२० कोटी रुपये शिल्लक राहिले तर ठिक आहे. परंतु, २००-३०० कोटी रुपये शिल्लक राहत असतील तर, ते खर्च न होण्यास जबाबदार कोण ?यासंदर्भात विभागीय सचिवाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

९.६२ राज्यातील गोरगरिब जनतेने काबाडकष्ट करुन मिळविलेले पैसे व कराच्या रुपाने दिलेल्या पैशांचा उपयोग जनतेच्या विकासासाठी करणे ही विभागाची जबाबदारी आहे. हे केवळ मान्य करुन चालणार नाही तर ती पार पाडण्याच्या दृष्टीने कारवाई करणेही अपेक्षित आहे, असे अभिप्राय समितीने नोंदविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ह्या बाबतची जबाबदारी विभागाने स्विकारली आहे परंतु ही जबाबदारी पार पाडताना, काही अडचणींना सामोरे जावे लागते. अनुदानीत शाळांतील शिक्षक भरतीवर नियंत्रक नसतो. जिल्हापरिषदांतील अनुदानीत शाळांमध्ये ५ ते १० टक्क्यांचा अपवाद वगळता सीईटी पध्दतीने पद भरती करण्याची पद्धत नाही. विभागाला या संदर्भातील निर्णय घेणे शक्य नाही. तसेच या संदर्भामध्ये राजकीय इच्छाशक्तीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

९.६३ विद्यापीठातील रिक्त पदासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले कि, मुंबई विद्यापीठामध्ये सरळसेवेनुसार ८७२ पदे मंजूर असून त्यापैकी ५१० पदे भरलेली आहेत व ३६२ पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने ४२० पदे भरलेली असून ३६ पदे रिक्त आहेत. एसएनडीटी विद्यापीठामध्ये ३३३ मंजूर पदे असून १०२ पदे रिक्त आहेत. ८४ पदे भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. पुणे विद्यापीठामध्ये ७७८ पदे मंजूर असून त्यापैकी २४३ पदे रिक्त आहेत. ३५० पदे भरलेली आहेत व ६३ पदे रिक्त आहेत. सोलापूर विद्यापीठांमध्ये १४९ पदे मंजूर असून ८५ पदे रिक्त आहेत. नांदेड येथील विद्यापीठामध्ये २५४ पदे मंजूर असून १८५ पदे रिक्त आहेत. आंबेडकर विद्यापीठामध्ये ५७३ पदे मंजूर असून १९५ पदे रिक्त आहेत. शिवाजी विद्यापीठ येथे ३५९ पदे मंजूर असून ९० पदे रिक्त आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,नाशिक येथे २१९ पदे मंजूर असून ५४ पदे रिक्त आहेत. रामटेक विद्यापीठ येथे ६६ पदे मंजूर असून ५१ पदे रिक्त आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे ५७० पदे मंजूर असून ६७ पदे रिक्त आहेत. संत गाडगे महाराज विद्यापीठ, अमरावती येथे ३१३ पदे मंजूर असून २४ पदे रिक्त आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे ३०६ पदे मंजूर असून ५१ पदे रिक्त आहेत. गडचिरोली विद्यापीठ येथे १०१ पदे मंजूर आहेत.

९.६४ पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? मुंबई विद्यापीठामध्ये देखील अनेक पदे रिक्त आहेत. त्याचे कारण काय आहे ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी

सांगितले कि, रिक्त पदांच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे. या समितीमध्ये विभागातील सचिवांचा देखील समावेश आहे. या समितीची बैठक प्रत्येक महिन्याला होते. त्यावेळी आढावा घेऊन पदे भरण्यासंदर्भात विद्यापीठाला कळविले जाते. मात्र अनेकदा पाठपुरावा करुन देखील काहीही कार्यवाही केली जात नाही. या संदर्भात आपल्याला शासकीय महाविद्यालयाचे उदाहरण येथे सांगू इच्छितो. या महाविद्यालयामध्ये प्रिन्सिपल या पदाकरिता युजीसीने काही निकष ठरवले आहेत. पदे भरण्याकरिता एमपीएससी मार्फत वर्तमानपत्रामध्ये वारंवार जाहिरात प्रसिध्द करुन देखील त्या पदांसाठी पात्र व्यक्ती उपलब्ध होत नाही. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार ते पद सध्या तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठामध्ये पात्र उमेदवार प्राप्त होत नसतील तर ग्रामीण भागामधील महाविद्यालयांमध्ये काय परिस्थिती असेल अशी खंत समितीने व्यक्त केली.

९.६५ पुरेशा प्रमाणात पात्र उमेदवार प्राप्त होत नसल्यामुळे अधिकाधिक पदे भरण्याकरिता पात्रतेचे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी अधिनियमात असलेल्या तरतुदीमध्ये बदल केला पाहिजे. पात्रतेच्या संदर्भात काही धोरणात्मक स्वरुपाचे प्रश्न आहेत. शिक्षण विभागामध्ये काही पदांवर कॉलेजमधील प्राध्यापकांना नियुक्त केले जाते. त्यांना शासकीय कामकाजाचा अनुभव नसतो व त्यांना धोरणात्मक निर्णय घेताना काही अडचणी निर्माण होतात. यामुळे या पदांवर आय.ए.एस अधिकारी किंवा उप सचिव पदावरील अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. अशी सुचना समितीने विभागास केली.

९.६६ राज्यामधील विविध विद्यापीठांमध्ये मोठया प्रमाणात विविध विषयातील व संवर्गातील पदे रिक्त आहेत. या संदर्भात समितीला एक टिप्पणी समितीस सादर करावी असे निदेश विभागास दिले असता त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात येईल असे आश्वासन सचिवांनी समितीस दिले.

९.६७ वसतिगृह शहरी भागामध्ये अनेक ठिकाणी मुलींच्या वसतिगृहांच्या बाबत अनेक अडचणी आहेत. या संदर्भात माहिती विशद करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, मुंबईमध्ये एकूण ४ वसतिगृहे आहेत. त्यामध्ये ११७२ विद्यार्थ्यांची क्षमता आहे. त्यापैकी २ वसतिगृहे मुलींची आहेत. ईस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी व प्रियदर्शनी महाविद्यालय, चर्चगेट येथे मुलींकरिता २ वसतिगृहे आहेत. सध्या राज्यामध्ये एकूण १६ वसतिगृहे सुरु असून

यामध्ये ८०० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांची एकूण ११ वसतिगृहे आहेत. ११ वसतिगृहांमध्ये ११०० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. राज्यात उच्च शिक्षण देणारी एकूण २१ शासकीय महाविद्यालये असून तेथील क्षमता १४४५ आहे.समाज कल्याण विभागाच्या मार्फत काही ठिकाणी वसतिगृहे तयार करण्यात आली आहेत. सध्या मुंबई विद्यापीठ, कलिना येथे वसतिगृहाकरिता बरीच जागा उपलब्ध आहे. या जागेवर विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची उभारणी समाज कल्याण विभागाने करावी, या दृष्टीने विचार सुरु आहे. सोलापूर येथे वसतिगृह बांधण्याकरिता जागा देण्यात आलेली आहे. समाज कल्याण विभागाकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध आहे, त्यामुळे त्यांना वसतिगृहाची उभारणी करता येईल. तसेच वसतिगृहातील २० टक्के जागा खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता राखीव ठेवण्यात येतील.

९.६८ समितीला एकलव्य शिष्यवृत्ती योजनेच्या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, राज्यामध्ये जानेवारी,१९९६ पासून एकलव्य शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेमधून साधारणपणे १००० ते १२०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. शिष्यवृत्तीकरिता पालकांचे वार्षिक उत्पन्न ७५ हजार रुपयांपेक्षा कमी असावे, अशी अट निश्चित करण्यात आलेली आहे. वाणिज्य, कला व विधी शाखेमधील ज्या विद्यार्थ्यांना किमान ६० टक्के गुण मिळाले आहेत व विज्ञान शाखेमधील ज्या विद्यार्थ्यांना किमान ७० टक्के गुण मिळाले आहेत, त्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. दर वर्षी प्रती विद्यार्थी ५ हजार रुपये याप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते.

९.६९ ग्रंथालयाबाबतीत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यातील ग्रंथालयांना शासनाकडून अनुदान दिले जाते याकरिता महसूल विभागाच्या माध्यमातून सर्व ग्रंथालयांची संपूर्ण तपासणी करण्यात येत असून त्याबाबतचा तपासणी अहवाल अजून विभागाला प्राप्त झाला नाही.

९.७० ग्रंथालयांची पट पडताळणी केली असता किती ग्रंथालयांमध्ये बोगस पुस्तके दाखविल्याचे तपासणीत आढळले? व संपूर्ण राज्यामध्ये ग्रंथालयांची संख्या किती आहे? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, जवळ जवळ ९०० ग्रंथालयांमध्ये पुस्तकांची बोगस संख्या आढळली. ग्रंथालयांना अनुदान वाढवून देण्यासंबंधीचा मुद्दा मंत्रीमंडळापुढे आला त्यावेळी ग्रंथालयांचे अनुदान वाढवून देत असतांना त्यांची तपासणी

देखील करणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेण्यात आली. तसेच आज राज्यामध्ये १२ हजार ८६१ ग्रंथालये आहेत.

९.७१ ग्रंथालयांना मोठया प्रमाणात अनुदान वाढवून देण्याची मागणी होती, त्या संदर्भात शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. तरीसुध्दा या ग्रंथालयांची रँडम तपासणी केली पाहिजे असा शासनाचा विचार आहे, असे ही सचिवांनी समितीस सांगितले.

९.७२ समितीला ग्रंथालयाच्या संदर्भात अधिक माहिती देताना संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अन्वये राज्यात सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालये पद्धतीचे नियोजन, प्रस्थापना, परिरक्षण, संघटन व विकास साधण्यासाठी ग्रंथालय संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यामध्ये नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना शासन मान्यता व सहाय्यक अनुदान देण्यात येते. शासन मान्यतेसाठी व दर्जा उन्नतीसाठी ग्रंथालयांना विहित अटी पूर्ण कराव्या लागतात. नोंदीकृत संस्थांनी काही अटी पूर्ण केल्यानंतर त्यांनी प्रस्ताव सादर केल्यास सुरुवातीला त्यांना ड वर्ग ग्रंथालय म्हणून मान्यता दिली जाते. पहिल्या वर्षी २० हजार रुपये अनुदान दिले जाते. त्यानंतर दर ३ वर्षानंतर अ, ब, क या वर्गामध्ये अपग्रेडेशनकरिता प्रस्ताव सादर केल्यास तपासणी करुन मंजुरी दिली जाते. अ, ब व क अशी एकूण १२०६१ ग्रंथालये महाराष्ट्र राज्यात आहेत. शासनाने त्याकरिता जवळजवळ ७० कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केलेली आहे. अ वर्गामध्ये ३३८, ब वर्गामध्ये २००४ व क वर्गामध्ये ४३२७, ड वर्गामध्ये ५९९२ ग्रंथालये आहेत. अ वर्गामध्ये ४, ब वर्गामध्ये ३, क वर्गामध्ये २ व ड वर्गामध्ये ४ कर्मचारी कार्यरत असावे, अशा प्रकारे आकृतीबंध तयार करण्यात आलेला आहे. सध्या एकूण २२६८० कर्मचारी कार्यरत आहेत.

९.७३ ग्रंथालयांना शासनामार्फत परिरक्षण अनुदान दिले जाते. गत वर्षीच्या सेवा कार्यासाठी जो खर्च आलेला आहे, त्यामध्ये वेतन, प्रवास इ. काही खर्चाच्या बाबी अनुज्ञेय आहेत. या खर्चाच्या ९० टक्के किंवा ग्रंथालय अनुदानाची कमाल मर्यादा या दोन्हींपैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान मंजूर केले होते. हे अनुदान दोन भागामध्ये दिले जाते. पहिल्या भागामध्ये साधारणपणे ऑगस्ट महिन्यामध्ये ५० टक्के अनुदान दिले जाते. याकरिता ग्रंथालयाने गत वर्षी केलेल्या कामाचा अहवाल सादर करावा लागतो. केल्यानंतर ३१

ऑक्टोबरच्या आत सी.ए चा रिपोर्ट सादर केल्यानंतर मार्च महिन्यापर्यंत उर्वरित परिरक्षण अनुदान तपासणी करुन दिले जाते.

९.७४ नवीन ग्रंथालय किंवा दर्जा बदलाच्या प्रस्तावांची प्रत्यक्ष तपासणी करुन निर्णय घेतला जातो. गत वर्षी ज्या ग्रंथालयांना अनुदान दिले होते, त्यांची दर वर्षी तपासणी केली पाहिजे. अनेकदा ग्रामीण भागामध्ये व खेडयांमध्ये ग्रंथालयाची सेवा दिली जात नाही. तेथे पुस्तके दिली जात नाही. ग्रंथालय सेवा देण्याच्या दृष्टीने आपल्याकडे तांत्रिक प्रशिक्षण घेतलेला कर्मचारी वर्ग आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. मात्र या बाबत काही अडचणी समोर आल्यामुळे सध्या राज्यामध्ये अनेक ठिकाणी खाजगी ग्रंथालये सुरु केली जात आहेत. दिनांक २८ डिसेंबर २०११ च्या बैठकीत शाळांच्या धर्तीवर ग्रंथालयाची पटपडताळणी करावी व त्याप्रमाणे अनुदानात वाढ करावी असा निर्णय घेतला. या संदर्भात मंत्रिमंडळामध्ये चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, सध्याच्या अनुदानात ५० टक्के वाढ करण्यापूर्वी जी ग्रंथालये खरोखर कार्यरत आहेत अशाच ग्रंथालयांना वाढीव अनुदान द्यावे. त्यानुसार दिनांक २१ ते २५ मे २०१२ रोजी महसूल विभागाने एकूण १२ हजार १६८ ग्रंथालयांपैकी १२ हजार ०२८ ग्रंथालयांची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याचा अहवाल तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिलेला आहे. सदरहू अहवाल नजिकच्या कालावधीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे. अ, ब, क आणि ड वर्गातील ग्रंथालयांना देण्यात येणारे अनुदान मर्यादित आहे. "ड" वर्ग ग्रंथालयासाठी २० हजार रुपये, "क" वर्ग ग्रंथालयासाठी ६४ हजार, तालुका पातळीवरील "क"वर्ग ग्रंथालयासाठी ९६ हजार रुपये, "ब" वर्ग ग्रंथालयासाठी १ लाख २८ हजार रुपये, तालुका पातळीवरील "ब" वर्ग ग्रंथालयासाठी १ लाख ९६ हजार रुपये, तर "अ" वर्ग ग्रंथालयासाठी १ लाख ९२ हजार रुपये तर जिल्हा पातळीवरील "अ" वर्ग ग्रंथालयासाठी २ लाख ५६ हजार रुपये अशाप्रकारे अनुदान मिळते. यामध्ये आता ५० टक्के वाढ होणार आहे. त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, अशीही माहिती समितीला देण्यात आली.

९.७५ ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात येते की ते मानधनावर काम करतात का व ग्रंथालयास केंद्र सरकारकडून अनुदान मिळते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, ग्रंथालयासाठी मिळणाऱ्या

अनुदानातून ५० टक्के रक्कम वेतनावर खर्च होते तर ५० टक्के रक्कम वेतनेत्तर अनुदानावर खर्च होते.

९.७६ राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानतर्फे पाच कोटी रुपये मिळतात. यातील अडीच कोटी रुपये केंद्र सरकार देते तर अडीच कोटी रुपये राज्य सरकारकडून मिळतात. ग्रंथालयाच्या संदर्भातील सर्व माहिती वेबसाईटवर दर्शविण्यात आली आहे.

९.७७ शहरी आणि ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ वाढली पाहिजे. राज्यातील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी जे काही पर्याय आहेत त्यातील ग्रंथालय हा एक पर्याय आहे. ग्रंथालयास मिळणारे अनुदान १०० टक्के खर्च होते काय ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, ग्रंथालयास मिळणारा अनुदान १०० टक्के खर्च होतो. आता ग्रंथालयासाठी ९५ कोटी रुपये अनुदान मंजूर झालेले आहे. या अनुदानातून ज्या ग्रंथालयांना उर्वरित अनुदान द्यायचे राहिले होते त्यांना ते देण्यात आलेले आहे.

९.७८ ग्रंथालयासाठी अनुदान घेण्याचे निकषा संदर्भात मागाहून प्राप्त झालेली आश्वासीत माहिती पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अंतर्गत तरतुदींनुसार सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता व अनुदान देण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे नियम, १९७० संमत करण्यात आले आहेत. त्यामधील तरतुदींनुसार-मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव दरवर्षी १० मे ते ३० जून या कालावधीमध्ये वृत्तपत्रात जाहिरात देऊन संचालनालयाकडून मागविण्यात येतात. संचालनालयांतर्गत त्या त्या जिल्ह्यांच्या जिल्हा ग्रंथालयामध्ये ते संबंधितांनी सादर करावयाचे असतात. त्यासाठी खालील बाबींची पूर्तता करून प्रस्ताव मुदतीत सादर करावे लागतात.

निकष -

(१) ग्रंथालयांची नोंदणी - संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अथवा महाराष्ट्र सहकारी संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये नोंदणीकृत ग्रंथालय शासनमान्यता व अनुदानासाठी प्रस्ताव करू शकते. (पंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे ग्रंथालय सुरू करावयाचे असल्यास वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता लागत नाही.)

प्रस्तावासोबत -

(२) घटनेची प्रत जोडावी.

(३) ग्रंथ - प्रस्तावामध्ये ग्रंथालयाकडे किमान ३०० ग्रंथ ज्यांची किंमत रू.२५ हजारांपेक्षा कमी नसावी, त्यांची यादी अ.क्र.दाखल क्रमांक, ग्रंथनाम, ग्रंथकार, प्रकाशक, किंमत इत्यादी तपशीलासह प्रस्तावासोबत जोडलेली हवी.

(४) वृत्तपत्रे - किमान ४ वृत्तपत्रे दररोज सुरू हवीत. प्रस्तवासोबत यादी जोडावी.

(५) नियतकालिके - किमान ६ नियतकालिके ज्यामध्ये साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, द्वैमासिके, त्रैमासिके यांचा समावेश असेल. (त्यांची शक्यतो पोस्टाद्वारे वार्षिक वर्गणी भरलेली असावी.) प्रस्तावासोबत यादी जोडावी.

(६) वर्गणीदार सभासद - वर्गणी भरलेले किमान २६ सभासद हवेत. (त्यांची नावांची यादी व वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक व दिनांक या तपशीलासह प्रस्तावासोबत जोडावी.)

(७) जागा - ग्रंथालयाकरिता भाड्याची वा स्वतःची पुरेशी जागा हवी. (याबाबत नियमात स्पष्ट तरतूद नसली तरी पुरेशी म्हणजे उदा.- ड वर्गासाठी किमान १०० चौ.फु.क्षेत्रफळाची हवी)

जागेचा आराखडा व क्षेत्रफळाचा तपशील, भाड्याची असल्यास मालकाशी केलेल्या भाडे कराराची प्रत प्रस्तावसोबत जोडावी व मालकीची असल्यास पंचायत वा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये असणारा ग्रंथालयाच्या मालकीचा नमुना-८ चा उतारा जोडावा.

(८) कर्मचारी - ग्रंथालयामध्ये किमान १ अर्धवेळ कर्मचारी (ग्रंथपाल) असावा. त्याच्या नेमणुकीचा ठराव जोडावा. प्रस्तावासोबत कर्मचाऱ्याची माहिती जोडावी लागते.

(९) कामाच्या वेळा - दररोज किमान ३ तास

अन्य बाबी -

(१) प्रस्ताव सादर करण्यापूर्वी ग्रंथालय किमान १ वर्ष सुरू असले पाहिजे व त्यांनी त्या मागील वर्षाचा संस्थेचा ऑडीट रिपोर्ट C.A. कडून लेखा परीक्षण करून घेतलेला हवा. त्याची प्रत प्रस्तावासोबत जोडावी.

(२) प्रस्तावासोबत मूळ अर्ज (५०रू.किंमत) भरून त्यासोबत रू.५००/- प्रोसिसिंग फी भरलेले ट्रेझरीचे चलन मूळ प्रत जोडावी. (Xerox नव्हे.)

(३) **रजिस्टर्स -** ग्रंथालयामध्ये आवश्यक असणारी रजिस्टर्स (ज्यांची यादी प्रस्तावासाठीच्या अर्जामध्ये दिलेली आहे.) ठेवावीत व त्यामधील नोंदी अद्ययावत असाव्यात.

(४) **ठराव -** ग्रंथालयाच्या कार्यकारिणीने सदर ग्रंथालयास शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत मान्यता असणारा ठराव करावा व त्याची प्रत प्रस्तावासोबत जोडावी.

(५) **लोकसंख्या - ग्रामपंचायत दाखला -** ग्रंथालयाच्या मान्यतेसाठी किमान लोकसंख्या ५०० च्या वर असावी. १०,००१ च्या वर ते २५,००० पर्यंत लोकसंख्येला दुसरे ग्रंथालय, २५,००१ ते ५०,००० पर्यंत तिसरे ग्रंथालय व ५०,००१ ते १ लाख पर्यंत व त्या प्रमाणात पुढे लाखास ४ अशी ग्रंथालयांना मान्यता मिळू शकते. त्यासाठी लोकसंख्येचा ग्रामपंचायतीचा दाखलाही सोबत जोडावा. (लोकसंख्येंसाठी अंतिम प्रमाण जनगणना कार्यालयाची संख्या मानण्यात येते.)

(६) **कार्यकारिणी -** संस्थेची कार्यकारिणी स्थानिक गावाचेच रहिवाशी असावेत. त्यांचे पत्ते स्थानिक हवेत. (त्याबाबत सोबत UID ची प्रत प्रस्तवासोबत जोडावी.)

मान्यतेसाठी कार्यवाही :-

वरीलप्रमाणे प्रस्ताव मुदतीत सादर केल्यानंतर त्याची छाननी करण्यात येते व पात्र असल्यास त्याची त्याच आर्थिक वर्षात समक्ष गावी जाऊन तपासणी संचालनालयाकडून करण्यात येते व त्यासाठी गुणांकनानुसार शासन मान्यता व तदर्थ अनुदान रू.२०,००० त्या वर्षाच्या मार्चअखेर प्रदान करण्यात येते.

ग्रंथालयांना वर्गनिहाय मान्यतेच्या अटी -

ग्रंथालयास मान्यता देताना "ड" वर्गातच देण्यात येते व पुढील प्रत्येक ३ वर्षांनंतर वरील वर्गाच्या अटी पूर्ण असतील व दर्जोन्नतीसाठी ग्रंथालयाने प्रस्ताव केला असेल तर त्याप्रमाणे तपासून वरील दर्जाची मान्यता व अनुदान देण्यात येते. वर्गनिहाय मान्यतेच्या अटी व अनुदानाची कमाल मर्यादा.

ग्रंथाल-याचा वर्ग	ग्रंथसंख्या	वृत्तपत्रे	नियत-कालिके	वर्ग-णीदार सभासद	कर्म-चारी संख्या	सेवाकार्या-च्या वेळा	बाल विभाग व महिला विभाग	संदर्भ विभाग	सांस्कृतिक कार्यक्रम	पुरेशी जागा	फर्निचर	साखळी योजना	कमाल अनुदान मर्यादा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)
जिल्हा-अ	१५००१	१६	५१	३०१	६	६ तास	आवश्यक	आव-श्यक	किमान १०	स्वत:ची	पुरेसे	आवश्यक	४,८०,०००
तालुका-अ	१५००१	१६	५१	३०१	४	६ तास	आवश्यक	आव-श्यक	किमान १०	स्वत:ची	पुरेसे	आवश्यक	२,५६,०००
इतर-अ	१५००१	१६	५१	३०१	४	६ तास	आवश्यक	आव-श्यक	किमान १०	स्वत:ची	पुरेसे	---	१,९२,०००
जिल्हा-ब	५००१	६	१६	१०१	४	६ तास	आवश्यक	---	किमान ४	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	आवश्यक	२,५६,०००
तालुका-ब	५००१	६	१६	१०१	३	६ तास	आवश्यक	---	किमान ४	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	आवश्यक	१,९२,०००
इतर-ब	५००१	६	१६	१०१	३	६ तास	आवश्यक	---	किमान-४	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	---	१,२८,०००
तालुका-क	१००१	४	६	५१	२	३-तास	--	---	--	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	आवश्यक	९६,०००
इतन-क	१००१	४	६	५१	२	३-तास	---	---	--	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	----	६४,०००
ड	३०१	४	६	२६	१	३-तास	---	---	--	स्वतंत्र स्वरुपा-ची	पुरेसे	-----	२०,०००

टीप :- ०१/४/२०१२ पासून वरील अनुदानाच्या रक्कमांत ५०% वाढ करण्यात आली आहे. ती मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेनंतर या वर्षात वितरीत करण्यात येणार आहे.

- मागील वर्षाच्या मान्य बाबींवरील खर्चाच्या ९०% वा ग्रंथालयाच्या वर्गाला अनुज्ञेय कमाल मर्यादा यापैकी जे कमी तितके अनुदान समान २ हप्त्यात दरवर्षी देण्यात येते.
- ३१ ऑक्टोबर च्या आत गत वर्षीच्या हिशेबाच C.A. चा अहवाल दिल्यास अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यात येतो.
- या अनुदानापैकी ५०% रक्कम आकृतिबंधानुसारच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी व उर्वरीत ५०% रक्कम ग्रंथालयांकरिताच्या इतर मान्य खर्चाच्या अन्य बाबींवर जसे ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, प्रवास, स्टेशनरी इत्यादीसाठी देण्यात येते.
- **लाभाच्या अन्य योजना -** ग्रंथालयास साधनसामुग्री ग्रंथालयीन फर्निचर हवे असल्यास ५०% संस्थेचे व ५०% सहाय्यक अनुदान संचालनालयाकडून देण्यात येते. त्यासाठी प्रस्ताव विहित नमुन्यात व अटींसह सादर करावा लागतो. या अनुदानाची कमाल मर्यादा ग्रंथालयाच्या वर्गास असणाऱ्या कमाल अनुदानाइतकी असते.
- **आमदार खासदार निधी -** ग्रंथालयांना ग्रंथ-फर्निचर, इमारत, संगणक साहित्य इत्यादी घेण्यासाठी त्या त्या जिल्हा नियोजन समितीकडूनही विहित मर्यादेपर्यंत अनुदान देण्याची तरतूद आहे. नियोजन विभागाच्या निर्णयानुसार ही मदत ग्रंथालयांना विहित कागदपत्रांच्या आधारे घेता येऊ शकते.
- **राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनांमधूनच्या विविध सहाय्य योजना-**

- दरवर्षी राज्य शासनाचे २.५ कोटी व केंद्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत स्वायत्त मंडळ असणाऱ्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून रू.२.५ कोटी अशा ५ कोटीची मदत राज्यातील ग्रंथालयांना
- ग्रंथ
- फर्निचर
- संगणक
- झेरॉक्स मशीन्स
- इमारत बांधकाम किंवा विस्तार
- बाल विभाग समृद्धीसाठी

- महिला व ज्येष्ठ नागरिक विभाग
- अपंग-अंध स्वतंत्र वाचन विभाग
- ग्रंथालय विषयक कार्यशाळा शिबिरे
- ग्रंथालाचा रौप्य, सुवर्ण हिरक, अमृत, शताब्दी व शतकोत्तर महोत्सव वर्ष साजरे करण्यासाठी अशा योजनांकरिता मिळू शकते.

यामध्ये समान निधी व असमान निधी अशा दोन प्रकारच्या निधी योजना आहेत. वरील नमूद निधी हा समान निधी योजनेचा आहे.

असमान निधी मये प्रतिष्ठानच्या निधीमधून वरील प्रकारच्या योजनाही वेगळ्या राबविल्या जातात. त्यातून ग्रंथालयांना सहाय्य मिळू शकते.

वरीलप्रमाणे ग्रंथालयांसाठी अटी व विविध योजना कार्यान्वित आहेत.

जिल्हानिहाय गंथालयांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	**जिल्हा**	**दर्जा/वर्गनिहाय योजनेतर ग्रंथालये**									**एकूण**
		जिल्हा		**तालुका**			**इतर**				
		अ	**ब**	**अ**	**ब**	**क**	**अ**	**ब**	**क**	**ड**	
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**	**(५)**	**(६)**	**(७)**	**(८)**	**(९)**	**(१०)**	**(११)**	**(१२)**
१	अकोला	१	०	२	२	२	३	९३	१५७	२४४	५०४
२	अमरावती	१	०	४	६	२	४	८६	१५५	१६८	४२६
३	बुलढाणा	१	०	२	३	२	१	३०	११५	२३०	३८४
४	यतवमाळ	१	०	३	४	२	२	४०	११२	२२९	३९३
५	वाशिम	१	०	१	३	०	१	२५	९०	२१३	३३४
अमरावती विभाग		**५**	**०**	**१२**	**१८**	**८**	**११**	**२७४**	**६२९**	**१०८४**	**२०४१**
६	उस्मानाबाद	१	०	५	२	१	१	७४	१३१	२७४	४८९
७	औरंगाबाद	१	०	२	५	१	५	६९	१४०	२२१	४४४
८	जालना	१	०	१	४	२	३	४८	८७	२९८	४४४
९	नांदेड	१	०	४	६	०	५	१६५	२११	३९७	७८९
१०	परभणी	१	०	४	३	०	२	७१	९५	२३७	४१३
११	बीड	१	०	३	५	२	४	८५	१६७	४२५	६९२
१२	लातूर	१	०	४	६	०	५	१४४	३२३	२४३	७२६
१३	हिंगोली	१	०	२	२	०	०	१८	४०	२१२	२७५
औरंगाबाद विभाग		**८**	**०**	**२५**	**३३**	**६**	**२५**	**६७४**	**११९४**	**२३०७**	**४२७२**
१४	गडचिरोली	१	०	०	३	२	१	७	६२	६१	१३७
१५	गोदिंया	१	०	१	५	०	०	१५	५९	११६	१९७
१६	चंद्रपूर	१	०	१	२	३	१	१२	७१	८७	१७८

१७	नागपूर	१	०	३	५	२	८	३७	८९	१०४	२४९
१८	भंडारा	१	०	०	५	१	१	१७	१०२	१००	२२७
१९	वर्धा	१	०	३	३	०	२	१९	३०	६३	१२१
नागपूर विभाग		**६**	**०**	**८**	**२३**	**८**	**१३**	**१०७**	**४१३**	**५३१**	**११०९**
२०	अहमदनगर	१	०	५	६	३	३	६८	१७४	२७२	५३२
२१	जळगाव	१	०	८	५	०	४	६८	११६	२५३	४५५
२२	धुळे	१	०	३	१	०	२	३१	६४	१२८	२३०
२३	नंदुरबार	१	०	१	३	०	०	६	३५	८७	१३३
२४	नाशिक	१	०	७	५	०	१२	६०	१०६	१३०	३२१
नाशिक विभाग		**५**	**०**	**२४**	**२०**	**३**	**२१**	**२३३**	**४९५**	**८७०**	**१६७१**
२५	कोल्हापूर	१	०	८	१	३	१०	१००	३३९	२६५	७२७
२६	पुणे	१	०	९	२	२	२२	१२०	२३६	२१३	६०५
२७	सांगली	१	०	५	३	०	१३	९६	१७७	९९	३९४
२८	सातारा	१	०	५	६	०	४	५८	१६८	१९३	४३५
२९	सोलापूर	१	०	८	३	०	११	२५६	४१४	२९१	९८४
पुणे विभाग		**५**	**०**	**३५**	**१५**	**५**	**६०**	**६३०**	**१३३४**	**१०६१**	**३१४५**
३०	ठाणे	१	०	६	३	१	१०	४०	५४	३९	१५४
३१	मुंबई उपनगर	१	०	०	०	०	१०	१८	१५	१०	५४
३२	मुंबई शहर	१	०	०	०	०	७	१३	६	१	२८
३३	रत्नागिरी	१	०	७	२	०	२	३५	७४	४९	१७०
३४	रायगड	१	०	११	२	१	१	१७	३४	१९	८६
३५	सिंधुदूर्ग	१	०	५	२	०	१०	४५	४७	२१	१३१
मुंबई विभाग		**६**	**०**	**२९**	**९**	**२**	**४०**	**१६८**	**२३०**	**१३९**	**६२३**
	एकूण	**३५**	**०**	**१३३**	**११८**	**३२**	**१७०**	**२०८६**	**४२९५**	**५९९२**	**१२८६१**

९.७९ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची इमारत फार जुनी आहे, त्याची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे, अशी सुचना समितीने दिली.

९.८० राज्यातील विद्यापीठातील रिक्त पदासंदर्भात दिनांक २२/८/२०१२ रोजी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष समितीने घेतली होती. सदर साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी समितीस सांगितले होते की, रिक्त पदासंदर्भात मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे. या समितीमध्ये विभागीय सचिवांचा देखिल समावेश आहे. या समितीची बैठक प्रत्येक महिन्याला होते व त्यावेळी रिक्त पदांचा आढावा घेऊन पदे भरण्यासंदर्भात विभागास कळविले जाते. परंतू

विभागाकडून रिक्त पदासंदर्भात माहिती समाधानकारक न मिळाल्यामुळे समितीने या विषयासंदर्भात साक्ष अपूर्ण ठेवून पुढील साक्षीकरिता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व विभागीय सचिव तसेच राज्यातील विद्यापीठातील कूलसचिव यांना बोलविण्यात यावे असा निर्णय घेतला.

९.८१ त्यानुसार दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ रोजी उपरोक्त विषयासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, संबंधित विभागीय सचिव व राज्यातील विद्यापीठामधील कुल सचिव यांची लोकलेखा समितीच्या बैठकीत साक्ष घेण्यात येईल असे कळविण्यात आले. परंतु सदर बैठकी करता मुख्य सचिव उपस्थित राहिले नाही व त्यांच्या अनुपस्थित बाबत उप सचिव श्रीमती लंवगरे यांनी समितीला पत्र पाठविले होते. लोकलेखा समितीच्या बैठकीस अनुपस्थित राहण्यासंदर्भातले पत्र मुख्य सचिवांच्या वतीने उप सचिव यांनी पाठविणे ही बाब आक्षेपार्ह आहे. सदर पत्रात उपसचिव यांनी मुख्य सचिवांनी लोकलेखा समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे पत्रात नमूद केल्या असल्यामुळे उपसचिवांनी समितीचा उपमर्द करण्याचा प्रयत्न केला असल्याने समितीला पाठविलेल्या पत्राबाबत उपसचिव यांनी समितीची माफी मागावी, असे निदेश समितीने दिले होते. या संदर्भात खुलासा करताना अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी समितीस सांगितले कि, उप सचिव यांनी पाठविलेल्या पत्राबाबत त्यांना काहीही माहिती नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठांमधील पदांना शासनाकडून मान्यता दिली जाते. कारण, त्यांचे वेतन शासनाकडून देण्यात येत असते. परंतु, एकदा पदांना मान्यता दिल्यानंतर पदे भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विद्यापीठांमार्फतच केली जात असते. त्यामध्ये शासनाचा किंवा या विभागाचा कोणताही सहभाग नसतो.

९.८२ मुख्य सचिव हे राज्याच्या प्रशासनाचे प्रमुख आहेत. लोकलेखा समितीमध्ये केवळ रिक्त पदासंदर्भात मुदा नव्हे तर अनेक मुद्दे जे राज्याच्या दृष्टीने हिताचे असतात त्यावर ही चर्चा केली जाते. त्यामुळे मुख्य सचिवांच्या अनुपस्थितीबाबत त्यांच्या वतीने उप सचिवांच्या स्वाक्षरीने कळविले जाते ही बाब योग्य नाही व समितीने मुख्य सचिवांच्या अनुपस्थितीबाबत नापसंती दर्शविली.

९.८३ दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या बैठकीकरिता राज्यातील विविध विद्यापीठातील कुलसचिव हजर होते. त्यांच्याकडून विद्यापीठामध्ये शिक्षक व शिक्षकेतर संवर्गात

किती पदे मंजूर आहेत त्यापैकी किती पदे भरली आहेत, किती पदे रिक्त आहेत, ती केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत व रिक्त पदे राहण्याचे कारण काय याबाबतची माहिती घेण्यात आली.

९.८४ त्यानुसार राज्यातील विद्यापीठामध्ये ४३ टक्के पदे रिक्त आहेत. उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली पाहिजे. परंतु, ४३ टक्के पदे रिक्त असतील तर उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याऐवजी आणखी खालावत जाईल, अशी समितीनी भीती व्यक्त करून या ४३ टक्के रिक्त पदांमध्ये बहुतांशी पदे ही प्रोफेसर, लेक्चरर वगैरे शिक्षकी पदे आहेत. त्यामुळे विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा कसा टिकेल, याबाबत समितीच्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत कोणतीही आर्थिक अडचण नाही. कारण, पदांना मान्यता दिल्यानंतर त्या पदांवर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना वेतन देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे. असे असताना ही रिक्त पदे भरण्यास एवढा विलंब का झाला ? विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) च्या अहवालामध्ये मुंबई विद्यापीठासह इतर विद्यापीठांत किती पदे रिक्त आहेत या बाबतचा उल्लेख आहे. शिक्षकेतर संवर्गाच्या पदांची माहिती देत असताना नमूद करण्यात आले की, सदरहू पदांच्या भरतीवर शासनाने बंदी आणलेली आहे. हे जरी खरे असले तरी शिक्षक संवर्गातील पदांवर बंदी नाही. शिक्षक संवर्गातील पदे भरण्यासाठी शासनाची उच्चस्तरीय समिती आहे. त्या समितीच्या माध्यमातून आवश्यकता असल्यास तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास मान्यता दिली जाते. आजच्या घडीला विद्यापीठांतील ४३ टक्के पदे रिक्त आहेत. ती पदे लवकरात लवकर भरणे आवश्यक आहे. देशातील २०० उत्तम विद्यापीठांमध्ये आपल्या राज्यातील एकही विद्यापीठ नाही, अशी खंत समितीने व्यक्त केली.

९.८५ प्रत्येक विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठात शिक्षक व शिक्षकेतर संवर्गामध्ये मंजूर असलेली पदे, भरलेली पदे व सद्यःस्थितीत रिक्त असलेली पदे यासंदर्भात माहिती देण्यास समितीने सांगितले असता, कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांनी समितीस सांगितले कि नागपूर विद्यापीठामध्ये शिक्षक संवर्गाची १५९ पदे रिक्त आहेत. यापैकी १४५ पदांची जाहिरात देण्यात आली होती. परंतु पदे भरण्यासाठी ॲक्ट नुसार गठीत केलेली समिती आणि यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार गठीत करण्यात आलेली समिती

वेगवेगळी आहे. भरती प्रक्रिया राबविताना विद्यापीठाने कोणती समिती ग्राह्य धरावी या बाबत आम्ही शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते. परंतु शासनाकडून काहीही कळविण्यात आले नाही. त्यानंतर आम्ही शासनाला स्मरणपत्र पाठविले. शासनाकडून मार्गदर्शन मिळाल्यास विद्यापीठामध्ये रिक्त असलेली पदे एक महिन्यात भरण्यात येतील, असे आश्वासन समितीला दिले. विद्यापीठमध्ये शिक्षकेतर संवर्गाची १४४ पदे रिक्त आहेत. अतिरिक्त १८५ पदे आहेत.

९.८६ कुलसचिव (अति.कार्यभार), पुणे विद्यापीठ, पुणे यांनी समितीस सांगितली कि पूणे विद्यापीठामध्ये वर्ग अ ते ड ची शिक्षकेतर संवर्गातील ३७५ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी २०१० मध्ये जाहिरात दिली होती. त्यानंतर विद्यापीठाला एम.सी.एस.आर. लागू झाले. एम.सी.एस.आर. नुसार उमेदवारांची पात्रता मागितली होती. पात्रतेचे उमेदवार नुकतेच आम्हाला मिळाले आहेत. जून-२०१० मध्ये शिक्षकेतर संवर्गातील पदांच्या भरतीवर बंदी आली होती. आता रिक्त पदांच्या ३ टक्के पदे भरण्यास परवानगी आहे. त्यानुसार ११ पदे भरता येतील. या बाबतचा जी.आर. निर्गमित झाला तर ही पदे भरण्यात येतील. शिक्षक संवर्गाची दि.३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत १३८ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर पदे गेल्या ७-८ वर्षांपासून ही पदे रिक्त आहेत.

९.८७ कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची ४ पदे रिक्त आहेत. वारंवार जाहिरात देऊनही पात्र उमेदवार मिळत नाही. त्यामुळे सदरहू रिक्त पदे भरता आलेली नाहीत. शिक्षकेतर संवर्गाची ३२ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी जाहिरात देऊन पूर्ण प्रक्रिया झालेली आहे. गेल्या वर्षी आम्हाला १.५ कोटी रुपये विकासासाठी मिळाले होते. त्यापूर्वी कमी मिळत होते. यासंदर्भात विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी १०० टक्के पैसे शासन देते, असे अप्पर मुख्य सचिवांनी सांगितले.

९.८८ कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची १०३ पदे मंजूर आहेत. यापैकी केवळ ६ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची जाहिरात दिलेली असून, पुढील महिन्यात रिक्त असलेली ६ पदे भरण्यात येतील. शिक्षकेतर संवर्गातील सर्व पदे भरलेली आहेत.

९.८९ संचालक, डेक्कन महाविद्यालय व सर्व अभिमत विद्यापीठ, पुणे यांनी समितीस सांगतले शिक्षक संवर्गाची ५३ पदे मंजूर असून ३४ पदे भरलेली आहेत. सद्य:स्थितीत १९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांबाबतची संपूर्ण भरती प्रक्रिया आम्ही पूर्ण केलेली आहे. २० ऑक्टोबरला मॅनेजमेंट कौन्सिलची बैठक आहे. त्यामध्ये हा प्रश्न मार्गी लागेल. शिक्षकेतर संवर्गाची ४६ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत जाहिरातीची प्रक्रिया संपलेली आहे.

९.९० कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची २५५ पदे मंजूर असून, २०३ पदे भरलेली आहेत. सद्य:स्थितीत ५२ पदे रिक्त आहेत. शिक्षकेतर संवर्गाची ७८३ पदे मंजूर असून ४७७ पदे भरलेली आहेत. शिक्ष्केतर संवर्गाची ३०६ पदे रिक्त आहेत. शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाची रिक्त पदे दोन-तीन महिन्यांत भरण्यात येतील, असे आश्वासन समितीला दिले.

९.९१ कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाच्या ३५ पदांचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला होता. अद्याप शासन स्तरावरुन या पदांना मंजुरी मिळालेली नाही. शिक्षकेतर संवर्गाची १६० पदे मंजूर असून, १०८ पदे भरलेली आहेत. ५२ पदे रिक्त आहेत, असे सांगितले.

९.९२ कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी समितीस सांगितले कि, शिक्षकेतर संवर्गाची ६४४ पदे मंजूर असून, ९३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची जाहिरात दिली असून भरती प्रक्रिया सुरु आहे. शिक्षक संवर्गाची ६० पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची जाहिरात दिली असून, भरती प्रक्रिया सुरु आहे. ही पदे गेल्या तीन वर्षांपासून रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी यापूर्वी सुध्दा जाहिरात दिली होती. परंतु यु.जी.सी.चा नवीन जी.आर. आला. त्यानुसार ए.पी.आय. कॅल्क्युलेट करावे लागते. त्यानुसार ते ए.पी.आय. कॅल्क्युलेट करुन ते मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये पास करुन घेतले आहे व त्यानंतरच रिक्त पदांची जाहिरात दिली आहे.

९.९३ कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची ३६५ पदे मंजूर असून, १६७ पदे भरलेली आहेत. यापैकी १९८ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. नुकतेच आम्ही इतर विद्यापीठातील २२ आणि विधी महाविद्यालयातील ७ प्राध्यापकांची पदे भरलेली आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही

सुरु आहे. शिक्षकेतर संवर्गाची १३१९ पदे मंजूर असून, १०२२ पदे भरलेली आहेत. २९७ पदे रिक्त आहेत. वर्ग-क च्या २३९ रिक्त पदांपैकी १९४ पदांची जाहिरात दिली आहे. या पदांची भरती प्रक्रिया सुरु आहे.

९.९४ उप कुलसचिव, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी समितीस सांगितले कि, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही. विद्यापीठाला स्वत:च्या खिशातून शासनाच्या नियमानुसार कर्मचाऱ्यांचे पगार द्यावे लागतात. विद्यापीठामध्ये शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाची एकूण ३५० पदे मंजूर आहेत. विद्यापीठामध्ये शिक्षक संवर्गाची ५५ पदे मंजूर असून ४० पदे भरलेली आहेत. १५ पदे रिक्त आहेत. शिक्षकेतर संवर्गाची २९५ पदे मंजूर असून २३७ पदे भरलेली आहेत. ५८ पदे रिक्त आहेत. अशा प्रकारे शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील एकूण ७३ पदे भरावयाची आहेत. सद्य:स्थितीत यापैकी २० पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, पात्र उमेदवारांना केवळ नियुक्ती आदेश देणे बाकी आहे. उर्वरित ५३ पदांबाबत सांगू इच्छितो की, ही पदे भरल्यानंतर विद्यापीठावर किती आर्थिक भार पडेल हे सुध्दा पहावे लागेल. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे विनाअनुदानित आहे. यासंदर्भात शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला डेव्हलपमेंट ग्रँट वेळोवेळी दिलेली आहे, असे अप्पर मुख्य सचिव यांनी समितीस सांगितले.

९.९५ कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची १५७ पदे मंजूर असून १२७ पदे भरलेली आहेत. ३० पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. अनुसूचित जाती/जमातीमध्ये पात्र उमेदवार मिळत नसल्यामुळे काही पदे रिक्त आहेत. शिक्षकेतर संवर्गामध्ये वर्ग-१ ची २८ पदे मंजूर असून ५ पदे रिक्त आहेत. वर्ग-२ ची २४ पदे मंजूर असून ४ पदे रिक्त आहेत. वर्ग-३ ची २२० पदे मंजूर असून ५४ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची १२८ पदे मंजूर असून २८ पदे रिक्त आहेत. नवीन शासन निर्णयानुसार शिक्षकेतर संवर्गाच्या रिक्त पदांपैकी ३ टक्के पदे भरता येत असल्यामुळे उर्वरित पदे रिक्त आहेत.

९.९६ Registrar, S.N.D.T., Women University, Mumbai यांनी समितीस सांगितले कि, We have total 281 teachning posts in our university out of which 190 posts are filled and only 91 posts are vacant till this date. We have already given advertisement for

filling up of 25 posts. We had also issued an advertisement before this latest advertisement but we did not get responce. Now this vacant post will be filled by December, 2012.

In case of non-teaching posts, we have total 445 non-teaching posts in our university out of which only 65 posts are vacant today. These posts are vacant due to the Governement Resolution about ban on filling up of post above 3%.

९.९७ सहायक कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, यांनी समितीस सांगितले कि, शिक्षक संवर्गाची १७ पदे मंजूर असून ८ पदे रिक्त आहेत. शिक्षकेतर संवर्गाची ५२ पदे मंजूर असून सद्य:स्थितीत ३ पदे रिक्त आहेत.

९.९८ कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे यांनी समितीस सांगितली कि, शिक्षक संवर्गातील २५ पदे मंजूर आहेत त्यापैकी १३ पदे रिक्त आहेत. शिक्षक संवर्गातील पदे भरण्यामध्ये अडचणी येत असल्यामुळे ही पदे रिक्त आहेत. शिक्षकेतर सवंर्गातील २४ पदे मंजूर आहेत त्यापैकी ५ पदे रिक्त आहेत. आमच्याकडे फ्रेश उमेदवार येतात. परंतु असोसिएट प्रोफेसर पदावरील उमेदवारांच्या पी.एफ संबंधी अडचणी येतात. त्या संदर्भात दिनांक १५ मार्च रोजी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांच्या सोबत बैठक घेण्यात आली होती. त्यांनी आम्हाला अर्ज करण्यास सांगितलेले आहे. मुंबई आणि कलकत्ता येथील दोन प्राध्यापकांची निवड झाली आहे.

९.९९ राज्यातील विविध विद्यापीठातील कुलसचिवांनी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने विद्यापीठांमध्ये पुरेसा कर्मचारीवृंद नसेल तर ही बाब विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी योग्य नाही. विद्यापीठांमध्ये ४३ टक्के पदे रिक्त आहेत असे समजल्यावर समितीला आश्चर्य वाटले मागील आठ-दहा वर्षापासून विद्यापीठांमध्ये पदे रिक्त आहेत याचा शासन स्तरावर विचार होणे आवश्यक आहे. इतक्या वर्षात रिक्त पदे भरण्यात आली नाहीत तेव्हा ती व्यपगत करण्यात येत आहेत असे शासनाने विद्यापीठांना कळवावयास पाहिजे होते. विद्यापीठांनी तीन महिन्यांच्या आत रिक्त पदे भरावीत आणि त्या संबंधीचा अहवाल समितीला सादर करावा, असे निदेश समितीने दिले व समितीने सर्व कुलसचिवांना सुचना केली कि, त्यांनी त्यांच्या स्तरावर रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेस वेग द्यावा. तसेच शासनाकडून रिक्त पदे लवकर भरण्याबाबत समितीमार्फतही शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे समितीने सांगितले.

९.१०० काही विद्यापीठांकडे मागील आठ-दहा वर्षांपासून शिक्षक सवंर्गातील पदे रिक्त आहेत. काही पदांच्या बाबतीत अर्हतानुसार भरती करावी लागते. जसे उमेदवाराने पीएच.डी.केलेली असावी. विद्यापीठास पीएच.डी. अर्हता प्राप्त उमेदवार मिळत नसेल तर त्यांना ते पद रिक्त ठेवावे लागते. त्या पदावर अन्य उमेदवाराची निवड करता येत नाही. या ठिकाणी कुलसचिवांकडून सांगण्यात आले की, शिक्षक संवर्गातील अनेक पदे रिक्त आहेत. जर शिक्षक उपलब्ध होत नसतील तर तासिकेवर शिक्षकांची नेमूणक करता येते. परंतु कुलसचिवांकडून तासिकेवर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असे सांगण्यात आले नाही.

९.१०१ शिक्षकांची संख्या अपुरी असेल तर विद्यार्थ्यांना शिकविणार कोण ? अर्हतेनुसार उमेदवार मिळत नसल्यामुळे शिक्षक संवर्गातील पदे रिक्त आहेत. ही पदे किती वर्षापासून रिक्त आहेत ? रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांना किती वर्षे शिक्षणपासून वंचित ठेवणार आहात ? तासिकेवर शिक्षकांची नियुक्ती का करीत नाही ? पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती काय ? ही पदे भरण्याबाबत शासन आणि विद्यापीठांमध्ये बैठक झाली होती काय ? शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होत नाही काय ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता अप्पर मुख्य सचिवांनी समितीस सांगितले कि, विद्यापीठांकडून शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गातील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. रिक्त पदे न भरल्यास अनुदान मिळणार नाही असे शासनाने आदेश काढले होते. त्यावेळी विद्यापीठांकडून रिक्त पदे भरण्यास गती मिळाली होती. नागपूर विद्यापीठात मागील दहा वर्षापासून ४०० ते ५०० पदे रिक्त होती. त्या बाबत आढावा घेऊन चार महिन्यात रिक्त पदे भरण्यास सांगितले. सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत मुलाखती आणि दुपारी ३.०० वाजता निवड झालेल्या उमेदवाराच हातामध्ये नियुक्तीचे पत्र दिले जात होते. परंतु आता मुलाखती होऊन उमेदवारांची निवड होऊन सुध्दा नियुक्ती करण्यास दोन-तीन महिन्यांचा कालावधी लागत आहे. तेव्हा या बाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. विद्यापीठांनी रिक्त पदे लवकर न भरल्यास अनुदान बंद करण्यात येईल असे शासनाकडून सांगण्यात आल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबत थोडी सुधारणा झाली होती.

९.१०२ दुसरा मुद्दा म्हणजे विद्यापीठांमध्ये तासिकेवर प्राध्यापक नेमण्याची कार्यपद्धती आहे. काहींची दैनंदिन वेतनावर नियुक्ती केल्यानंतर यांना कायम करा अशी त्यांच्याकडून

मागणी होते. त्यामुळे नियमित पदे भरण्यास उशीर होतो. शासनाने निर्णय घेतला होता की, दैनंदिन वेतनावर नियुक्त केलेल्या शिक्षकांना विद्यापीठाने स्वतःच्या निधीतून वेतन द्यावे, शासनाकडून त्यांच्या वेतनासाठी अनुदान मिळणार नाही.

९.१०३ तिसरा मुद्दा म्हणजे विद्यापीठाचे कुलगुरु आणि कुलसचिव यांनी ठरविले तर तीन महिन्यांच्या आत रिक्त पदे भरता येतील. काही वेळा एस.सी, एस.टी.संवर्गातील उमेदवार मिळण्यास अडचणी येतात. परंतु इतर संवर्गातील उमेदवार उपलब्ध होऊ शकतात.

९.१०४ विद्यापीठांतर्गत किती महाविद्यालये येतात आणि त्या महाविद्यालयांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गातील किती पदे रिक्त आहेत याची माहिती समितीला सादर करावी. कारण ती माहिती प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गातील किती पदे रिक्त आहेत याची आकडेवारी समोर येईल, असे निदेश समितीने दिले असता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि गोंडवाना विद्यापीठ, चंद्रपूर यांनी रिक्त पदासंदर्भात माहिती समितीस प्राप्त करून दिले **(विवरण क्र._____).**

९.१०५ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची कोणतीही संधी उपलब्ध नाही काय ? याबाबत माहिती देताना वित्त सचिवांनी समितीस सांगितले कि, वर्ग "अ", "ब", "क" आणि "ड" या संवर्गातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. शासनाचे भरतीवर निर्बंध होते. परंतु "अ" आणि "ब" संवर्गातील पदे भरण्यावर शासनाचे निर्बंध नव्हते. असे असताना "अ" आणि "ब" संवर्गातील संवर्गातील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. या पदांची भरती प्रक्रिया विद्यापीठ पातळीवर होणे गरजेचे आहे. काही कुलसचिवांनी सांगितले की, "क" आणि "ड" संवर्गातील पदे भरता येत नाहीत. "क" आणि "ड" संवर्गातील पदे भरण्या बाबत शासनाचे निर्बंध आहेत. सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २५ जुलै २०१२ रोजीचे परिपत्रक आहे. त्या परिपत्रकामध्ये कार्यपध्दती दिलेली आहे. याप्रमाणे एकूण प्रवर्गामध्ये मंजूर असलेल्या पदांच्या ३ टक्के जागा रिक्त असतील तर त्यांच्या स्तरावर नियुक्त्या करणारे प्राधिकरण असून त्या प्रमाणे कार्यवाही करता येईल. तथापि क व ड वर्गामधील पदे भरण्याची गरज असेल तर त्यासंबंधात सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती

आहे.त्यांच्यापुढे जर समर्थनासह सहित प्रस्ताव मांडला तर सदर समिती त्याबाबत विचार करुन पदे भरण्याच्या बाबतीत संबंधितांना परवानगी देऊ शकते. हा मुद्दा पुणे येथील बैठकीमध्ये मांडला होता आणि जर सदरहू मुद्दा सामान्य प्रशासन विभागामार्फत समितीपुढे आणला तर समिती या अनुषंगाने विचार करील.

९.१०६ उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण जगामध्ये जी विद्यापिठे आहेत त्यामध्ये आपल्या देशातील आणि महाराष्ट्रातील एकाही विद्यापीठाचा क्रमांक अव्वल-२०० मध्ये लागलेला नाही.याबाबत अत्यंत वाईट परिस्थिती आहे. महाराष्ट्रामधून कमीतकमी २-४ तरी विद्यापिठे अव्वल क्रमांकामध्ये मध्ये आली पाहिजेत आणि यादृष्टीने काम करण्याची गरज आहे, अशी खंत अप्पर मुख्य सचिव, उच्च तंत्र शिक्षण विभाग यांनी व्यक्त केली.

९.१०७ तासिका बेसिसवरील प्राध्यापकांना शासनामार्फत वेतन देण्यात येते की विद्यापीठामार्फत वेतन देण्यात येते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, विद्यापीठ अनुदानित असेल तर शासन वेतन देते तर विनाअनुदानित असेल तर विद्यापीठ वेतन देते.

९.१०८ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, रिक्त पदांची जाहिरात दिलेली आहे. पण ही जाहिरात फक्त महाराष्ट्रातील वर्तमानपत्रात देण्यात येते की, संपूर्ण हिंदुस्थानातील वर्तमानपत्रात देण्यात येते ? याबाबत संपूर्ण देश स्तरावर जाहिरात दिली जाते, असे विभागाकडून सांगण्यात आले.

९.१०९ संस्कृत भाषेचा विस्तार होण्यासंदर्भात समितीने विचारणा केली कि, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा विस्तार फक्त नागपूर विभागापुरता मर्यादित आहे. संस्कृत शिकणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. संस्कृत भाषेच्या विस्तारासाठी काय योजना आहेत ? याबाबत इतर विद्यापीठांशी व महाविद्यालयांशी संपर्क साधला आहे काय ? काही ठिकाणी खाजगी संस्कृत पाठशाला आहेत. आज संस्कृत भाषा लोप पावत चालली आहे. संस्कृत भाषेच्या वाढीसाठी काही प्रयत्न करता काय ? यावर कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी सांगितले कि, याबाबत प्रयत्न सुरु आहेत. मुंबईत दोन-तीन ठिकाणी सेंटर्स आहेत. पुणे हे शिक्षणाचे माहेर घर समजले जाते. परंतु पुण्यामध्ये तशा काही सोयी नाहीत. आपल्याकडे

पुणे विभागातून मागणी आली नाही काय ? यासंदर्भात विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. उत्तर प्रदेशमध्ये सत्तापालट झाल्यानंतर त्याठिकाणी उर्दू भाषा सक्तीची करण्यात आली आहे. तेव्हा संस्कृत भाषेचा प्रसार होण्यासाठी योजना राबविल्या पाहिजेत अशी सूचना समितीने विभागास दिली.

९.११० अभिमत विद्यापिठाबाबत काय स्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता अभिमत विद्यापिठांना यु.जी.सी. मान्यता देत असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. परंतु त्यामुळे याचा परिणाम सर्व विद्यापिठांवर होत आहे काय ? याबाबत अभिमत विद्यापिठामुळे काम करण्यामध्ये अडचणी येतात, असे विभागाकडून सांगण्यात आले.

९.१११ जी खाजगी विद्यापीठे आहेत, त्यांना चांगले प्राध्यापक मिळतात परंतु आपल्या विधापिठांना चांगले प्राध्यापक मिळत नाहीत. याबाबत सांगावयाचे झाले तर सदरहू खाजगी विद्यापीठे प्राध्यापकांना जास्त पगार देतात. त्यांना जास्त पगार देणे परवडते कारण ते विद्यार्थ्याकडून भरमसाठ डोनेशन घेत असतात. मेडिकल कॉलेजमध्ये ५० लाख, इंजिनिअरींग कॉलेजमध्ये १ लाख पर्यंत डोनेशन घेतले जाते. These private Universities can afford to give higher pay and hence they engage highly qualified professors. अभिमत विद्यापिठांमुळे येथील विद्यापिठांच्या कामकाजामध्ये फरक पडला असून तेथे लॅक्युना निर्माण झाला आहे.

९.११२ परदेशातील विद्यापीठे व्यवयाय करण्यासाठी येणार आहेत. येथील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी येणार नाहीत. परंतु आम्ही त्याला अनुदानाचे पाचर मारुन थांबविलेले आहे. आज याठिकाणी सुदैवाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचे कुलसचिव उपस्थित असून ते त्यांच्या क्षेत्रामध्ये विद्यापिठांचे नाव मोठे करीत आहेत. आपल्या देशामध्ये जी शिक्षण संस्कृती आहे तशी ती जगामध्ये कुठेही नाही.आपल्या विद्यापिठांच्या अस्तित्वा बाबत वेगळ्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे काय? तसेच दुसरी बाब म्हणजे याठिकाणी परदेशी विद्यापिठांना ३०० एकर जमीन उपलब्ध करुन द्यावयाची आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की , याकरता ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कारण, this Act is more in favour of the teachers and not in favour of students. शिक्षकांच्या हिताचा असण्यामध्ये काही अडचण नाही, पण यामध्ये मुख्यत्वे करुन

विद्यार्थी हा केंद्रबिंदू असावयास पाहिजे. त्यामुळे या कायद्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

९.११३ विविध कॉलेजमध्ये वर्षानुवर्षापासून रिक्त पदे आहेत. त्यासाठी शासनाकडून निधी देण्यात येतो. मात्र गेल्या पाच वर्षामध्ये शिक्षणासाठी हा निधी वापरण्यात आला नाही. त्यामुळे सदरहू निधी तसाच परत करण्यात आला. त्यानंतर या निधीचा विनियोग कशासाठी केला याची माहिती समितीला देण्यात यावी, असे निदेश समितीने विभागासा दिले.

९.११४ विद्यापीठांचे महालेखाकारांनाकडून लेखापरिक्षण केले जाते काय ? याबाबतीत महालेखाकारांनी सांगितले कि, We have not been able to do audit of all the Universities. We have categorised the Universities and we do audit of Universities which have incurred more expenditure. In some Universities we have done audit after 2-3 years. We were discussing about filling of the vacant posts, in this regard we would like to suggest that the Universities can form a Selection Board for all the colleges. It would become easier to fill the vacant posts. परंतु, विद्यापिठांना शासनाकडून निधी दिली जातो त्यामुळे त्याचे लेखापरिक्षण झालेच पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले कि, त्यांनी सुद्धा महालेखाकारांना विनंती केली होती की, दरवर्षी लेखापरिक्षण करण्यात यावे. जर २५ लाख रुपयांपेक्षा जास्त निधी देण्यात आली असेल तर महालेखाकार यांच्याकडून लेखापरिक्षण केले जाते. त्यानुसार दरवर्षी लेखापरिक्षण करावे अशी विनंती केली होती.

९.११५ पुणे, नाशिक, मुंबई या विद्यापीठांचे लेखापरिक्षण झाले आहे अशी माहिती सदर विद्यापीठांच्या कुलसचिवांनी समितीस दिली.

अभिप्राय व शिफारशी :-

९.११६ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन सन २००७-२००८ या वर्षात "सर्वसाधारण शिक्षण" या लेखा शिर्षाअंतर्गत रु.१४३८.६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती त्यापैकी रु.१३४६.६१ कोटी खर्च झाला असून रु. ७१.८४ कोटी शिल्लक राहिले असताना सन २००७-२००८ मध्ये रु. ११९.७२ कोटी इतक्या रक्कमेची पुरक मागणी करण्यात आली असून त्यामध्ये एकूण १० पुरक मागण्यापैकी ६ पुरक मागण्या महागाई भत्त्याच्या होत्या वास्तविक पाहता मूळ अंदाजपत्राकातील रु. ७१.८४ कोटी इतकी बचत असतना परत पुरवणी

मागणीद्वारे रु.११९.७२ कोटी इतकी रक्कम आवश्यकता नसताना विभागाने उपलब्ध करून घेतली असून त्याच्या समर्थनार्थ कर्मचाऱ्यांची काही पदे व विद्यापीठातील काही पदे रिक्त असल्याने रक्कम खर्च होवू शकली नाही. काही विद्यापीठाकडून रक्कम वसूल केल्यामूळे अखर्चित राहिली ही दिलेली कारणे अगदीच क्षुल्लक असल्याने समितीला ती पटण्यासारखी नाहीत वास्तविक पहाता अर्थसंकल्पाची प्रक्रीया ही ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात सुरु होते. दरम्यानच्या काळात महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नविन पदे निर्माण झाल्यानंतर त्यासाठी होणारा खर्च पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करून घेतला जातो. शासनाने एका विशिष्ट बाबीसाठी केलेली तरतूद ही त्याच योजनेसाठी खर्च केलेली आहे किंवा मंजूर अनुदानापैकी कमी किंवा जादा खर्च झाला आहे. तसेच त्याची फलनिष्पत्ती काय आहे हे तपासण्याचे काम लोकलेखा समितीची प्रामुख्याने आहे. ही बाब विचारात घेता विभागाने अंदाजपत्रक तयार करीत असताना सर्वकष बाबीचा विचार न करता मूळ अर्थसंकल्पातील एकूण मंजूर तरतूद त्यापैकी झालेला खर्च व शिल्लक राहिलेली रक्कम विचारात न घेता परत पुरवणी मागणीद्वारे रक्कम उपलब्ध करून घेताना ती कोणत्या प्रयोजनासाठी उपलब्ध करून घेण्यात येत आहे व या रक्कमेची आवश्यकता खरोखरच आहे काय हे ही विचारात न घेता ती उपलब्ध करून घेतली आहे. यावरून विभागाचे मूळ अंदाज पत्रकच सदोषपणे तयार केले असल्याचे सिध्द होते समितीने ही बाब साक्षीचे वेळी विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली असता वित्त विभागाचे सचिव हेच समितीच्या अभिप्रायाशी सहमत झाले व अर्थसंकल्पीय अंदाज चूकीच्या गृहितावर तयार केले असल्याबाबत आपले अभिप्राय दिले **यावरून विभागातील जे अधिकारी अंदाजपत्रक तयार करतात त्यांना त्याबाबतचे सखोल ज्ञान नाही हेच स्पष्ट होते. सबब या प्रकरणी चौकशी करून संबंधिता विरूद्ध जबाबदारी निश्चित करून त्याच्या विरूद्ध कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

९.११७ राज्यामध्ये खाजगी विना अनुदानित महाविद्यालये, उच्च महाविद्यालये मोठ्या प्रमाणात सुरु झाली आहेत तसेच अनेक अभिमत विद्यापीठे देखील सुरु आहेत. विना अनुदानित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे यामध्ये विविध स्वरुपाचे पाठ्यक्रम तयार करण्यात आले आहेत. अनेक विद्यार्थी या पाठ्यक्रमाचे शिक्षण घेत आहेत. या शिक्षणाकरिता देणग्या

देऊन प्रवेश देण्यात आले आहेत. सदरहू विद्यार्थी हे शिक्षण पूर्ण करुन ज्यावेळेस नोकरी निमित्त आस्थापनांमध्ये अर्ज करतात त्यावेळी त्यांना मिळालेल्या प्रमाणपत्रातील अभ्यासक्रम हा मान्यता प्राप्त नसल्याचे निदर्शनास येते. या विद्यार्थ्यांना नोकरी तर मिळत नाहीच परंतु, त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची वर्षे वाया जातात. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये एक प्रकारचा असंतोष निर्माण होऊन शैक्षणिक क्षेत्राचा होत असलेल्या बाजारुपणाबद्दज चीड निर्माण होत आहे. ते अत्यंत उद्वेगजनक असून **उच्च व तंत्र शिक्षण विभागाने खाजगी विना अनुदानित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे यांना परवानगी देताना सदरहू विद्यापीठे कोणत्या प्रकारचे शैक्षणिक पाठ्यक्रम अंमलात आणणार आहे. तशा स्वरुपाचे अभ्यासक्रम इतर विद्यापीठाशी संलग्न आहे काय यासंदर्भात त्यांच्याकडून सखोल माहिती घेऊन मगच त्यांना परवानगी देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

९.११८ इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जवळजवळ १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थकीत आहे. केंद्र शासनाच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे राज्य शासनाने मागणी केलेली नाही. सदरहू रक्कम प्रलंबित असल्याचे कारण म्हणजे इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती आहे हे अद्याप निश्चित न झाल्यामुळे केंद्र शासनाकडे शिष्यवृत्तीकरिता मागणी करण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू विषय हा सामाजिक न्याय व उच्च तंत्र शिक्षण या दोन विभागांशी संबंधित असल्यामळे व या दोन विभागांमध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करण्यामध्ये समन्वय नसल्यामुळे राज्यातील लाखो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून व त्याचा परिणाम म्हणून शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. यामध्ये या विद्यार्थ्यांचा काहीही दोष नसताना त्यांना निष्कारण त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे **इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि सामाजिक विभाग या दोन्ही विभागांनी एकत्रितपणे कार्यवाही करुन या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्री मंडळाच्या माध्यमातून केंद्र शासनास पाठविण्याबाबत त्वरित कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

९.११९ राज्यामधील विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांना आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांची सवलत मिळत नाही. मात्र त्या महाविद्यालयांमधील विमुक्त जाती व भटक्या जमाती व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. राज्य शासनाच्या धोरणानुसार आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये सवलत मिळत नसल्याने या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असून देखील त्यांना शिक्षण पूर्ण करता येत नाही अशी समितीने खंत व्यक्त केली. विद्यार्थी शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश न मिळू शकल्यामुळे केवळ नाईलाजास्तव त्यांची आर्थिक कुवत नसताना देखील विना अनुदानित महाविद्यांमध्ये प्रवेश घेतात. **शासनानेच अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांना मान्यता दिली असल्याने शिक्षणाच्या संबंधातील नियम सर्वांना एकसारखेच लागू असले पाहिजे असे समितीचे मत झाले. अनुदानित शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या सवलती मिळतात त्या सवलती विना अनुदानित शाळा, महाविद्यालयांना मिळाल्यास मुलांना शिक्षणापासून वंचित राहता येणार नाही. शासनावर याप्रकारे आर्थिक बोजा पडण्याची शक्यता असली तरी, त्यादृष्टीने शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे अशी समिती शिफारस करीत आहे.**

९.१२० शिक्षणाचा अधिकार हा केंद्र शासनाचा कायदा असून राज्य शासनाचा या योजनेमध्ये ४५% हिस्सा असून ५५% केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होतो. मध्यान्होत्तर भोजन योजना ही खाजगी विना अनुदानित विद्यालयांमध्ये दिली जात नाहीत. परंतु, हा भेदभाव विना अनुदानित व अनुदानित विद्यालयांमध्ये करणे उचित नाही त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना मध्यान्होत्तर भोजन योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपायायोजना करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

९.१२१ समितीपुढे आलेल्या चर्चेमध्ये काही महाविद्यालयांमध्ये आवश्यक असणा-या प्राथमिक स्वरुपाच्या कोणत्याही सोईसुविधा नसल्याचे निदर्शनास आले. विद्यालयांना मान्यता देण्यापूर्वी त्यांनी कोणत्या बाबींची पूर्तता करणे याबाबत कोणते निकष आहेत अशी समितीने विचारणा केली असता, या महाविद्यालयांना मंजूरी देण्यापूर्वी त्यांच्याकडे स्वत:ची जमिन, स्वत:ची इमारत, लेक्चर रुम, सेमिनार हॉल, डिनसाठी कार्यालय, स्टाफ रुम, ग्रंथालय, स्वच्छतागृहे खेळाचे मैदान इत्यादींची उपलब्धता आहे की नाही हे तपासले जाते अशी माहिती

समितीस मिळाली. परंतु, शासनाच्या निकषाप्रमाणे महाविद्यालयांची तपासणी झाली तर ५०-६० टक्के महाविद्यालय बंद करण्याची पाळी शासनावर येईल. **समितीच्या माहितीप्रमाणे ब-याच महाविद्यालयांकरिता स्वत:ची स्वतंत्र इमारत नसते. ग्रंथालय, सेमिनार हॉल, स्वच्छता गृहे, क्रीडांगणे यांची काहीही व्यवस्था नसताना या महाविद्यालयांना शासनाकडून मान्यता मिळालेली असते हे अत्यंत गैर असून आपण विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे नुकसान तरी करीत नाही ना याची जान शासनाने ठेवली पाहिजे. महाविद्यालयांना परवानगी देताना उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या निकषांची पूर्तता करण्यात येते की नाही याची तपासणी केल्याशिवाय महाविद्यालयांना मंजूरी देण्यात येऊ नये अशी समिती शासनास शिफारस करीत आहे तसेच परवानगी दिल्यावर निकषांची पायामल्ली होत तर नाही यादृष्टीने या महाविद्यालयांची नियतकालिक तपासणी करावी अशी देखिल समिती शासनास शिफारस करीत आहे.**

९.१२२ अनुदानित महाविद्यांलयामधील शिक्षकांची व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे रिक्त राहिल्यामुळे माहे मार्च, २००८ मध्ये ४०१ लक्ष एवढा निधी प्रत्यार्पीत करण्यात आल्याची बाब समितीस निदर्शनास आली. समितीस मिळालेल्या माहितीमध्ये दि. ३१ जानेवारी, २०१२ रोजी अ, ब, क व ड या वर्गातील ६१,३९५ मंजूर पदांपैकी १०,९६८ म्हणजे जवळपास १८% पद रिक्त असल्याचे दिसून आले. सर्वसाधारणपणे १०% पर्यंतची पदे रिक्त असू शकतात. परंतु, येथे हा आकडा फार मोठा असल्याचे निदर्शनास आले. महाविद्यालयांमध्ये पदे मंजूर असतात व त्यासाठी आवश्यक तरतूद देखील केलेली असते. अशावेळी **अनुदानित महाविद्यालयांनी त्यांच्याकडील रिक्त पदे विहित कालावधीत न भरल्यास त्यांची मान्यता रद्द करण्यासंदर्भातील धोरण शासनाने आखावे अशी समिती शिफारस शासनास करीत आहे तसेच या भरती प्रक्रियेचे केंद्रीयकरण केल्यास प्रतिक्षा यादी तयार करुन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी समिती शिफारस करीत आहे. अनुदानित शाळा, विद्यालयांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामळे तेथील पद भरतीबाबत देखील धोरण तयार करण्यात यावे अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

९.१२३ विद्यापीठातील रिक्त पदासंदर्भात पुढीलप्रमाणे माहिती समितीस प्राप्त झाली. मुंबई विद्यापीठामध्ये सरळसेवेनुसार ८७२ पदे मंजूर असून त्यापैकी ५१० पदे भरलेली आहेत व ३६२ पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने ४२० पदे भरलेली असून ३६ पदे रिक्त आहेत. एसएनडीटी

विद्यापीठामध्ये ३३३ मंजूर पदे असून १०२ पदे रिक्त आहेत. ८४ पदे भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. पुणे विद्यापीठामध्ये ७७८ पदे मंजूर असून त्यापैकी २४३ पदे रिक्त आहेत. सोलापूर येथील विद्यापीठामध्ये १४९ पदे मंजूर असून ८५ पदे रिक्त आहेत. नांदेड येथील विद्यापीठामध्ये २५४ पदे मंजूर असून १८५ पदे रिक्त आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठामध्ये ५७३ पदे मंजूर असून १९५ पदे रिक्त आहेत. शिवाजी विद्यापीठ येथे ३५९ पदे मंजूर असून ९० पदे रिक्त आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे २१९ पदे मंजूर असून ५४ पदे रिक्त आहेत. रामटेक विद्यापीठ येथे ६६ पदे मंजूर असून ५१ पदे रिक्त आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे ५७० पदे मंजूर असून ६७ पदे रिक्त आहेत. **एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्राध्यापकांची पदे रिक्त रहात असल्याने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक नुकसान होत आहे. पद रिक्त असल्याबाबत कारणमिमांसा केली असता, पुरेशा प्रमाणात नेट-सेट परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार मिळत नाही असे महाविद्यालयांकडून सांगण्यात येते. परंतु प्रत्यक्षात नेट-सेट परिक्षा उत्तीर्ण झालेल्या बहुतांश विद्यार्थ्यांना नोकरी नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यापीठांकडून नेट-सेट उत्तीर्ण उमेदवारांची यादी विभागाने मागवावी व त्याची तुलना रिक्त पदांसाठी करावी. ज्यायोगे मोठ्या कालावधीकरिता ब-याच प्रमाणात पद रिक्त राहणार नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होणार नाही. यादृष्टीने शासनाने उपाययोजना करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे तसेच प्रशासकीय कामकाजाकरिता प्राध्यापक संवर्गातील व्यक्तीची नियुक्ती केली जाते. परंतु, त्यांना प्रशासकीय कामकाजाचा अनुभव नसल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. त्यामुळे विद्यापीठांमध्ये प्रशासकीय कामकाजांकरिता प्रशासकीय अधिकारी अथवा उप सचिव दर्जाचा अधिकारी यांची नियुक्ती करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

९.१२४ राज्यातील विविध विद्यापीठातील कुलसचिवांना देखील समितीने साक्षीस बोलाविले होते. त्यावेळी कुलसचिवांकडून त्यांच्या विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाची माहिती समितीस प्राप्त झाली असता, फार मोठ्या प्रमाणात या विद्यापीठांमध्ये आठ ते दहा वर्षांपासून पदे रिक्त असल्याचे समितीस निदर्शनास आले. विद्यापीठांमध्ये पुरेसा कर्मचारीवृंद नसेल तर, विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कुलसचिवांनी त्यांच्या

स्तरावर रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेस वेग द्यावा तसेच शासनाने देखील विविध विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर रिक्त पदे त्वरित भरण्याच्यादृष्टीने कुलसचिवांसमवेत एकत्रित बैठक बोलावून अवलंबविण्यात येणा-या कार्यपद्धतीचा आढावा घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

९.१२५ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील कुलसचिवांनी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्यासाठी अधिनियमातील तरतूदी नुसार भरण्यात यावीत कि, युजीसीच्या मार्गदर्शक तत्वानुसार गठीत केलेल्या समितीकडून भरावीत. याबाबतचे मार्गदर्शन शासनाकडे मागितले आहे . तथापि विद्यापीठाने स्मरणपत्र पाठवून देखील त्याबाबतचे मार्गदर्शन विभागाने विद्यापीठाला अद्याप न करणे ही बाब अत्यंत खेदाची आहे असे समितीला वाटते. समिती त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करते. सबब या प्रकरणी चौकशी करून संबंधिता विरूद्ध जबाबदारी निश्चित करून त्यानुसार त्याचे विरूद्ध कारवाई करावी त्याची माहिती समितीला द्यावी व उशिरा का होईना आतातरी विद्यापीठाला त्वरीत मार्गदर्शन करून विद्यापीठाचे रिक्त पदे भरण्याचा मार्ग मोकळा करावा व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याच अनुषंगाने समितीची आणखी अशीही शिफारस आहे की राज्यातील विविध विद्यापीठातील विभागनिहाय प्राध्यापक, विभाग प्रमुख, संचालक इत्यादी शिक्षक संवर्गातील तसेच प्रशासकीय विभागाकडील अ ते ड वर्गातील मंजूर व रिक्त पदाबाबतचा त्रैमासिक अहवाल प्रत्येक विद्यापीठाकडून उच्च शिक्षण विभागाने मागवून घेण्याची कार्यपद्धती यापुढे सुरू करावी व ज्या योगे रिक्त पदाबाबतचे स्पष्ट चित्र शासनासमोर येण्यास मदत होईल. सबब याबाबत शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी व त्याबाबतची केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महिला व बालविकास

१०. चेंबूर येथिल बी.ओ.टी. तत्वावर बांधकाम करण्यास दिलेल्या भिक्षेकरी गृहासंदर्भात.

१०.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना **अनुदान क.-एक्स-१ सामाजिक सुरक्षा व पोषण आहार (सर्व दत्तमत) मधील प्रधानशीर्ष २२१५ सामाजिक सुरक्षा व कल्याण,** बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपला अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

अनुदान क्र. एक्स - १ सामाजिक सुरक्षा व पोषण आहार

(रूपये हजारात)

१०.२ मुख्य लेखाशीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण २२३६ पोषण आहार २०१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम				
मूळ	८,१२,३८,२७	१०,१२,९५,८०	९,२०,२०,७२	(-) ९२,७५,०८
पूरक	२,००,५७,५३			
या वर्षात प्रत्यार्पित तरतूद (मार्च २००८)				४३,९७,०५

टिपा व भाष्ये - रू.९२,७५.०८ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, मार्च २००८ मध्ये केवळ रू.४३९७०५ लाख एवढी रक्कम प्रत्यार्पणासाठी अपेक्षित होती. रू.९२,७५.०८ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, रू.२००.५७.५३ लाखांची पूरक तरतूद अत्याधिक सिद्ध झाले.

१०.३ ज्ञापन :

या मागणीखाली एकुण मंजूर तरतुदीपे्क्षा कमी खर्च झालेला आहे. बचत खर्चाची टक्केवारी ९.१ इतकी येते. या विभागाच्या सर्व योजना आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून राबविण्यात येतात व या सर्व योजनांचा निधी त्यांचेकडून क्षेत्रिय अधिकारी व संस्था यांना वितरीत केला जातो व त्यावर नियंत्रण ठेवले जाते.

वर्षामध्ये अधिक तरतूदीची गरज भासल्यास उपशिर्षनिहाय विचार केला जातो व त्यानुसार उपशीर्षनिहाय पूरक अनुदान घेतले जाते. मुख्यलेखाशीर्ष व मागणी खालील एकुण अनुदानाच्या बचती या वर्षाच्या शेवटी लक्षात येतात.

या मागणीखालील मुख्य लेखाशीर्षा खालील काही उपशिर्षामध्ये कमी/अधिक खर्च झालेला आहे. त्यबाबतची कारणे सोबतच्या विवरणपत्रात नमूद केली आहेत.

(रूपये लाखांत)

१०.४ मुख्य लेखाशीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०२-समाज कल्याण १०३- महिला कल्याण १०३(०१)(०१) स्वागत केंद्रे व राज्यगृहे व संरक्षणगृहे.				
मूळ तरतूद	४,०३.७०	४,००.०९	३,८८.८४	(-) ११.२५
पूरक	५.१७			
पुनर्वि	(-) ८.७८			

१०.५ ज्ञापन :

प्रस्तुत योजने अंतर्गत २२ शासकिय महिला संस्था कार्यरत असून या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वेतन, प्रवास, कार्या.खर्च, भाडेपट्टी व प्रवेशितांना आहार, सहा.अनुदान, इतर खर्च, सामुग्री पुरवठा या सारख्या विविध बाबीवर तरतूद उपलब्ध करून देण्यात येते. पदे रिक्त असल्यामुळे वेतना वरील खर्च कमी झाला असून बचत झाली आहे. बचतीची टक्केवारी २.८१% इतकी येते.

(रूपये लाखांत)

१०.६ मुख्य लेखाशीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०२-समाज कल्याण १०३-महिला कल्याण १०३(०३) (०२) महिला मंडळांना अनुदान				
मूळ	१,०४.०३			
पुनर्विनियोजन	(-) १४.७२	८९.३१	८५.८५	(-) ३.४६

१०.७ ज्ञापन :

महिला मंडळांच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना व्यवसायिक प्रशिक्षण उदा.टायपिंग, शिलाई, संगणक ब्युटीपार्लर या सारखे व्यवसाईक प्रशिक्षण देण्यात येते. ३० महिलांच्य एका सहामाही सत्रासाठी रू.२१५००/- इतके अनुदान व संपुर्ण वर्षासाठी रू.४३०००/- अनुदान दिले जाते. हि योजना जिमबाविअ मार्फत राबविली जाते त्या कालावधीमध्ये काही प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण कार्यक्रम न राबविल्यामुळे बचत झाली. बचतीची टक्केवारी ३.८७% इतकी येते.

(रुपये लाखांत)

१०.८ मुख्य लेखाशीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०२ समाज कल्याण १०३ महिला कल्याण १०३(१८)(०१) पंच वार्षिक योजनांतर्गत योजना- केंद्र पुरस्कृत योजना, स्वयंसिद्धा योजना				
मूळ	१०.००	१०.००	--	१०.००

रुपये १० लाखांची संपूर्ण तरतूद ही वापरण्यातही आली नाही तसेच परतही करण्यात आली नाही. रूपये १० लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

१०.९ ज्ञापन :

सदर योजना केंद्र शासनाची असून त्यांचेकडून निधी प्राप्त न झाल्याने सदर तरतूद खर्च करण्यात आली नाही.

(रुपये लाखांत)

१०.११ मुख्य लेखाशीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०२ - समाज कल्याण १०३ - महिला कल्याण (०७)(०२) स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना वैयक्तिक व्यावसायिक आर्थिक सहाय्य विशेष घटक योजना (२२३५-३२४८)				
मूळ	१,१८.००			
पुनर्विनियोजन	(-) ३०.७८	८७.२२	८१.०६	६.१६

(एक) लाभधारकांकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे, मार्च, २००८ मध्ये उपरोक्त उपशीर्षाखाली रुपये ८०.७८ लाखांची अपेक्षित बचत प्रत्यार्पित करण्यात आली.

१०.१२ ज्ञापन :-

निराधार निराश्रित महिलांना स्वत:चा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.५००/- इतके अनुदान एकदाच देण्यात येते. सदरची योजना अनुसूचित जाती उपयोजन अंतर्गत राबविण्यात येते. लाभार्थी कमी असल्याने बचत झाली आहे. लाभधारकाकडुन प्रस्ताव प्राप्त न झाल्याने ३०७८ हजाराची बचत मुळ अनुदानातुल प्रत्यार्पित करणेत आली. बचतिची टक्केवारी ७.०६ % इतकी येते.

(रुपये लाखांत)

१०.१३ मुख्य लेखाशीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०२ - समाज कल्याण १०३ - महिला कल्याण १०३(०६)(०२) विविध व्यवसायभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन विशेष घटक योजना				
मूळ पुनर्विनियोजन	३६.४७ (-) २३.७०	१२.७७	१०.२४	(-) २.५३

(एक) लाभधारकांकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे,(रुपये १७.७० लाख) आणि (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न दिल्यामुळे (रुपये ६ लाख), मार्च, २००८ मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रुपये २३.७० लाखांचा निधी काढण्यात आला.

१०.१४ ज्ञापन-

ब्युटी पार्लर, शिवण प्रशिक्षण, टापपिंग, यासारखे व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना दरमहा रु.१००/- प्रमाणे दहा महिन्यसाठी रु.१०००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदरची योजना अनुसूचित जाती उपयोजन अंतर्गत सुरु आहे. लाभार्थी कमी असल्यामुळे बचत झाली आहे. लाभधारकाकडुन प्रस्ताव प्राप्त न झाल्याने मुळ अनुदानातुन २३७० हजाराचा निधी मार्च, २००८ मध्ये प्रत्यार्पित केला.

(रुपये लाखांत)

१०.१५ मुख्य लेखाशीर्ष			एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)			(२)	(३)	(४)
०२ - समाज कल्याण १०३ - महिला कल्याण १०३(१५)(०३) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने					
मूळ		४,४६.१९			
पुनर्विनियोजन	(-)	७७.५७	३,६८.६२	३,२१.९९	(-) ४६.६३

(एक) जिल्हा परिषदांकडून अपेक्षे पेक्षा कमी खर्च झाल्यामुळे, रुपये ६७.८२ लाख) आणि (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न दिल्यामुळे (रुपये ९.७५ लाख), मार्च, २००८ मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ७७.५७ लाखांचा निधी काढण्यात आला.

रुपये ४६.६३ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

१०.१६ ज्ञापन -

जिल्हा परिषदेमधील महिला व बाल कल्याण समितीच्या शासनाने ठरवून दिलेल्या वस्तुरुपात सहाय्य देण्याबाबतच्या योजनांनुसार योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रती प्रवेशिता रु.२५००/- इतके अनुदान देण्यात येते. सदरची योजना अनुसूचित जाती उपयोजन अंतर्गत सुरु आहे. लाभार्थी संख्या कमी असल्याने बचत झाली आहे. जिल्हा परिषदांकडून अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्याने मार्च २००८ मध्ये ७७५७ हजाराचा निधी मुळ अनुदानातुन प्रत्यार्पित करणेत आला. बचतिची टक्केवारी १२.६४ % इतकी येते.

(रुपये लाखांत)

१०.१७ मुख्य लेखाशीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०२ - समाज कल्याण १०३ - बाल कल्याण १०३(०१)(०४) बाल न्याय अधिनियमाखाली शासन प्रमाणित गृहे व सुधारगृहे सुरु करणे व त्याचे परिक्षण				
मूळ	११,०९.९३	११,०९.९३	९,९१.०७	(-) १,१८.८६

१०.१८ ज्ञापन-

सदर शीर्षाखाली शासकिय बालगृहे, निरिक्षणगृहे, अनुरक्षणगृहे (पुरुष राज्यगृह) अशा एकूण ४३ शासकिय संस्था आहेत. सदर संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वेतनावर व वेतनेतर करीता (सामुग्री पुरवठा, इतर खर्च, आहार, कार्या, भाडेपट्टी इ. बाबींवर) तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते. रिक्त पदे असल्यामुळे वेतनावरील खर्चात बचत झाली आहे. बचतिची टक्केवारी १०.७०% इतकी येते.

(रुपये लाखांत)

१०.१९ मुख्य लेखाशीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)		(२)	(३)	(४)
०२ समाज कल्याण १०२ बाल कल्याण १०२(१०)(०२) कल्याण न्याय कार्यक्रम				
मूळ	५,००.००			
पूरक	२,४६.८५			
पुनर्विनियोजन	१,००.००	८,४६.८५	८,६८.८०	(+) २१.९५

कोणतीही विनिर्दीष्ट कारण न देता, मार्च २००८ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रुपये ३२६.८६ लाख इतक्या अतिरिक्त नीधीची तरतूद करण्यात आली. रुपये ६१.७३ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ठ २००८)

१०.२० ज्ञापन :-

केंद्र पुरस्कृत योजना असून या योजने अतर्गत बालगृहे, अनुरक्षणगृहे या निवासी संस्था असून अशा निवासी सर्वसाधारण प्रवेशितांच्या संस्थाना रु.९५० या दराने दरमहा दरडोई सहाय्यक अनुदान दिले जाते. एडसग्रस्त व मतीमंदासाठीच्या संस्थाना रु.११४० या दराने सहाय्यक अनुदान दिले जाते. व अनिवासी बाल संगोपन योजनेमध्ये रु.४२५/- दरमहा दरडोई दिले जाते. लाभार्थी संस्थेत वाढ झाल्यामुळे जादा खर्च झाला आहे.

(रुपये लाखांत)

१०.२१ मुख्य लेखाशीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०२ समाज कल्याण १०३ महिला कल्याण १०३(०७)(०१) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना स्वंयरोजगार योजनेखाली महिलांना वयाक्तिक व्यवसायिक आर्थिक सहाय्य			
मूळ पुनर्विनियोजन	३१.३४	३८.४९	(+) ७.१५

१०.२२ ज्ञापन :-

निराधार निराश्रित दारीद्ररेषेखालील कुटुंबातील महिनांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी रु.५००/- इतके अनुदान एकदाच देण्यात येते. लाभार्थी संख्या वाढल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे.

(रुपये लाखांत)

१०.२३ मुख्य लेखाशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण १०१ विशेष पोषण आहार कार्यक्रम १०१(०५)(०२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (राज्य आयोग पोषण निधीतून भागविलेली रक्कम)			
मुळ पुरक	४८,००.४०	४३,५२.५३	(-) ४,४७.८७

१०.२४ ज्ञापन :-

बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडून नवीन अंगणवड्या सुरू करण्याबाबतची प्रक्रिया वेळेत सुरू न झाल्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनिस यांचे मानधन तसेच आहार खर्चावरील तरतुदी मध्ये बचत झाली आहे. बचतीची टक्केवारी ९ % इतकी आहे.

साक्ष :-

१०.२५ दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२, दिनांक २ जानेवारी, २०१३, दिनांक २० व २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी पोषण आहारासंबंधी तसेच चेंबूर येथिल भिक्षेकरी गृहाच्या बीओटी तत्वावरील बांधकामासंबंधी समितीस माहिती दिली. विभागीय सचिवांनी समितीला असे सांगितले की, सबला योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा पुरवठा बंद केला आहे. आता त्या ऐवजी स्थानिक महिला मंडळ, तसेच महिला बचत गटांद्वारे ताजा शिजवलेला पोषण आहार पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहेत. महाराष्ट्रात टीएचआर योजना जुलै, २०१० पासून सुरु झाली. टीएचआर योजनेतंर्गत खाद्यपदार्थ मुख्यतः ६ महिने ते ३ वर्षे वयोगटांतील बालकांसाठी दिले जातात. परंतु सबला योजनेतंर्गत वयोगटाची मर्यादा जास्त आहे. त्यांच्यासाठी टीएचआर योजनेतंर्गत

खाद्यपदार्थ देण्याची आवश्यकता नाही. त्यांना मायक्रो फोर्टीफाईड डेन्स फुड देण्यात येते. हॉट कुक मीलमधून त्यांना आवश्यक ते प्रोटीन्स व कॅलरीज मिळू शकतात.

१०.२६ या खाद्यपदार्थांची शासनाच्या लॅब्रोटरीमध्ये तपासणी झाली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात अभिलेख तपासून घेतल्यानंतर माहिती देता येईल. रॅडम सॅम्पलिंगची तपासणी करण्यासाठी आयुक्तांना सांगितलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.२७ परंतु शासनाच्या प्रयोगशाळेत खाद्यपदार्थांची तपासणी केल्यानंतर सदर खाद्यपदार्थ निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर योजना फेल झाली आहे. शासनाच्या प्रयोगशाळेत खाद्यपदार्थांच्या वेळोवेळी केलेल्या सर्व चाचण्यांचा सविस्तर अहवाल समितीकडे सादर करावा असे निदेश समितीने विभागाला दिले असता शासनाच्या प्रयोगशाळेत खाद्यपदार्थाच्या वेळोवेळी केलेल्या चाचण्याचा सविस्तर अहवालासंदर्भात लेखी माहिती विभागाकडून पुढील प्रमाणे प्राप्त झाली आहे.

१०.२८ " शासनाचे पत्र क्र.एबावि २०१२/प्र.क्र.४७०/का.५, दि.२४/१/२०१३ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार आयुक्तालयाचे पत्र क्र.३४४,दि.१/२/२०१३ अन्वये विभागीय उप आयुक्त (६ महसुली विभाग) महिला व बाल विकास तसेच उप मुख्य कार्यकारी (बाक) जिल्हा परिषद यांना टीएचआर आहाराची नियमित तपासणी सरकारी व NABL लॅब मार्फत करणेबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१०.२९ तसेच आयुक्तालयाचे पत्र क्र.२८५३ दि.७/१२/२०१२ अन्वये उप मुख्य कार्यकारी (बाक) व विभागीय उप आयुक्त यांना दुसऱ्या जिल्हयातील अंगणवाडयांना भेट देऊन तेथील टीएचआर आहाराचे नमुने घेऊन NABL लॅब मार्फत तपासणी करणेबाबत सूचित केलेले आहेत. त्यानुसार बऱ्याच जिल्हयांकडून टीएचआर आहाराचे नमुने कोडींग करुन लॅबला पाठविण्यात आलेले असल्याचे कळविण्यात आलेले आहेत. सोबत पत्रे जोडलेली आहेत. **(विवरण क्र.____)**

१०.३० तसेच आयुक्तालयाने यापूर्वी देखील टीएचआर आहाराची वेळोवेळी तपासणी करुन घेणेबाबत कळविण्यात आले आहे. EOI व करारनाम्यानुसार टीएचआर आहाराचा पुरवठयापूर्वी टीएचआर आहार नमुन्यांची तपासणी NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून

तपासणी करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सदर प्रयोगशाळा अहवाल यांना कळविण्यात आले आहे. शासकीय अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) भंडारा यांचेकडील पत्रानुसार ज्या ठिकाणी प्लॅकस्टकचे तुकडे आढळले आहेत. त्या ठिकाणचा आहार बदलून देण्यात आलेला आहे.

१०.३१ मानवी दृष्टया खाण्यास योग्य आहे किंवा नाही याची बाल विकास प्रकल्प अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खात्री केली जाते. तद्नंतरच देयके अदा करण्याची कार्यवाही केली जाते."

१०.३२ तसेच विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, २ - ३ ठिकाणांहून खाद्यपदार्थांमध्ये १० ते १५ टक्के कमी कॅलरी आढळून आल्यासंबंधीचा अहवाल विभागाकडे प्राप्त झाला आहे. टीएचआर सॅम्पल किती फैल झाले याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालील प्रमाणे आहे :

१०.३३ "याबाबत सादर करण्यात येते की, EOI व करारनाम्यानुसार टीएचआर आहाराचा पुरवठयापूर्वी टीएचआर आहार नमुन्यांची तपासणी NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सदर प्रयोगशाळा अहवाल मानवी दृष्टया खाण्यास योग्य आहे किंवा नाही याची बाल विकास प्रकल्प अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खात्री केली जाते.तद्नंतरच देयके अदा करण्याची कार्यवाही केली जाते.

१०.३४ टीएचआर चा पुरवठा झाल्यानंतर काही तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत चौकशी करुन THR आहाराचे नमुने अचानक तपासणीकरिता NABL किंवा शासकीय प्रयोगशाळेत पाठविले जातात. त्यावेळेस जर अहवाल मानवी दृष्टया खाण्यास योग्य नसल्यास EOI व करारनाम्यातील अटी शर्तीनुसार संबंधित संस्थेकडून आहार बदलून घेण्यात येतो व दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. याबाबत भंडारा जिल्हयातील सुखडी या आहारामध्ये प्लॅस्टीक तुकडे आढळल्याबाबत शासकीय अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर बाबत या कार्यालयाचे पत्र क्र.४३१ दि.१२/२/२०१३ अन्वये दंड आकारण्याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) जि.प.भंडारा यांना कळविण्यात आले आहे. शासकीय अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच उप मुख्य

कार्यकारी अधिकारी (बा.क.) भंडारा यांचेकडील पत्रानुसार ज्या ठिकाणी प्लॅक्स्टकचे तुकडे आढळले आहेत त्या ठिकाणचा आहार बदलून देण्यात आलेला आहे."

१०.३५ सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील मुले प्रत्येक दिवशी अंगणवाड्यांमध्ये जात नाहीत. त्यांना अशा प्रकारे पॅकेटमध्ये खाद्य दिले पाहिजे. त्यात काही कॅलरीज व प्रोटीन असायला पाहिजे या संबंधी काही निकष आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले असता अनेक अंगणवाड्यांमध्ये निकृष्ट दर्जाचे फूड दिले जाते. ते जनावरे सुध्दा खात नाहीत अशी परिस्थिती आहे असे मत समितीने व्यक्त केले.

१०.३६ समितीने पुढे अशी विचारणा केली की, आता ११ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना शिजवलेले अन्न देण्यात येते. अशा परिस्थितीत टीएचआर योजना बंद करुन शिजवलेले अन्न देणे का सुरु केले याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, टीएचआर हा तात्पूरत्या स्वरुपात देण्यात आला होता. या योजनेचे डिसेंट्रलाईझेशन करण्याचा शासनाचा विचार आहे. हॉट कूक मिल्क संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, स्थानिक बचत गट कुकींगचे काम करतात. गावात माता समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. त्या समिती मार्फत खाद्य पदार्थांची गुणवत्ता तपासली जाते.

१०.३७ टीएचआर योजने अंतर्गत देण्यात येणारे धान्य खाण्यास योग्य नसते. ते धान्य जनावरे सुध्दा खात नाहीत, अशा प्रकारचे धान्य आपण लोकांना देतो. हे धान्य खाण्यास योग्य नसल्यामुळे जनतेच्या पैशाचा दुरुपयोग होत आहे. जी योजना सुरु करण्यात आली त्या योजनेचा जर लोकांना फायदा होत नसेल तर ती योजना का राबवायची अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टीएचआर योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेचे निकष कडक आहेत. राज्यात जवळपास ९० हजार अंगणवाड्या आहेत. यापैकी काही अंगणवाड्यांकडून तक्रारी आलेल्या आहेत. परंतु तक्रारींचे प्रमाण खूप कमी आहे. खाद्य पदार्थांची तांत्रिक चाचणी करुन ते निकषाप्रमाणे आहेत किंवा नाही याची छाननी करता येते.

१०.३८ युनिसेफ संस्था व केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून सन २००५ मध्ये एनएफएचएस-३ सर्वे करण्यात आला होता. मागील वर्षी देखील अशा प्रकारचा सर्वे करण्यात आला होता. त्यावेळी ० ते २ वयोगटातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात

आली होती. त्या तपासणीमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी आढळून आले होते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१०.३९ कुपोषणासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, मेळघाटमध्ये आणि गोंदिया, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. यावर युनिसेफ संस्था व केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून सन २००५ मध्ये एनएफएचएस-३ सर्वेचा अहवाल ५९० पेजेसचा आहे. त्याबाबतची माहिती www.rchiips.org/NFHS या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच २०१२ मध्ये झालेले Infant and Child Mortality vkf.k Nutrition And Anaemia चा रिपोर्ट सोबत जोडलेला आहे. **(विवरण क्र._____)**

१०.४० जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत महिला मंडळांच्या प्रशिक्षण केंद्रांमधील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी तसेच काही प्रशिक्षण केंद्रांनी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला नाही याबाबची कारणे काय आहेत? याबाबत माहिती देतना विभागाकडून सांगण्यात आले की, महिला मंडळांच्या प्रशिक्षण केंद्रांना अनुदान या योजने अंतर्गत राज्यात एकूण २५९ केंद्र कार्यरत आहेत. या योजने अंतर्गत महिला मंडळांच्या प्रशिक्षण केंद्रांना मान्यता देण्यात येते. यामध्ये ३० महिलांच्या सहा महिन्यांच्या एक प्रशिक्षण कालावधी असे वर्षात दोन कालावधी (एप्रिल ते सप्टेंबर व ऑक्टोबर ते मार्च) होतात. एका कालावधीसाठी रु.२१५००/- प्रमाणे दोन कालावधीसाठी एकूण रु.४३०००/-अनुदान देण्यात येते. आयुक्तालयाकडून जिल्हयामध्ये असलेल्या प्रशिक्षण केंद्रांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत तरतूद देण्यात येते. प्रशिक्षण केंद्राचा एक सहामाही कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्याचे मूल्यमापन करुन संस्थेस रु.२१५००/- च्या प्रमाणात अनुदान देण्यात येते. वर्षातून दोन वेळा हे अनुदान देण्यात येते. प्रत्येक वर्षी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये दोन सत्रे घेतली जातातच असे नाही. काही प्रशिक्षण केंद्रांना पुरेशा प्रवेशिता मिळाल्या नाहीत किंवा त्या महिला मंडळांच्या अन्य तांत्रिक अडचणी उदा. प्रशिक्षक उपलब्ध नसणे, प्रशिक्षणा करीताची सामुग्री, जागेची अडचण, या बरोबरच या केंद्रांमधील निदेशकांना अल्प मानधन, जागेच्या भाडयापोटी योजनेमधून देण्यात येणारे अल्प अनुदान या कारणांमुळे प्रत्येक वर्षी दोन सत्रे होतातच असे नाही.

१०.४१ जिल्हा पातळीवर सामूहिक विवाह योजना सुरु झाली आहे, त्यासाठी डीपीडीसीकडून निधी दिला जातो. परंतु सदर योजनेतंर्गत यापूर्वीची किती रकमेची थकबाकी आहे.या योजनेतंर्गत जिल्हानिहाय किती रक्कम देण्याचे बाकी आहे ? याबाबतची माहिती समितीस नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

१) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०११/प्र.क्र. ९३/का-२/दि.३० सप्टेंबर २०११, चे शासन निर्णयानुसार, योजना , जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्याचा निर्णय झालेला आहे. योजना डि.पी.डि.सी कडे वर्ग होण्यापूर्वीच्या प्रस्तावांकरीताची, जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेली प्रलंबित अनुदान मागणी आर्थिक वर्षात, वेळोवेळी, सादर करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आयुक्तालयाचे .लोकलेखा समितीस, योजनेअंतर्गतची प्रलंबित अनुदानाची मागणी सादर करणेसाठी, जिल्हा कार्यालयांकडून, प्रलबित अनुदानाची सुधारित मागणी प्राप्त करुन घेण्यात आली.

२) या योजनेअंतर्गत , जिल्हानिहाय किती रक्कम देण्याची बाकी आहे, याचे विवरणपत्र सोबत सादर करण्यात येत आहे. यात

अ) १०० संख्येच्या मर्यादेतील विवाह सोहळयाचे व वर्षात दोन पेक्षा अधिक विवाह सोहळयांचे आयोजन न केलेल्या संस्थाचे, प्रस्तावांकरीताचे जिल्हानिहाय प्रलंबित रकमा

ब) १०० पेक्षा अधिक विवाहांचे आयोजन केलेले विवाह सोहळयाचे व वर्षात दोन पेक्षा अधिक विवाह सोहळयांचे आयोजन केलेल्या संस्थांचे प्रस्तावांकरीताचे, जिल्हानिहाय प्रलंबित रकमा

असे दोन स्वतंत्र तपशिल देण्यात येऊन, एकूण प्रलंबित रकमांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र सादर करण्यात येत आहे. यानुसार, योजना जिल्हा नियोजन समितीकडे वर्ग होण्यापूर्वीची एकूण प्रलंबित रक्कम रु. ९,२१,००,०००/- इतकी आहे.

३) सन २०१०-११ मध्ये सादर केलेली रक्कम रु.१४,८९,५६,०००/- ची पूरक मागणी मंजूर न झाल्याने, माहे मार्च २०११ अखेरच्या प्रलंबित अनुदानासाठी, सन २०११-१२ मध्ये, परिपूर्ण १५८३९ प्रस्तावांकरीता रु. १९००.६८ हजार इतक्या रकमेचा पूरक मागणी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता.

४) तथापी वित्त विभागाचे सूचनांनुसार, शासनाचे दि.२/६/२०११ चे पत्रानुसार, १०० पेक्षा अधिक सामुहिक विवाह असलेल्या प्रस्तावांचा व वर्षातून दोन पेक्षा अधिक वेळा सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजन केलेल्या संस्थांचा, पूरक मागणी प्रस्तावात अंतर्भाव न करता, १३६४६ प्रलंबित विवाहांकरीता सुधारित रक्कम रु.१६३७.५२ हजार चा पूरक मागणी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यापैकी, रु.१०.०० कोटीची पूरक मागणी मंजूर झाली. त्यामुळे रु.६३७.५२ हजार रुपयांची मागणी प्रलंबित राहिली.

५) सन ११-१२ पासुन, अनुदानाची मागणी सादर करताना, सुधारित निकषानुसार, म्हणजे, १०० संख्येच्या मर्यादेतील विवाह सोहळे व वर्षात दोन पेक्षा अधिक विवाह सोहळयांचे आयोजन न केलेल्या संस्थाचे, प्रस्ताव विचारात घेऊनच मागणी सादर करण्याच्या वित्त विभागाच्या सूचना प्राप्त.

६) दि.३० सप्टेंबर २०११ पूर्वीच्या, १०० संख्येच्या मर्यादेत व वर्षात दोनच विवाह सोहळे आयोजित केलेल्या संस्थांचे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांकरीता, जिल्हयांनी केलेल्या आठमाही मागणीनुसार, रु.४,४८,४८,०००/- इतकी एकूण सुधारित मागणी आठमाही सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. सोबत योजनेअंतर्गतचे, जिल्हानिहाय प्रलंबित अनुदानाच्या रकमा दर्शविणारे विवरणपत्र सादर करण्यात येत आहे." **(विवरण क्र._____)**

१०.४२ मुलींच्या सामूहिक विवाह सोहळा आयोजनासाठी संबंधित स्वयंसेवी संस्थेला एक हजार रुपये आणि मुलीच्या वडिलांना दहा हजार रुपये दिले जातात. परंतु २-३ वर्षांपासून शासनाकडून निधीचे वाटप झालेले नाही. शासनाने महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी त्यांच्या मुलांच्या विवाहाकरिता अनुदान देण्यासंबंधी धोरण ठरविले होते. या अनुषंगाने ज्या स्वयंसेवी संस्थांकडून सामूहिक विवाहांचे कार्य केले जाते त्यांना २ हजार रुपये अनुदान द्यावयास पाहिजे होते. तसेच लाभार्थ्यांना देखील शासनाने आश्वासन दिले होते. त्या बाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पात्र असलेल्या लाभार्थ्यांना पूर्ण पैसे दिले जाणार आहेत. त्याबाबत आढावा घेऊन तरतूद केली जात आहे.

१०.४३ मागील ३ वर्षांपासून लाभार्थ्यांना अनुदानाचे पैसे मिळालेले नाहीत. आता जिल्हा पातळीवर डीपीडीसीकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो. परंतु तो देखील अपुरा

आहे. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने या योजनेला तातडीने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जिल्हानिहाय तरतूद करुन तातडीने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात आढावा घेतला जाईल.

१०.४४ विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना आळा घालण्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये सामूहिक विवाह सोहळ्याची योजना सुरु करण्यात आली होती. सध्याच्या परिस्थितीत त्या जिल्ह्यांमध्ये सदर योजना सुरु आहे का ? यावर विदर्भातील शेतकऱ्यांना अत्महत्यांना आळा घालण्यासाठी विदर्भातील अमरावती,अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्हयांमध्ये ही योजना सन २००५-०६ मधे माहे फेब्रुवारी २००६ पासून सुरु झाली असून आता पर्यंत या योजनेचा लाभ ६७०१६ इतक्या जोडप्यांनी घेतला आहे. तसेच शासनाने ही योजना संपूर्ण राज्यासाठी सुरु केली आहे. पूर्वी मुलींच्या सामूहिक विवाह सोहळा आयोजनासाठी संस्थेला एक हजार रुपये दिले जात होते. आता त्यात दोन हजार रुपयांपर्यंत वाढ केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.४५ वाशिम जिल्ह्यात या योजनेतंर्गत दोन वर्षांपासून शासनाकडून पैसे मिळालेले नाहीत. संबंधित विभागाकडून शासन निर्णयांमध्ये वारंवार बदल केले जात असल्यामुळे लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणली.

१०.४६ स्वयंसिध्दा योजनेस केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत तसेच या योजनेसाठी केलेली रु.१०.०० लाखाची तरतूद का वापरण्यात आली नाही ती परत न करण्याची कारणे काय आहेत? याबाबत समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली असता यावर केंद्र शासन पुरस्कृत स्वयंसिध्दा योजना सन २००६-०७ पर्यंत कार्यान्वीत होती. या योजनेसाठी मार्च- २००७ अखेर रु. ५८९ लाख प्राप्त झाले होते. केंद्रशासनाने या योजनेस ३१ मार्च, २००८ अखेर एक वर्षाची मुदतवाढ दिलेली होती. त्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळाने सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी रु. ३२.५० लाख अनुदानाची मागणी केली होती. त्यापैकी शासनाने सन २००७-०८ च्या व्हाईट बुक मध्ये २२३५-२५४६ या लेखाशिर्षाखाली

केंद्रपुरस्कृत स्वयंसिध्दा योजना यासाठी रु. १०.०० लाख तरतूद केली होती. परंतू केंद्र शासनाने ही रक्कम राज्य शासनाकडे पाठविली नाही. त्यामुळे राज्यशासनाने रु. १०.०० लाख ही तरतूद महिला आर्थिक विकास महामंडळाला वितरीत केली नाही. स्वयंसिध्दा योजनेच्या वाढीव सन २००७-०८ च्या शेवटच्या वर्षाच्या दि. १९ व २० फेब्रुवारी, २००८ रोजी आग्रा उत्तर प्रदेश येथे केंद्र शासनाने घेतलेल्या आढावा बैठकीत महिला आर्थिक विकास महामंडळाला मार्च-२००७ अखेर मिळालेल्या रु. ५८९ लाख या अनुदाना व्यतिरिक्त सन २००७-०८ साठी कोणत्याही प्रकारची जास्तीची तरतूद मंजुर करण्यात येणार नाही असे केंद्रशासनाने स्पष्ट केलेले होते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली. तसेच यासंदर्भात माहिती देताना उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांनी समितीस सांगितले की, महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत राज्यात १९ जिल्ह्यातील ३६ तालुक्यात ही योजना राबविण्यात आली होती. गाव समिती, तालुका समितीच्या माध्यमातून महिला बचत गटांचे महासंघात रुपांतर करायचे होते. परंतु आता ही योजना बंद झालेली आहे.

१०.४७ अंगणवाडीच्या इमारतीच्या बांधकामासाठी निधीची तरतूद कशा प्रकारे केली जाते याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अंगणवाडीच्या इमारतीच्या बांधकामासाठी नाबार्डकडून काही पैसे घेण्यात आले होते. तसेच, यासाठी डीपीडीसीचे फंडींग आहे, ह्युमन डेव्हलपमेंट कमिशनकडून देखील पैसे घेतले जातात. अंगणवाडीच्या इमारतीच्या बांधकामाची जेवढी मागणी असते ती मागणी निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. राज्याच्या फंडातून निधीच्या उपलब्धतेनुसार ही मागणी पूर्ण करण्यात येते.

१०.४८ महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्थापन करण्यात आलेल्या बचत गटाची माहिती देताना विभागाकडून सांगण्यात आले की, महिला आर्थिक विकास महामंडळ इफाड मार्फत स्पॉन्सर केलेला तेजस्वीनी नावाचा मेजर प्रोजेक्ट राबवित आहे. ६२ हजार बचत गट तयार करुन त्यांचे बँकेबरोबर लिंकअप करायचे आणि त्या बचत गटांनी उद्योग सुरु करायचे, असे या योजनेचे उद्दिष्ट आहे. आता पर्यंत राज्यात ६२ हजार बचत गट तयार झालेले आहेत आणि यामध्ये जवळ जवळ ३३ जिल्ह्यातील १० हजार गावांचा समावेश आहे.

१०.४९ आर्थिक प्रोत्साहन दिल्यानंतर किती बचत गटांनी उद्योग सुरु केलेले आहेत ? ग्रामिण भागात एकही बचत गट आर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्याचे दिसत नाही. भंडारा जिल्ह्यातील बचत गटांना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत कोणती मदत करण्यात आलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात जिल्हानिहाय माहिती उपलब्ध नसल्यामुळे सदर माहिती समितीस सादर करण्याचे निदेश दिले असता अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे.

१०.५० ज्या उद्देशाने बचत गटांची निर्मिती करण्यात आली तो उद्देश सफल झालेला आहे काय ? याबाबत जवळपास ३३ टक्के बचत गट बँकांशी लिंकअप झालेले आहेत. या प्रोजेक्टची मुदत सन २०१५ पर्यंत आहे अशी माहिती विभागाकडून समितीस देण्यात आली. याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली अधिक माहिती पुढील प्रमाणे आहे :

१०.५१ माविमने स्थापन केलेल्या एकूण ६५०३८ बचत गटांपैकी एकूण ४९९६७ गटांना रु.४३९.०० कोटी इतक्या रकमेचे कर्ज बँकांकडून प्राप्त झालेले आहे. थोडक्यात एकूण ७५ टक्के गटांना बँक कर्ज प्राप्त झालेले आहे. उर्वरित गटांपैकी काही गटांचे प्रस्ताव बँकांकडे प्रलंबित आहेत. तर काही गट नवीन आहेत. गटांना रिपीट बँक कर्ज मिळण्याचे प्रश्न मोठया प्रमाणावर असून, याकरिता माविममार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. उदा. SBI & ICICI सोबत समझोता करार करण्यात आलेला आहे.

१०.५२ महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत ६२ हजार बचत गट तयार करण्यात आले आहेत. त्या बचत गटांना मार्केट उपलब्ध करुन देण्यासाठी विभागाकडून प्रयत्न केलेले आहेत काय ? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महिला आर्थिक विकास महामंडळ मार्केटींगचा अभ्यास करण्यास सुरुवात केलेली आहे. प्रथम संस्थेची उभारणी करावी लागते. आम्ही ३१५ सीएमआरसी निर्माण केलेले आहेत. आता अडीच लाख महिला उद्योग करीत आहेत. बचत गटांसाठी बऱ्याच प्रमाणात लोकल मार्केट उपलब्ध आहे. आम्ही मार्केटींगसाठी प्रयत्न करीत आहोत. बचत गटांनी मोठ्या फेडरेशन बरोबर टायअप करावयास पाहिजे. पुढील दोन वर्षात यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

१०.५३ परंतु बचत गटाच्या बाबतीत समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, केवळ सेवाभावी संस्थांना पोसण्यासाठी बचत गट निर्माण करण्यात आलेले आहेत, बचत गटांचे

सक्षमीकरण झालेले नाही. राज्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्याचे काम तीन बचत गटांना देण्यात आलेले आहे परंतु काम करणारे लोक वेगळे पण नाव मात्र दुसऱ्याचे होते. त्यामुळे दुरुपयोग होत आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सुप्रिम कोर्टाने सन २००० मध्ये आदेश दिले होते. गाव पातळीवर अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना बचत गटामार्फत पोषण आहार देण्यात यावा, अशी मोहीम हाती घेतली होती. This Scheme is No.1 in Maharashtra in converting maximum number of villages into Self Help Groups. जिल्हा पातळीवरील, तालुका पातळीवरील लोक धान्याचा पुरवठा करतात. त्यामुळे तो पैसा जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर जातो. गाव पातळीवरील बचत गटांनी धान्याचा पुरवठा केला तर खेळते भांडवल गावामध्ये राहील. बचत गटांमार्फत अंगणवाडीला धान्य पुरवठा करण्याबाबतची शासनाची योजना आहे. ती योजना थोडी मागे पडलेली आहे. ती योजना पुनर्जीवित करण्याचा विभागाचा हेतू आहे. काही ठिकाणचे बचत गट बंद पडलेले आहेत, ते पुनर्जीवित करण्याचे ही प्रयत्न चालू आहे.

१०.५४ गावातील बचत गटांना काम दिले पाहिजे, परंतु बचत गटांना तीन-चार महिने वेतन मिळत नाही. त्यामुळे काही बचत गटांनी काम करणे बंद केलेले आहे. आता डिसेन्ट्रलाईज करुन शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्याचे काम दोन-तीन ठेकेदारांच्या बचत गटांना देण्यात आले आहे. बचत गटांना वेळेवर वेतन (पेमेंट) मिळाले पाहिजे. बचत गटांना वेळेवर वेतन (पेमेंट) मिळाले नाही तर ते पुन्हा फेल होतील असे समितीने सूचित केले.

१०.५५ शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्याचे काम एकच ठेकेदार करतो काय ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्याचे काम ठेकेदार करीत नाहीत.

१०.५६ स्वयंरोजगार योजने खाली महिलांना वैयक्तिक व्यावसायिक आर्थिक सहाय्य या विशेष घटक योजनेतील लाभधारकांकडून प्रस्ताव प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत तसेच सदर योजनेची प्रसिध्दी कशाप्रकारे करण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, स्वयंरोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील महिलांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.५००/- इतके अनुदान एकदाच देण्यात येते. सदरची योजना वैयक्तिक लाभाची योजना आहे. या मधील अटी, ती महिला दारिद्रय

रेषेखालील कुटुंबातील असावी, ती १५ वर्षापासून महाराष्ट्राची रहीवासी असावी तसेच विशेष घटक योजनेचा लाभ मिळण्यासाठी ती महिला मागासवर्गीय प्रवर्गातील असावी अशा अटी आहेत. ही योजना शासन निर्णय दि.२१.१०.८५ अन्वये सुरु झाली आहे. योजना सुरु होऊन २७ वर्षाचा कालावधी लोटला असून त्यामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. लाभाची रक्कम त्यावेळच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार निश्चित करण्यात आली आहे. आता २७ वर्षांनंतर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमधील बदलानुसार ही रक्कम फारच कमी आहे. त्यामुळे जरी या योजनेचा कितीही प्रसार व प्रचार केला तरीही पुरेसे लाभार्थी मिळणे शक्य होत नाही. योजनेच्या अटी व शर्तीनुसारची कागदपत्रे उदा. दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाचा दाखला, महाराष्ट्राचा रहीवासी दाखला, जातीचा दाखला, बॅकेमध्ये खाते उघडणे अशी कागदपत्रे जमविण्यासाठी आवश्यक असलेली नियमानुसारची कार्यवाही करण्याकरीता देखील त्यांच्याकडे रक्कम उपलब्ध होऊ शकत नाही आणि ती रक्कम उपलब्ध झालीच तर झालेल्या खर्चापेक्षाही लाभाची रक्कम कमी असते त्यामुळे लाभार्थींकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. विद्यावेतन रकमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

१०.५७ निराधार, निराश्रित, दारिद्र्य रेषेखालील महिलांना छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी ५०० रुपये अनुदान दिले जाते. ५०० रुपये अनुदान दिल्यानंतर किती महिलांनी छोटा व्यवसाय सुरु केलेला आहे ? याबाबत आकडेवारी समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. तसेच या योजनेकरीता एकूण १२२२६ इतके जास्त अर्ज प्राप्त होऊन त्या लाभार्थींना अनुदान देण्यात आल्यामुळे जादा खर्च झाला आहे. प्रामुख्याने सांगली, कोल्हापूर, जालना या जिल्हयांमध्ये योजनेला चांगला प्रतिसाद मिळून लाभार्थी संख्येत वाढ झाली आहे.

१०.५८ निराश्रित, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.५००/- इतके अनुदान एकदाच देण्यात येते. या अनुदानात वाढ करण्यात यावी किंवा हे अनुदान बंद तरी करण्यात यावे. कारण आज ५०० रुपयांमध्ये कोणताही छोटा व्ययवसाय सुरु करता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले विभागीय सचिवांनी सांगितले की, हे अनुदान वाढवून १० हजार रुपये करावे, असा प्रस्ताव विभागाने सादर केलेला आहे.

सदर अनुदान वाढवून १० हजार रुपये कसे करता येईल यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करावा अशी सुचना समितीने केली.

१०.५९ विविध व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन योजनेअंतर्गत आणि शासनाने ठरवून दिलेल्या वस्तुरुपात सहाय्य या अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत लाभार्थींची संख्या कमी होण्याची कारणांबाबत माहिती देताना विभागाकडून सांगण्यात आले की, विद्यावेतन योजनेअंतर्गत शासनमान्य व्यवसाय प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या महिला प्रवेशितांना दरमहा रु.१००/- या प्रमाणे जास्तीत जास्त दहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीसाठी एकूण रु.१०००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. लाभासाठीच्या अटी व शर्तींनुसार ती आर्थिकदृष्टया मागास कुटुंबातील असावी, तिला दुसऱ्या कोणत्याही संस्थेकडून विद्यावेतन मिळत नसावे, ती आर्थिकदृष्टया मागासवर्गीय कुटुंबातील असावी. व ती किमान ९ वी इयत्ता पास झालेली असावी. ही योजना शासन निर्णय दि.२१.१०.८५ अन्वये सुरु झाली आहे. लाभाची रक्कम त्या वेळच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार निश्चित करण्यात आली आहे. आता २७ वर्षांनंतर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती मधील बदलानुसार ही रक्कम फारच कमी आहे.योजनेच्या अटी नुसार अन्य संस्थांकडून लाभ मिळत नसावा अशी अट असल्यामुळे अन्य संस्थांकडून यापेक्षा जास्त लाभ मिळत असलेल्या महिला या योजनेचा लाभ घेण्यास उत्सुक नसतात.उदा. आयटी आय कडून या पेक्षा जास्त स्टायपेंड मिळतो. त्या मुळे जरी या योजनेचा कितीही प्रसार व प्रचार केला तरीही पुरेसे लाभार्थी मिळणे शक्य होत नाही. योजनेच्या अटी व शर्तीनुसारची कागदपत्रे उदा. दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाचा दाखला, महाराष्ट्राचा रहीवासी दाखला, जातीचा दाखला, बॅकेमध्ये खाते उघडणे अशी कागदपत्रे जमविण्यासाठी आवश्यक असलेली नियमानुसारची कार्यवाही करण्याकरीता देखील त्यांच्याकडे रक्कम उपलब्ध होऊ शकत नाही. आणि ती रक्कम उपलब्ध झालीच तर, झालेल्या खर्चापेक्षाही लाभाची रक्कम कमी असते त्यामुळे लाभार्थींकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही.

१०.६० महालेखाकारांनी समितीस सांगितले की, ग्रांट इन एड और युटीलाईजेशन सर्टीफिकेटच्या संदर्भात आज की तारीख में कुल ८८७ करोड़ रुपये के १६११६ युटीलाईजेशन सर्टीफिकेट प्रलंबित है. यदि इसको क्लीअर कर दिया जाएगा तो अकाऊंट ठीक हो जाएगा.

१०.६१ महिला व बाल विकास विभागाला काही बालकाश्रमांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत काय ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, छाननी मोहीम राबविली होती. तेव्हा १८६ बालकाश्रमात त्रुटी आढळून आल्या होत्या. त्या बालकाश्रमांची मान्यता रद्द केली आहे. सेवाभावी संस्थांमार्फत १,०७३ आणि शासनामार्फत ४६ बालकाश्रम चालविले जातात. यापैकी १८६ बालकाश्रमांची मान्यता रद्द केलेली आहे. तपासणी मोहीम सुरु ठेवलेली आहे. तसेच सदर बालकाश्रमांचे नियमित इन्स्पेक्शनही झाले पाहिजे असे ही विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.६२ महिला व बाल विकास विभागाला १८६ बालकाश्रमांमध्ये आढळून आलेल्या त्रुटी खालील प्रमाणे आहेत.

१. मान्य प्रवेशित संख्येनुसार इमारत,स्नानगृहे,स्वच्छतागृहे नसणे / अपुरे असणे, प्रवेशितांसाठी जागा अपुरी असणे.

२. प्रवेशितांना चौरस आहार न देणे.

३. प्रवेशितांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात नाही.

४. संख्येत मानद वैद्यकीय अधिकारी नियुक्त केलेला नाही. प्रथमोपचार पेटी ठेवण्यात आलेली नाही व त्यामध्ये पुरेशी औषधी नसणे.

५. आरोग्यविषयक नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत किंवा अद्ययावत नोंदी घेतलेल्या नाहीत.

६. स्वच्छतागृहे व स्नानगृहांचे दारे तुटलेले असणे, ते अस्वच्छ किंवा त्यामध्ये पाण्याची सोय नसणे / विद्युत व्यवस्था नसणे.

७. प्रवेशितांना निकषानुसार गणवेश व अंतर्वस्त्र उपलब्ध करुन दिलेले नाही.

८. हजेरी नोंदवहीनुसार व प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या प्रवेशितांना हिशोब जुळत नसणे.

९. प्रवेशित रजेवर किंवा गैरहजर असताना उपस्थिती दर्शविणे.

१०. बाल कल्याण समितीचे आदेश असताना उपस्थिती दर्शविणे.

११. संस्थेतील कर्मचाऱ्यांना बालगृहाच्य कामकाजाबाबत किंवा भूमिकेबाबत माहिती सांगता येत नाही.

१२. संस्थेत आवश्यक त्या नोंदवहया ठेवण्यात न येणे व नोंदवहयात नोंदी न घेणे.

१३. प्रवेशितांना शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य निकषानुसार उपलब्ध करुन न देणे.

१४. विभागाची परवानगी न घेता इमारत बदली केली आहे.

१५. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमानुसार संस्थेचे कामकाज नसणे.

एकुण बालकाश्रमांपैकी ७५ ते ८० टक्के बोगस आहेत. शासनाचे पैसे वाया जात आहेत. म्हणून यासंदर्भात शासनाने कडक धोरण स्वीकारले पाहिजे अशी सूचना समितीने विभागास दिले असता यासंदर्भात विभागाने कडक धोरण स्वीकारले आहे आणि ते धोरण पुढे सुध्दा सुरु राहणार आहे असे आश्वासन विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.६३ बाल न्याय कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत असलेल्या बालगृहे, अनुरक्षणगृहे अशा किती निवासी संस्थांना अनुदान दिले गेले ? किती एड्सग्रसत व मतीमंदांसाठीच्या संसथांना सहाय्यक अनुदान दिले गेले व अनिवासी बाल संगोपन योजनेअंतर्गत लाभार्थींची संख्या किती आह. याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बालन्याय कार्यक्रमाअंतर्गत अनुरक्षणगृहे १, निरिक्षणगृहे ५, बालगृहे २६५ आहेत तसेच एकूण ८ मतिमंद व ४ एड्सग्रस्त अशा एकूण १२ संस्थांना अनुदान दिले गेले व बालसंगोपन योजनेअंतर्गत एकूण १२६ संस्थांमार्फत एकूण १२५४९ लाभार्थ्यांना अनुदान दिले गेले.

चेंबूर येथील भिक्षेकरी गृहासंदर्भात

१०.६४ चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाच्या जागेबाबत महिला व बालहक्क आयोगामार्फत याची चौकशी करावी. कारण विभागाला न विचारता परस्पर चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाची जागा बीओटी तत्वावर विकसित करण्यासाठी बिल्डरला देण्यात आलेली आहे. हा निर्णय कोणी घेतला, का घेतला, कोणी परवानगी दिली याची चौकशी करण्यात यावी. असे निदेश समितीने विभागाला दिले तसेच महालेखाकारांनी यासंदर्भात चौकशी करुन समितीला अहवाल द्यावा. असे ही निदेश समितीने महालेखाकरांना दिले. याबाबत महालेखाकार कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे **(विवरणपत्र क्र. .....)** चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाबाबत मा.महिला व बालविकास मंत्री व विभागाचे सचिव यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. महिला व बाल विकास विभागाची परवानगी न घेता हे सर्व झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.६५ प्रौढ भिक्षेकरूंच्या प्रश्नासंबंधी बाल हक्क आयोगाला चौकशी करण्याचा अधिकार नाही. १८ वर्षाच्या आतील भिक्षेकरी असतील तर त्यांच्या प्रश्नासंबंधी चौकशी महिला

बाल आयोगाला करता येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता विभागाने या मध्ये सकारात्मक रहावे. Let the Government say that you don't have authority for inquiring the matter. असे मत समितीने व्यक्त केले व समितीने चेंबुर येथील भिक्षेकरी गृहाला भेट देण्याचे ठरविले.

१०.६६ महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरिक्षा अहवालासंबंधी लोकलेखा समितीने दि.२० डिसेंबर, २०१२ रोजी दहावा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात आला. या अहवालातील महिला व बाल विकास विभागांतर्गत असलेले भिक्षेकरी गृहाबाबत समितीने सादर केलेल्या अहवालात मुद्दा क्रमांक ९.७८ बाबत समितीने महिला व बाल विकास विभागाचे काम समाधानकारक नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आणून दिले व मुंबईतील भिक्षेकरी गृहांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचा निर्णय घेतला. तसेच महिला व बाल कल्याण विभागाने वित्त विभागाकडे पाठविलेल्या पद भरतीच्या प्रस्तावाबातही विभागाने वित्त विभागासोबत बसून टिप्पणी तयार करावी. महिला व बालकल्याण विभागाच्या कामामुळे समिती पुर्णपणे समाधानी नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

१०.६७ याअनुषंगाने मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम, महिला व बालविकास विभाग, नगर विकास विभाग, गृह विभाग व सामाजिक न्याय विभागाच्या विभागीय सचिव/प्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन भिक्षेकरी गृहाची पाहणी केली. बैठकित भिक्षेकरी गृहाची जागेचे मूळ मालक, जागेचे क्षेत्र, सध्याच्या जागेवर काय सुरू होते, भविष्य काळातील योजना बीओटीचे प्रपोजल केव्हा मान्य करण्यात आले व ते कोणत्या विकासकाबरोबर करण्यात आले आहे गृहातील भिक्षेकरूंची संख्या यासंदर्भात प्रथम महिला व बाल विकास विभागाच्या सचिवांना व इतर विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना समितीला माहिती देण्यास सांगितले. त्यावेळी भिक्षेकरी गृहाच्या जागेचे क्षेत्रफळ २७ एकर आहे. या जागेची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून ही जागा महिला व बाल विकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत आहे. भिक्षेकरी गृहाच्या जागेवर समाज कल्याण विभागाचे छोटे बांधकाम आहे.

१०.६८ भेटीचे वेळी या संदर्भात अधिक माहिती देताना महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, भीक मागण्यास प्रतिबंध करणे अधिनियम, १९६० अन्वये भिक्षेकरी गृह चालविले जाते. चेंबूर येथील भिक्षेकरी गृह पुरुष आणि महिला भिक्षेकरुंसाठी आहे. इंग्रजांच्या काळापासून भीक मागण्याची प्रथा सुरु आहे. ही प्रथा वाईट असल्यामुळे पोलिसांमार्फत मुंबईतील भिक्षेकरुंना पकडून कोर्टासमोर हजर केले जाते. त्यानंतर त्यांना भिक्षेकरी गृहात ठेवले जाते. भिक्षेकरी गृहात दाखल झालेल्या भिक्षेकरुंना खराटा तयार करणे, सुतार काम, मेणबत्ती बनविणे इत्यादींचे प्रशिक्षण देऊन त्यांना भीक मागण्यापासून परावृत्त केले जाते. महाराष्ट्र राज्यात १३ भिक्षेकरी गृह आहेत. भिक्षेकरुंना येथून वेगवेगळ्या भिक्षेकरी गृहात पाठविले जाते. भिक्षेकरी गृहातील भिक्षेकरु आजारी पडले तर त्यांच्यावर औषधोपचार केला जातो. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. भिक्षेकरुंसाठी जेवणाची व्यवस्था केली जाते. त्यांच्यासाठी कपड्यांची व्यवस्था केली जाते. त्यांना राहण्यासाठी बॅरेक्स उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ओहत. तसेच पुरुष भिक्षेकरी गृहात १२७ पुरुष आहेत आणि महिला भिक्षेकरी गृहात २२५ महिला आहेत. १ अधीक्षक, १ वैद्यकीय अधिकारी, ३ परिवेक्षा अधिकारी आणि २७ केअर टेकर असा एकूण ४४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे. सुरुवातीला भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात ४६ एकर ३६ गुंठे जागा होती. स्मशानभूमी, महिलांचे वसतिगृह इत्यादींसाठी जागेचे वाटप करुन आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात २७ एकर जागा राहिलेली आहे. भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात ४६ एकर ३६ गुंठे जागा होती. भिक्षेकरी गृहाच्या जागेचे वाटप करुन आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात २७ एकर जागा राहिलेली आहे. येथे पुरुष आणि महिला भिक्षेकरुंसाठी भिक्षेकरी गृह आहे. महिला भिक्षेकरुंसाठी कस्तुरबा महिला वसतिगृह आहे. या वसतिगृहात १८ ते ६० वयोगटातील महिला भिक्षेकरुंना ठेवले जाते.

१०.६९ भिक्षेकरूंना भिक्षेकरी गृहात किती काळ ठेवले जाते ? असे विचारले असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरूंना बेगर्स होममध्ये ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश वेगवेगळे असतात. एका भिक्षेकरूला बेगर्स होममध्ये आजीवन ठेवण्याबाबत देखील न्यायालयाचे आदेश आहेत. राज्यात एकूण १३ बेगर्स होम असल्याने तिकडे देखील त्यांना पाठविले जाते.

१०.७० भिक्षेकरूंच्या संदर्भात पोलिसांची नेमकी भुमिका काय आहे ? भीक मागणे हा कायद्याने गुन्हा आहे. मुंबईत भिक्षेकरुंवर कारवाई करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. सदर प्रकरणी पोलिसांची नेमकी भूमिका काय आहे, याची माहिती समितीला द्यावी अशी विचारणा गृह विभागाच्या सचिवांना केली असता सदर विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अख्यत्यारीत येतो असे समितीला सांगितले. भिक्षेकरू पोलिसांच्या माध्यमातून येथे येतात. त्यामुळे दाखल करण्यात आलेल्या भिक्षेकरुंची संख्या व इतर बाबींसंदर्भातील संपूर्ण माहिती संबंधित खात्यामार्फत येणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी बैठकीसाठी गैरहजर राहणे, सदर बाब समितीने गांभिर्याने दखल घेतली.

१०.७१ प्रस्तावित नूतनीकरणामध्ये बालविकास खात्याला देखील अंतर्भूत केलेले आहे काय तसेच नगरविकास खात्याची यासंदर्भात नेमकी भुमिका काय आहे याबाबत माहिती देण्यास नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींना समितीने सांगितले. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, यात नगरविकास विभागाची भूमिका दिसत नाही. प्रस्तावित इमारतीचा प्लॅन नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी गेला का ? तसेच मुंबई महागनरपालिकेने २ वेळा या संपूर्ण प्रस्तावाला मंजुरी दिल्याचे पत्र असल्याचे आमच्याकडे माहिती आहे. हे पत्र दिनांक ४ ऑक्टोबर, २००८ चे आहे. त्यामुळे आयओडी व सीसी दिली पाहिजे होती. अशी विचारणा समितीने केली असता नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींना या प्रकरणी माहिती देता आली नाही.

१०.७२ मूळ उद्देशामध्ये बदल केल्याचा मुद्दा आहे. नकाशे मंजूर करणे हे महानगरपालिकेचे काम आहे. उद्देश बदलण्यासाठी नगरविकास खात्याची मान्यता लागते. शासकीय भूखंडाचा विकास खाजगी विकासकाच्या म्हणजेच बीओटीच्या माध्यमातून करणे, हा समितीच्या समोरील विषय आहे. समितीला बीओटी प्रकल्पाची माहिती घेणे आवश्यक असून सदर प्रकल्प नेमका काय आहे, किती जागेवर उभारण्यात येणार आहे, या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना सांगितले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, चेंबूर, मुंबई येथील २७ एकर जागेवर खाजगी विकासकाकडून बांधकाम करून घ्यावयाचे होते. सदर भूखंडाचा विकास खाजगी विकासकाच्या माध्यमातून करण्याबाबत पायाभूत सुविधा समितीने ऑगस्ट, २००७ मध्ये मंजुरी दिली होती.

एकूण भूखंडाचे क्षेत्रफळ १,१३,९२४.२० चौ.मी. (२८.८० एकर) आहे, विकासकाला घ्यावयाचा भूखंड ४०,००० चौ.मी. आहे, तो सेलेबल लॅण्ड म्हणून देण्यात येत आहे, झोपडपट्टीमुळे बाधित क्षेत्र १३२४ चौ.मी. आहे, माहिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटी यांना दिलेली जागा २६७९.६६ चौ.मी. आहे. उर्वरित भूखंड शिल्लक आहे. शिलकी भूखंडाचे क्षेत्रफळ ६९,९१९ चौ.मी. आहे. येथे शासनाच्या इमारतीचे बांधकाम करून घ्यावयाचे आहे. एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौ.मी. आहे. यामध्ये १३ प्रकारच्या वेगवेगळ्या इमारती आहे. प्रशासकीय इमारतीचे बांधकाम जी प्लस १४ राहणार आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ ७७८९२.०८ चौ.मी. आहे. पुरूष भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे बांधकाम जी प्लस ३ राहणार आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ ६७०० चौ.मी. आहे. महिला भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे बांधकाम जी प्लस २ राहणार आहे, त्याचे क्षेत्रफळ ४३४७ चौ.मी. आहे. कस्तुरबा महिला वसतिगृहाचे बांधकाम जी प्लस १ राहणार आहे, त्याचे क्षेत्रफळ १०७६ चौ.मी. आहे. अनाथ बालकांकरिता बाल संकुल बांधण्याचे क्षेत्रफळ १००० चौ.मी. आहे. शवागृहाकरिता बांधण्याचे क्षेत्रफळ ४०.०० चौ.मी. आहे. रस्त्यांवरील मुलांकरता शाळा व वसतीगृह बांधण्याचे क्षेत्रफळ ६०००.०० चौ.मी. आहे. मुलांकरता वसतीगृह बांधण्याचे क्षेत्रफळ १८१५१.०० चौ.मी. आहे. मुलींकरता वसतीगृह बांधण्याचे क्षेत्रफळ ६०७८.०० चौ.मी. आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीभवन बांधण्याचे क्षेत्रफळ ७६२९.७८ चौ.मी. आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधण्याचे क्षेत्रफळ १७७०.८० चौ.मी. आहे. अधिकारी व कर्मचारी या करता टाईप-१ चे २४, टाईप-२ चे ५२ व टाईप-३ चे ३५ असे एकूण १११ निवासस्थाने बांधण्याचे क्षेत्रफळ ६२८४.२३ चौ.मी. आहे. शासकीय विश्रामगृह बांधण्याचे क्षेत्रफळ ४२७०.८८ चौ.मी. आहे. असे एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौ.मी. आहे. या व्यतिरिक्त भूमिगत वाहन तळ (१००० वाहनांसाठी) बांधण्याचे क्षेत्रफळ ३५०००.०० चौ.मी. आहे.

१०.७३ भिक्षेकरी गृहाच्या जागेचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रस्ताव आहे, यामागचा उद्देश काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरी गृहाच्या जागेवर सन १९४७ साली पुरुष व महिला भिक्षेकरुंसाठी बॅरेक्स बांधण्यात आलेल्या आहेत. या बॅरेक्सचे स्ट्रक्चर टेम्परारी स्वरुपाचे आहे. या बॅरेक्सचे स्ट्रक्चर परमनन्ट स्वरुपाचे करुन घ्यावयाचे आहे. या जागेचा विकास करुन

शासकीय कार्यालयासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय इमारत, अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थाने, समाज कल्याण विभागासाठी इमारतीचे बांधकाम शासनाला एकही पैसा खर्च न करता करुन मिळेल. या बदल्यात विकासकाला ४० हजार स्क्वेअर मीटर जागा मिळणार आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून भिक्षेकरी गृहाच्या जागेचा विकास करण्याबाबतचा मूळ प्रस्ताव कोणी सादर केला याबाबत मूळ प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केल्याची माहिती मिळाली.

१०.७४ या जागेचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाही. ही जागा महिला व बाल विकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत आहे. प्रॉपर्टी कार्डवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव आहे. महिला व बाल विकास विभागाचा या प्रस्तावाला पाठिंबा आहे काय ? तसेच महिला व बाल विकास विभागाच्या तत्कालीन प्रधान सचिव यांचा या प्रस्तावाला विरोध आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगीकरणाच्या माध्यमातून या जागेचा विकास करण्याचा प्रयत्न केला असेल तर तो जोरजबरदस्तीने केलेला आहे. कब्जेदाराला कायद्याने संरक्षण दिलेले आहे. कब्जेदार यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे काय ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मुंबईमध्ये शासनाची बरीच कार्यालये भाड्याच्या जागेत आहेत व ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. त्यासाठी प्रशासकीय इमारत बांधावयाची आहे. ज्यावेळी हा प्रस्ताव तयार करण्यात आला त्यावेळी महिला व बाल विकास विभागाने या जागेवर सध्या महिला व बाल विकास विभागाचे जे बांधकाम अस्तित्वात आहे त्यापेक्षा अधिक बांधकाम करुन मिळाले पाहिजे, असे अभिप्राय नमूद केले होते. सध्या महिला व बाल विकास विभागाशी संबंधित बांधकाम १५,४११ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळाचे आहे. या बदल्यात महिला व बाल विकास विभागाला २५,४५० स्क्वेअर मीटर जागेचे बांधकाम करुन देण्याचे प्रस्तावित आहे. सुरुवातीला भिक्षेकरी गृहाची जागा ४६ एकर होती. जागेचे वाटप केल्यानंतर आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात फक्त २७ एकर जागा राहिलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून जागेचे वाटप केले जाते. सन २००४ नंतर प्रत्येक विभागाने आपली नोंदणी नोंदविण्यास सुरुवात केलेली आहे. सदर बांधकामास महिला व बाल विकास विभागाचा अद्यापही विरोध असल्याबाबत महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितले.

१०.७५ एखाद्या विभागाचा विरोध असेल आणि ते कब्जेदार असतील तर सार्वजनिक बांधकाम विभागाला त्या जागेवर बांधकाम करण्याचा अधिकार आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, या जागेचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन पायाभूत सुविधा समितीकडे पाठविण्यात आला होता. महिला व बाल विकास विभागाला सध्या त्यांच्याकडे असलेल्या जागेपेक्षा जास्त जागा पाहिजे, असे मत पायाभूत सुविधा समितीच्या टिप्पणीवर त्यांनी नोंदविलेले आहे. आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांनी मागणी केलेल्याप्रमाणे आपण त्यांना ३४ हजार स्क्वेअर मीटरचे बांधकाम करुन देणार आहोत आणि १० हजार स्क्वेअर मीटर मोकळी जागा देणार आहोत. भिक्षेकरुंना शेती करण्यासाठी १० हजार स्क्वेअर मीटर जागा ठेवण्यात आलेली आहे.

१०.७६ महिला व बाल विकास विभागाचा सदर जागेचा विकास करण्याबाबत विरोध करण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली. यावर महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरी गृहाची २७ एकर जागा आहे. माननीय महिला व बाल विकास मंत्री महोदयांचा असा विचार आहे की, या संपूर्ण जागेचे बांधकाम विभागाने करावे. तसेच विभागाचे हेच मत आहे. भिक्षेकरी गृहाची संपूर्ण जमीन महिला व बाल विकास विभागाच्या ताब्यात आहे. ती जागा कमी करुन शासनाला फक्त बांधकाम करुन मिळेल. सध्या येथे जसे मोकळे वातावरण आहे तसे वातावरण बांधकाम केल्यानंतर येथे राहणार नाही. रिहॅब्लीटेशन सेंटरमध्ये चांगले वातावरण असले पाहिजे.

१०.७७ सद्य:स्थितीत बांधकाम कोणत्या टप्प्यावर आहे ? एकूण किती निविदा आल्या होत्या, निविदा सादर करणाऱ्या कंपन्यांची नावे काय आहेत आणि त्यांचे प्रत्येकाचे प्रस्ताव काय होते? असे समितीने विचारले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, दिनांक २७.०६.२००८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. एजन्सीचे नाव मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई असे आहे. मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या विकासकाची रु.११.१६ कोटी अधिमूल्य देऊ करणारी निविदा शासनाने मान्य केलेली आहे. इतर निविदा देणाऱ्या कंपन्यांनी कोणती ऑफर दिली होती ? अशी विचारणा केली समितीने केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, एकूण ६

उद्योजकांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यामध्ये मे.आस्था डेव्हलपर्स या विकासकाने ८ कोटी १० लाख रुपये अधिमूल्य देऊ करणारी निविदा सादर केली होती. अप-फ्रन्ट अमाऊंट बाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने विभागाला सांगितले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, जागा घोषित केली जाते, सेलेबल लॅण्ड घोषित केली जाते, विभाग किती बांधकाम करणार आहे, ते घोषित केले जाते. अगोदर अशाप्रकारे पॅरामिटर्स ठरवून दिले जातात. यानुसार संबंधित कंपनी किती प्रिमिअम देऊ शकते, हे पाहिले जाते. प्रिमिअम क्रायटेरियावर बिडिंग केले जाते. जास्तीत जास्ती बिडिंग प्रिमिअम देणाऱ्या कंपनीला काम देण्यात येते. मंगलम बिल्डर्सने ३०० लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, पीबीए इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने ८१ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, संगम इंडिया लिमिटेडने ६२० लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, एसके जॉईंट व्हेंचरने १५१ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेडने १११६ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती.

१०.७८ सदर प्रकल्पाच्या निविदेची जाहिरात कोणकोणत्या वर्तमानपत्रांत दिली होती ? असे समितीने विचारले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, प्रकल्पाच्या संदर्भातील जाहिरात वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. तसेच, दैनिक जागरण, नवी दिल्ली या वर्तमानपत्रात दिनांक २१.०९.२००७ रोजी ही जाहिरात दिली होती. दैनिक लोकमत, नवी मुंबई, दैनिक सामना, मुंबई, टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई, मुंबई संध्या, रत्नागिरी टाईम्स अशा ६ वर्तमानपत्रांमध्ये सदर कामाची जाहिरात देण्यात आली होती.

१०.७९ मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून ११ कोटी प्रिमिअम मिळाला. निविदा भरताना मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याबरोबर दुसरे कोणी पार्टनर होते का ? तसेच विभाग सदर काम बीओटी तत्वावर करणार होते मग विभागाला या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावरून निविदा मागविणे शक्य होते का ? धारावीच्या विकासाच्या संदर्भात असे करण्यात आले होते. आपण या संदर्भात काही विचार केला होता का ? याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना खुलासा करावयास सांगितला असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडची निविदा मंजूर झाली होती. त्यांच्या संयुक्त प्रकल्पात कोणीही आलेले नाही. निविदा भरताना कोण पार्टनर्स होते,

याची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले पंरतु अद्याप सदर माहिती समितीला अप्राप्त आहे. निविदा भरताना बिडिंग पार्टनर्स कोण होते, टेक्निकल पार्टनर्स कोण होते, सद्य:स्थितीत ते बदलले आहेत का, शेअर्सचे हस्तांतरण झाले होते का, झाले असेल तर ते कोणत्या भावात झाले, या सर्व बाबींच्या संदर्भातील माहिती देण्यात यावी. असे समितीने विभागाला सूचित केले पंरतु अद्याप सदर माहिती समितीला अप्राप्त आहे.

१०.८० सदर जागेच्या बांधकामाची सद्य:स्थितीबाबात तसेच निविदेला मंजुरी देताना कामासाठीचा कालावधी किती दिला होता ? याबाबत खुलासा करावयास सांगितला असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, १३ इमारतींपैकी पुरूष भिक्षेकरी गृहाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले. इतर इमारतींचे नियोजन सुरू आहे. मूळ कालावधी ४२ महिन्यांचा होता. प्रकल्पामध्ये अडचणी आल्यामुळे विचार करून ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. डिसेंबर, २०१४ अखेर सर्व बांधकाम पूर्ण करण्यात येईल, या अटीवर मुदतवाढ दिली आहे.

१०.८१ विभाग एसआरएचे पुनर्वसन दाखवित आहे. पुनर्वसनाचे काम मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड करणार आहे का ? पुनर्वसन कोण करणार आहे ? विकासकाला घ्यावयाचा भूखंड, झोपडपट्टीमुळे बाधित क्षेत्र, महिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटीला दिलेली जागा यातून वगळली आहे का ? यासंदर्भात विभागीय सचिवांना खुलासा करावयास सांगितला असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, पुनर्वसनासाठी येणारा खर्च विकासक शासनाकडे जमा करणार आहे. महिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटीला जागा दिलेली आहे, ती विकास प्रकल्पातून वगळली आहे.

१०.८२ महिला व बालविकास विभागाचा याप्रकल्पास विरोध आहे. मग हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम खाते जबरदस्तीने करीत आहे का ? सदर कामाच्या संदर्भात महिला व बालविकास विभागांची एनओसी दाखविण्यात यावी. हा प्रकल्प पायाभूत सुविधा समितीने मंजूर केला आहे व यास आयुक्तांची मान्यता असल्याबाबत, सांगण्यात आले आहे. येथे ४००० चौ.मी. जागा कमी मिळाली आहे. अधिक जागेची मागणी करून प्रस्ताव द्यायचा होता. प्रकल्पासाठी

वेगवगळ्या विभागाची एनओसी घ्यावी लागते. या प्रकल्पासाठी कोणकोणत्या विभागांची एनओसी घेतली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, प्रकल्पासाठीची एनओसी स्वतंत्र्य घेतली जात नाही. संबंधित विभागांकडे प्रकल्पाच्या संदर्भातील फाईल जाते.

१०.८३ महिला व बालविकास विभागाने मान्यता देताना फाईलवर कोणते अभिप्राय दिले होते ? याबाबत खुलासा करावा यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय असे आहेत की, "भिक्षेकरी गृह, चेंबूरचा भूखंड सर्व्हे क्र.४६९(अ) या जागेचा खाजगीकरणाच्या माध्यमातून भूखंड विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय भिक्षेकरी स्वीकार केंद्र, चेंबूर या संस्थेच्या जागेवर महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या संस्थांकरिता आयुक्त कार्यालय, पुणे यांजकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार सुमारे ६९,००० चौ.मी. जागा प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने पायाभूत सुविधा समितीसमोर सादर केलेल्या प्रस्तावात महिला व बालविकास विभागाकरिता फक्त २४,६८६ चौ.मी. एवढीच जागा प्रस्तावित केली आहे. तथापि, सदर जागा ही अत्यंत अपुरी आहे. यास्तव आता महिला व बालविकास विभागाला किमान खालीलप्रमाणे जागा उपलब्ध करून द्यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग महिला व बाल विकास विभागाला ३४ हजार स्क्वेअर मीटरचे बांधकाम करुन देणार आहोत. तसेच, आपण त्यांना १० हजार स्क्वेअर मीटर मोकळी जागा देखील उपलब्ध करुन देणार आहोत.

१०.८४ समाजिक न्याय विभागाचे अभिप्राय काय आहेत ? असे समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य विभागाचे अभिप्राय असे आहेत की, "चेंबूर, मुंबई येथील सर्व्हे क्र.४६९-अ येथील शासकीय भूखंडाचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करणेबाबत सदरचा प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीपुढे सादर करण्याबाबतची टिप्पणी विभागास पाठवून त्याबाबत अभिप्राय देण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने विनंती केलेली आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, सामाजिक न्याय विभागास मुलामुलींचे वसतिगृह जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय तसेच निवासस्थानासाठी एकूण

५५१०.६८ चौरस मीटर एवढीच जागा दर्शविण्यात आलेली आहे. याबाबत माननीय मंत्री, सामाजिक न्याय विभाग यांनी त्यांच्या दिनांक ७.१२.२००५ च्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या खालील जागेची मागणी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे." सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी विभागास आवश्यक असलेल्या जागेची मागणी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती, असे सार्वजनिक बांधाकाम विभागाने सांगितले असता हा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाला मान्य आहे काय असे विचारले असता याबाबत विभागीय सचिवांना याबाबत खुलासा करता आला नाही.

१०.८५ भिक्षेकरी स्वीकार केंद्राबरोबर जो करार झालेला आहे तसेच समितीला बैठकीचे वेळी जी लेखी माहिती देण्यात आलेली आहे त्यामध्ये असे नमूद केलेले होते की, "सदर कराराची प्रत अधीक्षक, भिक्षेकरी स्वीकार केंद्र यांनी शासनास परस्पर सादर केलेली असल्यामुळे या प्रस्तावासोबत प्रत प्राप्त झालेली नसल्यामुळे जोडण्यात आली नाही." या संदर्भात खुलासा करावयास सांगितला असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, समाज कल्याण विभागाचे अभिप्राय घेण्यात आले होते.

१०.८६ भिक्षेकरी स्वीकार केंद्रामार्फत काय काम केले जाते आणि भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे पदाधिकारी कोण आहेत ? याची समितीला माहिती देण्यास सांगितले. यावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र शासकीय आहे. ही शासकीय यंत्रणा असल्यामुळे त्यांच्या बरोबर कोणताही करार करण्यात आला नव्हता. टेंडरची प्रत शासनास सादर केलेली आहे.

१०.८७ विकासकाने ४२ महिन्यात बांधकाम पूर्ण करुन द्यावयाचे होते. परंतु ४२ महिन्यात बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विकासकाने बांधकाम वेळेवर पूर्ण करुन दिले नाही तर त्यांची बँक गॅरंटी जप्त केली जाते. तसेच सदर प्रकरण मागील १० वर्षापूर्वीचे आहे. विकासकाने वेळेवर बांधकाम पूर्ण केले केले नाही तर त्यांची बँक गॅरंटी जप्त करण्याची तरतूद असते. सन २००४ मध्ये आपण निविदा काढली होती. विकासकाला सन २०११ पर्यंत बांधकाम पूर्ण करुन द्यावयाचे होते. परंतु विकासकाने वेळेवर बांधकाम पूर्ण न केल्यामुळे विकासकाला सन २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विकासकाला जी ४० हजार स्क्वेअर मीटर जागा देण्यात

आलेली आहे त्या जागेचा भाव सन २०१४ पर्यंत वाढणार आहे. त्यामुळे विकासकाचा फायदा होणार आहे. कारण मुंबई शहरातील जागांचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे विकासकाकडून वाढीव अधिमूल्य घेण्याचा विभागाचा विचार आहे काय ? विकासकाकडून वाढीव अधिमूल्य घेतले तर शासनाचा फायदा होईल. असे समितीने विभागाला सूचित केले.

१०.८८ चेंबूर येथील जागेचे आरक्षण भिक्षेकरी गृहासाठी होते. नंतर या जागेच्या आरक्षणामध्ये बदल करुन या जागेवर बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशी माहिती समितीला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी दिली. जागेचे भाव वाढलेले आहेत हे विभागाला मान्य आहे काय ? विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शासन जागेचे भाव विचारात घेऊन विकासकाकडून जास्त पैसे मिळविणार आहे काय किंवा त्यांची बँक गॅरंटी जप्त करणार आहे काय ? या जागेचे आरक्षण केव्हा बदलण्यात आले तसेच विकासक त्याच्या जागेचा वापर व्यापारी तत्वाने करणार आहे. मूळ लॅण्ड विकास आराखड्यामध्ये बेगर्स होम म्हणून आली आहे. विभागाने हा उद्देशच बदलला आहे. चेंज ऑफ युजरची माहिती नगरविकास विभागाकडे आहे. महानगरपालिका व नगरविकास विभागाने यास मंजुरी देताना याचा विचार केला असेलच. तांत्रिक गोष्टी पूर्ण झाल्या आहेत का ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, डि-रिझर्व्हेशनची मंजुरी प्राप्त झाली आहे. नगरविकास विभागाने डि-रिझर्व्हेशन दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ व दिनांक ३० एप्रिल, २०१० अन्वये नियोजित केले आहे आणि त्याप्रमाणे डि-रिझर्व्हेशन झाले आहे. डि-रिझर्व्हेशनसाठी २२ महिन्यांच्या कालावधीचा विलंब झाला आहे. स्थानिकांचा या संदर्भात विरोध होता. स्थानिक लोकांना वहिवाटीसाठी रस्ता पाहिजे होता, खेळाचे मैदान पाहिजे होते, प्रसाधनगृह पाहिजे होते. त्या संदर्भात निर्णय होऊन या सर्व बाबी नियोजनात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. उद्योजकाने स्वः खर्चाने ४ प्रसाधनगृहे, वहिवाटीचा रस्ता व खेळाचे मैदान करण्याचे मान्य केले आहे. या सर्व बाबी करण्यास १४ महिन्यांचा कालावधी लागेल. त्यामुळे प्रकल्पासाठी ३६ महिन्यांचे मुदतवाढ देणे अपरिहार्य असल्याने तसे दिले आहे.

१०.८९ बैठकीचे वेळी विभागाने दिलेल्या टिप्पणीनुसार "दि.२९.१२.२००४ रोजी मा. मंत्री, सा.बां. यांचे दालनात सदर प्रकल्पाबाबत चर्चा झाली. बैठकीला मा. मंत्री, महिला व

बालविकास व मा. मंत्री, सामाजिक न्याय उपस्थित होते. बैठकीमध्ये सदर भूखंडाचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास सार्वजनिक बांधकाम विभागाने करावा, असे ठरले." महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव करीत असलेल्या वक्तव्यामुळे विरोधाभास होत आहे. याचे कारण काय आहे ? कार्यारंभ आदेश दिल्यानंतर डि-रिझर्व्हेशन झाले. डि-रिझर्व्हेशन करण्यापूर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आला. आपण डि-रिझर्व्हेशन गृहीत धरूनच कार्यारंभ आदेश दिला का ? आपण दिलेल्या टिप्पणीनुसार "वरील प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र खालीलप्रमाणे संबंधित प्राधिकरणाकडून घेण्यात आले आहे." त्यामध्ये नगरविकास विभागाकडून भूखंड विकास मंजूर आराखड्याच्या प्रस्तावित फेरबदलाच्या संदर्भातील पत्र असल्याचे सांगितले आहे, महानगरपालिकेच्या पत्राबाबत सांगितले आहे, पर्यावरण खात्याच्या पत्राबाबत सांगितले आहे. मात्र महिला व बालविकास विभागाच्या पत्राबाबत तेथे उल्लेख नाही. याचे कारण काय आहे ? असे समितीने विचारणा केली. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, कार्यारंभ आदेश दिल्यानंतर डि-रिझर्व्हेशनची प्रक्रिया सुरू करण्यात आली. डि-रिझर्व्हेशनला २२ महिन्यांचा कालावधी लागला. माननीय मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची बैठक दिनांक २९ डिसेंबर, २००४ ला झाली. पायाभूत सुविधा समितीची बैठक दिनांक ८ ऑगस्ट, २००७ ला होऊन सदर प्रकल्पास मान्यता प्राप्त झाली.

१०.९० पुढे समितीने अशी विचारणा केली की, डि-रिझर्व्हेशनपूर्वी आपण कार्यारंभ आदेश कसा दिला ? व सदर कामासाठी ३६ महिने वाढवून दिल्यामुळे कामास विलंब झाला आहे. सदर निविदा भरताना कोण बिडिंग पार्टनर्स होते, कोण टेक्निकल पार्टनर्स होते, नंतर ते बदलले का, या संदर्भातील सविस्तर माहिती देण्यात यावी. पंरतु सदर माहिती समितीला अद्याप अप्राप्त आहे. विभागाचे अधिकारी माहिती देऊ शकत नाहीत. सदर प्रकरणी डि-रिझर्व्हेशन होण्याच्या अगोदर वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. तसेच विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाश्यामध्ये व बैठकीच्या वेळी दिलेल्या माहितीमध्ये विरोधाभास आहे, हा विरोधाभास का आहे, त्याबाबत विभागाने सांगावे. विभागाकडून अशाप्रकारे असत्य टिप्पणी का देण्यात आली ? समितीची दिशाभूल करण्यात आली आहे, त्याबद्दल समितीने गांभीर्याने दखल घेतली.

१०.९१ आरक्षण बदलण्यापूर्वी वर्क ऑर्डर देण्याचे कारण काय आहे ? आरक्षणात बदल होणार आहे असे गृहीत धरुन तुम्ही वर्क ऑर्डर दिलेली आहे काय ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, दिनांक २९ डिसेंबर, २००४ रोजी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांच्या दालनात झालेल्या बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव देखील उपस्थित होते. भिक्षेकरी गृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यास काही आक्षेप नव्हते. कार्यरंभ आदेश देऊन आरक्षण बदलण्याची प्रोसेस पूर्ण करण्यात आलेली आहे.

१०.९२ सार्वजनिक बांधकाम विभागाने जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे काय ? बेकायदेशीरपणे वर्क ऑर्डर दिलेली आहे का ? समितीने विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. या संदर्भात समिती मुख्य सचिवासमवेत बैठक घेऊन याबाबत अधिक माहिती घेण्यात येईल असे समितीने सूचित केले.

१०.९३ भिक्षेकरी गृहाच्या जागेचे क्षेत्रफळ १,१३,९२४ चौरस मीटर आहे. या भूखंडाचा विकास केल्यानंतर बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौरस मीटर होणार आहे. यामध्ये टीडीआर किती आहे, एफएसआय किती वापरलेला आहे आणि मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांना टीडीआर दिलेला आहे काय यासंदर्भात तसेच मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या विकासकाची रु.११.१६ कोटी अधिमूल्य देऊ करणारी निविदा मान्य करण्यात आलेली आहे. विकासकाला ४० हजार चौरस मीटर क्षेत्रफळ वापरावयास मिळणार आहे, ते क्षेत्रफळ निवासी वापरासाठी आहे का व्यावसायिक वापरासाठी आहे याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे. विकासकाला टीडीआर, एफएसआय वापरुन ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रफळ वापरावयास मिळणार आहे. विकासकाला ६८ हजार चौरस मीटर बांधकामाचा फायदा होणार आहे. यामध्ये निवासी वापराचे क्षेत्रफळ किती आहे आणि व्यावसायिक वापराचे क्षेत्रफळ किती आहे ? जे ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य आकारण्यात आलेले आहे ते ४० हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे का ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे ? व यामध्ये निवासी वापराचे क्षेत्रफळ किती आहे आणि व्यावसायिक वापराचे क्षेत्रफळ किती आहे ? याबाबत विभागाला खुलासा करावायास सांगितला असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या

सचिवांनी अशी माहिती दिली की, या क्षेत्राकरिता अनुज्ञेय एफएसआय १ आहे. शासकीय निवासी इमारतीकरिता १.५ एफएसआय आहे आणि अनिवासी इमारतीकरिता ४ एफएसआय आहे.

१०.९४ पुढे समितीने अशी विचारणा केली की, ६८ हजार चौरस मीटरमध्ये व्यावसायिक वापरासाठी असलेले क्षेत्रफळ किती आहे आणि निवासी वापरासाठी असलेले क्षेत्रफळ किती आहे ? विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे, ते ४० हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे का ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे ? यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, ४० हजार चौरस मीटर क्षेत्रामधून १५ टक्के मनोरंजन क्षेत्र वजा करुन ३४ हजार चौरस मीटर क्षेत्रफळ उपलब्ध झालेले आहे. यासाठी २ एफएसआय अनुज्ञेय आहे. त्यामुळे निव्वळ बांधकाम क्षेत्रफळ ६८ हजार चौरस मीटर असणार आहे. ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रापैकी निवासी वापरासाठी किती क्षेत्रफळ आहे आणि व्यावसायिक वापरासाठी किती क्षेत्रफळ आहे ? अशी विचारणा समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विकास नियंत्रण नियमावलीनुसार ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र व्यावसायिक वापरासाठी आहे आणि ५० टक्के क्षेत्र निवासी वापरासाठी अनुज्ञेय आहे.

१०.९५ तीन लाख चाळीस हजार स्क्वेअर फूट क्षेत्राचा व्यावसायिक वापर होईल आणि उर्वरित ३ लाख ४० हजार स्क्वेअर फूट क्षेत्राचा निवासी वापर होईल. विकासकाने वेळेत बांधकाम पूर्ण न केल्यामुळे विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या ३६ महिन्यांच्या काळात सिमेंट, रेती इत्यादींचे भाव वाढले तर हा खर्च कोण करणार आहे ? याबाबत समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २००८ मध्ये कार्यरंभ आदेश देण्यात आलेला आहे. शासनाला विकासकाडून १,४१,२४९.०८ चौरस मीटरचे बांधकाम विनामूल्य करुन मिळणार आहे आणि या बांधकामाची किंमत ३३४ कोटी रुपये आहे. शासकीय बांधकामाचा संपूर्ण खर्च विकासक करणार आहे. बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किंमतीमध्ये जी भाववाढ होईल त्याचा खर्च विकासकच करणार आहे. विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे आणि शासनाला

विकासकाकडून मिळणाऱ्या बांधकामाची किंमत ३३४ कोटी रुपये आहे असा एकूण ३४५ कोटी रुपये शासनाचा फायदा होणार आहे.

१०.९६ दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींसाठी लहान सदनिका बनविण्याचे धोरण आखले आहे. आपण त्या धोरणाची निवासी प्रकल्पामध्ये अंमलबजावणी केली आहे का ? समितीने सदर मुद्दा देखील विचारात घेऊन हा करारनामा झाला, त्यावेळी कोणत्या अटी व शर्ती लागू होत्या, सदर करार किती वर्षांसाठी झाला होता, संबंधितांचे या संदर्भात काय निदेश होते, या सर्व गोष्टी माहिती समितीला देण्यास सांगितले. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, कार्यालयीन आदेश दिनांक २७.६.२००८ ला दिला. कालावधी ४२ महिन्यांचा होता. डेट ऑफ कमेन्समेंट दिनाक २६.१२.२०११ होती. डि-रिझर्व्हेशनला २२ महिन्यांचा कालावधी लागला. कामाला ३६ महिन्यांचे एक्स्टेंशन देण्यात आले. शासनाने दिनांक २४.१२.२०१४ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

१०.९७ शासनाकडून एखादी जागा विकासकाला देण्यासंदर्भात न्यायालयाने काही निदेश दिलेले आहेत की, शासनाने विकासकाला ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता जागा देऊ नये. आपण न्यायालयाच्या निदेशांची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसत आहे. न्यायालयाने असे आदेश कधी दिले, विभागाचा ९९ वर्षांचा करार झाला, तो कोणत्या नियमान्वये झाला ? शासनाने विकासकाला भूखंड देताना नेमका किती वर्षांचा करार केला होता ? विकासकाबरोबर केलेला करार ३० वर्षांचा आहे की ९९ वर्षांचा आहे ?याबाबत समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विकासकाबरोबर केलेला करार ९९ वर्षांकरिता आहे. आपण अगोदर ३० वर्षांचा करार करतो आणि नंतर ३० वर्षांनी ते पुन्हा ३० वर्षांसाठी रिन्यू करतो.

१०.९८ पुरूष भिक्षेकरी स्वीकार केंद्र जी प्लस ३ ची इमारत बांधणार आहात. सर्वच भिक्षेकरी हे शरीराने फिट असतात का ? कोणीही भिक्षेकरी अपंग नाही का ? अपंग भिक्षेकरींसाठी इमारती मध्ये लिफ्टची सोय असणार का ? अशी समितीने विचारणा केली असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, ५० मतिमंद, २५ अपंग व बाकीचे वृध्द भिक्षेकरी आहेत. समितीने विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर माहिती व मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड या विकासकाबरोबर केलेल्या मूळ कराराची प्रत समितीला

सादर करण्यात यावी. पंरतु सदर माहिती अद्याप समितीला अप्राप्त आहे. विकासकाबरोबर ९९ वर्षांचा करार केला आहे. आपण आता सांगत आहात की, ३० वर्षांनी ३० वर्षांचे एक्स्टेंशन करणार आहोत. आपण तेव्हाच्या बाजारभावानुसार अतिरिक्त मूल्य चार्ज करणार का ? याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त मुल्य आकारले जाणार नाही.

१०.९९ न्यायालयाने दिलेले निदेश संपूर्ण राज्याला लागू आहेत. आपण त्याची अंमलबजावणी केली पाहिजे होती. ३० वर्षांचा कालावधी संपल्यानंतर शासनाच्या अटी व शर्ती वेगळ्या असतील. विकासकाबरोबर केलेला करार समोर आल्यानंतरच सर्व गोष्टी क्लिअर होतील. भिक्षेकरी गृहाचे बांधकाम मल्टीस्टोरी करण्यात येत आहे. मतिमंद, अपंग यांच्यासाठी मल्टीस्टोरी इमारत धोकादायक आहे. भिक्षेकरी गृहात ५०-५५ टक्के मुले मतिमंद आहेत. समाजकल्याण विभागाच्या प्रधान सचिवांनी देखील सांगितले आहे की, या ठिकाणचे वातावरण मोकळे ठेवावे लागणार आहे. असे समितीने सूचित केले.

१०.१०० **चेंबूर येथील महिला सुधारगृहास व भिक्षेकरी गृहास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दि. २ जानेवारी, २०१३, २० व २७ फेब्रुवारी, २०१३ विभागीय सचिव व प्रतिनिधींसमवेत पुन्हा बैठक घेण्यात आली** सदर बैठकीत समितीने चेंबुर येथील महिला सुधारगृहातील काही महिलांनी पलायन करण्याचा प्रयत्न केला त्यासंदर्भातील माहिती देण्यास विभागीय सचिवांना सांगितले असल्यास विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, महिला सुधारगृहामध्ये कुंटणखान्यातून सुटका करण्यात आलेल्या मुलींना ठेवले जाते. तसेच, या मुलींना व बायकांना कोर्टाच्या आदेशानुसार ठराविक कालावधीकरिता सुधारगृहामध्ये ठेवले जाते. त्यानंतर त्यांच्या घराचा पत्ता ट्रेस करून पोलीस एस्कॉर्टमार्फत त्यांना त्यांच्या घरी सोडले जाते. एस्कॉर्ट नसल्यामुळे प्रवेशीतांना घरी सोडता येत नाही अशा प्रवेशीतांची दाखला दिनांक कोर्ट आर्डर, एक्सॉर्ट असल्याचा दिनांक व पोलिस स्टेशनच्या नावासह यादी **(विवरणपत्र क्र .....)** वर आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये या संदर्भात कोर्टामध्ये सु-मोटो रिट पिटीशनही दाखल करण्यात आले होते. परंतु नवजीवन सुधार गृह, चेंबूर येथील बांग्लादेशीय मुलींना हायकोर्टाच्या ऑर्डर्स मिळूनही त्यांना त्यांच्या मायदेशी पाठविण्याची व्यवस्था विभागाच्या माध्यमातून करण्यात आलेली नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बांग्लादेशीय मुलींना त्यांच्या मायदेशी पाठविण्याकरिता

त्यांच्या देशामध्ये त्यांच्या घराचा पत्ता ट्रेस केला जातो. त्यानंतर बांग्लादेश या देशाच्या कौन्सलेट कडून आपल्या विभागाचे काही प्रतिनिधी माहिती घेत असतात. या सर्व प्रक्रियेकरिता एका वर्षाचा कालावधी निघून जातो. आता सद्यःस्थितीत चेंबूर येथील सुधारगृहामध्ये एकूण ६८ मुली आहेत. त्यापैकी ५६ मुली बांग्लादेशीय आहेत. बांग्लादेशीय मुलींना सीमापार नेण्याकरिता एनजीओ देखील शासनाकरिता काम करीत असतात. पोलीस एस्कॉर्ट व एनजीओ यांच्या मदतीने बांग्लादेशीय कौन्सलेटशी व बांग्लादेशातील पोलिसांशी संपर्क साधून सर्व प्रक्रिया परिपूर्ण करावी लागते. अन्यथा बांग्लादेशातील पत्त्यावर या मुलींना भारतातून सोडता येत नाही. बांग्लादेश या देशाच्या कौन्सलेटमध्ये विभागीय प्रतिनिधी गेले होते. बांग्लादेशातील पोलीस, प्रोटोकॉल ऑफिसर्स, कौन्सलेट यांचेशी संवाद साधून एक प्रोटोकॉल स्थापन करण्यात येणार आहे. बांग्लादेशातील काही अधिकरी तसेच, दिल्लीतील संबंधित अधिकारी मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी पाहणीकरिता येणार आहेत जानेवारी महिन्याअखेरीपर्यंत या संदर्भात बांग्लादेशीय एम्बसीच्या सहकार्याने प्रोटोकॉल स्थापन करण्यात येणार आहे. ज्यावेळी समितीने चेंबूर येथील नवजीवन महिला सुधारगृहाला भेट दिली होती, त्यावेळी १०० महिलांची क्षमता असलेल्या सुधारगृहामध्ये ३३० महिलांचा समावेश करण्यात आला होता. आता त्यापैकी २४० महिलांना कोर्ट ऑर्डरनुसार व विहित प्रक्रियेनुसार त्यांच्या घरी पोहोचविण्यात आलेले आहे. यासंदर्भात समितीच्या पुढील बैठकीत विभागीय सचिवांनी सांगितले की, या बांग्लादेशी मुलींच्या संदर्भात शासनाच्या टास्क फोर्सने १६ जानेवारी, २०१३ रोजी एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये बांग्लादेशाच्या ॲम्बॅसीचे प्रमुख श्री.नजीबूल रहेमान उपस्थित होते. या बैठकीमध्ये बांग्लादेशी मुलींची ओळख परेड करण्यात आली व त्यातील २१ मुलींना एका ट्रेनने बांग्लादेशाच्या सीमेवर सोडण्यात आले. सद्या ९० मुली या सुधारगृहात आहेत. त्यापैकी ३४ महिला बांग्लादेशी आहेत. त्यांना सुद्धा लवकरात लवकर बांग्लादेशात सीमेवर सोडण्यात येणार आहे. संस्थेतील प्रवेशितांना मायदेशी पाठविताना संस्थेमार्फत रु.४५/- इतका एक दिवसाचा प्रवेशितेचा भत्ता खर्च करण्यात येतो.सदरील खर्च हा कमी असल्याने त्यामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय टास्क फोर्सच्या दिनांक १६/१/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. याबाबत आयुक्तालयकडून प्रस्ताव होताच कार्यवाही करण्यात योतो.

१०.१०१ बांग्लादेशीय मुलींना कोर्टाचे आदेश आल्यानंतर सीमापार करून देण्यापर्यंतच शासनाची जबाबदारी सीमित असावी अन्यथा कोर्टाचे आदेश आल्यानंतरही बांग्लादेशीय मुलींचे वास्तव्य अनावश्यक होते. Only because of non-availability of police protection and escort, you are not able to deport them to Bangladesh. अशा प्रकारे सुधारगृहामध्ये बांग्लादेशीय मुलींना सामावून घेणे शक्य होणार नाही असे समितीने व्यक्त केले आहे.

१०.१०२ भिक्षेकरी गृहात खाजगी सुरक्षा रक्षक असल्याचे समितीला दिसून आले. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, येथे खाजगी सुरक्षा रक्षक देखील कार्यरत आहेत त्याच प्रमाणे बाहेरच्या गेटवर पाच पोलीस हवालदार व आत पाच महिला पोलीस हवालदार आहेत. व मेन गेट वर पाच पोलीस हवालदार कार्यरत आहेत. यावर भिक्षेकरी गृहात ज्या मुलींना ठेवण्यात येते त्या मुली मारहाण करण्याऱ्या नशा करणाऱ्या असतात त्यामुळे त्या ठिकाणी खाजगी महिला सुरक्षा रक्षक ठेवतात त्यापेक्षा तेथे पोलीस विभागातील निवृत्त झालेल्या महिला पोलीसांची नेमणूक करावी अशी सुचना समितीने केली.

१०.१०३ समितीने ज्यावेळी महिला सुधारगृहाला भेट दिली होती, त्या दरम्यान मुंबईच्या काही हॉटेल्स मध्ये पोलिसांनी रेड टाकल्यानंतर १०० ते १५० मुलींचा समावेश या सुधारगृहामध्ये करण्यात आला होता. क्षमतेपेक्षा अधिक कुंटणखान्यातील मुली सुधारण्याकरिता या सुधारगृहामध्ये आणल्यानंतर त्याचा वाईट परिणाम तेथील स्टाफच्या कामावर होतो. स्टाफच्या संख्येत वाढ होत नसून त्यांच्या कामामध्ये मात्र सातत्याने वाढ होत असते.

१०.१०४ सर्वप्रथम ज्यावेळी कुंटणखान्यातील मुलींना सुधारण्याकरिता सुधारगृहामध्ये आणले जाते, त्यावेळी त्यांच्या जवळ सिगरेट, चरस, गांजा, अफू, मोबाईल व इतर वस्तू आढळून येतात. या मुलींना सुधारगृहामध्ये प्रवेश करण्यास अनुमती देत असतांना त्यांच्याजवळील या सर्व वस्तू काटेकोर तपासणी करून काढून घेणे आवश्यक असते. महिला असल्यामुळे कपडे व इतर आवश्यक वस्तू आतमध्ये नेण्यास परवानगी दिली तर हरकत नाही. परंतु सिगरेट, चरस, गांजा, दारू अशा गोष्टी आतमध्ये नेण्यास परवानगी दिली तर सुधारगृहाचा उद्देश साध्यच होत नाही. या मुलींना केवळ आवश्यक वस्तुच आत घेऊन जाण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे, या सर्व गोष्टीकरिता विभागाने कोणती व्यवस्था

केलेली आहे याबाबत सुधारगृहातील सुधारगृहातील महिला पर्यवेक्षिका व इतर महिला स्टाफ या सर्व गोष्टींची काळजी घेत असतात.

१०.१०५ समितीने ज्यावेळी चेंबुर येथील सुधारगृहाला भेट दिली त्यावेळी तेथील एका प्रवेशिताने समितीस सांगितले की, कोर्टाने घरी पाठवण्याच्या आदेश दिल्यानंतर सुध्दा मला सुधारगृहातील लोक घरी पाठवित नाहीत. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, कुंटणखान्यातून सुधारगृहात आणलेल्या मुलींचे आई-वडील त्यांना ज्यावेळी भेटण्याकरिता येतात त्यावेळी ते आम्हाला सांगतात की, आमची मुलगी पूर्णपणे बरी होईपर्यंत सुधारगृहातच ठेवा. तसेच, कोर्टाच्या आदेशानुसार या मुलीसंदर्भात केसवाईज डिटेन्शन ऑर्डर कोर्टातर्फे देण्यात येते. त्यानंतरच मुलींना सुधारगृहामध्ये किती कालावधीपर्यंत ठेवावयाचे, या संदर्भात निर्णय घेण्यात येतो. कारण सुधारगृहातील मुलींनी सांगितलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे. वाममार्गाला लागलेल्या मुलींनी कोणत्या मनःस्थितीमध्ये कोणत्या प्रश्नाची उत्तरे कशी दिलेली आहेत, याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

१०.१०६ समितीने पुढे अशी विचारणा केली की, सुधारगृहातील मुलींना कोर्टामध्ये घेऊन जाणे व तेथून परत सुधारगृहामध्ये आणण्याकरिता पोलीस बंदोबस्त व वाहनाची आवश्यकता असते. काही कालावधीपूर्वी गृह विभाग सुधारगृहाच्या मागणीप्रमाणे त्यांना पोलीस वाहन व बंदोबस्त वेळेवर उपलब्ध करून देत नव्हते का ? तसेच, सुधारगृहामध्ये सुरक्षेकरिता व दिवसरात्र पाळत ठेवण्याकरिता खाजगी सुरक्षा रक्षकांना नेमण्यात आलेले आहे. यामधील शस्त्रधारी व विना शस्त्रधारी सुरक्षारक्षक किती आहेत ? खाजगी सुरक्षा रक्षकांना नेमण्याऐवजी गृह विभागातील शस्त्रधारी पोलीस कर्मचा-यांची नेमणूक करावयास पाहिजे होती. याबाबत माहिती देताना विभागीय सचिव गृह विभाग यांनी सांगितले की, सुधारगृहातील मुलींना कोर्टामध्ये ये-जा करण्याकरिता वाहन व पोलीस बंदोबस्त वेळेवर देण्याकरिता विभागाकडून आणखी काटेकोर लक्ष देणार आहोत आहे. केंद्रामध्येही सुधारगृहे व सामाजिक न्याय उपक्रमांना गृह विभागाच्या सहकार्याची तरतूद केलेली असते. केंद्र शासन सुधारगृहांच्या आधुनिकीकरण व सुधारण्याच्या उपचारामध्ये सुधारणा आणण्याकरिता निधीची तरतूद करणार आहे. सुधारगृहामध्ये मुलींना ठेवण्यासंदर्भात काहीतरी मिनिमम स्टॅण्डर्ड असणे आवश्यक

आहे. सुधारगृहातील मुलींना कोर्टामध्ये पोलीस बंदोबस्तात पोलिसांच्या वाहनामधून नेणे आणि आणणे यामध्ये गृह विभागाचा जी भूमिका आहे, ती त्यांनी निश्चितपणे काटेकोरपणे निभावणे आवश्यक आहे. सुधारगृहातील मुलींना कोर्टामध्ये ने-आण करण्यासाठी पोलिसी वाहन व बंदोबस्त देणे अत्यावश्यक आहे. कारण सुधारगृहातील मुली या ॲरोगंट व व्हायलंट असतात. सुधारगृहातील मुलींना कोर्टामध्ये नेण्याकरिता तसेच, त्यांना त्यांच्या मायदेशी, शहरातही पोलिसी बंदोबस्तामध्येच सोडावे लागते. या बाबीमध्येही पोलिसांचा महत्त्वाचा रोल आहे. बांग्लादेशीय मुलींना सुधारगृहातून मायदेशी पाठविण्याकरिता बांग्लादेशाची एम्बसी, एनजीओ, कौन्सलेट यांच्याशी संवाद साधण्याकरिता तसेच, सुधारगृहातील बांग्लादेशीय मुलींना सीमापार नेण्याकरिता पोलिसांच्या बंदोबस्ताची आवश्यकता असते.

१०.१०७ महिला सुधारगृहासाठी आवश्यक असलेला एस्कॉर्ट तसेच वाहने वेळेवर उपलब्ध करुन देण्यासंबंधी पोलीस विभागाकडून आवश्यक ते सहकार्य मिळणे आवश्यक आहे. हा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. असे मत समितीने मत व्यक्त केले.

१०.१०८ महिला सुधारगृहाच्या ठिकाणी केंद्र शासनाच्या निधीतून इमारतीचे बांधकाम सुरु आहे. परंतु तेथे केवळ पिलर बांधलेले आहेत, स्लॅब टाकलेला नाही. तेथील वॉल कंपाऊंड ५ फूट उंच आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करता सदर वॉल कंपाऊंडची उंची वाढविणे, तसेच स्ट्रेदंनिंग करणे आवश्यक आहे अशी सुचना समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्लॅन एस्टीमेट प्राप्त झाले आहे. ते वित्त विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

१०.१०९ भिक मागणे कायद्याने गुन्हा आहे. मुंबईत भिक्षेकरींवर कारवाई करण्याचे अधिकार पोलीसांना आहेत काय ? याबाबत पोलीसांची नेमकी भूमिका काय आहे याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधी गृह विभाग यांनी सांगितले की, सन २०११ मध्ये मुंबई शहरात ६०७५ भिक्षेकरुंवर कारवाई करण्यात आली आहे. सन २०१२ मध्ये ५४७३ भिक्षेकरुंवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबईतील धार्मिक स्थळांच्या ठिकाणी २०११ मध्ये ७९ वेळा तर सन २०१२ मध्ये ५९ वेळा कारवाई करण्यात आली आहे. तसेच महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत नमूद केले आहे की, मुंबई भिक्षेकरी प्रतिबंध अधिनियम १९५९ अन्वये कलम ४(१) नुसार भिक मागताना आढळून आलेल्या कोणत्याही

व्यक्तीस अधिपत्रावाचून अटक करण्याचा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने केलेल्या नियमानुसार याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस अधिकार आहेत. सदर अधिनियमाच्या ४(२) नुसार फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८ कलम ६१ याच्या ५ तरतूदी या कलमांन्वये केलेल्या प्रत्येक अटकेला लागू असतील आणि अटक केलेल्या व्यक्तिस न्यायालयापुढे हजर करण्यात येईपर्यंत पोलीस ठाणे किंवा विभाग यांचा प्रभारी असलेल्या अधिकारी त्या व्यक्तीस विहित केलेल्या रितीने ठेवण्याची व्यवस्था करील.

१०.११० भिक्षेकरी गृहात दाखल करण्यात आलेल्या भिक्षेकरुंची संख्या व इतर बाबीसंदर्भातील प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे. संस्थेत दाखल झालेल्या प्रवेशितांना संस्था आहार, वस्त्र, निवारा आरोग्य सुविधा वैद्यकिय सुविधा, व्यवसायिक शिक्षण अशा सुविधा पुरविते. तसेच स्थानबद्ध केलेल्या प्रवेशितांना पुनर्वसनासाठी इतर संस्थांमध्ये त्यांच्या प्रवर्गानुसार स्थलांतरीत केले जाते. **(विवरण क्र. ____)**

१०.११२ भिक्षेकरुंवर कारवाई केली असे जरी विभागाडून सांगण्यात आले असले तरी भिक्षेकरु लोकांकडून पुणे व मुंबई सारख्या मोठ्या शहरात त्रास होतो. शहरातील मोठ्या सिग्नलवर वाहने थांबल्यानंतर भिक्षेकरु याचबरोबर तृतीयपंथीसुद्धा मोठ्या प्रमाणात भीक मागून लोकांना त्रास देतात, पैसे मागत असतात. काही लोक पैसे देतात, काही लोक पैसे देत नाहीत. पैसे घेतल्याशिवाय काही भिक्षेकरु जागा सोडत नाहीत. अशा प्रकारचे चित्र मोठ्या रस्त्यांवरील सिंग्नलवर बघावयास मिळते. अशा भिक्षेकरुंवर पोलीस विभागाकडून काय कारवाई करण्यात येते. याबाबत विभागाकडून सांगण्यात आले की, चेंबूर, मानखुर्द व गोवंडी या परिसरातील रस्त्यांवरील सिग्नलवर मोठ्या प्रमाणात जनतेला व वाहनांना अडवून भीक मागितली जाते. या ठिकाणचा बंदोबस्त मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे. येथील भिक्षेकरु व तृतीयपंथी लोकांना अटक करण्यात आली आहे. अशा प्रकारची कार्यवाही सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे. पोलीस आयुक्त यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. भिक्षेकरु ॲक्ट प्रमाणे संबंधितांवर कारवाई करण्यात येते. भिक्षेकरुना पकडण्याचे अधिकार मुंबईतील ९३ पोलीस स्टेशनला आहेत व याबाबतचे कामकाज कुर्ला कोर्टात चालते.

१०.११३ भिक्षेकरुंना कोर्टात हजर केल्यानंतर त्यांना किती दिवसाची शिक्षा किंवा दंड होतो. दंडाची रक्कम ते भरत नसल्यामुळे त्यांना चार,पाच दिवस किंवा एक आडवडा, एक

महिना अशा प्रकारे शिक्षा होते. समितीने चेंबूर येथील भिक्षेकरु गृहाला भेट दिली त्यावेळी तेथे असे आढळून आले की, काही भिक्षेकरुंना सहा सहा महिने सोडलेले नाही. त्यातील काही लोकांनी समितीला अशी माहिती दिली की, ते भिकारी नाहीत, गावावरुन आल्यामुळे ते रेल्वे किंवा बस स्थानकात झोपलो होतो, त्यावेळी त्यांना पकडून येथे आणण्यात आले आहे. त्यांचे म्हणणे कोणीही ऐकून घेत नाही व त्यांना डायरेक्ट कोर्टात नेऊन उभे केले आहे. यावर भिक्षेकरींना कोर्टाने शिक्षा दिल्यानंतर त्यांना बेगर्स ॲक्टच्या तरतूदींनूसार बेगर्स होम मध्ये ठेवण्यात येते. त्यांच्यावर ५०० रुपये दंड आकारण्यात येतो. त्यांच्या नातेवाईकांना बोलावून त्यांना घेऊन जाण्यास सांगितले जाते. एक वर्षाच्या कालावधीत १७६ पुरुष व १७४ महिलांना पकडण्यात आले आहे. त्यातील १०६ महिलांना भिक्षेकरु गृहात ठेवण्यात आले आहे. चेंबूर येथील भिक्षेकरी गृहात एकूण ८ बॅरेक आहेत. त्यातील पाच चांगल्या स्थितीत असून ३ बॅरेक नादुरुस्त आहेत. आता नवीन इमारत बांधण्यात येत आहे.

१०.११४ समितीने पुढे अशी विचारणा केली की, एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशनवरील ज्या लोकांकडे काही काही पुरावे नसतात अशा बेघरांना भिकारी म्हणून अटक केली जाते. परंतु त्या लोकांना वकील दिला जात नाही. कोकण, कर्नाटक मधील किती तरी लोकांना अशा प्रकारे अटक केली जाते. याबाबत खुलासा करताना प्रोबेशन ऑफ ऑफेन्डर्स् ॲक्टमध्ये असलेल्या तरतूदीप्रमाणे विभागामध्ये जे प्रोबेशन ऑफीसर आहेत ते खऱ्या अर्थाने याची तपासणी करतात. जे बेगर्स् असतील त्यांना जर भिक्षेकरी गृहामध्ये पाठविले असेल तर त्यांच्या घरातील लोक असे सांगतात की, आम्ही त्यांचा स्वीकार करतो. ते बेगर्स आहेत असे म्हणणार नाही. मात्र आम्ही यांची काळजी घेऊ असे मॅजिस्ट्रेट समोर जाऊन सांगू शकतात काय हा मुद्दा आहे. आतापर्यंत ही प्रक्रिया बंद होती. आता ती सुरु करण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. प्रोबेशन ऑफ ऑफेन्डर्स् ॲक्ट हा अतिशय चांगला कायदा आहे. अन्य कायद्यामध्ये जरी भिक्षेकरी विरुध्द शिक्षेची तरतूद केलेली असली तरी या कायद्यान्वये भिक्षेकरींना शिक्षा देण्याऐवजी प्रोबेशन अधिकारीच भिक्षेकरींना त्यांच्या स्वतःच्या घरामध्ये जबाबदारीवर त्यांच्याच घरात ठेवतात आणि वेळोवेळी त्यांचे कौन्सिलिंग करतात. त्यांच्यावर प्रोबेशन अधिकाऱ्यांचा कंट्रोल असतो.

१०.११५ प्रोबेशन अधिकाऱ्यांचे वास्तव्य हे मुंबईत असते आणि भिक्षेकरी हे दुसऱ्या जिल्ह्यात वास्तव्यास असतील तर अशा परिस्थितीत कशी कार्यवाही करण्यात येते ? व सगळया जिल्ह्यांमध्ये प्रोबेशन अधिकारी नियुक्त केलेले आहेत काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता याबाबत विभागाकडून विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये दोन प्रोबेशन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. ते पूर्णवेळ शासनाच्या सेवेत आहेत. काही काळापूर्वी त्यांना त्यांचे जे काम आहे ते वगळता वेगळेच काम देण्यास सुरुवात झाली होती. परंतु आता प्रोबेशनवरील अधिकाऱ्यांनी मूळ कामाकडे लक्ष द्यावयास पाहिजे, नाहीतर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे आदेश देण्यात आले आहेत. विभागाने कडक पावले उचलली नाहीत तर भिक्षेकरी हे सराईत गुन्हेगारही होऊ शकतात. आता प्रोबेशनच्या कामाला जास्त गती देण्यात येणार आहे. यासाठी एक स्वतंत्र सेलही निर्माण करण्यात येणार आहे.

१०.११६ नियुक्त करण्यात आलेल्या प्रोबेशन अधिकाऱ्यांची नावे, त्यांच्या कार्यकक्षा, त्यांना देण्यात येणारा पगार आणि त्यांच्याशी संबंधित असलेली महत्वपूर्ण माहिती याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. असे निदेश समितीने विभागाला दिले. कारण याठिकाणी चांगले एन.जी.ओ. आले पाहिजेत, नाहीतर बोगस एन.जी.ओ. काहीही काम न करता शासनाचे पैसे घेतील. असेही मत समितीने व्यक्त केले.

१०.११७ समितीने पुढे विचारणा केली की, राज्यामध्ये सर्व जिल्ह्यात भिक्षागृहे आहेत काय ? जर असतील तर ती मुंबई सारखी अद्ययावत आहेत काय ? यावर राज्यामध्ये १३ बेगर्स होम असून मुंबई मध्ये २, पुणे येथे १, नागपूर येथे १, सोलापूर येथे २, रायगड व ठाणे येथे प्रत्येकी १ बेगर्स होम आहे.

१०.११८ जिल्हावाईज भिक्षेकरी गृहांची माहिती सांगतांना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आतापर्यंत भिक्षेकरी गृहे ही फक्त मुंबई, पुणे आणि नागपूर पर्यंत मर्यादित होती. पोलिसांनी भिकाऱ्यांना पकडून कोर्टासमोर उभे केले की, त्यांना १५ दिवसासाठी अंडर ट्रायल मुंबई, कोल्हापूर, पुणे, नागपूर येथे ठेवले जाते. नंतर त्यांच्या स्थानबध्दतेचे आदेश आल्यावर त्यांना संबंधित जिल्ह्यातील बेगर्स होम मध्ये पाठवले जाते.

१०.११९ तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जास्त भिकारी असतात पंढरपूर, कोल्हापूर, सोलापूर, ज्योतिबा ही तीर्थक्षेत्र आहेत आणि त्याठिकाणी देवळाच्या बाहेर मोठ्या प्रमाणात भिकारी बसलेले असतात. मात्र भीक मागणे हा कायदेशीर गुन्हा असल्यामुळे जर त्याठिकाणी कोणी भीक मागत असेल तर संबंधितांवर ॲक्शन घेतली पाहिजे. जर एखादा माणूस खरोखरच लुळा-पांगळा असेल आणि त्याला कोणी पैसे दिले तर समजू शकतो. पण त्याठिकाणी धडधाकट माणसे देखील भीक मागत असतात आणि भाविक त्यांना पैसे देतात. यासाठी सर्व्हेक्षण केले पाहिजे. याबाबतीत टी.आय.एस.एस. किंवा खात्यामार्फत सर्वेक्षण करता येईल यासाठी शिर्डी व शेगांव प्रस्तावित केले आहे. असे विभागाने सांगितले.

१०.१२० महाराष्ट्रातील जी तीर्थक्षेत्रे आहेत तेथे येणाऱ्या भक्तांना भिक्षेकरुंचा प्रचंड त्रास होतो. त्याठिकाणी भिक्षेकरी गृह असली पाहिजेत. तसेच यासाठी एनजीओकडूनही सर्व्हेक्षण केले पाहिजे अशी सुचना समितीने विभागास केली.

१०.१२१ राज्यातील भिक्षेकऱ्यांची संख्येबाबत माहिती देताना असे सांगण्यात आले की, २०१० मध्ये मुंबई शहरातील ५७०४ भिक्षेकऱ्यांना कोर्टामध्ये उभे करण्यात आले. त्यापैकी ६९९ जणांना भिक्षेकरी गृहामध्ये पाठविण्यात आले. परंतु याबाबतीत बोगसगिरी समोर आली आहे. एकंदर ५७९९ भिक्षेकरी स्थानबध्द झालेले आहेत. पाच लोकांना नव्याने कामाला लावण्यात आले हे कोर्टात सिध्द झाले आहे.

१०.१२२ बालसुधार गृहाची स्थिती काय आहे ? महाराष्ट्रामध्ये बालसुधार गृहांची संख्या किती आहे ? तेथे एकंदर किती मुले आहेत व या मुलांना कोणते काम दिले जाते यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, बालसुधार गृहाची ज्युवेनाईल जस्टीस ॲक्टखाली स्थापना केली आहे. या बालसुधार गृहांना आय.सी.डी.एस. मार्फत फंडींग केले जाते. प्रत्यक्षात ते गुन्हेगार आहेत परंतु त्यांना बेसिक वातावरण मिळू शकेल आणि जर त्यांचे व्यवस्थित शिक्षण झाले तर जे एफर्टस् असतात ते विभागाच्या कंट्रोलमध्ये रहातात. राज्यामध्ये बालसुधार गृहांची संख्या ६० आहे. एकूण बालसुधार गृहांपैकी ४८ एन.जी.ओ. मार्फत व १२ शासनामार्फत चालविली जातात. सुरुवातीला अशा मुलांना निरीक्षण गृहामध्ये ठेवले जाते आणि कोर्टाने त्यांना स्थानबध्द करण्याबाबत आदेश दिल्यावर या मुलांना स्थानगृहामध्ये ठेवले जाते. राज्यामध्ये ६ विशेष गृहे असून ६० निरीक्षणगृहे आहेत. तसेच सर्व मुलांना स्थानबध्द केले

जाते असे नाही. मुलांना कोणतेही काम दिले जात नाही, त्यांना व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातील बाल सुधार गृहामधील मुलांची संख्येबाबत सांगताना महाराष्ट्रामध्ये १ फेब्रुवारी २०१२ मध्ये शासकीय बालसुधार गृहामध्ये ६०० मुले व एन.जी.ओ.मार्फत चालविण्यात येणाऱ्या बालसुधार गृहामध्ये ४२७५ मुले असून एकूण ४८७५ मुले बालसुधार गृहामध्ये आहेत.

१०.१२३ सर्व बालसुधार गृहातील जे एन.जी.ओ.आहेत, ते योग्य प्रकारे काम करतात की नाही हे समितीला पहावयाचे असल्यामुळे त्यांची नावे समितीला देण्यात यावीत. एन.जी.ओ. यांना किती मानधन दिले जाते? याबाबत माहिती देताना सांगण्यात आले की, एका एन.जी.ओ.ला दर महिन्याला एका मुलाच्या पाठिमागे ९५० रुपये दिले जातात. यासाठी येणाऱ्या एकुण खर्चाबाबतची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल बालसुधार गृहाच्या स्वयंसेवी संघटनांची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागाने दिले.

१०.१२४ स्वयंसेवी संस्थांचे सुधारगृह असले तरी तेथे शासनाचे अधिकारी नियंत्रक म्हणून असतात आणि जे.जे. ॲक्टप्रमाणे कामकाज होत असते. या संस्थांवर देखरेख करण्यासाठी शासनाची बालकल्याण समिती देखील आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाशिवाय निरीक्षणगृहामध्ये कोणालाही ठेवता येत नाही. त्याचप्रमाणे जेवढा कालावधी सांगितला जातो तेवढ्या कालावधीसाठीच खर्च केला जातो. भरारी पथकाच्या माध्यमातून चौकशी केली जाते जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराखाली दर तीन महिन्या नंतर बैठक होत असते असेही विभागाकडून सांगण्यात आले.

१०.१२५ एन.जी.ओ. मार्फत प्रत्येक मुलावर ९५० रुपये खर्च होत असतात आणि शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या बालसुधार गृहांवर सारखाच खर्च होतो. मग अशा परिस्थितीत शासन बालसुधार गृहांची संख्येमध्ये वाढ का करीत नाही? याबाबतीत काय अडचण आहे ? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. परंतु निरीक्षक गृहाच्या कर्मचाऱ्यांना १०० टक्के अनुदान दिले जाते तसेच बालन्यायालयाच्या आदेशानुसार सुधारगृहामध्ये भिक्षेकरुंना पाठविले जाते. परंतु मुंबई शहर व उपनगरामध्ये सुरवातीपासुनच शासकीय सुधारगृहे नाहित. असे विभागाकडून सांगण्यात आले.

१०.१२६ मुंबई ही राज्याची राजधानी आहे. या मुंबईमध्ये भिक्षेकरींचे, महिलांचे प्रश्न जटील होत आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये सुधारगृहाचे मुख्यालय असणे आवश्यक होते. चोऱ्यामा-या करणारे, कुटुंबियांनी टाकून दिलेली मुले या मुंबईत येऊन आसरा घेतात. अशा परिस्थितीत मुंबई मध्ये येथे एकही सुधारगृह नाही अशी खंत समितीने व्यक्त केली.

१०.१२७ शासनामार्फत निरीक्षणगृहे कोठे स्थापन करता येतील हा मुद्दा तपासून पाहण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. याबाबत राज्यात जी मोठी शहरे आहेत तेथे बालसुधारगृहे स्थापन करण्यात यावे असे निदेश समितीने विभागास दिले

१०.१२८ मुंबई व ठाण्यामध्ये एनजीओंची संख्या किती आहे ? याबाबत माहिती देताना सांगण्यात आले की, मुंबईमध्ये चिल्ड्रन एड सोसायटी आहे. तसेच मुंबई शहर व उपनगरात प्रत्येकी २ निरीक्षणगृहे आहेत. दि.१.२.२०१२ रोजीनुसार मुंबईतील निरीक्षणगृहातील मुलांची संख्या ५५० व उपनगरातील मुलांची संख्या ३५० इतकी आहे. शासकीय सुधारगृहांना निकषाप्रमाणे शासनाच्या फंडातून निधी मिळतो. या निधीतून त्यांच्या सर्व गोष्टींची पूर्तता होते.

१०.१२९ शासकीय निधीतून या सुधारगृहातील सर्व गरजा भागत असतील तर एनजीओंना अधिक पैसा देण्याची गरज का भासते ? अशी शंका समितीने उपस्थित केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय सुधारगृहांमध्ये बजेटनुसार निधी दिला जातो. एनजीओ मात्र देणगीद्वारे मिळणाऱ्या निधीवर अवलंबून असतात.

१०.१३० महाराष्ट्र राज्यात अनेक एनजीओज आहेत. त्यांना 'युनो' कडूनही मदत मिळते. आपल्याकडे काही डेडिकेटेड संस्था आहेत. त्या समर्पित भावनेने काम करीत आहेत. त्याबद्दल दुमत नाही. चिल्ड्रेन एड सोसायटी ही नावाजलेली संस्था आहे. अशा सारख्या संस्था समाजसेवेच्या भावनेतून, उदात्त हेतूने काम करीत आहेत. पण काही ठिकाणी बोगस संस्था देखील आहेत. काही संस्था पैसे मिळविण्याच्या उद्देशाने काम करीत आहेत. त्यासंबंधी वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत. मागील एका बैठकीत त्रिपाठी आयोगालाही समितीसमोर बोलविले होते. लोकप्रतिनिधींनी व इतर सामाजिक संस्थांनी एनजीओंना मदत केली तर इंटरनॅशनल संस्थांकडूनही त्यांना मदत मिळू शकते असे मत समितीने व्यक्त केले.

१०.१३१ अर्थसंकल्पामधील तरतुदीनुसार सुधारगृहांचा खर्च भागवावा लागतो असे विभागाचे म्हणणे आहे. पण बजेटमध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध झाली नाही तर मुलांना उपाशी

ठेवले जाते काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एनजीओंनी जास्त फंड गोळा केला तर ते अधिक सोयीसुविधा पुरवू शकतात. त्यामुळे एनजीओ बाहेरच्या फंडावरच अवलंबून असतात. शासकीय सुधारगृहे उपलब्ध निधीनुसार खर्च करतात.

१०.१३२ सुधारगृहातील बालके कैदी नसतात. तेथील मुलांना अधिक चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. पूर्वीचे निकष बरोबर नसतील तर त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे काम विभागाला करावे लागेल. एनजीओ चांगल्या सुविधा देतात, शासकीय सुधारगृहांमध्ये चांगल्या सुविधा मिळत नाहीत असे बोलले जाते. त्यामुळे शासनाची बदनामी होते असे अभिप्राय समितीने दिले असता अर्थसंकल्पामधील तरतुदीतून मुलांना सर्व सुविधा भरपूर मिळतात. परंतु एनजीओ अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी देणगीद्वारे मिळालेल्या फंडाचा उपयोग करतात. खाजगी निरीक्षणगृहांच्या स्वतःच्या जागा आहेत. शासकीय निरीक्षणगृहांच्या स्वतःच्या जागा नाहीत. राज्यात कोणकोणत्या ठिकाणी बालसुधारगृहे स्थापन करता येतील यासंबंधी माहिती समितीस देण्यात येईल असे सांगण्यात आले.

१०.१३३ समाजातील काही संवेदनशील विषय असतात. समितीचे असे म्हणणे आहे की, या कामासाठी एनजीओ मिळाले नाही तर या मुलांना उघड्यावर सोडून देता येणार नाही. निदान २-३ जिल्ह्यांसाठी एक बालसुधारगृहाची निर्मिती करण्यासाठी विभागाचे नियोजन असावयास पाहिजे. विभागाने एनजीओवर १०० टक्के अवलंबून राहू नये. पनवेलच्या एनजीओची नोंदणी रद्द करावी लागली आहे. त्या ठिकाणी जो दुर्दैवी प्रकार घडला त्याबाबतचे प्रकरण कोर्टात गेलेले आहे. त्यामुळे एनजीओंच्या केवळ इमारती चांगल्या असून चालत नाही. तेथील माणसे इतरांबरोबर दीर्घ काळापर्यंत चांगला व्यवहार करतील याची शाश्वती देता येत नाही. भिक्षेकरी, बालसुधारगृहे हा राज्याच्या दृष्टीने चिंतेचा व महत्वाचा विषय आहे. विभागाने या संदर्भात अतिशय दूरगामी विचार करणे आवश्यक आहे. या कामासाठी एनजीओ पुढे आले नाहीत तर शासकीय बालसुधारगृहांची निर्मिती करुन त्यांना संरक्षण द्यावे व तसे नियोजन करावे अशी समितीची सूचना आहे. तसेच निदान प्रत्येक विभागीय स्तरावर तरी एक सुधारगृह असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विभागाने मास्टर प्लॅन तयार करावा. या सुधारगृहांमधून बाहेर पडणारी मुले चांगले नागरिक झाले पाहिजेत.

त्याच्यातून दरोडेखोर निर्माण होता कामा नये. म्हणून काही चांगल्या एनजीओज तयार कराव्या लागतील. सुधारगृहे, भिक्षेकरी तसेच हा विभागही उपेक्षित आहे. या विभागाकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे, आवश्यक तेवढा निधी दिला पाहिजे. त्यादृष्टीने विभागाने या विषयावर गांभीर्याने विचार करावा अशीही सूचना समितीने केली.

१०.१३४ नवीन भिक्षेकरी गृहाची इमारत बांधतांना किती चौरस मीटर जागा उपलब्ध होणार आहे याबाबत समितीने विचारणा केली असता नवीन भिक्षेकरी गृहाची इमारत बांधल्यानंतर ६७०० चौरस मीटर जागा उपलब्ध होणार आहे. त्यामध्ये कार्यालयासाठी जागा ठेवण्यात आली आहे असे सांगण्यात आले.

१०.१३५ भिक्षेकरी गृहात अपंग व लुळे पांगळे लोक सुद्धा असतात. त्यामुळे भिक्षेकरी गृहासाठी इमारतीचे बांधकाम करतांना तेथे उद्वाहनाची व्यवस्था तसेच रॅम्प असावायास पाहिजे. दोन भिक्षकरुंना फिरण्यासाठी इमारतीमध्ये मोकळी जागा असणे ही आवश्यक आहे. याबाबत काय तरतुद करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता या इमारतीत उद्वाहन बसवता येणार नाही व शेती करण्यासाठी दोन एकर जागा मोकळी सोडण्यात आली आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

१०.१३६ सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जी इमारत बांधण्यात येत आहे त्या इमारतीसाठी आता उद्वाहनाची व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच सदर इमारतीचे बांधकाम करताना सपोर्ट हॅन्डल व रॅम्प बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे ही इमारत बांधतांना प्लॅनमध्ये बदल करुन तेथे दोन उद्वाहन बसविण्यात यावेत. हा खर्च संबंधित विकासकांनी करावा. समितीने भिक्षेकरु गृहाला भेट दिली तेव्हा भिक्षेकरुंना ठेवण्यासाठी अत्यंत कमी जागा असल्याचे समितीच्या निदर्शनास आले कारण भिक्षेकरुंना तेथे गुन्हेंगारासारखे बंदीस्त करण्यात आले होते. बॅरेकच्या क्षमतेपेक्षा पाच सहा पटीने भिक्षेकरुंना ठेवण्यात आले असल्यामुळे त्यांना मोकळा श्वास घेण्यासाठी व फिरण्यासाठी तेथे मोकळी जागा असणे आवश्यक आहे. म्हणून दोन इमारतीमध्ये अडीच ते तीन हजार स्क्वेअर फूटाची जागा मोकळी सोडण्यात यावी अशी सूचना समितीने विभागास केली.

१०.१३७ सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. ही इमारत सर्व सोईसुविधा युक्त बांधावयास पाहिजे. त्या बांधकामाच्या बाजूला साधारणपणे

२५०० ते ३००० चौ.फु.ची मोकळी जागा ठेवणे, लिफ्टची सोय करणे, अपंगांसाठी स्ट्रेचरव्दारे ये-जा करता येईल, अशी लिफ्ट बसवावी. शेतीसाठी मोकळी जागा ठेवणे, अपंगांसाठी रॅम्पची व्यवस्था करणे, या गोष्टींचा समावेश प्रस्तावात करावा, असे समितीला वाटते. अन्य बांधकामांबाबत शासनाने कोणता निर्णय घ्यावा, याबाबत समितीला काहीही म्हणावयाचे नाही. त्याबाबत मंत्रिमंडळाने यापूर्वीच निर्णय घेतला आहे. विकासकाला जो वाढीव एफएसआय मिळणार आहे, त्या बदल्यात समितीने सुचविलेल्या बाबी पूर्ण करुन घ्याव्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाने महानगरपालिकेला नवीन प्लॅन सादर करावा आणि भिक्षेकरी गृह व अन्य शासकीय बांधकामांना अधिकाधिक फायदा कसा होईल, हे पहावे.

अशीही सूचना समितीने विभागास केली.

१०.१३८ सर्व सोई सुविधांचा विचार करुन इमारतीचे बांधकाम करण्यात येईल असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांकडून देण्यात आले.

१०.१३९ भिक्षकरी गृहाची संपूर्ण जमीन महिला व बालकल्याण विभागाची आहे. त्यामुळे या जमिनीचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव महिला व बालकल्याण विभागाकडून यावयास हवा होता. कोणत्याही प्रस्तावाच्या माध्यमातून संबंधित विभागाचे पहिल्यांदा समाधान होणे गरजेचे आहे. परंतु, हे सर्व बाजूला ठेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने या जमिनीच्या विकासाच्या बाबतीत घुसखोरी केली आहे. सन २००७ पासून हा प्रस्ताव रखडला आहे. वर्षानुवर्षे केवळ चर्चा सुरु आहे. महानगरपालिकेकडे संपूर्ण आराखडे सादर करण्यात आले आहेत. महापालिकेला जर काही आक्षेप असतील तर त्यांनी ते संबंधित विभागाला कळवावेत. अन्यथा, आराखडे मंजूर करावेत. सदर आराखडे मंजूर करण्याबाबत महानगरपालिकेला कोणत्या अडचणी आहेत ? याबाबत खुलासा करताना अतिरिक्त आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी समितीस सांगितले की, या प्रकरणी पहिला मुद्दा हा आहे की, मूळ नकाशे व आराखडे यांचा अभ्यास महानगरपालिकेकडून झाला आहे. परंतु, एका बाबतीत Change of Reservation चा मुद्दा आहे. शासकीय निवासस्थानांसाठी ०.५ एफएसआय दिला जातो. महापालिका आयुक्त अधिकचा २५ एफएसआय देऊ शकतात. या संदर्भातील प्रस्ताव दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी महानगरपालिकेकडे आला आहे. या प्रकरणी शासकीय निवास्थानांसाठी ०.५ एफएसआय अधिकचा देणार आहोत.

१०.१४० दुसरा मुद्दा हा आहे की, ले-आऊटमध्ये बदल झालेला असल्यामुळे रिव्हाईज ले-आऊटची मागणी संबंधित विभागाने केली आहे. या संदर्भात काही बाबतीत अधिकचा खुलासा महानगरपालिकेने संबंधित विभागाकडून मागविला आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर रिव्हाईज ले-आऊटला मंजुरी देण्यात येईल. यापेक्षा अन्य कोणतेही मुद्दे महानगरपालिका स्तरावर प्रलंबित नाहीत.

१०.१४१ महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे विकासकाला देय होणाऱ्या एफएसआयवर नियमानुसार उपलब्ध होणारा टीडीआर ते लोड करु शकतात. कारण, तशी तरतूद कायद्यातच आहे. त्यामुळे नेमके बांधकाम किती होईल, हे आताच स्पष्ट होणार नाही. अशी शंखा समितीने उपस्थित केली असता अधिकचा एफएसआय फक्त शासकीय निवासस्थानांच्या बांधकामासाठी देय होणार आहे असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

१०.१४२ भिक्षेकरी गृह, शासकीय वसतीगृह, शासकीय कार्यालये यासाठी वाढीव एफएसआय मिळणार आहे. विकासकाकडून शासनाला जास्तीत जास्त बांधकाम बांधून मिळावे आणि शासनाला अधिकची जागा उपलब्ध व्हावी तसेच विकासकाबरोबर यापूर्वीच करार करण्यात आला आहे व त्यानुसार शासनाला देय होणारी जागा लवकरात लवकर बांधून मिळाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

१०.१४३ सदरचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने मंजूर केलेला आहे. संबंधित विकासकाबरोबर कायदेशीर करार झाला असून तो नोंदणीकृतही झाला आहे. आता समितीला या निर्णयात कोणताही मोठा बदल करता येणार नाही. मंत्रिमंडळाने आपल्या निर्णयात बदल करावा, अशा प्रकारची शिफारस समितीने करणे योग्य होणार नाही. आता या प्रकल्पाने पुढची स्टेज गाठली आहे. त्यामुळे करारानुसार जे काम निश्चित करण्यात आले आहे, ते लवकरात लवकर कसे मार्गी लागेल, शासनाला अधिकाधिक फायदा कसा होईल आणि भिक्षेकरीगृह, महिलांचे वसतीगृह यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा कशा उपलब्ध करुन घेता येतील, यासाठी समितीची शासनाकडे आग्रहाच मागणी आहे.

१०.१४४ समितीने या सर्व प्रकरणाबाबत सविस्तर चर्चा केली आहे, अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली आहे, प्रत्यक्ष प्रकल्पस्थळाला भेट दिली आहे व त्यावरुन समितीचे असे मत झ

ाले आहे की, हा सर्व व्यवहार संशयास्पद आहे. त्यामुळे शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

१०.१४५ एखादा चुकीच्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान होणार असेल, लोकांचे नुकसान होणार असेल तर त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

१०.१४६ सार्वजनिक बांधकाम विभागाने भिक्षागृहाची जागा बीओटी तत्वावर दिलेली आहे. यासंदर्भातील ड्राफ्ट कोणी तयार केलेला आहे ? ही जागा ३० वर्षासाठी कराराने द्यावयाची असतांना आपण ती ९९ वर्षाच्या कराराने का दिली ? दर ३० वर्षाने जागा रिन्यू करण्याची आवश्यकता असतांना आपण ९९ वर्षाचा उल्लेख का केलेला आहे ? याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, सदर जागा लिजवर देण्यात आलेली असून शासनाच्या पॉलिसी प्रमाणे देण्यात आलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१०.१४७ भिक्षेकरी गृहाच्या जागेसंदर्भात हा करारनामा झाला त्यावेळी कोणत्या अटी व शर्ती लागू होत्या, सदर करार किती वर्षांसाठी झाला होता, संबंधितांचे या संदर्भात काय निदेश होते, या सर्व गोष्टीचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाकडून एखादी जागा विकासकाला देण्यासंदर्भात न्यायालयाने निदेश दिलेले आहेत की, शासनाने विकासकाला ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता जागा देऊ नये. परंतू सार्वजनिक बांधकाम विभागाकडून न्यायालयाच्या निदेशांची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसत आहे. न्यायालयाने असे आदेश कधी दिले, भिक्षेकरी गृहाच्या जागेबाबत जो ९९ वर्षांचा करार झाला, तो कोणत्या नियमान्वये झाला ? शासनाने विकासकाला भूखंड देताना नेमका किती वर्षांचा करार केला होता ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विकासकाबरोबर केलेला करार ९९ वर्षांकरिता आहे. अगोदर ३० वर्षांचा करार करण्यात येतो आणि नंतर ३० वर्षांनी ते पुन्हा ३० वर्षांसाठी रिन्यू करण्यात येतो. विकासकाबरोबर केलेला करार हा ३० वर्षात पून्हा रिन्यू करण्यात येतो करार रिन्यू बाजार भावानुसार अतिरिक्त मुल्य आकारणार नाही.

१०.१४८ ९९ वर्षांसाठी जागा लीजने दिलेली आहे. सुप्रीम कोर्टाच्या नवीन निर्णयानुसार ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी जागा लीजने देता येत नाही, असे असताना

९९ वर्षासाठी लीजने जागा कशी दिली ? मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या टिप्पणीमध्ये ९९ वर्षांच्या लीजचा उल्लेख नाही याचाच अर्थ सार्वजनिक बांधकाम विभागाने मंत्रिमंडळा पुढे विचारार्थ पाठविलेली नाही असे दिसून येत आहे. यामध्ये काही अधिकारी सुध्दा सामील आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची समितीने शिफारस केली पाहिजे.

१०.१४९ दि. २८/१/२००३ च्या शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, "खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करावयाचा शासकीय भूखंड खाजगी उद्योजकाला/विकासकाला ९९ वर्षाच्या दीर्घ मुदतीने रु.१ प्रति चौ.मी.प्रतिवर्ष या दराने भाडेपट्टयावर हस्तांतरित करण्यात येईल. या बाबत उद्योजक/विकासकांबरोबर करावयाच्या करारनाम्याचे नुतनीकरण दर ३० वर्षांनी करण्यात येईल. मात्र भाडेपट्टयाचा रु. १ प्रति चौ.मी.प्रतिवर्ष हा दर ९९ वर्षाच्या मुदतीसाठी कायम राहील." ३० वर्षानंतर लीज ॲग्रीमेंट वाढवले जाईल, असे म्हटले आहे. मात्र या ठिकाणी ९९ वर्षाकरिता दर मात्र १ रु. एवढाच निश्चित केलेला आहे. त्यामध्ये वाढ केलेली नाही. याबाबत माहिती देताना अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनी सांगितले की, खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करीत असताना शासकीय बांधकामाच्या बदल्यात विकासकाला मोबदला दिला जातो. सन १९९६ मध्ये खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करण्याच्या संदर्भात शासनाने धोरण जाहीर केले होते. हे बांधकाम करण्यासाठी येणारा खर्च वसूल करण्याकरिता ही जागा भाडेपट्याने खाजगी विकासकाला दिली जाते. करारनामा करताना दर ठरवलेला असला तरी देखील शासनाला जे बांधकाम मिळते त्याच्या कॅशफ्लोचा फिजीबिलीटी रिपोर्ट मंजूर करुन घेतला जातो.

१.१५० चेंबूर येथील जो भूखंड विकासकाला दिलेला आहे, त्याचा सध्याचा दर प्रचंड वाढलेला आहे. विकासकाने केलेले बांधकाम व त्याला ९९ वर्षाकरिता मिळणारा दर यामध्ये खूप मोठी तफावत असल्याचे दिसून येते. सदर विकासकाला किती एफएसआय मिळणार आहे ? यावर विकासकाला १ एफएसआय व टीडीआर मिळणार आहे. शासनाकडे एकूण २८.८० एकरची जागा होती. त्यापैकी ४० हजार स्क्वे.मी म्हणजेच साधारणपणे १० एकर जागा विकासकाला दिलेली असून १८.८० एकर जागेवर शासनाने बांधकाम केलेले आहे. विकासकाला जागा ९९ वर्षाच्या लीजने दिलेली आहे. १० एकर वरील जागेत रिक्रीएशन सेंटर देखील बांधण्यात आले आहे. विकासकाला जास्तीत जास्त २ एफएसआय मिळू शकतो

म्हणजेच विकासकाला साधारणपणे ७ ते ८ लाख चौ.मी.एफ.एस.आय प्राप्त होणार आहे काय ? शासनाला १५ हजार स्क्वे फू. बांधकाम करुन दिले जाणार आहे.

१०.१५१ सद्य:स्थितीत किती काम झालेले आहे याबाबतची माहिती देताना असे सांगण्यात आले की, प्रशासकीय भवन ९ लाख चौ.फू असून आंबेडकर भवन १ लाख चौ.मी.चे आहे. १ लाख ४१ हजार १५३ चौ.मी.चे बांधकाम शासनाला करुन दिले जाणार आहे. खाजगी विकासकाला ४० हजार चौ.मी.चा भूखंड दिला असून ३४ हजार चौ.मी च्या बांधकामावर १ टीडीआर मिळणार आहे. सध्याच्या टीडीआरचा दर साधारणपणे ३ ते ४ हजार आहे. टीडीआरचा दर झोन प्रमाणे वेगवेगळा असतो.

१०.१५२ या प्रकरणात अनियमितता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी केलेली असून त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. अनियमितता करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई केली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले आहे.

१०.१५३ सदर कामाकरिता ३६ महिन्यांची मुदतवाढ दिलेली आहे. मात्र येथील कामाची प्रगती पाहता, या मुदतीमध्ये काम संपेल असे वाटत नाही. या कालावधीमध्ये मुंबईतील जागेचे भाव जवळजवळ दुपटीने वाढले आहेत. या वाढलेल्या जागेच्या दराचे मूल्यमापन आपण केले आहे काय ? सन २००८ मध्ये वर्क ऑर्डर दिली होती. आराखडा मंजूर नसताना काम कसे काय मंजूर केले ? २७ ऑक्टोबरला वर्कऑर्डर दिली होती. या कामाकरिता लागणाऱ्या विविध प्रकारच्या मंजुऱ्या घेण्याची जबाबदारी कोणाची होती. आराखडयाला महानगरपालिकेकडून मंजुरी घेणे ही जबाबदारी विकासकाची होती व आक्टोबर २००८ मध्ये परवानगी मिळाल्यानंतर काम सुरु केले होते असे सांगण्यात आले.

१०.१५४ सन २००८ मध्ये कामाला सुरुवात केली. सर्वोच्च न्यायालयाने कधी निर्णय दिला ? हे काम सुरु होण्यापूर्वी निर्णय दिला होता काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची माहिती घेऊन समितीला सादर करण्याचे आश्वासित केले होते त्यानुसार पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

१०.१५५ लोकलेखा समितीच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ च्या बैठकीत दिलेल्या सूचनानुसार शासकीय भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयासंबंधात सार्वजनिक बांधकाम विभागाने महसूल व वन विभाग व विधी व न्याय विभाग

यांचेकडे अनौपचारिक संदर्भ करून मा.सर्वोच्च न्यायालयाचा असा निर्णय असल्यास उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे व त्याबाबत महसूल व वन विभाग तसेच विधी व न्याय विभाग यांचेकडे पाठपूरावा सतत करण्यात येत आहे. त्या विभागाकडे तपास सुरु असून उपरोक्त प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त झाल्यास तो लोकलेखा समितीस सादर करण्यात येईल.

१०.१५५ करार करताना कालावधी ३० वर्षाचा ठरवावयास हवा होता. त्या नंतर हा कालावधी वाढवता आला असता. मात्र तसे न करता सुरुवातीलाच ९९ वर्षाचे लीज करण्यात आले. अशा प्रकारे घाई का करण्यात आली ? ३० वर्षाकरिता लीज द्यावे, अशा प्रकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सन २००० मध्ये दिला होता. या संदर्भात शासनाने जीआर देखील निर्गमित केलेला आहे. मात्र अधिकारी वर्ग त्याचे पालन करीत नाही. त्यामुळे शासनाला पुन्हा या संदर्भात जी.आर निर्गमित करावा लागला याबाबत माहिती देताना विभागाडून सांगण्यात आले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००३ मध्ये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. खाजगीकरणाचे प्रकल्प राबविण्याच्या संदर्भात सदरचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. शासनाने काढलेला हा शासन निर्णय सर्व विभागांना लागू आहे. काही ठराविक लोकांना फायदा व्हावा, हा उद्देश समोर ठेवून विभागाने हा निर्णय घेतलेला आहे, असे मत समितीने व्यक्त केले आहे. **(विवरणपत्र क्र)**

१०.१५६ चेंबुरची जागा दिल्या नंतर इतर किती जागा ९९ वर्षाच्या लीजने दिल्या गेल्या आहेत ?या प्रकरणामध्ये शासनाचे बरेच नुकसान झालेले आहे. हे काम नियोजन विभागाने नाकारले होते. अशा प्रकारचे मोक्याच्या जागेवरील मोठे भूखंड हे शासनाच्या मालकीचे आहेत. त्यांचा विकास करताना योग्य प्रकारे विचार केला गेला पाहिजे. त्याबाबत विभागाने पुनर्विचार केला पाहिजे. हा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार केलेला आहे. त्यांच्यावर कारवाईचे आदेश दिले पाहिजेत अशी समितीची मागणी आहे.

१०.१५७ सदर जागा खाजगी विकासकाला ९९ वर्षाच्या लीजवर दिलेली आहे. ही मुदत ३० वर्षे असावी, तसेच वर्क ऑर्डर देऊन ५ ते ६ वर्षे झाली. वर्क ऑर्डर देताना जमिनीचे दर व आताचे दर यामध्ये खूप मोठा फरक आहे. यामुळे या दराचे देखील पुनर्मूल्यांकन करुन खाजगी विकासकाबरोबर वाटाघाटी कराव्यात. शासनाचे नुकसान होणार नाही, याची

खबरदारी घेण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी. तसेच शासन निर्णयानुसार १ रु. भाडेपट्टयामध्ये दरवाढ सूचवली आहे. त्यामध्ये देखील वाढ करण्याची आवश्यकता आहे. अशी सुचना समितीने केली.

१०.१५८ सदर प्रकरण विभागाने किती वेळा मूव्ह केले होते ? याबाबत माहिती देताना विभागाने सांगितले की, दि. २६/९/२००१ मध्ये मंत्रिमंडळाने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर दि. २३ ऑक्टोबर २००२ रोजी सा.बा.वि.,सामाजिक न्याय विभाग तसेच महिला व बाल विकास विभाग इ. विभागाच्या मंत्री महोदयांची एक बैठक झाली होती. या बैठकीमध्ये सदर प्रोजेक्टला स्थगिती देण्याचे ठरले. या नंतर दि. २९/१२/२००४ रोजी माननीय मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी पुन्हा एक बैठक आयोजित केली. या वेळी असे ठरले होते की, सदर प्रकल्प खाजगी विकासकाने राबवावा. समाजिक न्याय विभागाच्या हॉस्टेलची गरज ठरवून प्रस्ताव सादर करण्याचे ठरविण्यात आले. दि. ८/८/२००७ मध्ये या संदर्भातील अहवाल कॅबिनेट समोर सादर करण्यात आला. त्यास मान्यता मिळाल्यानंतर २००८ मध्ये आदेश देण्यात आले. महानगरपालिकेने काही कामास मंजुरी दिली असून अद्याप काही मंजुऱ्या मिळणे बाकी आहे. सदर कामाला हेरिटेज कमिटीची मंजुरी मिळण्यामध्ये काही अडचणी येत आहेत. भिक्षागृहाला परवानगी मिळाली असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनला मंजुरी मिळालेली नाही. सन २०११ मध्ये सबमिट केलेले असून त्यास अद्याप हेरिटेज कमिटीची मंजुरी मिळालेली नाही.

१०.१५९या प्रकल्पास केंद्रशासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. हा प्रकल्प सागरी तटीय विनियमन प्राधिकरणांतर्गत येत असल्यामुळे केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी सागरी तटीय विनियमन प्राधिकरणापुढे हा मुद्दा ठेवून त्यास प्राधिकरणाची अनुमती का घेतली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, हा प्रकल्प सीआरझेड मध्ये येत नसल्यामुळे प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्कता लागली नाही.

१०.१६० या सर्व प्रकरणामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण विकासकाला फायद्याचे असल्याचे दिसून येते. सरकारच्या फायद्यापेक्षा विकासकाचा फायदा होण्याकडेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष दिसते. हा जो निर्णय घेतला त्यावेळी अधिकारी कोण होते ? यावर देवधर हे अधीक्षक अभियंता, श्री. शाह हे मुख्य अभियंता व श्री. डी.बी.देशपांडे सचिव

होते. तसेच या प्रकल्पाचे काम शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. हा जीआर महसूल विभागाच्या संमतीने काढण्यात आलेला आहे.

१०.१६१ बीओटी तत्वावर प्रतिवर्षी १ रुपया प्रती चौ.मी.दराने विकासकाला ९९ वर्षाच्या कराराने लिज देण्यात आली आहे. शासकीय जमीन अशा प्रकारे लिजने देता येते का? ३० वर्षासाठी लिजने जमीन देण्याचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय केव्हा आला? हा करार करण्यापूर्वी आला की नंतर आला आहे? विभागाने कॅबिनेटचा यात अंतर्भाव केला आहे. विभागाने लिजचा मूळ प्रस्ताव तयार करताना ३३ वर्षाचा केला आणि तो कालावधी कॅबिनेटने ९९ वर्षाचा केला असेल तर समितीचे काही म्हणणे नाही. मूळ ॲग्रीमेंटमध्ये ९९ वर्षाचा कालावधी अंतर्भूत करण्यामागे हेतू काय होता? बालेवाडी येथे प्रती चौ.मी. ३० नये पैसे दराने लिजचा करार करण्यात आला. जो अधिकार मंत्रालयाला किंवा कॅबिनेटला आहे तो समिती नाकारीत नाही. मूळ करारामध्ये १ रुपया प्रतिवर्ष प्रती चौ.मी.इतके नाममात्र भाडे का प्रस्तावित केले? आज त्या भागात कमर्शियल रेट २० हजार रुपये प्रती चौ.फूट असताना लिजवर ८ लाख चौ.फूट जागा विकासकाला देत आहात. याबद्दल समिती नापसंती व्यक्त केली.

१०.१६२ भाडे तत्वावर विकासकाला जागा देत आहोत, विकासक त्या जागेचा विकास करणार आहे. त्या जागेवर ५०० कोटी रुपयांचे बांधकाम तो शासनाला करुन देणार आहे. त्या बांधकामाचा खर्च तो त्यातून वसूल करणार आहे. म्हणून प्रतिवर्ष १ रुपया प्रती चौ.मी.दराने जमीन देत आहोत असे विभागाने सांगितले यावर समितीने अशी विचारणा केली की, विकासकाने ५०० कोटी रुपये खर्च केला तर तो १० ते २० वर्षात वसूल होईल. पुढील संपूर्ण काळात तो भाडे घेणार आहे. शासकीय भिक्षेकरी गृहाचे बांधकाम करुन देणार आहे त्याबद्दल विकासकाला ८ लाख चौ.फूट जागेवर बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे. ९९ वर्षे तुम्ही १ रुपया प्रती चौ.मी.दराने भाडे घ्यायचे का? याबाबत खुलासा करताना विभागाकडून सांगण्यात आले की, कॅश फ्लो गृहित धरला आहे. पूर्ण भूखंड विकसित करुन दिल्यानंतर १२ टक्क्यापर्यंत विकासकाला फायदा होईल. ५०० कोटी रुपये वसूल करण्यासाठी विकासकाला ९९ वर्षे लागणार आहेत. पूर्ण रक्कम वसूल करण्यासाठी एन्टायर पिरिएड लागतो. लिज ॲग्रीमेंटसाठी वार्षिक १ रुपया प्र.चौ.मी.दर आहे. या संदर्भातील निर्णय कॅबिनेटने २००२ मध्ये घेतला आहे.

१०.१६३ वित्त विभागाने ही बाब मंजूर केली आहे का? वित्त विभागाने काय अभिप्राय व्यक्त केले होते? बालेवाडीच्या संदर्भात वित्त विभागाने सविस्तर अभिप्राय नमूद केले होते. वित्त विभागाला मान्य नाही असे नमूद केले होते. यासंदर्भातील टिप्पणी समितीला नंतर सादर करण्यात येईल असे वित्त सचिवांनी समितीस सांगितले परंतु अद्यापपर्यंत वित्त सचिवांकडून माहिती प्राप्त झाली नाही.

१०.१६४ तसेच सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची माहिती विभागाकडे उपलब्ध नाही असे सांगितले असता समितीने याबाबतही नापसंती दर्शविली आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची माहिती नसेल तर कोणत्या आधारे ९९ वर्षाचा करार केला? अशी विचारणा समितीने केली असता बीओटी तत्वावरील काम होते. २००३ मध्ये कॅबिनेटमध्ये निर्णय झाला होता. विकासक शासनाला जे बांधकाम करुन देणार आहे त्याचा मोबदला म्हणून ३०-३० वर्षांनी करार रिन्यू करावयाचा आहे असे सांगण्यात आले. ३० वर्षाचे लिज किंवा ९९ वर्षाचे लिज असले तरी या संदर्भात शासनाचे जी.आर., सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्टाचे निर्णय आणि शासनाने त्या काळात कोणाकोणाला किती वर्षाची लिज दिली आहे याची माहिती समितीला सादर करावी. अनेक प्रकरणात ३० वर्षाची लिज दिली असल्याची समितीला माहिती मिळाली आहे. या प्रकरणी मंत्रालयीन विभागाची टिप्पणी, शासनाचे धोरण, कायदेशीर अभिप्राय या सर्व कागदपत्राची फाईल तयार करुन समितीला दोन दिवसात सादर करावी. असे निदेश समितीने विभागास दिले असता सदर प्रकरणाच्या मुळ नस्ती विभागाकडून प्राप्त झाली आहे. तसेच त्यासोबत मंत्रीमंडळाच्या निर्णयाची टिप्पणी समितीस प्राप्त झाली आहे.

अभिप्राय व शिफारशी

१०.१६५स्थानिक महिला मंडळ, तसेच महिला बचत गटांद्वारे ताजा शिजवलेला पोषण आहार मुख्यत: ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांसाठी दिला जातो. त्या आहाराची शासनाच्या प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर हे खाद्यपदार्थ निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले. म्हणजेच टिएचआर योजनेअंतर्गत देण्यात येणारे धान्य खाण्यास योग्य नसते यावर समितीने असमाधान व्यक्त केले व अनेक अंगणवाड्यामध्ये जे निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते ते जनावरे सुद्धा खात नाहीत असे समितीने मत व्यक्त केले.

१०.१६६ **यावर समिती अशी शिफारस करते की, टीएचआर योजनेअंतर्गत जे खाद्यपदार्थ पोषण आहार म्हणून बालकांना दिले जातात ते प्रोटीन्स व कॅलरीज युक्त असतील व पुरवले जातील याबाबतची दक्षता बालविकास व प्रकल्प अधिकारी यांनी घ्यावी व याबाबतची कलेली कार्यवाही समितीला तीन महिन्यात अवगत करावी.**

१०.१६७ निराश्रित, द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना स्वत:चा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.५००/- इतके अनुदान एकदाच देण्यात येते. या अनुदानात वाढ करण्यात यावी. कारण ५०० रुपयांमध्ये कोणताही छोटा व्यवसाय सुरु करता येत नाही. सदर अनुदान वाढवून १० हजार रुपये करण्याचे प्रस्तावित असल्याचे सचिवांनी समितीस सांगितले.

१०.१६८ **५०० रूपयांमध्ये बँकेत खाते उघडता येत नाही. तर गरीब स्त्री स्वत:चा व्यवसाय कसा सुरु करेल त्यामुळे यामध्ये निराश्रित व द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी चालू परिस्थितीचा व सद्य:स्थितीचा तसेच दिवसेंदिवस बदलणाऱ्या परिस्थितीचा आढावा घेवून व्यवसायासाठी लागणारे अनुदान संबंधित महिलांकडून प्राप्त होणाऱ्या व्यवसाय सुरु करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा प्रस्ताव विचारात घेवून अनुदान वाढवून देण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

१०.१६९महिला व बाल विकास विभागाला काही बालकाश्रमांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. यासंदर्भात विभागाने छाननी मोहीम राबविली होती. तेव्हा १८६ बालकाश्रमात त्रुटी आढळून आल्या होत्या. त्या बालकाश्रमांची मान्यता रद्द केली आहे. सेवाभावी संस्थांमार्फत १,०७३ आणि शासनामार्फत ४६ बालकाश्रम चालविले जातात. **या बालकाश्रमांची तपासणी मोहीम सुरु ठेवली पाहिजे. तसेच सदर बालकाश्रमांचे नियमित इन्स्पेक्शनही झाले पाहिजे. एकुण बालकाश्रमांपैकी ७५ ते ८० टक्के बोगस आहेत. त्यामुळे शासनाचे पैसे वाया जात आहेत. म्हणून यासंदर्भात शासनाने कडक धोरण स्वीकारले पाहिजे अशी शिफारस समितीने केली.**

१०.१७० मुंबई, चेंबुर येथील सर्वे क्र. ४६९ (अ) हा भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असून तो भिक्षेकरी गृहासाठी वापरात आहे. सदर भूखंडाचे क्षेत्रफळ ११३९४.२० चौ.मी. इतके आहे. भूखंडावर सध्या महिला व बालविकास विभागाच्या बॅरेक्स असून त्या १९४७ साली बांधण्यात आल्या आहेत. सदर भूखंडाचा विकास खाजगीकरण्याच्या

माध्यमातून करण्याच्या प्रकल्पास दिनांक ८ ऑगस्ट, २००७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीमध्ये मंजूरी घेण्यात आली व खुल्या निविदेद्वारे विकासामार्फत देकार मागविण्यात आले. मे. झील व्हेंचर्स प्रा. लि. मुंबई या विकासकाची रू ११.१६ कोटी अधिमुल्य देऊ करणारी निविदा स्वीकृत करण्यात आली. एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौ.मी. असून यामध्ये १३ प्रकारच्या वेगवेगळया इमारती आहेत. विकासकाला या बदल्यात ४०००० चौ. मी. भूखंड मिळणार आहे.

१०.१७१ सदरहू भूखंडाच्या विकास कामास दिनांक २७ जून, २००८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सदर बांधकामे ४२ महिन्यांत पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु नगरविकास विभागाकडून भूखंड विकास मंजूर आराखडयातील आरक्षणात केलेले फेरबदल, भूखंड मांडणी आराखडयात बदल व स्थानिक लोकांकडून झालेला विरोध इत्यादी यामुळे काम सुरू होण्यास विलंब झाला. शासकीय बांधकामे पूर्ण करण्यासाठी ३६ महिने इतकी मुदतवाढ दिली असून ते पूर्ण करण्याची दिनांक २६ डिसेंबर, २०१४ आहे.

१०.१७२ सदरहू जागा महिला व बालविकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत असून त्याची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. सदर प्रकल्प हा बीओटी तत्वावर करण्यात येत आहे. **जून, २००८ मध्ये या भूखंडाच्या विकास कामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. विकासकाने ४२ महिन्यांत बांधकाम पूर्ण करावयाचे होते. परंतु बांधकाम पूर्ण होऊ न शकल्यामुळे डिसेंबर, २०१४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. अद्याप काम पूर्ण झालेले नाही. या ६-७ वर्षाच्या कालावधीत मुंबई शहरातील जागांचे वाढलेले भाव तसेच विकासकाबरोबर ९९ वर्षाचा करण्यात आलेला करार व विकासकाला खाजगी बांधकामासाठी ४०,००० चौ.मी. एवढी देण्यात आलेली जागा यांचा विचार केल्यास शासनाने अत्यंत तोट्यामध्ये याबाबत व्यवहार केल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच जागेचे आरक्षण बदलण्यापूर्वी कार्यारंभ आदेश कसे देण्यात आले असाही प्रश्न उपस्थित झाला. विकासकाला ४०००० चौ.मी. या भूखंडावर टिडीआर वापरून बांधकाम करण्यास मिळणार असल्यामुळे त्याला फायदाच होणार आहे व अधिमुल्य कोणात्या क्षेत्रफळावर आकारले आहे तसेच करार ३० वर्षांचा झाला असून नंतर त्यात वाढ करण्यात येणार आहे व त्यावेळच्या बाजार भावानुसार अतिरिक्त मुल्य आकारण्यात येणार नसल्याने विकासाकाबरोबर झालेल्या करारामध्ये फारच विसंगती समितीस आढळून आल्या**

तसेच हा करार विकासकास जास्तीत जास्त कसा फायदा होईल हा मुख्य उद्देश ठेवून करण्यात आला असे समितीसमोर दिलेल्या महितीनुसार समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे या भूखंडाच्या विकासासाठी निविदा प्रक्रिया करताना तिची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी न देणे, केवळ सिमीत वृत्तपत्रांमध्ये त्याची जाहिरात देणे, जागेचे आरक्षण बदलण्यापूर्वी कार्यारंभ आदेश देणे, विकासकाला मिळणाऱ्या टिडीआर व अधिमुल्य कोणत्या क्षेत्रफळावर आकारण्यात आले आहे याबाबत संदिग्धता ठेवण्यात आली आहे. त्यामुळे यापुढील काळात बी.ओ.टी. तत्वावर शासकीय मालमत्तांचा विकास करतेवेळी याप्रकरणी ज्या त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत त्या त्रुटी शासनाच्या पुढील बी.ओ.टी. प्रकल्पाच्या वेळी राहणार नाही यादृष्टीने शासनाने आवश्यक ती दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करित आहे.

१०.१७३ चेंबूर, भिक्षेकरी गृह येथे अस्तित्वात असलेल्या भूखंडाचे एकूण क्षेत्र १,१३,९२४.२० चौ.मी. (२८.८० एकर) असून यापैकी ४०,००० चौ.मी. विकासकाला क्षेत्र दिले आहे व झोपडपट्टी अन्य सोसायटयांना ४००३.६६ चौ.मी. क्षेत्र दिले आहे. शासनास शिल्लक भूखंड ६९,९१९.५४ चौ.मी. असून त्यावर १,४१,२४९.०८ चौ.मी. बांधकाम करावयाचे आहे. विकासक ४०,००० चौ.मी. वर किती बांधकाम करु शकतो यांची माहिती बांधकाम विभागाने दिलेली नाही. एकूण भूखंडापैकी ४० टक्के विकासकास व ६० टक्के शासनास अशा प्रमाणात भूखंडाचे वाटप करण्यात आल्याचे दिसून येत आहे. **चेंबूर येथील जागेचा यापुढील ९४ वर्षाचा बाजारभाव विचारात घेता विकासकास दिलेले जागेच्याक्षेत्राचे मुल्य दिवसेंदिवस वाढत जाणार आहे त्याची तुलना शासनास मिळालेल्या बांधकामाशी व सुविधाशी केली असता अत्यल्प असून शासनास देण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये व सुविधांमध्ये वाढ करण्यात यावी तसेच भिक्षेकरी गृह, शासकीय वसतीगृह, शासकीय कार्यालये यासाठी वाढीव एफएसआय मिळणार आहे. विकासकाकडून शासनाला जास्तीत जास्त बांधकाम बांधून मिळावे आणि शासनाला ३००० चौ.फु. अधिकची जागा उपलब्ध व्हावी तसेच विकासकाबरोबर यापूर्वीच करार करण्यात आला असला तरी त्यामध्ये सुधारणा करुन व त्यानुसार शासनाला देय होणारी जागेचे व वाढीव जागेचे लवकरात लवकर बांधकाम करण्यात यावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१०.१७४ भिक्षेकरी गृहामध्ये पुनर्वसन करण्याकरीता दाखल करण्यात येते. त्यादृष्टीने सद्य:स्थितीमध्ये असलेल्या भिक्षेकरी गृहाची रचना करण्यात आली आहे. परंतु विकासकामार्फत विकसित करण्यात येणाऱ्या भूखंडावरील इमारतीमध्ये भिक्षेकरींचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. महिला व बाल विकास विभागाच्या देखिल भिक्षेकरींचे अशा प्रकारे पुनर्वसन करण्यास विरोध आहे. विभागाच्या मते या भिक्षेकरींना मोकळी जागा उपलब्ध करून देणे तसेच सभोवतालच्या परिसरामध्ये त्यांच्यासाठी फिरण्याची/वावरण्याची सोय व त्यांना शेती करण्यास जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

१०.१७५ भिक्षेकरी गृहातील जागेमध्ये काही शासकीय सेवेतील कर्मचारी राहतात त्या कर्मचाऱ्यांना उपलब्धतेनुसार गृहनिर्माण संस्थेसाठी जागा देण्याचा विचार व्हावा.

१०.१७६ भिक्षेकरी गृहात दाखल होणारे भिक्षेकरी हे अपंग व लुळे पांगळे सुद्धा असतात. त्यामुळे भिक्षेकरी गृहासाठी इमारतीचे बांधकाम करतांना तेथे उद्वाहनाची व्यवस्था असणे ही आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जी इमारत बांधण्यात येत आहे त्या इमारतीमध्ये फर्निचर, रॅम्प, किचन व उद्वाहनाची व्यवस्था इ. प्रस्तावित करण्यात आलेली नाही. **सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम करण्यात येत असलेल्या इमारतीमध्ये फर्निचर, रॅम्प, किचन व लिफ्ट इ. सोयी करणे, तसेच दोन इमारतींमध्ये अडीच ते तीन हजार चौ.फु.ची मोकळी जागा ठेवणे या गोष्टींचा समावेश इमारतीच्या आराखड्यात करण्यात यावा व या सर्व बाबी विकासकाला जो वाढीव एफएसआय मिळणार आहे, त्या बदल्यात विकासकाकडून पूर्ण करुन घ्याव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीला सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

११ राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी विविध योजना राबवूनही गावांना/वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याबाबत.

११.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना **अनुदान क्र.वाय-२ मधील मुख्य लेखा शीर्ष-२२१५ "पाणीपूरवठा व स्वच्छता"** या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चा संबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र. वाय-२ "पाणीपूरवठा व स्वच्छता"

(रुपये हजारात)

११.२ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता दत्तमत			
मूळ पूरक }	१८,४०,५३,६९	१६,७०,२३,८१	-१,७०,२९,८८
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००८)			१,५६,३७,८१

टिपा व भाष्ये :- रुपये १,७०,२९.८८ लाख इतक्या अंतिम बचतीपैकी मार्च २००८ मध्ये रुपये १,५६,३७.८१ लाख इतकी रक्कम परत करणे अपेक्षित होते.

११.३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या विभागात २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता या लेखाशिर्षाखाली महत्तम तरतूद असते. सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात या लेखाशिर्षाखाली मूळ तरतूद रु. १८,४०,५३.६८ लाख व पूरक मागणी रु. १.०० हजार अशी एकूण अनुदान रु. १८,४०,५३.६९ लाख इतकी तरतूद असून त्यापैकी प्रत्यक्ष खर्च रु. १६,७०,२३.८१ लाख

इतका झाला आहे. तसेच रु.-१,७०,२९.८८ लाख बचत झाली आहे. या विभागाने वर्षभरात रु. १,५६,३७.८१ लाख इतके अनुदान प्रत्यार्पित केले आहे.

या अनुदानाखाली झालेली भरीव बचत/अधिक खर्च व प्रत्यार्पित केलेल्या रकमा याबाबतची सविस्तर स्पष्टीकरणे बाबनिहाय खालीलप्रमाणे आहेत.

(रुपये लाखांत)

११.४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा ००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता विभागीय / उपविभागीय आस्थापना. मूळ पुनर्विनियोजन	९,२०.५५	८,२०.०९	-१,००.४६

पदे रिक्त राहिल्यामुळे मार्च २००८ मध्ये रुपये १०६.८५ लाखांचा निधी परत करण्यात आला. रुपये १००.४६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८).

११.५ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात रु.१०,२७.४० लाख तरतूद करण्यात आली आहे. प्रत्यक्ष खर्चानुसार सुधारित अंदाजानुसार इतर शिर्षाखाली वाढीव निधी उपलब्ध करण्यासाठी बचत रु. १.०६.८५ लाख एवढया रक्कमेचे प्रत्यार्पण केले आहे. सदर रक्कमांमध्ये महालेखापाल कार्यालयाने तफावत दर्शविली नाही. एकूण सुधारित तरतूद रु. ९.२०.५५ लाख प्रत्यक्ष खर्च रु. ८,२०,०८,५४६ दर्शविण्यात आला असून, जिल्हा परिषदेमधील पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाने प्रत्यक्ष खर्चाच्या दिलेल्या माहितीनुसार रु.७,९८,३०,६३४ खर्च झाला असून, प्रत्यक्षातील बचत रु. १,००,४६,४५४ ऐवजी रु. १,२२.०५ लाख झालेली आहे. महालेखापाल कार्यालयाने प्रत्यक्ष खर्चाच्या घेतलेल्या नोंदीमध्ये तफावत दिसते. सदर बचत जिल्हा परिषद कार्यालयाच्या पाणी पुरवठा विभागातील

तांत्रिक, अतांत्रिक तसेच राजपत्रीत पदे रिक्त असल्याने झाली आहे जि.प. मधील पाणी पुरवठा विभागाच्या पदाचा आढावा मंजूरीसाठी वित्त विभागास सादर केला आहे. मंजूरी नंतर पदे भरण्यात येतील.

(रुपये लाखांत)

११.६ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १९१ स्थानिक संस्था, नगरपरिषदा इत्यादींना सहाय्य १९१ (०१) (०६) कर्जरोख्यावरील व वित्तीय व इतर संस्थांकडून घेतलेल्या कर्जावरील बांधील दायित्वांच्या परतफेडीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सहायक अनुदान			
मूळ पुनर्विनियोजन	७,५४,३५.९५	७,५४,३५.९४	-०.०१

सुधारीत आठमाही अंदाजांच्या प्रत्यक्ष गरजांच्या आधारे वित्त विभागाने मंजूर केलेल्या मार्च २००८ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन याद्वारे रुपये ११६१.५० लाख इतका निधी काढण्यात आला.

११.७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

महालेखाकार कार्यालयाने नमूद केलेले एकूण अनुदान, प्रत्यक्ष खर्च व बचत बरोबर आहे. हुडकोकडून रु. ७८.८५ कोटी प्राप्त होणाऱ्या कर्जाच्या अनुषंगाने व्याज व हमी शुल्काच्या परतफेडीसाठी आवश्यक तरतूद विचारात घेऊन अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली होती. परंतु दि. ३१.३.२००८ पर्यंत सदर कर्ज प्राप्त झाले नाही. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हुडको कर्जाचे उर्वरित हप्ते न उचलण्याचा निर्णय घेतल्यामुळे हुडकोस

अदा करावयाचे व्याज व हमी शुल्काची रक्कम त्या अनुषंगाने कमी झाली आहे. बचतीची रक्कम अत्यल्प आहे. खुलासा मान्य व्हावा.

पुढील उपशीर्षाखाली संपूर्ण तरतूदीचा वापर करण्यात आला नाही.

(रुपये लाखांत)

११.८ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२(०३)(०१) ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याचा वर्धित वेग कार्यक्रम- (डब्ल्यू एस-६) राज्यक्षेत्र ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठा योजनांसाठी ग्रामपंचायती / जिल्हापरिषदांना अनुदाने (१००% केंद्रपुरस्कृत योजना)			
मूळ पुनर्विनियोजन }	--	--	--

११.९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानापोटी ही नोशनल तरतूद करण्यात आली होती. केंद्राकडून सरळपणे राज्यास अनुदान प्राप्त झालेले नाही. ते राज्याची नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेख्यात केंद्राकडून जमा करण्यात आले. त्यामुळे ही तरतूद प्रत्यार्पित करणे आवश्यक होते. म्हणून शा.नि.क्र.पुनर्वि-२००८/एस-३/प्रक्र.९१/पापु-०४ दि.२५.०३.२००८ अन्वये ही तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली.

(रुपये लाखांत)

११.१० प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२ (०३) (०१) जागतिक बँक सहायित प्रकल्प नळाद्वारे पाणीपुरवठा योजना मूळ पुनर्विनियोजन }	--	--	--

११.११ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या लेखाशिर्षाखाली जागतिक बँक अर्थसहाय्यीत नळ पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीत उद्‌भवलेल्या लवाद प्रकरणांच्या बाबतीत आवश्यक खर्चासाठी तरतूद करण्यात आली होती. सन २००७-२००८ मध्ये न्यायालय प्रविष्ट अशा एका प्रकरणाचा निर्णय अपेक्षित होता. न्यायालय प्रविष्ट/ लवाद प्रकरणाचा निर्णय लागून शासनास प्रदान करावयाचे असल्यास प्रदान त्वरीत करावे लागते. विलंब झाल्यास ॲवॉर्ड रकमेवर व्याज आकारले जाते. यास्तव या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूद मार्चपूर्वी समर्पित करता येत नाही. मार्च २००८ पर्यंत न्यायालयाचा निर्णय न लागल्याने सर्व तरतूद समर्पित करण्यात आली.

(रुपये लाखांत)

११.१२ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ जलनि:सारण व स्वच्छता १०७ मलप्रणाल सेवा १०७ (०३) (०१) ग्रामसफाई कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य (केंद्रपुरस्कृत योजना) मूळ पुनर्विनियोजन	--	--	--

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च २००८ मध्ये वर नमूद केलेल्या शीर्षाखाली रुपये ३०९५ लाख इतकी संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करणे अपेक्षित होते.

११.१३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, केंद्र शासनाकडून मिळणारा केंद्र हिस्सा या उपलेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत करण्यात येतो. संपूर्ण स्वच्छता अभियनांतर्गत जिल्हा परिषदांना त्यांनी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात केंद्र शासनाकडून परस्पर केंद्र हिश्श्याचा निधी वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. परंतु, क्वचितप्रसंगी केंद्र शासनाकडून जिल्हा परिषदांऐवजी राज्य शासनाला निधी वितरीत केला जातो. अशा वेळी सदर निधी अर्थसंकल्पीत करुन संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यास कालापव्यय होऊ नये म्हणून केंद्र हिश्यासाठी लाक्षणिक स्वरुपात तरतूद करण्यात येते. त्यानुसार सन २००७-०८ मध्ये या उपलेखाशिर्षाखाली रु. ३००.०० लाख एवढी लाक्षणिक स्वरुपात मूळ तरतूद करण्यात आली होती. परंतु सन २००७-०८ या वर्षात केंद्र हिश्श्याचा सर्व निधी (रु. ६७८५.७३ लाख) संबंधित जिल्हा परिषदांना केंद्र शासनाने परस्पर वितरीत केला. त्यामुळे या उपलेखाशिर्षाखाली लाक्षणिक स्वरुपात केलेली तरतूद पुनर्विनियोजनात पूर्णपणे कमी करण्यात आली.

अनुदानातील बचत पुढील उपशीर्षाखाली झाली.

(रुपये लाखांत)

११.१४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
१०२(०२)(११) ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खोदलेल्या विहिरी			
मूळ पुनर्विनियोजन	२,५५.१२	२,२७.६६	-२७.४६

११.१५ **ज्ञापन :**

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ग्रामीण पाणी पुरवठा या जिल्हास्तरीय कार्यक्रमांतर्गत ग्रामीण नळ पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी विशेष घटक योजनेंतर्गत साधी विहीरीच्या कार्यक्रमांकरिता रु.२६०.१९ लक्ष इतकी मूळ तरतूद करण्यात आली. अंतिम सुधारीत अनुदान रु.२५५.१२ लक्ष इतके निश्चित करण्यात आले. सदर तरतूद ग्रामविकास व जलसंधारण विभागातर्फे जिल्हा परिषदांना मंजूर केल्या जात असलेल्या अर्थोपाय अग्रीमाशी समायोज्य आहे रु.२५५.१२ लक्ष अंतिम सुधारीत तरतूदीपैकी रु. २२७.६६ लक्ष इतकी तरतूद ग्रामविकास व जलसंधारण विभागातर्फे त्यांचे समायोजन ज्ञापन क्र.समायो-२००७/हस्तांतरण/प्रक्र.३४४७/वित्त-२, दि.२९.०८.२००७, ज्ञापन क्र.समायो-२००७/हस्तांतरण/प्रक्र.३४५६/वित्त-२, दि.२८.११.२००७, ज्ञापन क्र.समायो-२००७/हस्तांतरण/प्रक्र.३४६६/वित्त-२, दि. १३.०२.२००८, ज्ञापन क्र.समायो-२००७/हस्तांतरण/ प्रक्र.३४८२/वित्त-२, दि.२३.०५.२००८, ज्ञापन अन्वये समायोजित करण्यात आली आहे. महालेखापालांनी प्रत्यक्ष खर्च रु. २२७.६६ लक्ष इतकाच नोंदविला आहे. उर्वरित रु. २७.४६ लक्ष इतकी तरतूद ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून समायोजित न झाल्यामुळे तेवढी बचत दिसून येत आहे. सदरचे समायोजन करण्याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(रुपये लाखांत)

११.१६ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणीपुरवठा १०२- ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०७(०५)(०८) जर्मन सरकार कडून द्वीपक्षीय सहाय्य- नळाद्वारे पाणी पुरवठा योजना मूळ पुनर्विनियोजन	३७,२२.००	२९,८०.६२	- ७,४१.३८

रु. ७६८.८४ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, कोणतेही विर्निदिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २००८ मध्ये रु. २६८.०७ लाखांचा निधी परत करण्यात आला. रु. ७६८.८४ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षेत आहेत (ऑगस्ट २००८)

११.१७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या प्रकल्पातील कामांना गती मिळून योजना मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रकल्पाच्या मूळ आराखडयात थोडा बदल करुन हा प्रकल्प जलस्वराज्य प्रकल्पाच्या संकल्पनेनुसार चालवावा असे ठरले. या बदलास एप्रिल २००७ मध्ये मंजूरी मिळाली. अर्थात २००६-२००७ या वर्षात प्रकल्पाची कामे खंडीत झालेली होती. एप्रिल २००७ नंतर प्रकल्पाची दुसऱ्या टप्प्याची कामे सुरु झाली. प्रकल्पाचा योजनेच्या बांधकामावरचा महत्त्वाचा खर्च २००७-२००८ मध्ये होऊ शकला नाही. त्यामुळे रु. २६३.०० लक्ष तरतूद प्रत्यार्पित करावी लागली.

रु. ७,४१,३८,१००/- बाबतचे स्पष्टीकरण सोबत जोडले आहे. **(विवरण पत्र क्र. १)**

(रुपये लाखांत)

११.१८ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०७(०६)(०५) जागतिक बँक सहाय्य प्रकल्प - प्रकल्प नियोजन व संनियंत्रण युनिट (राज्यस्तरीय)			
मूळ पुनर्विनियोजन	४,५२,००.००	४,५२,००.००	---

११.१९ **ज्ञापन :**

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या लेखाशिर्षाखाली सन २००७-२००८ साठी अर्थसंकल्पात रु. ६,०२,००.०० लक्ष तरतूद मंजूर होती. जलस्वराज्य प्रकल्प ही मागणी आधारीत पुरवठा व लोकसहभाग या तत्त्वावर ग्रामीण भागात पिण्याचे पाणी व स्वच्छता सुविधा उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम आहे. या उपक्रमात एकूण ३३९१ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. त्यापैकी विविध कारणांमुळे २५४ ग्रामपंचायती सन २००७-२००८ मध्ये प्रकल्पातून वगळण्यात आल्या. त्यामुळे या २५४ ग्रामपंचायतीच्या योजनांवर होणारा खर्च झाला नाही. त्यामुळे मूळ अंदाजात मंजूर तरतूद रु. ६,०२,००.०० लक्ष मध्ये रु.१,५०,००.०० लक्षाची बचत झाली. सुधारीत अंदाज २००७-२००८ मध्ये रु १,५०,००.०० लक्ष तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे. उर्वरित सर्व तरतूद खर्च झाली आहे. या लेखाशिर्षाखाली कमी अथवा जास्त खर्च झालेली नाही.

(रुपये लाखांत)

११.२० प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२(०२)(१०) ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कुपनलिका. मूळ पुनर्विनियोजन	२,३८.९३	२,३८.९३	--

११.२१ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या लेखाशिर्षाखाली तरतूदीएवढाच खर्च झालेला असल्याने अभिप्राय अपेक्षित नाहीत.

(रुपये लाखांत)

११.२२ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२(०२)(१२) विद्युत पंप बसविणे/ हातपंपाचे विद्युत पंपात रुपांतर करणे मूळ पुनर्विनियोजन	१,७८.३१	१,८१.२१	+२.९०

११.२३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, आर्थिक वर्ष २००७-२००८ मध्ये अनुसूचित जातींसाठी उच्च क्षमतेच्या विंधण विहिरींवर विद्युत पंप बसविणे/हातपंपाचे विद्युतपंपात रुपांतर करणे या

कार्यक्रमाकरिता मूळ तरतूद रु. २५८.०१ लक्ष होती. जिल्हा परिषद कोल्हापूर, नाशिक व ठाणे यांच्याकडून खर्च होणार नसल्याने तरतूद समर्पित करण्यात आली. जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या मंजूर रु. ८०.७३ लक्ष तरतूदीतून समर्पित करावयाची रक्कम नजरचुकीने रु. ७०.७३ लक्ष ऐवजी रु. ७३.७३ लक्ष इतकी आदेशात नमूद केली गेली. मात्र अंतिम सुधारित अनुदान रु. १००.०० लक्ष इतके वितरीत करण्यात आले. त्यामुळे विभागाचे अंतिम सुधारीत अनुदान रु. १८१.२१ इतके असताना अनावधानाने ते १७८.३१ लक्ष इतके दाखविण्यात आले होते. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १८१.२१ लक्ष इतका झाला असून महालेखापाल कार्यालयाने तेवढयाच प्रत्यक्ष खर्चाची नोंद केली आहे. प्रत्यक्षात जादा खर्च झाला नाही. विभागाने दिलेले स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे.

(रुपये लाखांत)

११.२४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२(०२)(१९) विधण विहिरीचे जलभंजन स्त्रोतांचे बळकटीकरण यासाठी अनुदान (जिल्हा स्तर) पुरवठा			
मूळ पुनर्विनियोजन }	२८.०१	२७.३२	-०.६९

११.२५ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा स्तरीय कार्यक्रमांतर्गत बिगर आदिवासी क्षेत्रातील २२ जिल्हयामध्ये विंधण विहिरींचा जलभूजन कार्यक्रम राबविण्यासाठी व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण करण्यासाठी दि. ५१.९४ लाख इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. मागणी आधारित पुरवठा स्वरुपाचा कार्यक्रम असल्याने तसेच या कार्यक्रमासाठी १० टक्के लोकवर्गणी आवश्यक असल्याने या कार्यक्रमासाठी मागणी नव्हती. कार्यक्रमाअभावी रु.२०.०३ लक्ष इतकी समर्पित केलेली रक्कम

स्वीकारुन रु. ३१.९१ लक्ष इतकी तरतूद अंतिम सुधारित अनुदान म्हणून मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी प्रत्यक्षात रु. २७.३२ लक्ष इतका खर्च झाला आहे. लोकवर्गणीची रक्कम प्राप्त न झाल्याने कार्यक्रम राबविणे शक्य झाले नाही. परिणामी, अनुदान अखर्चित राहिले आहे. त्यामुळे बचत दिसून येत आहे. या लेखाशिर्षाखाली झालेली बचत कमी असल्याने स्वीकारण्यात यावी.

(रुपये लाखांत)

११.२६ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम १०२ (०५) (०९) जिल्हा पाणी व्यवस्थापन मूळ पुनर्विनियोजन	१,१९.४१	१,१९.३८	-०.०३

११.२७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, पुणे, अहमदनगर व औरंगाबाद या तीन जिल्ह्यातील आपलं पाणी प्रकल्पांतर्गत पाणी व्यवस्थापन कक्षांचा तसेच राज्यस्तरावरील प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचा वाढीव पदांसह वेतन-भत्त्यांचा खर्च भागविण्यासाठी रु. १७०.०० लक्ष तरतूद करण्यात आली होती. या लेखाशिर्षाखाली मार्च २००८ अखेर होणाऱ्या खर्चाचा अंदाज घेऊन रु. ११९.४१ लक्ष इतके अंतिम सुधारीत अनुदान मंजूर करण्यात आले. सन २००७-०८ मध्ये पुणे, अहमदनगर व औरंगाबाद या तीन जिल्ह्यातील पाणी व्यवस्थापन कक्षांसाठी प्रत्येकी १० अशी एकूण ३० नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. सन २००७-०८ च्या अर्थसंकल्प तरतूदींचा प्रस्ताव सादर करण्यात आला तेव्हा सन २००७-०८ मध्ये ही सर्व पदे एप्रिल, २००७ मध्ये भरली जातील असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात सर्व पदे भरली गेली नाहीत. काही पदे रिक्त राहिली व काही पदे उशीरा भरली गेली. त्यामुळे खर्च कमी झाला, रु. ५०.५९ लक्ष तरतूद समर्पित करावी लागली रु. ०.०३ ची बचत ही अत्यल्प असल्याने मान्य करण्यात यावी ही विनंती.

(रुपये लाखांत)

११.२८ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणी पुरवठा १९१ स्थानिक संस्था नगरपालिका इत्यादींना सहाय्य. १९१ (०२) (०९) प्रादेशिक असमतोल दूर करणे			
मूळ पुनर्विनियोजन	१,२४.००	१,२४.००	--

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता, वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २००८ मध्ये प्रत्यार्पण/ पुनर्विनियोजनाद्वारे रुपये १,५५,५२.४२ लाख इतका निधी काढण्यात आला.

वर नमूद केलेल्या शीर्षाखाली झालेली अंतिम बचत/अधिक खर्च यासाठीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८).

११.२९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रादेशिक असमतोल दूर करणे (२२१५१९९७), या लेखाशिर्षाखाली रु. ४,९९,००,०००/- इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली होती.

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार व अधीक्षक अभियंता (मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे, यांनी शासनास सादर केलेली अनुषांगिक माहिती आणि अनुदान मागणी यांनुसार, शासन निर्णय क्रमांक प्राअस-१८०७/प्र.क्र.४६१/पापु-२४ दिनांक ०४ मार्च,२००८ अन्वये रुपये ३,७५,००,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली होती.

वर्ष २००७-०८ या वर्षात उपरोक्त लेखाशीर्षाखाली रुपये १,२४,००,०००/- इतकी सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात उपरोक्त लेखाशीर्षाखाली रु. १,२४,००,०००/- इतके अंतिम सुधारीत अनुदान सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना मुक्त करण्यात आले आहे. या अंतिमत: मंजूर व मुक्त अनुदानाइतकाच खर्च क्षेत्रीय यंत्रणेने केला आहे. यामध्ये तफावत आढळून येत नाही.

(रुपये लाखांत)

११.३० प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणी पुरवठा १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम १०२(०२)(१५) नळाद्वारे पाणीपुरवठा योजना - भारत निर्माण कार्यक्रम यासाठी अनुदान (राज्यक्षेत्र)			
मूळ	५८,६५.००	५८,५३.१२	-११.८८

११.३१ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या लेखाशिर्षाखाली रु. ५८,६५.०० लक्ष मूळ तरतूद होती. अंतिम सुधारीत अनुदान तेवढेच निश्चित करण्यात आले. खर्च रु. ५८,५३.१२ लक्ष एवढा झाला असल्याने रु. ११.८८ लक्ष एवढी अल्प बचत झालेली आहे. खर्च हा मंजूर तरतूदीपेक्षा जास्त झालेला नाही. त्यामुळे वित्तीय अनियमितता झालेली नाही. झालेली बचत ही ०.२% असल्याने ती अत्यल्प आहे. त्यामुळे ती क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

११.३२ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०१ पाणी पुरवठा १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम १०२ (०२) (१६) नळाद्वारे पाणीपुरवठा योजना - देखभाल व दुरुस्ती यासाठी अनुदान.			
मूळ	२०,४४.९८	१९,९९.९८	-४५.००

११.३३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, या लेखाशिर्षाखाली रु.२०,४४.९८ लक्ष मूळ तरतूद होती. अंतिम सुधारीत अनुदान तेवढेच निश्चित करण्यात आले. खर्च रु. १९,९९.९८ लक्ष एवढा झाला असल्याने रु. ४५.०० लक्ष एवढी बचत झालेली आहे. खर्च हा मंजूर तरतूदीपेक्षा जास्त झालेला नाही. त्यामुळे वित्तीय अनियमितता झालेली नाही. झालेली बचत ही २.२% असल्याने ती अल्प आहे. त्यामुळे ती क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

११.३४ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ जलनि:सारण व स्वच्छता १०७ मलप्रणाल सेवा १०७(०२)(०३) केंद्र सहाय्यित शौचालय बांधणे (राज्यहिस्सा)			
मूळ	२६,९३.८१	२६,२५.१०	- ६८.७१

११.३५ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-०८ मध्ये या उपलेखशिर्षाखाली रु. २६९३.८१ लाखाची तरतूद करण्यात आली होती. या लेखशिर्षतर्गत रु. ६८.७१ लाखाची बचत दर्शविण्यात आलेली आहे. जिल्हा परिषद, वाशिम यांना २२१५२१६२ या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. तथापि, सदरची रक्कम २२१५२१७१ या लेखाशिर्षाखाली खर्च झालेली दर्शविलेली आहे. तसेच २२१५२१७१ या लेखाशिर्षाखाली वितरीत केलेली रक्कम रु. ५०.०० लाख इतकी रक्कम २२१५२१६२ या लेखाशिर्षाखाली खर्च झालेली दर्शविण्यात आलेली आहे. या दोन्ही लेखाशिर्षाबाबत **T.E.** महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे सादर केलेली आहे.

जिल्हापरिषद, नागपूर यांना या उपलेखाशिर्षाखाली रु. १८७.७३ लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आली होती. तथापि, सन २००७-२००८ या वर्षात वैयक्तिक शौचालय व शालेय स्वच्छतागृहांच्या बांधकामांचे उद्दिष्ट रु. ८०.७३ लाखात पूर्ण होणार असल्याने उर्वरित रक्कम रु. १०७.०० लाख इतकी बचत झाली.

सर्व जिल्हापरिषदांनी वैयक्तिकरित्या खर्चमेळाचे काम केल्याचे दिसून येते. तथापि खर्चमेळाचे काम योग्यप्रकारे न झाल्यामुळे महालेखापाल कार्यालयांनी दर्शविलेली बचत व विभागास बचत यातील तफावत महालेखापाल कार्यालयांच्या निदर्शनास आणता आली नाही.

(रुपये लाखांत)

११.३६ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०२ जलनि:सारण व स्वच्छता १०७ मलप्रणाल सेवा १०७ (०२) (०४) शौचालय बांधणे (राज्यस्तरीय योजना)			
मूळ	१५,६८.२१	१३,०५.५४	- २,६२.६७

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रु. ३८८.२६ लाख इतक्या अंतिम बचतीसाठीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८)

११.३७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-०८ मध्ये या उपलेखाशिर्षाखाली रु. १५६८.२१ लाखाची तरतूद करण्यात आली होती. या लेखाशिर्षातर्गत रु. २६२.६७ लाखाची बचत दर्शविण्यात आलेला आहे.

जिल्हापरिषदांना धुळे यांना रु. ६०.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. यापैकी रु. २५.०० लाख इतका खर्च झाला असून उर्वरित रक्कम रु. ३५.०० लाख विशेष घटक योजनेतील लाभार्थी नसल्याने सदर रक्कम खर्च झाला नाही.

जिल्हापरिषद, पुणे यांना रु. २५.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. तथापि, ती विहीत मुदतीत प्राप्त झाली नसल्याने महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी स्वीकारली नाही.

जिल्हापरिषद, कोल्हापूर यांना रु. ५०.०० इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. अपेक्षित खर्च रु. ५.०० लाख होणार असल्याने रक्कम रु. ४५.०० लाख बचत झालेली आहे. जिल्हापरिषद, वाशिम यांना २२१५२१६२ या लेखाशिर्षाखाली रु ५.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. तथापि, सदरची रक्कम २२१५२१६२ या लेखाशीर्षाखाली खर्च झालेली दर्शविलेली आहे. तसेच २२१५२१६२ या लेखाशीर्षाखाली वितरीत केलेली रक्कम रु. ५०.०० लाख इतकी रक्कम २२१५२१७१ या लेखाशीर्षाखाली खर्च झालेली दर्शविण्यात आलेली आहे. या दोन्ही लेखाशीर्षाबाबत T.E. महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे सादर केलेली आहे.

जिल्हापरिषद, नागपूर यांना रु. १००.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. सदर रक्कम परत करण्याबाबतचा प्रस्ताव जि.प. नागपूर यांनी जि.नि.वि.स. नागपूर यांचेकडे सादर केला. त्यानुषंगाने विशेष समाज कल्याण अधिकरी, नागपूर यांनी रु. १००.०० लाख बचतीचा प्रस्ताव मंजूर केला.

जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग व नंदूरबार यांना वितरीत केलेली रक्कम अनुक्रमे रु. ४.२१ लाख व रु. ५.०० लक्ष ही सर्व रक्कम खर्च केल्याचे त्यांनी सादर केलेल्या ताळमेळाच्या स्लिपवरुन दिसते.

सर्व जिल्हापरिषदांनी वैयक्तिरित्या खर्चमेळाचे काम केल्याचे दिसून येते. तथापि, खर्चमेळाचे काम योग्यप्रकारे न झाल्यामुळे महालेखापाल कार्यालयांनी दर्शविलेली बचत व विभागास आढळलेली बचत यातील तफावत महालेखापाल कार्यालयांच्या आणता आली नाही.

(रुपये लाखांत)

११.३८ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य १९१(०२)(०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान मूळ पुनर्विनियोजन	६२,८८.१९	६२,८८.१९	---

११.३९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारणासाठी सहाय्यक अनुदान (२२१५१६४७) या लेखाशीर्षाखाली रुपये २०,००,००,०००/- इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली होती.

मागणी क्रमांक वाय-२,२२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, या प्रधान लेखाशीर्षाखाली झालेल्या बचतीमधून पुनर्विनियोजनाद्वारे शासन निर्णय क्रमांक पुनर्वि-२००८/आर-१/प्रक्र९१/पापु-०४ दिनांक २५ मार्च, २००८ अन्वये रुपये ६८,५९,०००/- आणि शासन निर्णय

क्रमांक मपनि/पुनर्वि-२००८/आर-३/प्र.क्र.७२/पापु-०४ दिनांक ३१ मार्च, २००८ अन्वये रुपये ४२,१९,६०,०००/- अशी एकूण रु. ४२,८८,१९,०००/- इतकी रक्कम मागणी क्रमांक वाय-२,२२१५ (२२१५१६४७) या लेखाशीर्षाखाली वळविण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे एकूण रु. ६२,८८,१९,०००/- इतकी सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

(एकुण रु. २०,००,००,००० + ६८,५९,०००+ ४२,१९,६०,००० = ६२,८८,१९,०००)

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारणासाठी सहाय्यक अनुदान (२२१५१६४७), या लेखाशीर्षाखाली रुपये २७,८८,१९,०००/- इतके अनुदान अंतिमत: मुक्त करण्यात आली आहे.

मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत रुपये ३५,००,००,०००/- इतके अनुदान अंतिमत: मुक्त करण्यात आले आहे.

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात उपरोक्त नमूद कार्यक्रमाखाली एकूण रुपये ६२,८८,१९,०००/- इतके अंतिम सुधारित अनुदान सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना मंजूर व मुक्त करण्यात आले आहे. या अंतिमत: मंजूर व मुक्त अनुदानाइतकाच खर्च क्षेत्रीय यंत्रणेने केला आहे. यामध्ये तफावत आढळून येत नाही.

(रुपये लाखांत)

११.४० प्रधान शिर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)		**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य १९१ (०३) (०२) नागरी वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रम केंद्र हिस्सा.				
मूळ पूरक पुनर्विनियोजन	०.०१	४,६२.०७	४,६२.०६	- ०.०१

११.४१ ज्ञापन :

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात केंद्र पुरस्कृत योजना-नागरी वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रम -केंद्र हिस्सा (२२१५१८३४), या लेखाशीर्षाखाली रुपये ०४,००,००,०००/- इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली होती.

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार, उपरोक्त लेखाशीर्षाखाली रुपये ४,६२,०६,२५०/- इतकी सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. रुपये ६२,०६,२५०/- इतक्या रकमेची पुरवणी मागणी विधान मंडळाने मंजूर केली आहे. (वर्ष २००८ अर्थसंकल्पीय अधिवेशन.)

वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात उपरोक्त लेखाशीर्षाखाली सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रुपये ४,६२,०६,२५०/- इतके अंतिम सुधारीत अनुदान मंजूर व मुक्त करण्यात आले आहे. या अंतिमत: मंजूर व मुक्त अनुदानाइतकाच खर्च क्षेत्रीय यंत्रणेने केला आहे. यामध्ये तफावत आढळून येत नाही.

(रुपये लाखांत)

११.४२ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा १९१ स्थानिक संस्था, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य. १९१(०१)(०५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चा कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने (स्थानिक क्षेत्र नियमित आस्थापना मूळ पुनर्विनियोजन	६३,३७.०३	६१,१८.२०	-२,१८.८३

वर नमूद केलेल्या शीर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे रु. ४६०५.२९ लाख इतक्या अपेक्षित अधिक खर्चाच्या करण्यात आलेल्या तरतुदीसाठी कोणतेही निर्विदिष्ट कारण देण्यात आले

नाही. रुपये २१८.८३ लाख इतक्या अंतिम बचतीसाठीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००८)

११.४३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात रु. ६०,८१.९९ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. प्रत्यक्ष खर्चानुसार सुधारीत अंदाजानुसार इतर शीर्षाखाली वाढीव निधी उपलब्ध करुन रु. २,५५.०४ लाख एवढया रक्कमेची सुधारीत तरतूद केली आहे. सदर रक्कमामध्ये महालेखापाल कार्यालयाने तफावत दर्शविली नाही. एकूण सुधारीत तरतूद रु. ६३,३७.०३ लाख एवढी आहे. प्रत्यक्ष खर्च रु. ६१,१८,१९,६३९ दर्शविण्यात आली असून, जिल्हा परिषदेमधील पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाने प्रत्यक्ष खर्चाच्या दिलेल्या माहितीनुसार रु. ६०,२५,०२,३१७ खर्च झाला असून, प्रत्यक्षातील बचत रु. २,१८.३६१ ऐवजी ३,१२,००,३८३ झालेली आहे. महालेखापाल कार्यालयाने प्रत्यक्ष खर्चाच्या घेतलेल्या नोंदीमुळे तफावत दिसते. सदर बचत जिल्हा परिषद कार्यालयाच्या पाणी पुरवठा विभागातील तांत्रिक, अतांत्रिक तसेच राजपत्रीत पदे रिक्त असल्याने झाली आहे जि.प.मधील पाणी पुरवठा विभागाच्या पदाचा आढावा मंजूरीसाठी वित्त विभागास सादर केला आहे. मंजूरी नंतर पदे भरण्यात येतील.

(रुपये लाखांत)

११.४४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
०१ पाणीपुरवठा ००३ प्रशिक्षण ००३(०२)(२२) उपअभियान कार्यक्रम			
मूळ	१,४९.३३	१,६४.८८	+१५.५५

११.४५ **ज्ञापन :**

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, महालेखाकारी कार्यालयाने नोंदविलेली मूळ तरतूद, एकूण अनुदान रु. १४९.३३ लाख बरोबर आहे. महालेखाकारांनी नोंदविलेला प्रत्यक्ष खर्च रु. १६४.८८ लाख व त्यामुळेच अधिक खर्च रु. १५.१५ लाख बाबतचा खुलासा पुढीलप्रमाणे :

सर्व जिल्हापरिषदांकडून प्राप्त माहिती व शासनस्तरावरुन महालेखाकार कार्यालयात केलेल्या तपासानुसार विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १४१.८४ लाख इतका असून रु. ७.४९ लाख इतकी बचत झालेली आहे. सदरची बचत ही जिल्हापरिषद, अहमदनगर, उस्मानाबाद, भंडारा व धुळे यांनी अनुक्रमे रु. २.६४ लाख, रु. २.९९ लाख रु.१.०९ लाख व रु. ०.७७ लाख एवढया अनुदानाच्या रकमा कोषागारातून आहरीत न केल्यामुळे झाली आहे.

महालेखाकारांनी नोंदविलेला प्रत्यक्ष खर्च रु. १६४.८८ लाखामध्ये विभागाच्या प्रत्यक्ष खर्च रु. १४१.८४ लाखापैकी रु. १२६.८८ लाख इतक्याच रकमेचा समावेश आहे. यामध्ये सोलापूर जिल्हापरिषदेच्या एकूण रु. २९.९२ लाख प्रत्यक्ष खर्चातील रु. १४.९६ लाख इतक्या खर्चाचा समावेश केला नसल्याचे दिसून येते. महालेखाकार कार्यालयाने सोलापूर जिल्हापरिषदेला रु. २९.९२ लाख रकमेची ताळमेळ प्रमाणपत्रे दिलेली आहेत. तथापि जिल्हा परिषद, ठाणे यांनी २२१५२२४२ या उपशिर्षाखाली काढलेल्या रु. ३८.०० लाख इतक्या रकमेची नोंद २२१५२१४२ या उपशिर्षाखाली केलेली आहे. (१४१.८४-१४.९६+३८.००=१६४.८८) सदरच्या चुकीच्या नोंद दुरुस्तीचा प्रस्ताव या विभागाचे पत्र क्र. खर्च मे-२००९/सं.क्र.६०६/ पापु-४ दि.९/११/२००९ अन्वये महालेखापाल कार्यालयास सादर केला आहे. सदर उपलेखाशिर्षाखाली विभागाचा जादा खर्च झालेला नसून प्रत्यक्षात बचतच झालेली आहे. कृपया खुलासा मान्य व्हावा.

(रुपये लाखांत)

११.४६ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ जलनि:सारण व स्वच्छता १०७ मल:प्रणाल सेवा १०७ (०२) (०१) शौचालय बांधकाम धरुन संपूर्णग्राम स्वच्छता कार्यक्रम (सर्वसाधारण योजना)			
मूळ	३,३६.९२	३,४१.९२	+५.००

११.४७ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-०८ मध्ये या उपलेखाशिर्षाखाली रु. ३३६.९२ लाखाची तरतूद करण्यात आली होती. या लेखाशिर्षातर्गत रु. ५.०० लाखाचा अधिक खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी जिल्हा परिषद, नंदूरबार यांनी पडताळणी केली असता २२१५ २१७१ या लेखाशिर्षाखालील रु. ५.०० लाख ही रक्कम कोषागार कार्यालय, नंदुरबार यांनी २२१५ १७८१ या लेखाशिर्षाखाली खर्ची झाल्याचे दाखविलेले असल्याने रु. ५.०० लाखाचा अधिक खर्च दर्शविला आहे. त्यासंदर्भात T.E. महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे क्र. जिपन/संस्वअ/सलेअ/३०/०९, दि. ३० मार्च, २००९ च्या पत्रान्वये सादर केलेले आहे.

(रुपये लाखांत)

११.४८ प्रधान शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
(१)	(२)	(३)	(४)
०२ जलनि:सारण व स्वच्छता १०७ मल:प्रणाल सेवा १०७ (०२) (०५) केंद्र सहाय्यित योजनांतर्गत शौचालये बांधणे (राज्य हिस्सा)			
मूळ	६,५०.००	६,६९.३८	+१९.३८

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रुपये ३९.९३ लाख इतक्या अंतिम खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००८).

११.४९ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, सन २००७-०८ मध्ये या उपलेखाशिर्षाखाली रु. ६५०.०० लाखाची तरतूद करण्यात आली होती. या लेखाशिर्षातर्गत रु. १९.३८ लाखाचा अधिक खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

जिल्हापरिषद, पुणे यांना रु. १७.२५ लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे रु.२७.२५ लाख खर्च झाल्याचे दर्शविलेले आहे. यापैकी रु. १०.०० लाख हा अधिकचा खर्च २२१५२१७१ या लेखाशिर्षाचा असून सदरची रक्कम २२१५२१८९ या लेखाशिर्षाखाली खर्च झाल्याचे दर्शविले आहे. याबाबत जिल्हापरिषद, पुणे यांनी T.E. महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे सादर केली होती. तथापि, ती विहीत मुदतीत प्राप्त झाली नसल्याने महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे स्वीकारली नाही.

जिल्हापरिषद, सोलापूर यांना रु. ३१.९२ लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली होती. तथापि, यापैकी रु. १६.९२ लाख इतकी रक्कम खर्च झालेली आहे. उर्वरित रु.१५.०० लाखाची रक्कम प्राप्त झालेली नाही. सर्व जिल्हापरिषदांनी वैयक्तिकरित्या खर्च मेळाचे काम केल्याचे दिसून येते. तथापि खर्च मेळाचे काम योग्यप्रकारे न झाल्यामुळे

महालेखापाल कार्यालयांनी दर्शविलेला अधिकचा खर्च व विभागास आढळलेला खर्च यातील तफावत महालेखापाल कार्यालयांच्या आणता आली नाही.

साक्ष :-

११.५० दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ रोजी उपरोक्त ज्ञापनांच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रतिनिधांची साक्ष घेतली विभागाकडून वेळेत पूर्ण झाले नसल्यासंदर्भात या संदर्भात सामितीला माहिती देताना तत्कालिन प्रधान सचिव, पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला असे सांगितले की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या संदर्भात महालेखाकारांनी काही लेखापरीक्षण परिच्छेद काढलेले आहेत. निधीची रक्कम पूर्णपणे खर्च झालेली नाही, या संदर्भात देखील काही बाबी आहेत. ग्राम विकास विभाग व महालेखाकार यांच्या सोबत खर्चमेळ होणे आवश्यक होते मात्र ते काही ठिकाणी झालेले नाही. खर्चमेळ झाला नसल्यास किंवा उशिरा होणे ते आक्षेपार्ह आहे. साधारणपणे १५० कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिलेला आहे. त्याचा खर्चमेळाशी संबंध आहे. सन २००६-०७ पासून संपूर्ण देशात व राज्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने एक नवीन कार्यक्रम आखला व त्याची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. पूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत पाणी पुरवठा योजना मंजूर केल्या नंतर त्या योजनेची अंमलबजावणी केली जात होती. या संदर्भात अनेकांचे असे आक्षेप होते की, एखाद्या गावामध्ये किंवा शहरामध्ये पाणी पुरवठा योजना राबवताना तेथील गावकऱ्यांना किंवा नागरिकांना विश्वासात घेतले जात नाही. यामुळे पाईपलाईन कोठे टाकायची, पाण्याची टाकी कोठे बांधायची अशा स्वरुपाच्या काही अडचणी निर्माण होत होत्या. यामुळे ती योजना फारशी यशस्वी ठरत नव्हती.

११.५१ सन २०००-२००१ मध्ये शासनाने शौचालये बांधण्याची योजना सुरु केली होती. मात्र या योजनेमध्ये देखील नागरिकांचा सहभाग नसल्यामुळे बांधलेल्या शौचालयांचा जास्त प्रमाणात वापर होऊ शकला नाही. यामुळे या दोन्ही योजना फारशा यशस्वीपणे राबवता आल्या नाहीत. या नंतरच्या काळामध्ये शासनाने योजना राबविण्याच्या संदर्भात काही आमूलाग्र स्वरुपाचे बदल केले. कोणतीही योजना राबवताना तेथील स्थानिकांना विश्वासात घेऊन त्यांचे जास्तीत जास्त सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला. यामुळे योजनांच्या यशाचे प्रमाण वाढू लागले.

११.५२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जागतिक बँक, जर्मन बँक व केंद्र शासनाच्या मदतीने काही महत्वपूर्ण योजना राबवल्या आहेत. काही योजनांचे नियोजन करत असताना प्रोक्युरमेंट करिता विलंब लागल्याचे सचिवांनी समितीला सांगितले.

११.५३ अनुदान क्रमांक वाय-२ "पाणीपूरवठा व स्वच्छता" या परिच्छेदा संदर्भात पार्श्वभूमी विशद करताना तत्कालीन विभागीय सचिवांनी असे सांगितले की शासनाकडून २ प्रकारच्या योजना राबवण्यात आल्या होत्या. ग्रामीण पाणी पुरवठा करण्याकरिता केंद्र शासनामार्फत राजीव गांधी मिशन वर्धित पाणी पुरवठा योजना राबवण्यात आली. या योजनेकरिता ५० टक्के मॅचिंग ग्रँट निश्चित करण्यात आली होती. दुसरी योजना महाजल ही आहे. जलस्वराज्य योजनेकरिता १४७० कोटी रुपयांपैकी ६७० कोटी रुपये देण्यात आलेले आहे. सदर योजनकरिता जागतिक बँकेने कर्ज दिलेले आहे. हे कर्ज देताना त्यांनी काही अटी घातलेल्या आहेत. ३१०० गावांमध्ये ही योजना सध्या राबवण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत नियोजन करण्याची प्रक्रिया खूप लांबलचक होती. या योजनेमध्ये खूप चांगले काम झाले. महिला सक्षमीकरण करणे हा देखील या योजनेचा भाग होता. जर्मन बँकेने देखील एका योजनेला मदत केली होती. स्वजलधारा योजना अहमदनगर, पुणे, औरंगाबाद येथे राबवण्यात आली. या योजनेमध्ये काही रक्कम अखर्चित राहिली याचे मुख्य कारण योजेनेचे नियोजन क्लिष्ट होते. या नंतर शासनाने १० टक्के लोक वर्गणी गोळा करण्याची अट काटेकोरपणे पाळली. जोपर्यंत संपूर्ण गाव हागणदारी मुक्त होत नाही तोपर्यंत निधी वितरित केला गेला नाही. यामुळे काही ठिकाणी योजना राबवण्यामध्ये उशीर झालेला आहे. या वर्षी जल स्वराज्य योजनेकरिता ६०० कोटी रुपये मंजूर केले असून त्यापैकी १५५ कोटी रुपये पुनर्विनियोजित केले आहेत. ही रक्कम नोशनल रिएप्रोप्रिएशन केली होती. पूर्वीच्या योजनेमध्ये शासनाने अधिकाधिक शौचालये बांधण्यावर भर दिला होता. आता मागणी लक्षात घेऊन शौचालये बांधली जात आहेत. या करता जास्तीत जास्त नागरिकांना प्रेरीत केले जात आहे. नागरिकांनी दिलेली वर्गणी व शासनाचा निधी यांचा एकत्रितपणे वापर करून शौचालये बांधण्याची योजना तयार केली आहे. या दोन्ही कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य देशामध्ये अग्रेसर आहे. जल स्वराज्य प्रकल्प लोक सहभागावर आधारित असून या प्रकल्पाची अंमलबजावणी संपूर्ण राज्यामध्ये

अतिशय चांगल्या प्रकारे झालेली आहे. राज्यामध्ये दर वर्षी निर्मल ग्राम पुरस्कार देण्यात येतो. या माध्यमातून अधिकाधिक गावांना स्वच्छतेच्या संदर्भात प्रोत्साहन दिले जाते.

११.५४ जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागामधील रिक्त असलेली तांत्रिक व अतांत्रिक, राजपत्रित पदांची सद्यःस्थिती बाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषदेमध्ये साधारणपणे २ प्रकारची पदे असतात. जीएसडीए व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग येथील पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (माजिप्रा) मार्फत भरली जातात. कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्या पदांचा यामध्ये समावेश होतो. जीएसडीए मध्ये गट 'अ' अंतर्गत ३३ मंजूर पदे असून त्यापैकी ३१ पदे भरलेली आहेत. गट 'ब' मध्ये ९९ पदे मंजूर असून ४३ पदे भरलेली आहेत व ५३ पदे रिक्त आहेत. गट 'क' मध्ये ६७१ पदे मंजूर असून ३६४ पदे भरलेली आहेत व ३०७ पदे रिक्त आहेत. ही ३०७ पदे अतांत्रिक स्वरुपाची आहेत. गड 'ड'मध्ये ६६ पदे मंजूर असून ५५ पदे भरलेली आहेत व ११ पदे रिक्त आहेत. ही पदे सन २०११-१२मध्ये भरण्यात आली आहेत. गट 'अ' मधील ११ पदे भरण्यात आली असून गट 'ब' मधील ५३ पदे भरली आहेत. गट 'अ', 'ब' मधील पदे भरण्यासाठी मागणी केली असून गेल्या वर्षीपासून सतत उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पदे भरण्याचा प्रयत्न केला जात आहे.

११.५५ गट 'अ' मध्ये जिल्हा परिषदेच्या अंतर्गत ३०५ पदे मंजूर असून २६३ पदे भरलेली आहेत व ४२ पदे रिक्त आहेत. वर्ग २ मध्ये ९९ पदे मंजूर असून ४७ पदे भरलेली आहेत व ५२ पदे रिक्त आहेत. वर्ग ३ व ४ मध्ये २८८५ पदे मंजूर असून २२६५ पदे भरली आहेत व ६२० रिक्त आहेत. वर्ग ४ मध्ये ७११ पदे मंजूर असून ५९५ पदे भरलेली आहेत व ११६ पदे रिक्त आहेत. प्रतिनियुक्ती वरील पदे जिल्हा परिषदेमार्फत भरली जातात. वर्ग ३ व ४ ची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरली जातात. साधारणपणे वर्ग १ मधील पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजिप्रा) मार्फत भरली जातात. ही पदे बऱ्याच वर्षापासून भरली गेली नाहीत, याचे मुख्य कारण असे होते की, सदर पदांकरिता बिंदू नामावली तयार करण्यात आली नव्हती व मागणी पत्रक देखील पाठवण्यात आले नव्हते. आता बिंदू नामावली तयार झाली असून सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच मागणी पत्रक देखील तयार करुन विभागाला पाठवले जाणार आहे.

११.५६ जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागातील तांत्रिक व अतांत्रिक व अराजपत्रित पदांची सद्य:स्थिती काय आहे याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
वर्ग -१ तांत्रिक पदे	३०५	२५९	*४६
वर्ग - २ तांत्रिक पदे	९९	५५	#४४
वर्ग - ३ तांत्रिक पदे	१२	९८३	@८६
वर्ग - ३ व ४ अतांत्रिक पदे	२३२७	१८७७	४५०
एकूण	**४०००**	**३१७४**	**८२६**

* कार्यकारी अभियंता-३, उप अभियंता (यां) - ९,

\# सहायक भू वैज्ञानिक - १३, कनिष्ठ भू वैज्ञानिक इ ३१

@ कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) - ११,

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - २७५

११.५७ विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की.विभागामध्ये अद्यापपर्यत विविध संवर्गातील बरीच पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत पाणी पुरवठा योजना कशा प्रकारे राबवल्या जातील? अनेक जिल्ह्यांमध्ये उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांची पदे रिक्त आहेत. एका संवर्गामध्ये ३०० पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा पासून रिक्त आहेत, तसेच बिंदू नामावली का तयार करण्यात आली नाही ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बिंदू नामावली तयार करण्याची जबाबदारी प्रत्येक एजन्सीची आहे. जीएसडीएने तयार केलेली बिंदू नामावली पाणी पुरवठा विभागाला सादर केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडून मंजूर करून घ्यावे लागते. मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसे

न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई केलेली आहे. त्यांच्याकडे विखुरलेल्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती. आता ती एकत्रित करून शासनाकडे पाठवण्यात आलेली आहे.

११.५८ बिंदू नामावली तयार करण्यासाठी विशिष्ट पध्दत असते. ही पदे न भरल्यामुळे शासनाचे काम ठप्प झाले यामुळे जे संबंधित अधिकारी दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमध्ये पदे भरण्यासाठी काही अडचण होती. या ठिकाणी अनियमित पदोन्नती झाली होती. हा प्रकार सन २००१-०२ पासून सुरू होता. सेवा नियमावलीनुसार पदोन्नती झाली नाही. एकूण ९० अभियंतांचे अनियमित पदोन्नती झालेली आहे.

११.५९ अनियमित पदोन्नतीच्या संदर्भात १५ दिवसांमध्ये समितीला लेखी माहिती सादर करण्याबाबत तसेच या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात यावी व बिंदू नामावली ज्यांनी अंमलात न आणता बेकायदेशीरपणे पदोन्नती दिली त्यांच्यावर कारवाई काय केली? विभाग प्रमुख म्हणून ही बाब विभागीय सचिवाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी काय कार्यवाही केली याबाबतची माहिती समितीस सादर करण्यात यावी असे निदेश विभागास दिले. परंतु विभागाकडून यासंदर्भात माहिती अद्याप अप्राप्त आहे.

११.६० रिक्त पदामुळे तरतूद अखर्चित राहण्याचे कारण सांगताना तत्कालीन सचिवांनी माहिती दिली की, मध्यंतरी शासनाने पदे भरण्यावर बंदी घातली होती. प्रत्येक संस्थेने आपापल्या विभागातील पदांचा आढावा घेऊन नंतरच पदे भरणे आवश्यक आहे असे सुचविण्यात आले होते. सहा महिन्यांपूर्व बंदी उठविण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणांतर्गत प्रक्रिया सुरु झाल्यानंतर रिक्त पदे भरण्यात येतील.

११.६१ पाणीपुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता विभागीय, उपविभागीय या शिर्षाखाली प्रशासकीय खर्चात बचत दाखविली आहे. किती पदे मंजूर आहेत, किती खर्च येणार आहे याची माहिती असताना अतिरिक्त तरतूद का मागितली जाते? पदे भरली नाही म्हणून बचत झाली असे कारण सांगितले जाते. वर्षानुवर्षे पदे रिक्त आहेत, तरी देखील तरतूद वाढवून का मागितली जाते? विभागामध्ये पध्दत अशी आहे की, पदे किती मंजूर आहेत त्या प्रमाणात तरतूद केली जाते. यासंदर्भात विभागाकडून मात्र उत्तर प्राप्त झाला नाही.

११.६२ शासनाकडून पाणी पुरवठा योजनेकरिता मोठ्या प्रमाणात निधी पुरवला जातो. मात्र या निधीचा वापर योग्य प्रकारे केला जात नाही. शासनाने सुरूवातीला जी योजना सुरू केली होती त्यामध्ये सरपंच, ग्रामसेवक व गावकऱ्यांचा समावेश समितीमध्ये केलेला होता. ही योजना ४० लाख रुपयांची असून त्याकरिता २० लाख रुपये अग्रिम देण्यात आला होता. या योजनेच्या माध्यमातून वर्षभर गैरव्यवहार सुरू होते. कोट्यवधी रुपये खर्च होऊन देखील प्रत्यक्ष लाभार्थ्यांना त्याचा काहीच फायदा मिळत नाही. सन २०११-१२ मध्ये ज्या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडला तेथेही टँकरने पाणी पुरवठा केला. अशा प्रकारे शासनाच्या निधीचा अपव्यय करण्यात आला, तसेच आज राज्यात अनेक भागात पाण्याची टंचाई असल्यामुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असूनही अनेक गावात उन्हाळ्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. ज्या भागात मोठया प्रमाणात पाऊस पडतो किमान ते भाग टँकरमुक्त करावेत असे उद्दिष्ट घेऊन विभाग पुढे जाणार की नाही? कोकणामध्ये प्रतिवर्षी प्रत्येक जिल्हयात, तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करायचा अशी विभागाची भावना झालेली आहे काय? ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत माहिती देताना तत्कालीन विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाचा उद्देश हाच असतो की, पाणी टंचाई असलेल्या गावाला टँकरमुक्त करायचे. कारण टँकरने पाणीपुरवठा करणे सोपे नाही आणि नागरिकांच्या दृष्टीने देखील ते सोयीचे नाही.

११.६३ राज्यात अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना राबविल्या आहेत. त्या योजनांवर मोठया प्रमाणात निधी खर्च केला गेला आहे, पायाभूत सुविधा उभ्या केल्या, मोठया प्रमाणात यंत्रणा निर्माण केली गेली. असे असूनही महाराष्ट्र राज्यात आज ८० ते ९० टक्के योजना कार्यान्वित नाहीत असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. लोकांना या योजनांच्या माध्यमातून पाणी मिळत नाही. पाणी पुरवठा विभागाचे म्हणणे आहे की, योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित कराव्यात. जिल्हा परिषदांचे म्हणणे आहे की, योजना पूर्ण नसल्यामुळे जिल्हा परिषद त्या योजना ताब्यात घेऊ शकत नाही, जिल्हा परिषदाकडे यंत्रणा नसल्यामुळे त्या योजनांची देखभाल ते करु शकत नाही. या संदर्भात ठोस विचार न केल्यामुळे सगळ्या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ठप्प झालेल्या आहेत. नगरपालिकांच्या हद्दीतील पाणी पुरवठा योजनांची देखील अशीच अवस्था आहे. १० कोटी, २० कोटी, ४०

कोटी रुपयांचे अंदाजपत्रक केले, १०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक अंमलात आणूनही गावांना पाणी मिळत नाही, ही बाब फार गंभीर आहे. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

११.६४ जिल्हानिहाय किती पाणीपुरवठा योजना पूर्णपणे बंद आहेत, ज्या योजना उद्घाटनपुरत्या सुरु झाल्या आणि नंतर बंद झाल्या याची माहिती तसेच प्रादेशिक योजना बंद असणे, योजना पूर्ण होऊनही लोकांना पाणी न मिळणे याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल समितीस देण्यात यावा जेणे करून संबंधितावर जबाबदारी निश्चित करता येईल असे निदेश समितीने दिले. परंतु अद्यापपर्यंत विभागाकडून माहिती प्राप्त झाली नाही.

११.६५ ९० टक्के योजनांचा निधी खर्च होऊनही योजना कार्यान्वित नसण्याची कारणे काय आहेत? यासंदर्भातचे अधिकार ग्रामपंचायतींना दिले आहेत. त्यांना समिती नेमून निविदा मागविण्याचे अधिकार दिले आहेत. निविदा मागवून पाईप खरेदी करण्यात येतात. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागाने कोणती यंत्रणा उभी केली? ९० टक्के योजनांचा ९० टक्के निधी खर्च होऊनही गावांना पाणी मिळत नाही. त्यामुळेच ग्रामसभेला निधी देण्यात आला. त्या ठिकाणी सरपंच, ग्रामसेवक यांचे नियंत्रण नाही. एखाद्या ग्रामपंचायतीने भ्रष्टाचार केला म्हणून गुन्हा दाखल केला का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, ग्रामपंचायतीमध्ये समिती स्थापन केलेली आहे. किती समित्यांविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे याचा समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीला देण्यात आले परंतु समितीला अद्यापपर्यंत विभागाकडून प्राप्त झालेली नाही. प्रथम खबरी अहवाल दाखल केलेल्या संबंधित ग्रामपंचायत बरखास्त केली का? याबाबत विभागीय सचिवांनकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

११.६६ ग्रामपंचायतीला डावलून गावातील आपापल्या मर्जीतील लोकांना कामे दिली जातात. या संदर्भातील कायदा आणि नियम कसे तयार केले? कारण शासनाची कोणतीही योजना ग्राम पातळीवर राबवायची असेल तर त्यासाठी लोकशाही मार्गाने निवडून आलेली संस्था म्हणजे ग्रामपंचायत आहे. पण ग्रामपंचायतीला डावलून कामे करुन घेण्यात आली असे ही समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

११.६७ महाजल योजनेवरील खर्चामध्ये १ कोटी रुपये बचत झाल्याची कारणे काय आहेत? याबाबत माहिती देताना तत्कालीन विभागीय सचिवांनी सांगितले कि, आस्थापनेवरील

खर्च कमी झाला आहे. पदे भरली नसल्यामुळे राज्य शासनाचा आस्थापनेवरील खर्च कमी झाला. जागतिक बँक आणि जर्मन बँकेची योजना होती, त्या संदर्भात नागरिकांचा सहभाग घेण्याची अट होती. नागरिकांचा सहभाग घ्यावा म्हणून ग्रामपंचायत कायद्यामध्ये बदल करुन ग्राम पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य समिती तयार केली होती.

११.६८ आस्थापना खर्च कमी झाला म्हणून बचत झाली असे विभागीय सचिवांनी सांगितले परंतु स्पष्टीकरण ज्ञापनामध्ये म्हटले आहे की, तांत्रिक व अतांत्रिक पदे रिक्त असल्यामुळे बचत झाली आहे. यामध्ये शासनाची चूक झाली हे मान्य केले आहे. पदे मंजुरीसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. किती दिवसात पदे मंजूर होतील आणि भरली जातील याची माहिती समितीला देण्यात यावी असे सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही पदे भरली जातात, त्याच पध्दतीने सेवानिवृत्तीमुळे देखील पदे रिक्त होत असतात. ही सायकल असते. काही पदे भरण्यात आली आहेत. परंतु विभागाने दिलेले उत्तर समितीने मान्य केले नाही कारण सेवानिवृत्तीमुळे किती पदे रिक्त होणार आहेत याची विभागाला माहिती असते व संबंधित कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक विभागाकडे असते. त्यावरुन कोण केव्हा निवृत्त होणार आहे याची कल्पना विभागाला असते? असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता २०१२-१३ मध्ये ५३ पदे भरण्यात आली आहेत. गट अ व बची ११ पदे भरली आहेत. गट क व ड ची पदे जिल्हा परिषदेकडून भरली जातात. जून, २०१२ पर्यंत पदे भरण्यास बंदी होती, आता बंदी उठविली आहे. यापुढे ती रिक्त पदे भरण्यात येतील.

११.६९ पदे भरण्यास बंदी होती तर विभागाकडून तरतूद का मागण्यात आली असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, हे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन २००७-०८ या वर्षाचे आहे. जिल्हा परिषदांमध्ये पाणीपुरवठा विभागाचा आढावा घेऊन वित्त विभागाकडे पदे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविला होता. वित्त विभागाने त्यानंतर पदांसाठी मंजुरी दिली आणि पदे भरण्यात आली. पुन्हा ५२ पदांची मागणी सादर केली आहे. गट 'अ' व 'ब' मधील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात.

११.७० भारत निर्माण योजना राज्यात जिल्हानिहाय किती पूर्ण झाल्या, किती योजना अपूर्ण राहिल्या आणि किती योजनांमध्ये भ्रष्टाचार झाला? त्या संदर्भात अधिकाऱ्यांवर काय

कारवाई केली? याबाबतची माहिती समितीस सादर करण्याचे निदेश विभागास दिले परंतु अद्यापपर्यंत विभागाकडून माहिती प्राप्त झाली नाही.

११.७१ समितीने पुढे जलस्वराज्य प्रकल्प योजनेसाठी जो निधी देण्यात आला त्यातील रु.७,४१,३८,१०० इतका निधी अखर्चित राहण्याची कारणे काय? अशी विचारणा विभागीय सचिवास केली असता यासंदर्भातील लेखी उत्तर पुढील प्रमाणे प्राप्त झाले आहे.

११.७२ वित्त विभागाने निलंबन लेख्यातील रकमा समायोजित करण्यासाठी पुरवणी मागणीने निधी उपलब्ध करून घ्यावा असे सुचीत केले होते. त्यानुसार २००७-०८ या आर्थिक वर्षात विभागाशी संबंधीत निलंबाधीन रकमेच्या समायोजनासाठी दि.२५ जाने., २००८ च्या शासन निर्णयाद्वारे अनुदान उपलब्ध करून दिले आहे. परंतु ती समायोजीत न झाल्याने अखर्चित राहीली. तोपर्यंत सन २००७-२००८ च्या अंतिम सुधारीत अनुदानाचे तसेच तरतुद समर्पणाचे शासन निर्णय निर्गमित झाले होते. त्यामुळे अखर्चित तरतुद रू.७,४१,३८,१००/- समर्पित करता आली नाही. तसेच जलस्वराज्य प्रकल्प संकल्पनेबाबत माहिती अहवालाच्या शेवटी **विविरणपत्र क्र. -----** जोडली आहे.

११.७३ सन, २००७-०८ के बहुत केसीज ऐसे हैं जिनका अभी तक रिकन्सिलिएशन नहीं हुआ है. हमने जून २००८ में इनसे फाइनल फीगर्स मांगे थे. लेकिन उस समय फाइनल फीगर्स हमें नहीं दिए गए. हमने इस विभाग को १८ सितम्बर को एक पत्र भी लिखा था कि आपके आंकड़ों में यदि कोई बदल है तो आप हमें बता दीजिए. लेकिन उस समय भी हमें कोई जानकारी नहीं दी गयी. इस बारे में हमें कोई नोट ऑफ एरर भी नहीं दिया गया है. अशी माहिती महालेखाकारांनी समितीस दिली असता तत्कालीन सचिवांनी खर्चमेळास विलंब झालेला आहे आणि ती बाब समर्थनीय नाही असे सांगितले.

११.७४ परंतु नोट ऑफ एरर यदि समय पर मिल जाये तो फिर फीगर्स में व्हेरियेशन नहीं आता. असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले असता समितीने आकड्यांमध्ये काही फरक असेल तर त्या बाबतीत जेव्हा महालेखाकार पत्र पाठवितात तेव्हा खात्याकडून उत्तर दिले जात नाही आणि नंतर जेव्हा उत्तर देतात तेव्हा त्यामध्ये फरक येतो. तोपर्यंत महालेखाकारांचा अहवाल तयार होऊन सदर अहवाल सभागृहास सादर करण्यात येतो. त्यामुळे याची जबाबदारी विभागावर येते असे मत समितीने व्यक्त केले.

११.७५ महालेखाकारांनी पुढे समितीच्या असे निदर्शनास आणून दिले कि, ग्रांट इन एड से संबंधित १४६८ केसीज ऐसे हैं जिनका अभी तक यूटिलाइजेशन सर्टिफिकेट हमको नहीं मिला है तथा इन केसीज की कुल रकम करीब ७४२ करोड़ रुपए है. सन २००७-०८ में २७१ केसीज ऐसे थे, जिनका यूटिलाइजेशन सर्टिफिकेट हमको नहीं मिला था. लेकिन तब से लेकर अब सन् २०११-१२ तक के कुल १४६८ केसीज ऐसे हो गए हैं जिनका यूटिलाइजेशन सर्टिफिकेट हमको अभी तक नहीं मिला है. इन सभी केसीज की कुल रकम करीब ७४२ करोड़ रुपए है.

११.७६ महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त माहिती संदर्भात समितीने विभागीय सचिवांना विचारले कि, आतापर्यंत जे १४६८ प्रकल्प पूर्ण झाले त्यांचे उपभोक्ता प्रमाणपत्र दिलेले नाहीत. ते प्रमाणपत्र केंद्र स्तरावर तसेच राज्य स्तरावर पाठवावे लागतात. जवळपास ७७० कोटी रुपये खर्च केले त्याचे उपभोक्ता प्रमाणपत्र दिलेले नाहीत त्यामुळे पुढच्या प्रकल्पांना निधी देणार नाहीत. त्यांनी उपभोक्ता प्रमाणपत्र का दिले नाही ? तसेच ते देण्याची जबाबदारी कोणाची होती ? उपभोक्ता प्रमाणपत्र न दिल्यामुळे पुढचा निधी मिळणार नाही अशी स्थिती निर्माण होते. या बाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कोणती कारवाई करणार याबाबतची माहिती देताच तत्कालीन सचिवांनी खुलासा केला कि, यामध्ये दोन भाग आहेत. महालेखाकारांनी प्रकल्पांची संख्या १४०० सांगितली. ते कदाचित नळ योजनेला प्रकल्प म्हणत असतील. सन २००७-२००८ मध्ये हजारोच्या संख्येने नळ योजना राबविल्या. त्यावेळी आपल्याला जवळपास २२ हजार गावांचे उद्दिष्ट दिले होते आणि तेवढे प्रकल्प होते. ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेमार्फत पैसे वाटप करावयाचे होते. चार पाच वर्षामधील अशा योजनांची किंवा प्रकल्पांची संख्या १ लाखाच्या वर असेल. त्यापैकी १४०० प्रकल्पांचे उपभोक्ता प्रमाणपत्र ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेमार्फत यावयाचे राहिले असतील. परंतु एकूण प्रकल्पांची संख्या खूप मोठी आहे. भारत निर्माण योजनेमध्ये ५० ते ६० हजार गावांच्या योजना पाच सहा वर्षात राबविल्या. १४०० योजनांचे उपभोक्ता प्रमाणपत्र राहिले असतील तर ते पूर्ण केले जातील.

११.७७ महालेखाकारांनी घटनात्मक मुद्दा उपस्थित केलेला आहे. उपभोक्ता प्रमाणपत्र दिल्याशिवाय पुढचा निधी मिळणार नाही. त्यामुळे निधी न मिळण्याची परिस्थिती निर्माण झाली.

त्यासाठी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर विभाग योग्य ती कारवाई करणार की नाही ? या बाबतीत नियंत्रण नसेल व कोणताही बडगा दाखविणार नसाल तर विभागाकडून जे उत्तर प्राप्त होणार तसेच वर्षानुवर्षे चालू राहील. ग्रामपंचायत, ग्रामसेवक यांच्यापर्यंत फटका देणार नसाल तर समितीमध्ये चर्चा करण्याला काही अर्थ राहणार नाही तसेच महालेखाकारांनी जो घटनात्मक मुद्दा उपस्थित केला त्यालाही अर्थ राहणार नाही. या बाबतीत निर्बंध निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा भविष्यामध्ये असेच चालू राहील आणि अडचणी निर्माण होतील, असे मत समितीने व्यक्त केले व विभागाच्या कामकाजावर असमाधान व्यक्त केले. परंतु, ही बाब फक्त पाणी पुरवठा व स्वच्छता विभागापुरतीच मर्यादित नाही असे महालेखाकारांनी काही प्रश्न विचारावयाचे आणि शासनाने उत्तर द्यावयाचे नाही असे महालेखाकारांच्या अहवालामध्ये अनेक पृष्ठे सापडतात. आर्थिक शिस्त पाळली गेली पाहिजे. महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपांचे उत्तर दिले नाही तर कारवाई घेण्याच्या बाबतीत काय तरतूद आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, महालेखाकारांना उत्तर देत नाही असे शासनाकडून किंवा या विभागाकडून घडत नाही. या बद्दल पत्रव्यवहार चालू आहे. काही पत्र व्यवहार केंद्र शासनामार्फत सुध्दा चालू आहे. विभागाने महालेखाकारांना विनंती केलेली आहे की, महालेखाकारांनी एक बैठक बोलवावी. त्या बैठकीमध्ये या संदर्भात जो पत्रव्यवहार होत आहे त्याबाबत स्पष्टीकरण होईल. विभागानी महालेखाकारांकडे बैठकसाठी वेळ ही मागितलेला आहे.

११.७८ यासंदर्भात अधिक स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, महाराष्ट्रामध्ये या सर्व कार्यक्रमाची विकेंद्रित पध्दतीने अंमलबजावणी होत असल्यामुळे विभागाकडून जिल्हा परिषदेला पैसे देण्यात येतात, ग्रामपंचायतीला पैसे देण्यात येतात. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच जीएसडीएला पैसे देण्यात येतात. महालेखाकारांचे असे म्हणने आहे कि, प्रत्येक ग्रामपंचायतीने उपभोक्ता प्रमाणपत्र द्यावे. दरवर्षी विभागाकडून ९ ते १४ हजार ग्रामपंचायतींमध्ये योजना राबविण्यात येतात आणि प्रत्येक ग्रामपंचायतीकडून उपभोक्ता प्रमाणपत्र मागण्यास थोडा वेळ लागणार आहे. विभागानी राज्य स्तरावर खर्चाचे विवरणपत्र दिलेले आहे. महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, रुट एक्स्पेंडीचर द्यावे. म्हणजे १४ हजार, २० हजार ग्रामपंचायतींकडून रुट एक्स्पेंडीचर मागण्यासाठी वेळ लागत आहे.

त्यांनी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या पैशाच्या मागणी केलेली आहे. असे व्हावचर ठेवणे कठीण आहे असे ग्रामपचायतींचे म्हणणे आहे.

११.७९ समितीने पूढे असे निदर्शनास आणून दिले की, ग्रामविकास विभागाकडून सुध्दा अनेक योजनांची अंमलबजावणी होते. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच ग्रामविकास विभाग यांचे समन्वय नाही. एखाद्या विषयामध्ये दोन खात्याचा संबंध असेल तर त्या विषयाचा फूटबॉल होतो आणि योग्य उत्तर मिळत नाही. खात्याअंतर्गत समन्वय नसल्यामुळे अशा बाबी राहून जातात आणि यासंदर्भातील कारणे विभागास लोकलेखा समितीशिवाय कोणी विचारणार नाही. त्यामुळे जे काही प्रश्न असतील त्या संदर्भात दर दोन तीन महिन्यामध्ये विभागाने सचिव पातळीवर संयुक्त बैठक घेतली तर त्यातून मार्ग निघेल आणि बऱ्याचशा गोष्टी होतील. अशा सचिव पातळीवर विभागाअंतर्गत बैठका होतात का ? याबाबत माहिती देताना तत्कालीन सचिवांनी सांगितले कि, ही पाणीपुरवठा समिती केंद्र शासनाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे किंवा जागतिक बँकने दिलेल्या सूचनेप्रमाणे करण्यात आली होती. त्यानंतर ग्रामपंयायती आणि या समित्या यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला होता. त्या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून ग्रामसेवक नव्हते तसेच सरपंच हे अध्यक्ष नव्हते. त्यामुळे फिल्ड लेव्हलवर सुध्दा या बाबतीत समन्वयाचा अभाव दिसून आला. नंतर त्या समितीमध्ये ग्रामसेवकाला सदस्य सचिव करण्यात आले. ग्रामसेवक हे आपले अधिकारी असल्यामुळे त्यांना उपभोक्ता प्रमाणपत्र किंवा बाकीचे पूर्तता अहवाल देण्यास हक्काने सांगू शकतो. सुरुवातीला हा प्रश्न होता. ग्रामविकास विभागाचे सचिव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर सर्व योजनांचा आढावा घेत असतात. सन २००५-२००६ ते २००८-२००९ या कालावधीमध्ये भारत निर्माण योजनेमध्ये ३८ हजार ४४७ योजना राबविल्या. त्यापूर्वी प्रत्येक वर्षी फक्त १०० ते २०० योजना राबवित होतो. योजनांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे आणि विकेंद्रित पध्दतीने काम झाल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. जी उपभोक्ता प्रमाणपत्र राहिलेली आहेत ती मिळण्यामध्ये आता अडचण नसावी. आता त्या समितीमध्ये ग्रामसेवक आणि सरपंच आहेत.

११.८० केंद्र शासनाने किंवा जागतिक बँकेने अटी घातलेल्या आहेत. सगळे जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्यामध्ये सरपंचाला, ग्रामसेवकाला बाजूला ठेवले. इतर लोकांकडे काम सोपवून काम करीत असतील तर ते उत्तरदायी नाहीत म्हणून भ्रष्टाचार होतो. पाणीपुरवठा

योजनेचे पैसे योग्य पध्दतीने वापरण्यासबंधी निर्बंध निर्माण करण्याचा शासनाला पूर्ण अधिकार आहे. कामाच्या बाबतीत काही अफरातफर झाली तर त्या समितीमध्ये जे सदस्य असतील त्यांना आपल्या मालमत्तेमधून ते भरुन द्यावे लागेल असे जर केले तर त्या समितीवर निर्बंध येतील आणि ते व्यवस्थित काम करतील. अशी सुचना समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, त्या समितीमध्ये सरपंच आणि ग्रामसेवक यांना अध्यक्ष आणि सदस्य सचिव केले. शासनाने त्या बाबतीत शासन निर्णय काढला होता परंतु त्यानंतर ते न्यायालयात गेले. त्या बाबतीत मुंबई न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शासनाचा निर्णय रद्द करुन पूर्वीप्रमाणेच पाणीपुरवठा व स्वच्छता समिती राहील असा निर्णय दिलेला आहे.

११.८१ परंतु, केंद्र सरकारचा किंवा राज्य सरकारचा निधी खात्याकडे आल्यानंतर खालच्या स्तरापर्यंत अंमलबजावणी करण्याची नैतिक आणि सर्व जबाबदारी सरकारची आहे. त्याचे इन्फ्रास्ट्रक्चर कसे असावे हे न्यायालय कसे ठरविणार ? कारण शासनाची बाजू नीट मांडली जात नाही. जेव्हा जबाबदारी घेण्याची वेळ येते त्यावेळी जबाबदारी कोणीच घेत नाही. त्यावेळी जर ग्रामसेवक, सरपंच त्या समितीमध्ये असते तर त्यांना जबाबदार धरु शकलो असतो. शासन योजना राबवितो पण त्यामध्ये सरपंचाला घेतले नाही.

११.८२ स्वयंसेवी संस्था, गावचे लोक कोर्टात गेले असतील पण अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये सरकारची जी जबाबदारी असते ती सरकारने निभावली पाहिजे. म्हणजेच न्यायालयात शासन आपली बाजू मांडण्यामध्ये कमी पडते का ? याबाबत शासन न्यायालयात बाजू मांडण्यास कमी पडत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले. मग मुंबई न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विभागाने अपील का केले नाही ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, यासंदर्भात कायद्यामध्ये तरतूद करण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. या प्रकरणासंदर्भात शासनाच्या विरोधात सन २०११ साली निकाल लागला.

११.८३ कायदा करण्याची जबाबदारी शासनाची असल्यामुळे त्यास विलंब का होत आहे, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ग्रामविकास विभागाशी चर्चा करुन कायदा करण्यासाठी त्यांना प्रस्ताव पाठविलेला आहे. या बाबतीत काम चालू आहे. ग्रामविकास विभागाच्या सचिवांशी बोलून लवकरच बदल करुन घेण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

११.८४ सरकारच्या विरोधात न्यायालयात जाण्याची स्वयंसे्वी संस्था किंवा लोकांची प्रवृत्ती वाढलेली दिसते. कारण सरकार ठोस कायदे करत नाही, शासनाने कायदा सायलेंट ठेवलेला आहे. न्यायालय कायद्याच्या पुढे जाऊ शकत नाही. न्यायालय म्हणते की तुम्ही असा कायदा केलेला नाही. त्यामुळे न्यायालय शासनाच्या बाजूने निकाल देत नाही. अशा योजना करीत असताना त्याच्या कायदेशीर बाजू सुध्दा तपासून घेतल्या पाहिजेत आणि आवश्यकता असेल तर अंमलबजावणीच्या वेळला तशा प्रकारचा कायदा सुध्दा केला पाहिजे. सरकार ठोस कायदे न करता फक्त अध्यादेश काढते. यामुळे सरकार ब-याच बाबतीत फटके खात असते, काही बाबीसंदर्भात सरकारवर कायदे न केल्यामुळे ताशेरे ओढले जातात. त्या संदर्भातही सरकार सायलेंट राहते. राज्यशासनाच्या ठोस कायद्याच्याविरुध्द इंटरव्हेन्शन करण्याचा न्यायालयाला अधिकार नाही. परंतु शासनाने ठोस कायदे केलेले नसल्यामुळे कोर्टाला इंटरव्हेन्शन करण्याचा अधिकार मिळतो.

११.८५ शासनाने केलेल्या कायद्यांमधील पळवाटांचा फायदा घेऊन कोणतेही अराजक या राज्यामध्ये येता कामा नये, याचाही विचार करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने ठोस कायदे केल्यानंतर त्याची अंमलबजावणीही काटेकोरपणे करणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

११.८६ भारत निर्माण योजना तसेच भूगर्भातील पाण्याच्या संदर्भात सविस्तर टिप्पण्या तयार करुन समितीला सादर करण्यात यावे असे निदेश समितीने विभागास दिले.

११.८७ मराठवाडा पॅकेजअंतर्गत कोणकोणत्या बाबींवर ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, मराठवाडा पॅकेजअंतर्गत मराठवाडयातील एकूण ५ शहरांना ३५ कोटी रुपये देण्यात आले होते. औरंगाबाद, जालना, परभणी, लातूर, उस्मानाबाद या पाच शहरांना उपरोल्लेखित ३५ कोटी रुपये देण्यात आले होते. या पाच शहरांपैकी जालना आणि परभणीचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. जालना येथील काम पूर्ण होऊन देखील वीज देयक थकबाकी न भरल्यामुळे नवीन योजनेकरिता एमएसइबी नवीन वीज जोडणी देण्यास नकार देत आहे. औरंगाबाद येथील कामही ९० टक्के पूर्ण झालेले आहे. आता तेथे केवळ पाण्याची टाकी बांधावयाचे काम शिल्लक आहे. टाकी बांधणे, रस्ता बांधणीकरिता परवानगी मिळण्याकरिता जिल्हाधिकारी

महोदय यांची परवानगी आवश्यक आहे. उर्वरित काम तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती विभागाला प्राप्त झालेली आहे. लातूर आणि उस्मानाबाद मध्ये ५३ किलोमीटरच्या रस्त्याचे काम व्यवस्थित झालेले आहे. परंतु त्यापैकी ४९ किलोमीटरच्या रस्त्याचे काम १०० टक्के पूर्ण झालेले आहे. ४ किलोमीटर रस्त्याच्या कामाच्या शेवटच्या टप्प्याकरिता पैसे कमी पडत आहेत. याकरिता नगरविकास विभागाने पैसे दिले तर हे काम पूर्ण होऊ शकेल.

११.८८ मराठवाडा पॅकेजअंतर्गत शासनाकडून अजून किती रुपये निधी येणे शिल्लक आहे? सन २००८ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मराठवाडा पाणीपुरवठयाच्या कामाकरिता सदर पॅकेज जाहीर करण्यात आले होते. या पॅकेजअंतर्गत असलेल्या कामांच्या दरवाढीबाबत शासन लक्ष देत नाही का ? नाशिक -औरंगाबाद चौपदरीकरणाच्या काम बंद पडलेले आहे. नाशिक-वैजापूर या १०५ किलोमीटरच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम बाकी आहे. शासन कोणत्याही पॅकेजअंतर्गत किंवा योजनेअंतर्गत विहित निधी टप्प्याटप्प्याने व काम पूर्ण झाल्यानंतर देते. मराठवाडयातील पाणीपुरवठयाची योजना एकूण किती कोटी रुपयांची आहे ? सन २००६-२००७ व २००७-२००८ मध्ये मराठवाडयाला पॅकेजअंतर्गत एकूण किती रुपयांचा निधी प्राप्त झाला ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला कि, सन २००६-२००७ व २००७-२००८ मध्ये मराठवाडयाला पॅकेजअंतर्गत अनुक्रमे १५ व ३५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. यानंतर मराठवाडा पॅकेजअंतर्गत शासनाकडून मराठवाडयाकरिता पैसे येणे बाकी नाहीत.

११.८९ तसेच मराठवाडा पॅकेज अंतर्गत रुपये ३५,००,००,०००/- इतके अनुदान कोणत्या बाबींवर खर्च करण्यात आले याबाबतची तपशीलवार माहिती लेखी स्वरूपात विभागाकडून पुढील प्रमाणे प्राप्त झाली आहे.

११.९० नियोजन विभागाचे क्रमांक मविका-२००६/प्र.क्र.१०७/का.१४५६ दिनांक १० नाव्हेंबर २००६ अन्वये मराठवाडा एकात्किम विकास कार्यक्रमातील शिल्लक कामांच्या प्रस्तावांचा समावेश असणारा "मराठवाडा विकास कार्यक्रम-२००६" हा कार्यक्रम शासनाने मंजूर केला होता. त्याअनुषंगाने,

१) लातूर, जालना, औरंगाबाद, उस्मानाबाद व परभणी या ५ शहरांच्या पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या होत्या.

सदर योजनेसाठी सन २००६-०७ व २००७-०८ मध्ये एकूण प्रस्तावित निधी रुपये ५०.०० कोटी मंजूर करण्यात आला होता.

सन २००६-२००७ मध्ये रु.१५.०० कोटी व सन २००७-२००८ मध्ये रुपये ३५.०० कोटी असे एकूण रुपये ५०.०० कोटी अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरीत करण्यात आले.

सदर अनुदानापैकी, आतापर्यंत रुपये ४०.८५ कोटी अनुदान खर्च झाले आहे. योजनांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) **परभणी पा.पु.योजना** - कामे पूर्ण झाली आहेत.

२) **औरंगाबाद पा.पु.योजना** - मंजूर कामापैकी पाण्याची टाकी बांधणे, संप व पंप हाऊसची कामे व गुरूत्ववाहीनीची कामे पूर्ण झाली आहेत. परंतु महानगरपालिकेने अद्याप परवानगी न दिल्यामुळे ३ क्रॉस कनेक्शन व २ कि.मी. पाईप लाईनची कामे बाकी आहेत.

३) **जालना पा. पु. योजना** - कामे पूर्ण झाली आहेत मात्र नगर परिषदकडे विद्युत वितरण कंपनीची रु.८० कोटी थकबाकी असल्यामुळे विद्युत कनेक्शन अद्याप मिळालेले नाही.

४) **लातूर पा.पु. योजना** - टप्पा ५ अंतर्गत वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण पाण्याची टाकी बांधण व ३५ कि.मी. वितरण व्यवस्था टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

५) **उस्मानाबाद पा.पु. योजना** - वितरण व्यवस्थेतील ५३ कि.मी. पैकी ४९ कि.मी. काम पूर्ण उर्वरित ५ कि.मी. चे काम नगर परिषदेने सूचविले नाही.

वरील योजनेसाठी सन २००८-२००९ पासून अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात आली नाही.

११.९१ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, उस्मानाबाद येथील ५३ किमीच्या रस्त्याच्या बांधकामाकरिता लागणारा निधी कमी पडत आहे. ४९ किमीच्या रस्त्याचे बांधकाम पूर्ण झालेले असतांना उर्वरित ४ किमीच्या रस्त्याच्या याबाबत माहिती देताना उर्वरित ४ किमीच्या रस्त्याच्या बांधकामाकरिता नगरविकास विभागाकडे निधीची मागणी केलेली आहे. युआयडीएसएसएमटी अंतर्गत या रस्त्याचे बांधकाम केंद्र पुरस्कृत योजनेच्या माध्यमातून केले

जात आहे. युआयडीएसएसएमटी हा विभाग नगरविकास विभाग हाताळत असल्यामुळे या ४ कि.मी. रस्त्याच्या बांधकामाकरिता नगरविकास विभागाकडे निधीची मागणी केलेली आहे.

११.९२ मराठवाडा पाणीटंचाईकरिता प्रसिद्ध आहे. पाण्याच्या दुर्भिक्ष्याची परिस्थिती ग्रामीण पातळीवर भयानक आहे. ग्रामीण भागामध्ये शेतकरी पावसाळी पिकाला पाणी देण्याकरिता पावसाळयामध्ये ७ हॉर्सपॉवरचे इंजिन लावून टयूबवेलने पाणी खेचत आहे. पावसाळयामध्ये भुगर्भातील पाणी खेचण्याकरिता कायद्याने परवानगी आहे का ? संबंधित भागामध्ये त्याच एका विहिरीवर आजुबाजूचे २० पाडे पाण्याकरिता अवलंबून आहेत. संबंधित शेतकरी आपल्या पावसाळी पिकाला वाचविण्याकरिता पुढील आठ महिन्यांकरिता २० पाडयातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याची आबाळ करु शकतो का ? याकरिता ठोस कायदा व त्याच्या काटेकोर अंमलबजावणी व वचकाची गरज आहे, असे समितीने सुचना केली असता याबाबत तत्कालीन विभागीय सचिवांनी खुलासा केला कि, पाणी टंचाईबाबत शासनाचा आराखडा व योजना हा निराळा विषय आहे. या विषयाअंतर्गत शासनाच्या कृतीआराखडयानुसार काम अतिशय सुरळित चालू आहे. पाणी टंचाईकरिता महाराष्ट्र राज्यातील विविध भागामध्ये प्रयत्न चालू आहेत.

११.९३ राज्यामध्ये एकूण किती विंधणविहिरी आहेत ? विंधणविहिरीची खोली साधारणतः किती असावी, यासंदर्भात शासनाने काही नियम ठरविलेले आहेत का ? पावसाळयामध्ये भुजल साठयातील पाणी खेचण्याकरिता प्रतिबंध करण्याबाबतचे नियम विभागाने तयार केलेले आहेत का ? पावसाळयामध्ये व इतर दोन ऋतुंमध्ये भुजलातील पाण्याचा साठा साधारण किती पटींनी वाढतो ? भुगर्भातील पाण्याच्या साठयाचे नियोजन विभागनिहाय केले जाते का ? भुजल सर्वेक्षण व नियमन खात्यामध्ये एकूण किती कर्मचारीवृंद काम करीत आहे? शासनाने जलाशयाचा व भुगर्भातील पाण्याच्य पुर्नभरणाविषयी पाणी मुरविण्याविषयी कोणता विचार केलेला आहे ? प्राप्त परिस्थितीत राज्यात किती इंच पाऊस कमी पडलेला आहे ? तसेच, राज्यात दरवर्षी किती इंच पाऊस पडणे शेतीकरिता व एकूण लोकसंख्येच्या प्राथमिक गरजांकरिता आवश्यक आहे ? याबाबतची माहिती देताना संचालक भूजल सर्वेक्षण यंत्रणा, पुणे यांनी समितीस सांगितले कि, भुगर्भातील पाण्याच्या पातळीचा रिव्हयू वॉटरशेडनिहाय ठरविला व गणांकित केला जातो. राज्यात एकूण १५३१ पाणलोट क्षेत्रे निश्चित करण्यात

आलेली आहेत. ३,९१६ निरीक्षण विहिरी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. दर तीन महिन्यांनी या सर्वांचे मोजमाप घेतले जाते. भुगर्भातील पाण्याची पातळी किती वाढते ? याचाही अभ्यास केला जातो. राज्यात एकूण तीन ते चार प्रकारचे वॉटरशेड्स आहेत. ओव्हर एक्प्लॉईट वॉटरशेड म्हणजे ज्या जलाशयातून किंवा संबंधित ठिकाणच्या भुगर्भातीला पाण्याचा जास्तीत जास्त उपसा केला जातो. राज्यात एकूण ७३ क्रिटीकल वॉटर शेड्स आहेत. ७०-९० टक्के उपसा असणारे सेमी क्रिटीकल वॉटर शेड्स ११९ आहेत. राज्यात एकूण १३३२ सुरक्षित वॉटरशेड्स आहेत. पाण्याच्या उपशावर नियंत्रण करण्याविषयीचा कायदा १९९३ मध्ये पास करण्यात आला होता.

११.९४ सदर १५३१ पाणलोट क्षेत्रांचे विभागनिहाय वर्गीकरण केल्या संदर्भात माहिती देताना समितीस असे सांगण्यात आले कि, दिनांक २२ एप्रिल,२०१२ रोजी पाण्याच्या नियोजनासंदर्भात व उपशासंदर्भात सर्वसमादेशक असा एक कायदा पास करण्यात आला होता. या कायद्यामध्ये पब्लिक ड्रिंकिंग वॉटरशेडच्या आसपास ५०० मीटरपर्यंत कोणत्याही प्रकारचा अन्य जलस्त्रोत उत्पन्न करता येणार नाही. तसेच, कोणतीही विंधण विहिरीचे काम देखील ५०० मीटरच्या परिसरामध्ये करता येणार नाही. तालुका व जिल्हा पातळीवरील पाण्याच्या उपशाला निर्बंध घालण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत देण्यात आलेले आहेत. कोणतेही ड्रिंकिंग वॉटर शेड आसपासच्या ५०० मीटरपर्यंतच्या पाण्याच्या उपशाच्या प्रमाणावर अवलंबून असते. शेतीकरिता या ५०० मीटरच्या परिसरामध्ये अन्य जलस्त्रोत उत्पन्न करण्याचा कोणी प्रयत्न केला तर इतर नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासारख्या प्राथमिक गरजेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पीडीडब्ल्यूएसवर जवळपासच्या एक ते दोन किलोमीटर व ५०० मीटरच्या जलस्त्रोताचा विपरित परिणाम होऊ शकतो.

११.९५ भुगर्भातील पाणी मुरवून ते तेथे साठवून ठेवण्याकरिता "जलधर" नावाचे तंत्र विकसित झालेले आहे. या तंत्राच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा अबाधित ठेवता येतो. प्रायोगिक तत्वावर हे तंत्र जालना, बीड व सातारा या तीन जिल्हयामध्ये एमडब्ल्यूएसआयपी मार्फत लागू करण्यात आलेले आहे. या तीन जिल्हयामध्ये या तंत्राच्या ॲप्लिकेशनला यश आल्यानंतर हे तंत्र सर्व जिल्हयांमध्ये लागू करण्यात येणार आहे.

जीएसबीआय मार्फत कम्पाऊंड वॉटरशेडचे काम करण्यात येणार आहे. या तंत्राच्या आधारे पावसाळयामध्येच भुगर्भातील पाण्याची पातळी आवश्यकतेनुसार वाढवून अबाधित राखता येईल.

११.९६ भुगर्भातील पाण्याची पातळी सुरक्षित ठेवण्याकरिता हाय बाऊंड्रीज हेही तंत्र विकसित करण्याचे विचाराधीन आहे. टीडीएस या संस्थेमार्फत उपरोल्लेखित तंत्र यशस्वीरित्या सर्व जिल्हयांमध्ये लागू करुन भविष्यातील पाण्याच्या दुर्भिक्ष्याचा भीषण प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तीन ते पाच वर्षांमध्ये भुगर्भातील पाण्याचे ॲक्विपर मॅपिंग करता येणेही शक्य होणार आहे. २२ एप्रिल,२०१२ रोजी पारित करण्यात आलेला सर्वसमावेशक असा भुजल कायद्याच्या नियमांचे प्रारुप मा.राष्ट्रपतींच्या संमतीसाठी प्रलंबित आहे. हा कायदा केवळ पारित करुन चालण्यासारखे नाही. या कायद्याचे सर्वसमावेशक व प्रभावी असे नियम तयार करुन त्यांची काटेकोर व कठोर अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. साधारणतः येत्या दोन महिन्यांमध्ये या कायद्याची सर्व प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात येईल. त्यानंतर सदरहू कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सुरु होईल

११.९७ माहे एप्रिल,२०१२ मध्ये सर्वमसावेशक असा भुजल कायदा पारित केला गेल्यानंतर तीन महिन्यानंतरही त्याच्या प्रशासकीय प्रक्रियेस विलंब का लागत आहे ? महाराष्ट्रामध्ये ज्या ठिकाणी पाण्याचा उपसा जास्त होत असेल, तेथे संबंधितांविरुध्द कोणत्या प्रकारची कारवाई होते ? यावर पाण्याच्या जादा उपशाकरिता जुन्या कायद्यामये पिनल प्रोव्हिजन आहे. येत्या आठ ते दहा वर्षांमध्ये राज्यावर पाण्याचे भीषण संकट येणार आहे, असे भाकित अनेकांकडून वर्तविले जात आहे. या पाश्वभूमीवर बोअरवेलविषयीचे कायदेही कठोर करण्यात येणार आहेत असे समितीस सांगण्यात आले.

११.९८ ग्रामीण भागामध्ये एक माणूस २ हॉर्सपॉवरच्या इंजिनची मोटार बसवून शेतीकरिता पाणी खेचतो. परंतु त्याच्या शेतीला तो पाणी देत असतांना ज्या वॉटरशेडमधून पाणी खेचत होता, तो वॉटरशेड आजुबाजूच्या २० पाडयातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या जलस्त्रोतावर परिणाम करीत होता. एक वर्ष संबंधित माणूस शेतीला पाणी देत असतांना आठ ते दहा महिने आजुबाजूच्या पिण्याच्या पाण्याच्या प्राथमिक गरजेवर घालत आहे, ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता शासनाने भूजलासंबंधी कायदा केलेला

आहे. हा कायदा अमलात येणार आहे. या कायद्यान्वये ज्या ठिकाणी पाण्याची समस्या आहे असे कोणतेही क्षेत्र नोटिफाय करता येईल आणि परिस्थिती सुधारल्यानंतर ते डिनोटिफाय करता येईल. क्षेत्र अधिसूचित केल्यानंतर त्या क्षेत्रातील पाण्याच्या उपशावर नियंत्रण करण्याचे अधिकार शासनाला प्राप्त होतात. नियंत्रण याचा अर्थ शासन पाणी उपश्यावर संपूर्ण किंवा अंशत: बंदी घालू शकते. चर्चेच्या दरम्यान असा मुद्दा पुढे आलेला आहे की, जमिनीखालील कोणत्याही गोष्टीवर उदा. मेजर किंवा मायनर मिनरल्सवर शासनाची मालकी असते. त्याच प्रमाणे भूगर्भातील पाण्यावर देखील शासनाची मालकी असली पाहिजे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. अशा त-हेची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे काय ? अशी शंका समितीन उपस्थित केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, या संबंधी वेगळा कायदा आहे.

११.९९ आता राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासनाने फक्त पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिलेले आहे. पिण्या व्यतिरिक्त शेती, उद्योग किंवा अन्य कोणत्याही गोष्टीला पाणी न देण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी कशी करणार ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती विशद करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, सन १९९३ चा भूजल कायदा आहे. त्या कायद्यानुसार जिल्हाधिका-यांना पाण्याच्या उपशावर बंदी घालण्याचे अधिकार आहेत. गावातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी सेक्शन ४ खाली तरतूद करण्यात आलेली आहे. टंचाईच्या परिस्थितीमध्ये कोणी अतिरिक्त पाण्याचा उपसा करीत असेल तर त्याच्या विरुध्द कारवाई करण्याचे अधिकार जिल्हादंडाधिका-यांना आहेत. राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांनी पाण्यासंबंधीचे नियोजन ब-या पैकी केलेले आहे. सन १९९३चा कायदा हा दंडात्मक होता. नवीन कायद्यामध्ये पाण्याच्या उपशावर नियंत्रण ठेवले जाणार आहेच परंतु हे नियंत्रण करण्यासाठी नागरिकांच्या समित्या गठित करण्यात येणार आहेत. ज्या ठिकाणी पाण्याची तीव्र टंचाई आहे, जेथे प्रचंड प्रमाणावर पाण्याचा उपसा होतो तेथे पाणलोट क्षेत्रनिहाय समित्या गठित करुन त्या समित्यांना अधिकार प्रदान करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. राज्य, जिल्हा आणि गाव स्तरावर भूजल नियंत्रण समित्या गठित करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. तसेच ज्या भागामध्ये पाण्याचा प्रचंड उपसा होतो अशा ठिकाणी पुनर्भरण करण्याचे काम या कायद्यान्वये समितीकडे सोपविण्यात आलेले आहे. पुनर्भरणाच्या कामासाठी लागणारा निधी

उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे. सद्य:परिस्थितीत रेग्युलेटरी मेझर्स घेण्यास काही हरकत नाही.

११.१०० माननीय मुख्यमंत्र्यांनी पिण्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही गोष्टीसाठी पाणी न देण्याचे धोरण जाहीर केलेले आहे. जर पिण्याऐवजी अन्य कारणासाठी पाणी वापरले गेले तर त्याबाबतीत कोणती कारवाई केली जाईल ? आता जायकवाडी धरणातील पाण्याची पातळी शून्याच्या खाली गेलेली असताना उजव्या आणि डाव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडले जात आहे. अशा प्रकारे पाणी वापरले जात असेल तर त्यावर कोण निर्बंध घालणार ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता सदरहू बाब जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील आहे, असे तत्कालीन विभागीय सचिवांनी सांगितले.

११.१०१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत अनेक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना केलेल्या आहेत. या योजना सदोष असल्यामुळे जिल्हा परिषदा त्या ताब्यात घेत नाहीत. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यामध्ये बनगाव - लटोरी या दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नाहीत. लटोरी ही ४८ गावांची प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्यात आली. ही योजना प्रत्येक महिन्यामध्ये काही दिवस सुरु असते आणि काही दिवस बंद असते. जे लोक पाणीपट्टी भरत आहेत त्यांना पाणी मिळत नाही. शिवाय त्या लोकांसाठी वेगळी योजना करायची म्हटले तर ती देखील करता येत नाही. लोकांना पाणी तर मिळाले पाहिजे. योजना कार्यान्वित ठेवण्याचा खर्च महाराष्ट्र जिवन प्राधिकरण करण्यास तयार नाही. जिल्हा परिषदा योजना ताब्यात घेण्यास तयार नाहीत. मग योजना सुरु कशी राहाणार ? अशा परिस्थितीत कोणता मार्ग काढता येईल ? याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ? तसेच बनगाव-लटोरी या दोन्ही योजना सुरु करताना जिल्हा परिषदेची मान्यता घेण्यात आली. परंतु जिल्हा परिषद या योजना चालविण्यास तयार नाही. नक्षलग्रस्त भागातील या योजना आहेत. त्या भागातील लोकांना पिण्यास पाणी मिळत नाही. याबाबत सदस्य महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी सांगितले कि, हा प्रश्न दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या संदर्भात आहे. वस्तुस्थिती अशी आहे की कोणत्याही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सक्षम होऊ शकत नाहीत. बहुसंख्य पाणीपुरवठा योजना तोट्यात असतात. टॅक्सबेस भागातील योजना सक्षम असतात.त्या भागात पेईंग कॅपॅसिटी जास्त असते. शेवटी सर्व ठिकाणी योजनेच्या देखभालीचा खर्च, एस्टॅब्लिशमेण्ट

खर्च सारखाच असतो. राज्यामध्ये ९९१ पैकी ७०० योजना केल्यानंतर हा अनुभव आलेला आहे. या पाणीपुरवठा योजनांचा कंन्सल्टिंग कंपनीकडून सर्व्हे करण्यात आला. त्यांनी या योजना चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान प्रस्तावित केले. अनुदानाशिवाय कोणत्याही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सक्षम होणार नाहीत असे त्यांनी सांगितले.

११.१०२ जर योजना पूर्ण केल्यानंतर त्या पुढे सुरु राहाणार नसतील तर त्यासंबंधीची जबाबदारी कोणावर तरी निश्चित केली पाहिजे. याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, याबाबतीत जबाबदारी कोणावर निश्चित करुन हा प्रश्न सुटणार नाही. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना करण्याचा निर्णय शासनाने १९९०मध्ये घेतला. १९९१ ते १९९६ या काळात ५०० ते ५५० पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आल्या. १९९६मध्ये १० हजार कोटी उभे करण्याचा निर्णय झाला. ३ हजार कोटीचे कर्जरोखे काढण्यात आले. ७५० योजनांपैकी ५०४ योजना चालू आहेत. प्रश्न लोकांच्या पेईंग कॅपॅसिटीचा आहे. महिना १२० रु. पाणीपट्टी लावली आणि लोकांनी ती भरली तर योजना व्हायबल होईल. ग्रामीण भागातील योजनांच्या आर्थिक बाजूचा विचार केला तर अनुदानाशिवाय योजना चालू शकणार नाहीत. ही अनुदान किती द्यायची हे ठरवावे लागेल.

११.१०३ योजनांवर १०० कोटी रु. खर्च करुन देखील लोकांना पाणी मिळणार नसेल तर पर्यायी उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे समितीने सुचित केले व अनुदान दिल्या शिवाय योजना सुरु राहाणार नसतील तर त्याबाबतीत सरकारचे धोरण काय राहील ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले कि, काही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालू आहेत तर काही बंद आहेत. एक गोष्ट मान्य करायला पाहिजे ती म्हणजे जी काही कमीत कमी पाणीपट्टी असेल ती लोकांनी भरली पाहिजे. काही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अशा आहेत की त्यांची पाणीपट्टी भरलीच गेलेली नाही. पाणीपट्टी भरली जात नसेल तर कोणतीही यंत्रण योजना चालवू शकणार नाही. योजना चालविण्यासाठी शंभर टक्के अनुदान देणे योग्य नाही. परंतु जेथे पाणीपट्टी भरली जाते अशा ठिकाणी ऑपरेशन आणि मेण्टेनन्स निधीतून जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि अन्य यंत्रणांना निधी दिला जातो. प्रत्येक वर्षी १०० कोटी पेक्षाही अधिक निधी दिलेला आहे. त्यामधून त्यांनी भागवावे असे अपेक्षित आहे. तसेच जे लोक

पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत अशा लोकांना पाणी दिले पाहिजे आणि जे लोक पाणीपट्टी भरणार नाहीत त्यांचे पाणी बंद केले पाहिजे.

११.१०४ लोकांनी पाणीपट्टी दिल्या शिवाय पाणीपुरवठा योजनेचा विजेचा खर्च, आस्थापना खर्च भरुन निघणार नाही. लोक पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत. पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या हॉर्सपॉवरचे पंप लावावे लागतात. त्यामुळे विजेचा खर्चही मोठ्या प्रमाणावर येतो. या गोष्टी विचारात घेता वीज आणि आस्थापना खर्चासाठी अनुदान देण्यात येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

११.१०५ महाराष्ट्र राज्यापुढे पाण्याचे महाभयंकर असे संकट उभे ठाकलेले आहे. मग ते भूगर्भातील पाणी असो की धरणातील पाणी असो. ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजना करण्याकरिता लोकवर्गणीचा सहभाग असला पाहिजे. लोकवर्गणी देण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे ही लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे. त्यांनी लोकांमध्ये सामंजस्य निर्माण केले पाहिजे. सरकार कोणकोणत्या गोष्टी करु शकते याची कल्पना लोकप्रतिनिधींना आहे. आज पाणीपुरवठ्याच्या अनेक योजना हस्तांतरणाच्या वादात अडकलेल्या आहेत. या सर्व परिस्थितीचा साकल्याने अभ्यास करुन सरकारला नेमका कोणता अहवाल द्यावयाचा याबाबतीत अधिका-यांमध्येसुध्दा एकवाक्यता असली पाहिजे. योजनेच्या लाभार्थ्यांनी देखील लोकवर्गणीच्या स्वरुपात आपला कमीत कमी हिस्सा दिला पाहिजे. योजनांमध्ये तांत्रिक अडचणी देखील खूप असतात. योजना राबविताना कोणकोणत्या तांत्रिक अडचणी येतात हे देखील तपासून पहावे, असे मत समितीने व्यक्त केले.

११.१०६ एकूण ९०० पैकी ७०० योजनांचे मुल्यांकन (व्हॅल्यूएशन) झालेले आहे. सर्व परिस्थिती तपासून हे मुल्यांकन (व्हॅल्यूएशन) झालेले आहे. त्यामध्ये काही सूचना केलेल्या असतील त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा तसेच भुजलातील पाण्याच्या साठयाबाबत व भुसर्वेक्षणाच्या निष्कर्षाबाबत सविस्तर माहिती समितीस सादर करण्याचे निदेश समितीने विभागास दिले.

११.१०७ समिती केवळ महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या परिच्छेदावर चर्चा करुन थांबत नाही तर सन्माननीय सदस्यांना काम करताना जे जे अनुभव येतात ते अनुभव या

ठिकाणी ते मांडत असतात. सन्माननीय सदस्यांच्या अनुभवाचा फायदा सरकारला लोकोपयोगी कामे गतीने आणि सक्षमतेने करण्यासाठी व्हावा अशी सन्माननीय सदस्यांची तळमळ आहे. तेव्हा यादृष्टीने विभागाने समितीला टिपणी द्यावी.

११.१०८ राज्याने केलेल्या कायदा माननीय राष्ट्रपतींच्या संमतीच्या प्रतीक्षेत आहे. कायदा केल्यानंतर त्याची त्वरित अंमलबजावणी झाली पाहिजे. १०-१० वर्षे नियम तयार न झालेले कायदे देखील आहेत. शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात धोरण ठरवून त्यासंबंधी १९९७मध्ये कायदा केला. त्याचे नियम अद्याप तयार केलेले नाहीत. नियम केले नाहीत तर कायद्याची अंमलबजावणी होणार नाही. भूजलाच्या कायद्यामध्ये क्लॅरिटी नसेल तर अजूनही त्याबाबतीत विचार करावा. भूजल संबंधीच्या विधेयकावर विधानसभेमध्ये रात्री २.०० वाजेपर्यन्त चर्चा झाली. पाण्याच्या समस्येवर सन्माननीय सदस्यांनी मांडलेले आपले अनुभव विचारात घेऊन पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी समिती सरकारला कोणकोणत्या शिफारशी करु शकेल यानुषंगाने समितीला विभागाकडून माहिती अपेक्षित आहे. परंतु, विभागाकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे या संदर्भातील आलेले अभिप्राय समितीला देता आलेले नाहीत.

अभिप्राय व शिफारशी :-

११.१०९ महाराष्ट्र जीवन प्राधिकारणामार्फत पाणीपुरवठा मागणी मंजूर करुन त्या योजनांची अंमलबजावणी केली जात होती. परंतु, या योजना शासन स्तरावर राबविताना या गावांमध्ये / शहरांमध्ये ही योजना राबवायची आहे. तेथील नागरिकांचे अभिप्राय विचारात घेण्यात येत नसल्यामुळे पाण्याची पाईप लाईन पुढे ढकलायची, टाकी कोणी कुठे बांधायची यामध्ये मतभिन्नता व विसंगती आढळून यायच्या. त्यामुळे ज्या भागात ज्या गोष्टींची आवश्यकता नसेल तेथे देखील पाण्याच्या टाकीची व नळाची सोय करण्यात येत असल्यामुळे ज्या भागात पाणी टंचाई आहे त्यांच्याकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे या योजनेवर ब-याच जणांनी आक्षेप घेतले व मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत होते, अशीच परिस्थिती ही शौचालये बांधण्याबाबत होती. **शासनाने सदर योजना राबविण्याबाबत त्यामध्ये काही आमुलाग्र बदल जरी केले असले तरी, त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने लोकसहभाग हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असल्याचे समितीने**

निदर्शनास आणले. मानवाचे आरोग्य हे प्रामुख्याने पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता आणि योग्य स्वच्छतेवर अवलंबून असल्याने शासनाने पाणीपुरवठा व स्वच्छता योजना सुरु करताना व त्या यशस्वीपणे राबविण्यासाठी लोकसहभाग हा मुद्दा विचारात घ्यावा अशी समिती आग्रहाने शिफारस करीत आहे.

११.११० पाणीपुरवठा व स्वच्छता हे विषय नागरिकांच्या स्वास्थ्याशी निगडीत असल्याने राज्यातील नागरिकांच्या आयुष्यमानावरील त्याचा परिणाम होत असतो. पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या नुसत्या योजना कागदोपत्री असून चालत नाही तर त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणी ही त्या विभागात कार्यारत असणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर अवलंबून असते. राज्यातील जिल्हापरिषदेतील पाणीपुरवठा विभागातील तांत्रिक व अतांत्रिक रिक्त पदांचा आढावा समितीसमोर सादर झाला. शासनाचा पाणी पुरवठा व स्वच्छता हा विभाग राज्यातील सर्व सामान्य जनतेच्या जीवनाशी निगडीत आहे. या विभागाकडे पाणी पुरवठ्याच्या संदर्भात आवश्यक तो तांत्रिक अतांत्रिक स्वरूपाचा पुरेसा कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे. तथापि, **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मंजूर असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक पदापैकी रिक्त असलेली समितीस वर्ग-१ ची ४६ तांत्रिक पदे, वर्ग-२ ची ४४ तांत्रिक पदे, वर्ग-३ ची ८६ तांत्रिक पदे व वर्ग-३ व वर्ग-४ ची ४५० अतांत्रिक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. म्हणजे मंजूर पदांच्या जवळपास २०% हून अधिक पदे रिक्त असल्याने वर्षानुवर्षे एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने विभागाचा कारभार कसा चालतो याबाबत समितीने शंका व्यक्त केली. विभागातील रिक्त असलेली पदे तातडीने भरावयाची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात अवगत करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

११.१११ जिल्हापरिषदेकडे देखील पाणीपुरवठा विभागाकडे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. ती पदे भरण्याचे दृष्टीने ग्रामविकास विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी एकत्रित बसून त्याबाबत तातडीने रिक्त पदे भरण्यासाठी उपाययोजना करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात कळवावी असे समितीची शिफारस आहे.

११.११२ महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अतिप्रमाणात तर काही जिल्ह्यांमध्ये अतिशय अल्पप्रमाणात पाऊस पडतो यातही जिल्ह्यांतील सर्व भागांमध्ये पाऊस पडण्याचे प्रमाण सारखे नसते. त्यात तालुकानिहाय कमीजास्तपणा असतो. त्यामुळे दरवर्षी भरपूर पर्जन्यवृष्टी झालेल्या

भागात तसेच कमी पर्जन्यवृष्टी झालेल्या भागात साधारणतः फेब्रुवारी-मार्च महिन्यांमध्ये पाणीटंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होते. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये/वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर-जून या कालावधीत टंचाई निर्वारण कार्यक्रम राबविला जातो. **त्यामध्ये त्या गावांना/वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. गेली कित्येक वर्षे काही भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे माहित असून देखील शासन स्तरावर त्याचे कायमचे निर्मूलन करण्यासाठी कायमस्वरूपी कोणत्याही ठोस उपाययोजना अद्यापपर्यंत केल्याचे समितीस दिसून आले नाही. त्यामुळे दुष्काळ, पाणीटंचाई या विषयाशी संबंधित असलेले शासनाचे कृषि विभाग, महसूल, विभाग पाणीपुरवठा विभाग, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग इत्यादी विभागांनी आपआपसांमध्ये योग्य तो समन्वय साधून पाणीटंचाई निर्वारणासाठी व महाराष्ट्र टँकर मुक्त होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत अशी समिती आग्रहाने शिफारस करीत आहे.**

११.११३ राज्यामध्ये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान, शिवकालीन पाणी साठवण योजना, जलस्वराज्य योजना, ग्रामीण पाणीपुरवठा "आपलं पाणी" प्रकल्प, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम असे विविध केंद्र व राज्य अर्थसहाय्यीत योजना राबविण्यात येत असतात. **या योजनांसाठी पायाभूत सुविधा उभारण्याकरिता करोडो रुपयांचा निधी खर्च करण्यात येतो असे असले तरी आज महाराष्ट्र राज्यामध्ये बहुतांश योजना पूर्णपणे कार्यान्वित झालेल्या नसल्यामुळे जिल्हापरिषदा या योजना त्यांच्या ताब्यात घेत नाहीत. त्यामुळे त्यांची देखभाल-दुरुस्तीही होत नाही. अशाप्रकारे या नळपाणीपुरवठा योजना ठप्प झाल्या असून त्यांच्यावर झालेला शेकडो-करोडो रुपयांचा खर्चही वाया गेलेला आहे असे समितीने खेदाने नमूद केले असून योजना पूर्णात्वास नेण्यात येऊन त्याचा लाभ जनतेस मिळावयाचा असल्यास या योजनांची पुर्णत्वाची व देखभाल तसेच दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा विशिष्ट अभियंत्यांवर निश्चित करावी अशी समिती शिफारस करते तसेच या योजना सदोष असल्यामुळे जिल्हापरिषदा त्या ताब्यात घेत नाहीत. त्यामुळे या योजनांवर खर्च करुन देखील त्याचा काही उपयोग होत नाही. या योजना सुरु ठेवायच्या असल्यास त्यांना शासनाकडून अनुदान देणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु, १००% अनुदान न देता या प्रकल्पामधील पाण्याचे वापर करणारे जे ग्राहक आहेत त्यांच्याकडून जी पाणीपट्टी आकारली**

जाते त्याची वसूली नियमितपणे झाल्यास व शासनाने काही प्रमाणात अनुदान दिल्यास या योजनांच्या देखभाल-दुरुस्तीवर होणारा खर्च भागविता येईल व योजना देखील पूर्णपणे कार्यान्वित राहिल. त्यादृष्टीने शासनाने प्रोत्साहनपर योजनेचा विचार करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

११.११४ महालेखापालांनी सहायक अनुदानाशी संबंधित १४६८ प्रकरणांमध्ये उपभोक्ता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे मुद्दा उपस्थित झाल्यामुळे आक्षेप घेतला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये ७४२ कोटी रक्कमेच्या खर्चाबाबतचा आक्षेप आहे. उपभोक्ता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय पुढचा निधी मिळत नसल्यामुळे बरीचशी कामे या सदर प्रमाणपत्राअभावी रेंगाळलेली आहेत. सदरहू खर्च हा राज्यातील विविध पाणीपुरवठा योजनांवर झालेला आहे. सन २००७-२००८ मध्ये हजारोंच्या संख्येमध्ये नळयोजना राबविल्या गेल्या त्यावेळी जवळपास २२००० हजार गावांचे उद्दिष्ट होते व तेवढेच प्रकल्प होते. **आता या प्रकल्पांची संख्या एक लाखाच्यावर गेली असावी अशी माहिती समितीस प्राप्त झाली. त्यामुळे सर्व ग्रामपंचायतीमधून खर्च झालेल्या रकमेचे उपभोक्ता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात अडचण येत आहे. विभागाचे म्हणणे जरी खरे असले तरी, आर्थिक शिस्त पाळली गेली पाहिजे. सदर प्रमाणपत्रे संबंधितांकडून त्या-त्या वेळी घेणे अनिवार्य असताना त्यात दिरंगाई झाली आहे. यास्तव त्यामध्ये अनियमितता असणे योग्य नाही असे समितीचे मत झाले. त्यामुळे विभागाने ही सर्व अप्राप्त उपभोक्ता प्रमाणपत्रे त्वरित मिळविण्याच्यादृष्टीने ग्रामविकास विभागाशी समन्वय साधून गटविकास अधिकाऱ्यांवर ही प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी जबाबदारी निश्चित करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

११.११५ राज्यात पडलेल्या दुष्काळामुळे भूजलातील पाणीसाठ्याचे महत्त्व किती आहे हे दिसून आले आहे. आपल्या राज्यातील काही भागामध्ये पावसाळा समाप्त झाल्यावर लगेचच पाणी टंचाई जाणवू लागते. पाण्यासाठी बोअरवेल खोदण्याचे प्रमाणात अतिशय वाढ झाली असून भूगर्भातील पाणी पंपाद्वारे खेचून घेण्यात येते. यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत आहे. याचे काही कालांतराने दुष्परिणाम पुढच्या पिढीस भोगावे लागतील. **त्यामुळे अनियंत्रित पाणी उपशावर नियंत्रण ठेवणे आवश्यक झाले असून भूगर्भातील पाण्याचा साठा वाढविण्याच्या दृष्टीने निश्चित उपाययोजना करणे अगत्याचे आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा**

वापर करून भूजल सर्वेक्षण यंत्रणा, पुणे यांच्या सहकार्याने राज्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना शासनाने करावी अशी समितीची शिफारस आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

१२ गुणात्मक व दर्जेदार मराठी चित्रपटांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्याबाबत.

१२.१ भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात **अनुदान क्र. झेडडी - १ "सर्वसाधारण शिक्षण, सेक्रेटरीएट सामाजिक सेवा",मधील प्रधान शीर्ष २०७० इतर प्रशासनिक सेवा, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, २२२० माहिती व प्रसिध्दी, २२५१ सेक्रेटरिएट सामाजिक सेवा** व **अनुदान क्र. झेडडी - ५ "शिक्षण, कला क्रीडा संस्कृती यावरील भांडवली खर्च" मधील प्रधान शीर्ष ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च** याअंतर्गत महालेखाकारांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र. झेडडी - १ "सर्वसाधारण शिक्षण, सेक्रेटरीएट सामाजिक सेवा"

(रुपये हजारांत)

१२.२ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान रुपये**	**प्रत्यक्ष खर्च रुपये**	**अधिक (+) बचत (-)**
२०७० इतर प्रशासनिक सेवा			
२२०२ सर्वसाधारण शिक्षण			
२२२० माहिती व प्रसिध्दी			
२२५१ सेक्रेटरिएट सामाजिक सेवा			
दत्तमत			
मूळ पूरक	३,९७,०८	३,२५,५८	- ७१,५०

रक्कम वर्षभरात परत करण्यात आली (मार्च २००८)

टिपा व भाष्ये :- मूळ तरतूदी इतका देखील खर्च झाला नाही. रुपये ३०.५३ लाखांचे पूरक अनुदान अनावश्यक असल्याचे सिद्ध झाले आणि ती तरतूद लाक्षणिक मागणीतून निर्बंधित करता येऊ शकलो असली.

	एकूण अनुदान रुपये	प्रत्यक्ष खर्च रुपये	अधिक (+) बचत (-)
२२०२, सर्वसाधारण शिक्षण ०३ विद्यापीठांनाव उच्च शिक्षण १०२, विद्यापीठांना सहाय्य (०१) (०१) सर्वसाधारण शिक्षणासाठी (संतपीठ) विद्यापीठांना अनुदाने मूळ पुनर्विनियोजन	१,४९.७६	१,४९.७३	....

बांधकामाकरिता कार्यकारी अभियंता, औरंगाबाद यांच्याकडून कामांचा अंदाजित खर्च उशिराने मिळाल्याने मार्च २००८ मध्ये ५०.२४ लाखांचा निधी परत करण्यात आला.

१२.३ ज्ञापन :-

उपरोक्त लेखाशिर्षाखालील सन २००७-०८ या वित्तीय वर्षामध्ये अंतिम तरतूद रुपये १४९.७६ लाख प्राप्त असून त्या अनुषंगाने रुपये १४९.७६ लाख खर्च झालेला आहे. त्यामुळे बचत किंवा अधिक खर्च निरंक आहे. महालेखापाल कार्यालयाने कोणताही लेखा आक्षेप घेतलेला नसल्याने स्पष्टीकरण निरंक आहे.

(रुपये लाखांत)

१२.४ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान रुपये**	**प्रत्यक्ष खर्च रुपये**	**अधिक (+) बचत (-)**
२२५१ सेक्रेटरिएट - सामाजिक सेवा ९० सेक्रेटरिएट (०१) (०१) पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभाग. मूळ पूरक पुनर्विनियोजन - १३.९५	१,०८.६७	१,०५.४०	- ३.२७

टिपा व भाष्ये :- पदे रिक्त राहिल्यामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळे मार्च २००८ मध्ये १३.९५ लाखांचा निधी परत करण्यात आला.

१२.५ ज्ञापन :-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामध्ये सन २००७-०८ मध्ये ४६ पदी मंजूर होती. सदर पदांच्या वेतनासाठी अपूरी पडणारी रु.२९८१ लाख एवढी तरतूद पुरवणी मागणीद्वारे प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, मार्च २००८ अखेर पर्यंत रिक्त पदे भरली न गेल्यामुळे व कार्यरत कर्मचारी व अधिकाऱ्यांपैकी काही अधिकारी/कर्मचाऱ्यांची बदली झाल्याने वेतनासाठी केलेली सर्व तरतूद खर्च होऊ शकली नाही. त्यामूळे रु.१३.९५ लाख एवढा निधी पुनर्विनियोजीत करण्यात आला आहे. सदर बचत ही केवळ ३ टक्के आहे. याबाबत महालेखापालांनी कोणताही आक्षेप न घेतल्याने सदर परिच्छेद वगळण्यात यावा ही विनंती.

अनुदान क्र. झेडडी - ५ "शिक्षण, कला क्रीडा संस्कृती यावरील भांडवली खर्च"

(रुपये लाखांत)

१२.६ प्रधान शिर्ष	**एकूण अनुदान रुपये**	**प्रत्यक्ष खर्च रुपये**	**अधिक (+) बचत (-)**
४२०२ शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च (दत्तमत) ०४ कला व संस्कृती १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यामध्ये गुंतवणूक १९०(००) (०१) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांना भाग भांडवलाचे अंशदान मूळ ६,००.०० पुनर्वि - ४,३२.०० नियोजन विभागाकडून मिळालेल्या निदेशाच्या आधारे, मार्च २००८ मध्ये रू.४३२ लाखांचा निधी परत करण्यात आला.	१,६८.००	१,६७.००	१.००

१२.७ ज्ञापन :

सदर लेखाशिर्षाखाली रू.१६८.०० लाख इतके अनुदान प्राप्त झाले व प्रत्यक्ष खर्च रू.१६७.०० लाख झाल्याने रू.१.०० लाख इतकी बचत झाली आहे. सदर बचत ही नगण्य असल्याने सदर परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

साक्ष :-

१२.८ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाच्या अनुदान मागणी क्रमांक झेडडी-१ "सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा" (सर्व दत्तमत) संदर्भात लोकलेखा समितीने दि.२२ जून, २०१२ रोजी प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने अनुदान क्रमांक झेडडी-१ "सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा" (सर्व दत्तमत) या मागणीन्वये मंजूर करण्यात आलेल्या रकमेएवढा खर्च का करण्यात आला नाही ? याबाबत खुलासा मागितला विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, पूर्वी पर्यटन विभाग गृह विभागात व सांस्कृतिक कार्य विभाग समाजकल्याण विभागात समाविष्ट होता. सन २००७-२००८ मध्ये पर्यटन व सांस्कृतिक कार्य हा विभाग नव्याने निर्माण करण्यात आला. नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विभागासाठी ४५ पदे मंजूर करण्यात आली होती. नवीन विभाग तयार करताना ३२ पदे भरण्यात आली. उर्वरित पदे भरण्यासाठी सदर मागणी करण्यात आली होती.

१२.९ अनुदान क्रमांक झेडडी-५-४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च (दत्तमत) या मागणी अंतर्गत सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात फिल्मसिटीने स्टुडिओ क्रमांक १ व २ मध्ये वातानुकुलीत यंत्रणा बसविणे, स्टुडिओ क्रमांक ७ ची दुरुस्ती करणे व अन्य काही कामांसाठी शासनाकडे ६ कोटी रुपयांची मागणी करणारा प्रस्ताव दिनांक ११ ऑगस्ट २००८ रोजी सादर केला होता. सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात हा प्रस्ताव विभागाने वित्त व नियोजन विभागाकडे पाठविला. काही त्रुटींची पूर्तता केल्यानंतर या विभागाने हा प्रस्ताव मान्य केला व दिनांक १२ मार्च, २००८ रोजी १ कोटी ६७ लाख रुपये शिक्षण, क्रीडा कला व संस्कृती या विभागासाठी मंजूर केले. या विभागाने सदर निधी तसाच्यातसा रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाकडे सुपूर्द केला. या निधीतून महामंडळाने स्टुडिओ क्रमांक १ व २ मध्ये वातानुकुलीत यंत्रणा बसविण्याचे काम सन २००९ मध्ये पूर्ण केल्याची विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणली असता समितीने असे सांगितले की, विभागाने सादर केलेल्या लेखी माहितीत असे नमूद करण्यात आले आहे की, "नियोजन विभागाकडून मिळालेल्या निदेशाच्या आधारे मार्च, २००८ मध्ये रु.४३२ लाखांचा निधी परत करण्यात आला."

सचिवांनी केलेला खुलासा आणि लेखी माहिती यामध्ये तफावत असण्याची कारणे काय अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, सांस्कृतिक कार्य विभागाने वित्त विभागाकडे ६ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी विभागासाठी केवळ १ कोटी ६८ लाख रुपये मंजूर झाले. त्यावेळी वित्त विभागाने असे नमूद केले होते की, "शासनाची आर्थिक स्थिती लक्षात घेता ६ कोटी रुपये मंजूर करणे शक्य होणार नाही. त्यामुळे फक्त १ कोटी ६८ लाख रुपये मंजूर करण्यात येत आहेत." परंतु, कागदपत्रानुसार असे दिसते की, ४३२ लक्ष रुपये परत दिले आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, एवढी रक्कम विभागाला मिळालेलीच नाही.

१२.१० विभागाने सदर वस्तुस्थिती महालेखाकार यांच्या निदर्शनास का आणून दिली नाही ? तसेच विभागाने ६ कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर केला होता. त्यापैकी वित्त विभागाने फक्त १ कोटी ६८ लाख रुपये मंजूर केले आहेत व त्यामधील फक्त १ लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. अशा परिस्थितीत महालेखाकारांनी कोणत्या मुद्याबाबत आक्षेप घेतला आहे. अशी समितीने विचारणा केली तसेच महालेखाकार यांनी In this we are showing that the total grant under this head is Rs. 168 lakhs and the actual expenditure is Rs. 167 lakhs असे सांगितले. यावर विभागीय सचिवांनी In this there is a saving of Rs.1 lakh. As this saving was so meager, we have requested the Accountant General (A.G.) to consider the explanation and cancel the para असे सांगितले.

१२.११ विभागाने ६ कोटी रुपयांची मागणी केल्यानंतर वित्त विभागाने १ कोटी ६८ लाख रुपये मंजूर केले आहेत. विभागाने त्यापैकी बहुतांशी रक्कम खर्च केली असून फक्त १ लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. महामंडळाच्या स्थापनेपासून आतापर्यंत राज्य शासनाने किती भागभांडवल पुरविले आहे? याची विचारणा समितीने विभागाकडे केली असता, विभागाने रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाची स्थापना करताना शासनाकडून १५ कोटी रुपयांचे भागभांडवल देण्यात येईल, असे ठरविण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत १२ कोटी २९ लाख रुपयांचे भागभांडवल देण्यात आले आहे. महामंडळाकडून दरवर्षी जेवढी मागणी येते त्याप्रमाणे भागभांडवलाची उर्वरित रक्कम देण्यात येत असते.

१२.१२ समितीने महामंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत दरवर्षी शासनाने भागभांडवल म्हणून किती रक्कम महामंडळाला दिलेली आहे, अशी विचारणा केली असता विभागाने खालील माहिती समितीस दिली.

अ.क्र.	वर्ष	रक्कम रूपये (रुपये लाखात)
(१)	१९७७-१९७८	७६.३०
(२)	१९७९-१९८०	३२.९०
(३)	१९८१-१९८२	१५.००
(४)	१९८२-१९८३	१५.००
(५)	१९८३-१९८४	१५.००
(६)	१९८४-१९८५	२५.००
(७)	१९८५-१९८६	२०.४०
(८)	१९८६-१९८७	२५.००
(९)	१९८७-१९८८	१६.५०
(१०)	१९८८-१९८९	२४.२४
(११)	१९९०-१९९१	१५.००
(१२)	१९९१-१९९२	२८.२०
(१३)	१९९२-१९९३	२८.४०
(१४)	१९९३-१९९४	१९.५०
(१५)	१९९४-१९९५	४८.२०
(१६)	१९९५-१९९६	५८.००
(१७)	२००६-२००७	६००.००
(१८)	२००७-२००८	१६७-००
	एकूण	**१२२९.६४**

१२.१३ महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (अर्थात दादासाहेब फाळके चित्रनगरी) या मंडळाच्या संदर्भातील अतिरिक्त माहिती समितीस त्रास झाली असून सदर माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

१२.१४ अनुदान क्रमांक झेड्डी-१-सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा या मागणी अंतर्गत समितीने मराठी चित्रपटांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाची चर्चा राज्यभर होत असते. साधारणपणे २५ लाख रुपयांचे अनुदान मराठी चित्रपटांना देण्यात येते. असे निदर्शनास येत आहे की, अत्यंत सुमार दर्जाच्या चित्रपटांना अनुदानाचे वाटप केले जाते. केवळ एखाद्याची हौस पूर्ण करण्यासाठी चित्रपट काढण्यात येतो व शासनाकडून अनुदान पदरात पाडून घेतले जाते. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण चित्रपटांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी अशा प्रकारच्या गौरवास्पद चित्रपट निर्मात्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने ही योजना राज्य शासनाने सुरु केलेली आहे. तथापि, मूळ उद्देशापासून आपण दूर जात आहोत व त्यामुळे खऱ्या कलाकारांना व गुणवत्तापूर्ण चित्रपट निर्माण करणाऱ्या निर्मात्यांना आर्थिक सहाय्यापासून वंचित रहावे लागते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या योजनेसंदर्भात शासनाचा उद्देश, योजनेचे निकष व एकूण कार्यपध्दती याबाबत समितीस माहिती देण्यात यावी असे सांगण्यात आले तसेच व्हिसलिंग वूड प्रकरणाची सद्य:स्थिती बाबत अवगत करावे असे सांगितले.

१२.१५ यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देताना व्हिसलिंग वूडचे प्रकरण न्यायालयात गेले होते. चित्रपट महामंडळाची एकूण ५१७ एकर जमीन आहे. त्यापैकी २० एकर जमीन श्री.सुभाष घई यांच्या व्हिसलिंग वूडसाठी मंजूर करण्यात आली होती. एकूण २० एकर जमिनीमधील साडेचौदा एकर मोकळी जमीन असून साडेपाच एकर जमिनीवर इमारत बांधण्यात आली आहे.

१२.१६ या प्रकरणी न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, महामंडळाने प्रथम व्हिसलिंग वूडकडून साडेचौदा एकर मोकळी जमीन ताब्यात घ्यावी. इमारत व त्याखालील जमीन पुढील दोन वर्षानंतर ताब्यात घ्यावी. यामागे न्यायालयाचा असा उद्देश होता की, या इमारतीमध्ये चित्रपट निर्मितीसंबंधीचे प्रशिक्षणार्थी शिक्षण घेत आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी दोन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला आहे, त्यांचे नुकसान होता कामा नये. त्यामुळे इमारत व त्याखालील जमीन २ वर्षानंतर ताब्यात घ्यावी व या कालावधीसाठी व्हिसलिंग

वूडकडून महामंडळाने भाडे घ्यावे. सदर भाड्याची रक्कम ७९ कोटी रुपये आहे. २ वर्षानंतर भाड्याच्या ७९ कोटी रुपये रकमेतून इमारतीची किंमत वजा करुन उर्वरित रक्कम, इमारत व इमारतीखालील जागा व्हिसलिंग वूडकडून घ्यावी.

१२.१७ विभागीय सचिवांनी समितीला पुढे अशीही माहिती दिली की, न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे इमारतीचे मूल्यमापन (व्हॅल्युएशन) निश्चित करण्याच्या सूचना अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांना देण्यात आल्या आहेत. महामंडळाने साडेचौदा एकर मोकळी जमीन ताब्यात घेतली असून जेसीबीच्या सहाय्याने जमीन एकसारखी करुन घेण्यात आली आहे व चित्रपटांच्या शुटिंगसाठी भाड्याने देण्याचे काम देखील सुरु केले आहे. या माध्यमातून महामंडळाला महसुलही प्राप्त होत आहे. चित्रपट अनुदानाबाबतचा सध्याचा शासन निर्णय सन १९९७ मधील आहे. त्यानुसार चित्रपटांचा 'A', 'B' व 'C' असा दर्जा परीक्षा मंडळाकडून निश्चित केला जातो. 'C' दर्जा मिळालेल्या चित्रपटांना ५ लाख रुपये अनुदान देण्यात येत होते. तर 'A' दर्जा मिळालेल्या चित्रपटांना २५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. चित्रपटांना जास्तीत जास्त २५ लाख रुपये अनुदान देण्यात येते.

१२.१८ नंतरच्या कालावधीत या संपूर्ण कार्यपध्दतीचा आढावा घेण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीत चित्रपट क्षेत्रातील तज्ञांचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये श्री.विक्रम गोखले, श्री.चंद्रकांत देसाई, श्री.चंद्रकांत कुलकर्णी व अन्य ८ तज्ञांचा समावेश आहे. या समितीने अभ्यास करुन काही शिफारशी शासनाला केल्या आहेत. समितीने अशी शिफारस केली आहे की, 'C' दर्जा असलेल्या चित्रपटांना अनुदान न देता फक्त 'A' व 'B' दर्जा मिळालेल्या चित्रपटांना अनुदान देण्यात यावे. त्याचप्रमाणे अशीही शिफारस करण्यात आली आहे की, चित्रपट निर्मितीचा वाढलेला खर्च विचारात घेता २५ लाख रुपयांऐवजी ४० लाख रुपये अनुदान देण्यात यावे. त्याचप्रमाणे समितीने कार्यपध्दतीत देखील काही बदल सुचविले आहेत. यानुसार परीक्षा मंडळाने चित्रपटाचा दर्जा निश्चित करण्यासाठी चित्रपटांच्या १० अंगांसाठी गुण बहाल करावेत व त्यानुसार दर्जा निश्चित करावा. या नवीन कार्यपध्दतीला 'मार्किंग सिस्टिम' असे संबोधले आहे.

१२.१९ ज्या चित्रपटांना ६० ते ७९ या दरम्यान गुण मिळालेल्या चित्रपटांना 'B' दर्जा व ८० पेक्षा जास्त गुण मिळालेल्या चित्रपटांना 'A' दर्जा बहाल करावा व ६० पेक्षा कमी गुण मिळालेल्या चित्रपटांना अनुदानासाठी अपात्र ठरवावे. 'A' दर्जा प्राप्त चित्रपटाला ४० लाख रुपये व 'B' दर्जा प्राप्त चित्रपटाला ३० लाख रुपये अनुदान द्यावे, अशी कार्यपध्दती समितीने सुचविली आहे.

१२.२० याप्रमाणे बदल केल्यास अनुदानासाठी चित्रपटांची संख्या कमी होईल, दर्जा नसलेल्या चित्रपटांना अनुदान दिले जाणार नाही आणि गुणात्मक व दर्जेदार चित्रपटांना आर्थिक सहाय्य मिळेल, असा समितीचा उद्देश आहे. समितीचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणार असून मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर नवीन कार्यपध्दती अंमलात येईल असेही समितीला सांगण्यात आले.

१२.२१ अनुदान क्रमांक झेडडी-१-सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा या मागणी अंतर्गत समितीने रिक्त पदांची सद्य:स्थिती काय आहे ? शासनाने रिक्त पदे भरण्यास बंदी घातली आहे का ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी रिक्त पदे भरण्यास सन २००७-२००८ मध्ये कोणतीही बंदी नव्हती. अद्यापि, सद्य:स्थितीत मंजूर पदांपैकी ३% पदे भरण्यास परवानगी असून उर्वरित पदे भरण्यास बंदी आहे. या विभागाअंतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.लं.देशपांडे अकादमी, हिंदी अकादमी वगैरे १०-१२ संस्था येतात. त्यापैकी काही संस्था/कार्यालयांनी स्वत:चे रिक्रुटमेंट रुल्स तयार केले नव्हते. सदरचे काम हाती घेण्यात आले आहे. सद्य:स्थितीत जवळ जवळ ७० ते ८० टक्के पदे भरली असून २३ पदे रिक्त आहेत. सांस्कृतिक कार्य संचालनालयाची एकूण ७१ मंजूर पदांपैकी ४८ पदे भरण्यात आली व ती पदे भरण्याची प्रक्रिया सुरु झाली असल्याचे सांगितले यावर समितीने आपल्या विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयांच्या रिक्त पदांची माहिती एका तक्त्यात समितीला सादर करण्याबाबत सांगितले असता सचिवांनी पुढील माहिती समितीला दिली.

गट 'अ' व 'ब' मधील सरळसेवेची कोटयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा संवर्गनिहाय तपशिल दि.३१.०६.२०१२ अखेरच्या माहितीचे विविरणपत्र-२

अ.क्र	विभागाचे नाव	गट	रिक्त पदांची संख्या	किती पदांकरिता आयोगाकडे मागणीपत्र पाठविले आहे
१	२	३	४	५
(१)	पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग व अधीनस्त कार्यालये	अ	४	<u>सरळसेवेच्या ४ रिक्त पदांपैकी</u> (१) पुराभिलेख संचालनालयातील संचालक १ पदासाठी माहे जुलै २०१२ रोजी म.ला.आ. जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच नव्याने निर्माण करण्यात आलेल्या उपसंचालक पदाचे सेवाप्रवश नियमास म.लो.आयोगाने सुचविलेल्या सुधारणा सुधारीत करणेबाबत संचालनालयाला माहे ७/२०१२ रोजी कळविण्यात आले आहे. (२) उर्वरीत २ पदांपैकी वित्तीय सल्लागाराचे माहे ७/२०१२ रोजी रिक्त झालेले १ पद पु.ल. अकादमीचे असून ते लेखा व कोषागाराकडून प्राप्त करून घेण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. उर्वरीत हिंदी, सिंधी व गुजराती अकादमीतील नवनिर्मीत सहसंचालक, या १ रिक्त पदासाठी सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाकडे माहे ०७/२०१२ रोजी सादर करण्यात आले आहेत.
(२)	पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग व अधीनस्त कार्यालये	ब	१४	<u>१४ रिक्त पदांपैकी</u> (१) पुराभिलेख विभागातील सहायक संचालकांच्या ३ पदांबाबत, सेवाप्रवेश नियमांना म.लो.आयोगाने सुचविलेल्या सुधारणा सुधारीत करणेबाबत संचालनालयाला माहे ७/२०१२ रोजी कळविण्यात

आले आहे.

(२) पुरातत्व विभागातील सरळसेवेच्या ९ रिक्त पदांपैकी सहायक संचालक ३ पदे, नोंदणी अधिकारी २ पदे व अभिरक्षक संवर्गातील ४ पदे आहेत. त्याबाबत मागणीपत्र प्राप्त झाले असून त्यावर उपस्थित झालेल्या मुद्दांची पुर्तता करणेबाबत संचालनालयाला कळविण्यात आले आहे.

(३) सांस्कृतिक कार्य संचालनालयातील २ पदांपैकी कार्यक्रम अधिकारी १ पद व लेखा अधिकारी १ पदासाठी सेवाप्रवेश नियम तयार करून सा.प्र.वि.कडे माहे ०७/२०१२ रोजी मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत.

एकूण १८

गट 'अ' व 'ब' मधील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा संवर्गनिहाय तपशिल दि.३१.०६.२०१२ अखेरच्या माहितीचे विवरणपत्र-३

अ.क्र.	विभागाचे नाव	गट	रिक्त पदांची संख्या	किती पदांकरिता वि.प.स.ची बैठक होऊन पदोन्नतीची कार्यवाही सुरू आहे.
१	२	३	४	५
(१)	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व अधीनस्त कार्याल्ये	अ	१	पुरातत्त्व संचालनालयातील उपअभियंता हे पद नव्याने निर्माण झालेले असून त्याचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२)	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व अधीनस्त कार्यालये	ब	९	पदोन्नतीच्या ९ पदांपैकी (१) पुरातत्व विभागाच्या पदोन्नतीच्या **३** पदांपैकी **१** पद अभिरक्षकाचे व **१** पद उप अभिरक्षकाचे व **१** पद प्रशासन अधिकाऱ्याचे असून अभिरक्षकाचे रिक्त पद भरण्याकरीता निम्न संवर्गात कर्मचारी उपलब्ध नाही. उप अभिरक्षकाचे रिक्त पद भरण्याकरीता दि.१७/०८/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. (२) सांस्कृतिक कार्य संचालनालये पदोन्नतीच्या ३ पदांपैकी २ कार्यक्रम अधिकारी व सहायक संचालक १ पदासाठी सेवाप्रवेश नियम तयार करून सा.प्र.वि.कडे माहे ०७/२०१२ रोजी मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत. (३) पुराभिलेख विभागातील **सहायक संचालकाच्या ३ पदांचे सेवाप्रवेश नियमांस** म.लो.आयोगाने सुचविलेल्या सुधारणा सुधारीत करणेबाबत संचालनालयाला माहे ७/२०१२ रोजी कळविण्यात आले आहे.
		एकूण	**१०**	

१२.२२ डॉक्युमेंटरीबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नसल्याने याबाबतची माहिती सचिवांनी समितीला देण्यास सांगितले विभागीय सचिवांनी याबाबत माहिती देताना डॉक्युमेंटरी हा विषय माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारितील आहे. डॉक्युमेंटरीची निवड करण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केली आहे. राष्ट्रपुरुष, थोर नेते, समाजातील विशिष्ट घटना किंवा अन्य महत्वाचे विषय यामधून डॉक्युमेंटरीचे विषय निवडण्यात येतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर १९४२ चे भारत छोडो आंदोलन असेल किंवा काही महत्वाच्या घटना असतील तर त्यांना प्राधान्य देण्यात येते. एखाद्या विषयावर किंवा राष्ट्रपुरुषांवर डॉक्युमेंटरी तयार करण्याबाबत समाजातील नामवंत व्यक्ती, सन्माननीय विधानसभा, विधान परिषद सदस्य, खासदार, मंत्री महोदय किंवा मुख्यमंत्री महोदयांकडून समितीला शिफारशी प्राप्त होत असतात. त्यांच्या सूचना समितीसमोर ठेवण्यात येतात व त्यांना मंजुरी देण्यात येते. अर्थसंकल्पीय तरतुदीअन्वये उपलब्ध असलेल्या निधीतून आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

१२.२३ अनुदान क्रमांक -झेड्डी-१ सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा या मागणी अंतर्गत समितीने राज्यात एकूण किती संग्रहालये आहेत व त्यांना दरवर्षी किती अनुदान देण्यात येत याची विचारणा विभागीय सचिवांकडे केली असता राज्यात एकूण १३ शासकीय वस्तू संग्रहालये आहेत. नागपूर, सिंदखेड राजा, पैठण, नाशिक, माहूर, सांगली, कोल्हापूर, सातारा, औंध, उस्मानाबाद अशी १३ शासकीय वस्तू संग्रहालये आहेत, अशी माहिती सचिवांनी समितीला दिली.

१२.२४ यावर समितीने सचिवांच्या असे निदर्शनास आणले की, गेल्या २५ वर्षात वस्तुसंग्राहलयाच्या अनुदानाच्या रकमेत शासनाने वाढ केलेली नाही. या संग्रहालयांना केवळ १८ हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात येते. सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमातून मिळणाऱ्या पैशातून संग्रहालयाचा खर्च भागवितात. परंतु, संग्रहालयाचा देखभाल व दुरुस्ती खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, आस्थापना खर्च, वीज शुल्क, पाणी पट्टी, स्थानिक पालिका कर हा सर्व खर्च १८ हजार रुपये अनुदानातून भागू शकतो का, याचा शासनाने विचार केला नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली. सर्व संग्रहालयांनी वाढीव अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत. तथापि, शासनाकडून अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यांनी

याबाबत सचिव स्तरावर एक बैठक आयोजित करावी, राज्यातील सर्व संग्रहालयांच्या संचालकांना आमंत्रित करावे व त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यामधून मार्ग काढावा सूचविले यासंदर्भात निश्चितपणे लवकरच अशी बैठक आयोजित करण्यात येईल व राज्यातील सर्व संग्रहालयांच्या संचालकांना आमंत्रित केले जाईल असे आश्वासन विभागीय सचिवानी समितीला दिले.

१२.२५ रूपये ७९.६५ लक्ष कोणत्या बाबीवर खर्च करण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी १२ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून केंद्र सरकारने राज्यातील प्रोटेक्टेड मॉन्यूमेंटची दुरुस्ती व जतन करणे यासाठी २००६-०७, २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या चार वर्षाच्या काळात ५० कोटी रुपये मंजूर केले होते. त्यापैकी २००६-०७ व २००७-०८ मध्ये प्रत्येकी १२.५ कोटी याप्रमाणे २५ कोटी रुपये उपलब्ध झाले होते. त्यापैकी झालेला हा खर्च आहे. या निधीतून बाणगंगा तलावाची दुरुस्ती व जतन करणे, गेट वे ऑफ इण्डिया इमारतीच्या छतावरुन मोठया प्रमाणावर गळती होत असल्यामुळे जवळपास सहा महिने ही इमारत बंद ठेवण्यात येऊन स्कॅफोल्डिंगच्या माध्यमातून त्याची दुरुस्ती करण्यात आली. लखोजी राजवाडा, रामटेक मंदिर, सिध्देश्वर मंदिर नांदेड, उदगीर किल्ला या कामांची दुरुस्ती करण्यात आली. या ५० कोटी रुपयांपैकी २६ कोटी रुपये अद्याप शिल्लक आहेत. त्या निधीतून करावयाची कामे मंजूर झालेली असून ती कार्यवाहीत असून २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या वर्षात कामे टेंडरखाली आलेली असून ही सर्व रक्कम खर्च होईल असे सांगितले. यावर समितीने संग्रहालयाच्या नवीन बांधकामांसाठी निधी दिला जातो का? तसेच पैठण येथील कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा मुद्दा अद्याप अनिर्णित आहे? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सप्टेंबर महिन्यात जी बैठक आयोजित केली जाणार आहे, त्या बैठकीत या विषयासंदर्भात सविस्तर माहिती दिली जाईल. अस्तित्वात असलेल्या म्युझियमची डागडुजी विभागामार्फत केली जाते. नागपूर, पैठण, तेर, रत्नागिरी येथील वास्तूंची विभागामार्फत दुरुस्ती केलेली आहे. श्री.बंडोपंत जोशी व एक अल्पसंख्याक समाजाचे कर्मचारी यांच्या निवेदनावर शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे त्यानुसार त्यांना मानधन देय नाही. या प्रश्नाबाबत लोकआयुक्तांपुढे साक्ष झाली होती. जो करार झालेला आहे त्यामध्ये या दोघांचे नाव समाविष्ट नाही. त्यामुळे वित्त विभागापुढे

चार वेळा प्रस्ताव जाऊनही मान्य झालेला नाही. ते कर्मचारी आहेत किंवा त्यांना पूर्वी वेतन मिळत होते याबाबत त्यांच्याकडे देखील कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे सांगितले.

१२.२६ यावर समितीने राज्यातील कलाकरांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतचे निकष काय आहेत, तसेच किती कलावंतांना आतापर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते? जे खरेखुरे कलाकार आहेत ते आर्थिक सहाय्यापासून वंचित राहतात, त्यांचे नाव यादीत समाविष्ट होत नाही. ज्यांनी कलेची जोपासना केली त्यांच्याकडे आज उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही ही वस्तुस्थिती असून आर्थिक सहाय्य देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांपुढे त्यांची मुलाखत घेतली जाते, त्यानंतर प्रस्ताव पाठविले जातात. परंतु अनेक दिवस प्रस्ताव प्रलंबित राहतात, कित्येक कलाकारांना आर्थिक सहाय्य वेळेवर मिळत नाही. नवीन कलाकारांची यादी मंजूर केली जात नसल्याबाबत अनेक लोकांच्या तक्रारी असून त्याबाबत कोणतीच कार्यवाही केली जात नसल्याची खंत समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केली की, अगोदर राज्यस्तरीय समिती होती. विभागाचे मंत्री समितीचे अध्यक्ष व समितीवर विभागाचे राज्यमंत्री, मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष, नाटककार, चित्रपट मंडळाचे अध्यक्ष, तमाशा व लावणी मंडळाचे अध्यक्ष सदस्य होते.

१२.२७ कलावंताना मानधन देण्याबाबत दोन वर्षापूर्वी नव्याने व्यवस्था केलेली असून जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार केली असून जिल्हापरिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी त्या समितीचे सदस्य सचिव आहेत. त्या शिवाय गटविकास अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी त्या समितीवर सदस्य आहेत. त्या त्या जिल्हयातील अर्ज या समितीपुढे येतात. त्या अर्जाची छाननी करुन समिती विभागाकडे प्रस्ताव पाठविते आणि त्यानंतर विभागाकडून आर्थिक अनुदान दिले जाते. दोन वर्षापासून प्रत्येक जिल्हयाला प्रतिवर्षी ६० चा इष्टांक ठरवून दिलेला आहे. विदर्भातील अनेक अर्ज प्रलंबित आहेत असे सचिवांनी सांगितले असता असे किती कलावंत आहेत, ज्यांचे नाव जिल्हयाच्या समितीपुढे आलेले नाही या संदर्भात प्रत्येक जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. प्रतिवर्षी ६० चा इष्टांक जिल्हयाला ठरवून दिलेला असल्यामुळे आणखी अर्ज आले तर संबंधित कलावंत यादीत नाव नसल्याने अनुदान मिळण्यापासून वंचित राहतील. त्यामुळे अशा कलावंतांचे अर्ज सुध्दा विचारात घ्यावेत असे कळविले आहे. 'अ' वर्ग जो राष्ट्रीय

पातळीवरील कलावंत आहे त्याला दरमहा १४०० रुपये, ब वर्ग राज्य स्तरावरील कलावंत आहे त्याला दरमहा १२०० रुपये व क वर्ग स्थानिक जिल्हा पातळीवरील कलावंताला दरमहा १००० रुपये आर्थिक अनुदान दिले जाते. अशी प्रत्येक जिल्हयातून कलावंतांची यादी प्राप्त झाल्यानंतर किती अतिरिक्त अनुदान लागेल हे कळविण्यास सांगितले आहे. विभागाकडे नंदूरबार, रत्नागिरी, सोलापूर, बीड, गोंदिया जिल्हयाची माहिती प्राप्त झाली आहे. जिल्हयातील पात्र कलावंत आर्थिक अनुदानापासून वंचित राहू नयेत हा विभागाचा उद्देश आहे. पात्र कलावंत कोण आहेत हे समितीने ठरवावयाचे आहे.

१२.२८ यावर समितीने समितीचे पदसिध्द अध्यक्ष हे पालकमंत्री आहेत. खरे कलावंत कोण आहेत हे शोधण्यासाठी पालकमंत्री कार्यबाहुल्यामुळे पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा समितीवर स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश केला गेला पाहिजे. कारण लोकप्रतिनिधींचा थेट जनतेशी संपर्क येत असतो, तथापि, अनुदान मिळावे म्हणून कलावंत समितीपुढे येतीलच असे नाही. मुंबई शहरामध्ये सिनेमा क्षेत्रात काम करणारे, गाणी गाणारे, वाद्ये वाजविणारे कलावंत मोठया प्रमाणात राहतात. अशा कलावंतांकडे स्वत:हून विभागाच्या प्रतिनिधींनी जाऊन चौकशी करुन त्यांच्या आरोग्याबाबत, मानधनाचा अर्ज भरुन घेण्याबाबत कार्यवाही केली पाहिजे. त्या दृष्टीने विभागाने काय नियोजन केले आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी यावर मुख्य प्रश्न बजेटचा असल्याचे सांगितले परंतु त्या अनुषंगाने योजना तयार करु असे आश्वासन दिले. यावर समितने मुंबई उपनगरासाठी सुध्दा समिती करावी अशी मागणी केली असता यावर विभागीय सचिवांनी समिती अस्तित्वात असून अतिरिक्त जिल्हाधिकारी या समितीचे सदस्य सचिव असल्याचे सांगितले. समितीने या कलावंतांना केंद्र शासनाकडून सुध्दा मानधन दिले काय? अशी विचारणा केली असता वृद्ध कलावंताना मानधन देण्याबाबत केंद्र शासनाची योजना असून याअंतर्गत महाराष्ट्रतील कलावंतांना देखील मानधन देण्यात येत आहे असे सांगितले. यावर समितीने राज्यातील जे कलावंत आहेत त्या संदर्भात समिती अस्तित्वात असून ती समिती राज्यामध्ये फिरुन केंद्र शासनाला प्रस्ताव पाठविते. असे सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की केंद्र शासनाच्या कलावंत मानधन योजनेअंतर्गत राज्यातील कलावंतांची निवड करण्यासंदर्भात कोणतीही समिती अस्तित्वात नाही. ज्या कलावंतांचे प्रस्ताव

या विभागास प्राप्त होतात, त्यांच्या प्रस्तावांची छाननी करून योग्य प्रस्ताव शासनाच्या शिफारशीसह केंद्र शासनाकडे मानधन मंजूर करण्यासाठी सादर केले जातात.

१२.२९ कलावंत हे स्वाभिमानी असतात. ते आर्थिक अनुदान मिळावे म्हणून शासनाच्या दारी येणार नाहीत. त्यांच्या वृध्दापकाळात औषधपाण्यासाठी उपाययोजना करणे हा समाजव्यवस्थेचाच एक भाग आहे. प्रत्येक जिल्हयाला ६० चा इष्टांक ठरवून दिल्याचे सांगण्यात आले आहे. संजय गांधी योजनेमध्ये कोणतीच मर्यादा ठेवलेली नाही. आर्थिक अनुदान देण्याबाबत निकष जरुर लावण्यात यावा. संबंधित लाभार्थ्यांचा पूर्वेतिहास असला पाहिजे, त्याबाबतचा दाखला असला पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असता कामा नये असे मत समितीने मांडले.

१२.३० कला, सांस्कृतिक, नाट्य राज्य महोत्सव यासाठी उपलब्ध झालेली तरतूद कमी खर्च होण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नाट्य राज्य महोत्सव वर्षातून एकदा महाराष्ट्र शासनाचा लावणी महोत्सव मुंबईमध्ये एनसीपीए येथे भरविला जातो. जिल्हा स्तरावरुन जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव येतात व निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यक्रम केले जातात. सोलापूर येथे दरवर्षी कार्यक्रम आयोजित केला जात नाही. अकलूज येथे काही वर्षापूर्वी खास कार्यक्रम केला गेला होता अशी माहिती समितीच्या निदर्शनास आणली.

१२.३१ यावर समितीने कलेला प्रोत्साहन देण्याऐवजी उपलब्ध झालेला निधी अखर्चित ठेवून कलावंतांवर अन्याय केलेला आहे हा खरा आक्षेप आहे. निधी खर्च का केला जात नाही ? लावणी महोत्सव साजरा केला जातो, त्यामध्ये स्त्रियांच्या लावण्या सादर करण्याकडे शासन खास लक्ष देते. मागील काळात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पुरुषांच्या लावण्याचा अप्रतिम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबई आणि नागपूर येथे स्त्रियांच्या लावण्यांचा कार्यक्रम झालेला होता. पुरुषांच्या लावण्या सादर करण्याबाबत विभागाने लक्ष दिले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी जरुर विचार केला जाईल असे आश्वासन समितीला दिले.

१२.३२ समितीने मार्च, २००८ मध्ये देयकांचा निपटारा करण्यासाठी रु.३६.६४ लाख अधिक खर्च झाला असून अतिरिक्त निधीची गरज का भासली? अर्थसंकल्पात तरतूद करता आली नाही का? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी पैठण येथील संतपीठाचे

अंदाजपत्रक उशिरा प्राप्त झाले होते, त्यामुळे अतिरिक्त मागणी २००८ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करावी लागली असा खुलासा केला.

१२.३३ नवी दिल्ली येथे संचलनामध्ये प्रत्येक राज्याचे चित्ररथ सहभागी होत असतात. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाचा समावेश असतो का तसेच चित्ररथानां पारितोषिके दिली जातात परंतु ज्या चित्ररथांना पारितोषिक नाकारले जाते ते का नाकारले याची कारणे कळविली जातात काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी मागील २२ वर्षात महाराष्ट्राच्या चित्ररथाला ३ ते ४ वर्षे प्रथम आणि काही वेळेला द्वितीय पारितोषिक मिळालेले आहे. यावर्षी राज्याचा चित्ररथ नव्हता. चित्ररथाची निवड करण्यासाठी केंद्र शासनाची एक समिती आहे. प्राथमिक स्वरूपाची समिती आहे. केंद्रीय संरक्षण सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती आहे. या समितीपुढे देशातील सर्व राज्यांच्या चित्ररथांचे विषय येतात. त्या विषयाची छाननी करून ही समिती कोणते चित्ररथ दाखवायचे ते निश्चित करते. दरवर्षी प्रत्येक राज्याचे चित्ररथ असतातच असे नाही. शेवटी कोणते चित्ररथ दाखवायचे याबाबत समिती निर्णय घेत असते. गेल्या २-३ वर्षात महाराष्ट्राच्या चित्ररथाला पारितोषिक मिळालेले नाही. एक वर्ष डबेवाल्यांच्या संदर्भात चित्ररथ दाखविला होता. एक वर्ष लेण्यांच्या संदर्भात चित्ररथ दाखविला होता. यावर्षी सप्टेंबर महिन्यात यासंदर्भात बैठक होणार आहे. यावर्षी चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांची जन्मशताब्दी आहे. त्या विषयावर चित्ररथ तयार करण्याचा मानस आहे. परंतु अजून अंतिम निर्णय झालेला नाही. तसेच चित्ररथांना पारितोषिक नाकारले जाते. त्याची कारणे लेखी कळविली जात नाही. योजना पटली तरच चित्ररथ दाखविण्याचा विचार केला जातो. ३५ राज्ये आहेत इतक्या राज्यांचे चित्ररथ दाखविणेही शक्य होत नसल्याचे सांगितले.

१२.३४ प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक मोठे नाट्यगृह बांधण्याची शासनाची योजना आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून मागणी न आल्यामुळे खर्च झालेला नाही म्हणजेच तरतूद अखर्चित आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मोठे नाटयगृह असावे असे शासनाचे धोरण अनेक जिल्हाधिकाऱ्यांना माहीत नसल्याचे सांगत याबाबत विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी गेल्या ३ वर्षात असे झालेले नसून पैसे जास्त खर्च झालेले असल्याचे सांगितले. यावर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विस्तृत असे नाटयगृह असावे असे शासनाचे धोरण आहे.

अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हयाच्या ठिकाणी असे नाटयगृह बांधलेले नाही. परंतु तरतूद नसेल तर नाटयगृह कसे बांधणार हा प्रश्न निर्माण होतो. पैसे मिळणार नाहीत त्यामुळे आराखडा तयार होत नाही अनेक जिल्हे असे आहेत की जेथे नाटयगृह नसल्याची खंत समितीने व्यक्त केली असता यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ३ वर्षापूर्वी शासनाच्या ही गोष्ट लक्षात आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी नाटयगृह बांधण्याचा प्रयत्न झाला. साधारणपणे १२ ते १३ जिल्हे असे आहेत की ज्या ठिकाणी नाटयगृह नाही. परंतु गेल्या ३ वर्षात ही संख्या कमी करण्याचा प्रयत्न झालेला आहे. आता फक्त ४-५ जिल्ह्याच्या ठिकाणी नाटयगृह नाही. नाटयगृह नसलेल्या जिल्हयांची संख्या कमी करीत आणलेली आहे असे समितीच्या निदर्शनास आणले असता समितीने ४-५ जिल्हे नाट्यगृह नसलेले आहेत असे म्हणणे बरोबर होणार नाही. अनेक जिल्हयांच्या ठिकाणी मोठे नाटयगृह नाही. याबाबत विभागाने माहिती द्यावी आणि नंतर समितीला अवगत करावे असे सांगितले. तसेच नाटयगृह बांधण्यासाठी किती तरतूद केली जाते, अशी विचारणा केली असता यावर सचिवांनी पुढील खुलासा केला १०-१२ कोटी रूपयांची तरतूद केली जाते. नाटयगृह बांधणे या योजनेअंतर्गत मागील दोन वर्ष सन २०१०-२०११ - रू. ७.०० कोटी, सन २०११-२०१२ रू. १०.०० कोटी अशी तरतूद केल्याचे सांगितले. समितीने या अनुषंगाने विभागीय स्तरावर अशी नाटयगृहे असून जिल्हा स्तरावर नसल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली. विभागीय सचिवांनी यावर जिल्हा पातळीवर काही ठिकाणी उदा. गोंदिया येथे नाटयगृह असल्याचे सांगितले व नगरपरिषदा किंवा महानगरपालिका यांच्या सहकार्याने नाटयगृहे बांधली जातात. यावर्षी अकोला येथे नाटयगृह बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद करुन जिल्हावार व वर्षनिहाय खालील प्रमाणे माहिती समितीला दिली.

१२.३५ राज्य योजनेनुसार हप्त्या-हप्त्याने नाटयगृह अर्थसहाय्याची निधी शासन वितरीत करीत असते. त्यानुसार सन २००९-२०१० मध्ये घुळे, बीड आणि बुलढाणा या नाटयगृहांसाठी अर्थसहाय्याचे हप्ते वितरीत करण्यात आले. सन २०१०-२०११ मध्ये सिंधुदूर्ग व गोंदिया ही नवीन जिल्हा नाटयगृहांना प्रशासकीय मान्यता देऊन पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला. तसेच उस्मानाबाद, रत्नागिरी, अहमदनगर व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांना विशेष पॅकेज अंतर्गत निधी वितरीत करण्यात आला. सन २०११-२०१२ मध्ये कोणताही परिपूर्ण

प्रस्ताव प्राप्त झला नाही. मात्र पॅकेज अंतर्गत कुसुमाग्रज प्रतिष्ठानासाठी दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला. सन २०१२-२०१३ मध्ये परभणी जिल्हा नाटयगृहास प्रशासकीय मान्यता व पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला. वाशिम व जळगाव जिल्हा नाटयगृहाचा प्रस्ताव कार्यवाहीत आहे. पुढील जिल्हा मुख्यालयी शासकीय नाटयगृह नाहीत. परंतु त्यांच्याकडून नाट्यगृह बांधण्याबाबतचे प्रस्तावही अप्राप्त आहेत. उदा. अकोला, भंडारा आणि रायगड. यावर समितीने अनेक विषय समितीपुढे येत असतात. त्यातील काही विषय जुनेच असतात. त्याची माहितीसुद्धा समितीला द्यावी. एकंदरीतच खात्याच्या धोरणाविषयी एक सविस्तर टिप्पणी समितीला सादर करावी. त्याचबरोबर रिक्त पदांबाबतची माहिती, तसेच विभागामार्फत पुढे कोणत्या योजना हाती घ्यावयाच्या आहेत, नवीन योजना कोणत्या आहेत याची माहिती द्यावी. असे निदेश समितीने संबंधितांना दिले. समितीने सचिवांच्या निदर्शनास असेही आणून दिले की, संग्रहालयाच्या संदर्भात एक बैठक लावणे आवश्यक आहे. अनेक मौल्यवान व सुंदर वस्तु आहेत परंतु त्यासाठी संग्रहालय नाही. पुढच्या पिढीला माहिती होण्याच्या दृष्टीने या वस्तू संग्रहित करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबतची सविस्तर टिप्पणी तयार करून समितीला देण्याबाबत आदेश दिले. सन २००८-२००९ आणि २००९-२०१० या दोन वर्षातील महालेखाकारांच्या परिच्छेदावर कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले असता विभागीय सचिवांनी सन २००८-२००९ तसेच २००९-२०१० या दोन्ही वर्षातील विनियोजन लेख्यांबाबतच महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्राप्त परिच्छेदांबाबत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापाल कार्यालयाकडून तपासून त्या बाबतची माहिती विधानभंडळ सचिवालयास सादर करण्यात आली आहे असे समितीस अवगत केले.

१२.३६ समितीने भारतीय चित्रपटसृष्टीला नुकतीच १०० वर्ष पूर्ण झालेली आहेत. दादासाहेब फाळके यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. त्यानिमित्ताने एखादा विशेष कार्यक्रम नाशिक या त्यांच्या जन्मस्थानी होणे आवश्यक आहे असे सांगितले असता. विभागीय सचिवांनी यासंदर्भात एक समिती स्थापन करून कार्यक्रम निश्चित केलेला आहे. सहा महसुली विभागात आणि मुंबई व कोल्हापुर याठिकाणी कार्यक्रम होणार असून गोरेगाव येथे म्युझियमचे काम सुरू झालेले असल्याचे सांगुन सदर प्रकल्प खूप मोठा प्रकल्प असल्याने जागतिक दर्जाचे हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेचे चित्रपट असल्याचे सांगितले. यावर समितीने मराठी

सिनेमांच्या बाबतीत देखील कार्यक्रम होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन करुन पुढे अशी विचारणा केली की, गोरेगाव चित्रनगरीत जागा कोणाची आहे. यावर विभागीय सचिवांनी शासनाची जागा आहे. मूळ वन विभागाची जागा होती. आता ७/१२ वर महामंडळाची नोंद असून सुभाष घई यांच्या व्हिसलींग वूडला २००० साली २० एकर जागा दिली होती. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे १४.५ एकर जागा गेल्या तीन महिन्यात शासनाच्या ताब्यात दिलेली आहे. आता ५.५ एकर शिल्लक असल्याची माहिती समितीस दिली. ५.५ एकर जमीन अजून श्री.घई यांच्या ताब्यात असल्याचे तसेच ॲडलॅबला २ एकर जमीन दिलेली आहे. त्यांना उत्पन्न मिळते त्याच्या ३ टक्के महामंडळाला १ कोटी रुपये मिळतात असे सांगितले. समितीने यासंदर्भात अशी विचारणा केली की, रिलायन्सला कशासाठी जमीन दिली, यावर पोस्ट प्रोडक्शनसाठी रिलायन्सला जागा दिल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर समितीने अशी विचारणा केली की, ॲडलॅब कंपनीस करारनामा करुन २ एकर जमीन दिली. करारनामा करुन दिलेल्या जमिनींची कोणालाही परस्पर विक्री करता येत नाही. जॉईंट व्हेंचर केले असले तरी अशा जमिनी विक्री करता येत नाहीत असे निदर्शनास आणून दिले असता त्याबाबत विभागीय सचिवांनी माहिती देताना सदरहू कंपनी पुढे टेकओव्हर केली आहे. सदर करारनामा २० वर्षासाठी केलेला आहे. त्या ठिकाणी जे उत्पन्न मिळते त्याच्या ३ टक्के उत्पन्न शासनाला मिळते आहे. ज्या प्रमाणे करारनामा करण्यात आलेला आहे, त्याप्रमाणे त्यांच्याकडून पेमेंट मिळत असून करारनाम्यात सदर जमिनीचे भाडे २ लाख रुपये ठरलेले आहे. तसेच प्रोसेसिंग फी मधून ३ टक्के प्रमाणे १ ते १.२५ कोटी रुपये उत्पन्न मिळत आहे. सदर करार हा २० वर्षासाठी करण्यात आलेला आहे असे समितीस सांगितले.

१२.३७ एखादा साखर कारखाना अथवा अन्य उद्योग उभारणीसाठी शासकीय जमीन देण्यात येते. त्या जमिनीचे बाजारमूल्य जसे असेल, त्या प्रमाणे त्या उद्योजकास स्टॅम्प डयूटी भरावी लागते. आपण सदर कंपनीस २ एकर जमीन दिलेली आहे. त्या जमिनीचे वर्षाला भाडे फक्त २ लाख रुपये ठरविले आहे. आज त्या जमिनीचे बाजारमूल्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. एकंदरीत तेथील जमिनीचे बाजारमूल्य पाहता सदर जागेचे ठरविलेले भाडे खूपच कमी वाटते. त्यात वाढ झाली पाहिजे असे समितीने सुचविले.

१२.३८ यावर विभागीय सचिवांनी सदरहू जमिनीचा करारनामा १९९७ मध्ये झालेला आहे. प्रोसेसिंग फी च्या माध्यमातून तेथे जेवढे उत्पन्न मिळते त्याच्या ३ टक्के म्हणजे जवळपास १ ते १.२५ कोटी रुपये शासनास प्राप्त होतात, अशी माहिती दिली.

१२.३९ यावर समितीने समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, करारात कायदेशीर तरतुदी केलेल्या नसतील तर तशा तरतुदी नव्याने करुन घ्याव्यात. एखाद्याने राहण्यासाठी जागा घेतली तर त्यास बाजारमूल्याप्रमाणे स्टॅम्प डयूटी भरावी लागते. तशी कायद्यात शासनाने तरतूद केलेली आहे. हा करार पूर्वी करण्यात आलेला आहे, त्यास बराच कालावधी झालेला आहे. आता परिस्थिती बदलली आहे. जमिनींच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. रेडी रेकनरमध्ये देखील बदल झालेला आहे. हा उद्योग करोडो रुपयांची उलाढाल करणारा असून त्यांच्याकडून फक्त २ लाख रुपये भाडे घेण्यात येत असेल तर ते योग्य नाही. सदरहू भाडे वाढविण्यास कायदेशीर अडचणी येत असतील तर त्या समितीच्या निदर्शनास आणून द्याव्यात. याबाबतीत समिती शासनाला शिफारस करील. काही कायदेशीर अडचणी असतील तर त्याबाबतीत शासनास नव्याने कायदा करण्यास शासनास शिफारस करू मुंबई महानगरपालिकेने अनेक जमिनी ९९ वर्षाच्या करार करुन लीजवर दिलेल्या आहेत. परंतु महानगरपालिकेने पूर्वीच्या कायद्यांमध्ये बदल करुन जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्यानुसार भाडयात वाढ केलेली आहे.

१२.४० गोरेगाव येथील चित्रनगरीची निर्मिती तत्कालिन मुख्यमंत्री श्री. शरदराव पवार यांनी केली. शासनाच्या वतीने त्या ठिकाणच्या जागेवर सांस्कृतिक स्थळ उभे रहावे, चांगल्या दर्जाची फिल्मसिटी उभारावी आणि त्यातून चांगल्या मराठी, हिंदी चित्रपटांची निर्मिती व्हावी असा उद्देश आहे. परंतु या चित्रनगरीमध्ये मराठी चित्रपट निर्मात्यांना सवलती मिळत नाहीत. मराठी चित्रपट निर्मात्यांना सवलती मिळणार नसतील तर त्या चित्रनगरीचा काय उपयोग आहे? मराठी चित्रपट निर्मात्यांना जास्तीत जास्त सवलती उपलब्ध करुन देण्याबाबत आपल्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. या ठिकाणचा २० ते २५ टक्के भाग मराठी चित्रपट निर्मितीसाठी ठेवण्यासंदर्भात आपणाकडून योग्य त्या उपाययोजना कराव्यात, तसेच सदर कंपनीस २ एकर जमिनी संदर्भातील करारनामा १९९७ साली झालेला आहे. त्यात वर्षाला २ लाख रुपये भाडे ठरवून दिलेले आहे. सदरहू भाडयात वाढ करण्यासंबंधी समिती शासनास

शिफारस करील. परंतु सदरहू भाडयात वाढ करणे तसेच मराठी चित्रपट निर्मितीसाठी चित्रनगरीमध्ये २५ टक्के भाग उपलब्ध देणे या दोन्ही मुद्याची माहिती समितीला सादर करण्यात यावी असे आदेश दिले. चित्रपट महामंडळ नफ्यात आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता महामंडळ १० ते १२ कोटी नफ्यात असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.४१ पुणे येथे महात्मा फुले संग्रहालयाच्या बाबतीत बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु अद्यापही बैठक झालेली नाही. ती बैठक कधी घेण्यात येणार आहे? अशी समितीने विचारणा केली असता या बाबतीत सप्टेंबर, २०१२ मध्ये बैठक घेण्यात येणार आहे असे सचिवांनी सांगितले.

१२.४२ समितीने पुणे येथे शिवसृष्टीची निर्मिती व त्याचा विकास करण्यासाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे पाठविलेला नाही. त्या बाबतची सद्य:स्थिती काय आहे? तसेच शिवसृष्टीचा विकास करण्यासंबंधीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेकडून शासनाकडे पाठविला असून शासनाने या विषयासंबंधीचा प्रस्ताव आला तर त्यास मान्यता देण्यात येईल असे सांगितले आहे परंतु शिवसृष्टीचा प्रस्ताव महापालिकेकडून शासनाकडे आलेला नव्हता असे विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले.

१२.४३ शिवसृष्टीच्या प्रस्तावास शासकीय मान्यता आणि शिवसृष्टीस शासनाचे आर्थिक सहाय्य हे वेगवेगळे विषय आहेत. या प्रस्तावाच्या बाबतीत पुणे महानगरपालिकेने जेवढया गतीने पावले उचलावयास पाहिजे होती, तेवढया गतीने उचललेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पुण्याचा विकास आराखडा तयार झालेला आहे. त्यात यासाठी जागा आरक्षित करुन ठेवण्यास सांगण्यात आले आहे. महानगरपालिका आणि मेट्रो रेल्वे यांच्यात वाद होता. त्यामुळे या प्रस्तावाच्या कामास सुरुवात झाली नसल्याची खंत समितीने व्यक्त केली. दादासाहेब फाळके यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. सिनेमा सृष्टी सुरु होऊन १०० वर्षे झालेले आहे. दादासाहेब फाळके यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नाशिक हे त्यांचे जन्मस्थळ आहे. त्यामुळे या तरतुदीमधून नाशिक येथे दादासाहेब फाळके यांच्या सन्मानार्थ एखादा प्रकल्प उभा करण्याची संकल्पना शासनासमोर आहे काय? अशी विचारणा समितीने केली. तसेच ती तरतूद खर्च करताना नाशिक शहराचा विचार

करावा. फिल्म फेस्टीवल वेगवेगळया ठिकाणी आयोजित केला जातो. पुणे येथे फिल्म फेस्टीवल झाला, पुण्यातील एकाही आमदारांना संयोजकांनी निमंत्रण दिले नाही हे बरोबर नाही. ज्या ठिकाणी फिल्म फेस्टीवल होईल त्या ठिकाणच्या आमदारांना संयोजकांनी निमंत्रण दिले पाहिजे असे समितीने सूचित केले असता पुणे फिल्म फेस्टीवलच्या आयोजकांनी लोकप्रतिनिधींना निमंत्रण पाठविण्यात आल्याचे पुरावे विभागाला सादर करण्यात आले असल्याची बाब विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली.

१२.४४ प्रेक्षकांसाठी २५० रुपयांमध्ये १०० मराठी चित्रपट दाखविण्याचा उपक्रम श्रीमती अलका कुबल यांनी सुरु केला आहे. परंतु चित्रपटाच्या प्रवेशिकेवर मात्र करमणूक कर आकारला जातो तो आकारला जाऊ नये अशीही त्यांनी मागणी केलेली आहे. अशा प्रकारे २५० रुपयात १०० मराठी चित्रपट दाखविण्याचा उपक्रम सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी सुरु असतांना या उपक्रमास करमणूक करातून सूट देण्यात येईल काय? अशी विचारणा केली त्यावर विभागीय सचिवांनी श्रीमती अलका कुबल यांचेशी संपर्क साधला असता, अशी माहिती मिळाली की, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाने पुणे शहरात १०० मराठी चित्रपट दाखविण्याचा उपक्रम भारतीय चित्रपटसृष्टीच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून राबविला होता. या मराठी चित्रपट महोत्सवासाठी कोणताही करमणूक कर आकारण्यात आला नाही. किंबहुना राज्यात मराठी चित्रपटांना करमणूक कर आकारला जात नाही, अशी माहिती समितीला दिली. सन २००९-२०१० व २०१०-१०११ या वर्षाचे खर्चमेळाचे काम ऑक्टोबर, २०१२ पर्यंत पूर्ण करावे असे विभागास समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

१२.४५ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन अहवालासंदर्भात मागणी क्र.झेड्डी-१ अंतर्गत मराठी चित्रपटांना शासनाकडून रु.२५ लाखाचे अनुदान देण्यात येते. सदरहू अनुदान हे दर्जेदार व गुणवत्तापूर्वक चित्रपटांना प्रोत्साहन मिळावे तसेच अशाप्रकारचे दर्जेदार चित्रपट बनविणाऱ्या चित्रपट निर्मात्यांना आर्थिक सहाय्य् करण्याच्या उद्देशाने ही योजना राज्य शासनाने सुरु केली आहे. परंतु, वस्तुस्थिती पाहाता, खरचं या योजनेचा लाभ उत्कृष्ट व दर्जेदार चित्रपट बनविणा-यांना होतो काय याबाबत समितीने साशंकता व्यक्त केली. केवळ एखाद्याची हौस भागविण्याकरिता चित्रपट

तयार करण्यात येऊन शासनाकडून अनुदान पदरात पाडून घेतली जाते की काय, असे सध्याचे काही मराठी चित्रपट पाहून वाटते.

१२.४६ चित्रपट निर्मितीला सहाय्य करण्याच्या योजनेसंदर्भात चित्रपट क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असलेली समिती नियुक्त करण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. या तज्ञांच्या समितीने चित्रपट निर्मितीचा वाढलेला खर्च विचारात घेता, चित्रपट निर्मितीसाठी देणा-या अनुदानामध्ये चित्रपटाच्या दर्जाप्रमाणे अनुदान द्यावे असे सुचविले असून त्यादृष्टीने कार्यपद्धतीत काही बदलही प्रस्तावित केलेले आहे. **या समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर तातडीने योग्य ती कार्यवाही करुन सदरहू तज्ञांचा अहवाल हा मंत्रीमंडळापुढे लवकरात लवकर सादर करण्याची कार्यवाही विभागाने करावी जेणेकरुन गुणवत्तापूर्ण, गुणात्मक व दर्जेदार चित्रपटांनाच आर्थिक सहाय्य शासनाकडून देता येईल व सध्याप्रमाणे अनुदान प्राप्त चित्रपटांच्या संख्येमध्ये मर्यादा घालता येईल अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

१२.४७ पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.ल.देशपांडे अकादमी, हिंदी, सिंधी, गुजराती अकादमी, पुराभिलेख संचालनालय अशाप्रकारच्या संस्था येतात. समितीने या विभागातील एकूण मंजूर पदे व रिक्त पदांचा आढावा घेतला असता, समितीच्या निदर्शनास या विभागामध्ये ब-याच प्रमाणात रिक्त पदे असल्याचे दिसून आले. **उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विविध संस्था या विभागाच्या अंतर्गत येत असल्याने या संस्थामध्ये काम करण्याकरिता मनुष्यबळ उपलब्ध नसेल तर या संस्थाच्या कार्यपद्धतीवर विपरित परिणाम होत असल्याने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

१२.४८ राज्यांमध्ये नागपूर, सिंदखेड राजा, पैठण, नाशिक, माहूर, सांगली, कोल्हापूर, सातारा, औंध, उस्मानाबाद इत्यादी १३ ठिकाणी शासकीय वस्तुसंग्रहालये आहेत. या संग्रहालयांना प्रत्येकी केवळ रु.१८,०००/- एवढे वार्षिक अनुदान देण्यात येते. सदरहू रक्कम अत्यंत तुटपुंजी असून शासनाने ब-याच वर्षांमध्ये या अनुदानाच्या रकमेत वाढ केलेली नाही. या संग्रहालयांचा देखभाल-दुरुस्ती खर्च, कर्मचा-यांचे वेतन, आस्थापना खर्च, वीज खर्च,

पाणीपट्टी, स्थानिक पालिका कर हा सर्व खर्च एवढ्या तुटपुंज्या अनुदानातून भागविणे शक्य नसल्याने शासन स्तरावर या प्रकरणी तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे समितीने मत व्यक्त केले. **या वस्तुसंग्रहालयांचे प्रश्न मार्गी लावण्याच्यादृष्टीने शासनाने सचिव स्तरावर अत्यंत तातडीने बैठक बोलावून राज्यातील सर्व संग्रहालयांच्या संचालकांच्या अडचणी व त्यांच्या मागण्या विचारात घ्याव्यात अशी समिती शिफारस करीत आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी देखील समिती शिफारस करीत आहे.**

१२.४९ राज्य शासनाकडून कलावंतांना आर्थिक सहाय्य दिले जाते. "अ" वर्गातील जो राष्ट्रीय पातळीवरील कलावंत आहे त्याला दरमहा रु.१४००/- व "ब" वर्गातील राज्य पातळीवरील कलावंतास दरमहा रु.१२००/- व "क" वर्गातील स्थानिक जिल्हा पातळीवरील कलावंतास दरमहा रु.१०००/- एवढे अनुदान दिले जाते. सध्याच्या राहणीमानाच्या काळात हे अनुदान अत्यंत तुटपुंजे असून त्यामध्ये कलाकाराने विशेषत: वयोवृद्ध कलाकाराने जीवन कसे जगावे हा देखील एक प्रश्नच आहे तसेच हे अनुदान देण्याकरिता जे निकष वापरले जातात त्यासंदर्भात देखील शासनाने पुनर्विचार करणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. सबब, त्याबाबत शासनाने आवश्यक तो निर्णय घ्यावा.

१२.५० समितीस मिळालेल्या माहितीमध्ये आर्थिक अनुदानास पात्र कलावंतांची निवड करण्यासंदर्भात जिल्हा पातळीवर पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असल्याची माहिती मिळाली. या समितीवर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, गट विकास अधिकारी, तहसिलदार इत्यादींचा समावेश आहे. परंतु, या समितीवर स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश नसल्याबद्दल समितीने सखेद आश्चर्य व्यक्त केले. **लोकप्रतिनिधी हा सतत जनतेच्या संपर्कात येत असल्याने या लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघातील क्षेत्रातील कलाकारांची सखोल माहिती असल्याने लोकप्रतिनिधींना आर्थिक अनुदानास पात्र कलावंतांची निवड करण्यासंदर्भात जिल्हा पातळीवरील समितीवर स्थान देण्यात यावे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

१२.५१ कला, सांस्कृतिक कार्य, राज्य नाट्यमहोत्सव याकरिता देखील शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. परंतु, विभागातर्फे वरील उद्दीष्टाकरिता प्राप्त झालेला निधी

देखील संपूर्णपणे खर्च न करता शिल्लक राहत असल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. **कलेला प्रोत्साहन देण्याऐवजी उपलब्ध झालेला निधी अखर्चीत ठेवून विभाग कलावंतावर अन्याय करीत असून असा अखर्चीत निधी ठेवून काय साध्य केले जाते याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. त्यामुळे यापुढील काळात राज्यनाट्य महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम याकरिता प्राप्त होणा-या निधीचे योग्यप्रकारे नियोजन करुन त्यांचा लाभ कलाकारांना कसा होईल यादृष्टीने विभागाने योग्य ते नियोजन करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

१२.५२ प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक मोठे नाट्यगृह असावे असे शासनाचे धोरण आहे. परंतु, साक्षीच्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हाधिका-यांना शासनाच्या धोरणाविषयी काहीच माहिती नाही. राज्यामध्ये साधारणत: १२ ते १३ जिल्हे असे आहेत की, या जिल्ह्यांमध्ये नाट्यगृहाची सोय नाही. जिल्ह्याधिका-यांना या योजनेची माहितीच नसल्यामुळे त्यांच्याकडून शासनास नाट्यगृह उभारण्याबाबत प्रस्तावच प्राप्त होत नाहीत. त्यामुळे नाट्यगृहे उभारण्याकरिता अंदाजपत्रकात केलेली तरतूद अखर्चीत राहते हे संयुक्तिक नाही. **समिती जिल्हास्तरावर नाट्यगृहे नसल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करते व अकोला, भंडारा, रायगड या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मुख्यालय नाट्यगृह बांधण्याचे प्रस्ताव शासनाकडे तातडीने सादर करावे अशी शिफारस करत आहे व शासनाने देखील यासंबंधी वेळोवेळी आढावा घेऊन संबंधितांकडे पाठपुरावा करावा व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात उपलब्ध करुन द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१२.५३ गोरेगाव येथील चित्रनगरीमध्ये मूळ वन विभागाची असलेली जागा शासनाने श्री.सुभाष घई यांच्या व्हिसलिंग वुड या कंपनीला सन २००० साली २० एकर जागा दिली. यापैकी ५.५ एकर जमिन श्री.सुभाष घई यांच्या ताब्यात असून ॲडलॅब या कंपनीला २ एकर जमिन दिलेली आहे. यातून मिळणा-या उत्पन्नाच्या ३% रक्कम चित्रपट महामंडळाला सदरहू कंपनी देते. ॲडलॅब या कंपनीशी २० वर्षांचा करारनामा केला असून सदरहू जमिनीचे भाडे वार्षिक रु.२ लाख ठरलेले आहे. परंतु, सदरहू करारनामा हा सन १९९७ मध्ये झाला असून या दरम्यानच्या काळामध्ये जमिनीचे बाजारमूल्य फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. **जागेचे ठरवलेले भाडे हे जमिनीच्या बाजारमुल्यांपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे सदरहू भाड्यामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे असे समितीचे मत झाले. भाडेकरार केला असल्यामुळे यातील**

कायदेशीर बाबी तपासून व विधी तज्ञांचा सल्ला घेऊन सध्याच्या बाजारमुल्याचा विचार करुन भाडेवाढीसंदर्भात शासनास ठोस प्रस्ताव सादर करावा व यासंबंधी केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.

१२.५४ गोरेगाव येथील चित्रनगरीमध्ये मराठी सिनेनिर्माते, दूरदर्शनवाहिन्यांचे निर्माते यांना तेथे चित्रिकरण करण्याकरिता जे भाडे आकारले जाते ते या निर्मात्यांच्या आर्थिक क्षमतेपेक्षा फारच जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजधानीत चित्रनगरी असून देखील चित्रपट महामंडळ हे मराठी चित्रपट निर्माते व मालिका निर्मात्यांना सवलतीच्या दरामध्ये चित्रिकरणाकरिता जागा वा स्टुडिओ वापरण्यास देत नाही ही अतिशय खेदजनक बाब आहे. **त्यामुळे मराठी चित्रपट/मालिका निर्मात्यांना वेगळ्या सवलती देऊन त्यांना या क्षेत्रामध्ये प्रोत्साहित करणे आवश्यक असल्याने गोरेगाव येथील चित्रनगरीमधील जागेमध्ये चित्रीकरण करण्याकरिता सवलत देण्यात यावी अशी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी देखील समिती शिफारस करीत आहे.**

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

बुधवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(४) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(९) श्री.विवेक पंडित, वि.स.स.
(१०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(११) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

निमंत्रित

(१३) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग :

श्री.अे.बी. कुलकर्णी, प्रधान सचिव.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

१) श्री.संजय कुमार, प्रधान सचिव.
२) श्री.भुषण गगराणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, मुंबई

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डब्ल्यू -२ व डब्ल्यू ४ संदर्भात प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि अनुदान क्र. झेडडी-१ व झेडडी-५ संदर्भात अप्पर मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांची साक्ष घेण्यात आली

गुरुवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनील केदार, वि.स.स.
(५) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
(६) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय सावकारे,वि.स.स.
(८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(९) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(११) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१२) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१३) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.स.स.
(१४) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(१५) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१६) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती एम. हिमविन्दु, वरिष्ठ उप महालेखापाल.

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वित्त विभाग :

१) श्री. के. शिवाजी, प्रधान सचिव
२) श्री. संजय भाटिया, विक्रीकर आयुक्त

नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव.

नियोजन विभाग

श्री.के.पी.बक्षी, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. जी-१, जी-२, जी-४ व जी-५ संदर्भात प्रधान सचिव, वित्त विभाग, अनुदान क्र. ओ-३ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन (रो.ह.यो) विभाग आणि अनुदान क्र. ओ-४ व ओ-९ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेण्यात आली

बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.५२ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(५) श्री. बदामराव पंडीत , वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(८) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(९) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१०) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(११) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(१२) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१३) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१४) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
(१५) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

कृषी विभाग

श्री.सुधीर गोयल, अपर मुख्य सचिव.

गृहनिर्माण विभाग

(१) श्री. गौतम चॅटर्जी, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग
(२) श्री. सतिश गवई, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा

<u>दूग्धव्यवसाय विकास विभाग</u>

१) श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव
२) श्री.जयंत गायकवाड, आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. क्यू-३ संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, तसेच अनुदान क्र. डी-३ संदर्भात अपर मुख्य सचिव, कृषी विभाग आणि अनुदान क्र. डी-६ संदर्भात प्रधान सचिव दुग्धव्यवसाय विकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

गुरुवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.०७ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(७) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(८) श्री.विवेक पंडित, वि.स.स.
(९) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१०) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(११) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.स.स.

निमंत्रित

(१२) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
(१३) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

उद्योग विभाग

(१) श्री.ए.छत्रपति शिवाजी, प्रधान सचिव, उद्योग
(२) श्री.संजय सेठी, सचिव व विकास आयुक्त (उद्योग)

उर्जा विभाग

(१) श्री.आनंद लिमये, महासंचालक, महाऊर्जा,पुणे
(२) श्री. आशिष शर्मा, व्य.सं. महाजनको
(३) श्री. अ.मेहता, व्य.सं. महावितरण
(४) श्री. अरविंद सिंह, व्य.सं. महापारेषण, मुंबई

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. के-७ संदर्भात प्रधान सचिव, उद्योग विभाग, अनुदान क्र. के-११ संदर्भात प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(५) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(७) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(८) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(११) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१२) श्री.विवेक पंडित, वि.स.स.
(१३) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१४) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१६) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

पाणीपुरवठा विभाग

(१) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव.

(२) श्री.ए.के. जैन, प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय (तत्कालीन प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

<u>नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग</u>

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. वाय-२ संदर्भात प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अनुदान क्र. ओ-३ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन (रो.ह.यो.) विभाग आणि अनुदान क्र. एफ-२ संदर्भात प्रधान सचिव (१) व (२), नगरविकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

गुरुवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(३) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(१७) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(१८) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
(१९) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(२०) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(२१) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(२२) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(२३) श्री.विवेक पंडित, वि.स.स.
(२४) श्री.नितिन सरदेसाई, वि.स.स.
(२५) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२६) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(२७) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२८) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
(२९) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

कृषी विभाग

श्री.सुधीर गोयल, अपर मुख्य सचिव.

दूग्धव्यवसाय विकास विभाग

१) श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव.
२) श्री.संजय चहल, सचिव.
३) श्री.जयंत गायकवाड, आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डी-३ व डी-४ संदर्भात अपर मुख्य सचिव, कृषी विभाग, तसेच अनुदान क्र. डी-६ संदर्भात प्रधान सचिव दुग्धव्यवसाय विकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

मंगळवार, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(५) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(९) श्री.विवेक पंडित, वि.स.स.
(१०) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(११) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१२) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१३) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) श्री.अनंतरामन आर. उप महालेखापाल (लेखा व व्हीएलसी)
(२) श्री.सुरेश एस.जगताप, उप महालेखापाल (महसूल विभाग)

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

श्री.ज.स.सहारिया, अपर मुख्य सचिव (अति.कार्यभार उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डब्ल्यू - २ व डब्ल्यू - ४ संदर्भात अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे दुपारी ३.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी १७.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री.विवेक पंडीत, वि.स.स.
(४) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(५) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

निमंत्रित

(६) श्री.विनायक राऊत, वि.प.स.
(७) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(२) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

साक्षीदार :

महिला व बाल विकास विभाग :

१) श्री.उज्जवल उके, प्रधान सचिव
२) श्री.विजय क्षीरसागर, सहायक आयुक्त (भिक्षा प्रशासन)
३) श्री.सतिश प्र.श्रावगे, कार्यकारी अभियंता, (इमारती बांधकाम विभाग, मुलुंड)
४) श्री.जी.के.आरवेल,

गृह विभाग :

श्रीमती मेघा गाडगीळ, प्रधान सचिव

सार्वजनिक बांधकाम विभाग :

१) श्री.श्यामल कुमार मुखर्जी, सचिव
२) श्री.ए.बी.गायकवाड, अधीक्षक अभियंता (सा.बा.मंडळ,ठाणे)

सामाजिक न्याय विभाग :

१) श्री.हितेश विसपुते, सहायक संचालक (लेखापरिक्षण)
२) श्री.बी.एस.तायडे

नगर विकास विभाग :

श्रीमती सीमा ढमढेरे, सह सचिव

लोकलेखा समितीने सन २०१२-२०१३ या वर्षाच्या दहाव्या अहलालात नमूद केल्याप्रमाणे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे भेट देऊन विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(३) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(१५) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(१६) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(१७) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१८) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(१९) श्री.बदामराव पंडीत, वि.स.स.
(२०) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(२१) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(२२) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

निमंत्रित

(२४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह विभाग :

श्री. अभिताभ राजन, अपर मुख्य सचिव.

महिला व बाल विकास विभाग :

१) श्री.उज्जवल उके, प्रधान सचिव
२) श्रीमती सोनाली वायंगणकर, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
३) श्री.जी.के.आरवेल, अधिक्षक, भिक्षा गृह,चेंबूर,मुंबई.

सार्वजनिक बांधकाम विभाग :

श्री.श्यामल कुमार मुखर्जी, सचिव

सामाजिक न्याय विभाग :

१) श्री.आर.डी.शिंदे, सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एक्स-१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम व सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(३) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री.विवेक (भाऊ) पंडीत, वि.स.स.
(७) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(८) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(९) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१०) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महिला व बाल विकास विभाग :
१) श्री.उज्जवल उके, प्रधान सचिव
२) श्रीमती कुसुम, महाव्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ
३) श्रीमती सोनाली वायंगणकर, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

सार्वजनिक बांधकाम विभाग :
श्री.श्यामल कुमार मुखर्जी, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एक्स-१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(७) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(९) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१०) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(११) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१३) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
(२) श्रीमती शीला जोग, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महिला व बालविकास विभाग :

श्री.उज्वल उके, प्रधान सचिव

सार्वजनिक बांधकाम विभाग :

(१) श्री.श्यामल कुमार मुखर्जी, सचिव
(२) श्री.ए.बी.गायकवाड, अधीक्षक अभियंता

भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

(५) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(१०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(११) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(१२) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.
(५) श्री.सोमनाथ सानप, कक्ष अधिकारी.

समितीने अकरावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व संमत केला.